ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण.

---

# आमचीं घरें.

JAN 27 1934
Poona City General Library.
Class——No——

हा निबंध

नारायण विसाजी रानडे, वकील

यांनीं

1451

लिहिला,

तो

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए.

संपादक ग्रंथमाला,

यांनीं

पुणे नगर वाचन मंदिर पुणे
दाखल अंक
वांचीक 864| Vij
दिनांक 15/7/76 किंमत-

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापविला.

---

जानेवारी १९०२.

अ १८

# आमचीं घरें.

मद्रासच्या " इंडिअन रिव्ह्यु " नांवाच्या मासिकपुस्तकाच्या नोव्हें-बरच्या अंकांत दोन लेख आलेले आहेत. एक मुंबईच्या माजी गव्हरनर सर रिचर्ड टेंपल साहेबांनी लिहिलेला असून, दुसरा रा० रा० एम्. आर. पारख यांनीं लिहिलेला आहे. दोनीही लेखांतील विषय " शहरांत राहणाऱ्या गरीब लोकांचीं घरें " हा आहे. पहिला इंग्लंदांतील गरीब लोकांसंबंधाचा व दुसरा हिंदुस्थानांतील गरीबांसंबंधाचा आहे.

दोनीही लेखांचा मथितार्थ, मोठे वस्तीच्या व कारखान्याच्या शहरांत मोलमजुरीवर निर्वाहा करणाऱ्या लोकांचीं घरें चांगलीं नाहींत, व त्यामुळें सदर घरांत राहणाऱ्या लोकांचे हाल होतात, त्यांची प्रकृति बिघडते व ते अल्पायुषी होतात असा आहे. नामदार टेंपल साहेबांच्या मतें ही स्थिति सुधारण्यास तीन उपाय आहेत.

( १ ) घराच्या मालकांनींच आरोग्यशास्त्रास धरून बांधलेलीं दुसरीं घरें गरिबांस राहण्याकरितां भाड्यानें देणें.

( २ ) अशीं नवीं घरें बांधणाऱ्या व्यापारी मंडळ्या स्थापन होऊन त्यांनीं बांधलेल्या शहराबाहेरील घरांत राहण्याची सोय होणें.

( ३ ) म्युनिसिपालिट्यांनीं सदर प्रकारचीं गरीबांकरितां घरें बांधणें.

नंबर १।२ चे उपाय व्यापारी तत्वावर चालणारे असून योग्य आहेत, व त्याप्रमाणें इंग्लंदांत थोडाबहुत प्रयत्न ठिकठिकाणीं चालूही आहे; परंतु तिसऱ्या रीतीनें व्यवस्था करणें तर म्युनिसिपालिट्यांनीं घातलेल्या रकमेचें त्यांस द्यावें लागणारें व्याज व ऐनाची फेड भाड्यांतून जाहली पाहिजे; नाहींतर अगोदरच असह्य कर्जाच्या पेंचीं आलेल्या म्युनि-सिपालिट्यांवर जबर बोजा पडेल व तो परंपरेनें कर देणाऱ्या लोकांसच सोसावा लागेल. ह्मणून तो उपाय योग्य विचारानंतर अमलांत यावा असें नामदारांचें मत आहे.

रा. रा. पारख यांच्या मतें हिंदुस्थानांतील मोलमजूरी करून शहरांत राहणाऱ्या गरीब लोकांस आरोग्यशास्त्रास अनुसरून बांधलेलीं घरें मिळण्यास पैशाची वाण नाहीं. त्यांच्या मतें मुख्य अडचणी चार आहेत.

१ हिंदुस्थानांत उष्ण हवेमुळें पदार्थ जलद कुजतात ह्मणून इंग्लंदासारख्या थंड हवेंतील शास्त्रीय उपाय जशाच्या तसे येथें लागू करणें वाजवी नाहीं.

२ जनसमूहांत दिसत असलेले सुधारणेविषयीं पराङ्मुखता.

३ लोकांमध्यें वसत असलेलें आरोग्य शास्त्राचें अज्ञान.

४ गरीबांची शोचनीय निर्धनता.

त्यांचें असेंही ह्मणणें आहे कीं, जे लोक कायद्याचा अम्मल कडक रीतीनें केला तर सुधारणा होईल असें ह्मणतात, ते मोठी चुकी करतात. कारण हिंदुस्थानांत कायद्याचा अम्मल सौम्य केला पाहिजे, तरच चांगला परिणाम होईल. शहराबाहेर चांगलीं घरें बांधलीं तर त्याचा फायदा गरीबांस न मिळतां मध्यम स्थितींतील लोकच घेतील. दाटी मोडण्याकरितां दुसऱ्या विरळ वस्तीच्या देशांत गरीबांस पोंचविण्यापासून फायदा जाहलेला नाहीं व होणार नाहीं असा अनुभव आहे; यामुळें गरीबांसच दाटीनें राहणें तोट्याचें आहे, असें शिकविलें पाहिजे. मालकास योग्य प्रकारचीं घरें बांधण्यास भाग पाडतां येईल व त्यापासून इष्ट सुधारणा होईल अथवा ग्लासगो शहरांत केलेल्या म्युनिसिपालिटीच्या प्रयत्नाप्रमाणें प्रयत्न करावा असें रा. रा. पारख याणीं सुचविलें आहे.

नामदार टेंपल साहेबानीं सुचविल्या उपायांपैकीं नंबर १।२ च्या उपायांनीं सर्व गृहसुधारणा होईल तर ठीकच आहे; परंतु अद्याप विलायतेप्रमाणें इकडे सुरवातही झालेली नाहीं. तिसरा उपाय त्यांच्याच लिहिण्यावरून इंग्लंडसारख्या संपन्न देशांतील म्युनिसिपालिट्यांस असह्यच ठरतो; तर हिंदुस्थानांतील गरीब व कर्जबाजारी म्युनिसिपालिट्यांकडून अमलांत येणें तूर्तच्या स्थितींत अगदीं अशक्यच ह्मणावें लागतें. विशेषतः म्युनिसि-

पालिटीचीं आद्य कर्तव्यें, म्हणजे पक्कीं गटारें, स्वच्छता, विपुल व स्वच्छ पाणी, रुंद सडका असलीं कामेंसुद्धां अद्यापि पुरीं होणेचीं आहेत, तोंपर्यंत असल्या सोयी करण्याकडे पैसा खर्च करणें मुळींच वाजवी होणार नाहीं. रा. रा. पारख यांच्या मतें कायद्याच्या सक्तीनें मालकाकडून अवश्य तीं घरें बांधण्यांत सुधारणा करून घेतां येईल; परंतु मालक जीं घरें बांधतील तीं मोक्ष साधण्याकरितां नसल्यानें अर्थात्‌च आरोग्य-शास्त्रास अनुसरून मालकांस घरें बांधणें भाग पाडलें तर, जास्त खर्च होणाऱ्या रकमेचा मोबदला घेतल्यावांचून ते राहणार नाहींत. जास्त भाडें भरण्यास गरीबांस सामर्थ्य नसल्यामुळें यांपासून गरीबांस फायदा तो कोणचा? शास्त्रीय पद्धतीनें घरें बांधण्यास जास्त खर्च मुळींच येणार नाहीं असें संभवत नाहीं. ग्लासगोप्रमाणें इकडे व्यवस्था होणें हल्लींच्या म्युनिसिपालिट्यांच्या जमेच्या व खर्चाच्या मानानें व लोकांकडून उत्पन्न होऊं शकेल त्या कराच्या रकमेच्या मानानेंही शक्य नाहीं. लोकमत जागृत करणें हा उपाय चांगला व रामबाण. परंतु त्यास दिनावधि लागणार. तेव्हां हल्लीं जरूरीनें अमलांत आणणेसारखा उपाय हाच दिसतो कीं, ज्या मालकांचें काम गरीब मोलमजूरी करणारे करतात त्यांजवरच त्यांच्या मजूरास राहणेची योग्य सोय करण्याची जबाबदारी ठेवावी.

सदरचा विचार मोठमोठ्या कारखान्याच्या शहरांत राहणाऱ्या मजूरांचा झाला, परंतु असल्या शहरांतसुद्धां मध्यम स्थितींतील लोकांचीं घरें बरींच आरोग्यशास्त्राच्या नियमास सुटून असतात असा अनुभव अलीकडे आल्यामुळें शहरसुधारणेची नवी संस्था मुंबईस निघाली आहे; परंतु आपल्या या देशांत इलाख्यांच्या राजधान्या खेरीजकरून बाकीचीं शहरें पाहिलीं तर त्यांत श्रीमान्, मध्यम स्थितींतल्या व गरीब लोकांचीं सर्वच घरें शास्त्रीय परीक्षेंत नापसंत ठरतील अशींच आहेत. इकडे संस्था-निकसुद्धां शेंकडा पांच खरे श्रीमान् सांपडतील कीं नाहीं याची शंकाच आहे; व त्यांतील बऱ्यांचींच गृहें जुन्या पद्धतीनें बांधलेलीं व शास्त्रीय माहितीचा उपयोग न करितां तशींच राहूं दिलेलीं आढळतील. मध्यम

स्थितींतील लोकांच्या अगर गरीबांच्या घरांविषयीं तर बोलावयासच नको; तीं सारींच सुधारणें अवश्य आहेत असें बिनदिकत ह्मणतां येईल. वरील दोनीही लेखांत गरीबाशिवाय इतर लोकांच्या घरांचा विचारच केलेला नाहीं व तो त्या लेखाचा प्रतिपाद्य विषयही नाहीं. या देशांत पुणें, सातारा, सोलापूर अशा शहरांतसुद्धां मोलमजूरीवर निर्वाह करणारे लोक आपल्या मालकीच्या घरांतच राहतात; खेड्यापाड्यांनीं तर सर्वच लोक आपआपल्या घरांत राहतात हें सांगावयास नको. तेव्हां स्थूल मानानें आपल्या देशांतील घरांविषयीं लिहितांना सर्व घरांस सारखेंच लिहिणें लागूं पडेल. ज्या सूचना खालीं दिल्या आहेत त्यांत आरोग्यशास्त्राच्या सर्व तत्वांचा समावेश करण्याचा उद्देश नसून हल्लींच्या लोकस्थितीचा व ऐपतीचा विचार करून या बाबतींत लोकमत जागृत करून योग्य दिशा दाखवून द्यावी एवढाच आहे. एकदा पाट पाडून दिल्यावर दुसरे लेखनपटु शास्त्रज्ञ वीर या लेखांतील उणीवा भरून काढतीलच.

पाळीव जनावरांविषयीं विचार केला तर असें दिसून येईल कीं, जर आपण त्यांस मारिलें नाहीं, त्यांची उपासमार केली नाहीं, त्यांजपासून वाजवीपेक्षां जास्त श्रम घेतले नाहींत, व निरनिराळ्या ऋतूंस अनुसरून त्यांची योग्य जोपा केली, तर ते बहुधा पूर्णायुषी होऊन मरतात. वन्यपशूही अपघातानें न मरतील तर सदरप्रमाणें जगतात. प्रत्येक प्राण्याचें पूर्णायुष्याचें मान त्या प्राण्याच्या पूर्ण वाढीस लागणाऱ्या कालाच्या पांचपटीइतकें असतें. आपल्या देशांत मनुष्याच्या पूर्ण वाढीचें मान २० वर्षें धरतात, ह्मणून मनुष्याचें कमाल आयुष्य १०० असें मानतात. इंग्लंद वगैरे सुधारल्या देशांतही मनुष्याच्या मरणाच्या वेळेच्या वयाच्या वर्षमानाची सरासरी ३० असें ठरलें आहे. इंग्लंदपेक्षां इकडील लोक हल्लीं कमी वर्षें जगतात असा अनुभव आहे. तेव्हां मनुष्याचें सरासरीचें आयुष्यमान कमाल आयुष्यापेक्षां इतकें कमी कां असा सहजी प्रश्न उत्पन्न होतो. मनुष्येतर प्राण्यांस लागूं नाहींत अशा कांहीं गोष्टी

मनुष्यास मरण लवकर येण्यास कारण होतात हें खरें. हीं कारणें खालीं लिहिलेंप्रमाणें :—

१ मनुष्यास मानसिक श्रम करावे लागतात, व त्यामुळें मानसिक व्यथेनें तो जर्जर होतो.

२ मनुष्याच्या दुष्ट संवयींपासून होणारे रोग.

३ संसर्गापासून उद्भवणारी व्याधी.

४ चैनीमुळें व अपघातामुळें उत्पन्न होणारी व्याधी.

५ आनुवंशिक रोग.

हीं सर्व कारणें जशीं मनुष्यास विशेष आहेत, तसेंच संरक्षणाचे उपायही मनुष्यास विशेष साध्य आहेत. यामुळें मनुष्यांत दिसून येणाऱ्या मृत्युसंखेचा सर्वांशीं उलगडा होत नाहीं.

सर्व प्राण्यांस सारखेच अनुभवावे लागणारे हवेचे फेरफार, शीत व उष्णता यापासून मरणसंख्येंत होणारी वाढ सर्व प्राण्यांत सारखीच असावी असें प्रथमदर्शनीं वाटतें. परंतु पाळीव जनावरांची कांहींशी अर्धवट सोय मनुष्याकडून होते, ती खेरीज केली तर इतर सर्व प्राण्यांस सदरीं दाखल केलेल्या अरिष्टांपासून संरक्षण करण्याकरितां पर्वताच्या गुहा व वनें यांचा आश्रय केल्यावांचून गत्यंतर नाहीं. हीं आश्रयस्थानें अपुरीं यामुळें त्यांस मरणाचें भय जास्त, असें असतांही ते अल्पायुषी क्वचितच मरतात; परंतु मनुष्यानें तीं नैसर्गिक साधनें अपुरीं समजून आपल्या बुद्धिबलानें झोंपड्या, घरें, वाडे, खेडीं, गांव, शहरें अशीं साधनें निर्माण केलीं. तीं साधनें निर्माण केलीं तेव्हां शास्त्राविरुद्ध ज्या चुका त्याच्या हातून जाहल्या त्यामुळें मनुष्याचें संरक्षण न होतां मनुष्य अधिकच रोगाधीन जाहला आहे. शास्त्रसंमत वसतिस्थानें नसल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या रोगापासून होणाऱ्या प्राणहानीवरून असें ह्मणावें लागतें.

आतां घरें बांधण्याचा जो मूळ उद्देश ह्मणजे हवा, उष्णता व पर्जन्य यांपासून संरक्षण होणें तो साधून हल्लींचीं आपलीं घरें निरोगी कशीं करितां येतील तें पाहूं.

घर पूर्णपणें निरोगी होण्यास ७ गोष्टी अवश्यक आहेत.

१ केर अगर धूळ राहणार नाहीं, अशी घराची बांधणावळ व व्यवस्था पाहिजे. जेथें केर व धुरळा आहे, तेथें रोगबीज आहे असें समजावें.

२ वापरामुळें उत्पन्न होणारा केर व घाण पाणी वगैरे निस्तोष बाहेर निघून जाईल अशी व्यवस्था व तजवीज असली पाहिजे.

३ ओल बिलकुल असूं नये.

४ सूर्याच्या तेजाच्या तीव्रतेपासून बाधा न होतां सर्व बाजूंनीं मुबलक उजेड घरांत येत असला पाहिजे.

५ घरांत नेहमीं स्वच्छ हवा राहिली पाहिजे व ती सावकाश व एकसारखी बदलत असली पाहिजे.

६ घरांतील उष्णतेचें मान सदा सारखें राहिलें पाहिजे.

७ घरांत नेहमीं स्वच्छ व निरोगी पाण्याचा पुरवठा मुबलक पाहिजे.

या सात गोष्टी हल्लींच्या आपल्या घरांत कशा साध्य करून घेतां येतील हें पाहूं.

घरांत लहानशा फटींतून सूर्यकिरण येऊं दिले व जर त्यांत धुळीचे अगर केराचे परिमाणू दिसतील, तर घरांत अपायकारक धूळ आहे असें समजावें. ती श्वासोच्छ्वासाबरोबर शरीरांत जाऊन व इतर रीतीनें उपद्रव करिते. या पीडेपासून मुक्तता होण्याकरितां घरास कानेकोपरे वगैरे धूळ माजून राहील असे भाग ठेवूं नयेत. वापरास जरूरीपेक्षां जास्त घर असूं नये. घरांत अनवश्यक सामान बाळगूं नये. मोडकें तोडकें सामान ठेवूं नये. अवश्य असेल तें सामान नीट व्यवस्थेनें त्याजवर केर व धूळ माजणार नाहीं असें ठेवावें. सच्छिद्र अगर धुरळ्याचा समावेश करून घेईल असें सामान बाळगूं नये. छपरास गवत, तुरकाठ्या, पळकाठ्या, असलें सामान घालूं नये. गरीबीमुळें घालणें भाग होईल तर सालोसाल झाडावें व शक्य तितकें वरचेवर बदलावें. वापरण्याचे कपडे वगैरे पदार्थ नेहमीं धुतां येतील असे असावे; व ते वरचेवर धुवून उन्हांत वाळवावे. बसण्याचीं

जाजमें, सतरंज्या वगैरे वरचेवर झाडून व धुवून स्वच्छ ठेवाव्या. घराच्या भिंती, कडीपाट व खांब वगैरे वर्षांतून निदान दोनदां ऊन पाण्यानें धुवावे. भिंती वर्षांतून दोनदां चुन्यानें व तें शक्य नसेल तर पांढऱ्या मातीनें सारवाव्या. शेणानें केव्हांही सारवूं नये गाद्यागिरद्या वगैरे वरचेवर उन्हांत वाळवून वर्षांतून एकदां रू स्वच्छ करवून पुन्हां भरवाव्या. या व अशा दुसऱ्या उपायांनीं रोगबीजास आश्रयस्थान मिळणार नाहीं असें करण्याविषयीं दक्षता ठेवावी.

२. वरचेवर झाडून निघालेला केरकचरा व दुरुस्ती अगर कौलें परतण्याचे वेळीं निघालेला केरकचरा, गदाळा, धुरळा वगैरे घराजवळ सांठवून न ठेवितां लोखंडी बुट्टींतून अगर खापरी भांड्यांतून रोजचेरोज अगर सांठेल तेव्हां जेथें म्युनिसिपालिटीनें सोय केली असेल, तेथें लागलाच नेऊन टाकावा. जेथें म्युनिसिपालिटी नसेल, त्या गांवीं शेताच्या उपयोगाकरितां शेतांत लगेच नेऊन ठेवावा. ज्यास शेत नसेल त्यानें शेतवाल्यास विकावा अगर देऊन टाकावा. घराशेजारीं खताकरितां सांठवून ठेवण्याची वहिवाट आहे, ती बंद केली पाहिजे. घरांतील वापराचें पाणी भिंतीस भोंक राखून बाहेर खळग्यांत सोडणें अनर्थावह आहे. वापराचें पाणी व पावसाचें पाणी घराच्या आवारांत न सांचतां लागलेंच वाहून जाईल अशीं पक्कीं गटारें ज्यास बांधण्याचें सामर्थ्य असेल त्यांनीं तीं बांधून रस्त्याच्या गटारास अवश्य मिळवावीं. परंतु रस्त्याच्या गटारांत तें पाणी मुरणार नाहीं अशी व्यवस्था असली पाहिजे. ज्या गांवांस म्युनिसिपालिट्या आहेत त्या गांवांस अशीं गटारें करणें हें त्यांचें आद्यकर्तव्य आहे. घरांतील व रस्त्याचीं गटारें नेहमीं स्वच्छ राहतील तर त्यापासून फायदा आहे. रस्त्याच्या गटाराच्या पाण्यापासून लोकांच्या आरोग्यास उपद्रव होणार नाहीं अशी अखेर व्यवस्था लावणें म्युनिसिपालिटीचें काम आहे. दुसऱ्या मजल्यावरील मोऱ्या बाहेरून असणें चांगलें. सदर मोऱ्यांच्या नळांतून हवा खेळण्याकरतां व त्या साफ करण्याकरितां त्यांचें वरील व खालील तोंड खुलें असावें. म्युनिसि-

पालिटी असणाऱ्या गांवास शौचकूपाचें पाणी खड्डा करून त्यांत सोडून न देतां मैल्याप्रमाणें पाणीही बाहेर नेण्याची तजवीज करून सदर मैला व पाणी यांचा खताकडे उपयोग करावा. असें केलें असतां उपद्रव नाहींसा होऊन कमिटीस फायदाही होईल. ज्या ठिकाणीं कमिटीची स्थापना जाहलेली नाहीं, तेथील वापराचें पाणी एका खापराच्या मांदणांत सांठवून रोजचेरोज पूर्वीं सांठविलेल्या खताच्या ढिगावर शेतांत नेऊन ओतावें. खेड्यांतून व म्युनिसिपालिटी नसणाऱ्या गांवांतून रस्त्याकडेस अगर परसांत पुरीषोत्सर्ग करण्याची वहिवाट आहे ती फार घातुक आहे; ती अज्जी बंद केली पाहिजे. अशा ठिकाणीं लोकांनीं वस्तीपासून कांहीं अंतरावर एका शेतांत सभोंवती कुंपण करून पुरुषांकरितां एक व बायका व मुलांकरितां एक अशी निरनिराळी दोन तुकडी तयार करावी व त्यांत दीडफूट खोलीची चरी काढून त्यांत शौचास जावें; व शौचविधी जाहल्यावर उकरलेल्या मातीनें विष्ठेचें आच्छादन करावें. याप्रमाणें एक चरी भरल्यावर तीन फुटाच्या अंतरावर दुसरी चरी खणावी. याप्रमाणें सर्व शेत भरल्यावर दुसरें शेत तयार करावें व कांहीं दिवसांनीं पहिलें नांगरून पिकास तयार करावें. असें केलें असतां घाण होणार नाहीं व शेतही उत्तम खतवून तयार होईल.

३. कोणत्याही ठिकाणीं वस्ती करण्याचें मनांत आणिलें तरी तेथील जमिनींत कमी जास्त मानानें सूर्यकिरण, पाऊस, वारा इत्यादिद्वारा रासायनिक व्यापारानें अर्धवट कुजून रूपांतर होत असलेलीं द्रव्यें सांपडतात; शिवाय जमीन स्पंजाप्रमाणें कमजास्त सच्छिद्र असते, यामुळें पावसाचें व वापराचें पाणी जमिनींत मुरतें व घरास ओल येते. तसेंच जमिनीच्या पोटांत कुजत असलेल्या द्रव्यांपासून उत्पन्न होणारें घातुक विष घरांत येतें. जेथें पूर्वीं वस्ती जाहलेली आहे अशा ठिकाणीं कुजणाऱ्या द्रव्यांचा भरणा जास्तच असतो. याकरितां घरास ओल, लोणा, गारठा बिलकुल उपयोगी नाहीं. ज्यास नवीन घर बांधणेंचें असेल, त्यांनीं असलीं घातुक द्रव्यें काढून टाकून मग घर बांधावें; परंतु काढून

टाकलेलें ठिकाण नदीवरील गाळानें अगर तळयांतील मातीनें न भरितां चांगल्या स्वच्छ मुरमानें भरून काढावें. हवा व ऊन यांची क्रिया बंद जाहली आहे इतका खोल पाया घालावा; व पायाखालच्या जमिनींतील पाण्यापासून भिंतीस ओल न येण्याकरितां तळाशीं निदान एक फूट चुना व काळी खडी मिसळून घालून धुमसानें ठोकून घट्ट बसवावी व त्याजवर पायास आरंभ करावा. पायाच्या दोन्हीं बाजूंकडील जमिनींतील पाण्यानें ओल येऊं नये ह्मणून दोनीही अंगांस पुरेसा चुना बसवावा, ह्मणजे भिंतीस ओल अगर लोणा येण्याची भीति नाहीं. घराची जमीन पांढऱ्या मातीनें वगैरे न करितां दगडांनीं माचवून मुरमाची करावी. ज्यांस शक्य असेल त्यांनीं टाकीच्या दगडांनीं, अगर लांकडाच्या तक्त्यांनीं, गुळगुळीत तोंडाच्या विटांनीं अथवा खडी व चुना यांच्या मिश्रणानें करून घेतली असतां चांगलें. जमीन केव्हांही मातीनें सारवावी, परंतु शेणानें सारविणें वाईट. घराची जमीन, परसू, अंगण अगर रस्त्याच्या सपाटीपेक्षां निदान २ फूट तरी उंच असावी व तिजसभोंवतीं जोतें असावें. घरांतील न्हाणी, मोरी व धुणीं वाळत घालण्याची जागा निजण्याबसण्याच्या जागेपासून पृथक् असावी. ज्यांचीं घरें जुनीं आहेत त्यांनीं सदरील सर्व गोष्टी आरोग्यास अवश्यक आहेत हें पक्कें लक्षांत वागवून होईल तितक्या जरूरीनें अमलांत आणाव्या. अशी व्यवस्था होईपर्यंत ओलीच्या जागीं उष्णता उत्पन्न करून ओलीचा उपद्रव कमी करावा; परंतु ती अजी नाहींशी करणेंच फार हितावह आहे. घराच्या मागील व पुढील बाजूंस घाण माजूं न देतां चांगलीं झाडें सवडीप्रमाणें लावलीं असतांही जमिनींतील ओल झाडें शोषून घेऊन कमी करतात.

४. घरास घर लागून न बांधतां मध्यें इतारतीच्या मानानें जागा ठेवून इमारती बांधल्या असतां हवें तिकडून इमारतीस उजेड पोंचूं शकतो. कमींत कमी अंतर निदान १० फूट तरी दोन एकमजली इमारतींत असावें. याजपेक्षां जास्त उंचीच्या इमारतींत अर्थात्च जास्त अंतर पाहिजे. इमारतीस इमारत टेंकली असली तर माजघरांत उजेड मुळींच पडत नाहीं, यामुळें तेथेंच रोगबीज राहण्याची भीति फार. यामुळें ज्यास जागेच्या संकोचामुळें सुट्या इमारती बांधतां येत नाहींत अगर पूर्वीच्या

असलेल्या चिकटलेल्या इमारती राहूं देणें भाग आहे, त्यांणीं तीन दालनांच्या ऐवजीं दोन दालनें कायम करावीं अगर ठेवावीं व तिसरें लागून न बांधतां अगर ठेवतां बाकी इमारतीपासून कांहीं अंतरावर निराळें बांधून वापरास कमी पडणाऱ्या जागेची भरती करून द्यावी. इमारत एकच मजली असेल तर असें न करितां माजघरच्या दोन्ही सोप्याकडील भिंती उंच करून तिकडून माजघरांत उजेड केला असतां चालेल. अर्थात्च पुढील व मागील सोप्याचीं छपरें खिडक्यांपेक्षां नीचीं राहणार. छपराच्या कांहीं भागास तावदानें लावून अगर शिखरा-सारखा उंचवटा करून त्याच्या बाजूनें उजेड घेतला तरीही निर्वाह होण्यासारखा आहे. पुढील व मागील सोपे अंगणाच्या अगर रस्त्याच्या बाजूनें व परसाच्या बाजूनें भिंती घालून बंद करणेचे असतील तर सर्व सोप्यांस उजेड पोंचेल इतक्या मोठ्या व पुरेशा खिडक्या लाविल्या पाहिजेत. आपल्याकडे साधारण मोठ्या घरास एक अगर अधिक चौक असतात. अशा चौकामुळें उजेड मुबलक येतो. पूर्वीपासून घरास अगर वाड्यास जितके चौक जास्त तितकें तें घर अगर तो वाडा चांगला व श्रीमानाचा असें मानण्याची वहिवाट आहे, किंबहुना जितके वाड्यास चौक जास्त तितकी मालकाची धनदौलत जास्त असें समजतात. डा० राजेंद्रलाल मित्र यांचें असें ह्मणणें आहे कीं 'चौकापासून व विशेषतः चौकाभोंवती लहानशी ग्यालरी असेल तर कोणताही ऋतु असला तरी चौकाच्या कोणत्या तरी भागांत सूर्याचें उन व तेज आणि हवा यांजपासून बचाव होतो. याकरितां ज्यास शक्य असेल त्यांनीं आपले घरास चौक ठेवावे. ज्यांस हें शक्य नसेल त्यांनीं घराच्या सर्व भागास सकाळपासून सायंकाळपर्यंत उजेड कमती पडणार नाहीं व अंधार कोठेंही असणार नाहीं इतक्या बेतानें खिडक्या ठेवून किंवा अन्य रीतीनें उजेडाचा पुरवठा होईल असें करावें.' खिडक्यांतून येणाऱ्या उजेडाच्या तीव्र तेजानें आंत राहणाऱ्यांस अगर काम करणाऱ्यांस उपद्रव होऊं नये ह्मणून खिडक्यांस तावदानें लावून त्याजवर अलवानी पडदे सोडावे अगर खिडक्यांच्या बाहेरल्या अंगास पत्रा अगर लांकडी फळी तिरकी उभी करावी ह्मणजे उजेड भरपूर मिळून तेजापासून होणारा उपद्रव कमी होईल.

९. एखाद्या माळावर वस्तीपासून लांब जाऊन बसलें असतां मनास आल्हाद होतो, असा अनुभव बहुधा सर्वांस आहे. हल्लीं या इलाख्यांत तर ग्रंथिक सान्निपातानें बहुतेक सर्व मुलूख व्यास जाहल्यामुळें लोकांना रानांत राहणें भाग झालें आहे. रानांत राहिल्यामुळें जरी पुष्कळ अडचणी व कष्ट होतात, तरी अशाप्रकारें बाहेर जाऊन राहणें आरोग्यकारक आहे असें अनुभवास आलेलें आहे. कित्येकांचीं डाक्तरांचीं बिलें बंद जाहलीं आहेत. पण कांहीं लोक रानांत राहत असतांही आरोग्यास जरूर इतकीसुद्धां हवा व उजेड येऊं देत नाहींत ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. गांवांतल्यापेक्षां सर्वांच्या राहण्याच्या झोंपड्या भिकार व अपुऱ्या असतां प्रकृतीवर चांगला परिणाम होतो, याचें इंगित माळावर स्वच्छ हवा व उजेडहीं मुबलक असतात हें होय. ही स्वच्छ हवा दोन निरनिराळ्या वायूंच्या मिश्रणाची बनलेली आहे. तींत नैत्रोजनचें प्रमाण शेंकडा ७९ असतें व आक्सिजनचें २१ असतें. मनुष्याच्या जीवास फार अपायकारक वायु ह्मणजे क्यारबानिक आसिड वायु दहा हजारांत चार या प्रमाणानें असतो. याशिवाय पाण्याची वाफ वगैरे अल्पस्वल्प प्रमाणानें मिसळलेली असते. शरीरव्यापारापासून अशुद्ध रक्त शुद्ध करण्याकरितां हवा आपल्यास श्वासोच्छ्वासाबरोबर शरीरांत घ्यावी लागते. हवा उच्छ्वासाबरोबर फुपुसांतून बाहेर येते ती तपासली तर, नैत्रोजन ७९, आक्सिजन १६॥ व क्यारबानिक आसिड वायूचें प्रमाण ४॥ याप्रमाणें असल्याचें दिसून येईल; ह्मणजे १०० पट क्यारबानिक आसिड ग्यास वाढला व आक्सिजन कमी जाहला. असा आपल्या जीवनव्यापाराचा परिणाम नित्यशः हवेवर होत आहे. प्रत्येक मनुष्यास दर २४ तासास ४०० घनफूट हवा श्वासोच्छ्वासानें दूषित करितां येते. यावरून घराच्या आकाराच्या मानानें व आंत राहणाऱ्या इसमांच्या मानानें हवा किती जलद दूषित होईल हें प्रत्येकास गणितानें ठरवितां येईल. हें प्रमाण उजेडाकरितां लावलेले दिवे व स्वयंपाक व पाणी तापवण्याकरितां पेटविलेल्या विस्तवापासून जास्तच वाढतें. हा क्यारबानिक आसिड वायु नाहींसा करणें निदान तो

शरीरप्रकृतीस इजा करणार नाहीं इतका कमी करणें हें मनुष्याचें काम आहे. या कामांत त्यास नैसर्गिक मदत आहे. सदर वायु हलका असल्यामुळें तो वर जातो व पोकळी केंव्हांही राहण्याची नाहीं या सृष्टिनियमास अनुसरून स्वच्छ हवा वायु वर जाण्यानें जाहलेली पोकळी भरून काढते. तसेंच क्यारबानिक आसिडवायु एके ठिकाणीं न राहतां वर जाऊन सभोंवतालच्या हवेंत मिसळतो. आपणास फक्त हा नैसर्गिक व्यापार अप्रतिबंध चालेल अशी तजवीज केली पाहिजे. घरास खिडक्या अगर दुसरीं साधनें नसतील तर शुद्ध हवा आंत येणार नाहीं व क्यारबानिक आसिडवायू निघून जाण्यास छपराखालीं अगर कडीपाटाखालीं भोंकें नसतील तर सदर वायू घराबाहेर जाणार नाहीं. या सोयीं आपण आपल्या घराच्या प्रत्येक दालनास व विशेषतः निजण्याचा, बसण्याचा व काम करण्याचा जागेस केल्या पाहिजेत. प्रत्येक मनुष्यास सुखानें राहतां येण्यास दर तासास ३००० घन फूट हवा त्याच्या खोलींत आली पाहिजे किंवा असली पाहिजे. या मानानें कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यास पुरेसें मोठें घर मिळण्यासारखें नसतें; ह्मणून जितकें जितकें घर लहान व कुटुंबाचीं माणसें जास्त तितक्या तितक्या मानानें हवा वरचेवर बदलण्याकरितां खिडक्या व फटी जास्त लागतात. आतां अशी कल्पना केली कीं, एका घरांत प्रत्येक मनुष्याच्या वांट्यास दोन खण जागा अगर १००० घनफूट जागा येते, तर तशा प्रत्येक दोन खणांस निदान एक तीन फूट उंचीची व दोन फूट रुंदीची खिडकी शुद्ध हवा आत येणेंकरितां व तितक्याच मानाची एक ठिकाणीं अगर लहान लहान भोंकें मिळून जाहलेली फट अशुद्ध हवा बाहेर जाण्याकरितां असली पाहिजे. ज्यांच्या घरांत इतकीसुद्धां जागा दरएक मनुष्याच्या वांट्यास येणार नाहीं, त्यांनीं खिडक्यांची संख्या व माप वाढविलें पाहिजे. खोलीच्या दारासमोर खिडकी किंवा खिडकीसमोर खिडकी असेल तर स्वच्छ हवा आंत येण्यास चांगली मदत होते. दूषित हवा बाहेर जाण्याकरितां वळचणी अगर कडीपाटाखालीं पक्या विटांच्या बांधकामांत लहान लहान भोंकें ठेवलीं असतां चांगला उपयोग होतो. ज्यांच्या घरास बाजूनें खिडक्यांच्याद्वारें हवा

आंत येऊं देण्यास मुळींच सवड नसेल त्यांनीं निदान छपरांतून हवा येण्याजाण्याची वाट करावी. स्वयंपाकाच्या व पाणी तापविण्याच्या चुलीवर एक भोंक धूर व ऊष्ण हवा बाहेर जाण्याकरितां ठेवावें; तें असें कीं, ऊन व पाऊस आंत न येतां धूर व हवा बाहेर निघून जाईल. आपल्या घरांतून आपण दिवे लावतों त्यास धूर वर नेणारी चिमणी नसते, करितां दिवा ठेवण्याच्या कोनाड्यास एक लहान भोंक आरपार ठेवल्यास चांगला उपयोग होईल. आजाऱ्याच्या अगर बाळंतिणीच्या खोलींत खुली व स्वच्छ हवा आंत न जाऊं देण्याबद्दल जी तत्परता दाखविण्यांत येते ती फार घातुक आहे. इतरांपेक्षांही सदर ठिकाणीं पडून राहणाऱ्या इसमास स्वच्छ हवेची फार अवश्यकता असते, हें लक्षांत वागविलें पाहिजे. तसेंच अशा जागीं शुश्रुषा करणारांशिवाय इतर भेटण्यास आलेल्या अगर गप्पा मारण्याकरितां आलेल्या लोकांनीं बसूं नये; कारण खोलींत जितकीं माणसें जास्त तितकी हवा जलद दूषित होते. गोरगरिबांच्या घरांस बहुधा उघडा सोपा असतो, व ज्यांच्या घरांस तो नसेल त्यांनीं अवश्य करावा, कारण त्यापासून निजतां, बसतां अगर काम करीत असतां फायदा होतो. तो सोपा मात्र निदान जमिनीपासून दोन फूट उंचीवर असावा. मनुष्यांनीं वापरण्याच्या खोल्या निदान सकाळीं व संध्याकाळीं एक तासभर सर्व दारें व खिडक्या खुल्या ठेवून असूं द्याव्या.

६. घरांत सारखी उष्णता कशी राहील याचा संबंध पुष्कळ अंशीं हवामान व वाहणारे वारे यांशीं आहे. हिंदुस्थानाचा कांहीं भाग समशीतोष्ण कटिबंधांत आहे व हिमालयाच्या कांहीं भागावर तर सदैव बर्फ असतें, तथापि एकंदरीनें विचार केला असतां हा देश उष्ण हवेचाच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. प्रत्येक ठिकाणीं वारा वर्षांतून फार दिवस कोणत्या दिशेनें वाहतो हें त्या ठिकाणच्या झाडाच्या कलावरून ठरवितां येतें. कारण झाडें जिकडून वारा फार वाहतो त्याच्या उलट दिशेकडे कलतात. या गोष्टीचा विचार घर बांधतेवेळीं केला तर वाऱ्याच्या सोसाट्यापासून मालकास आपला बचाव करून घेतां येईल. आपल्यांत अमुक दिशेस घराचें तोंड असूं नये असे नियम आहेत

त्याची उत्पत्ति या कारणांमुळेंच जाहली असावी. वाऱ्याच्या झोतापासून बचाव करून घेणेंकरितां खिडक्यांस तिरप्या पातळ फळ्यांमध्यें फटी ठेवून दारें लावणें हा आहे. खिडक्या इतक्या उंचीवर असाव्या कीं, त्यांपासून आंत येणाऱ्या हवेचा झोंत निजणाऱ्या अगर काम करीत असलेल्या इसमाच्या अंगावर येणार नाहीं. हवा शीत असल्यामुळें सहन करण्यास कठीण जाईल तर धूर नाहींसा जाहलेली कोळशाची शेगडी वर खापरी चिमणी बसवून हवा उष्ण होईपर्यंत खोलींत ठेवली तर उष्णता उत्पन्न होऊन थंडीपासून बचाव होतो. उष्ण काळांत व विशेषत: दिवसां मधल्या दोनप्रहरांत बाहेरील हवा घरांतल्या हवेपेक्षां जास्त उष्ण होऊन पातळ होते; व कौलें वगैरे बाह्य भाग तापल्यानें आंतील हवाही कांहींशी उष्ण होते. या फाजील उष्णतेपासून इजा होऊं नये ह्मणून वाळ्याचे पडदे खिडक्यांस लावून ते वरचेवर पाण्यानें भिजवावे ह्मणजे उष्णता कमी होऊन हवा आंत येईल व खोलींतील उष्ण हवा बाहेर जाऊन खोलींत बसण्यापासून अगर काम करण्यापासून शरीरास फाजील उष्णतेचा उपद्रव होणार नाहीं. पंख्यापासूनही हवेंतील उष्णता कमी करितां येते व झोपाळ्यापासूनही उपयोग होतो. घराच्या भिंती कमी रुंदीच्या असल्या तर त्या लवकर निवतात. हातपंख्यानें वारा घेतल्यानें अथवा खिडकीच्या तोंडाशीं ओलें फडकें बांधल्यानेंही उष्णतेचें मान कमी करितां येतें.

७. घरांत राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यास स्वच्छ पाण्याचा पुरवठा अगदीं अवश्य आहे. हा पुरवठा सतत वाहणाऱ्या चावीच्या द्वारें होईल तर फार चांगलें; ह्मणजे पाणी घरांत सांठवून ठेवून दूषित होण्याची भीति नाहीं. ज्या गांवांस म्युनिसिपालिट्या आहेत, त्या गांवांसही असा पुरवठा दुर्भिळ असल्यामुळें, खेड्यापाड्यांनीं असा पुरवठा असणें अशक्यच. म्युनिसिपालिटीकडून मिळणारें पाणी अगर वापराकरितां दुसऱ्या तऱ्हेनें मिळविलेलें पाणी डोळ्यानें जरी स्वच्छ दिसलें, तरी शास्त्रीय पद्धतीनें परीक्षण केलें तर खरोखर स्वच्छ असल्याचें कचितच आढळून येतें. ह्मणून स्नान, धुणें, स्वयंपाक वगैरे करितां पाणी शुद्ध करण्याच्या यंत्रांतून शुद्ध केलेलें पाणी वापरावें

हें चांगलें. हें यंत्र ह्मणजे फिल्टर, हा बहुधा सर्वांनीं पाहिलेला असेलच. त्याचीं मडकीं व आंतील कोळसे व वाळू हीं मात्र वरचेवर स्वच्छ केलीं पाहिजेत. वाळू व कोळसे वरचेवर नवीनच वापरांत आणिल्यास फारच उत्तम. ज्या गांवास ओढ्याचें अगर नदीचें पाणी वापरण्यांत येतें, त्या पाण्यांत कपडे धुणें अगर अंग धुणें चांगलें नव्हे. पात्रांत मूत्र अगर पूरीषोत्सर्ग करणें फार वाईट. जेथें विहिरीचें पाणी उपयोगांत आणतात, त्या ठिकाणीं विहिरीचें पाणी बिघडूं नये ह्मणून विहिरीच्या खोलीच्या दुपटी इतक्या जाग्यांत विहिरीसभोंवतीं कोणत्याही प्रकारची घाण करूं नये, कपडे धुवूं नयेत. व स्नान करूं नये; कारण त्यापासून विहिरीचें पाणी बिघडतें.

ज्या घरास दुसरा मजला असेल, त्या घरच्या माणसांनीं दुसऱ्या मजल्यावर निजावें. माड्यांवर जाण्याचा जिना कोपऱ्यांत आकुंचित जागेंत नसावा. तो उजेडांत व रुंद असावा व त्याच्या पायऱ्या अर्ध्या फुटापेक्षां जास्त उंचीच्या असूं नयेत, ह्मणजे ह्मातान्यासही चढउतर करितांना अडचण पडणार नाहीं. निजण्यास पलंग, माचा अगर बाजलें असावें. ह्मणजे जमिनीशेजारच्या वाईट हवेपासून बचाव होतो. घरासभोंवतींची याई अगर दोन यार्ड जमीन अणकुचीदार दगड चुन्यांत अगर मातींत घट्ट बसवून करावी ह्मणजे सर्पाचें भय कमी होईल. रात्रीं दिवा लावल्यावांचून आंथरूण सोडूं नये. गडबडीनें, उतावळीपणानें, अगर फाजील भरंवशानें घरांत वावरूं नये, ह्मणजे अपघात होण्याचें पुष्कळ अंशीं टळेल.

वरील सर्व गोष्टींसंबंधानें ही एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, कोणी एकानें या सर्व गोष्टी यथास्थितपणें अमलांत आणिल्या तथापि तो जेथें राहत असेल तेथील साधारण सर्व लोकांनीं मनापासून वरील गोष्टीचा अम्मल केल्याशिवाय त्यास आपल्या करण्याचा फायदा मिळणार नाहीं. वर नमूद केलेल्या गोष्टीपैकीं बऱ्याच घरच्या मालकांकडूनच अमलांत येण्यासारख्या आहेत, व कांहीं गोष्टी मात्र सरकारास अगर म्युनिसिपालिट्यांस सक्तीनें अमलांत आणितां येतील. घराबाहेर रस्त्यावरील गटारें बांधणें, गैरा व मैल्याचें पाणी काढून नेणें व केर-

कचरा गोळा करणें हीं तर म्युनिसिपालिटीचीं कर्तव्येंच आहेत. परंतु घर बांधणेस अगर दुरुस्त करणेस परवानगी देतांना सांडपाण्याचा निकाल व हवा व उजेड याचा योग्य पुरवठा यांजकडे लक्ष पुरवून नीट व्यवस्था करणेस भाग पाडतां येईल. तसेंच घरांत घराच्या कुवतीपेक्षां जास्त माणसें अगर बिऱ्हाडें असणार नाहींत अशीही तजवीज करितां येईल. आपल्या देशांत भाऊबंदी हिश्शामुळें मुळचीं सोईचीं व पुरेशीं घरें असतात तीं अपुरीं व गैरसोईचीं होतात. ही गैरसोय एकानें दुसऱ्यास आपला हिस्सा विकून अगर अन्य रीतीनें दूर करून घेतली पाहिजे. म्युनिसिपालिटी नसणाऱ्या गांवीं वरील गोष्टीचा अम्मल लोकांनीं आपआपसांत केला पाहिजे अगर सरकारानें कायद्यानें लोकांस करणेस भाग पाडलें पाहिजे; परंतु खरा व पूर्ण अम्मल होण्यास लोकांच्या अंतःकरणांतच सुधारणा करण्याचें आलें पाहिजे. डा० वामन बाजी कुलकर्णी यांणीं येथील पुस्तकालयांत व्याख्यानाच्या वेळीं सांगितल्याप्रमाणें वस्ती विरल करणें हाही उपाय चांगलाच आहे. यास सरकारची मदत जरूर आहे. सरकारानें वस्तीकरितां मुफत अगर अल्पमोलानें सोईची जागा लोकांस दिली पाहिजे; व लोकांनींही दाटणी कमी करून सरकाराकडून मिळणाऱ्या सवलतीचा फायदा घेतला पाहिजे.

या उपायांनीं सांथीचे रोग व दुसरेही पुष्कळ रोग यांपासून बचाव होईल व नेहमीं लहान सहान आजार शरीरास पीडा करून जर्जर करितात त्यांचाही प्रतिबंध होईल. रोगोत्पत्तीस घराच्या अयोग्यपणाशिवाय वाईट अन्न, वस्त्र वगैरे कारणें आहेत त्यांचा विचार येथें केलेला नाहीं. ज्या सूचना केलेल्या आहेत त्या जनसमाजाच्या आटोक्यांत आहेत तेवढ्याच केल्या आहेत. ज्या फार खर्चाच्या त्या नमूद केलेल्या नाहींत. ज्यास विस्तृत माहिती हवी असेल त्यास मरफे साहेबांसारख्यांचे याच शास्त्रावरील बारकाईनें व शोधक बुद्धीनें लिहिलेले ग्रंथ आहेत, ते वाचून आपली ज्ञानजिज्ञासा तृप्त करून घेतां येईल. येथें नवीन कांहीं शोध करून दाखल केलेले नसोन पूर्वींच ठरलेल्या गोष्टी आपल्या घरास कशा, कितपत व कोणत्या रीतीनें लागूं करितां येईल हें सांगितलें आहे.

---

# ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें प्रकरण.

# इंग्रजी कायदा आणि राजनीति यांचा परस्पर संबंध.

हा निबंध

फ्रेडरिक पॉलककृत

'HISTORY OF ENGLISH LAW AS A BRANCH OF POLITICS'

या लेखाचें भाषांतर आहे.

---

भाषांतरकार

रा. रा. ना. कृ. आगाशे, बी. ए. एल्एल्. बी.

वकील सातारा

---

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिलें.

---

किंमत ४ आणे.

याच ग्रंथकाराकडून.

---

## इंग्लंडांतील प्रधान मंडळ.

एच्. डी. ट्रैलकृत 'सेंट्रल गव्हर्मेंट' या ग्रंथाच्या आधारें.

पृष्टसंख्या १८०. किं० १ रु० ट०हा० ८२.

---

## राजकीयदृष्ट्या इतिहासाचें महत्व.

डब्ल्यू. ई. एच. लेकी यांच्या 'पोलिटिकल व्हॅल्यू आफ हिस्टरी' या विषयावरील व्याख्यानाच्या आधारें.

पृष्टसंख्या ४८. किं० ८३ ट०हा० ८८६..

---

# भाषांतरकाराची टीप.

**फ्रेडरिक पॉलक** नांवाचा ग्रंथकार, कायद्याचा व्यासंग करणाऱ्या प्रत्येक इसमास माहीत असला पाहिजे. कायद्यासारखा नीरस विषय, खुलवून लिहिण्याच्या कामांत या ग्रंथकर्त्याची फार ख्याति आहे. त्याची भाषा फार गोड, सरळ, आणि साधी अशी आहे. त्यानें निरनिराळ्या प्रसंगीं आणि निरनिराळ्या विषयांवर जे निबंध लिहून लोकांना वाचून दाखविले, त्यांपैकीं 'History of English Law as a Branch of Politics' या निबंधाचें पुढील लेखांत भाषांतर केलें आहे. तें कितपत साधलें आहे, याचा निर्णय करणें वाचकांकडे आहे. या निबंधांत दाखविलेली दिशा घेऊन, आपल्या देशांतील राजनीतीचा कायद्यांवर, व कायद्यांचा राजनीतीवर कसा परिणाम घडत गेला, याचें एखाद्या विद्वानानें खुलासेवार विवेचन केलें, तर तें फार चित्ताकर्षक होईल असें आह्मांस वाटतें. हें काम करण्यास एखादा विद्वान् पुढें सरसावला व त्याला आमच्या या भाषांतरापासून थोडा जरी उपयोग झाला, तरी आमच्या श्रमाचें सार्थक झालें असें आह्मीं समजूं.

'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते'

सातारा,
जानेवारी १८९९.

ना० कृ० आगाशे.

# इंग्रजी कायदा आणि राजनीति यांचा परस्पर संबंध.

कायदा हा विषय फार पारिभाषिक व बिकट आहे, मात्र तो अगदीं किळस उत्पन्न करणारा नव्हे, अशी या देशांतील ( ह्मणजे इंग्लंडांतील ) लोकांचीं फार दिवसांपासून समजूत झालेली आहे, व त्यामुळें कायदेपंडितावांचून अन्य कोणीही त्या विषयाच्या वाटेस जात नाहीं. बरें, कायदे जणणाऱ्या लोकांची तरी अशी स्थिति आहे कीं, त्यांना आपल्या धंद्यांत व्यावहारिक दृष्टीनें कायद्यांचा उपयोग करून घ्यावा लागतो, ह्मणून कायदे प्रस्तुत जसे असतील, तसेच घेऊन त्यांनां चालावें लागतें; पूर्वी ते कायदे कोणच्या प्रकारचे होते, या गोष्टीचा विचार करणें त्यांना अवश्य पडत नाहीं. आतां ह्याचा परिणाम मात्र असा झाला आहे कीं, इंग्लंडांतील सुशिक्षित लोकांपैकीं पुष्कळ लोकांना इंग्रजी कायद्यांचा इतिहास कुलुपांत घालून ठेविलेल्या पुस्तकांप्रमाणें आहे; आणि एका हाताच्या बोटांवर मोजता येतील, इतक्या लोकांच्या हातूनच काय तो त्याचा व्यासंग होत आहे. हीच गोष्ट निराळ्या शब्दांत सांगावयाची झाली, तर असें ह्मणावें लागतें कीं, इंग्लंडांतील पुष्कळ सुशिक्षित लोकांना आपल्या देशाच्या इतिहासांतील आवश्यक भाग माहित नाहीं, अथवा तो माहित करून घेण्याची त्यांच्यापाशीं साधनें नाहींत. या मुद्यावर माझें ह्मणणें काय आहे, हें आपल्याला नीट समजावून देण्याकरतां, ' इतिहास ' ही संज्ञा कशाला देतां येत नाहीं, हें आपल्या लक्षांत मला आणून दिलें पाहिजे. तारखांच्या जंत्र्या, आणि त्या तारखांच्या पुढें महत्वाच्या अशा मानल्याजाणाऱ्या ठोकळ गोष्टी, आपल्या लहानपणीं आपण पाठ केलेल्या आणि लिहून काढलेल्या, आपणांपैकीं पुष्कळांना आठवत असतील यांत शंका नाहीं. राजांची राज्यारोहणें आणि मृत्यु, लढाया, सांधीचे रोग,

**गन्पावडर** ( टीप नंबर १ पहा ) प्लॉट, **लंडन** येथील भयंकर अग्निप्रलय, इत्यादि गोष्टी या वर्गापैकींच आहेत, परंतु त्या ' इतिहास ' या सदरांत येणाऱ्या नाहींत. ह्या गोष्टी इतिहासाच्या सांगाड्याचा, पण तोही फार महत्वाचा नाहीं असा, एक भाग आहे. उदाहरणार्थ **म्यागना कारटा** ( टीपनंबर२पहा ) नांवाच्या सनदेवर **जॉन** राजाचें सही करणें ही गोष्ट घ्या. इंग्रजी इतिहासांतील ठोकळ तारखांच्या कोणच्याही जंत्रींत अगदीं हटकून सांपडणाऱ्या गोष्टींपैकींच ही एक आहे. बरें, पण ही तारखांची जंत्री पाहिली असतां, ही सनद कशा-करितां दिली, याचा आपल्याला कांहींएक बोध होत नाहीं; आणि इंग्लंडांतील शाळेंतील मुलाला, कांहीं थोड्या वर्षांपूर्वी, अवश्य वाचाव्या लागणाऱ्या इतिहासांच्या पुस्तकांकडे जरी आपण धांव घेतली, तरीही आपली हीच दशा. त्यासंबंधानें आपल्याला अवश्य लागणाऱ्या माहि-तीपैकीं कोणतीच माहिती त्या पुस्तकांतून दिलेली नाहीं. शाळेंत चालू असणाऱ्या व जुन्या पद्धतीनें लिहिलेल्या इतिहासांमधून वरील सनदे-संबंधानें आपल्याला काय माहिती मिळणार? जी कांहीं मिळणार ती या नमुन्याची. **जॉन** राजानें ( टीप नंबर ३ पहा ) आपल्या राज्याचा कारभार फार वाईट रीतीनें केला, त्याच्या पदरच्या सरदारांनीं त्याच्या विरुद्ध बंड केलें, आणि नंतर राज्यकारभार सुरळीत रीतीनें चाल-विण्याविषयीं त्याच्याकडून अभिवचन घेतलें. ( हाच मजकूर पण भल्या मोठ्या शब्दांनीं सांगितलेला असतो. कारण, शाळेंतील मुलांच्या उप-योगाकरितां ह्मणून लिहिलेल्या पुस्तकांच्या कर्त्यांची अशी समजूत झालेली दिसते कीं, जों जों मुलगा लहान असेल तों तों मोठे शब्द त्याच्या नरड्यांत कोंबकोंबून घातले पाहिजेत ). त्याकरितां ते सर्वजण **रनीमेड** ( टीप नंबर ४ पहा. ) येथें जमले, आणि त्या सनदेवर त्यांनीं राजाची सही घेतली, व तेव्हांपासून त्या सनदेला **ग्रेट चारटर** ह्मणजे मोठी महत्वाची सनद, असें लोक ह्मणूं लागले; आणि हें वर्णन झाल्या-नंतर प्रत्येक मनुष्याला जन्मतःच प्राप्त होणारे हक्क, जूरीच्या मदतीनें आपला न्याय करून घेण्याचा त्याचा हक्क, आपल्या घरांत एखाद्या किल्ल्यांत असल्याप्रमाणें त्याला प्राप्त होणारे स्वातंत्र्य, यासंबंधानें शब्दांचें

अवडंबर, या पुस्तकांमधून असावयाचें. पूर्वी अशा प्रकारच्या वर्णनांचीच इतिहासांत गणना होत होती; निव्वळ तारखा सांगण्यापेक्षां हा प्रकार थोड्या अंशानें बरा, परंतु खरा इतिहास जो ह्मणावयाचा तो याहून किती तरी भिन्न आहे! ती सनद इंग्लिश लोकांना प्राप्त झालेल्या स्वतंत्रेची सीमा दाखविणारी खूण आहे, असें जे लोक ह्मणतात तें कशावरून आणि कां, आणि ती सनद करून देण्याविषयीं दिलेलें अभिवचन अगदीं निरुपयोगी असें न ठरतां विशेष नेटानें जोराला कसें लागलें, हें कळण्याची इतिहासाच्या खऱ्या वाचकांस अपेक्षा असते. **जॉन** राजानें चांगल्या तऱ्हेनें राज्यकारभार चालविण्याचें जसें अभिवचन दिलें होतें, तसें त्याच्या पूर्वी आणि त्याच्यानंतर गादीवर बसलेल्या राजांनींही दिलें होतें. **तुर्कस्थाना**ची हल्लींचीच स्थिति पहा. गेल्या पंचवीस वर्षांत, तुह्मी ह्मणाल त्या वेळेला उत्तम प्रकारानें राज्यकारभार चालवूं, असें तेथील सुलतानांनीं आपल्या प्रजेला अनेक वेळां सांगितलें, परंतु नुस्ती तोंडाची वाफ दवडण्यापलीकडे त्याचा काय उपयोग झाला? कागदांवर लिहून दिलेल्या सनदा, अभिवचनें आणि चांगले कायदे, एवढ्यानेंच देशाची राज्यव्यवस्था जर उत्तम प्रकारची ठरेल, तर मग तुर्क लोकांच्या राष्ट्राइतकें सुव्यवस्थित राष्ट्र जगांत कोणचेंच नाहीं, असें ह्मणावें लागेल. खरोखर आमच्या त्या मोठ्या सनदेकडे जर कोणी नजर दिली तर तिच्यांत त्याला सर्वत्र घोंटाळा आणि अप्रस्तुत गोष्टींची चर्चा दिसून येईल. तुर्क लोकांचे कायदे आणि जाहिरनामे आमच्यापेक्षां बरेच सुबक लिहिलेले असतात, असें मी बिनदिक्कत सांगतों. ह्मणून आपल्याला इतिहासाचें खरें ज्ञान प्राप्त झालें आहे असें आपणाला ह्मणतां येण्याच्या पूर्वी, '**म्यागना कारटा**' हा इंग्लिश इतिहासाचा फार महत्वाचा यशस्तंभ आहे, व तुर्क लोकांच्या सनदा केरांत टाकण्याच्या योग्यतेच्या आहेत, अशी स्थिति कां असावी हें समजून घेण्याची तरी निदान आपली तयारी असली पाहिजे. आतां तें समजून घेण्याकरतां ज्या लोकांनीं **जॉन** राजापासून ती सनद मिळविली, त्या लोकांसंबंधानें व त्या लोकांच्या समकालीन संस्थांसंबंधानें माहिती करून घेणें आपल्याला अवश्य आहे. ती सनद नुस्ती डोळ्यांनीं वरवर

न वाचतां तिच्यांत चांगलें डोकें घातलें ह्मणजे त्या वेळेच्या लोकांना तिचा कसा उपयोग झाला हें आपल्या ध्यानांत येईल. परंतु आतां आपण हें लक्षांत आणा कीं, ती सनद ह्मणजे एक कायदेशीर दस्तऐवज आहे. त्या दस्तऐवजांत एखाद्या कायद्यांत दिसून येणाऱ्या तरतुदी आणि बंदोबस्त यांची इतकी रेलचेल आहे कीं, तेराव्या शतकाच्या आरंभाला इंग्लंड देशांत कायद्यांच्या कोणकोणच्या संस्था होत्या त्याचें थोडें तरी ज्ञान करून घेतल्याशिवाय, त्या कागदाचा आपण अर्थ जर करूं लागलों तर त्यापासून आपल्याला कांहीं बोध होणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट आपला घोटाळाच होईल. आपल्या मनांत असो वा नसो; इतिहासांतील **मागना कार्टा**चा बरोबर अर्थ समजून घेण्यास कायद्यांत बुडी मारल्याशिवाय आपणांला गत्यंतर नाहीं; त्या विषयाच्या अगदीं बुडाशीं, किंवा त्याच्या आसपास जर आपल्याला जावयाचें असेल, तर तेराव्या शतकांतील मुत्सद्दी आणि सुधारक यांच्या नजरेला कोणकोणच्या कायदेशीर गोष्टी आल्या, त्या वेळेच्या लोकांच्या कायद्यांच्या समजुतीकडे त्यांनीं कशा प्रकारानें लक्ष पुरविलें, याची मोठ्या मेहनतीनें आपण माहिती करून घेतली पाहिजे. आतां मी जें हें विधान केलें तें कमीअधिक प्रमाणानें, आमच्या राज्यव्यवस्थेचा ज्या ज्या निरनिराळ्या काळीं विस्तार होत गेला, त्या त्या काळाला लागूं पडण्यासारखें आहे. इतिहासाचा सांगाडा अथवा इतिहासाच्या शुष्क अस्थी या संबंधानें नुकतेंच मी कांहींसें बोललों होतों. शरीराला जशा अस्थी तसा राजकीय संस्थांना कायदा हें ह्मणणें अधिक खरें आणि यथार्थ आहे. कायदा ही एक प्रकारची बाह्य रचना आहे, आणि कोणच्याही संस्थांना जें एखादें स्वरूप प्राप्त होतें, तें या कायद्यापासूनच होतें. शारीरशास्त्राचा अभ्यास केल्यावांचून मनुष्याच्या शरीराचें हुबेहूब चित्र काढणें जसें अशक्य, तसेंच कायद्याच्या ज्ञानाशिवाय इतिहासाचें खरें रहस्य कळणेंही अशक्य आहे. याच कारणामुळें जो कोणी कायद्याचा व्यासंग करतो, व स्थूल मानानें इंग्लिश संस्था आणि कायदा या उभयतांचा विस्तार परस्परांशीं कसा गुरफटून गेला आहे, याचें निरीक्षण करतो, त्यालाच तो चित्ताकर्षक वाटतो.

आणि आलीकडे आपल्याला असें दिसून येतें कीं, आपणांपैकीं उत्तम इतिहासकार--यांपैकीं सर्व विद्वान् लोकांच्या मतानें सर्वांत पहिलें स्थान ज्याला देणें योग्य आहे, अशा प्रो॰ स्टब्सच्याच (टीप नं. ९ पहा.) नांवाचा तेवढा येथें मी उल्लेख करतों--कायद्याच्या इतिहासांत उत्पन्न होणाऱ्या अडचणींनें भिऊन जात नाहींत; कायद्याचें जुनें दफ्तर ते मोठ्या काळजीनें आणि उल्हासानें चाळून पाहतात, आणि आह्मीं कायदे जाणणारे लोक त्यांच्यासंबंधानें माहिती मिळविण्याची जितकी खटपट करूं, तितकी तरी खटपट केल्याशिवाय, त्यांना चैनच पडत नाहीं. उलट आह्माला ज्या गोष्टी कळल्या नाहींत, किंवा ज्या कळवून घेण्याची आह्मीं खटपट केली नाहीं, त्या ते उघडकीस आणतात. इतिहासकार या नात्यानें त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांचें परीक्षण करण्याचें काम माझें नाहीं. एखाद्या शिष्यानें आपल्या गुरुजीची तारीफ करणें जरी अविनयास्पद नसलें, तरी विशेष अभिनंदनपर नव्हें, हें उघड आहे. परंतु कायद्याचा व्यासंग करणारा या नात्यानें, केवळ कायद्याच्या मुद्यावर लक्ष देऊन त्यांच्या कृतींत दिसून येणारे त्यांचे दीर्घ परिश्रम आणि सूक्ष्म रीतीनें त्यांनीं केलेलें निरीक्षण, या दोहोंबद्दल त्याचें कौतुक करण्याला, मला हरकत दिसत नाहीं. तसेंच आमच्या कायद्यांच्या पुस्तकांत फार दिवसांपासून भरती करकरून घातलेल्या हकीगतीसंबंधानें, ज्या कांहीं आमच्या मिथ्या कल्पना होत्या, व त्यांच्याच जोरावर आह्मीं त्या हकीगतीचा जो भलताच अर्थ करीत होतो, तो आमच्या मनांतून पार नाहींसा करण्याच्या कामीं, त्यांनीं जी आह्माला फार मोठी मदत केली आहे, तीबद्दल त्यांचे आभार मानण्याला, मला पूर्ण स्वतंत्रता आहे. वर सांगितल्याप्रमाणें त्यांनीं कामगिरी बजाविली आहे, हें एकदां आपल्या ध्यानांत आलें ह्मणजे, 'कातड्यासारखी जगांत दुसरी कोणतीच वस्तु नाहीं,' असें एक चर्मकार जसें नेहमीं ह्मणत असे, त्याच नमुन्यावर मी कायद्याचा व्यासंग करणारा आहे ह्मणून, कायद्याच्या इतिहासाचा अभ्यास करावा, असें ओरओरडून सांगत आहे, असा आपल्या मनांत कदाचित् संशय आलाच, तर तो दूर करण्याला तें पुरें होईल, अशी माझी आशा आहे.

कायद्याच्या संस्था आणि कल्पना यांपासून राज्यनीतीला फार मोठा आणि फलोत्पादक असा जोर कसा मिळत गेला, व त्यापासून आमच्या राजकीय संस्था आणि कल्पना विशेषतः आह्मा इंग्लिश लोकांच्या स्वभावास अनुरूपच कशा झाल्या, इतकेंच नाहीं, तर इंग्लिश कायद्याची छटाही त्यांत पूर्णपणानें कशी उतरली, यासंबंधाची आपल्या मनांत थोडीशी कल्पना आणून देण्याचा आजच्या माझ्या भाषणाचा हेतु आहे. आपल्याला आज जितका अवकाश आहे, तितक्या अवकाशांत या विषयाचा फार बारकाईनें विचार करणें अथवा इंग्लिश इतिहासाचा बराच मोठासा भाग आक्रमण करणें, अशक्य आहे, हें उघड आहे. ह्मणून ज्यावेळेस आपल्या संस्थांच्या स्थापना मोठ्या झपाट्यानें होत होत्या, किंवा त्यांच्यांत नवीन फेरफार होत होते, अशा आणीबाणीच्या वेळेस इंग्लिश राजनीतीची काय स्थिति होती, याचा कायद्याच्या दृष्टीनें विचार केला, तर त्यापासूनच आपला हेतु कदाचित् उत्तमप्रकारें साध्य करून घेतां येईल असें वाटतें. अशा प्रकारचे तीन प्रसंग आपल्या नजरेपुढें एकदम येऊन उभे राहतातः पहिला प्रसंग, ह्मणजे ज्यावेळेस बाराव्या आणि तेराव्या शतकांत फार मोठी इमारत रचली तो; दुसरा प्रसंग, ह्मणजे ज्यावेळेस राजा आणि पार्लमेंट यांमध्यें वैरभाव उत्पन्न होऊन आपआपसांत यादवीयुद्ध सुरू झालें व **कॉमनवेल्थ**ची [ टीप नंबर ६ पहा ] स्थापना झाली तो; आणि तिसरा, ह्मणजे **दुसऱ्या जेम्स** राजाचा अधिकारत्याग, आणि **तिसऱ्या वुइलियम**ची केलेली निवडणूक, या दोहोंमुळें ज्यावेळेस अर्वाचीन राज्यव्यवस्थेची उभारणी झाली तो. या तीनही प्रसंगीं कायदा व कायद्याच्या व्यासंगांत रममाण होणारे लोक, यांनीं निरनिराळ्या मार्गांनीं कां होईना; पण व्यवहाराला उपयोगीं पडेल, असें वळण इंग्रजी राजनीतीला कसें लावलें हें स्पष्टपणें दाखवितां येईल. प्रथम आपण मध्ययुगाचाच [ टीपनंबर ७ पहा. ] विचार करूं. कारण, त्या युगाची माहिती असावी तितकी सध्याच्या सुशिक्षित लोकांना नाहीं. प्रोफेसर **स्टब्स** यांनीं 'राज्यव्यवस्थेचा इतिहास' या विषयावर आपला मोठा ग्रंथ छापून काढण्याच्या अगोदर, विशेष रीतीचा व्यासंग करणाऱ्या विद्यार्थ्यां-

शिवाय इतरांना ही माहिती वस्तुतः दुष्प्राप्यच होती. प्रोफेसर साहेबांचा ग्रंथ जो प्रसिद्ध झाला, तो तरी नुक्ताच ह्मणजे १८७५ सालीं. शिवाय त्यांची लेखनपद्धतिही लोकांना असावी तितकी प्रिय नाहीं. जे कोणी लोक तो इतिहास वांचतात त्यांपैकीं बरेच, परीक्षेची भीति त्यांच्या नजरेपुढें असते ह्मणूनच वाचतात, एरवीं तो कधींही वाचतेना, अशी माझी कल्पना आहे. तथापि, अलीकडे लोकांना समजेल अशा सुगम भाषेंत लिहि-लल्या लहान लहान पुस्तकांमधून या ग्रंथांतील माहिती देण्याचा क्रम मोठ्या झपाट्यानें सुरू आहे; परंतु तूर्तच्या प्रसंगीं तरी, बाराव्या शत-काच्या उत्तरार्धांत आणि तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत असा एक काळ आला होता कीं, त्या काळांत इंग्लंड देशांत अनेक गोष्टींची फार बळकट आणि मजबूत अशी रचना झाली, ही माहिती पुष्कळ लोकांना अश्रुत-पूर्व आहे, असें धरून चाललें पाहिजे. आपल्या देशांत अस्तित्वांत असणाऱ्या संस्थांपैकीं बहुतेक सर्व संस्थांचें जें स्वरूप हल्लीं आपल्याला दृग्गोचर होतें, तें त्यांनां प्रथम या काळांत मिळालें; अलीकडे कांहीं फरक त्यांत झाला असेल तर तो फार थोडा आहे. वीस किंवा तीस वर्षांच्या पूर्वीं या गोष्टी विद्वान् लोकांना कळ-लेल्या नव्हत्या, किंवा थोड्याशा परिश्रमानें कळवून घेतां आल्या नसत्या असें नाहीं; परंतु इतिहासाचा साधारण रीतीनें अभ्यास कर-णारे इकडे मुळीं लक्षच पुरवीत नाहींत. मध्य युगासंबंधानें अगदीं आलीकडे आलीकडे—क्वचित् क्वचित् हल्लींच्या कालांत देखील—लोकांना पसंत झालेल्या ग्रंथकारांनीं लेख लिहिण्याची जी एक तऱ्हा उचलली होती, तीवरून आमचें ह्मणणें खरें ठरतें. त्यांचे लेख प्रमाणभूत असें धरून जर एखादा चालला, तर त्याची अशी कल्पना होऊन बसेल कीं, मध्ययुग ह्मणजे अंधार, अज्ञान आणि अपराध यांचा काल होय; व त्या कालांत माहित असण्या लायख गोष्टींची कोणीही माहिती करून घेतली नाहीं, किंवा हातानें घडवून आणतां येण्याजोग्या गोष्टी कोणीही घडवून आणल्या नाहींत, असेंही वाटेल. एखाद्याची अशी कल्पना होईल कीं, मध्ययुगांतील समाजाचे पुढें लिहिल्या प्रमाणें एकंदर तीन वर्ग करतां येतील: पहिल्या वर्गांत आपआपल्या किल्यांत वस्ती करून

राहणारे सरदार लोक, दुसऱ्यांत या सरदारांच्या जुलुमाखालीं चिरडून गेलेले गरीब व हताश झालेले लोक व तिसऱ्या वर्गांत सर्व प्रतीच्या गृहस्थ लोकांपासून पैसे उपटण्या पलीकडे ज्यांचे विचार कधींही गेले नाहींत असे दांभिक पुरोहित. अशा रीतीनें गत गोष्टींचा विचार करणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें, इंग्लंड देशाचा ह्मणा किंवा इतर कोणत्याही देशाचा ह्मणा, इतिहास शिकण्याच्या नुस्त्या मार्गाला लागण्यापूर्वी, अशी ही झालेली मनाची प्रवृत्ति अगदीं बदलून टाकली पाहिजे. सहा किंवा सात शतकांपूर्वी आपले जे पूर्वज होते त्यांच्यापेक्षां आपण आतां पुष्कळ सुधारलों आहों, मनुष्याच्या उपजीविकेला लागणाऱ्या साधनांची आपणापाशीं अधिक समृद्धि आहे, आणि एकंदरीच्या मानानें आपण अधिक सुस्थित आणि सुखी आहों, हें मी यत्किंचित् देखील नाकबूल करीत नाहीं. इतिहासाचा वरवर अभ्यास केला तरीदेखील, गेलेले दिवस सुखाचे गेले, असें सांगणाऱ्या आख्यायिकाकारांच्या मनांतील तरंग, त्याचप्रमाणें गेलेल्या कालांत मनुष्यजातीची कांहीं सुधारणा झाली नाहीं, असें सांगणारे व लोकांच्या मर्जीतले ग्रंथकार यांच्या मनांतील तरंग, हे दोन्हीही आपणांपुढें क्षणभर टिकत नाहींत. परंतु हा सर्व परिणाम आपल्या पूर्वजांनीं तत्कालीन समजुतीप्रमाणें जें कांहीं चागलें काम करून ठेविलें आहे, त्याचा मुख्यत्वेंकरून आहे. उदाहरणार्थ, आपल्या प्राणांचें आणि वित्ताचें बाह्य उपाधीपासून संरक्षण झालें पाहिजे, न्याय विकला जाऊं नये व विकत घेतां येऊं नये, एकपक्षीं, कोणच्याही मनुष्याला कायदेशीर कारणाशिवाय शासन होऊं नये, व दुसऱ्यापक्षीं कायद्यांचें उल्लंघन करतां येईल इतका कोणीही मनुष्य प्रबल होतां कामा नये, या सर्व गोष्टी आपल्याला अगदीं खात्रीनें सुगम अशा वाटतात. परंतु मध्ययुगांतील शास्ते आणि मुत्सद्दी यांना याच गोष्टी आतां इतक्या सुगम वाटत नव्हत्या; त्या साध्य करून घेण्याकरितां त्यांना अश्रांत श्रम करावे लागले, आणि प्रसंगविशेषीं लढायाही कराव्या लागल्या; आणि तसे श्रम करीत असतां क्वचित् प्रसंगीं त्यांनीं कठोरपणा दाखविला असला तर त्याबद्दल दोष देण्याच्या हेतूनें आपल्या तोंडांतून आपण एक शब्द-

देखील काढण्याची सोय नाहीं. कारण, तसें करण्यापूर्वी प्रस्तुतच्या काळांतदेखील मोठमोठ्या सुधारलेल्या राज्यांत काय प्रकार झाले आहेत, इकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. आणि कांहीं लोक असें जेव्हां ह्मणतात कीं, मध्य युगांतील लोकांनीं नवीन अशा कोणच्याही गोष्टी शोधून काढल्या नाहींत, तेव्हां त्यांचें मला मोठें आश्चर्य वाटतें; सर्व पाश्चात्य ख्रिस्ती राष्ट्रांत कमीअधिक प्रमाणानें जिचा नमुना उचलला आहे, अशी पार्लमेंटाची संस्था त्यांनीं जी शोधून काढिली, तिच्यांत नवीन असें कांहीं नाहीं, असें कां यांचें ह्मणणें आहे? असो. आपल्या पूर्वजांनीं केलेल्या ज्या कामाविषयीं मी आतां आपल्याला सांगितलें आहे, तें काम त्यांनीं पार्लमेंटाची संस्था अस्तिवांत येण्यापूर्वी केलेलें आहे. सुस्थिति ( टीप नंबर ८ पहा ) आणि न्याय यांची सुव्य-वस्थित, स्थिर आणि नियत अशी पद्धति सुरू होण्यापूर्वीचा काल, पार्लमेंटाची संस्था आस्तित्वांत आणण्याजोगा पक्क झाला नव्हता. आणि ती अवश्य लागणारी व्यवस्था आणि स्थिरता, ह्मणजे हल्लीं जिला आपण कायद्याची सुधारणा हें नांव देऊं, अशा उपायांनीं अमलांत आली होती.

**नॉर्मन** लोकांच्या ( टीप नंबर ९ पहा ) विजयानंतर सरासरी एक शतक पावेतों, अम्मलबजावणी करण्याकरतां राजानें घालून दिलेले नियम ह्मणून जे आपण हल्लीं समजतों, ते अमलांत आले होते, असें ह्मणतां येत नाहीं. अर्वाचीन काळांत राजसत्ता जशी मर्यादित झाली आहे, तशी पूर्वी नव्हती; तरी लोकांना ज्यापासून अतिशय उपयोग आहे अशीं कामें करून घेण्यासाठीं त्या राजसत्तेची फारशी मदत होत नव्हती. देशांत शांतता राखणें हें राजाचें कर्तव्य आहे व शांतता राखण्याचा त्याचा हक्क आहे, असें त्या वेळेचे लोक समजत असत. आणि ह्मणूनच ‘ राजाची शांतता ’ हे शब्द त्या काळाच्या अगोदर-पासून प्रचारांत आलेले आपण पाहतों. शांतता राखण्याचें काम राजा जरी बजावीत होता तरी, बलिष्ठ लोकांत तंटे उपस्थित झाले असतां आपआपसांत युद्ध करून त्यांचा ते निकाल लावून घेऊं

लागले, ह्मणजे त्यांना प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगांत नव्हतें; आणि बाराव्या शतकाच्या अखेरपावेतों अशा प्रकारचें आपआपसांतील युद्ध बेकायदेशीर आहे, अशीही समजूत नव्हती. ( राजकीय कारणाकरितां आणि ज्यांत सार्वजनिक कल्याण आहे अशा कामाकरितां, राजा आणि प्रजा यांमध्यें झालेलें युद्ध घटकाभर बाजूला ठेविलें तरी ) अशीं आपआपसांत खाजगी कारणाकरितां युद्धें झाल्याचीं उदाहरणें बाराव्या तेराव्या शतकाच्या अखेरीअखेरीस-देखील पुष्कळ सांपडतील. त्या वेळेस सर्व देशाला सारखी लागू पडेल अशी न्यायपद्धति अमलांत नव्हती; आणि हीच गोष्ट आपण विशेष लक्षांत ठेवावी असें माझें आपल्याला सांगणें आहे. शंभर अधिक परगण्यांपैकीं प्रत्येक परगण्यांत जुन्या तऱ्हेच्या लोकसंमत न्यायसभा ( ह्मणजे पंचायती ) होत्या. **नॉर्मन** विजयापूर्वी **विटेनागॉमॉट** ( टीप नंबर १० पहा ) अथवा **विटन्स**, ह्मणजे देशांतील शहाण्या लोकांची सभा, आणि राजा या दोघांच्या हातांत काय ती सत्ता होती; त्या सभेंत हजर राहण्याचा आणि तेथें आपलें मत देण्याचा हक्क प्रत्येक स्वतंत्र मनुष्याला असे. त्यालाच अनुसरून वर सांगितलेल्या न्यायसभांत हजर राहण्याकरितां प्रत्येक स्वतंत्र मनुष्याला पाचारण करतां येत होतें. लोकसंमत हा शब्द वर जो मी वापरला आहे ' तो त्याच्या हल्लींच्या अर्थानें वापरला आहे ' असें आपण समजूं नये. तेथें काम चालू असतांना हजर असणाऱ्या लोकांपैकीं पुष्कळ लोकांच्या मताला असावी तितकी किंमत होती किंवा नाहीं, या विषयीं बरीच वानवा आहे; जलद आणि सारासार विचार पाहून निकाल देण्याचा प्रयत्न त्या सभांच्या हातून कधींही झाला नाहीं, हें विधान मात्र अगदीं बिनदिक्कत करितां येण्यासारखें आहे. प्राचीन काळांतील कोणचीही गोष्ट घ्या, ती अगदीं सरळ आणि साधी असावयाची असा जो कांहीं सार्वत्रिक भ्रम असतो, तो ऐतिहासिक दृष्ट्या केलेल्या टीकेपुढें फार वेळ टिकत नाहीं. संस्थांच्या इतिहासांत जों जों आपण मागें जाऊं, तों तों आपल्याला असें दिसून येईल कीं, आपणांपुढें आलेल्या कामांतील तात्पर्यार्थाकडे नजर न पुरवितां आजूबाजूच्या भाकड कथांकडे

'मंत्रापेक्षां तंत्र फार' या ह्मणीप्रमाणें लक्ष पुरविण्याची त्या वेळेच्या लोकांची नेहमींची प्रवृत्ति होती. आणि इंग्लंडाचा इतिहास या नियमाला अपवाद नाहीं. ह्या सर्व न्यायसभांमधून निरनिराळ्या चालीरीतींचें प्राबल्य होतें. या चालीरीती संख्येनें इतक्या जास्त व प्रकारानें इतक्या भिन्न होत्या कीं, त्यांचें वर्णन करणें दूरापास्त आहे, अशी लोकांची समजूत होती, आणि तशी समजूत होण्याजोग्या त्या पारिभाषिक आणि प्रत्यूहजनक होत्या, व पुढें येणाऱ्या व्यवहाराच्या गुणावगुणांशीं ज्यांचा अगदीं संबंध नाहीं, अशा भानगडीही त्यांत अनेक होत्या, असें ह्मणण्याला बरींच कारणें आहेत. पूर्वीच्या काळांतील काम चालविण्याच्या पद्धतीचा नमुना पुढें दिलेल्या रोमन लोकांच्या गोष्टींत चांगला दिसून येतो. ती गोष्ट अशी—रोम शहरांतील एका मनुष्यानें, आपले द्राक्षाचे वेल कापल्याबद्दल आपल्या शेजाऱ्यावर फिर्याद आणिली. पण त्या फिर्यादींत त्याला यश आलें नाहीं; कारण ट्वेल्व्ह टेबल्स ( टीप नंबर ११ पहा. ) नांवाचा रोमन लोकांचा जो कायदा होता, त्यांत झाडें असा सर्व साधारण शब्द घातला होता, ह्मणून वादीला जर दाद पाहिजे होती, तर त्यानें द्राक्षाचे वेल असें न लिहितां झाड असा कायद्याला संमत असलेला शब्द घालणें जरूर होतें.' असें त्यांत ठरलें! जर्मनी देशांतील जुन्या कायद्यासंबंधानेंही या मासल्याच्या गोष्टी अनेक सांगण्यांत येतात, आणि इंग्लंडांतील जुन्या १०० अधिक परगण्यांतील पंचायतीमधून असे प्रकार अनेक वेळां झाले असतील, यांत शंका नाहीं. शिवाय आपलें कामकाज सोडून देऊन या पंचायतीकडे खेपा घालणेंही गोरगरीब लोकांना त्रासदायक होतें, असें ह्मणण्यासही बरीच जागा आहे.

त्याचप्रमाणें जूरीच्या मदतीनें न्याय करण्याची लोकसंमत संस्था पूर्वीपासून चालत आलेली आहे, अशी आह्मीं आपल्या मनाशीं घमेंड मारीत होतों; कदाचित् अजूनपर्यंत लोकांच्या वाचण्यांत जीं पुस्तकें येतात, त्या पुस्तकांमधून ऑल्फ्रेड [ टीप नंबर १२ पहा. ] राजाच्या नांवाशीं या संस्थेचा संबंध प्रायः जोडून देण्यांत येत असतो. परंतु खरा प्रकार तसा नाहीं. त्यासंबंधीं बारीकसारीक माहिती जितकी

अजून मिळावी तितकी मिळालेली नाहीं. परंतु अलीकडच्या काळांतील जूरीच्या मदतीनें न्याय करण्याची पद्धति, जुन्या लोकसंमत काम करण्याच्या मार्गांतील ते सर्व विधी, आणि तो सर्व त्रास टाळण्याकरितां, आणि आपल्या मुलखांतील वसूल आपल्या पदरांत पाडून घेण्याकरितां, कमिशनर लोकांना प्रथम शपथ देऊन नंतर आपल्या मदतीला घेण्याचा राजांनीं जो प्रघात घातला, त्यापासून हळूहळू निघाली असावी, असें माझें मत आहे. कसेंही झालें तरी दिवाणी कामांत जूरीचा जो प्रवेश झाला, तो राजाच्या न्यायसभेमुळें झाला, पंचायतीमुळें नव्हे, हें अगदीं खास. तथापि हा विषय फार मोठा आहे ह्मणून त्यांत आतां शिरतां येत नाहीं.

आपण आपला क्रम चालू ठेवून राजाची न्यायसभा ह्मणजे कोणच्या प्रकारची होती हें पाहूं. व्यापक दृष्टीनें पाहिलें तर, पूर्वीची इंग्लंडांतील शहाणे लोकांची जी सभा होती, तिचें काम करण्याकरितां तेवढ्या वेळेपुरतें नेमिलेलें मोठमोठ्या वजनदार लोकांचें हें एक कौन्सिल [ सभा ] होतें आणि त्या कौन्सिलाच्या मदतीनें आणि सल्लयानें राजा आपल्या राज्याचा कारभार चालवीत असे. तीच नजर जरा आकुंचित केली तर असें दिसून येईल कीं, ही न्यायसभा आतांच सांगितलेल्या शहाणे लोकांच्या सभेची, न्यायाच्या कामांत मदत करणारी एक पोट-सभा होती. सर्व राज्यावर न्याय करण्याच्या कामांत राजाचें आधिपत्य आहे ही कल्पना पूर्वीपासूनच होती—पुढें कांहीं कालानें राजा ह्मणजे " न्यायाचा झरा ", असें ह्मणण्याचा जो प्रघात पडला त्याच्या मुळाशीं तरी हीच कल्पना आहे. परंतु तो न्याय देण्याचा अधिकार राजा स्थिर आणि नियत मार्गांनीं बजावीत नव्हता. न्याय-सभेंत राजासन्निध असणारे बडे बडे लोक, धर्माध्यक्ष, आणि उपा-ध्यांच्या घराण्यांतील मुख्य पुरुष,—तात्पर्य राजाचें लक्ष मुद्दाम आपणाकडे ओढून घेण्याजोगा, किंवा पडेल ती किंमत देऊन तें विकत घेण्याइतका, जो जो मनुष्य प्रबल आणि श्रीमंत होता तो प्रत्येक— आपले व्यवहार प्रथमतः राजाच्याच न्यायसभेपुढें नेत होते, किंवा स्थानिक न्यायसभांमधून तिकडे वर्ग करून घेत होते; आणि तेथें गेल्यावर बराच पैसा आणि वेळ खर्च केल्यानंतर त्यांना तेथें न्याय

मिळत असे. न्याय मिळण्याची ही पद्धति आपणाला आतां जरी असंस्कृत अशी दिसते, तरी स्थानिक न्यायसभांमधून चालू असलेल्या पद्धतीपेक्षां प्राय: ती बरीच सुधारलेली होती. वादाच्या पायीं होणाऱ्या खर्चासंबंधानें आलीकडे बरीच कुरकुर ऐकूं येते आणि ती अगदींच अयथार्थ आहे असें नाहीं; परंतु बाराव्या शतकांत या कामाला लागणारा खर्च केवळ अपरिमित होता. लोकांना न्याय देणें हें राजाच्या हातांत पैसे वसूल करण्याचें उत्तम साधन होतें व त्याच द्वारानें आपल्याला तो किफायतही चांगलीच करून घेत होता. अशा प्रकारानें न्याय विकणें आणि विकत घेणें यांत कोणच्याही प्रकारचा भ्रष्टपणा नाहीं अशी त्यावेळेची समजूत होती हें आपल्या लक्षांत येईलच, तथापि त्यांत भ्रष्टपणा मुळींच होत नव्हता असें समजणें मात्र फार कठीण आहे. राजाच्या दरबारांत जाऊन तेथें आपल्या व्यवहाराचा निकाल आपल्यासारखा करून घेण्याकरतां पक्षकार लोक पैशाचीं ओझींच्या ओझीं देत होते असें नाहीं, तर त्याची चवकशी जर कोठें व्हावयाची असेल, तर ती तेथेंच व्हावी या हेतूनें ते देत होते. राजाकडे जाऊन न्याय मागणें हा प्रजेचा हक्क नव्हता, प्रसन्न होऊन त्यानें तो केला तर केला; स्थानिक न्यायसभांनीं केलेले निकाल दुरुस्त करणें किंवा फिरविणें, किंवा पहिल्या-पेक्षां जास्त माहिती मिळाली असतां, आपला निकाल आपणच फिरविणें, या कामांत तर राजाची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याचें महत्व किती होतें हें स्पष्ट दिसून येतें. आणि राजाच्या आज्ञापत्रांचा प्रशस्तपणें विक्रय होत होता इतकेंच नाहीं, तर त्यांची किंमतही प्रसंग पडेल तशी कमी, अधिक प्रमाणानें घेण्यांत येत होती. आणि असें कां होत होतें असें जर आपण विचारलें तर, राजाच्या अधिकाऱ्यांना जितका पैसा काढणें शक्य होतें, तित-का ते काढीत होते, असें सांगण्याशिवाय माझ्यापाशीं दुसरें उत्तर नाहीं. असो.

आतांपर्यंत दिली इतकी माहिती दिल्यानंतर ‘ कोणाही मनुष्याला न्याय अथवा हक्क आम्ही विकणार नाहीं, किंवा कोणालाही न्याय देण्याचे कामांत किंवा त्याचे हक्क रक्षण करण्याचे कामांत नाकार किंवा दिरंगाई करणार नाहीं ’, हें कलम त्या महत्वाच्या सनदेंत कां घातलें असावें हें स्पष्ट होतें. ज्या कालाविषयीं आपण हल्लीं

विचार करीत आहों त्या कालानंतर सुमारें ९० वर्षांनीं ती सनद लोकांना प्राप्त झाली; तितक्या अवधींत पुष्कळ सुधारणा होऊन राजाच्या दरबारीं जाऊन न्याय मागण्याचा प्रजेला हक्क मिळाला व राजाच्या मर्जीचा भाग त्यांतून पार नाहींसा झाला, हें आपल्या लक्षांत आलें असेलच. वर सांगितलेल्या या कलमाशिवाय त्यांत आणखी असें एक कलम होतें कीं, त्याच्या योगानें निरनिराळ्या परगण्यांमधून नियमितपणानें न्यायाधीश पाठविणें राजाला भाग पडूं लागलें. या प्रमाणें साऱ्या इंग्लंड-देशभर कायद्याचा चोंहोंकडे एक प्रकारचा अम्मल करण्याची पद्धति **मॅग्ना कारटा**च्या तारखेपासून व्यवस्थित रीतीनें सुरू झाली. याहींपेक्षां विशेष महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे त्या सनदेमुळें इंग्लंडच्या राजधानीचें ह्मणून एक शहर वसविण्यांत आलें, असेंदेखील ह्मणण्यास आपल्याला हरकत नाहीं. कारण राजाची न्यायसभा आतांपर्यंत एके ठिकाणीं अशी कोठेंच नव्हती; ती एखादे वेळी **ऑक्सफर्ड** येथें भरे, तर दुसऱ्या वेळीं **वेस्टमिनिस्टर** येथें भरे, केव्हां केव्हां **विंचेस्टर** येथेंही भरे व केव्हां केव्हां तर ती अशा ठिकाणीं भरे कीं, तीं ठिकाणें आतां अगदीं अप्रसिद्ध अशीं मानलीं जात आहेत. परंतु त्या सनदेंत असें ठरविलें होतें कीं, राजानें नेमिलेल्या न्यायाधीशासमोर, चवकशीकरतां लोकांचे आपआपसांतील तंटे जे यावयाचे, ते राजाची न्यायसभा असेल त्या ठिकाणीं न येतां कांहीं विवक्षित ठिकाणींच यावे; आणि याप्रमाणें न्यायाच्या सभांचें मुख्य स्थान आणि पुढें कालावधीनें राजाचे राजकीय राजधानीचें स्थान, **वेस्टमिनिस्टर** येथें स्थापन झालें.

आतां हें अगदीं खरें आहे कीं, या सर्व गोष्टी कांहीं एकदम झाल्या नाहींत, किंवा त्यांच्यापासून होणारा परिणामही पूर्णपणें एकदम लोकांच्या प्रत्ययाला आला नाहीं. उदाहरणार्थ **मॅग्ना कार्टा** पास होण्याच्या पुष्कळ अगोदर राजाचे न्यायाधिकारी सर्व परगण्यांभर चक्कर घालीत होते, आणि **दुसऱ्या हेन्रीच्या** ( टीप नंबर १२ पहा ) कारकीर्दींत हें काम त्याच्या देखरेखीखालीं मोठें पद्धतशीर चाललें होतें; परंतु पहिल्यानें हा सर्व खटाटोप मुख्यत्वेंकरून राजाचा करभार गोळा

करण्याकरितां होता. राजाची न्यायसभा ह्मणजे त्याचा करभार गोळा करण्याचें व न्याय देण्याचेंही एक प्रकारचें साधन होतें. त्या काळांत प्रांताधिकाऱ्याची जी जागा होती, ती केवळ शोभेकरतांच होती, व आपल्या प्रांतांतील वसूल राजाच्या खजिन्यांत पोचता करण्याची काय ती त्या अधिकाऱ्यावर जबाबदारी होती; परंतु राजाच्या सभेंतील न्यायाधिकारी आणि सरदार लोक वेळोवेळ या प्रांतांतून त्या प्रांतांत व त्या प्रांतांतून या प्रांतांत जे फिरत होते, ते राजाचा करभार कोणी किती द्यावयाचा याचा निर्णय करण्याकरितां, लोकांच्या तक्रारी ऐकण्याकरितां, व स्थानिक अधिकाऱ्यांवर देखरेख करण्याकरितां, फिरत होते. हळू हळू राजाचे प्रतिनिधि या नात्यानें इनसाफी आणि वसुली अशीं दोन्हीही कामें त्यांनीं आपल्याकडे ओढून घेतली; आणि शेवटीं, केवळ न्यायाच्या कामाकरितां बाहेर पाठविलेल्या न्यायाधिकारांचा उल्लेख **मॅग्ना कारटामध्यें** केलेला आढळतो. या न्यायाधिकाऱ्यांना **मॅग्ना कारटानें** जे अधिकार दिले होते, ते तरी थोडेच होते. आमच्या हल्लींच्या परगण्यांतल्या न्यायसभांमधील अधिकाऱ्यांना जे अधिकार मिळाले आहेत, ते त्यांना **मॅग्ना कारटा** पास झाल्यानंतर पुढें हळू हळू मिळत गेले; परंतु हल्लीं-देखील राजाच्या प्रतिनिधीला जो मान आहे, तो या न्यायाधिकाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या परगण्यांमध्यें मिळतो, व त्यांची योग्यता परगण्यांमधील इतर अधिकाऱ्यांपेक्षां जास्त समजली जाते. याप्रमाणें स्थानिक न्याय-सभा एका मागून एक विलयाला गेल्या, [ आतां **लंडन** शहरांत व दुसऱ्या आणखी इतर शहरांत व गांवांत सध्याच्या कालाला शोभतील अशा सुधारणा करून पूर्वींचीं तीं स्थानिक कोर्टें आजपर्यंत अस्तित्वांत आहेत, ही गोष्ट स्वतंत्र आहे. ] आणि राजाच्या नांवाखालीं सर्वत्र एकाच प्रकारचा कायदा सुरू झाला. याचा तात्कालिक परिणाम असा झाला कीं, राजाची सत्ता बरीच वाढली व त्याबरोबरच त्या त्या ठिकाणचे बडेलोक व त्यांचीं कोर्टें ह्यांची महती त्या मानानें कमी झाली. पण दुसरा परिणाम असा झाला कीं, तेव्हांपासून कायदे जाणणारांचा एक अगदीं पृथक् असा धंदा मानण्यांत येऊं लागला, व त्यामुळें त्या धंद्यांतील लोकांच्या अंगांत विलक्षण सामर्थ्य आणि तेजस्विता दिसून

येऊं लागलीं व खुद्द राजांशींसुद्धां स्वतंत्रपणानें वागण्याइतकी योग्यता त्यांच्या ठिकाणीं आली, आणि इंग्रजी राज्यव्यवस्थेवर यापासून कशा-प्रकारचें कार्य घडून आलें याचा अनुभव पुढें पांच शतकांनंतर राजा आणि कॉमन्स [ सामान्यजन ] या उभयतांमध्यें जेव्हां मोठा वाद सुरूं झाला, तेव्हां कळून आला. त्याचप्रमाणें राजानें नेमिलेले न्याया-धीश प्रांतोप्रांतीं फिरत होते, आणि आतांप्रमाणेंच त्यावेळेसही वकील लोक, ते जातील त्या ठिकाणीं त्यांच्याबरोबर जात होते, त्याच्या योगानें लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी एक गोष्ट घडून आली, ती ही कीं, न्यायाधीश व वकील ह्यांच्या सहवासानें इंग्लंडांतील निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांस कायद्याच्या व राजनीतीच्या सर्व साधारण अशा तत्वांची बरीच ओळख झाली. जूरीच्या संस्थेचें या गोष्टीशीं मोठें लक्षांत घेण्याजोगें साम्य आहे. गांवोगांव हिंडणाऱ्या न्यायाधिशांप्रमाणें राजाचे हक्कांचा प्रजाजनांवर अम्मल करण्यासाठीं प्रथमतः या संस्थेची योजना झाली; परंतु पुढें पुढें लोकांमधील आपआपसांत उत्पन्न होणारे तंटे मिटविण्याच्या कामीं तिचा कसा उपयोग होत गेला, आणि शेवटीं तिच्यामुळें राजाची सत्ता नियंत्रित करण्याकरितां प्रजेच्या हातांत केवढें शस्त्र आलें, हें आपण पहातच आहों.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून कायदा आणि राजनीति यांचा परस्परांवर क्रिया आणि प्रतिक्रिया कशी होत असते हें आपण लक्षांत आणा. अगदीं प्रथम ज्या संस्था अस्तित्वांत येतात त्यांचा हेतु कायद्याची अम्मलबजावणी करण्याचा असतो, असें ह्मणण्यापेक्षां सरकारच्या अधिकाराची अम्मलबजावणी करण्याचा असतो असें ह्मणणें विशेष शोभेल. त्या संस्थांचा हेतु मुख्यत्वें-करून राजाचा अम्मल योग्य रीतीनें आणि राजास फायदेशीर असा चालावा, हा असतो. निरनिराळे धंदे व निरनिराळीं खातीं ह्यांमध्यें हल्लींप्रमाणें पूर्वीच्या काळांत पृथक्पणा नव्हता ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. सगळीं खातीं व सगळे धंदे एकांत एक गुरफटून जाऊन त्यांची एक खिचडीच बनली होती. पुढें

काळगतीनें त्यामध्यें पृथक्पणा येत गेला व अमकी गोष्ट अमक्या धंद्यांत अगर खात्यांत येते हें निश्चित होत गेलें. ज्या संस्थेचें जें मूळचें काम असेल, तें तिजकडून काढून तिला निराळेंच काम आखून देणें व तिचें मूळचें रूप अगदीं बदलून टाकणें हें काम पूर्वीच्या काळांत सहज होण्यासारखें होतें. पुढें कालगतीनें विशेष संस्थांकडे विशेष कामें आंखली जातात व अमुक काम अमुक संस्थेचें असें ठाम ठरून जातें. अशीं उदाहरणें आजही आपणांस कित्येक सांपडतील. असा पृथक्पणा येत गेला ह्मणजे कायद्याच्या वांटणीलाही कांहीं संस्था येतात व त्या संस्थांच्या मदतीनेंच पुढें राजकीय संस्थांसही जोर येतो. कायद्यापुढें राजानें देखील वांकलें पाहिजे, ह्या कल्पनेचा पुढें उदय होत जातो, इतकेंच नाहीं, तर कायदा ह्मणजे राजाच्या इतर प्रधानाप्रमाणेंच एक मूर्तिमंत अधिकारी आहे असें लोकांस वाटूं लागतें. ह्या कायदारूप प्रकृतीची अंमल बजावणी करणारे अधिकारीही तयार होतात व आणीबाणीच्या प्रसंगीं अमुक प्रकारें अमक्यानें वागलें पाहिजे, असेंदेखील हा कायदा मोठ्यानें आरडून सांगूं लागतो. कायदा हा सर्वांत श्रेष्ठ आहे असें मीच ह्मणतों असें नाहीं, तर हें तत्व मध्ययुगांतील ग्रंथकारांसही संमत होतें. इ० स० १२५० नंतर थोड्याच वर्षांनीं **ब्रॅक्टन** नांवाच्या एका ग्रंथकारानें काय लिहून ठेविलें आहे तें आतां मी आपणांस सांगतों. इंग्लंडांतील कायद्यावर ब्रॅक्टननें मोठा खुलासेवार असा एक ग्रंथ लिहिला आहे. अशा तऱ्हेचा हा पहिलाच ग्रंथ. त्यामध्यें एके ठिकाणीं राजासंबंधानें त्या ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं—"राजावरही ज्यांचा अधिकार चालतो, असे कोणीच नाहीं असें मात्र समजूं नये. अशांपैकीं पहिलें स्थान ज्यास दिलें पाहिजे असा परमेश्वर. त्याचप्रमाणें ज्याच्यायोगानें राजाला राजपद मिळालें असा कायदा, तोही राजाच्या वरच. तसेंच त्यानें स्वतः नेमिलेली न्यायसभा, ह्मणजे सरदार आणि मानकरी वगैरे, हेही राजाच्या वरच. मानकरी हे राजाचे सहचर आहेत, असें ह्मणतात खरें, पण ज्याला सहचर असतात, त्याला त्याच्यावरही कोणीतरी

असतो. राजा जर बेलगाम वागूं लागला, ह्मणजे कायद्याच्याविरुद्ध जर त्याचें वर्तन होऊं लागलें, तर त्याला त्या सहचरांनींच लगाम चढविला पाहिजे ;" नंतर पुढें **ब्रॅक्टननें** एका ठिकाणीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, राजा आणि सरदार संगनमत करून सदाचरणाचा मार्ग जर सोडून देतील, तर त्याचें प्रायश्चित्त त्यांना या लोकांत जरी भोगावें लागलें नाहीं तरी परलोकांत तें भोगावें लागणारच. दुसऱ्या एका ठिकाणीं तोच ग्रंथकार असें ह्मणतो कीं,—" राजावर कोणाही मनुष्याचा हुकूम चालतां कामा नये, परंतु कायद्याचा आणि परमेश्वराचा हुकूम त्यानें शिरसा मान्य केलाच पाहिजे, वस्तुतः राजा हें पद त्याला कायद्यानेंच दिलें आहे. कायद्यानें ज्याअर्थीं त्याला सर्व सत्ता आणि अधिकार दिला आहे, त्याअर्थीं कायद्याची सत्ता व अधिकार त्यानें मानला पाहिजे; कारण, कायदा एकीकडे ठेऊन तो स्वेच्छाचारी बनला, तर तो राजाच नव्हे. " दुसऱ्या एका ठिकाणीं हेच उद्गार त्यानें पुनः याच भाषेंत काढले आहेत. ह्यावरून कायदा हें प्रजाशासन करण्याच्या कामांत उपयोगीं पडणारें एक साधन आहे, इतकेंच नाहीं, तर सार्वजनिक हक्क आणि स्वतंत्रता संपादन करण्याचें प्रत्येक नागरिकांच्या हातांतील एक शस्त्र आहे, हें जें इंग्रजी राज्यव्यवस्थेखालीं स्वातंत्र्य संपादन करण्याच्या कामांतील मुख्य तत्व त्याचें तेराव्या शतकांतील एका इंग्रजी कायदेपंडितानें बीजारोपण करून ठेविलें आहे, हें आपल्या लक्षांत येईलच. **ब्रॅक्टननें** वरील तत्व घालून दिल्यानंतरसुद्धां, पुढें बऱ्याच वर्षांनीं या तत्वाची उलट बाजू प्रतिपादन करणारे कांहीं कायदेपंडित व न्यायाधीश इंग्लिश राजांना सांपडले असा विचार आपल्या मनांत आला ह्मणजे त्याबद्दल आपल्याला अतिशय खेद होतो. अशीं उलट मतें कां असेनात, पण त्यांचें तरी प्रतिपादन करणारे लोक आपल्या बाजूला अवश्य पाहिजेत, असें राजांना वाटत होतें, ही गोष्ट त्यांतल्या त्यांत महत्वाची आहे. इंग्लिश लोकांचें स्वातंत्र्य ज्या कालांत बहुतेक स्मृतिशेष झालें होतें, त्या कालांतदेखील, आपण प्रजेवर जो जुलूम करीत आहों, तो तरी कायद्याच्या अनुषंगानेंच करीत आहों, असें भासविणें निदान तसा बाहणा तरी करणें राजांना भाग पडत होतें. इंग्लिश लोकांच्या हातांत

विशेषतः एक शस्त्र असें आहे कीं, तें अगदी अमोघच आहे, असें ह्मटलें असतां चालेल. तें शस्त्र हें:-इंग्लिश राज्यांतील कोणचाही अम्मलदार असो, त्याच्या हातांत अधिकार कितीही मोठा असो, त्यानें कायद्याचें यत्किंचित् जरी उल्लंघन केलें किंवा आपल्या अधिकाराचा यत्किंचित् जरी दुरुपयोग केला तरी, बेकायदेशीर रीतीचें वर्तन करणाऱ्या दुसऱ्या कोणच्याही साधारण प्रतीच्या मनुष्याप्रमाणें न्यायसभेंत त्याच्या विरुद्ध काम चालवितां येतें. हा हक्क आह्मां इंग्लिश लोकांच्या इतका कांहीं अंगवळणीं पडून गेला आहे कीं, त्या हक्काचें स्वरूप आमच्या लक्षांतदेखील येत नाहीं. हा हक्क असल्यानें सर्वच गोष्टी साध्य होतात असें नाहीं. पूर्वींच्या खडतर काळांत राजाच्या मर्जीप्रमाणें वागणाऱ्या पार्लमेंटांनीं रयतेवर जुलूम होण्याजोगा अधिकार व सत्ता ज्या वेळेस राजांना दिली, त्या वेळेस या अधिकाराचा लोकांना कांहीं उपयोग झाला नाहीं; त्याचप्रमाणें जाणूनबुजून अन्याय करणारी जूरी निवडून काढणें, किंवा राजांना नमून असणाऱ्या न्यायाधीशांची निवडणूक करणें यांचाही या हक्कामुळें लोकांना प्रतीकार करतां आला नाहीं. परंतु इंग्लंड देशाच्या बाहेर एक क्षणभर जर आपण नजर फेंकली तर आपल्याला असें दिसून येईल कीं, पुष्कळ देशांत मला तर वाटतें कीं, युरोपखंडांतील बहुतेक सर्व देशांत ह्मटलें तरी चालेल, प्रजेला अशा प्रकारचा हक्क आज तागायत मिळाला नाहीं. अम्मलबजावणी करण्याकरतां नेमलेल्या अधिकाऱ्यांनीं आपला अधिकार बजावीत असतांना केलेल्या वर्तनावर जर कोणाची देखरेख असेल, तर ती अम्मलबजावणी करण्याकरतांच नेमलेल्या वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची असते; न्यायसभांचा त्यांच्यावर मुळींच अम्मल चालत नाहीं. अशा कायद्याखालीं दिवस कंठण्याचा प्रसंग आला तर त्याबद्दल इंग्लिश लोकांना काय वाटेल, याचा जर आपण विचार करूं लागलों, तर आपल्या देशांत चालू असलेल्या कायद्यांची खरी किंमत फार आहे हें मर्म आपल्या लक्षांत येण्यास कठीण जाणार नाहीं. न्यायासनापुढें जाऊन चवकशी करून घेण्याचा प्रत्येक आरोपीला जो हक्क आहे, त्या संबंधानें पहिल्या चार्लसच्या ( टीप नं० १४ पहा ) कारकीर्दीत जेव्हां एक मोठा तंटा सुरू झाला होता, तेव्हां

त्या तंट्यांत जो आरोपीतर्फे एक आधार वरचेवर दाखविण्यांत येत होता, त्यावरून या इंग्लिश नियमाचा स्पष्ट रीतीनें खुलासा होतो. **चवथ्या एडवर्ड** राजाला [ टीप नं० १९ पहा ] एका न्यायाधीशानें असें स्पष्ट सांगितलें कीं, आपण राजे आहां तरी प्रजेपैकीं कोणच्याही इसमाला आपणास केव्हांही पकडतां येणार नाहीं. त्याचें कारण त्या न्यायाधीशानें असें सांगितलें कीं, त्या इसमाला पकडण्याच्या कामांत आपण बेकायदा वर्तन केलें असें जर पुढें निष्पन्न झालें, तर त्या इसमाला अन्यायाची अटक केल्याबद्दल आपणाविरुद्ध कायदेशीर इलाज करतां येत नाहीं, कारण स्वत: राजावर फिर्याद चालूं शकत नाहीं.

वर खुलासा केलेल्या या मुद्यावरून राजकीय दृष्ट्या ज्याला विशेष महत्व प्राप्त झालें आहे, व ज्यामुळें इंग्लिश लोकांना इतर राष्ट्रांत विशेष मान्यता आली आहे, असा त्यांच्या अंगचा स्वभाव चांगला व्यक्त होतो. तो स्वभाव कोणता ह्मणाल तर, कायद्याच्या अनुरोधानें चालण्याचा. आह्मांस आणि अमेरिकेंतील आमचेच सजातीय या उभयतांनाही, आह्मी कायद्याच्या धोरणानें चालणारे आहों, असें ह्मणवून घेण्यांत फार आनंद वाटतो. आह्मी जें जें करतो त्याला पूर्वींचीं उदाहरणें आणि कायदा यांचा आधार, निदान या दोहोंचा कांहीं तरी संबंध असावा, ही गोष्ट आह्माला फार आवडते. सत्ताधारी मनुष्याशीं नमून वागणें आणि कायद्याच्या अनुरोधानें चालणें या दोहोंत कोणचा भेद आहे तो आपण लक्षांत आणा; आह्मी कायद्याला मान देतों, व्यक्तीला देत नाहीं. इंग्लंड देशाच्या अगदीं पूर्वींच्या इतिहासांत आमच्या मनाला अशा प्रकारची संवय लागल्याचें दिसून येतें. पूर्वींच्या उदाहरणांना प्रमाणभूत धरणें यावर आमच्या अर्वाचीन व्यवहारशास्त्राचा पाया उभारला आहे, आणि ही गोष्ट **नॉर्मन** विजयानंतर थोड्याच दिवसांत झालेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होतें. इंग्रजी कायद्यांत आणि राज्यपद्धतींत ही कल्पना इतकी जी खिळून गेली आहे, तिच्या मुळाशीं **नॉर्मन** लोकांनीं ज्यावेळेस इंग्लिश लोकांना जिंकलें त्या वेळची एकंदर परिस्थिति असावी, असें माझ्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं. वीरश्रेष्ठ **वुइलियम** यानें मोठा घोर संग्राम करून इंग्लंड देशाची गादी मिळविली हें

आपणां सर्वांना माहीत आहेच; परंतु इंग्लंडच्या गादीवर तो आपला हक्क सांगत होता, तो केवळ आपल्या बाहुबळावरच सांगत नव्हता. इंग्लिश लोकांवर राज्य करण्याचा माझा हक्क आहे; आणि **हारोल्डनेंच** ( टीप नंबर १७ पहा ) तें राज्य दांडगाईनें मिळविलें असें तो प्रतिपादन करीत होता. त्या वेळेच्या इंग्रजी राज्यव्यवस्थेच्या नियमाप्रमाणें त्यानें केलेलें स्वपक्षमंडन चुकीचें होतें, कारण, लोकांनीं आपलीं मतें **हारोल्डला** अनुकूल अशीं देऊन राज्यपदावर त्याची योजना केली होती; **वुइलियमच्या** बाबतींत तसा कांहीं प्रकार झाला नव्हता. तथापि त्यानें पुढें आणिलेला आपला हक्क खरा आहे, असें भासविण्यापुरती तरी त्याच्यापाशीं बरींचशीं कारणें होतीं; आणि इंग्लिश राज्य जें आपण मिळविलें आहे, तें हक्कानें मिळविलें आहे, केवळ बाहुबलावर नाहीं, असें प्रतिपादन करण्यानें त्यानें आपला बराच कार्यभाग साधून घेतला होता. ज्या इंग्लिश लोकांनीं त्याचा प्रतीकार करण्याचा यत्न केला होता, त्या लोकांच्या जमिनी त्यानें भडाभड खालसा केल्या; परंतु एवढी एक गोष्ट खेरीजकरून इंग्रजी कायदे व इंग्लिश लोकांच्या चालीरीती या उभयतांना इंग्लिश राजाच्या कारकीर्दींत जो मान मिळत होता तोच, अथवा त्याच्याच बरोबरीचा मान **वुइलियमच्या** कारकीर्दींत मिळत होता. **नार्मन** ( टीप नं. १८ पहा. ) राजांना, आपणांस अगदीं नवी अशी राज्यपद्धति देशांत ठेवावी लागत होती, आणि त्यामुळें स्वभावतःच स्थानिक माहिती मिळविणें, पूर्वींचीं उदाहरणें शोधून काढणें, व ज्या लोकांना चालीरीतींची चांगली माहिती असेल, त्यांच्यापासून ती जागच्या जागेवर मिळविणें या दोन तीन गोष्टींवर विशेष लक्ष देणें, त्यांना भाग पडत होतें. **डोम्सडे बुक** [ टीप नं. १९ पहा. ] नांवानें प्रसिद्ध असलेल्या पुस्तकांत जमिनीच्या पहाणीसंबंधानें दिलेल्या माहितीवरून वरील हेतु साध्य करून घेण्याकरितां त्यांनीं कोणची पद्धति स्वीकारली होती, हें बरेंच पाहण्यास सांपडतें. आणि सर्वांचा साहजिक परिणाम असा होतो कीं, पूर्वींचीं उदाहरणें आणि फार दिवसांपासून चालत आलेल्या चालीरीती यांना विशेष महत्व प्राप्त होतें, व त्याच्या उलट जाण्याची प्रवृत्ति समूल नाहींशी होत जाते.

हिंदुस्थान देशांत हिंदु व मुसलमान या दोघांच्याही धर्मशा-शास्त्राप्रमाणें न्याय करण्याचें काम इंग्लिश न्यायाधीश आणि म्याजिस्ट्रेट यांचेकडे सोपविलेलें आहे, हें आपल्याला माहित आहेच. पण त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, त्यामुळें तद्देशीय कायद्यांना एक प्रकारचा नियमितपणा आणि स्थिरपणा प्राप्त झाला आहे, इतकेंच नाहीं, तर आजपर्यंत त्यांच्या ठायीं जो जोम आणि जी नियंत्रणशक्ति नव्हती, तीदेखील त्यांना मिळाली आहे. न्यायाच्या बाबतींत पूर्वीच्या उदाहरणांना व त्याच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींना मान देण्याची इंग्लिश न्यायाधीशांची कल्पना अगोदरच त्यांच्या मनांत दृढ झालेली होती हें खरें ; आणि इंग्लिश संस्था व नॉर्मन संस्था या उभयतांमध्यें जितकी विसदृशता होती, तिच्यापेक्षां जास्त आमच्या आणि हिंदुस्थान देशांतील लोकांच्या कायद्यांत आणि चालीरीतींत आहे, हेंही खरें. तथापि हिंदुस्थान देशाच्या उदाहरणावरून आपल्याला कांहीं एक अनुमान काढण्याला जागा नाहीं, असें मात्र कोणी समजूं नये; आणि माझें हें ह्मणणें आपल्याला जरी थोडेंसें धाडसाचें वाटेल, तरी मी असें ह्मणतों कीं, **नॉर्मन** लोकांच्या विजयानंतर **अँग्लो-नॉर्मन** अम्मल जेव्हां सुरू झाला, तेव्हां त्या अमलाखालीं इंग्लंडांतदेखील वर सांगितल्या प्रकारचा कांहींसा परिणाम झाला.

आतां ही केवळ माझी कल्पना आहे असें आपल्याला वाटेल, परंतु तशी कल्पना करण्याला मला बरीच जागा हो आहे हें तरी निदान कबूल करणें आपल्याला भाग आहे. इंग्रजी कायद्यांना केवळ प्लेगच ह्मटलें असतां चालेल असें जें त्यांच्यांत दिसून येणारें आचारांचें प्रस्थ, [ हें प्रस्थ प्रस्तुत कालींदेखील बऱ्याच प्रमाणानें आहे ] व विद्वत्तेचा ढोल या दोहोंनाही पूर्वीच्या उदाहरणाविषयींचा हा पूज्यभाव बऱ्याच अंशानें कारणीभूत झालेला आहे, असें मला वाटतें. परंतु इंग्लिश लोकांना स्वतंत्रता मिळवून देण्याच्या कामांत अश्रांत श्रम करणाऱ्या लोकांना वर सांगितलेल्या गोष्टींचीच फार मोठी मदत झाली आहे, हें आपण विसरतां कामा नये. पूर्वीच्या उदाहरणांना एकीकडे झुगारून

देण्याचा जेव्हां कांहीं लोकांनीं यत्न केला, तेव्हां त्यांची खरी योग्यता व खरें सामर्थ्य लोकांच्या प्रत्ययास आलें. ज्या वेळेस इंग्लंडांतील राजांनीं, अनधिकृत व अनुदाहृत अशा कृत्यांनीं प्रजेला पीडा देण्याचा क्रम सुरू करून त्यांचा तळतळाट घेतला, त्यावेळेस पूर्वीच्या राजांच्या कारकीर्दीच्या इतिहासामधून आपल्या या कृत्यांना कांहीं आधार किंवा उदाहरणें सांपडतात कीं काय, हें शोधून काढण्याकरितां त्यांनीं आपल्या नोकर लोकांचें होतें नव्हतें तेवढें बुद्धिवैभव खर्ची घातलें. माझें ह्मणणें जर खरें असेल तर, पुनः येथेंदेखील, आमच्या देशाच्या राजकीय परिस्थितिमुळें कायद्याच्या बाबतींत मनाची प्रवृत्ति प्रथम कशा प्रकारची बनते व तिलाच पुढें जोर कसा येतो व हिलाच राजनीतीचें धोरण ज्याच्यावर बरेंच अवलंबून असतें, अशा राष्ट्रीय स्वभावाचें स्वरूप पुनः कसें प्राप्त होतें, हें आपल्या दृष्टीस पडतें. आपल्या वाडवडिलांनीं मिळविलेल्या प्राचीन हक्कांबद्दल भांडणें आणि ज्याची कोणालाही पुरतीशी माहिती नाहीं, अशा एखाद्या नवीन हक्काकरितां भांडणें या दोहोंत मोठा भेद आहे. आपल्या पाठीला भिंतीचा आधार घेऊन उभें राहणें व मोकळ्या मैदानांत उभे राहणें, या दोहोंत जो भेद आहे त्याच स्वरूपाचा वरील भेद आहे.

**मध्य युगाचा** विचार सोडून देऊन पुढें जाण्याच्या अगोदर कायद्याच्या दृष्टीनें व ऐतिहासिक दृष्टीनें महत्वाची अशी एक बाब आहे तिच्या संबंधानें मी एकच शब्द सांगतों. आपण ज्या काळाचा विचार करित आहों त्या काळांत **प्रापंचिक** ( Secular ) आणि **पौरोहित्य संबंधी** ( Ecclesiastical ) न्यायसभांत फार मोठा असा विरोध होता. आज मित्तीला देखील प्रत्येक **धर्माध्यक्षा** ( Bishop ) ची अशी एक न्यायसभा आहे, परंतु त्याचा अधिकार वस्तुतः पुरोहित लोकांवरच काय तो चालतो, आणि त्यांच्या संबंधानें चालणाऱ्या कामांत देखील महत्वाच्या गोष्टींचा निकाल क्वचितच लागतो. परंतु बाराव्या शतकांत, आणि त्या नंतर कांहीं शतकेंपावेतों, वर सांगितल्यापेक्षां निराळी स्थिति होती. धर्मसंबंधीं न्यायसभांची लोकांच्या चालीरीतीवर

व नीतीवर एक प्रकारची सर्व साधारण अशी देखरेख होती, आणि खाजगी वर्तनांतील किरकोळ बाबतींत देखील त्यांचा हात शिरत होता. ह्या शिवाय धर्मानुशासन आणि धर्मक्षेम यांच्याशीं जवळचा अथवा दूरचा संबंध असणाऱ्या प्रत्येक गोष्टी आपल्या अधिकाराखालीं आणण्याविषयीं त्यांची सक्त मेहनत चालू होती. उदाहरणार्थ लग्नासंबंधानें होणाऱ्या सर्व प्रकारच्या खटल्यांचा निकाल करण्याचा हक्क सर्वस्वी आमचा आहे, असें ते प्रतिपादन करीत असत, व त्यांत त्यांना यशही बरेंच येत होतें. तो सर्व इतिहास अतिशय कौतुकजनक आहे, परंतु तूर्तच्या प्रसंगीं मी त्याची फक्त एकच बाजू दाखवितों. धर्मविषयक न्यायसभांत देखील चांगुलपणाचा अंश बराच होता हें निर्विवाद आहे. कायद्यांच्या साहाय्यानें ज्यांचा निकाल होणें अवश्य आहे, अशा खटल्यांची संख्या होतां होईल तितकी कमी करण्याकडे लक्ष असल्यामुळें, राजाच्या न्यायसभांत जी दाद मिळणें अशक्य होतें, ती दाद पुष्कळ प्रसंगीं या न्यायसभांमधून मिळत होती. परंतु त्या सभांच्या नांवाखालीं होणें शक्य असणारा, आणि वारंवार होणारा ‘ अव्यापारेषु ’ व्यापार व सर्व प्रजेला होणारा थोडा फार उपद्रव यांची खरी कल्पना हल्लींच्या विद्वान् मनुष्याला होणें फार कठीण आहे; आणि ज्या वेळेस एखाद्याला यासंबंधानें थोडेसें तरी ज्ञान होतें, त्या वेळेस इंग्लंडांत झालेल्या धर्मसुधारणेपासून राजकीय दृष्ट्या महत्वाचे असे सुपरिणाम काय झाले आहेत, आणि ज्यांच्यापैकीं पुष्कळांना धर्मविषयक न्यायसभा जोडल्या होत्या, असे सर्व धर्माश्रम एकूण एक उध्वस्त करून टाकिले व धर्मसंस्थेची सर्व मालमत्ता खालसा केली, असें असतांना लोक आपल्या मनाची समता पूर्णपणें कायम ठेवून स्वस्थपणें पहात कसे राहिले, हें कळणें त्याला बरेंच सोपें जाईल.

आतां मी आपल्याला असें सांगतों कीं, चार शतकें ओलांडून माझ्या बरोबर आपण चला, ह्मणजे **स्टुअर्ट** ( टीप नंबर २० पहा ) घराण्याचे राजे राज्य करीत असतां, त्यांच्या बरोबर इंग्लंडांतील **कॉमन्स** (सामान्य) लोकांनीं सुमारें एक शतकपर्यंत जें मोठें युद्ध केलें तेथपर्यंत आपण

जाऊन पोहोंचू. 'स्टुअर्ट' घराणें हें शब्द मीं विशेष अर्थानें वापरले आहेत. ज्या युद्धाचा परिणाम असा झाला कीं, शेवटच्या स्टुअर्ट राजाचा नाश होऊन त्याला आपला देश सोडून दूर जाऊन रहावें लागलें, त्या युद्धाचा आरंभ पूर्णपणें आणि बुद्धिपुरःसर त्या घराण्यांतील पहिल्या राजाच्या कारकीर्दींत झाला होता, आणि ही गोष्ट त्या वेळच्या अगदीं आरंभाच्या कागदपत्रांवरून मी आपल्याला आतां येथें दाखवून देतों. इंग्लंडच्या इतिहासांतील तो भाग फार मोठा आणि महत्वाचा आहे; परंतु तूर्तच्या प्रसंगाला त्याचा एक दिशेपुरताच विचार करावयाचा आहे. ती दिशा ही कीं, तें युद्ध जें सुरू झालें त्याला कायदेशीर आधार आणि कायद्याचे मुद्दे यांचा जोर कितपत पोंचला होता, याचा निर्णय करणें. आपआपसांतील **यादवी युद्ध** ( टीप नं० २१ पहा. ) ( Civil war. ) अगदीं सुरू होईपर्यंतदेखील एकीकडे राजा आणि त्याचे सल्लामसलतगार व दुसरीकडे **पार्लमेंट** या उभयतांमधील वाद, न्यायसभांमधून चालणाऱ्या वादाच्या स्वरूपाचा होता हें अगदीं स्पष्टपणें दिसून येतें. मोठमोठे हक्क आपल्याला मिळाले पाहिजेत, असें प्रतिपादन करते वेळेस, आपल्या पूर्वजांना प्राचीन काळापासून न्यायाला अनुसरून जे अधिकार मिळालेले आहेत, त्यांपेक्षां जास्त आह्मी कांहीं मागत नाहीं, असें राजा ह्मणत होता, आणि या ह्मणण्याला बळकटी आणण्याकरतां कमीअधिक प्रमाणानें बाह्यतः रमणीय अशा प्रमाणांची त्याला कधींही वाण पडली नाहीं. प्रत्यक्ष युद्धाची वेळ अगदीं जवळ येऊन पोंचेपर्यंत, **कॉमन्स** [ सामान्य ] लोकांनीं राजाबरोबर मोठ्या नेटानें त्याचा प्रतीकार करण्याचा जो उद्योग चालविला होता, त्यांत त्यांनीं फार दिवसांपासून चालत आलेले आपले हक्क आणि स्वतंत्रता हे दोन मुद्दे केव्हांही सोडले नाहींत. वादाचे मुख्य मुद्दे दोन होते. पार्लमेंटाच्या संमतिशिवाय कोणत्याही प्रसंगीं, अथवा कोणत्याही नांवाखालीं कर आणि करभार राजाला बसवितां येईल किंवा कसें, हा पहिला मुद्दा; आणि दुसरा मुद्दा हा कीं, राजाला आपल्या कौन्सिलच्या संमतीनें आपण मुद्दाम दिलेल्या हुकमापलीकडे दुसरें कोणतेंही कारण न लावतां, लोकांना कैद करण्याचा आणि त्यांना तुरुंगांत ठेव-

ण्याचा अधिकार आहे किंवा कसें. याशिवाय व्यवहारांत उत्पन्न होणाऱ्या मोठमोठ्या अडचणींशीं ज्याचा अतिनिकट संबंध आहे, असा आणखी एक तिसरा मुद्दा होता, आणि तो जरी वादाच्या अखेरी अखेरीला बराच मागें पडला, तरी तो प्रथमतः पुढें येण्याला एक कारण झालें होतें व तें हें कीं, राजानें एक नवीनच अधिकार आपल्याकडे घेतला आणि त्या अधिकाराच्या जोरावर त्यानें पार्लमेंटाच्या अधिकाराशिवाय जाहिरनामे प्रसिद्ध करून, राज्यकारभार चालविण्याच्या कामांत ज्यांचा अति निकट संबंध आहे, अशा सर्व खात्यांनीं पाळण्याचे असे, कायदेवजा, कांहीं नवीन नियम व नवीन व्यवस्था अमलांत आणल्या; व त्यांपैकीं कांहीं नियम तर असे होते कीं, ते कोणच्याही राजाला अमलांत करतां येतील किंवा नाहीं, यासंबंधानेंदेखील बराच संशय होता. जेम्सच्या हातून प्रथम झालेला अधिकारातिक्रम आणि पार्लमेंट बरोबर चार्ल्सचा अगदीं शेवटचा असा झालेला बेबनाव, या दोहोंत जवळ जवळ एका पिढीपेक्षां जास्त काळ लोटला. परंतु तितक्या काळांत या गोष्टींचा जो वादविवाद चालला होता, तो राजनीतीच्या तत्वांवर न चालतां चालू कायद्यांच्या तत्वावर चालला होता. उभय पक्षांमध्यें कायद्याच्या बाजूनें तंटा सुरू असतांना, कायद्याच्या नांवाखालीं राजनीतीचें धोरण लक्षांत ठेवण्याची खबरदारी पूर्णपणें घेण्यांत येत होती, हें निर्विवाद आहे; परंतु सर्व गोष्टी एकीकडे ठेवून क़ायदा आपल्या बाजूला आहे असें दाखविण्याची उभय पक्षांची मुख्य खटपट होती. लोकावर बसविलेले करभार आणि जाहिरनामे या संबंधांत आपल्या अडचणी काय आहेत, हें जेम्स राजाला, अगदीं आरंभालाच, ह्मणजे १६१० सालीं, कॉमन्स लोकांनीं जेव्हां कळविलें, तेव्हां त्यांनीं कशी भाषा वापरली होती, ती मी आपल्याला वाचून दाखवितों. आणि जातां जातां मला एक गोष्ट आपल्याला सांगावीशी वाटते ती ही कीं, इतिहासांतील कोणत्याही कालाची हुबेहुब कल्पना जर आपल्याला करून घ्यावयाची असेल, आणि ज्या लोकांविषयीं आपण इतिहास वाचतो आहों, त्या लोकांचे विचार काय होते, त्यांचे हेतु काय होते, ह्यांचें रुद्धत जर आपल्याला कळून घ्यावयाचें असेल, तर त्याला,

मला ठाऊक आहे असा एकच निश्चित मार्ग आहे; तो कोणचा तर लोकांनीं सांगितलेल्या माहितीवरच समाधान मानून न घेतां, खुद्द त्या कालासंबंधाचे आपल्या हातून करवतील तितके लेख आणि कागदपत्रें गोळा करणें हा होय. पहिल्या प्रथम हें काम बरेंचसें त्रासदायक असें वाटतें, परंतु तें केल्यानें शेवटचा त्रास बराच कमी होतो; कसेंही झालें तरी पन्नास अथवा वीस वर्षांपूर्वी इंग्लंडच्या इतिहासासंबंधानें हें काम करणें जितकें सोपें होतें, त्याच्यापेक्षां हल्लीं अधिक सोपें झालें आहे.

पार्लमेंटाच्या संमतीशिवाय बसविलेल्या करभारासंबंधानें १६१० सालीं पहिल्या जेम्सपुढें कॉमन्स लोकांनीं खालीं लिहिलेले उद्गार काढले:—
"इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेच्या व त्या देशांतील राजनीतिच्या नियमांवरून, पार्लमेंटाच्या संमतीनें, कायदे करण्याचा व लोकांवर कर बसविण्याचा अधिकार इंग्लंडच्या राजांना प्राप्त झालेला आहे; तो अधिकार बजावीत असतां, या दोन्ही बाबतींत लोकांच्या संमतीशिवाय फेरफार किंवा अदलाबदल न होईल, अशाविषयीं राजांनीं जपलें पाहिजे.

"या कारणामुळेंच या राज्यांतील लोक आपल्या राजांशीं मोठ्या इमानानें व प्रेमानें वागतात. व ज्या ज्या योग्य प्रसंगीं राजाला पैशाची मदत लागते, त्या त्या प्रसंगीं ती ते आपण होऊन देतात; ह्मणून त्यांच्या हक्कावर व स्वतंत्रतेवर गदा आणणारी एखादी गोष्ट घडून येऊं लागली, ह्मणजे तिच्या विषयीं त्यांना फार सावधगिरी ठेवावी लागते व जेणेंकरून आपल्या हक्कांना व स्वतंत्रतेला धक्का लागणार नाहीं, असे उपाय त्यांना योजावे लागतात.

"आणि ह्मणूनच लढाईमुळें किंवा अन्य कारणांमुळें पैशाचा तुटवडा पडल्यावरून राजांनीं ज्या ज्या वेळेस, पार्लमेंटाच्या संमतीशिवाय लोकांवर कर बसविले, त्या त्या वेळेस त्यांनीं पार्लमेंटपुढें उघड रीतीनें आपलीं गाऱ्हाणीं सांगितलीं; जेव्हां जेव्हां अशीं गाऱ्हाणीं सांगितलीं तेव्हां तेव्हां प्रत्येक वेळीं राजांनीं त्यांच्या गाऱ्हाण्यांचा योग्य विचार करून पार्लमेंटाच्या संमतीशिवाय प्रजेवर कर बसविण्याचा आमचा

हक्कच आहे, असें मत प्रतिपादन न करितां, लोकांना कुरकुर करण्याला जागा न राहील अशा तजविजी केल्या. देशांत चालू असणाऱ्या कायद्यांमधून पार्लमेंटला असलेल्या हक्कांचा उल्लेख केलेला आहे, असें असूनही आपल्यावर प्रेम करणाऱ्या प्रजेला विशेष संतोष व्हावा या हेतूनें, ह्या राजांनीं पार्लमेंटाचे असे निराळे आक्ट [ कायदे ] पास केले, व त्यांत असें ठरविलें कीं, लोकांनीं एके ठिकाणीं जमून संमति दिल्याशिवाय त्यांच्यावर कोणच्याही प्रकारचे कर किंवा करभार बसविले जाणार नाहींत.

" ह्मणून आह्मीं कॉमन्स लोक पार्लमेंट सभेंत एकत्र होऊन, आमच्या पूर्वजांचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून सर्व लोकांच्या वतीनें महाराजांच्या पायापाशीं येऊन असा अर्ज करितों कीं, पार्लमेंटाच्या संमतीशिवाय रयतेवर जे करभार आपण बसविले आहेत, ते एकदम बंद करावे व काढून टाकावे, कारण हल्लीं ज्या स्वरूपाचे कर लोकांवर बसविण्यांत आले आहेत, त्या स्वरूपाचे कर महाराजांच्या पूर्वजांनीं मोठ्या अडचणीच्या व आणीबाणीच्या प्रसंगीं देखील बसविले नाहींत. अर्थात् महाराजांच्या हल्लींच्या वर्तनाला इतिहासांतील पूर्वीचा दाखला मिळत नाहीं. "

यावरून आपण पहा कीं, फार दिवसांपासून चालत आलेल्या कायद्याच्या अनुसंधानानें किती काळजीपूर्वक आणि किती स्पष्टपणानें लोकांनीं आपल्या हक्काचें राजापाशीं मागणें केलें आहे. यानंतर आपल्या इच्छेस वाटेल त्याप्रमाणें राजानें काढलेल्या जाहिरनाम्यासंबंधानें केलेल्या गाऱ्हाण्यांचा विचार जेव्हां आपण करूं लागतों, तेव्हां आपल्याला असें दिसून येतें कीं, या बाबतींत वरील भाषेपेक्षां ही विशेष स्पष्ट रीतीची भाषा कॉमन्स [ सामान्य ] सभेंतील सभासदांनीं वापरली आहे.

" महाराजांच्या पूर्वजांच्या राज्यांत महाराजांच्या प्रजेला जें सुख मिळालें व जी स्वतंत्रता प्राप्त झाली, तिला अनेक कारणें आहेत. त्या

सर्वांत प्रजेला विशेष प्रिय आणि विशेष महत्वाचें जें वाटतें, तें हें कीं, आपल्या पूर्वजांनीं देशाचा राज्यकारभार जो केला, तो कायद्यांनीं घालून दिलेल्या नियमांच्या आधारानें केला. आपल्या मनास वाटेल तशी सत्ता आपल्या हातांत घेऊन, प्रजेवर त्यांनीं आपला अम्मल चालविला नाहीं. इंग्लंडच्या राजांकडून कायद्याला याप्रमाणें मान मिळत गेल्या-मुळें, लोकांनाही अनायासेंच एक हक्क प्राप्त झाला आहे, तो हा कीं, देशांत चालू असणाऱ्या कायद्यांत, किंवा पार्लमेंटांत सभेनें सर्व सभा-सदांच्या मान्यतेनें पसंत केलेल्या कायद्यांत जेवढी शिक्षा सांगितली असेल, तेवढ्या शिक्षेलाच ते पात्र आहेत. त्याशिवाय त्यांच्या जीवाला किंवा शरीराला किंवा त्यांच्या स्थावर मिळकतीला अपाय करीन ह्मटलें, तर तें राजाच्या स्वाधीन नाहीं. "

**पहिल्या चार्लसनें** आपल्या बापानें घालून दिलेल्या राजनीतीचा कित्ता गिरविण्याचा जेव्हां प्रयत्न केला, तेव्हां जो मोठा वाद सुरू झाला, त्या वादाची सरणी कोणच्या थाटावर न्यावयाची, याची या प्रस्तावनेनें स्पष्टपणें आंखणीच घालून दिली. हा अर्ज जेम्स राजापुढें सादर करून, त्यांत आपलीं गाऱ्हाणीं गाइल्यानंतर सतरा वर्षांनीं चार्लसनें जबरीनें लोकांपासून कर्ज काढून पैशाची रक्कम उभारली. राजाचें हें करणें कायद्याच्या अगदीं उलट आहे, अशी देशांतील लोकांची सर्वत्र समजूत झाली होती, आणि चांगल्या प्रतिष्ठित आणि धनसंपन्न लोकांनीं पैसा देण्याचेंही नाकारलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांपैकीं एकजण असें बोलला. "**लॉर्डस्‌च्या** ( बडे लोकांच्या ) कौन्सिलपुढें मला बोलाविलें होतें, पण तें कशाकरितां तें मला माहीत नाहीं. राजाच्या हुकुमा-वरून पैसे न दिल्याबद्दल मला बोलावणें झालें होतें असें मी ऐकलें. मी त्यांना सांगितलें कीं, तुह्मीं नेतच असाल तर माझी मालमत्ता तुह्मीं तशीच घेऊन जा, मी तुह्मांस प्रतिबंध करीत नाहीं ; पण उसनें जर तुह्मीं मजजवळ कांहीं मागाल, तर तुह्मांला मी एक छदामही देणार नाहीं." याप्रमाणें राजाच्या उलट जाणारे जेवढे लोक होते, तेवढ्या सगळ्यांना **शेवटीं** तुरुंगाची वाट धरावी लागली. यांपैकीं पांच

जणांनीं आपलें नष्ट झालेलें स्वातंत्र्य पुन: परत मिळविण्याची खटपट केली, व त्या खटपटीप्रमाणें त्यांची मुक्तता होण्याच्यापूर्वी त्यांना न्यायसभांची मदत घेणें भाग पडलें. कायद्यांत सांगितलेल्या एखाद्या विशिष्ट गुन्ह्याचा त्यांच्यावर आरोप करणें अगदीं अशक्य होतें, आणि ह्मणून राजा आणि त्याचें **प्रिव्ही कौन्सिल** यांनीं आपल्या नुस्त्या अम्मल बजावणीच्या अधिकारानेंच दिलेल्या हुकुमावरून, त्यांना कारागृहांत टाकतां येईल किंवा नाहीं असा प्रश्न उत्पन्न झाला. आणि त्यानंतर व्यक्तिस्वातंत्र्याच्या कामांत प्रजेचे हक्क काय आहेत; यासंबंधानें प्रथमत: राजाच्या न्यायसभेंत आणि नंतर पार्लमेंट सभेंत मोठा महत्वाचा वाद सुरू झाला. न्यायसभांमध्यें कायमचा असा कांहींच निकाल लागला नाहीं; राजाच्या अगदीं इच्छेविरुद्ध जाणें तेथील न्यायाधीशांच्या हातून होईना, अथवा पूर्णपणें त्याच्या वतीनें निकाल देण्याचीही त्यांची छाती होईना. परंतु **हाउस आफ् कॉमन्स** (सामान्यजनसभा) नें या वादांत मन घातलें, आणि तेथें जेव्हां या विषयाची चर्चा सुरू झाली तेव्हां मोठ्या श्रमानें मिळविलेली आणि तात्पुरती अशी जी विद्येची सामग्री न्यायाधीशापुढें आणली होती, ती या वेळेलाही पुढें आली. न्यायसभांमध्यें विराजमान होणारे न्यायाधीश जरी भेकड आणि श्ववृत्ति धारण करणारे होते, आणि पुढें कांहीं वर्षांनीं त्यांच्या अंगचा हा दुर्गुण जरी जास्तच बळावत गेला, तरी पार्लमेंट सभेंत कायदे जाणणारे, आणि त्यांत अगदीं निष्णात, असेदेखील सभासद पुष्कळ होते, आणि स्वतंत्रता संपादन करण्याच्या कामांत त्यांना आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याला कोणाचाही प्रत्यवाय नव्हता. या मंडळींनीं आपल्याउलट बाजू घेतल्याबद्दल **जेम्स** व **चार्लस** या दोघांनीं त्यांच्यावर कटु शद्बांचा नुसता वर्षाव केला. त्यांच्या ह्मणण्याचें समर्थन करण्याचें काम हल्लींच्या लोकांना सकृद्दर्शनीं जितकें सोपें आहे असें वाटतें तितकें तें त्यांनां वस्तुत: सोपें गेलें नाहीं. त्या कामांत यश मिळविण्याकरतां त्यांच्या अंगांत विलक्षण प्रकारचें धैर्य पाहिजे होतें इतकेंच नाहीं; पण आपण उपस्थित केलेल्या वादाचे गुणावगुण लोकांपुढें बाह्यत: तरी चांगले दिसतील अशा

रीतीनें मांडणें अवश्य होतें, आलीकडे झालेल्या शोधावरून या वादांत **विग्** लोकांनीं घेतलेला पक्षच एतावता खरा आहे असें शाबीत झालें आहे. **विग्** ( टीप नंबर २२ पहा ) हा शब्द अजूनपर्यंत जरी आचारांत आलेला नव्हता, तरी कांहीं कालानें तो प्रचारांत आला ह्मणून, ' **विग्** लोकांनीं घेतलेला पक्ष ' असे शब्द मी योजिले आहेत. **कॉमन्स** ( सामान्य ) लोकांनीं पुढें आणिलेले आपले हक्क लोककल्याण आणि राजनीति या दोहोंकडे नजर दिली असतां न्याय्य ठरतात, इतकेंच नाहीं तर त्यांनीं दिलेल्या केवळ ऐतिहासिक अशा उदाहरणावरूनही विशेष न्याय्य असे ठरतात. तरी पण राजाला आपल्या बाजूचें समर्थन करण्याच्या कामांत अगदींच निराश होण्याचें कारण नव्हतें. **म्याग्ना-कार्टांत** वापरलेले शब्द आणि सनदेचा एकंदर भावार्थ, मध्ययुगभर पुन: पुन: त्या सनदेचें केलेलें दृढीकरण, आणि स्थूल मानानें पूर्वींच्या आधारांचा गौरव या सर्व गोष्टींनीं पार्लमेंटाच्या पक्षाला बळकटी आली होती यांत शंका नाहीं. परंतु आलीकडे जो प्रघात पडला होता, त्यामुळें राजाच्या पक्षाला जोर कमी होता असें नाहीं; आणि राज्यव्यवस्थेच्या कायद्यांच्या संबंधानें प्रश्न उपस्थित झाले असतां, सरासरी शंभर वर्षेंपावेतों अविच्छिन्न रीतीनें सुरू असलेला प्रघात एका बाजूला ठेवणें फार कठीण आहे. नेहमीं जरी नाहीं तरी बऱ्याच प्रसंगीं पहिल्या **चार्ल्स** राजानें जीं जीं बेकायदेशीर आणि जुलमी कृत्यें करण्याचा प्रयत्न केला, तीं तीं करण्याचा **ट्यूडर** [ टीप नं. २३ पहा. ] घराण्यांतील राजांनीं नुस्ता प्रयत्न केला, इतकेंच नाहीं तर, खरोखरच आपल्या हातांनीं करून दाखविलीं. पण त्यांत फरक हा होता कीं, **ट्यूडर** घराण्यांतील राजांची राज्यशासनपद्धति लोकांना प्रिय होती, आणि जुलूम करण्याच्या कामांत कोठवर मजल गेली असतां थांबणें जरूर आहे, हें त्यांना माहित होतें. त्यांच्या कारकीर्दींत अव्यवस्थित मार्गांनीं जरी पैसा वसूल होत होता, तरी त्याचा विनियोग खऱ्या खऱ्या सार्वजनिक कामाकरितांच होत होता. मनास वाटेल त्या लोकांना जरी कारागृहांत टाकण्याचा क्रम सुरू होता, तरी त्याला कारणें निराळीं होतीं. सर्व लोकांच्या

हक्कांचें ते लोक संरक्षण करीत होते, यामुळें त्यांना बंदिवास भोगावा लागत होता, असें नाहीं. ज्यांच्या कायदेशीरपणाविषयीं बरीच शंका आहे, असे हुकूम जरी वेळोवेळीं सोडण्यांत येत होते, तरी ते खऱ्या आणीबाणीच्या प्रसंगींच देण्यांत येत होते. राज्यव्यवस्थेच्या नियमांनीं हल्लींच्या सारखें नियंत्रित राजपद **आठवा हेन्री** [ टीप नं. २४ पहा. ] आणि **इलिजाबेथ** यांनीं केव्हाही पतकरलें नसतें. पार्लमेंट आणि जानपद यांचें नेतृत्व आपल्याकडे घेण्याचा त्यांचा मानस होता, त्यांच्यावर सक्ती करण्याचा नव्हता ; आपल्या मानेवरचें पार्लमेंटाचें जूं झुगारून देण्याच्या हेतूनें पार्लमेंटाला असंमत अशा साधनांनीं पैसा गोळा करण्याची घातुक चूक त्यांच्या हातून केव्हांही झाली नाहीं. याप्रमाणें १६ व्या शतकांत घडून आलेल्या उदाहरणांचा दाखला देणाऱ्या लोकांस कायद्याला व राजनीतीला संमत असें माझ्या मतानें हें एक चांगलें उत्तर आहे कीं, ट्यूडर घराण्यांतील राजांनीं आपल्या प्रजेवर जुलूम केला असतां तिकडे लोकांनीं लक्ष पुरविलें नाहीं; तें तरी विवक्षित काळ आणि विवक्षित प्रसंग पाहूनच पुरविलें नाहीं. परंतु तेवढ्यावरून त्या शतकांतील राजांचा दाखला देऊन पुढें होणाऱ्या राजांना प्रजेवर जुलूम करण्याच्या कामांत त्यांनीं आपली संमति दिली असें मात्र ह्मणतां येणार नाहीं. ' हल्लींच्या काळांतदेखील एखादा लोकप्रिय आणि प्रतापशील मुत्सद्दी आपला अम्मलबजावणीचा अधिकार दडपीत दडपीत कायद्याच्या अगदीं अखेरच्या मर्यादेपर्यंत कसा नेऊं शकतो. हें आपण पाहिलेंच आहे; त्या वेळेपुरतें त्यांत त्याला यश मिळतें; परंतु पुढें केव्हांही त्याबद्दल त्याला प्रायश्चित्त भोगावें लागतेंच. **लिबरल** ( प्रजापक्ष ) किंवा **कॉन्सरव्हेटीव** ( राजपक्ष ] या दोन राजकीय पक्षांपैकीं एका पक्षाचें बरें व दुसऱ्या पक्षाचें वाईट करण्याच्या हेतूनें हा विचार मीं प्रगट केलेला नाहीं. कारण माझें ह्मणणें मि० **ग्लॅडस्टन** [ टीप नं २५ पहा] व **लॉर्ड बीकन्सफील्ड** या उभयतांनाही सारखेंच लागू पडतें. तथापि या उभयतांपेक्षां योग्यतेनें कमी अशा एखाद्या मनुष्यानें, **माल्टा** येथील लढाईच्या कामावर हिंदुस्थानचें सैन्य पाठविणें अथवा राजाच्या हुकुमानें सैन्याकरतां होत असलेली खरेदी

बंद पाडण्याकरतां पार्लमेंटसभेपुढें आणलेलें बिल जरी नापास झालें, तरी ती खरेदी आपल्या अधिकारांतच बंद पाडणें, किंवा याच्यासारखेंच दुसरें एखादें कृत्य करण्याचें मनांत आणलें, तर त्याच्या हातून फार मोठी चूक झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं; कारण तें काम दडपून कडेला लावण्याइतकें बुद्धिसामर्थ्य त्याच्या अंगांत नाहीं. कांहीं अंशीं याच प्रकारची, परंतु याच्यापेक्षांही फार ढोबळ व फार घातुक अशी चूक पहिल्या **चार्लस** राजाच्या हातून झाली. ती चूक ही कीं, **ट्यूडर** घराण्यांतील राजांची राज्यपद्धति, त्यांच्याइतकी अक्कल त्याच्या अंगांत नसतां, त्यानें अगदीं हुबेहुब उचलली.

राजा आणि प्रजा यांचे परस्पर हक्क काय आहेत, यासंबंधानें कॉमन्ससभेंत ( सामान्यजनसभेंत ) जेव्हां वादविवाद सुरू झाला तेव्हां मी पूर्वी सांगितल्याप्रमाणें, **जॉन सेलडन** ( टीप नं० २६ पहा ) **सर एडवर्ड कोक** प्रभृति तत्कालीन कायदेपंडितांनींच त्या वादांत पुढाकार घेतला होता. आणि हा वादविवाद संपल्यानंतर त्या वेळेस मोठ्या कडाक्यानें सुरू असणाऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रश्नासंबंधानें खालील ठराव सभेनें पास केले:—

१ कोणाही स्वतंत्र मनुष्याला, राजा अथवा **प्रिव्हिकौन्सिल** यांचे अथवा दुसऱ्या कोणाच्याही हुकुमानें तुरुंगांत अडकवितां येणार नाहीं किंवा प्रतिबंधांत ठेवतां येणार नाहीं. तुरुंगांत त्याला टाकण्यापूर्वी त्याला तेथें पाठविण्याला, किंवा त्याला तेथें अडकावून ठेवण्याला किंवा प्रतिबंधांत ठेवण्याला काय कारण झालें, हें सांगितलें पाहिजे व त्याला तेथें पाठविण्याला, अथवा अटकेंत ठेवण्याला अथवा प्रतिबंधांत ठेवण्याला कायद्याची अनुकूलता पाहिजे.

२. राजा, **प्रिव्हिकौन्सिल** किंवा दुसरा कोणीही इसम यांच्या हुकुमावरून, एखाद्या मनुष्याला तुरुंगांत पाठविलें असेल किंवा तेथें अटकेंत ठेवलें असेल अथवा दुसऱ्या कोणच्याही प्रकारानें त्याला प्रतिबंधांत ठेवलें असेल, तेव्हां आपल्याला प्रतिबंध करण्याचें कारण काय, त्याबद्दल न्याया-

सनासमोर आपली चवकशी झाली पाहिजे, अशी जर त्या अटकेंत ठेवलेल्या मनुष्यानें विनंति केली, तर विनंति मान्य केली पाहिजे, व त्याप्रमाणें त्याजवर आणलेल्या आरोपाची चवकशी न्यायसभेंत करून घेण्याकरितां त्याला तेथें हजर ठेविला पाहिजे.

३. राजा, प्रिव्हिकौन्सिल अथवा दुसरा कोणीही इसम यांनीं हुकूम केल्यावरून एखाद्या स्वतंत्र मनुष्याला तुरुंगात पाठविला असेल, अथवा दुसऱ्या एखाद्या प्रकारानें त्याला कैदेंत पाठविण्याला अथवा अटकेंत ठेवण्याला कायदेशीर कारण कोणचें आहे, हें जर त्याला सांगितलें नसेल आणि आपल्याला प्रतिबंधांत न ठेवितां, आपल्यावर जो कांहीं आरोप असेल, त्याची न्यायासनासमोर नेऊन चवकशी व्हावी, असें मागणें त्यानें मागितल्यावर तें जर नाकारलें असेल, तर त्याला बंधमुक्त केला पाहिजे किंवा जामीनावर खुला केला पाहिजे.

कायदे जाणणारा मनुष्य कायद्याच्या बाबतींत आपलें मत देतांना ज्याप्रकारची आपल्या वाक्यांची रचना करील, त्याचप्रकारची रचना वरील वाक्यांची आहे; त्यांतील शब्द फार काळजीनें व अगदीं तोलून घातले आहेत—केवळ कल्पनेनें प्राप्त झालेले मनुष्याचे स्वाभाविक हक्क काय आहेत, याचें वर्णन करितांना अलंकारिक भाषेची जशी अगदीं रेलचेल उडवून देण्यांत येते, त्याहून हा प्रकार किती तरी भिन्न आहे! स्वतंत्र मनुष्यास अटकेंत ठेवण्यासंबंधानें जसे हे नियम झाले, तसेच पार्लमेंटाच्या बाबतींतही पूर्वीं वेळोवेळीं जी असंमति प्रदर्शित केली होती, तीच पुनः मोठ्या जोरदार भाषेंत संक्षिप्त रीतीनें प्रदर्शित केली. ह्या विषयावरील ठराव खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

आपली मिळकत आणि मालमत्ता यांजवर प्रत्येक स्वतंत्र मनुष्याची पूर्ण आणि सर्व प्रकारची मालकी आहे, आणि अशी मालकी असणें हा त्याचा प्राचीन काळापासून चालत आलेला, व ज्याच्याविषयीं कोणालाही शंका घेतां येणार नाहीं, असा एक हक्क आहे; सर्वानुमतानें पास झालेल्या पार्लमेंटाच्या आक्टाशिवाय राजाला किंवा त्याच्या मंत्र्याला कोणावरही कोणच्याही प्रकारचा कर किंवा करभार बसवितां येणार नाहीं.

यानंतर पुढें दोन महिन्यांनीं **पिटिशन ऑफ् राइटस** नांवाची सनद राजाकडे पाठविली, त्यावर कांहीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन पार्लमेंटाची बैठक लांबणीवर टाकण्याच्या कामांत राजाचा सरासरी एक महिना निघून गेला; परंतु पुढें त्यानें त्या सनदेला नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें आपली संमति दिली. इंग्लिश लोकांना प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याला आधारभूत असलेली ही सनद फार मोठी असल्यानें ती येथें जशीच्या तशीच उतरून घेतां येत नाहीं. ती सनद मूळची फार मोठी आहे असें नाहीं; पण तिच्यांतील प्रत्येक कलमावर मोठी टीका द्यावी लागेल. देशांत फार दिवसांपासून चालत आलेल्या कायद्यां विरुद्ध वर्तन कसें होत गेलें, यासंबंधानें प्रथम त्यांत गाऱ्हाणें गाइलें आहे, व शेवटीं तसें गाऱ्हाणें गाण्याला जीं जीं कारणें झालीं असतील, तीं तीं दूर करण्याविषयीं **लॉर्डस** ( श्रेष्ठजन ) व **कॉमन्स** (सामान्यजन) या उभतांनीं राजाला प्रार्थना केलेली आहे, ' राज्यांत चालू असलेल्या कायद्याअन्वयें व नियमाअन्वयें आह्मां स्वतंत्र लोकांना या सर्व गोष्टी आमचे हक्क ह्मणून महाराज सरकारापासून मिळाल्या पाहिजेत, अशी आमची प्रार्थना आहे. ' परंतु या ' पिटिशन ऑफ् राइट ' मध्यें मागितलेले हक्क लोकांना प्राप्त होण्याला पुष्कळ वर्षें लोटावीं लागलीं. त्या सनदेपासून इच्छित कार्य पूर्णपणें शेवटास जाण्यास व इष्ट कार्याकरतां तिचा उपयोग करून घेण्यास पुढें आणखी साठ वर्षें कंठावीं लागलीं; परंतु ज्या वेळेस फल प्राप्त झालें, त्या वेळेस इंग्लंडांतील लोकांचें स्वातंत्र्य न्याय्य मार्गांनीं प्रस्थापित झालें, **स्टुअर्ट** घराण्यांतील राजांना देशपरित्याग करावा लागला, व सर्व लोकांत अपमान सोसावा लागला. ' **पिटिशन** ' ला आपली संमति दिल्यानंतर **चार्ल्सनें** मोठ्या क्रोधानें पार्लमेंट बरखास्त केलें, आणि त्याच्या जागीं दुसरें पार्लमेंट न बोलावतां, अकरा वर्षेंपर्यंत पार्लमेंटाच्या मदतीशिवाय राज्यशकट हांकला; आणि एकट्या राजाच्या परवानगीनें लोकांवर कर बसविण्याच्या हक्काचें ' **शिपमनी** ' ( Ship money ) ( टीप नंबर २८ पहा ) या नवीन रूपानें पुनरुज्जीवन केलें. **राजा विरुद्ध हँपडन** ( टीप नंबर २९ पहा ) हा जो प्रसिद्ध खटला चालला होता, त्यांत पूर्वीच्या कार-

कीर्दीत वसुलाच्या बाबतींत जे खटले सुरू झाले होते व त्या खटल्यांत जें तत्व प्रतिपादन करण्यांत येत होतें, तेंच तत्व या खटल्यांतही मोठ्या जोरानें प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें. तें तत्व हें कीं, राजाची सत्ता दोन प्रकारची आहे—एक साधारण प्रकारची सत्ता व दुसरी अनियत अथवा श्रेष्ठ प्रकारची सत्ता ; साधारण प्रकारची सत्ता कायद्याला संमत आहे व तिची व्याख्याही कायद्यांनीं ठरविलेली आहे; दुसऱ्या प्रकारची सत्ता कायदा आणि पार्लमेंटाचे आक्ट यांच्यापेक्षांही श्रेष्ठ आहे. अशा प्रकारच्या वादविवादाच्या सरणीपलीकडचीच पायरी उघड रीतीनें कायद्याचीं बंधनें तोडून टाकणें, ही होय, असें आपणांस हल्लीं वाटण्याचा संभव आहे; परंतु या पायरीला जाऊन पोंचण्याची **चार्लस**च्या अंगांत धमक नव्हती अथवा तसें करण्याची त्याला इच्छा नव्हती. **चार्लस**चा कायदेशीर उपायांनीं प्रतीकार करण्याची **कॉमन्स** (सामान्य) लोकांच्या ठिकाणीं जशी उत्कंठा दिसून येत होती, तशीच उत्कंठा लोकांवर जुलूम करण्याच्या कामांत **चार्लस**ही दाखवीत होता. प्रसंग पाहून न्यायाधीशांना कामावरून दूर करणें किंवा त्यानां बढती देणें, या उपायांनी राजानें न्यायाधीश लोक आपल्या मुठींत आणून ठेविले होते; त्याचा परिणाम असा झाला कीं, राजा व त्याचे मंत्री यांचें व न्यायाधीशांचें मन अगदीं एक होऊन गेलें होतें, व त्यामुळें **हँपडन** विरुद्ध चाललेल्या खटल्यांत न्यायाधिशांनीं बहुमतानें त्याच्या विरुद्ध निकाल दिला. **लॉंग पार्लमेंटानें** (टीप नंबर २० पहा) '**शिप् मनी**' (Ship money) च्या बाबतींत **चार्लस**नें स्वीकारलेल्या मार्गास आपली असंमति दर्शविली इतकेंच नाहीं, तर न्यायाधीशांचा हा ठराव कायद्याच्या दृष्टीनें अयोग्य आहे आणि ह्मणून तो प्रमाणभूत मानला जाऊं नये, असाही त्या सभेनें ठराव केला. राजा आणि पार्लमेंट या उभयतांमध्यें सुरू असलेल्या युद्धाचें कायदेशीर स्वरूप हा काळपर्यंत कायम राखण्यांत आलें होतें; त्याच्यापुढें मात्र हें स्वरूप स्पष्टपणानें दृग्गोचर होत नाहीं, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. '**ग्रँड रिमॉन्स्ट्रन्स**' नांवाची सनद सन १६४१ सालीं पार्लमेंटानें विचारासाठीं पुढें घेतली. या सनदेंत राजकीय गोष्टींचाच काय तो समावेश केला आहे असें स्पष्टपणें दिसतें.

पिटिशन आफ् राइट्सनें जेवढें क्षेत्र व्यापिलें होतें, तेवढें सर्व, किंबहुना त्यापेक्षां थोडेंसें जास्तीच क्षेत्र या सनदेनें व्यापून टाकिलें होतें; परंतु पिटिशन आफ् राइट्सकडून निघून आपण या रिमॉन्सट्रन्स कडे वळलों, ह्मणजे आपण कायद्याच्या वातावरणांतून निघून राजकीय वातावरणांत येऊन उतरलों आहोंत, असें आपल्याला वांटल्यावांचून रहात नाहीं. सन १६४२च्या आरंभाला पार्लमेंटच्या सभासदांपैकीं पांच सभासदांना पकडण्याचा राजानें प्रयत्न केला व त्यामुळेंच सिव्हिल वॉर नामक आपआपसांतील यादवी युद्ध सुरू झालें. हें युद्ध सुरू होण्याला जर कोणचें एखादें कारण झालें असेल, तर पांच सभासदांना पकडण्याचा केलेला यत्न हेंच कारण होय; आणि चार्लसच्या हातून अगदीं उघड उघड आणि धडधडीत अन्यायाचें व बेकायदेशीर असें जें प्रथम वर्तन झालें, तें तरी या संबंधांतच होय हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. चार्लसचें हें कृत्य कोणच्याही बाजूनें पाहिलें तरी अन्यायाचें होतें, असें कोणी ह्मटल्यास त्याला दोष देतां येणार नाहीं. कायद्याच्या दृष्टीनें तें कृत्य न्याय्य होतें असें ठरविण्याचा किंवा त्याचें समर्थन करण्याचा एकानेंदेखील प्रयत्न केल्याचें माझ्या पाहण्यांत नाहीं. राज्यव्यवस्थेच्या त्यावेळेच्या नियमांत कमीअधिक प्रमाणानें हात घालण्याला जागा होती ह्मणून त्या नियमांचा आपल्या मताप्रमाणें अर्थ करण्याची आरंभीं आरंभीं चार्लसची सर्व खटपट होती; पांच सभासदांच्या कामांत लोकांच्या स्वातंत्र्यावर एकदम छापा घालण्याचा त्याचा उघड उघड बेत होता, आणि त्यांत जर त्याला यश आलें असतें, तर सर्व समाजाचा रक्षणकर्ता मी, अशी ऐट मारतां येण्याकरतां त्यानें आपल्याकडून सर्व तयारी करून ठेविली होती.

पिटिशन ऑफ् राइट्सचा खरा परिणाम घडून येण्याला साठ वर्षें लोटावीं लागलीं, असें मी सांगितलें आहे. तो साठ वर्षांचा काल आपण आक्रमण करून आलों, ह्मणजे दुसऱ्या जेम्स राजाचें पलायन येथपर्यंत आपली मजल येऊन पोंचते. जेम्सच्या कारकीर्दीचा इतिहास पाहिला ह्मणजे, आपल्या राज्यावर पाणी सोडून देशत्याग करून तो पळून

गेला, यांत आपल्याला आश्चर्य वाटत नाहीं. ज्या देशावर तो राज्य करीत होता, त्या देशांतील लोकांच्या स्वतंत्रतेचा विध्वंस करण्याइतकें त्याच्या अंगांत सामर्थ्य नव्हतें, किंवा बाह्यतः तरी त्या स्वतंत्रतेला मान देण्याचा आव घालून लोकाराधन करण्याइतका दूरदर्शीपणाही त्याच्या अंगांत नव्हता. इंग्लिश पार्लमेंटानें, आपल्या राजापुढें, त्यानें आपल्याला दिलेल्या पीडांची व त्यानें केलेल्या वचनभंगांची आणखी एकदां कहाणी गाइली; परंतु त्यांतल्या त्यांत सुदैव हेंच समजण्याचें कीं, अशा तऱ्हेची कहाणी सांगण्याचा प्रसंग इंग्लिश पार्लमेंटाला पुनः आला नाहीं. ज्या **बिल ऑफ् राइट्सनें** दुसऱ्या जेम्सला इंग्लंड देशाच्या राज्यावरून पदच्युत केल्याचें, व तें राज्य **वुइलियम** आणि **मेरी** (टीप नंबर ३२ पहा) यांनीं स्वीकारल्याचें, जाहीररीतीनें प्रसिद्ध केलें, त्याच **बिल ऑफ् राइट्समध्यें** दुसऱ्या **जेम्सनें** राष्ट्रीय स्वातंत्र्याविरुद्ध कोणकोणचे अपराध केले, ते एकामागून एक ग्रथित करून, त्यानें केलेलें एकूणएक कृत्य बेकायदेशीर आहे असें ठरविलें. प्रजेवर राजा जुलूम करूं लागला असतां, आमच्या पूर्वजांनीं ज्या मार्गाचें नेहमीं अवलंबन केलें, त्याच मार्गाचें अवलंबन आह्मींही करीत आहों असें लार्ड्स व कॉमन्स या दोघांनींही या बिलांत स्पष्टपणें ह्मणून ठेविलें आहे; त्याचप्रमाणें प्रजेला आजपर्यंत ज्या निरनिराळ्या पीडा भोगाव्या लागल्या, त्या तशा न भोगणें हा प्रजेचा हक्क आहे, आणि तो हक्क राजानें पाळला पाहिजे, असेंही त्यांनीं त्यांत नमूद करून ठेविलें आहे. तेथें एक प्रश्न उत्पन्न होतो; तो कोणचा, हें आपण ज्या वेळेस **बिल् ऑफ् राइट्चा** विचार करीत होतो, त्या वेळेस आपल्या लक्षांत आलें असेल. आतां तो प्रश्न बराच महत्वाचा असल्यामुळें, त्याच्या संबंधानें मीं येथें थोडासा विचार करतों. **बिल् ऑफ् राइट्स, पिटिशन ऑफ् राइट्स** आणि खुद्द **म्यागना कारटा** या सर्व सनदांत काय केलें आहे, तर लोकांना पूर्वींच जे हक्क प्राप्त झालेले होते, त्यांचेंच मोठ्या उदात्त व गंभीर रीतीनें दृढीकरण केलेलें आहे यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. प्रत्येक सनदेंत वर सांगितलेले हक्क प्रजेला मिळणें अगदीं रास्त आहे. त्यांच्यावर प्रजेची एक प्रकारची मालकी आहे, असे माझ्या मतानें

तरी सद्धेतुपूर्वक ह्मटलें आहे, [ तरीपण यावरून हें कृत्य कांहीं अंशानें सद्धेतुलासुद्धां सुटून झालें नसेल असें सिद्ध होत नाहीं. ] व त्या ह्मणण्याचें समर्थनही चांगल्या रीतीनें केलें आहे. तत्रापि इतिहासकार आपल्याला असें सांगतात, कीं, या सनदेपैकीं प्रत्येक सनद राज्यव्यवस्थेच्या इतिहासांत तिची मर्यादा ठरवून देण्याच्या कामीं अत्यंत उपयोगाची आहे. व त्यांच्या त्या सांगण्यासंबंधानें संशय घेण्याला आपल्याला जागाही पण नाहीं विशेषतः **रेव्होल्युशन** [ राज्यक्रांति ] ( टीप नंबर ३३ पहा. ) नंतर इंग्लंडांतील राज्यशासनपद्धतीला अगदीं नवीन वळण लागलें आहे. या दोन गोष्टींचा मेळ कसा घालावयाचा? कायद्यानें प्राप्त झालेले व ज्यांचा उपभोग आपण घेत आहों असे हक्क कागदावर लिहून ठेवल्यानें राजकीय संस्थांचा विकास अथवा रूपांतर तें कसें होणार? केवळ कायद्याच्या दृष्टीनें अथवा राजकीय दृष्टीनें विचार केला, तर हें एक निव्वळ कोडें आहे, असें आपल्याला वाटतें. राज्यनीति व कायदा या उभयतांची एकमेकावर होणारी प्रतिक्रिया ( जिच्याकडे या साऱ्या व्याख्यानभर मी आपली नजर एकसारखी ठेविली आहे ) आपण लक्षांत घेतली, ह्मणजे हें कोडें उकलण्याचा मार्ग आपल्याला तेव्हांच सांपडेल. सर्व कायद्यांची नियामक शक्ति सारखीच आहे असा कायद्यांतील एक सिद्धांत आहे. देशांत प्रचलित असलेले कायदे अस्तित्वांत येण्यास कोणचीं राजकीय कारणें झालीं, त्यांचा अम्मल सुरू झाल्यावर व्यवहारदृष्ट्या त्यांपासून काय परिणाम होतात, अथवा ज्या लोकांकरितां ते कायदे केलेले असतात, ते लोक त्या कायद्यांची आज्ञा पाळण्याला खूष आहेत किंवा नाखूष आहेत, याचा कायदेपंडिताला, आपले कायदेपंडिताचेंच तेवढें नातें लक्षांत ठेवावयाचें असेल तर, विचार करण्याचें कारण रहात नाहीं. परंतु नानाप्रकारच्या राजकीय आणि सामाजिक अवस्थांचा त्या कायद्यांपासून होणाऱ्या नानाविध क्रियांवर परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. कांहीं कायदे जागृतावस्थेंत असतात, कांहीं निद्रावश झालेले असतात, कांहीं कायद्यांची अनुज्ञा शब्दशः पाळण्यांत येते, कांहीं कायद्यांचा अपलाप करण्यांत येतो व कांहीं

कायद्यांकडे स्वस्थपणानें लोक डोळेझांक करतात. कागदावर लिहून ठेवलेला कायदा तोच असतो, परंतु काल, व्यक्ति, आणि राज्य शासनपद्धति यांत जसजसा फरक पडत जातो, तसें तसें त्याला नवीन स्वरूप प्राप्त होतें. मूळ ग्रंथावर निरनिराळ्या पंथांच्या लोकांच्या टीका निरनिराळ्या प्रकारच्या असतात. दुसऱ्या **जेम्स** राजाच्या अगदीं हुकुमांत चालणाऱ्या न्यायाधीशांना **पिटिशन ऑफ् राइट्स्** नांवाच्या सनदेंत प्रत्यक्ष घातलेल्या शब्दांत ढवळाढवळ करणें शक्य नव्हतें; परंतु शांततेनें आपल्या आयुष्याचे दिवस कंठणाऱ्या नागरिकांना व प्रतिष्ठित बायकांना, त्यांच्यावर काल्पनिक राजद्रोहाचा आरोप ठेवून, कज्जांत आलेला पुरावा क्षुल्लक अथवा गर्हणीय होता तरी, कंठस्नान घालण्याचा क्रम या न्यायाधीशांनीं सुरू ठेविला होता. पहिला **चार्लस** किंवा पहिला **जेम्स** यांच्या कारकीर्दीत असणाऱ्या एकूण एक न्यायाधीशांपेक्षां दुसऱ्या **जेम्सच्या** कारकीर्दीत असणारे न्यायाधीश हे विशेष तिरस्कारार्ह आणि श्ववृत्तीचा अवलंब करणारे होते, तरी आपण लोकांवर करभार आणि **शिपमनी** नांवाचा कर बसविण्याच्या कामांत त्यांच्या पूर्वीच्या बंधूंनीं जें आचरण केलें, तें त्यांच्या हातून होईनासें झालें; परंतु त्यांनीं असा एक नवीनच शोध काढिला कीं, राजाच्या अंगांत एक प्रकारची प्रवर्तक शक्ति आहे व तिच्या जोरावर तो वाटेल ती गोष्ट करूं शकेल. हा शोध त्यांनीं काढल्याबरोबर **रेफरमेशन** (टीप नंबर ३४ पहा) (Reformation) केलेल्या सर्व कामाला वस्तुतः हरताळ फासण्याचें काम फार सोपें झालें. या किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी यापुढें होऊं नयेत, असें **बिल् ऑफ् राइट्स**मध्यें इंग्लिश लोकांनीं स्पष्टपणें ह्मटलें होतें. प्रजेचें स्वातंत्र्य नष्ट न व्हावें, राज्याचा कारभार सुयंत्रित रीतीनें चालावा, या हेतूनें कायद्यांत जे जे प्रतिबंध सांगितले होते, ते ते पूर्णपणानें, यथान्याय आणि उत्साहपूर्वक पाळले जावे, ह्मणून आपल्या अंगांत असणाऱ्या राजकीय शक्तीचा लोकांनीं उपयोग केला, आणि **बिल् ऑफ् राइट्स** नांवाची सनद राजापासून करून घेतली, असें ह्मणणें संयुक्तिक आहे. इंग्लिश लोकांच्या स्वतंत्रतेचें रक्षण करणारे कायदे यापुढें जागृत रहावें, त्यांनीं निद्रावश होऊं नये, असा इंगितें.

लोकांचा पक्का निश्चय झाला होता. ट्युडर घराण्याच्या ऐन उत्कर्षाचे वेळीं सदरहू कायदे बऱ्याच अंशानें झोपीं गेले होते; आणि इलिझाबेथ-च्या पश्चात् वामशील आणि पंडितंमन्य असा पुरुष राज्यासनावर न येतां प्रजेचा खरा शास्ता जर राज्यासनावर बसला असता, तर अनेक पिढ्यांपर्यंत या कायद्यांची हीच स्थिति कायम राहिली असती; दुर्दैवा-च्या फेऱ्यांत सांपडल्यानंतर मुत्सद्दीपणाचा एखादा धडा जरी दुसरा चार्ल्स राजा शिकला असता, अथवा दुसऱ्या जेम्सच्या अंगांत सर्व लोकांत साधारणत: असणारें दूरदर्शित्व थोडेसें तरी जर असतें, तर **कॉमनवेल्थ** ( Common wealth ) नंतर देखील गाढ निद्रेनें पुन: त्या कायद्यांना पछाडलें असतें, परंतु राष्ट्राच्या सुदैवानें **स्टुअर्ट** घरा-ण्यांतील राजांचीं मूर्खपणाचीं कृत्यें सांचत सांचत इतकीं सांचली कीं, कायद्यांनां आपली निद्रा सोडून देऊन खडबडून जागें होणेंच भाग पडलें. **पिटिशन ऑफ राइट्स**नें आपलें शिंग फुंकल्यानंतर मध्यंतरीं त्या शिंगाचा आवाज बंद पडला होता, परंतु त्याच आवाजाला मिळवून घेऊन **बिल् ऑफ राइट्स**नें पुन: एकदां शिंग फुंकलें, त्यासरशीं जिकडे तिकडे जागृतावस्था प्राप्त झाली. ज्या राष्ट्रांतील लोकांनीं प्रथम विश्वास ठेवला, परंतु त्यांच्याशीं दगलबाजपणाचें वर्तन ठेवल्यानें पुढें विश्वास ठेवणें ज्यांना बिकट वाटूं लागलें, अशा लोकांचा **बिल् ऑफ राइट्स** हा अगदीं निकराचा व शेवटचा शब्द होय. कायद्याच्या दृष्टीनें पाहिलें तर या बिलांत नवीन असें कांहीं नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यांत कांहींच तथ्य नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल, परंतु एखाद्या मनुष्यापासून नुस्तें वचन घेणें आणि जामीन घेणें यांत राजकीय दृष्टीनें पाहिलें तर पुष्कळ फरक आहे.

कायद्याच्या दृष्टीनें या बिलांत नवीन असें कांहीं नाहीं, असें जें आह्मीं ह्मटलें, त्याचा फार व्यापक अर्थ करणें उपयोगीं नाहीं. करतांनाच कच्चा राहिलेला असा एखादा नियम घेऊन, त्याची आपण व्याख्या करूं लागलों ह्मणजे, कांहींना कांहीं जास्त गोष्टींची त्यांत भर घातल्याशिवाय आपल्याला गत्यंतरच नसतें. एखाद्या नियमाचें तुह्मीं

स्पष्टीकरण करूं लागला असतां, आपलें ह्मणणें काय आहे, हें यथार्थ-रीतीनें सांगण्याची तुह्मीं कितीही खटपट केली, तरी तुमचें तें करणें स्पष्टीकरणादाखलच आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे; आणि पुढें मग तुमचें तें स्पष्टीकरण जुन्या मूळ ग्रंथाच्या–जुना ग्रंथ असलाच तर— बरोबरीनें रहात जाईल. इतकेंही करून तुह्मीं ज्या रीतीनें अर्थ करता, त्याशिवाय अन्य रीतीनें अर्थ करणें शक्यच नाहीं, असा तरी भरंवसा कोठें आहे? तुमची अर्थ करण्याची रीति अगदीं उत्तम प्रकारची असूं शकेल; परंतु दुसऱ्या टीकाकाराला नुस्ता दिसण्यालाच चांगला का होईना; पण दुसरा अर्थच करतां यावयाचा नाहीं, इतकी ती उत्तम असणें शक्य नाहीं. तुह्मीं पसंत केलेला, व आतांपर्यंत कमीअधिक प्रमाणानें संदिग्धावस्थेंत असणारा अर्थ तुह्मीं जो करतां, तो मूळ ग्रंथांतील एखाद्या पाठांतराच्या अथवा एखाद्या सूक्ष्म अर्थभेदाच्या आधारानें करता. एखादा अधिकार अथवा आचार तुह्मांस वाटेल तितका प्राचीन असूं शकेल, परंतु नवीन प्रकारच्या पद्धतीनें केलेल्या अर्थामुळें त्यांना एक प्रकारची नवीन स्थिरता आणि जोर येतो. वादग्रस्त अशा कायद्याच्या मुद्यावर निकाल देते वेळेस प्रत्येक दिवशीं आतां सांगितलेला हा प्रकार न्यायसभांमधून चाललेला आपण पाहतों. कायद्यानें कोणचा नियम घालून दिला, याची शहानिशा करण्याचा न्यायाधीशांचा हेतु असतो; त्या नियमांत भर घालण्याची किंवा त्याच्यांत फेरबदल करण्याची इच्छा नसते; परंतु तो नियम काय आहे हें ठरवितांना त्याच्यांत थोडीशी भर पडणें अथवा, त्याला जणूकाय नवीन प्रस्थानमर्यादा ठरवून देणें, या दोन गोष्टी झाल्याशिवाय रहातच नाहींत. आमच्या देशांतील कायद्यांची इमारत या रीतीनें बांधीत बांधीत नेली आहे; आणि पार्लमेंटमध्यें पास झालेल्या आक्टांनीं आतांपर्यंत वर्णन केलेला प्रकार त्याज्य होय, असें केव्हांही ठरविलें नाहीं. उलट त्यांच्यापासून या गोष्टीला एक प्रकारचें उत्तेजनच मिळालें आहे, आणि वास्तविक पाहिलें तर तसें उत्तेजन दिल्यावांचून गत्यंतर ही नाहीं. कारण एखादा कायदा मोठ्या काळजीनें जरी तयार केलेला असला, तरी विवक्षित कज्जांतील हकीगतीला तो कायदा लावण्याचा

प्रयत्न केला ह्मणजे, त्यांत कोठेंना कोठें तरी संशय घेण्याला जागा सांपडतेच सांपडते. इंग्लंडांतील लोकांच्या स्वतंत्रतेला अगदीं आधारभूत अशा मानलेल्या ज्या प्राचीन सनदा आणि प्राचीन चालीरीती होत्या त्यांची, **बिल् ऑफ राइट्स** आणि **पिटिशन ऑफ् राइट्स** या दोन सनदांच्या द्वारानें पार्लमेंटानें व्याख्याच केली, अथवा त्यांचा अर्थनिर्णयच केला, असें मानलें पाहिजे. ही गोष्ट तव्हांच आपल्या लक्षांत येण्याकरतां, आपण हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, इंग्रजी राज्यव्यवस्थेचा हल्लींच्या काळीं जो अम्मल सुरू आहे, तो बऱ्याच अंशानें लोकांच्या समजावर अवलंबून आहे; आणि त्यांत विशेष हें कीं, या लोकांच्या समजूतींना व्यवस्थित प्रकारचें स्वरूप प्रत्यक्ष कायद्यानें केव्हांही दिलेलें नाहीं. साक्षात् कायदाच जर पाहिला, तर त्यांत असें ठरविलेलें आपल्याला दिसून येईल कीं, कॉमन्सची ( सामान्य जन ) सभा व लॉर्डस ( बडे लोकांची सभा ) या दोन सभांनीं पसंत केलेल्या बिलाला आपल्याला वाटेल तरच संमति देण्याचा अधिकार कायद्यानें राजाला दिलेला आहे. **क्याबिनेट** ( टीप नंबर ३९ पहा ] नावाची मंडळी, आणि मुख्य प्रधान या नांवाची व्यक्ति या दोहोंचाही कायद्यांत कोठेंच मागमूस सांपडत नाहीं. राजानें कोणचेंही कृत्य करावयाचें झालें, तर तें आपल्या मंत्र्यांच्या मार्फतीनें केलें पाहिजे व त्या मंत्र्यांवर सर्व प्रकारें पार्लमेंटाचा अधिकार पाहिजे. असें कायद्याचें तत्व आहे; परंतु राजानें आपले मंत्री जे निवडावयाचे, ते कशा रीतीनें निवडावयाचे हा जो राज्यकारभार चालविण्याच्या कामांतील अतिशय महत्वाचा भाग, त्याच्यासंबंधानें कायद्यानें कोणचीही मर्यादा ठरवून दिलेली नाहीं, किंवा, कोणच्याही प्रकारचें बंधन घालून ठेवलेलें नाहीं. जे मंत्री हाउस ऑफ् लॉर्डस ह्मणजे बडे लोकांच्या सभेंतील सभासद नाहींत, त्यांना हाउस ऑफ् कॉमन्स ह्मणजे सामान्यजनसभेंत सभासद होऊन आलेंच पाहिजे, असादेखील एखादा साक्षात् कायदा नाहीं. ज्या समजुतीवर सर्व देशाचा राज्यकारभार चालला आहे, त्या समजुतीशीं अगदीं विसंगत असणारीं व त्या अर्थानें पाहिलें तर राज्यव्यवस्थेच्या नियमालाच विसंगत अशीं वरच्याप्रमाणें

आणखी उदाहरणें जर मी देत बसलों, तर एक तासदेखील पुरे होणार नाहीं. लोकांच्या समजुतीचा हा क्रम एकसारखा सुरू असल्यामुळें, राज्यव्यवस्थेच्या नियमांचा अम्मल अर्धा शतकपावेतों निर्विघ्नपणानें होत आला. आणि त्यांत यावत्कालपर्यंत कोणच्याही प्रकारचें विघ्न उत्पन्न होणार नाहीं, तावत्कालपर्यंत विशेष खुलाशाची व्याख्या करण्याचें काहीं प्रयोजन नाहीं. तथापि अशा तऱ्हेची व्याख्या करण्याचें प्रयोजन केव्हां ना केव्हां तरी उत्पन्न झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं, अशी कल्पना करणें शक्य आहे. आणि तसें झालें ह्मणजे **क्याबिनेटला** कायद्याच्या दृष्टीनें आंजला जें अस्तित्व नाहीं, तें प्राप्त झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं. अगदीं हुबेहूब हाच जरी नाहीं, तरी बहुतेक अंशीं हाच प्रकार कामन्स ( सामान्यजन ) च्या सभेंत आपल्या डोळ्यादेखत चालू आहे. या वादविवादाच्या कामांत प्रत्यक्ष जे नियम केले आहेत, ते करतांनाच असे केले आहेत कीं, त्याच्या योगानें सभासद लोकांना सभेच्या कामाला खोटी करण्याला अनेक प्रसंग सांपततात. हे नियम जे केले, व ज्यांचा अम्मल बहुत काल पावेतों होत आहे, ते नियम करतांना असेंच गृहीत धरलें होतें कीं, कामन्स [ सामान्यजन ] सभेंतील सभासद हे समजूतदार आणि सभ्य गृहस्थ आहेत, आणि ते सार्वजनिक कामाला केवळ अडथळा करावयाचा, ह्मणून करणार नाहींत. परंतु गेल्या तीन चार वर्षांत कांहीं युक्तिबाज सभासदांनीं, आपलें ह्मणणें सभेनें मान्य करावें, या हेतूनें सभासदांना धाकदपटशा दाखविण्याकरितां सभेच्या कामांत नसतीं विघ्नें उपस्थित करून कोणीकडून तरी खो आणण्याचा प्रयत्न अव्याहत रीतीनें चालू ठेविला आहे. परंतु याचा परिणाम काय होतो? कसेंही झालें तरी या नियमांत फेरफार करण्याचा पार्लमेंट सभेला पूर्ण अधिकार आहे. आणि त्या नियमांचा सभासदांकडून गर्हणीय रीतीनें जर दुरुपयोग होऊं लागला, तर त्या सभेला तें कधींही खपावयाचें नाहीं. परस्परांविषयींचा विश्वास व त्या विश्वासानें चळावलेल्या समजुती एकदां नाहींशा झाल्या, ह्मणजे एखादी साक्षात् मर्यादा घालून देणें अवश्य होतें.

यापूर्वीच एक दोन राजकीय उपायांची योजना झाली आहे, आणि याशिवाय जास्ती आणि विशेष सक्तीचे नियम करण्याचें घाटत आहे.

वास्तविक रीतीनें अमलांत असणारे कायदे आणि कायदेशीर संस्था यांचा राजकीयदृष्टया आपण आतांपर्यंत विचार करीत आहों; परंतु विशेष रीतीनें निगूढ अशा कायद्यांच्या कल्पनांचाही राजनीतीवर परिणाम होतो. आणि तोही आपल्या अटकळीपेक्षां विशेष महत्वाचा असा असतो. **रेव्होल्यूशन** [ राज्यक्रांति ] आणि **बिल ऑफ् राइट्स** यासंबंधानें आतांच आपण विचार करीत होतों. कायद्यासंबंधाच्या व दुसऱ्या इतर प्रकारच्या संशयानें ज्यांचीं डोकीं कमीअधिक प्रमाणानें त्रासून गेलीं होतीं, अशा लोकांनीं, दुसऱ्या जेम्सवर राजनिष्ठा ठेवण्याचें कारण नाहीं, असें जें ठरविलें, तें तरी कायद्यांतील मानसिक कल्पनांचा त्यांना फार मोठा जोर होता ह्मणून ठरविलें, असें जर मी सांगितलें, तर तें माझें सांगणें यथार्थ आहे, असें आपल्याला कदाचित् वाटावयाचें नाहीं. परंतु वस्तुस्थिति मी ह्मणतों अशीच आहे, यांत संशय नाहीं. **कॉन्व्हेन्शन** [ टीप नंबर ३६ पहा. ] पार्लमेंटानें असा ठराव केला कीं, 'राजा व प्रजा यांजमध्यें झालेला मूळचा करार मोडून देशांतील राज्यव्यवस्था उलथून पाडण्याचा दुसऱ्या जेम्सनें प्रयत्न केला होता. हा मूळचा करार, ज्याला पुढील ग्रंथकारांनीं **सामाजिक करार** ( Social contract ) असें नांव दिलेलें आढळतें, तो केवळ काल्पनिक असून समाज आणि सरकार यांचा मूळ पाया तेथें आहे, अशी जी कांहीं लोकांची समजूत आहे, तीही काल्पनिकच आहे. इतकें सांगितलें ह्मणजे काल्पनिक गोष्टीला जितका मान द्यावयाचा, तितकाच याही गोष्टीला द्यावयाचा हें निराळें सांगणें नको. समाज आणि सरकार यांच्या अस्तित्वावांचून करार होणें शक्यच नाहीं; आणि वरील सिद्धांत प्रतिपादन करणारे लोक तर या दोहोंच्याही पूर्वीं अस्तित्वांत आलेल्या करावर कायद्यांच्या अंगचें सामर्थ्य अवलंबून आहे, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. कोणी कोणाचा शास्ता नाहीं, ज्याचा तो स्वतंत्र, अशा स्थितींत रहाणारीं मनुष्यें एकत्र जमतात आणि एक-

मेकांच्या संमतीनें समाजाची रचना करतात, अशी कांहीं ग्रंथकारांची कल्पना आहे, परंतु याच्या उलट आपल्याला पुरेंपणी असें ठाऊक आहे कीं, समाजाची स्थापना होऊन कांहीं कालानें त्याला सुस्थिति प्राप्त झाली ह्मणजे, व्यक्तीव्यक्तीला निरनिराळे हक्क आणि स्वातंत्र्य मिळणें शक्य होतें. हल्लींच्या कायद्यांच्या कल्पनांचा पूर्वीच्या कालाशीं आणि परिस्थतीशीं मेळ घालणें हें एक हेत्वाभासाचें उदाहरण आहे. कारण, या कायद्यांच्या कल्पनानां जुळणारी हल्लींची जी वस्तुस्थिती आहे, ती पूर्वीच्या काळांत नव्हती. परंतु **सामाजिक करार** या मताचें येथें यथास्थित रीतीनें विवेचन करणें, अप्रासंगिक होणार आहे, आणि ज्या अर्थी **लेस्ली स्टीफन** नांवाच्या ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत [ टीप नं ३७ पहा ] या विषयाचें उत्तम रीतीनें विवेचन केलें आहे, त्या अर्थी तसें करणें विशेषच अप्रासंगिक होईल. आपल्याला विशेष कौतुक वाटेल अशी एकच गोष्ट मला सांगावयाची आहे, आणि ती ही कीं, वर सांगितलेला हा सिद्धांत कायद्याच्या शिक्षणाचा ज्यांच्यावर परिणाम झाला आहे अशा व कल्पनातरंगांत ज्याचें मन सदा निमग्न झालेलें आहे, अशा लोकांच्या डोक्यांतून जरी निघालेला आहे, तरी **रेव्होल्युशन** [ राज्यक्रांति ] घडवून आणणाऱ्या आमच्या मुत्सद्यांनीं या सिद्धांताचा व्यावहारिक राज्यनातींत मोठ्या उत्सुकतेनें उपयोग करून घेतला. राज्याभिषेकाच्या वेळेस घ्याव्या लागणाऱ्या शपथेंतील ( Coronation oath ) स्पष्टपणें दिलेल्या वचनाकडे आपण लक्ष दिलें, ह्मणजे **जेम्स** राजाच्या हातून चूक झाली, असें ठरविण्याला सकृद्दर्शनीं बराच आधार आहे, असें वाटतें. तथापि राज्याभिषेक होण्याच्या पूर्वी किंवा नंतर राजा हा कांहीं झालें तरी राजाच आहे, आणि यामुळें लोकांनीं त्याच्याविषयीं आपल्या मनांत पूर्णपणें स्वामिभक्ति बाळगली पाहिजे, हें जसें खरें आहे, तसेंच राजानेंही पण कायद्याची आज्ञा पाळून राज्यकारभार हांकला पाहिजे. ही एक नांवची सबब पुढें करून वरील गोष्ट जी सुचविली, ती केवळ एका बाजूला ठेवण्याकरतांच सुचविली. राजा हा परमेश्वराचा अंश आहे हें मत टाकून दिल्यावर त्याच्याउलट विशेष उदात्त अशा तत्वांचा अंगीकार करणें अवश्य झालें यांत शंका नाहीं. शहाण्या

लोकांनीं अशा तऱ्हेच्या तत्वाचा अंगीकार कसा करावा इतकेंच नाहीं, तर व्यवहारांतदेखील त्याचा उपयोग कसा करून घ्यावा ह्याचें आपल्याला मोठें गूढ पडेल यांत शंका नाहीं. परंतु हें आपल्याला हल्लींच्या काळांत मोठें गूढ असें वाटत असलें, तरी त्यावेळेस या तत्वाचें बंड फार मोठें होतें, आणि राजाच्या हातून होणाऱ्या जुलमाला ज्यांनीं कधींही उत्तेजन दिलें नाहीं, अशा लोकांच्या मनाला त्याच्या एकसारख्या टोंचण्या लागलेल्या होत्या. हें तत्व हागून पाडण्याकरितां दुसरें तत्व शोधून काढणें अवश्य झालें. कारण, सार्वजनिक उपयुक्ततेवर उघडपणें मदार देण्याजोगी लोकांचीं मनें पक्क झालीं नव्हतीं, व त्याला अनुकूल असा कालही आला नव्हता. सामाजिक कराराची मजेदार कल्पना हाताला लागण्याजोगी जवळच होती, व तिचा उपयोग करून घेतल्यानें आलेलें संकट दूर झालें. संकट दूर झालें या दृष्टीनेंच विचार केला, तर ती कल्पना मजेदार अशी वाटते; परंतु वस्तुतः ती तशी नाहीं; आणि ह्मणून ही एक मोठी सुखाची गोष्ट मानली पाहिजे कीं, दोन्ही सभांनीं प्रसिद्ध केलेल्या आपल्या ठरावांत या मूळच्या कराराचा मोठ्या प्रमुखपणानें जरी उल्लेख केलेला आहे, तरी **बिल ऑफ राइट्स**-मध्यें त्याचा मुळींच समावेश करण्यांत आला नाहीं. इंग्लंडच्या गादीवर **प्रॉटेस्टंट** पंथांतील राजांनीं बसावें, असें ज्या आक्टांत ठरलें, त्या आक्टांत जर त्या तत्वाचा समावेश केला असता तर, कांहीं कांहीं कालपावेतों **विग** पक्षाच्या मंडळीला हें तत्व जसें राजकीयदृष्ट्या श्रद्धा-विषय होऊन बसलें होतें, तसें तें इंग्लंडांतील झाडून सर्व लोकांना होऊन बसलें असतें.

इंग्रजी राजनीतींतील ठळक ठळक गोष्टींपैकीं कांहींची आतापर्यंत जी कांहीं तुटपुंजी माहिती मी आपल्याला दिली आहे, ती देतांना आमच्या देशाच्या इतिहासांतील प्रत्यक्ष अस्थिमांसांत, कायद्यांच्या संस्थांच्या निरनिराळ्या रचना, निव्वळ कायदेशीर हक्काविषयीं उत्पन्न होणारें तत्व व कायद्यासंबंधानें लोकांनीं मनास वाटतील तशा केलेल्या कल्पना देखील कशा खिळून गेल्या आहेत, हें सिद्ध करून दाखवि-

ण्याचा यत्न मी केला आहे. कायदा आणि कायद्याची सर्व सामग्री ही, इतर मनुष्यनिर्मित संस्थांप्रमाणें, हुकूम सोडल्याबरोबर निर्माण होत नाहींत, तर ती वाढत वाढत पूर्णावस्थेला येऊन पोंचतात, ह्या राजकीय दृष्ट्या विशेष महत्वाच्या आणि विशेष व्यापक अशा सिद्धांतांची, हें विवेचन करीत असतां थोडीशी बाजू तरी आपल्याला दिसली आहे. आणि आपणापैकीं एखाद्याचें मनांत कां होईना, पण अशी जर कल्पना आली असेल कीं, आतांपर्यंत सांगितलेल्या कल्पनांच्या साहाय्यानें इंग्लंडांतील कायद्यांचा सूक्ष्म रीतीनें आणि ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला, तर तो इंग्लंडांतील हल्लींच्या पुष्कळ लोकांना जसा नीरस आणि कष्टप्रद वाटतो, तसा तो वस्तुतः नाहीं, तर मग माझ्या श्रमाचें बरेंच सार्थक झालें, असें मी समजेन.

# परिशिष्ट.

**टीप नंबर १.** ( अ ) '**गनपावडरप्लॉट**' ( बंदुकीच्या दारूचें बंड ) या नांवाचें बंड पहिल्या **जेम्स**च्या कारकीर्दींत इ० स० १६०५ सालीं झालें होतें. पार्लमेंट सभागृह बंदुकीच्या दारूनें उडवून देऊन, राजा, **लॉर्ड्स** [ बडे लोक ] आणि **कॉमन्स** [ सामान्य लोक ] या सर्वांचा नाश करण्याचा बंडवाल्यांचा हेतु होता; परंतु हें बंड लवकरच उघडकीस आल्यामुळें तो बेत फसला.

( ब ) **दुसरा चार्ल्स** राजा राज्य करीत असतां, १६६६ सालीं लंडन शहरास भयंकर आग लागून, बहुत प्राणांचा व वित्ताचा नाश झाला.

**टीप नंबर २. म्याग्ना कारटा** ह्मणजे मोठी सनद. मोठी ह्मणजे महत्वानें मोठी असें समजावयाचें. हिलाच इंग्रजीमध्यें 'ग्रेट चारटर' असेंही नांव आहे. ही सनद इंग्लिश लोकांना १२१५ सालीं **जॉन** राजाकडून मिळाली. या सनदेमुळें खालीं सांगितलेले हक्क इंग्लिश लोकांना प्राप्त झाले.

[ १ ] प्रजेचें स्वातंत्र्य [ २ ] आपली मिळकत राजानें मागितली असतां, ती त्याला देत नाहीं असें ह्मणण्याचा हक्क [ ३ ] न्यायस्वातंत्र्य आणि न्यायसमता [ ४ ] पार्लमेंटनें कर बसविणें [ ५ ] खरीं वजनें आणि मापें ह्यांची देखरेख [ ६ ] लंडन व इतर शहरांत व्यापार करण्याचें स्वातंत्र्य [ ७ ] परदेशांतील व्यापाऱ्यांना इंग्लंड देशांत येण्याजाण्याची मोकळीक.

**टीप नंबर ३.** सन ११९९ पासून १२१६ पर्यंत **जॉन** राजा इंग्लंड देशाचें राज्य करीत होता. **जॉन** हा फार वाईट मनुष्य होता. आजपर्यंत इंग्लंड देशांत जे जे राजे झाले त्या सर्वांत हा अतिशय वाईट होता. तो जात्या हुषार होता, आणि त्यानें जर मनांत आणलें

असतें, तर देशाचा राज्यकारभारही त्याच्या हातून उत्तम प्रकारानें झाला असता; परंतु आपल्या हुषारीचा त्यानें दुरुपयोग केला. त्याच्याविषयीं एका जुन्या लेखांत असें म्हटलें आहे, ' तो **नाइट** [ Knight ] म्हणजे सरदार होता; पण सत्य त्याच्या ठिकाणीं वास करीत नव्हतें, तो राजा होता; पण त्याच्या अंगांत न्यायबुद्धि नव्हती, तो क्रिश्चियन होता; परंतु आपल्या धर्माविषयीं त्याच्या मनांत श्रद्धा नव्हती. '

**टीप नंबर ४.** **केंट** नांवाच्या परगण्यांत, **विंडसर**जवळ **टेम्स** नदीच्या कांठीं हें शहर आहे.

**टीप नंबर ५.** प्रोफेसर **स्टब्स** हे फार प्रसिद्ध इतिहासकार आहेत.

**टीप नंबर ६.** **कॉमन वेल्थ** १६४९ पासून १६६० पर्यंत. ' कॉमन वेल्थ ' या शद्बांचा अर्थ ' बहुस्वामिक ऐश्वर्य ' असा आहे. **पहिल्या चार्ल्स** राजाचा शिरच्छेद केल्यानंतर इंग्लंडांत जी राज्यपद्धति सुरू झाली तिला हें नांव आहे. **चार्ल्स**नें प्रजेवर फार जुलूम केल्यामुळें राजा हा हुद्दा यापुढें नको असें कॉमन्सनीं ठरविलें, व ही नवीन पद्धति सुरूं केली. या नवीन पद्धतीनें राज्याची सर्व सत्ता लोकांच्या हातांत आली, म्हणून तिला वर सांगितलेलें अन्वर्थ नांव देण्यांत आलें होतें.

**टीप नंबर ७.** **रोमन** बादशाही ५ व्या शतकांत नाहींशी झाल्यानंतर पुढें १५व्या शतकाच्या शेवटीं विद्येचें पुनरुज्जीवन ( Revival of learning ), होईपर्यंत जो काल गेला, त्या कालाला इंग्रजींत **मिडल् एजिस** [ Middle ages ] असें नांव आहे. त्यालाच आम्हीं मध्ययुग अशी संज्ञा दिली आहे.

**टीप नंबर ८.** इंग्रजी ' Order ' म्हणून जो शद्ब आहे, त्या करितां ' स्थिति ' असा शद्ब आम्ही वापरला आहे. संस्कृत ग्रंथांत ' स्थिति ' हा शब्द या अर्थानें वापरलेला आढळतो. उदाहरणार्थ ' **स्थित्यै** दंडयतो दंड्यान् ' हा रघुवंशांतील श्लोक पहा.

**टीप नंबर ९.** **नॉर्मन** लोकांचा मुख्य जो **नॉरमंडीचा ड्यूक वुइलियम** यानें १०६६ सालीं इंग्लंडावर स्वारी केली. इंग्लिश लोक

**व नॉर्मन** लोक यांमध्यें त्याच सालीं **हेस्टिंग्ज** येथें फार मोठा घोर संग्राम झाला. त्यांत इंग्लिश लोकांचा पराजय होऊन, त्यांचा राजा **हारोल्ड** रणांगणातच मरण पावला; त्यानंतर इंग्लिश लोकांनीं आपण होऊनच **वुइलियमला** इंग्लंडची गादी दिली. त्यानें इंग्लंडचें राज्य २० वर्षे ( १०६६ ते १०८७ ) केलें. हाच **वुइलियम** इंग्रजी इतिहासांत **वुइलियम दी कांकरर** ह्मणजे ' विजयशाली वुइलियम ' या नावानें प्रसिद्ध आहे.

**टीप नंबर १०.** फार प्राचीनकाळीं इंग्लडांतील राजांना सल्ला मसलत देण्याकरितां ह्मणून एक सभा होती, तिला **विटेना गेमॉट** ( Witena-gemot ) अथवा नुसतें **विटेना** [ Witena ] असें नांव होतें. Witena ह्मणजे शहाण्या लोकांची, आणि **गेमॉट** ह्मणजे सभा असा या शद्बांचा अर्थ आहे.

**टीप नंबर ११. ट्वेल्व टेबल्स** [ Twelve tables ] ख्रिस्ती शतकापूर्वीं २००० वर्षे **रोमन** लोकांनीं दुसऱ्या देशांत कोणत्या प्रकारचे कायदे आहेत, हें पाहण्याकरितां आपले लोक पाठविले होते. त्यांनीं मिळवून आणलेल्या माहितीवरून रोमन लोकांनीं आपल्या देशाकरितां जे कायदे केले, त्यांना हें नांव आहे.

**टीप नंबर १२. ऑलफ्रेड दी ग्रेट** या नांवानें जो राजा इंग्लंडच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे, तोच हा **ऑलफ्रेड.** त्यानें ८७१ पासून ९०१ पर्यंत इंग्लंडचें राज्य केलें. आजपर्यंत जगांत जेवढे उत्तम राजे झाले त्यांपैकीं हा एक होता, अशी त्याची ख्याति आहे.

**टीप नंबर १३.** दुसऱ्या हेन्रीची कारकीर्द ११५४ पासून ११८९ पर्यंत ह्मणजे ३५ वर्षेपर्यंत होती.

**टीप नंबर १४. ब्रॅक्टन** हा एक चांगला ग्रंथकार होता असें दिसतें.

**टीप नंबर १५. पहिला चार्ल्स** हा राजा १६२५ पासून १६४९ पर्यंत इंग्लंडच्या गादीवर होता. **स्टुअर्ट** घराण्यांतील हा दुसरा राजा होय. हा आपला बाप **पहिला जेम्स** [ १६०३ ते

१६२५ ] याच्या गादीवर बसला. पार्लमेंट सभेची सत्ता झुगारून देऊन आपल्या एकट्याच्या इच्छेप्रमाणें राज्यकारभार चालावा, अशी याची फार इच्छा होती. ती इच्छा सफल करण्याकरितां बेकायदेशीर व अन्यायाचे अनेक मार्ग यानें स्वीकारले. शेवटीं पार्लमेंटाबरोबर याचें फार मोठें युद्ध झालें, त्याला इंग्रजींत **सिव्हिल वॉर** असें नांव आहे. त्या लढाईंत त्याचा पराजय झाला व त्याला पार्लमेंटाचा सेनानायक **क्रॉमवेल** यानें कैद केलें. शेवटीं १६४९ सालीं देशांतील कायद्यांचें उल्लंघन केल्याबद्दल न्यायासनासमोर त्याची चवकशी केली. न्यायाधीशांनीं त्याला दोषी ठरवून देहान्त शिक्षा दिली. त्याप्रमाणें १६४९ सालींच त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. सर्व सत्ता आपल्या हातांत घेण्याची याला फार हांव सुटली आणि त्यामुळेंच त्याचा नाश झाला. राजा हा देवाचा अंश आहे, हें मत तो आपल्या बापापासून शिकला होता आणि त्यामुळेंच त्याच्या हातून फार मोठ्या चुका झाल्या. याची कारकीर्द इंग्लिश इतिहासांत फार प्रसिद्ध आहे.

**टीप नंबर १६. चवथा एडवर्ड** इंग्लंडच्या गादीवर १४६१ पासून १४८३ पर्यंत होता.

**टीप नंबर १७. वुइलियम दी कांकररनें** इंग्लंडावर हल्ला केला, तेव्हां **हारोल्ड** नांवाचा राजा तेथें राज्य करीत होता. त्याची कारकीर्द १०६६ सालीं सुरू झाली होती. त्याच वर्षी **वुइलियम** बरोबर जी लढाई झाली, ( टीप नंबर ९ पहा ) तींत एक बाण हारोल्डच्या उजव्या डोळ्यांत शिरून, मेंदूपर्यंत जाऊन पोंचला. त्यामुळें तो तेथल्या तेथेंच मरण पावला.

**टीप नंबर १८. नॉर्मन** घराण्यांतील राजांनीं १०६६ पासून ११५४ वर्षापर्यंत ह्मणजे ८८ वर्षें पर्यंत राज्य केलें. त्या घराण्यांत एकंदर चार पुरुष झाले.

**टीप नंबर १९. डोम्सडे बुक** आपल्या कारकीर्दीच्या अखेरीला सर्व देशाची **वुइलियम दी कांकररनें** पाहणी करविली. ह्या संबंधाची माहिती ज्या पुस्तकांत दिली होती, त्याला **डोम्सडे बुक** असें नांव दिलें

होतें. [ अन्तकालच्या दिवसाला इंग्रजींत **डे ऑफ डूम** ( Day of doom ) असें ह्मणतात. ] आणि अशी पाहणी केल्यानें आपणा सर्वांचा अन्तकालाचा दिवस जवळ आला असें इंग्लिश लोकांना वाटलें, ह्मणून त्यांनीं त्या पुस्तकाला हें नांव दिलें.

**टीप नंबर २०.** इ० स० १६०३ पासून ह्मणजे पहिल्या **जेम्स**-च्या कारकीर्दीपासून तों इ० स० १७१४ पर्यंत ह्मणजे **ॲन** राणीच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत, इंग्लंडच्या गादीवर जे राजे बसले, ते सर्व **स्टुअर्ट** घराण्यांतील होते.

**टीप नंबर २१.** ' Civil war ' या शद्बांना योग्य असे प्रति-शद्ब पाहिजे आहेत. सदरहू शद्बांतील खरें रहस्य मराठी वाचकांच्या ध्यानांत यावें ह्मणून ' आपआपसांतील यादवी युद्ध ' हे शद्ब आह्मी वापरले आहेत. ते सर्वस्वी योग्य आहेत असें ह्मणण्याचा आमचा आग्रह नाहीं. प्रो. आपटे यांनीं आपल्या कोशांत सुचविलेला **प्रजा संक्षोभ** हा शद्ब आमच्या मतें चांगलासा नाहीं. मि. **बाळाजी हरी कुलकर्णी** यांनीं आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत ' द्विपक्षयुद्ध ' असे शद्ब घातले आहेत. ( ग्रंथमाला अंक ४८. इं० इतिहास पृष्ठ ३९० पहा ); परंतु त्यांचा अर्थ आमच्या नीटसा लक्षांत येत नाहीं.*

**टीप नंबर २२.** **विग्** व **टोरी,** व **लिबरल** आणि **कॉनसर व्हेटीव** यासंबंधानें, या शब्दांवर ' राजकीय दृष्टचा इतिहासाचें महत्व ' या निबंधांत आह्मीं दिलेली टीप पहा. [ ग्रंथमाला अंक ४४. ]

**टीप नंबर २३.** इ० स० १४८५ पासून ह्मणजे सातव्या **हेन्री**-पासून तों १६०३ पर्यंत ह्मणजे **इलिझाबेथ**च्या कारकीर्दीपर्यंत ट्यूडर घराण्यांतील राजे इंग्लंड देशावर राज्य करीत होते. या घराण्यांतील राजांचीं नांवें :—सातवा हेन्री, आठवा हेन्री, सहावा एड्वर्ड, मेरी आणि इलिझाबेथ.

---

* द्विपक्ष ह्मणजे दुफळी अथवा दुही. अशा स्थितींत झालेली आपसांतील दोन पक्षांची लढाई या अर्थाचा ' द्विपक्षयुद्ध ' हा समास बोधक होय. सदर ग्रंथकारांनीं ' यादवी ' हाही शब्द उपयोजिला आहे. ( त्यांच्या ग्रंथाचें पृष्ठ १३६ पहा. )

संपादक.

**टीप नंबर २४.** आठव्या **हेन्रीची** कारकीर्द १५०९ पासून १५४७ पर्यंत आणि **इलिजाबेथची** कारकीर्द १५५८ ते १६०३ पर्यंत.

**टीप नंबर २५.** [ अ ] **ग्लॅडस्टन्** यांचा जन्म १८०९ सालीं होऊन ते नुकतेंच ह्मणजे १८९८च्या मे महिन्यांत वारले, हें वाचकांच्या ध्यानांत असेलच. यांचीं चरित्रें लिहिण्याचें काम दोन तीन मासिक पुस्तकांत सुरू आहे. तीं मासिकपुस्तकें वाचकांनीं पहावीं.

( ब ) **लॉर्ड बीकन्स फील्ड**–**ग्लॅडस्टन** जसे लिबरल पक्षाचे अग्रणी तसे हे गृहस्थ **कान्सरव्हेटीव** पक्षाचे अग्रणी होत. लॉर्डची पदवी मिळण्यापूर्वी हे **डिझरायली** या नांवानें प्रसिद्ध होते. हे दोन वेळां इंग्लंड देशाचे मुख्य प्रधान होते. यांच्याच कारकीर्दींत **लॉर्ड लिटन** हे हिंदुस्थानचे मुख्य प्रधान होते.

( क ) **माल्टा** हें एक भूमध्य समुद्रांत **सिसिलीच्या** दक्षिणेस बेट आहे. येथें इंग्लिश लोकांचा फार बळकट असा एक किल्ला आहे.

**टीप नंबर २६.** पहिल्या जेम्सच्या कारकीर्दींत प्रजेच्या वतीनें भांडणारे जे मुख्य लोक होते, त्यापैकीं **जॉन् सेल्डन्** हा एक होता. इ० सन १६२१ सालीं **जेम्सनें** त्याला व त्याच्या इतर साहाय्यकारी लोकांनां कैदेंत टाकलें होतें. त्या साहाय्यकारी लोकांत **सर एडवर्ड कोक** हाही एक गृहस्थ होता.

**टीप नंबर २७. पिटिशन ऑफ् राईटस्** ही सनद इंग्लिश लोकांना पहिल्या **चार्लसच्या** कारकीर्दींत सन १६२८ सालीं मिळाली. लोकांचे हक्क ( राइट्स ) काय आहेत, ते या कागदांत नमुद केले होते ह्मणून त्याला हें नांव प्राप्त झालें. ' पिटिशन ' या शब्दाचा अर्थ अर्ज असा आहे. पुढें १६८९ सालीं ' **डेक्लेरेशन ऑफ् राइटस** ' या नांवाचा एक कागद याच धोरणावर पार्लमेंटानें तयार केला, व त्याच्यावरूनच पुढें त्याच वर्षी **बिल् ऑफ् राइटस** नांवाचा कागद तयार झाला. हे तीनही कागद करण्याचा हेतु असा होता कीं, राजानें प्रजेच्या हक्कांची पायमल्ली करूं नये, ह्मणून ते हक्क कोणकोणचे आहेत हें त्याला समजून द्यावें.

**टीप नंबर २८. शिप्मनी** हा कर १६३४ सालीं पहिल्या **चार्ल्सनें** बसविला होता. प्राचीन काळीं लढाई चालू झाली असतां, समुद्र किनाऱ्यावरील शहरांतील लोकांवर हा कर बसविण्याचा राजाला अधिकार होता. या करापासून उत्पन्न झालेल्या पैशा ( मनी ) चा विनियोग देशाच्या रक्षणार्थ जहाजें ( शिप् ) बांधण्यांत होत होता. १६३४ सालापूर्वी सुमारें शंभर वर्षें हा कर कोणच्याही राजानें बसविला नव्हता, तो **चार्ल्सनें** बसविला, यामुळें सर्व लोक बिथरून गेले.

**टीप नंबर २९. प्युरिटन** पक्षाच्या लोकांनीं राजाच्या या वर्तनाबद्दल बराच गिल्ला केला. **शिप्मनीच्या** रूपानें वसूल झालेल्या पैशांतून राजा आपल्यापाशीं मोठें सैन्य बाळगील व त्यायोगानें प्रजेवर जास्त जुलूम होईल अशी त्यांना भीति पडली, व त्यामुळें राजाचें हें कृत्य मान्य करावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें १६३७ सालीं **जॉन हँपडेन** नांवाच्या गृहस्थानें तो कर देण्याचें नाकारलें. त्याबरोबर राजाच्या हुकूमानें त्याच्यावर न्यायासनासमोर खटला सुरू केला. न्यायाधीशांनीं राजाची मर्जी संपादन करण्याकरतां हँपडनविरुद्ध निकाल दिला. परंतु लोकांनीं त्याचाच पक्ष स्वीकारला; यामुळें राजा व प्रजा यांमधील वितुष्ट दिवसानुदिवस जास्त बळावत चाललें.

**टीप नंबर ३०.** पहिल्या **चार्ल्सनें** १६४० सालीं पांचव्या खेपेला जें पार्लमेंट बोलाविलें. त्याला **लाँग** ह्मणजे फार दिवस टिकलेलें **पार्लमेंट** अशी संज्ञा आहे. कारण तें पार्लमेंट एकंदर वीस वर्षें अस्तित्वांत होतें.

**टीप नंबर ३१. ग्रँड रिमान्स्ट्रन्स** याचा शब्दार्थ ' फार महत्वाची कानउघाडणी ' असा आहे. हा कागद १६४१ सालीं तयार झाला होता व त्यांत **चार्ल्स** राजानें व त्याच्या मंत्र्यांनीं अगदीं आरंभापासून काय काय बेकायदेशीर कामें केलीं होतीं, त्यांची पद्धतवार माहिती

दिली होती. तो कागद राजाकडे सादर केला होता, व त्याच्या छापील प्रती सर्व देशभर वांटल्या होत्या.

**टीप नंबर ३२. बुइलियम** ( तिसरा ) आणि त्याची राणी **मेरी** या उभयतांची कारकीर्द १६८९ ने १६९४ पर्यंत होती व पुढें मेरीच्या मरणानंतर एकट्या बुइलियमचीच १६९४ पासून १७०२ पर्यंत होती.

बुइलियमच्या पूर्वी **दुसरा जेम्स** इंग्लंडच्या गादीवर होता. त्यानें १६८५ पासून १६८८ पर्यंत राज्य केलें.

**टीप नंबर ३३.** दुसरा जेम्स राजा पळून गेल्यानंतर **बिल ऑफ राइट्सच्या** आधारानें पार्लमेंटसभेनें बुइलियमला आणि मेरीला गादीवर बसविलें. या गोष्टीला इंग्रजींत **रेव्होल्यूशन** ह्मणजे राज्यक्रांति अशी संज्ञा आहे.

**टीप नंबर ३४.** सोळाव्या शतकाच्या मध्याला इंग्लंडांत **प्रॉटेस्टंट** धर्माचें माहात्म्य वाढून **पोपची** सत्ता नाहींशी झाली—ही जी धर्मसुधारणा झाली तिला **रेफरमेशन** अशी इंग्रजींत संज्ञा आहे. ' रेफरमेशन ' या शब्दाचा अर्थ सुधारणा असाच आहे.

**टीप नंबर ३५.** क्याबिनेट ह्मणजे काय हें समजून घेण्याकरतां वाचकांनीं ' इंग्लंडांतील प्रधानमंडळ ' भाग दुसरा पहावा.

या पुढचा कांहीं मजकूर गाळला आहे. तो मजकूर विशेष महत्वाचा नाहीं व त्याच्या स्पष्टीकरणार्थ टीपा फार द्याव्या लागतील, ह्मणून ही व्यवस्था केली आहे.

**टीप नंबर ३६.** दुसरा **जेम्स** पळून गेल्यानंतर **बुइलियमनें** जें पार्लमेंट बोलाविलें ( १६८८ ) त्याला हें नांव आहे. ज्याला राज्याभिषेक पुढें व्हावयाचा आहे, अशा राजानें बोलाविलेल्या पार्लमेंटाला **कॉनव्हेन्शन** पार्लमेंट असें ह्मणतात.

**टीप नंबर ३७.** या ग्रंथाचें नांव The History of English thought in the eighteenth century असें आहे.

# ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापलेलें प्रकरण.

# दोनशें वर्षांपूर्वीं पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या एका प्रवाशाचें हिंदुस्थानांतलि प्रवासवृत्त.

यादव शंकर वावीकर

यांनीं लिहिलें.

तें,

विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए.

ग्रंथमाला संपादक यांनीं

कोल्हापूर येथें 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिलें.

किंमत ८६ आणे.

६

१२५१

# * दोनशें वर्षांपूर्वी पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या एका प्रवाशाचें हिंदुस्थानांतील प्रवासवृत्त.

प्रवासाचें महत्व फार मोठें आहे. पाठशाळेंतून किंवा पुस्तकांतून मनुष्य जें ज्ञान मिळवितो, त्याचा उपयोग व्यवहारांत चांगल्या रीतीनें करितां येण्यास प्रवासाची फार अवश्यकता असते. पाठशाळेंतील पदव्या मिळवून किंवा पुस्तकांचे भारेच्या भारे वाचून मनुष्य ज्ञानसंपन्न होतो असें नाहीं; तर त्या ज्ञानाची परिसमाप्ति प्रवासांत झाली नाहीं तर मनुष्यास जी एक व्यावहारिक दृष्टि लागत असते, ती पुस्तकी ज्ञानानें क्वचित्च येते. अध्ययनक्रम आटोपल्यावर कांहीं देशाटण (तीर्थाटण) करून नंतर व्यवहारास लागावयाचें, ही चाल प्राचीनकाळीं आमच्यांत होती. पाश्चात्य लोकांतही हीच चाल अद्याप चालू असून तिचें महत्व ते पूर्ण जाणून आहेत.

प्रवासापासून अनेक फायदे होतात. प्रवासांत अनेक प्रदेश, अनेक तऱ्हेचे लोक, त्यांच्या विलक्षण चालीरीति, त्यांचे विलक्षण पोषाख, त्यांच्या धर्मसमजुती व त्यांचे आचारविचार, तसेंच निरनिराळीं शहरें, नद्या, सरोवरें, रमणीय स्थळें, हृदयंगम देखावे व अपार सृष्टिसौंदर्य इत्यादि अनेक गोष्टी अवलोकनांत आल्यामुळें ऐहिक दुःखांचा व विवंचनांचा विसर पडून मन अगदीं तल्लीन होऊन जातें, आणि त्यास एके प्रकारचा आनंद होतो. हा तर फायदा झालाच; परंतु याशिवाय अत्यंत महत्वाचा फायदा ह्मटला ह्मणजे मनुष्याची आकुंचित असलेली

---

* Churchil's Voyages and Travels. Vol. IV. The Globe trotter in India two hundred years ago by Professor M. Mac Millan. आणि भारतीय साम्राज्य पुस्तक ६ वें या ग्रंथाधारें प्रस्तुत लेख लिहिला आहे.

ग्रंथकर्ता.

ज्ञानदृष्टि विशाळ होते, त्याचा अनुभव वाढतो, भिन्न स्थळें व विविध लोक पाहिल्यामुळें खरें काय, खोटें काय, चांगलें काय, वाईट काय, यांविषयीं विचार करण्याची त्याला संवय लागते. त्याचे विचार प्रगल्भ होतात. त्याच्या अंगीं व्यवहारचातुर्य येतें. त्याच्या मतास लोक विशेष मान देतात. सारांश, प्रवासाचा फायदा त्यासच होतो असें नाहीं, तर पर्यायेंकरून त्याच्या देशबांधवांस व धर्मबांधवांसही त्याच्या प्रवासाचा पुष्कळ फायदा होतो.

प्रवासापासून जसे अनेक फायदे आहेत ह्मणून वर सांगितलें, तसेच किंवा त्यापेक्षां कांहीं अंशानें कमी असे अनेक फायदे प्रवासग्रंथवाचनापासून होतात. भाषेंत प्रवासग्रंथ तयार होण्यास लोकांस प्रथम प्रवासाची अभिरुचि उत्पन्न झाली पाहिजे. व ही प्रवासाची अभिरुचि उत्पन्न होण्यास त्या लोकांच्या मनावर परदेशगमनाचें, व्यापाराचें व इतर अनेक गोष्टींचें महत्व पूर्ण बिंबून प्रवासास लागणारें साहस व जोम हे त्यांच्यांत उत्पन्न झाले पाहिजेत. डच, पोर्तुगीज, स्प्यानिश व इंग्लिश इत्यादि अनेक युरोपियन राष्ट्रांत प्रवासाची अभिरुचि फार प्राचीन काळापासून दिसून येते. निरनिराळ्या प्रदेशीं जाऊन तेथें व्यापार करून द्रव्यसंचय करण्याविषयीं आणि हळूहळू तेथें आपली सत्ता प्रस्थापित करण्याविषयीं या राष्ट्रांची कित्येक शतकांपासून जी स्पर्धा लागली होती, तिची साक्ष इतिहासावरून सहज पटत आहे. आज ह्या राष्ट्रांचीं पृथ्वीच्या पाठीवर जीं अनेक ठिकाणीं राज्यें आहेत, आणि त्यामुळें त्यांच्या इतिहासास व वैभवास जें प्रगल्भ स्वरूप प्राप्त झालें आहे, याचें मूळ कारण ह्मटलें ह्मणजे त्यांची प्रवासाची अभिरुचि हें होय! आणि याच त्यांच्या प्रवासाच्या अभिरुचीमुळें हल्लींही सुधारणेच्या बाबतींत त्यांचें पाऊल पुढें पडत आहे!

फार लांब कशाला? इंग्लिश लोकांकडे पहा. त्यांचें राज्य पृथ्वीच्या पाठीवर अनेक ठिकाणीं आहे. चारी खंडांत हे लोक पसरले असून यांची गृहस्थितिही त्याप्रमाणें बनली आहे. आईबाप एका देशांत तर

मुलगे दुसऱ्या देशांत व मुली तिसऱ्या देशांत; त्यांचा जमीनजुमला व व्यापार जगाच्या एका भागांत, तर त्यांचें घरदार दुसऱ्या भागांत आणि नातलग तिसऱ्या भागांत, याप्रमाणें जगाच्या कोणत्याही भागांत जाऊन रहाण्याचें त्यांना कांहींच वाटत नाहीं. याचें कारण काय, तर त्यांची प्रवासाची अभिरुचि हें होय!

आमच्या लोकांस प्रवासाची अभिरुचि नसल्यामुळें आमचे जे अनेक तोटे झाले आहेत, ते येथें सर्व सांगणें अप्रासंगिक होणार आहे. जे लोक प्रवास करून परदेशीं जाऊन येतात, त्यांना लोक जातिबहिष्कृत करतात. हिंदुस्थानांतच प्रवास करण्याची काय ती मुभा. अटकेपर्यंतच आमच्या प्रवासाची हद्द. ती ओलांडून पलीकडे जातां कामा नये. असा अत्यंत घातुक समज होऊन त्यास रूढीचें स्वरूप मिळाल्यामुळें देशाच्या बाहेर प्रवास करण्यास कोणीही फारसें धजत नाहीं. यदा-कदाचित् कोणी धजलाच तर त्यास इष्टमित्र, नातलग वगैरे सर्व समाजास मुकावें लागतें. यामुळें आमची स्थिति कूपमंडूकाप्रमाणें झाली आहे! हा आमचा समज अत्यंत घातुक आहे. इतकेंच नाहीं, तर यास शास्त्राधारही मुळींच नाहीं. रूढिदेवीचें स्तोम विशेष माजल्यामुळें आह्मी अगदीं अंध बनलों असून आह्मांस आमच्या प्राचीन इतिहासाची विस्मृति पडली आहे.

प्राचीनकाळीं आह्मीं हिंदुस्थान देश वसविला इतकेंच नाहीं, तर आपल्या अतुल बाहुबलानें पश्चिम, दक्षिण व पूर्व समुद्रांत साम्राज्य स्थापन केलें. पूर्वेस सुमात्रा, जाव्हा, बोर्नियो, काम्बोडिया, सयाम व फिलिपाईन बेटें इत्यादि देशांत हिंदुलोकांची वस्ती होती असें प्रमाणसिद्ध आहे. सिलोनांत बौद्ध धर्माचा प्रसार होण्यापूर्वी तो देश हिंदुराजांनीं जिंकिला होता. आफ्रिका खंडाच्या पूर्वकिनाऱ्याशी हिंदूंचें विशेष दळण-वळण असून तो भाग ' झिंद ' या नांवानें प्रसिद्ध होता. त्याचाच अपभ्रंश पुढें ' झांझिबार ' असा झाला. जावा व जमेका बेटांत हिंदु तऱ्हेच्या जुन्या इमारती, जीर्ण झालेलीं देवालयें व शिलालेख असून

आहेत. तेथें शैव व वैष्णव लोक असून संस्कृत भाषेचा पुष्कळ प्रसार होता असें समजतें. या बेटांत पूर्वी हिंदुधर्म असून नंतर बौद्ध धर्माचा प्रसार झाला. मलाया व सुमात्रा या प्रांतीं प्राचीनकाळीं हिंदूंचा मोठा व्यापार असून तेथें त्यांच्या वसाहती होत्या. इराणी आखात, मस्कत व तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर कित्येक शतकांपासून हिंदु लोकांची वस्ती आहे.

कार्थेज देशांत हिंदु शिपाई गेले असून, ते तिकडील सुप्रसिद्ध सेनापति हॅस्ट्रुबाल व हानिबाल यांच्या लष्करांत होते. शिकंदर बादशहा स्वारी करून हिंदुस्थानांतून परत गेला, त्यावेळीं त्यानें पुष्कळ हिंदुलोक बरोबर नेले होते. पौरवस व दक्षिणेकडील पांड्यराजा यांचे वकील आगष्टस बादशहाच्या दरबारीं होते. हिंदुस्थानाचा प्राचीन काळापासून मिसर देशाशीं मोठा व्यापार असून, तेथें पुष्कळ हिंदु लोक जाऊन राहिले होते. सोकोत्रा बेटांत पूर्वी हिंदूंचीच वस्ती असून, त्याचें प्राचीन नांव 'सुखतर' अस होतें.*

यावरून हें उघड आहे कीं, प्राचीन काळीं हिंदु लोकांची वस्ती अनेक देशांत असे. देशपर्यटण शास्त्रसंमत आहे, असेंही अनेक प्रमाणांवरून सिद्ध करून देतां येण्याजोगें आहे. जे धर्माचे चालक आहेत किंवा समाजहिताबद्दल ज्यांना कळकळ आहे, त्यांनीं या गोष्टीचा अवश्य विचार करून देशपर्यटणाच्या बाबतींत ज्या अडचणी असतील, त्या काढून टाकण्याचा लवकर प्रयत्न करावा, अशी त्यांना विनंति आहे.

## डॉ० जॉन फ्रान्सिस गेमिली क्यारेरी.

इंग्लिश लोकांची सत्ता ह्या देशांत प्रस्थापित होण्यापूर्वी जे युरोपियन प्रवासी या देशांत येऊन गेले, त्यांपैकींच डा० जॉन फ्रान्सिस गेमिली क्यारेरी हा एक प्रवासी होता. हा इतालियन गृहस्थ असून याचा

---

* याहीपेक्षां जास्त माहिती कोणास पहाणें असल्यास 'भारतीय साम्राज्य' पुस्तक ६ वें भाग ३६ पहावा.

जन्म नेपल्स शहरीं इ. स. १६५१ सालीं झाला. तो दिवाणी कायद्यांत श्रेष्ठ पदवीचा मनुष्य ( डाक्टर ) असून त्याची समाजांत फार मानमान्यता असे. परंतु कांहीं खाजगी बाबतीस त्रासून त्यानें लांबचा प्रवास करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें तो पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास निघाला. त्याला स्वभावतःच प्रवासाची विशेष आवड असे. या प्रवासास निघण्यापूर्वी तो इ. स. १६८३ ह्या वर्षी सर्व युरोपखंडभर फिरून आला होता. त्यानें जें आपलें प्रवासवृत्त लिहून ठेविलें आहे, त्यावरून दिसून येतें कीं, या प्रवासांत त्यानें आपल्या आयुष्याचीं पांच वर्षें, पांच महिने व वीस दिवस घालविलीं. प्रवासास निघाल्यापासून तों प्रवास संपेपर्यंत त्यानें आपल्या प्रवासाची सर्व हकीकत फार काळजीपूर्वक व विशेष परिश्रम घेऊन लिहून ठेविली आहे. तो ग्रंथ फारच मोठा असून त्याचा विस्तार अर्ध्या फुलस्केप कागदाचीं छापील ८०० पानें येवढा प्रचंड आहे.

यानें आपल्या प्रवासवृत्तांत जशी उपयुक्त व विविध माहिती लिहून ठेविली आहे, तशी पूर्वीं कोणीही लिहून ठेविलेली दिसत नाहीं. कल्पित व असंभवनीय गोष्टी लिहून ठेवण्यांतच पूर्वींच्या प्रवाशांस मोठें महत्व व कौतुक वाटत असे. त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत देशांचीं व शहरांचीं वर्णनें, येथील इतिहास, हवामान, उत्पन्नें, राजकीय पद्धति, लोकांचे आचारविचार, त्यांच्या धर्मकल्पना, त्यांचे पोषाख, अलंकार, देवळें, मशिदी इत्यादि अनेक प्रकारची जेवढी ह्मणून उपयुक्त माहिती त्यास मिळाली, तेवढी सर्व आपल्या ग्रंथांत लिहून ठेविली आहे. त्याची बुद्धि विशाळ असून त्याची विद्वत्ताही मोठी होती, त्यामुळें त्याची अवलोकनशक्ति इतरांपेक्षां विशेष होती. पैसा मिळविण्याकरितां किंवा धर्मप्रसार करण्याकरितां त्यानें हा प्रवास केला नसून त्याचा मुख्य उद्देश ज्ञानसंपादन करण्याचा होता व त्याच उद्देशानें तो ता० १३ जून १६९३ रोजीं प्रवासास निघाला. तो ह्मणतो कीं, प्रवासांत बरोबर नुसते पैसे किंवा हुंड्या घेऊन फारसा उपयोग नाहीं, तर प्रवाशानें

विक्रीकरितां बरोबर कांहीं माल घेतल्यास तें विशेष फायदेशीर पडतें. व्हेनीस येथील कांचेचे मणी पौरस्त्य लोकांस फारच आवडत असून त्यांचा ते अलंकाराप्रमाणें उपयोग करितात. थोडक्या पैशांत पुष्कळ नफा मिळवावयाचा असल्यास माल्टा येथें सेंट पालनें जेथें सर्व सर्प जमवून भस्म केले असें ह्मणतात, तेथील पाषाणवत् झालेल्या सर्पांच्या जिव्हा व डोळे यांना इराण, हिंदुस्थान व चीन या देशांत चांगली किंमत येते. कारण यांचा गंडा जवळ असला ह्मणजे सर्पदंशापासून अपाय होत नाहीं. पाचास चांगली मागणी असते. स्वस्त घड्याळेंही बरींच खपतात. शिवाय प्रवाशानें औषधांची चांगली माहिती करून घेऊन बरोबर पुष्कळ औषधें घ्यावीं ह्मणजे त्याचा चोहोंकडे विशेष मानपान होतो व लोकही त्याच्याकडे येतात. आणि मग अनायासेंच त्यांच्यासंबंधीं माहिती मिळविण्यास किंवा त्यांचें हृद्गत काढून घेण्यास प्रवाशास उत्तम संधि मिळते.

त्याचें प्रवासवृत्त फार मोठें आहे. त्या सर्वांशीं आपणांस कांहींच कर्तव्य नसून हिंदुस्थानाविषयीं त्यानें आपल्या ग्रंथांत जें कांहीं लिहून ठेविलें आहे, तेवढेंच येथें नमूद करण्याचा विचार आहे. नेपल्सहून निघाल्यावर तो कालाब्रिया येथें गेला. सिसिली व माल्टा हीं बेटें पाहून तो ईजिप्तकडे वळला. ईजिप्त येथील सुधारणेविषयीं व तेथील भव्य व सुंदर इमारतीविषयीं फार प्राचीन काळापासून ख्याति असल्यामुळें गेमिली यानें त्या प्रदेशांत पुष्कळ प्रवास केला. तेथील मनोरे स्वतः पाहून त्याविषयीं त्यानें पुष्कळ माहिती लिहून ठेविली आहे. आलेक्झांड्रिया येथें तो मशिद पहावयास गेला असतांना त्यावर कांहीं आरब तुटून पडले. तेव्हां त्यास जीव घेऊन तेथून पळ काढावा लागला. जगद्विख्यात नाईल नदीच्या कांठचा सुपीक प्रदेश पहात पहात तो तिच्या उगमाकडे गेला होता.

ईजिप्तचा प्रवास संपविल्यावर तो पालेस्ताईन येथें गेला. या देशांत ख्रिस्ताचा जन्म झाल्यामुळें त्या भूमीस ख्रिस्ती लोक विशेष पवित्र

समजतात व येथील यात्रा करण्यांत महत् पुण्य मानतात. पालेस्ताईन प्रांतांतील प्रवास संपवून तो आसिरिया प्रांतांत गेला. तेथील इतिहास-प्रसिद्ध शहरें त्यानें पाहिलीं. नंतर ऱ्होडस, स्मरना, व दुसरीं कांहीं बेटें पाहून कान्स्टांटीनोपल, आड्रीयानोपल, बर्का वगैरे शहरें पाहून अजमासें दहा महिने प्रवास केल्यावर तो त्रेबिझांड बंदरीं येऊन उतरला. त्रेबिझांड येथून निघून एशियामायनर, पर्शिया, या देशांतील एर्झेरोम, कार्स, एरिव्हान, इस्पाहान, शिराझ इत्यादि नामांकित व प्रसिद्ध शहरें पाहून १७६ दिवसांचा खुष्कीचा कष्टमय प्रवास करून इराणी आखातांतील बंदर आबास येथें येऊन पोहोंचला. एशियांतील तुर्कस्थानांतून प्रवास करीत असतांना त्याला फारच त्रास व दगदग सोसावी लागली. वाटेंत कित्येक ठिकाणीं त्याला विनाकारण अडकून ठेवण्यांत आलें असून कित्येक ठिकाणीं लांच देऊन सुटका करून घेणें त्याला भाग पडलें. हा प्रवास केव्हां संपेल असें त्यास झालें होतें.

## इराणांतील प्रवास.

तुर्कस्थानच्या सरहद्दीवरील नदी ओलांडून इराणच्या जमिनीवर पाय ठेवतांच तो घोड्यावरून उतरला व आतां आपण दगदगींतून सुटलों, असें ह्मणून त्यानें इराणच्या भूमीचें चुंबन घेतलें! तुर्क लोकांपेक्षां इराणी लोकांत प्रवाशाविषयीं आदरबुद्धि विशेष असल्याचें त्याला आढळून आलें. कारवान लोकांस उतरण्याकरितां तेथें ठिकठिकाणीं भव्य धर्मशाळा असून त्यांची बांधणी फार सुरेख होती. परंतु प्रवाशांचीं तट्टें वेठीस धरणें व त्यांच्याकडून पैसे लुबाडणें यांत हे लोक बरेच प्रवीण दिसून आले. वाटेंत त्याला अनेक ठिकाणीं दरोडेखोरांच्या टोळ्या भेटल्या; परंतु त्यांनीं त्याला लुबाडलें नाहीं. एर्झेरोम येथें बंदुकीवर जकात देण्यासंबंधानें थोडासा मतभेद पडल्यामुळें एक तुर्क मनुष्य मोठा सुरा घेऊन गेमिली याच्या अंगावर धांवला. तेव्हां प्रेस्कॉट नामक तेथील एका इंग्लिश व्यापाऱ्यानें जर त्या वेळीं त्या तुर्क मनुष्यास धरला असता, तर खरोखर गेमिली हा क्वचित्च वांचला

असता! त्याच्या प्राणावर येऊन ठेपलेला प्रसंग काय तो येवढाच. याशिवाय कोठेंच त्यावर असला प्रसंग गुदरला नाहीं.

या सतराव्या शतकांत युरोपांतील पुष्कळ व्यापारी लोक धनसंचयार्थ बाहेर प्रदेशीं गेले होते. तसेंच पुष्कळ रोमन क्याथेलिक मिशनरी शुभवर्तमानाचा प्रसार करण्याकरितां अनेक देशीं जाऊन राहिले होते. फादर डेलम्याशियस व फादर व्हिलॉट हे मिशनरी आर्मेनियांत त्याला भेटले. इस्पाहान येथें जेम्स नार्थ क्यामर नामक एका डच कंपनीच्या प्रतिनिधीच्या घरीं तो उतरला होता. त्या गृहस्थाचें मौल्यवान् सामान, त्याचे सोन्याचे हुक्के, घोडे व इतर जनावरांच्या पागा, पक्षी, संग्रहालयें, क्रीडाभूमि, बागबगिचे, नौकरचाकर पाहून साहसी लोक कसें वैभव पावतात याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण दिसलें.

इराणामध्यें मुसलमानांनीं पारशी लोकांचा जो भयंकर धर्मछल चालविला होता, त्यास कंटाळून स्वधर्मरक्षणार्थ पारशी लोकांनीं देशत्याग केला व हिंदुस्थानांत येऊन आपला तळ दिला. परंतु धर्मछळास न जुमानतां कित्येक पारशी लोक तेथेंच राहिले व त्या लोकांविषयीं गेमिली यानें जें लिहिलें आहे, तें येथें नमूद करणें अवश्य आहे. तो ह्मणतो— "गलिच्छ व अमंगळ प्राण्यांस मारण्यास हे लोक सांगतात. यांच्यांत एक दिवस असा नेमलेला आहे कीं, त्या दिवशीं स्त्रीपुरुष वगैरे सर्व लोक जंगलांतील बेडूक मारण्यास जातात. वर्षांतून पांच दिवस मांस, मासे, लोणी, अंडीं इत्यादि पदार्थ खात नाहींत; आणि तीन दिवस संध्याकाळपर्यंत उपोषण करितात. कोणी मेला ह्मणजे डोंगरावरील विहिरीकडे त्यास नेतात. तीन साडेतीन हात उंचीचे असे तेथें पुष्कळ खांब असतात. त्यां पैकीं एका खांबास शव उभें बांधून त्यास भक्षण करण्याकरितां कावळे येईपर्यंत प्रार्थना करितात. उजव्या डोळ्यापासून खाण्यास सुरवात झाली असली तर तें सुचिन्ह असें मानून प्रेत पुरतात व डाव्या डोळ्यापासून झाली असल्यास अशुभ समजून प्रेत तसेंच ठेवितात.

## इराणी आखात व हिंदीमहासागर यांमधील प्रवास.

बंदर कांगो हें इराणी आखातांत असून येथें पोर्तुगीज लोकांचा अंमल असे. इराणच्या शहाकडून पोर्तुगीज लोकांस येथें पुष्कळ सवलती असत. ती संधि दिपवाळीची असल्यामुळें तेथें असलेल्या हिंदु व्यापाऱ्यांनीं घरें सुशोभित केलीं असून पुष्कळ दिवे लाविले होते. त्या व्यापाऱ्यांनीं त्यास गादीवर मुख्य स्थानीं बसवून त्याचा बहुमान केला व पानसुपारी, अत्तर, मिठाई वगैरे त्यास दिली. त्या प्रसंगीं पहिल्यानेंच हिंदी कलावंतिणीचा नाच त्याच्या पहाण्यांत आला. या नाचाचें त्यानें पूर्ण वर्णन दिलें असून त्यापासून आपणास आनंद वाटला असें तो लिहितो. इराणच्या किनाऱ्यावर असलेल्या भवानीच्या देवालयाची व गांवांतून हिंदु लोक या देवीस भाताचा नैवेद्य नेत असत त्याची हकीकत लिहून ठेविली आहे. तेथें मोत्यांचा मोठा व्यापार असल्यामुळें व्यापाऱ्यांस पुष्कळ किफायत होते. सुरत बंदराशीं येथून मोत्यांचा वगैरे पुष्कळ व्यापार चालतो असें लिहिलें आहे. याचे मित्र फादर फ्रचान्सिस व फादर कॉंस्टनटाईन यांनीं सुरतेस जाणाऱ्या एका इंग्लिश गलबताचें तिकिट घेतलें. गेमिली यास बरोबर येण्यास त्यांनीं पुष्कळ आग्रह केला. परंतु व्यर्थ! येथून हा गृहस्थ घोडे घेऊन जात असलेल्या मूर लोकांच्या एका गलबतावर बसून हिंदुस्थानांत जाण्यास निघाला. या गलबतावर करमणूक होऊन मूर लोकांपासून पुष्कळ उपयुक्त माहिती मिळेल अशी त्यास आशा होती. या प्रवासांत त्याला नोर जरी थोडा पडला तरी त्याचे फार हाल झाले. आपणास या गलबतावर येण्याची कोठून कुबुद्धि झाली, असा त्यास पुढें पश्चात्ताप झाला. या गलबतावरील खलाशांविषयीं त्यानें पुष्कळ गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांचें अज्ञान, त्यांचीं व्यसनें, व त्यांचे दुर्गुण पाहून त्यास अगदीं कंटाळा आला. वाटेंत खाण्यापिण्याचे त्याचे पुष्कळ हाल झाले. एक महिना व सात दिवस या प्रवासांत घालवून सुमारें १२०० मैलांचा प्रवास केल्यावर ता. ८ जानेवारी १८९९ रोजीं ही स्वारी गुजराथेंतील मांगरोळ येथें उतरली.

## पोर्तुगीज प्रांतीं आगमन.

हिंदुस्थानच्या जमिनीवर पाय ठेवतांच त्याला परमानंद झाला. तो ह्मणतो–' पुष्कळ दिवस प्रवास केल्यावर दमून भागून प्रवासी घरीं आल्यावर व इष्टमित्र भेटल्यावर त्यास जो आनंद होतो, त्यापेक्षां पुष्कळ दिवसांचा कष्टमय प्रवास करून मी आज हिंदुस्थानांत आलों, याबद्दल मला जास्त आनंद वाटत आहे. या सुवर्णभूमींत जे अनेक उत्तमोत्तम पदार्थ उत्पन्न होत आहेत, त्यांचीं नांवें ऐकून जो आनंद होतो त्यापेक्षां अधिक आनंद मला होत आहे. कारण, मी आतां ते सर्व पदार्थ स्वतः दृष्टीनें पहाणार आणि खऱ्याखोट्याविषयीं स्वतः निर्णय करणार!'

मांगरोळहून तो दमण येथें गेला. त्या गांवांतील रस्ते नीट व घरें सुरेख पाहून तो गांव इटॅलियन पद्धतीप्रमाणें बांधलेला त्यास आढळला. घरें कौलारू असून प्रत्येक घरासभोंवतीं लहानसा बाग होता. गांवांत हिंदुमुसलमान लोकांची वस्ती असून पोर्तुगीज लोकांची वस्ती गांवाच्या बाजूस होती. पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत हें शहर आल्यापासून पुष्कळ पोर्तुगीज येथें स्थायिक झाले. कित्येकांनीं एतद्देशीय स्त्रियांशीं लग्नें लाविलीं. जेसुइस्ट रेकोलेट्स व आगस्टिनीयन्स या ख्रिस्ती पंथांचीं देवळें असून प्रत्येक पंथाचे पुष्कळ पाद्री असत. इ० स० १५३५ सालीं मार्टीन आलफान्सो डिसोझा यानें प्रथम हें शहर मोंगलांपासून काबीज केलें. चिसोटा आचिसिनो यानें पोर्तुगाल राजाच्या विरुद्ध बंड उभारून हें शहर हस्तगत केलें. परंतु डान कानस्टनटाइन नामक पोर्तुगीज मुख्य गव्हरनरानें तें पुनः परत मिळविलें. औरंगझेब बादशहानें ८०००० लोकांनिशीं या शहरास वेढा दिला. परंतु पोर्तुगीज लोक त्यावेळीं फार निकरानें लढले व त्यांनीं शहाच्या अर्ध्या सैन्याचा फडशा उडविला. तेथें टिकाव लागत नाहीं असें पाहून वेढा उठवून शहा दुसरीकडे चालता झाला.

दमण येथील पोर्तुगीज लोकांचें वैभव व त्यांचा थाटमाट पाहून तो अगदीं आश्चर्यचकित झाला. प्रत्येकाकडे पुष्कळ चाकरमाणसें असून

त्यांचे कपडेलत्ते व सामानसुमान फारच मौल्यवान असे. पाद्री लोकसुद्धां पालख्यांतून फिरत असत. त्यांना शिकारीचा नाद असून लांडगे, अस्वलें, कोल्हे वगैरे हिंस्र श्वापदांची ते शिकार करीत. वाघ मारण्याच्या यांच्या दोन रीति असत; ( १ ) वाघ जेथें पाणी पिण्यास येत असेल अशा नदीच्या किंवा तळ्याच्या कांठीं खळग्यांत दबा धरून बसून ते त्यास मारीत. अथवा ( २ ) बंदूक वगैरे तयार करून घेऊन बैलाच्या गाडींतून शिकारीच्या जागेकडे हळूच जाऊन त्या श्वापदाच्या कपाळाला गोळी मारून त्याचा प्राण घेत असत.

दमणहून तो सुरतेस गेला. सुरत यावेळीं मोठें भरभराटीचें शहर असून तें व्यापाराचें मुख्य स्थळ होतें. अनेक देशांचे व्यापारी तेथें असून इंग्लिश, फ्रेंच, पोर्तुगीज, डच वगैरे लोकांच्या मोठमोठ्या वखारी असल्यामुळें हिंदी उपसागरामधून येणाजाणारीं सर्व तारवें या बंदरीं लागत असत. येथील रस्ते अरुंद व घरें मातीचीं होतीं. गेमिलीचा मुक्काम या शहरीं थोडे दिवस असल्यामुळें यानें येथील विशेषशी माहिती दिली नाहीं.

अमदाबाद, खंबायत, भडोच हीं त्याकाळीं गुजराथेंतील बरींच भरभराटीचीं शहरें असून तेथेंही तो गेला होता. या शहरांविषयीं संक्षिप्त माहिती त्यानें आपल्या ग्रंथांत दिली आहे. या प्रांतांत असतांना त्यानें आपलें खाणेंपिणें फारच बेताचें ठेविलें होतें. युरोपियन औषधें क्वचित्च मिळत असून एतद्देशीय लोक त्यांचा मुळींच उपयोग करीत नसत. देशी लोक कांहीं रोगांवर रोग्याच्या अंगास डाग देत असत. त्यापासून कित्येक रोगी बरे होत व कित्येक मृत्युमुखीं पडत. या प्रांतांत त्याला पुष्कळ फकीर ( हिंदुगोसावी ) आढळले. त्यांच्याविषयीं त्यानें उल्लेख केला आहे. हे कित्येक फकीर आपणांस झाडास टांगून घेऊन त्या स्थितींत कित्येक वर्षें रहातात; कित्येक एक हात वर धरितात तो अगदीं वाळून जातो. कित्येक एकाच पायावर वर्षेंच्या वर्षें उभे रहातात. कित्येकांनीं वस्त्रांचा त्याग केला असून ते दिगंबर

वृत्तीनें रहातात. या नग्न गोसाव्यांच्या पायां पडण्यास व त्यांचा उपदेश ऐकण्यास पुष्कळ बायका जात असत, हें पाहून त्यास आश्चर्य वाटलें.

एका फ्रेंच मनुष्यानें त्यास पांजरपोळ दाखविण्यास नेलें. या ठिकाणीं अनेक प्रकारचे व निरुपयोगी पशुपक्षी ठेविले असून धर्मादायांतून त्यांचें पालनपोषण होत असे. येथें किडे, मुंग्या, ढेंकूण इत्यादि प्राणी एका खोलींत असून त्यांना खाण्याकरितां ह्मणून एका मनुष्याचे हातपाय बांधून त्याला आंत टाकलें होतें. असल्या मनुष्यास तासावर किंवा दिवसावर पैसे देत असत. ही संस्था त्याला उपयुक्त वाटली नाहीं. एक मुसलमान एका हातांत कोंबडें व एका हातांत सुरी घेऊन बाजारांतून फिरतांना त्यानें पाहिला. या कोंबड्याचे प्राण सोडवा, नाहींतर मी त्याला आतां मारणार, असें लोकांस सांगून तो त्यांजपासून पैसे उपटी. आपला कोणी नातलग पुनर्जन्म पावून याच प्राण्याच्या जन्मांत आला असेल असा विचार करून कित्येक धर्मभोळे लोक तो मागेल ते पैसे त्याच्या हातावर टाकून त्या प्राण्याची सुटका करीत. याप्रमाणें कांहीं लोकांचा हा व्यवसायच बनला होता.

## वसईचा प्रवास.

वसईस पोर्तुगीज लोकांची सत्ता स्थापित होऊन दीडशें अधिक वर्षें झालीं होतीं. पोर्तुगीज लोकांच्या वसई शहराची फार ख्याति होती. वसई हें शहर पूर्वीं खंबायतच्या बादर नामक राजाकडे असून पोर्तुगीज लोकांस भिऊन त्यानें वसई व दुसरीं कांहीं आसपासचीं बेटें इ. स. १५३५ सालीं डि अंकूना याच्या हवालीं केलीं. या शहराचें क्षेत्रफळ तीन मैलांचें असून याला आठ बुरूज आहेत. रस्ते नीट व रुंद असून गांवास मुख्य दोन दरवाजे आहेत. खाडीच्या बाजूकडेही एक दरवाजा आहे. कांहीं वर्षांपासून भयंकर सांथीनें (Carazzo) येथें ठाणें दिल्यामुळें शहर उध्वस्थ झालें आहे. मुख्य कामगार कोणी क्यापटन असून त्याला गव्हरनर असें ह्मणतात. न्यायव्यवस्था पहाण्याचें काम

व्हेडोर नामक एका अम्मलदाराकडे आहे. येथें डोंबाऱ्याचे खेळ त्याच्या पहाण्यांत आले. एक मनुष्य आपल्या बेंबीजवळील वस्त्रांत बांबू रोवी व दुसरा त्यावर चढून जाऊन हातपाय मोकळे सोडून बांबूवर तरंगे नंतर खालचाही मनुष्य आपले हात सोडी. हें पाहून त्याला महदाश्चर्य वाटलें! कांहीं तरी दैविक सामर्थ्याशिवाय हें करतां येणें शक्य नाहीं, असें त्यानें लिहिलें आहे!

येथें क्यासाबो नामक पंधरा मैल लांब असा सुंदर बगीचा असून त्या ठिकाणीं असंख्य फुलझाडें व फळझाडें लाविलीं होतीं. या जमिनीची लागवड हिंदुमुसलमान, किरिस्ताव वगैरे अनेक लोकांकडे होती. झाडांस पाणी सोडण्याची विशेष व्यवस्था केली असल्यामुळें तीं निरंतर हिरवींगार असत. बड्या बड्या पोर्तुगीज लोकांचे तेथें बंगले असून उन्हाळ्यांत हवा खाण्यास ते तेथेंच जात असत. लग्न करून स्थायिक रहाण्याविषयीं गेमिली यास वसई येथें विनंति करण्यांत आली होती. ४४,००० रुपये स्त्रीधन ह्मणून मिळण्याचा संभव असून सालाचें १,३२० रुपयांचें कायद्या-संबंधीं कांहीं काम देण्याचें त्याला अभिवचन देण्यांत आलें होतें; परंतु या उष्ण हवेंत त्यास रहावयाचें नसल्यामुळें त्यानें ती विनंति अमान्य केली.

वसई येथून तो साष्टी बेटांत असलेलीं कान्हेरी ( केव्हज् ) लेणीं पहाण्यास गेला. वाटेंत साष्टी येथील फादर एडवर्ड नामक धर्मोपदेशकास त्यानें वसईहून आणलेलें पत्र देऊन तो त्याजकडेस उतरला. या पाद्रीसाहेबांनीं त्याचा फारच चांगला समाचार घेतला! तो आल्यावर त्याला थंड पाण्याचा पेला व दोन सुकीं महाळुंगें ( Citrons ) खाण्यास दिलीं! तीं दोन्हींही मुंग्यांनीं भरलेलीं असल्यामुळें फार थोडा भाग त्यानें मोठ्या कष्टानें खाल्ला. दुसऱ्या दिवशीं तो गुहा पहाण्यास निघाल्यावर पाद्रीसाहेब हंसून सांगूं लागले कीं, घरांत अझून भाकरी ( रोटी ) भाजली नाहीं. तथापि जवळच्या गांवीं तुमची उपहार करण्याची सर्व सोय होईल. पुढील खेड्यांत भाताच्या पेजेशिवाय त्याला कांहींच खाण्यास

मिळालें नाहीं; परंतु निरुत्साह न होतां तो तसाच पुढें गुहा पहाण्यास निघून गेला! या अल्प गोष्टीवरून त्याच्याठायीं प्रवासाची अभिरुचि केवढी दांडगी होती हें स्पष्ट व्यक्त होतें. या गुहांविषयीं गेमिली यानें वर्णनात्मक असें बरेंच लिहून ठेविलें आहे; परंतु ऐतिहासिक दृष्ट्या त्यांत फारच अल्प माहिती आहे. त्यास ऐतिहासिक माहिती मिळण्याचा क्वचित्च संभव होता, व हल्लींप्रमाणें त्याकाळीं ऐतिहासिक चर्चेकडे लोकांचें मुळींच लक्ष नव्हतें. शिकंदर बादशहानें या गुहा बांधल्या असा जो तेथील लोकांचा समज होता, तोच यानें गृहित धरलेला दिसतो. ठाण्याच्या खाडींत जाण्यास जो खडकामधून रस्ता कोरलेला आहे, तोही शिकंदर बादशहाच्या नांवावर मोडत असे. गेमिली यानें या गुहांचें जें वर्णन लिहिलें आहे, तें येथें देण्यापेक्षां अलीकडे सरकारी ग्याझेटियरमध्यें जें सविस्तर वर्णन छापलें आहे, तें वाचकांनीं वाचावें म्हणजे झालें.

## गोव्याचा प्रवास.

पोर्तुगीज लोकांच्या राजधानीचें मुख्य शहर जें गोवा तें आपण पहावें, असें त्यास वाटल्यावरून गेमिली हा वसईहून गोव्यास जाण्यास निघाला. वाटेंत ख्रिस्ती, ज्यू, मूर, हिंदु, मुसलमान वगैरे अनेक जातींचे चांचे लोक असून ते प्रवाशास फार त्रास देत असत. पोर्तुगीज प्रांत सोडल्यावर पुढें जाणें विशेष धोक्याचें होतें. कारण जवळ जवळ अडीचशें मैलांचा हा समुद्रकिनारा मराठ्यांकडे असे. डोंगरांत राहणाऱ्या पहाडी लोकांचें साहाय्य घेऊन शिवाजी राजानें प्रथम राज्य स्थापिलें. त्याचा मुलगा संभाजी हा मोंगलांच्या हातीं सांपडून त्यांनीं त्याला हालहाल करून ठार मारिलें. हल्लींच्या राजाचें नांव रामराव ( राजाराम ) असून त्याच्याजवळ ५०,००० घोडेस्वार व तितकेंच पायदळ आहे. हे लोक मोठे चपळ व काटक आहेत. आज येथें तर उद्यां पन्नास कोसांवर ते दृष्टीस पडतात. कारण, त्यांच्या स्वारीबरोबर लटांबर मुळींच नसतें. परंतु मोगलांची तऱ्हा याहून अगदीं भिन्न आहे. ते हळूहळू प्रवास करितात. त्यांच्याबरोबर खाण्या-

पिण्याचें वगैरे पुष्कळ सामान असून शिवाय बायकांचे झनानखाने व इतर फालतु लोक पुष्कळ असतात. मराठ्यांकडे हा प्रांत असून शिवाय पुष्कळ मजबूत डोंगरी किल्ले व दुसरे सुपीक प्रांत आहेत. असें ह्मणतात कीं, शिवाजी पोर्तुगीज प्रजा असून त्याचा जन्म ठाण्यास झाला होता आणि त्याचें तेथें दुकान होतें. शिकंदर ( अलेक्झांडर ) बादशहानें कान्हेरी गुहा बांधल्या, हा जसा मागें एक दंतकथेचा मासला सांगितला, तसाच हाहि होय.

## पोर्तुगीज लोकांचा अंमल.

हिंदुस्थान देशाचा रस्ता शोधून काढण्याबद्दल पोर्तुगीज लोकांचे व इतर युरोपीयन लोकांचे सतत पंचवीस वर्षें एकसारखे प्रयत्न चालले होते. हाच हेतु मनांत धरून वास्कोडिगामा हा सामानसुमान, दारूगोळा व चाकर लोक बरोबर घेऊन लिसबनहून ता. ९ जुलै १४९७ रोजीं निघाला. वाटेनें त्यास केप ऑफ् गुड होप लागलें. तेथून निघून पुढें त्यास मोझांबिक बंदर लागले. तेथून त्यानें पुनः जहाजें हाकारलीं, तों ता. ८ मे १४९८ रोजीं तो मलबार प्रांतांतील कलिकत बंदरांत येऊन उतरला. हाच पोर्तुगीज लोकांचा व विशेषतः युरोपियन लोकांचा हिंदुस्थानांत पहिला प्रवेश. येथून पुढें त्यांच्या दिग्विजयास प्रारंभ झाला. दक्षिण किनाऱ्यावरील राज्यें खालसा करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. तसेंच खंबायत, गुजराथ, दीव, सुरत, ठाणें, चौल, दाभोळ वगैरे सुमारें २०० मैलांचा प्रदेश, शिवाय गोवा, साष्टी, वसई, कोचीन, कलिकत वगैरे प्रांत हळू हळू काबीज केले. दिग्विजयाच्या कामीं बरेंच यश मिळत आहे असें पाहून त्यांना विशेष उत्साह आला. सिलोन बेटाचा कांहीं भाग संपादन केल्यावर त्यांची दृष्टि चीनकडे गेली. मलाका, तिमोर आणि सोलोर हीं बेटें काबीज केलीं. चीनच्या बादशहाची परवानगी मिळवून मकासर येथें कायमची वसाहत केली. कानरा प्रांत खालसा केला. ब्याङ्गालोर, क्यांबोलीन, नेगापट्टण, तांबूलीन इत्यादि शहरें घेतलीं. अनेक समुद्रकिनाऱ्यांवरील प्रांत हस्तगत झाल्यामुळें ठिकठिकाणीं आरमार

ठेवण्यांत आलें. पुढें समुद्रांचें सार्वभौमत्वही यांच्याचकडे आलें. जिकडेतिकडे यांचें आरमार असल्यामुळें इतर राष्ट्रें यांना वचकून असत. ह्यांच्या हुकमाशिवाय व परवान्याशिवाय कोणत्याही राष्ट्रांचीं तारवें या समुद्रांतून हाकारलीं जात नसत. कोणी यांच्या हुकमाचें उल्लंघन केल्यास ते त्यांचीं जहाजें पकडीत, मालाचा लिलांव करीत व खलाशांस तुरुंगांत टाकीत.

याप्रमाणें दिग्विजय करून पोर्तुगीज लोकांनीं आपला अम्मल अनेक देशांत चालविला. तेथील मूळच्या लोकांस बाटवून त्यांना ख्रिस्तानुयायी बनविलें. परंतु ही त्यांची सत्ता कायमची टिकली नाहीं. त्यांच्यांत पूर्वीचा जोम राहिला नाहीं. अनेक प्रदेश हस्तगत होऊन लक्ष्मीची पूर्ण कृपा झाल्यामुळें त्यांच्यांत आळस व ऐषआराम वाढले. काबीज केलेल्या जुन्या प्रदेशाची व्यवस्था करण्याचें सोडून देऊन नवीन नवीन प्रदेश जिंकण्याच्या ते भरीस पडले. व पुढें जो त्यांच्या सत्तेस क्षय लागला त्याचें बीज यांतच उद्भवलें.

हिंदुस्थानांत पूर्वी त्यांची जशी भरभराट होती तशी हल्लीं नसून त्यांना उतरती कळा लागली होती. अमेरिकेंत यावेळीं त्यांना ब्राझील नामक मोठा सुपीक देश सांपडला असून तो जिंकून हस्तगत करण्याकडे त्यांचे एकसारखे डोळे लागले होते. इकडे वसई, दमण, गोवा वगैरे प्रांतीं त्यांचा अम्मल ढिला पडतांच इतर राष्ट्रांनीं व राजांनीं त्याचा फायदा घेऊन त्यांचे मुलूख बळकावले. डच लोकांचें व यांचें पुष्कळ वर्षांपासून वैमनस्य होतें; तेंही यांच्या ऱ्हासास कारणीभूत झालें, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पोर्तुगीज लोकांचा कां ऱ्हास झाला, यांचीं कारणें सांगतांना कित्येक ख्रिस्ती राष्ट्रें ह्मणतात कीं, या लोकांना धर्माची आस्था नसून धर्मप्रसार करण्याच्या कामीं हे फारसे झटले नाहींत. एका हातांत क्रास ( धर्मचिन्ह ) व दुसऱ्या हातांत तरवार याप्रमाणें त्यांनीं हिंदुस्थानच्या भूमीवर पाय ठेविला; परंतु येथें त्यास सुवर्ण दृष्टीस पडतांच तें घेण्याकारितां त्यांनीं क्रॉस एके बाजूस ठेविला

व खिसे भरण्याचा सपाटा चालविला. याप्रमाणें त्यांच्यापाशीं द्रव्याचें पुष्कळ ओझें झाल्यामुळें तें संभाळण्याकरितां पुढें त्यांना तरवारही खालीं ठेवावी लागली.

हिंदळकन राजाशीं लढून आलफान्सो डि आलबुकर्क यानें इ० स० १५०८ सालीं गोंवा शहर घेतलें. हिंदळकन यानें तें पुनः घेतलें.

आलबुकर्क यानें पुनः त्याचा पाडाव केला, व सात हजार लोकांची कत्तल करून तें शहर परत मिळविलें, व आसपासचा प्रांतही काबीज केला. लोकांत शांतता रहावी ह्मणून मामूल वहिवाटी कायम ठेविल्या. हिंदु मुली बाटवून पोर्तुगीज लोकांशीं त्यांचीं लग्नें लाविलीं. पुढें हा प्रघात जारीनें सुरू झाला. पुष्कळ लोक बाटवून त्यांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. ठिकठिकाणीं ख्रिस्ती लोकांचीं देवळें स्थापन होऊन धर्मोपदेशक उपदेश करूं लागले. एतद्देशीय लोकांस रोमन क्याथोलिक पंथ उत्तम वाटून पुष्कळांनीं तो स्वीकारला. ब्राह्मण स्त्रिया व पोर्तुगीज पुरुष यांच्या संबंधापासून एक मोठी जात उत्पन्न होऊन तिला मेस्तिझो नांव पडलें. हे मेस्तिझो लोक गोव्यांत पुष्कळ होते. ‘ राजा कालस्य कारणम् ’ या उक्तीप्रमाणें यावेळीं गोंवा शहरांत तीनचतुर्थांश ख्रिस्ती असून एकचतुर्थांश हिंदु होते.

यावेळीं गोवा शहराची लोकवस्ती बरीच कमी झाली असून पूर्वीप्रमाणें तें शहर आतां भरभराटींत नव्हतें. या शहरास जो मोठा मजबूत तट आहे, त्यावरून या शहराचा त्यावेळीं झालेला र्‍हास सहज लक्षांत येत होता. या र्‍हासाचीं कारणें अनेक असतील; परंतु डच लोकांचें पोर्तुगीज लोकांशीं जें वैमनस्य होतें, तें मुख्य कारण असून त्याशिवाय दुसरें कारण ह्मटलें ह्मणजे यावेळीं अमेरिकेंतील ब्राझील देश जिंकण्याकडे पोर्तुगीज लोकांचें सर्व लक्ष लागलें होतें. यावेळीं ( इ. स. १६९५ ) गोवा शहरची लोकसंख्या २०,००० होती असें गेमिली यानें लिहून ठेविलें आहे.

सर्व युरोपियन राष्ट्रांत गेमिली याचें पोर्तुगीज लोकांविषयीं फारच चांगलें मत होतें. डच किंवा इंग्लिश लोकांपेक्षां पोर्तुगीज लोकांस तो विशेष चहात असे. दुसऱ्या लोकांपेक्षां पोर्तुगीज लोकांच्या अंगीं सभ्यता विशेष आहे, असें तो ह्मणतो. पोर्तुगीज लोकांविषयीं त्याचें जें येवढें अनुकूल मत होतें याचें कारण हें कीं, त्या लोकांप्रमाणें तोही रोमन क्याथोलिक पंथाचा होता.

डान फ्रान्सिस्को डि टाव्हर्नो नामक पोर्तुगीज गव्हरनर जनरलला एकदां एका राजपुत्रानें चांगलेंच फसविलें. ती गोष्ट अशी कीं, एकदां एका राजपुत्रास गव्हरनरला भेटावयाचें असून गव्हरनर हा भेटीस आलेल्या गृहस्थास बसण्यास खुर्ची देत नाहीं व त्यामुळें आलेल्या पाहुण्याचा फार अपमान होतो अशी बातमी त्यास कळली. मुलाखतीच्यावेळीं याप्रमाणें आपला अपमान न होतां, आपण ती वेळ मोठ्या शिताफीनें मारून न्यावी व आपलें बुद्धिचातुर्य पाहून त्या लोकांनीं थक्क व्हावें असा त्यानें एक विचार काढला. गव्हरनरच्या भेटीस जातेवेळीं त्यानें बरोबर दोन चाकर घेतले. आपणास बसण्यास खुर्ची मिळत नाहीं, असें पाहून त्यानें त्या चाकरांस बसण्यास सांगितलें व आपण त्यांच्यावर बसला. त्याच्या बुद्धिचातुर्याची पोर्तुगीज गव्हरनरनें मोठी वाहवा केली व लागलीच खुर्च्या आणण्यास सांगितलें. मुलाखत संपल्यावर ते चाकर तेथेंच बसून राहिले, असें पाहून गव्हरनरच्या मनुष्यांनीं राजपुत्रास तें वर्तमान कळविलें व त्या लोकांस बोलवा ह्मणून सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला " ज्या खुर्च्यांवर मी बसतों त्या मी कधींही बरोबर घेऊन जात नसतों. "

गोवा वगैरे प्रांतीं चाकर इतके स्वस्त असत कीं, भातास फक्त तांदूळ दिले कीं, दिवसाचे चोवीस तास ते नोकरी करीत. जननेंद्रिय झांकण्यास लंगोटी मिळाली कीं झालें, मग त्यांना कशाचीही जरूर नाहीं. साधारण स्थितीच्या पोर्तुगीज लोकांकडे ३०।४० चाकर असत, व कनिष्ठ प्रतीचे लोक निदान सहा सात तरी चाकर ठेवीत. हे चाकर

लोक कांहीं दिवस आपला धर्म पाळीत. परंतु लवकरच ते क्याथोलिक पंथाचा स्वीकार करीत असत. तीस किंवा चाळीस रुपयांस गुलाम मिळत असत. या गुलाम लोकांची विक्री गोव्यास होत असे. तेथून ते कंपनीच्या जहाजांत घालून इतर पोर्तुगीज बंदरीं किंवा लिसबन, मोसा, मोझांबिक व झासोला इत्यादि ठिकाणीं विक्रीकरितां नेत असत. तो ह्मणतो, या हलक्या लोकांशीं गोड बोलून ते कधींही काम करीत नाहींत किंवा ऐकत नाहींत. जेव्हां खरपूस मार द्यावा तेव्हां ते काळजीपूर्वक काम करितात व गाढवाप्रमाणें ओझीं वाहतात. यांच्यांतही कित्येक चांगले लोक आहेत व श्रेष्ठ वर्णाच्या लोकांत तर कित्येक इतके चांगले आहेत कीं, जर प्रत्येक युरोपीयन त्यांच्याप्रमाणें सुशील व सौम्य असेल तर खरोखर केवढी तरी चांगली गोष्ट होईल.

गोवा प्रांत ह्मणजे फळझाडांचें व फुलझाडांचें अगदीं आगर. पश्चिम किनाऱ्यावरील ही उद्यानभूमिकाच. आणि तशांत गेमिली येथें मार्च एप्रिल महिन्यांत ह्मणजे फळझाडांच्या व पुष्पांच्या ऐन बहारीच्या दिवसांत आलेला. तेथील मधुर फळांचा आस्वाद घेऊन तो अगदीं थक्क झाला! युरोपांत इतक्या प्रकारचीं फळें पहावयाससुद्धां मिळत नाहींत, असें त्यानें ह्मटलें आहे. नारळ, पोफळ ताड, फणस, आंबा, अंजीर, जांब, जांभूळ, अननस, पपनस, करवंदें, तोरण, उंडी, चिंच वगैरे अनेक फळांची माहिती देऊन शिवाय त्यानें त्यांचीं चित्रेंही काढून दाखविलीं आहेत.

## औरंगजेब बादशहाची भेट.

समुद्रकिनारा सोडून गेमिली यानें देशाच्या आंतील भागीं अशी एकच सफर केली. इतिहासकारास त्याचा हा प्रवास फार उपयुक्त आहे. कारण, त्यावेळीं औरंगजेब बादशहाचा तळ दक्षिणेंत बरेच दिवस पडला असून विजापूर, गोवळकोंडा हीं राज्यें त्यानें खालसा केलीं होतीं. संभाजीच्या मरणानंतर मराठी सत्तेचा जरी समूळ नाश

झाला होता, तरी त्या सत्तारूपी मूळास पुनः अंकुर फुटत चालला होता. हा परद्वीपस्थ असल्यामुळें यानें निःपक्षपातानें जी हकीकत लिहून ठेविली आहे, ती जरी अल्प आहे तरी तीपासून त्या काळच्या स्थितीवर बराच प्रकाश पडणार आहे.

देशाच्या आंतील भागीं प्रवास करणें धोक्याचें असून फार कष्टमय आहे, करितां तो बेत रहित करावा असें गेमिली यास त्याच्या मित्रांनीं फार आग्रहपूर्वक सांगितलें. परंतु त्यानें ती गोष्ट मान्य केली नाहीं. तो ह्मणतो कीं, आशिया खंडांतील या महान् बलाढ्य बादशहाची स्वारी, त्याचें वैभव व राजदरबार हीं स्वतः पहाण्याचा व त्या कामीं कितीही त्रास पडला किंवा खर्च लागला तरी तो सोसावयाचा माझा कृतसंकल्पच होता. प्रवासास लागणारें सर्व सामानसुमान व मजूर बरोबर घेऊन ता० ९ मार्च १६९५ रोजीं तो गोव्याहून गाळगाला येथें जाण्यास निघाला. गोव्याजवळील सेंट स्टिफन नामक खेड्यांतील कारवान लोकांचा तांडा चालला होता त्याबरोबर त्यानें दोन दिवस प्रवास केला. पुढें त्या तांड्याची व याची चुकामुक पडल्यामुळें एक रात्र त्यानें झाडाखालीं काढली. शेजारच्या खेड्यांतून सर्व रात्रभर एकसारख्या मोठमोठ्या आरोळ्या ऐकूं येत होत्या. त्या शिमगी पौर्णिमेनिमित्त होत्या असें त्यास मागाहून समजलें.

हा प्रवास त्याला फारच त्रासदायक व कंटाळवाणा वाटला असें त्याच्या लेखावरून दिसतें. तो ह्मणतो " तुर्कस्थान किंवा इराण या देशांतून प्रवास करण्यापेक्षां ह्या मोंगलाच्या प्रांतांतून प्रवास करणें फार कष्टमय आहे; कारण, प्रवासाचें मुख्य साधन जीं जनावरें तीं येथें क्वचितच असून ठिकठिकाणीं उतरण्याकरितां काफलाखाने किंवा धर्मशाळा नाहींत. प्रवासास लागणाऱ्या वस्तु वाटेंत मिळत नाहींत. आणि सर्वांत दुःखदायक गोष्ट ही कीं, चोरांची टोळधाड केव्हां येऊन पडेल आणि गरीब प्रवासी केव्हां लुबाडला जाईल, याचा मुळींच नेम नाहीं. ज्याचा स्वतःचा घोडा नसेल त्याला बैलावर प्रवास करणें भाग पडतें,

शिवाय सर्व सिधासरंजाम घेऊन स्वयंपाक करण्यास भांडींही बरोबर घेतलीं पाहिजेत. मोठमोठ्या शहरींच फक्त कायती जेवण मिळण्याची सोय असते. दक्षिणेंत विजापूर वगैरे प्रांतीं त्यावेळीं लढाया चालल्या असून जिकडे तिकडे पुंडाई माजली होती. कोणाचाच पक्का अम्मल नसल्यामुळें शांततेचा चोहोंकडे भंग झाला होता. दक्षिणेंतील प्रवासापेक्षां सुरत, अमदाबाद वगैरे प्रांतीं प्रवासाची पुष्कळ सोय असून तिकडे अधिक शांतता आहे ह्मणून त्यानें लिहिलें आहे. आपलें सामानसुमान घेऊन चालण्यास यानें बरोबर तीन एतद्देशीय लोक घेतले होते. त्यांविषयीं तो लिहितो कीं, " यांना चांगली बत्ती दिल्याशिवाय हे वटणीस येत नाहींत. यांच्याशीं गोडगोड बोलून किंवा पैसा देऊन हे कधींही चांगलीशी चाकरी करीत नाहींत. परंतु यांना चांगला दम भरला कीं, गाढवाप्रमाणें ओझीं घेऊन हे चालतात. "

देशोदेशीं प्रवास केल्यामुळें गेमिली याचा प्रवासांत अनेक तऱ्हेच्या हलक्या लोकांशीं संबंध आल्यामुळें त्याची दृष्टि विकारवश झाली असावी. वस्तुतः हे हलक्या जातींचे लोक हिंदुस्थानांत जेवढे सात्विक व दिलदार आढळून येतात तेवढे कोणत्याही देशांत आढळून येत नसतील. बैलावर बसून कांहीं दिवस प्रवास केल्यावर पांडा येथें त्यानें एक घोडा विकत घेतला. मार्डोल येथें त्यास एक देवालय लागलें त्याचे त्यानें पुष्कळ वर्णन दिलें आहे. जवळपास कोणी नाहीं असें पाहून मूर्ति फोडण्याचा माझा क्रम असे, असें तो लिहितो.

## सती.

पोर्तुगीज प्रांत सोडल्यावर वाटेंत लवकरच त्याला सतीचा भयंकर देखावा दृष्टीस पडला. ' सती चितेजवळ असून तिची मुद्रा गंभीर आणि प्रशांत होती. ती आपल्या नातलगांचा निरोप घेत होती. तिजबरोबर पुष्कळ पुरुष व स्त्रिया होत्या. तिच्या सासरच्या लोकांनीं सुभ्यास वगैरे पैसे देऊन परवानगी मिळविली होती. त्या स्त्रीनें चांगला पोशाख केला होता. नंतर चितेवर केलेल्या पांच सहा हात उंच

लांकडाच्या झोंपडींत ती शिरली. लांकडें लवकर जळावीं ह्मणून त्यांवर तेल टाकलें होतें. अग्नीच्या भीतीनें तिनें पळून जाऊं नये ह्मणून तिला बांधून टाकिलें होतें. कोणास कांहीं सांगावयाचें आहे काय? ह्मणून तिनें प्रश्न करतांच पुष्कळांनीं स्वर्गास पाठविण्याकरितां तिच्याबरोबर कांहीं देणग्या व पत्रें दिलीं. तिनें तीं सर्व आपल्या पदरीं बांधून घेतलीं. इतकें झाल्यावर ब्राह्मणानें चितेस अग्नी लाविला. तिची लवकर रक्षा व्हावी ह्मणूनच कीं काय तिच्या नातलगांनीं चितेंत तेल ओतण्याचा सपाटा चालविला होता.' असलें अमानुष व भयंकर कृत्य करण्यास तुमच्या मनास कांहींच वाटत नाहीं काय? असा त्यानें प्रश्न केल्यावर ते लोक ह्मणाले कीं, ती आमची चाल आहे, व तीप्रमाणें आह्मांस वागलें पाहिजे. सतीच्या किंवा तिच्या नवऱ्याच्या शवाच्या अंगावर जे सोन्यारुप्याचे अलंकार असतात ते जरी अग्नीनें दग्ध होतात, तरी त्यांचें सोनेंरुपें शोधून काढून घेण्यास ब्राह्मणास मुभा असते.

बाजोटा नामक गांवीं त्यास पुनः ३०० बैलांचा तांडा भेटला. या तांड्यापाशीं शहाच्या सैन्याची रसद असून तो गालगाला येथें ज्या ठिकाणीं मोंगलांचा तळ पडला होता तिकडेच चालला होता. अशा रीतीनें मार्गक्रमण करीत करीत बारा दिवसांनीं ही स्वारी औरंगझेब बादशहाचा जेथें तळ होता, तेथें जाऊन पोहोंचली. औरंगझेब बादशहाच्या सैन्यांत जे ख्रिश्चन लोक होते, त्यांनीं त्याचा बराच आदरसत्कार केला. शहाच्या सैन्यांत नौकरी करणें फार सुखकर असून पगारही मुबलक मिळतो, असें त्यांनीं त्यास सांगितलें. त्यांना लढाईवर जावेसें न वाटलें किंवा पहारा करण्यांत त्यांच्याकडून कांहीं कसूर झाली, तर, तेवढ्याच दिवसांचा पगार मुजरा होत असे. शहा जरी कट्टा स्वधर्माभिमानी होता, तरी त्यांना आपला धर्म पाळण्यास पूर्ण मुभा असे. शहाच्या पदरीं जे रोमन क्याथोलिक होते, त्यांनीं मातीच्या भिंती घालून एक 'भजनालय' केलें असून तेथें दोन कानडी पाद्री धर्मज्ञान सांगत असत. फ्रचानसिस बॉर्जिया नामक एका व्हेनेसियन ( याचा

जन्म दिल्लीस झाला होता. ) गृहस्थानें त्यास आपल्या घरीं बोलाविलें व त्याचा आदरसत्कार केला. या गृहस्थाच्या हाताखालीं सर्व ख्रिश्चन असून त्याला शिक्षा देण्याचा अधिकार असे. दारू प्याल्यामुळें दोन मुसलमानांस खांबाशीं बांधून टाकिलें असून त्यांना त्या अपराधाबद्दल फटके देण्यांत आले.

यावेळीं शहाचें एकंदर सैन्य ह्मटलें ह्मणजे ६०,००० घोडा व १०,००,००० पायदळ असून सामानसुमान वहाण्याकरितां ५०,००० उंट व ३००० हत्ती होते. याशिवाय या सैन्याबरोबर इतर चाकरमाणसें, बाजारबुणगा, व्यापारी, कारागीर व आणखी इतर पुष्कळ लोक असत. गेमिली ह्मणतो कीं, शहाचा तळ ह्मणजे चालणारें मोठें गांवच होतें, असें ह्मटलें पाहिजे.

ता. २१ मार्च १६९५ रोजीं गेमिली याची शहाशीं खाजगी मुलाखत झाली. बादशहाची स्वारी ज्या तंबूंत होती, त्यास गुलाल बार असें ह्मणत. बादशहाच्या व शहाजाद्यांच्या तंबूचा परिघ तीन मैलांचा असून त्यांच्या सभोंवार चौक्या पहारे व खंदक होते. त्यास तीन दरवाजे असत. ‘ आराम ’ नामक दरवाजा फक्त बायकांकरितांच असून दुसरे दोन बादशहाकरितां व त्याच्या मंत्रिमंडळाकरितां होते. खासा स्वारीच्या तंबूस आंत व बाहेर अशीं दोन दालनें असून शहास भेटण्यास त्यामधून जावें लागे. बाहेरील दालनांत नगारे, नौबती व तुताऱ्या होत्या. रात्रीं व सकाळीं कांहीं विक्षितवेळीं हीं वाद्यें वाजविण्यांत येत असत. मुलामा दिलेल्या दोन हातांत सोन्याचा टांगलेला गोळा असे. राजचिन्ह किंवा राजपताकाप्रमाणें हा गोळा हत्तीच्या पाठीवर ठेवून शहाच्या स्वारीपुढें नेहमीं चालवीत असत. दुसऱ्या दालनांत जाऊन खासा स्वारी जेथें बसली होती तेथें तो गेला. तंबू भरजरी असून वेलबुट्टीनें व नकशीनें पूर्ण भरला होता, रेशमी कापडाचे पडदे सोडले होते. शहाची स्वारी मौल्यवान गालिचावर बसली होती व भोंवतालीं किनखाबी लोड, तिवाशा पडल्या होत्या.

मोंगलाच्या दरबारीरिवाजाप्रमाणें सलाम ( खुरनिशांत ) केल्यावर शहानें त्यांस युरोपांतील आपला देश कोणता, स्वदेश सोडून किती दिवस झाले, तुह्मीं कोठें कोठें गेला होता, येथें कोणत्या उद्देशानें आला, तुह्मांस चाकरी करण्याची इच्छा आहे किंवा तुह्मीं परत जाणार आहा इत्यादि प्रश्न विचारले. त्यास गेमिली यानें मोठ्या नम्रतेनें उत्तर दिलें कीं, " मी नेपोलिन असून दोन वर्षें झालीं मी नेपल्सहून निघालों आहे. ईजिप्त, तुर्कस्थान, इराण वगैरे देशांत मी प्रवास केला. आशिया-खंडांतील तुह्मांसारख्या महाबलाढ्य सार्वभौम पातशहाचें दर्शन व्हावें, तुमचें मोठें दरबार व तसेंच लष्कर दृष्टीस पडावें, याच हेतूनें मी आपली भेट घेण्यास आलों आहे. " हंगेरी देशांत तुर्क आणि युरोपियन लोकांची लढाई कशी काय चालली आहे ह्मणून शहानें त्यास विचारलें. या प्रश्नाचें उत्तर दिल्यावर जाहीर दरबारांत जाण्याची वेळ झाल्यामुळें, त्यास निरोप देण्यांत आला.

गेमिली यानें याही दरबारचा थाट पाहिला. शहाची स्वारी एका पालखींतून येऊन सिंहासनावर विराजमान झाली. सिंहासन लांकडी चौकोनी असून सुमारें पांच सहा हात उंच होतें. त्यावर मुलामे दिलेले होते. वर चढून जाण्याकरितां त्यास रुप्याच्या पायऱ्या होत्या. शहाचा फेटा पांढरा असून त्यास कलाबतूचे वर पट्टे होते. पुढील भागीं त्यावर मोठा पाच असून त्याच्या सभोंवतीं लहान लहान पाच होते. तो शरीरानें ठेंगणा व सडपातळ होता, त्याचें नाक मोठें व मुद्रा तेजस्वी असून वृद्धावस्थेमुळें दाढी शुभ्र झाली होती व शरीरयष्टीही लवली होती. शहा सिंहासनीं जाऊन बसल्यावर त्याला ढालतरवार देण्यांत आली. ती त्यानें डाव्या बाजूस आंत ठेऊन दिली. बाजूस दोन चाकर उभे असून ते चवऱ्या ढाळीत होते. एका परिचारकानें त्याच्या मुख-कमलावर हिरवी छत्री धरली होती. शहानें कांहीं खूण केल्यावर दरबारी कामास सुरवात झाली. लोकांचे अर्ज घेण्यास दोन चिटणीस जवळ उभे असून ते बादशहास अर्ज वाचून दाखवीत. शहाचें वय

जरी यावेळीं ७८ वर्षांचें होतें, तरी चष्मा वगैरे न लावतां अर्जांवर व इतर दरबारच्या महत्वाच्या कागदपत्रांवर तो स्वतः आपल्या हातानें शेरे मारी व सह्या करी.

याप्रमाणें दरबाराचें काम चालू असतांना हत्तीच्या पागा सरदार लोकांनीं सुव्यवस्थित ठेवल्या आहेत कीं नाहींत, हें पहाण्याकरितां हत्ती समोर उभे केले असून मधून मधून शहा तिकडे नजर देत असे. सर्व अमीर उमराव उभे असून नौबदी वाजत होत्या. इतक्यांत शहाजादे व त्यांचे पुत्र आले. या राजपुत्रांचे पोशाख भरजरी असून फार मौल्यवान् होते. जमिनीस तीनदां हात लावून तर तो आपल्या मस्तकीं व उरोभागीं लावून त्यांनीं शहास मोठ्या आदबीनें सलाम ( खुरनिशात ) केले व सिंहासनाच्या डाव्या बाजूच्या पहिल्या पायरीवर जाऊन बसले. शहास संततिसंपत्ती वगैरे सर्व अनुकूल असून यावेळीं तो आपल्य वैभवशिखरीं होता.

आपल्या वृद्ध पित्यास कारागृहांत टाकून भावांचा पाडाव करून त्यांना ठार मारून व देशोधडीस लावून यानें सिंहासन कसें संपादन केलें. इत्यादि गोष्टी इतिहासवाचकांस पूर्ण अवगत आहेत. त्यांचा येथें उल्लेख करून जागा अडविणें बरें नाहीं. पित्याविरुद्ध मुलानें बंड उभारून त्याला जर्जर करणें किंवा लढाई करून त्याचा पाडाव करणें, ही चाल मोंगल घराण्यांत परंपरागत आली होती. मुलांच्या हातीं मोठा अधिकार किंवा अनन्वित सत्ता दिल्यानें झातारपणीं त्यांच्या अगदीं अंकित व्हावें लागतें, ही गोष्ट औरंगझेब बादशहाच्या पूर्ण लक्ष्यांत आली होती. शहाजहान बादशहानें जी मोठी चूक केली ती हीच ; व हिचें प्रायश्चित्त त्यास फारच कडक भोगावें लागलें ! या वरील भीतीनें तो आपल्या मुलांच्या हातीं फारसें सैन्य देत नसे, व स्वतंत्र मोहिमेवर त्यांना क्वचित्‌च पाठवीत असे. या बादशहाविषयीं गेमिली यानें असें लिहून ठेविलें कीं, याच्या पूर्वजाप्रमाणेंच याचीही गति होईल. परंतु इतिहासावरून गेमिली याचें हें भविष्य खरें झाल्याचें दिसून येत नाहीं.

राज्यपद मिळविल्यावर यानें आपणास 'आलमगीर' ह्मणजे जगाचा स्वामी असा महान् किताब धारण केला. तो निरंतर कार्य व्यापृत असून आपला वेळ सहसा फुकट जाऊं देत नसे. त्याची स्वधर्मावर पूर्ण श्रद्धा असे. पहाटेस स्नान करून उजाडण्यापूर्वीं तो निमाज पढे. नंतर थोडासा उपहार केल्यावर दोन तास चिटणीसांबरोबर कामकाज पहाण्यांत घालवी. लोकांस आपल्या तक्रारी खुद्द बादशहाच्या कानावर घालतां याव्या ह्मणून दररोज दुपारीं जाहीर मुलाखत घेण्याचा त्याचा क्रम असे. मात्र शुक्रवारीं ही जाहीर मुलाखत बंद असे. तिसऱ्या व चौथ्या वेळेचा निजाम झाल्यावर संध्याकाळीं दोन तास तो गृहसंबंधीं खाजगी कामांत घालवी. दोन तासांपेक्षां अधिक वेळ तो झोंप घेत नसे. झोंप झाल्यावर मुसलमानी धर्माचें आद्य पुस्तक जें कुराण तें दिव्याजवळ बसून उजाडेपर्यंत तें तो वाचीत असे.

त्याचा पोषाख साधा व त्याचा खाण्यापिण्याचा खर्चही फार बाताबेताचाच असे. असें ह्मणतात कीं, स्वतःच्या चरितार्थाप्रीत्यर्थ तो सरकारी तिजोरींतून पैही घेत नसे. स्वतः बहु मोलाच्या टोप्या तयार करून तो त्या आपल्या सुभेदारांकडे व अमीर उमरावांकडे पाठवून देत असे. बादशहानें हा आपला बहुमान केला असें समजून ते त्याजकडे हजारों रुपये पाठवीत. या पैशांतून शहा आपल खर्च भागवीत असे. शिवाय शहाच्या खाजगी सरंजामाकरितां ह्मणून चार गांवांचा महसूल मुक्रर करून ठेविला असे.

राज्यपद मिळविण्याकरितां त्यानें जीं भयंकर व अंगावर रोमांच उभे करणारीं अशीं कृत्यें केलीं होतीं, त्यांजबद्दल त्याला पुढें फार पश्चात्ताप झाला. आणि त्यांजबद्दल प्रायःश्चित्त ह्मणून त्यानें मच्छमांस व गव्हाची पोळी खाण्याचें सोडून दिलें होतें. मेवामिठाई, फळफळावळ व इतर धान्याहार तो करीत असे. या आहारापासूनच कीं काय, त्याची वृत्तिही अंमळ सात्विक झाली होती. "ईश्वराप्रमाणें आपण सर्वज्ञ नाहीं. आणि असें आहे तर कामदार मंडळींचा आणि

आपला मतभेद झाला किंवा आपलीं मतें त्यांना पसंत नसलीं तर त्यांत काय अधिक आहे? ते जर निमकहराम होतील तर परमेश्वर त्यांना त्याबद्दल योग्य प्रायश्चित्त देईल.

विजापूर येथील पदच्युत केलेला व औरंगझेबाच्या स्वारींत कारागृहवासांत असलेला **शिकंदर आदिलशहा** यास गेमिली यानें पाहिला. त्याचें वय २९ वर्षांचें असून तो शरीरानें बळकट व गौर वर्णाचा होता. बादशहानें त्यास सालीना दहा लक्ष रुपयांचा तनखा दिला होता. औरंगझेबानें याचें राज्य इ० स० १६८६ त खालसा केलें व त्यानंतर तीन वर्षें कारागृहवास भोगून तो मरण पावला, असें कर्नल मेडोज टेलर यानें लिहिलें आहे. परंतु आपण त्यास इ०स० १६९५ सालीं पाहिला, असें गेमिली यानें सांगितलें आहे.

विजापूरचें राज्य जिंकल्यावर एका वर्षानें गोवळकोंड्याच्या राज्याचीही तीच वाट झाली. तेथील पदभ्रष्ट **तानाकशहा** हा स्वारीबरोबर नसून त्यास दौलताबाद येथील किल्यांत बंदींत ठेविला होता. त्याचें वय यावेळीं ६० वर्षांचें होतें. प्रथम त्यास दररोज खर्चाकरितां वीस रुपये मिळत असत. गादीवर असतांना त्यास पुत्रमुख दृष्टीस पडलें नव्हतें; परंतु तो योग कारागृहवासांत घडून आला. तेव्हां बादशहाची मर्जी बहाल होऊन त्यानें दररोज त्यास ५०० रुपयांची नेमणूक करून दिली. गोवळकोंडा घेतेवेळीं मोंगल सैन्यांत जे युरोपियन लोक होते, त्यांनीं त्यास त्यावेळच्या तेथील धामधुमीसंबंधानें पुष्कळ गोष्टी सांगितल्या.

## गोव्यास परत जाणें.

दुभाषी व इतर चाकर लोक त्यास गालगाला येथें सोडून गेल्यामुळें त्यास गोव्यास एकटें परत यावें लागलें. इडोर, बेळगांव, शहापूर या मार्गानें बालेघाटावरून तो गोव्यास आला. त्याची भाषा कोणास समजत नसल्यामुळें वाटेंत त्याचे खाण्यापिण्याचे फार हाल झाले. एका हिंदूस गव्हाची पोळी करण्यास त्यानें सांगितलें असतांना त्यानें नाच-

ण्याची भाकर केली. ती ऊन असतांना त्यानें कशी तरी थोडी खाल्ली. परंतु शिळी झाल्यावर ती त्यास मुळींच खाववेना. दिवसभर चालून काळोख पडल्यावर झाडांखालीं निवाऱ्यास राहून तो रात्र काढी. अशा रीतीनें तो एकटाच मार्गक्रमण करीत असतांना त्यास मराठ्यांनीं अड-कविलें. तुह्मांस बंदूक किंवा तोफ सोडतां येते कीं काय ह्मणून त्यांनीं त्यास खुणांनीं विचारलें. आपणास तें कांहीं येत नाहीं, असें त्यानें कळविल्यावर त्यांनीं त्यास सोडून दिलें. ह्या प्रवासांत त्याची फार उपासमार झाल्यामुळें व त्यास अति दगदग पडल्यामुळें तो अजारी पडला, व तसाच ता० ९ एप्रील रोजीं गोव्यास जाऊन पोंहोचला. देशाच्या आंतील भागीं प्रवास करूं नका ह्मणून त्यास फादर प्रिफेस्ट, हिपोलिटस् वगैरे गृहस्थांनीं सांगितलें असतांना त्यानें त्यांच्या उपयुक्त सूचनेचा अव्हेर केला. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें जरी तो अजारी पडून आला तरी त्यांनीं त्याची चांगली सुश्रूषा केली.

## इतर माहिती.

गेमिली याच्या अवलोकनांत जेवढ्या गोष्टी आल्या तेवढ्याच त्यानें लिहून ठेविल्या असें नाहीं, तर त्याशिवायही त्यानें दुसरी पुष्कळ उपयुक्त माहिती मिळवून लिहून ठेविली आहे. मोंगललोक, त्यांची राज्यव्यवस्था, फौजफाटा, अमीरउमराव वगैरेसंबंधानें त्यानें पुष्कळ उपयुक्त माहिती दिली आहे. तसेंच हिंदु मुसलमान लोकांच्या चालीरीती, त्यांचे आचारविचार, लग्नपद्धति, प्रेतसंस्कार इत्यादि गोष्टींसंबंधानेंही त्याच्या प्रवासांत उल्लेख असल्याचें दिसन येत आहे. पतिनिधनानंतर ब्राह्मणस्त्री सती न गेल्यास तिचें केशवपन होत असे. वैधव्यबंधनें दुःसह होऊन विधवांचें पाऊल वांकडें पडल्यास त्यांचा मनस्वी छळ होत असे, इतकेंच नाहीं तर त्यांना घरांतूनही घालवून लावण्यांत येत असे. अशा रीतीनें अगदीं अनाथ व समाजहीन बनलेल्या स्त्रिया मुसलमानी किंवा ख्रिस्तीधर्म स्वीकारीत असत, असें त्यानें लिहिलें आहे.

सतीची क्रूर व निर्दय चाल बंद व्हावी ह्मणून मोंगलांनीं व दुसऱ्या कित्येक राजांनीं परवानगीशिवाय सती जाऊं नये ह्मणून हुकूम केले होते. परंतु अम्मलदारांस पैसे वगैरे दिले ह्मणजे ही परवानगी सहज मिळत असे. तो ह्मणतो, येथें हिंदुलोक ख्रिस्ती किंवा मुसलमान लोकांबरोबर जेवीत नाहींत किंवा त्यांच्या भांड्यांचा उपयोग करीत नाहींत. परंतु मलाका बेटांत किंवा दुसऱ्या देशांत या लोकांस त्याबद्दल कांहींच विधिनिषेध वाटत नाहीं. यावरून हें उघड दिसतें कीं, इराणी आखातांत व मलाकाबेटांत आमचे लोक त्याकाळीं होते.

गोवळकोंडें येथील रत्नांच्या खाणींविषयीं त्यानें जी माहिती दिली आहे ती अशीः—सुमारें १४० वर्षांपूर्वी (इ० स० १५९९ च्या सुमारास). कोणी शेतकरी आपलें शेत नांगरीत असतांना त्यास अत्यंत तेजोमय असा हिरा सांपडला. तो त्यानें गांवांत आणून विकला. हिरा फार मौल्यवान् असल्यामुळें त्याविषयीं सर्व गांवभर बातमी पसरली. तेव्हां पुष्कळ लोक त्या शेतकऱ्याच्या मागोमाग शेतांत गेले आणि हिरे शोधण्याच्या प्रयत्नास लागले. त्यांपैकीं कित्येकांस हिरे सांपडले. मग काय विचारतां, हिरे शोधण्याचा एकसारखा सपाटा चालला. नंतर शहानें त्या सर्व जमिनीचा ताबा आपल्याकडेस घेतला व ती जमीन हातावर विकण्यास आरंभ केला.

जेवढी जमीन खोदण्याकरितां विकत घ्यावयाची तिजपेक्षां जास्त जमिनीवर प्रथम ते हात दीडहात उंचीची भिंत घालून ठेवीत. नंतर राजाकडून जी जमीन विकत घेतली असेल ती सहा सात हात किंवा पाणी लागेपर्यंत खोल खणीत असत. पाणी लागल्यावर खोदण्याचा प्रयत्न सोडून देत; कारण पाण्याखालीं हिरे सांपडण्याची मुळींच आशा नसे. ही खणलेली माती पूर्वीं भिंत घालून ठेवलेल्या जागेंत टोपल्यांतून नेत, आणि तेथें त्या मातीवर पुष्कळ पाणी घालून तिचा पातळ चिखल करीत. त्या चिखलावर पुनः पाणी घालून भिंतींत मुद्दाम ठेवलेलीं भोकें मोकळीं करीत, त्यामुळें मातीचा भाग बाहेर वाहून जाऊन आंत वाळू राही.

तींत पुनः पाणी घालून पूर्ववत् मातीचा अंश काढून टाकीत. वाळू वाळल्यानंतर चाळून काढीत व पुनः तिचा ढीग करून सोडग्यांनीं बडवीत. नंतर पुनः एकदां चाळीत. इतकें झालें ह्मणजे मग ती माती पसरून तींतून गिऱ्हाइकांदेखत व राजाच्या अम्मलदारांदेखत हिरे शोधून काढीत. अमुक ठरींव वजनापेक्षां जास्त वजनाचे हिरे निघाले कीं, ते अम्मलदार लोक राजाकडे नेऊन हजर करीत असत.

दुसरीही कांहीं अवांतर माहिती यानें लिहून ठेविली आहे. परंतु ती फारशी उपयुक्त नसल्यामुळें तिजविषयीं येथें उल्लेख करीत नाहीं. गेमिली यानें पृथ्वीपर्यटण केलें असून त्यानें जें आपलें प्रवासवृत्त लिहिलें आहे तेंही फार मोठें आहे. तो आपली प्रवासाची हकीकत दररोज लिहून ठेवीत असे. वाटेची सर्व हकीकत, तसेंच ज्या गांवीं तो गेला त्या गावाविषयीं, तेथील लोकांविषयीं, तेथील इमारती, राजमंदिरें, उपवनें, तेथें दृष्टीस पडलेलीं फळझाडें, फूलझाडें, पशुपक्षी, तेथील लोकांच्या चालीरीती, सरकार, फौजफाटा व इतर जी ऐतिहासिक माहिती मिळत गेली तीही त्यानें नमूद करून ठेविली आहे. गेमिली याच्या अगोदर पुष्कळ युरोपियन प्रवासी अनेक देशांतून प्रवास करून गेले होते. परंतु यानें जशी विविध माहिती लिहून गोळा करून ठेविली आहे, तशी कोणीही लिहून ठेविली नाहीं. त्यांच्या प्रवासवृत्तांत असंबद्ध, काल्पनिक व दैविक गोष्टींचाच बहुत करूनउल्लेख असे.

गेमिली यानेंही कित्येक भोळसट व अज्ञानमूलक अशा गोष्टी लिहून ठेविल्या आहेत. पूर्वींच्या लोकांत जो भोळेपणा दिसून येतो त्यास गेमिली ह्मणजे अपवाद होता असें नाहीं. तो जरी विद्वान् व बहुश्रुत होता, तरी त्या काळाच्या मानानें त्याच्या विचारांत भोळसरपणा दिसून येतो. अलीकडील सुशिक्षित मनुष्य ज्या गोष्टींवर क्षणभरही विश्वास ठेवणार नाहीं, अशा गोष्टी गेमिली यास खऱ्या वाटत असत. ईजिप्तमध्यें मसाला घालून ठेवलेल्या प्रेतांच्या अस्थि जखमांस व इतर दुखण्यास फार गुणावह असतात, असें त्यास समजल्यावरून त्यानेंही अशा कांहीं

अस्थि बरोबर घेतल्या व त्या सर्व प्रवासभर मोठ्या काळजीनें बाळगल्या. भुतेंखेतें वगैरे असून तीं मनुष्यास त्रास देतात, असाही त्याचा पक्का समज होता. छातींत मोठमोठाले खिळे ठोकून घेतलेले कांहीं आरब यानें पाहिले, या आरब लोकांस जखमा झाल्याचीं कांहींच चिन्हें दिसत नव्हतीं. हें पाहून तो ह्मणतो, ' हें काय गौडबंगाल आहे तें त्यांचें त्यांनाच माहीत. परंतु दुसरा कोणी खिळे मारून घेण्यास तयार झाला तर हे ढोंगी लोक त्याजवर हा प्रयोग करीत नाहींत. ' वसई येथें एका डोंबाऱ्यानें कांहीं खेळ केले ते पाहून कांहीं तरी अद्भुत शक्तीच्या साहाय्याशिवाय ते खेळ करतां येणें शक्य नाहीं, असें तो ह्मणतो. दीव येथें एक मनुष्य ४०० वर्षे वयाचा होता. त्याला तिनदां दांत आले. त्याची दाढी पांढरी होऊन नंतर पुनः काळी होऊन फिरून पांढरी झाली होती, असें तो लिहितो. फिलिपाईन बेटांत अशीं कांही झाडें आपण पाहिलीं आहेत कीं, त्यांचीं पानें परिपक्व होतांच पंख, पाय, शेंपूट इत्यादि अवयवांचे त्यांपासून पक्षी होतात व त्यांना पक्ष्याप्रमाणें उडतां येतें. माकडांविषयींही यानें अशाच कित्येक विलक्षण गोष्टी लिहून ठेविल्या आहेत. पूर्वीं आमचे लोक जसे भोळे असत तसेच युरोपियन लोकही होते. सारांश, अलीकडे शें दीडशें वर्षांत जशी विचार करण्याची विशेष प्रवृत्ति दिसून येते, तशी पूर्वीं नव्हती.

## तो हिंदुस्थान सोडून जातो.

गोव्याहून निघून सिलोन, मलाका, बोर्नियो, सयाम, पेगू, चीन, मकाओ, फिलिपाईन बेटें, आकापल्को, क्यालिफोर्नीया, व्हेरक्रूझ इत्यादि अनेक देशांत प्रवास करून तो आपल्या देशीं परत गेला. या अनेक देशांत प्रवास करीत असतांना त्यानें ज्या ज्या गोष्टी पाहिल्या त्या सर्व लिहून ठेविल्या आहेत. त्या फार मनोरंजक व बोधप्रद आहेत. परंतु आपल्या या हिंदुस्थान देशांत प्रवास करीत असतांना त्यानें ज्या गोष्टी पाहिल्या व लिहून ठेविल्या, तेवढ्याच येथें नमूद करावयाच्या असल्यामुळें पुढील हकीकतीशीं आपणास कांहींच कर्तव्य नाहीं.

इकडे आलमगीर बादशहाची जशी त्यानें भेट घेतली तशीच चीनमध्यें गेल्यावर चीनच्या सार्वभौम बादशहाची भेट घेतली. चीनच्या सर-हद्दीवर जी मोठी भिंत आहे व जगांतील सात आश्चर्यांत जिची गणना आहे, तीही त्यानें स्वतः जाऊन पाहिली. मेक्सिको देशांत त्यानें सुमारें अकरा महिने मुक्काम करून तेथील बहुतेक शहरें, रमणीय स्थळें व रुप्याच्या खाणी पाहिल्या. अशा रीतीनें प्रवास करीत करीत तो नेपल्स येथें डिसेंबर १६९९ त येऊन पोहोंचला. पृथ्वी-पर्यटणास त्याला पांच वर्षें, पांच महिने व वीस दिवस लागले. त्या काळीं खुष्कीचा प्रवास फार कष्टमय असून समुद्रप्रवासांतही अली-कडील सुधारणा व सोई मुळींच नव्हत्या. आगबोटीच्यायोगानें समुद्रप्रवास विशेष सुखकर, सुलभ व सोईस्कर झाला आहे. तसेंच बहुतेक सर्व देशांत आगगाड्या झाल्यामुळें जमिनीवरील प्रवासही फार सुखकर झाला आहे. पृथ्वीपर्यटण हल्लीं ऐशीं दिवसांत सहज करितां येतें. यावरून त्या काळचा प्रवास किती कष्टमय असेल याची वाचकांस सहज कल्पना करितां येईल. तो व्हेनीस येथील गुप्त हेर आहे, या संशयावरून त्यास कारागृहांत टाकण्यांत आलें व तेथेंच त्याचे शेवटचे दिवस गेले.

## उपसंहार.

पोर्तुगीज लोक प्रथम व्यापार करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांत आले. कलिकत येथील राजानें त्यांस आश्रय दिल्यावर त्यांनीं हळूहळू गोवें प्रांत सर केला, आणि समुद्रकिनाऱ्यानें आपली सत्ता वाढवून दीव, दमण, साष्टी, मुंबई वगैरे बहुतेक मुख्य बंदरें काबीज केलीं. त्यांनीं आपली सत्ता अधिक वाढविली असती; परंतु मराठे व मोंगल प्रबळ असल्यामुळें त्यांना ठिकाणच्या ठिकाणीं बसणें भाग पडलें. पोर्तुगीज अमलांत हिंदु प्रजेचा फारच धर्मच्छळ झाला. त्यांच्या दीन स्थितीचें हृदयद्रावक वर्णन इतिहासांत वाचलें ह्मणजे अंगावर रोमांच उभे रहातात. त्यांनीं प्रजेशीं कुबुद्धि धरून इनामदारांचीं दरोबस्त वतनें

बुडविली. देवालयें फोडून भ्रष्ट केलीं. आपल्या धर्माज्ञेनुरूप कोणी कांहीं व्रतें उद्यापनें केलीं तर त्यांच्या घरास वेढा घालून त्यांना पकडून नेऊन त्यांचे हालहाल करून त्यांना बाटवावयाचें. यामुळें धर्म-महोत्सव होणें अगदीं बंद झालें. ब्राह्मणांवर पूर्ण वक्रदृष्टि असून त्यांना मुलखांत फिरण्याची सक्त मनाई असे. गांवांतील विहिरींत व तळावांत थुंकून व उष्टें मांस टाकून तीं बाटविलीं. गांवचे गांव बाट-वून किरिस्ताव केले. चोहोंकडे खिस्तीधर्म चालू केला. रोमन क्याथोलिक पंथांत हिंदुधर्माप्रमाणेंच पूजाअर्चा असल्यामुळें पुष्कळ अज्ञ मूढ लोक सहज बाटूं लागले. बाटे लोकांचें श्रेष्ठत्व मानण्यांत येऊं लागल्यामुळें त्यांना विशेष स्फुरण आलें.

यांप्रमाणें त्यांच्या प्रांतांत जे अनेक जुलूम चालू झाले, त्यांस त्रासून स्वधर्मरक्षणार्थ पुष्कळ लोकांनीं देशांतर केलें. कित्येक घरंदाज व पुढारी लोक पेशव्यास शरण गेले व या धर्मछलांतून आह्मांस सोडवा व हिंदुधर्माचें रक्षण करा ह्मणून विनंति केली. तिकडील हकीकत ऐकून पेशव्यांचें चित्त द्रवलें व चिमाजी आप्पाच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांनीं त्यास वसईवर रवाना केलें. चिमाजी आप्पानें वसई सर केली व हिंदु प्रजेचे आशीर्वाद घेतले. मुसलमानी अमलांत हिंदूंचा विशेष धर्मछल झाला. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तरवार याप्रमाणें धर्मप्रसार त्यांनीं केला. पोर्तुगीज प्रांतांत कशी स्थिति होती, याचें वर दिग्दर्शन केलेंच आहे. विधर्मीय अमलाखालीं प्रजेस अनेक दुःखें भोगावीं लागत असतात, ही गोष्ट अगदीं महशूर आहे. याची साक्ष बल्गेरिया, नेपल्स, ग्रीस, आर्मेनिया वगैरे युरोपीयन देशांच्या इतिहासावरून व तसेंच हिंदुस्थानांतील मुसलमानी रियासती-वरून सहज पटणार आहे. परंतु सुदैवानें ती स्थिति नाहींशी झाली आहे. इंग्रज सरकारच्या अमलांत सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांस पूर्ण स्वातंत्र्य असून धर्मबाबतींत हात घालून प्रजेचीं मनें आह्मीं कधींही दुखविणार नाहीं, असें त्यांचें अभिवचन आहे! आणि याबद्दल आपण त्यांची स्तुति करावी तेवढी थोडीच आहे.

श्री

# ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें प्रकरण.

---

# पंचांग ह्मणजे काय?

---

हें पुस्तक

रा० रा० अमृत माधव वाघोलकर

यांनीं तयार केलें तें

कोल्हापूर येथें

'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिलें.

पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

---

शके १८२१.

सन १८९९.

किं० ०२ आणे.

श्री.

गुरुवर्य रावसाहेब **रघुनाथ नारायण आपटे**, एम्. ए. एल्. एल्. बी.

प्रोफेसर राजाराम कॉलेज कोल्हापूर यांचे सेवेसी, त्यांची

विद्वत्ता, स्वदेशवात्सल्य, महाराष्ट्रभाषाप्रेम, आंग्ल

व हिंदु ज्योतिर्गणितशास्त्रांत प्रावीण्य, सद-

यता, कोणताही विषय शिष्यांच्या मनां-

त भरवून देण्याची शैली, इत्या-

द्यनेक सद्गुणांस मोहित हो-

ऊन पूज्यभावानें हें ल-

हानसें पुस्तक त्यां-

च्या परवा-

नगीनें,

अर्पण केलें आहे.

ज्योतिःशास्त्रमहोदधेः परमगात्पारं यदीया मति-

र्वाग्मी न्यायसभासु यः परगुणग्राही सदध्यापकः।

दैवी वाग्भजतेऽङ्गनेव च परा भाषाङ्ग्लदेश्या च यं

स श्रीमान्रघुनाथराय इह मे जीयाच्चिरं देशिकः॥ १॥

प्रिय नम्र शिष्य

**ग्रंथकर्ता.**

# प्राणी.

## निबंध १ ला.

## प्राण्यांचे उपयोग.

**१ प्राणी आणि कळप. २ प्राण्यांचा जमिनीशीं संबंध. ३ प्राण्यांचा पिकाशीं संबंध. ४ मनुष्यास प्राण्यांपासून उपयोग. ५ शेतीच्या धंद्यांत प्राण्यांचें महत्व.**

### १. प्राणी आणि कळप.

शेतकीच्या दृष्टीनें विचार करितां प्राणिवर्गाचे सामान्यत्वें सहा उपयोग आहेत. जमिनीचा सुपीकपणा कायम राहण्यास प्राण्यांपासून फार साह्य होतें. पिकांची व्यवस्था लावण्यास प्राण्यांची मदत होते. प्राणी अगर त्यांपासून तयार होणारे पदार्थ यांचा अन्नाच्छादनाचे कामीं स्वाभाविक उपयोग आहे. शेतकीच्या धंद्यांतील कामांत त्यांचा फार उपयोग होतो. शेतांत रान उगवलें असलें तर, प्राणी तें खाऊन टाकतात व जमीन साफ करितात. वनस्पतींस त्रास देणाऱ्या जीव-जंतूंचाही प्राणी नाश करितात. प्राण्यांच्यायोगानें शेतीच्या धंद्यांत वैचित्र्य येतें व जेव्हां शेतकऱ्यास शेतवाडींत काम नसतें, तेव्हां शेत-कऱ्यास पाळलेलीं जनावरें एक विरंगुळाच असतो; त्यायोगानें त्यास सतत उद्योग करण्याची संवय लागते व त्याजवर आळसाचा अंमल बसत नाहीं.

प्राण्यांची जेव्हां पुष्कळ प्रमाणावर वाढ केलेली असते, तेव्हां तीस सामान्यत्वें कळप अशी संज्ञा देतात. कळप हे गाई, बैल, ह्मशी, रेडे घोडे, शेळ्या, मेंढ्या, कोंबडीं, बदकें, डुकरें, खबुतरें, मासे वगैरे कोण-त्याही प्राण्यांचे असूं शकतील; परंतु प्रचारांत कळप ही संज्ञा मुख्यतः

चतुष्पाद प्राण्यांस लावतात. शेतीच्या बाबतींत विचार करावयाचा ह्मणजे मुख्यतः चतुष्पाद प्राण्यांसंबंधींच ह्मणजे गाई, बैल वगैरे गुरां-ढोरांसंबंधींच होय; आणि या लेखांत प्राणी व कळप हे दोन्ही शब्द मुख्यतः गुरांढोरांचे वाचक आहेत असें समजावें.

## २. प्राण्यांचा जमिनीशीं संबंध.

जमिनीच्या जातीची सुधारणा करण्यांत व तिचा मगदूर वाढविण्यांत ज्या गोष्टींचें साह्य होतें, त्यांत वनस्पतींस निःसंशय प्रथम स्थान देणें भाग आहे; व त्याचें सविस्तर विवेचन जमीन या विषयावरील पांचव्या निबंधांत केलें आहे. प्राण्यांसंबंधानें पाहूं गेलें तर जमीन सुधारण्याच्या कामीं मदत करण्यांत यांचा दुसरा नंबर लागतो. गुराढोरांचे कळप शेतांतून चरत असतांना सहजींच सर्व खत जमिनीस मिळत असतें. गुरेंढोरें अशीं शेतांत मोकळीं न सोडतां जर ठाणबंदी असलीं तर मात्र शेतकऱ्याच्या निष्काळजीपणामुळें खताचा बराच नाश होतो.

ज्या मानानें शेतकऱ्याजवळ गुरें असतील त्या मानानें त्याचे जमिनीस सुपीकता प्राप्त होते. गुरांस खाऊं घालण्यास त्यास वैरण विकत घ्यावी लागते ही गोष्ट खरी; परंतु शेतीपुरताच जरी विचार केला, तरी गुरांपासून मलमूत्राच्या रूपानें शेतकऱ्यास जें खत प्राप्त होतें, तो त्यास निव्वळ फायदा पडतो असें ह्मटलें पाहिजे. मोठ्या प्रमाणावर व मिश्र शेती करावयाची असेल तर, गुरें पाळणें हें अत्यावश्यक आहे. कारण अशा प्रकारच्या शेतींत विकत घेतलेलीं खतें मुळींच पुरवठ्यास येत नाहींत. लहानशीच शेतवाडी असेल तर खतें विकत घेऊन चालतें. गुरें पाळल्यापासून अनायासें मुबलक खत प्राप्त होऊन, शिवाय त्यांपासून नैसर्गिक दूधदुभत्याच्या बाबतींत उपयोग होतो तो निराळाच[1].

---

१ प्राण्याच्या मलमूत्रापासून जें खत तयार होतें त्याचा जमिनीस किती उपयोग आहे याचें वर्णन ‘ जमीन ’ या विषयावरील निबंधांत पहा. तसेंच ‘ कृषिकर्मविद्या ’ ‘ वर्गाच्यांचे पुस्तक ’ वगैरे ग्रंथ पहावे.

## ३. प्राण्यांचा पिकाशीं संबंध.

जमिनींत जितकीं पिकें तयार होऊं शकतील तितकीं जर तयार केलीं व विकूं गेलें, तर त्यांस गिऱ्हाईक मिळण्याची पंचाईत पडेल. अशी स्थिति असल्यामुळें, जमिनींत तयार होणाऱ्या पिकांपैकीं कांहीं पिकांचा उपयोग प्राणी पोसण्याकडे करून, मांस, दूध, तूप, अंडीं वगैरे रूपांनीं त्यांची विक्री केली पाहिजे. असें केलें असतां जमिनींतील पीक मोफत न जातां तें उपयोगीं लागेल.

वर दर्शविलेल्या उपयोगापेक्षां महत्वाचा दुसरा एक उपयोग शेतकऱ्यांस गुरें पाळल्यापासून सहजींच होतो. तो कोणता ह्मणाल तर, ज्या पिकांवर शेतकरी गुरें पोसतो, त्या पिकाचा कांहीं अंश खताचे रूपानें जमिनीस पुन्हा परत केला जाऊन ती चांगली सुपीक बनते. व्यापारी धोरणानें पाहिलें तर कांहीं जातीचीं पिकें विकल्यानें फार नुकसान आहे. कांहीं जातींचें गवत असें आहे कीं, तें जर उभें विकलें, तर त्याच्यायोगानें जमिनींतील वनस्पतींच्या पोषक द्रव्यांच्या बाबतींत जें नुकसान होतें तें, तेंच गवत गुरांस खाऊं घालून, त्यांपासून उत्पन्न होणारे पदार्थ दूध वगैरे विकल्यानें जें नुकसान होतें, त्यापेक्षां फार अधिक असतें.[१]

## ४. मनुष्यास प्राण्यांपासून उपयोग.

जीं मनुष्यें मांसाहारी असतात, त्यांस प्राण्यांचा अन्नाप्रमाणें उपयोग आहे. गाई, बकरीं, कोंबडीं, डुकरें, मासे वगैरे पुष्कळ प्राण्यांचे मांसाचा मनुष्य आपल्या निर्वाहाकरितां उपयोग करितो.

---

१. क्लोवर (Clover) नांवाचें एक विलायती गवत आहे. तें एक टन तयार होण्यास जमिनींतून ४० पौंड नैट्रोजन, १० पौंड फॉस्फरिक असीड आणि ४० पौंड पोट्याश शोषून घेतें. तेंच गवत गुरांस खाऊं घातलें, व एक टन लोणी तयार केलें तर त्यांत २॥ पौंड नैट्रोजन व फास्फरिक असीड व पोट्यास प्रत्येकीं सुमार १ पौंड असतो. तेव्हां नुसतें गवत विकण्यापेक्षां गुरें पोसून दूध वगैरे विकणें दुप्पट फायद्याचें होणार आहे हें सहज लक्षांत येईल.

मांसाहारी लोकांची गोष्ट जरी बाजूस ठेवली, तरी दूध, अंडीं[1] वगैरे रूपानें प्राण्यांपासून मनुष्यास अनेक उपजीविकेचे पदार्थ प्राप्त होतात.

वस्त्राच्छादनाचे कामींही माणसास प्राण्यांचा फार उपयोग आहे. प्राण्यांचे लोकरीपासून मौल्यवान वस्त्रें तयार करितात. त्यांच्या कातड्यांचे जोडे वगैरे अनेक उपयोगी पदार्थ होतात. प्राण्यांचीं पिसें, शिंगें, हाडें, केंस वगैरे जे अवयव आहेत, त्यांचा मनुष्यास अनेक रीतीनें उपयोग होतो. मनुष्य कलाकौशल्याचे साह्यानें प्राण्यांचा अगर त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचा अनेक रीतीनें उपयोग करून घेत आहे.

शेतकीच्या कामांत अवश्यक खतांची प्राप्ति प्राण्यांपासूनच होते. प्राण्यांचें रक्त व हाडें यांपासून नैट्रोजन, फॉस्फरिक असीड वगैरे द्रव्यें मिळतात. कसाईखान्यांतील घाणीमध्यें वनस्पतींचीं पोषक द्रव्यें विपुल असतात.

या सर्व गोष्टींशिवाय महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, प्राण्यांपासून मनुष्यास संगतीचा लाभ चांगला होतो. कुत्रीं, मांजरें, ससे, पोपट वगैरे पाळलेले पक्षी, यांचे संगतीपासून मनुष्यास अतिशय सुख होतें. धनगरास कुत्र्याची, शेतकऱ्यास गुरांढोरांची किती सोबत असते, हें थोड्या विचारानें सहज कळणार आहे. सारांश प्राण्यांपासून माणसास इतके उपयोग आहेत कीं, त्यांशिवाय त्याचें बिलकुल चालावयाचें नाहीं.

## ८. शेतकीचीच्या धंद्यांत प्राण्यांचें महत्व.

जमीन नांगरण्याच्या कामीं पशूंचा फार उपयोग होतो. यंत्रविद्येंत कितीही सुधारणा झाली व नाना प्रकारचीं शेतकीचीं हत्यारें जरी निघालीं, तरी बैल, रेडे, घोडे वगैरे जनावरांखेरीज शेतकीचें काम कधींही चालावयाचें नाहीं. माल एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं नेण्याकरितां

---

१ युरोपांत शाकाहारी किंवा निवृत्तमांस जे असतात त्यांस अंडीं चालतात. त्यायोगें प्राणहत्या होत नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे.

आगगाड्या वगैरे साधनें जरी झालीं आहेत, तरी बैलगाड्या अगदींच बंद पडल्या नाहींत व पडावयाच्या नाहींत. आगगाड्या, जनरथ, विजेच्या गाड्या, बायसिकलें व बैल अगर घोड्यांच्या साह्यावांचून चालणाऱ्या नवीन निघालेल्या गाड्या वगैरे अनेक स्थलांतराचीं साधनें जरी निघालीं आहेत, तरी घोडागाडी अगर बैलगाडी ही अगदीं निरुपयोगी कधींही व्हावयाची नाहीं.

अलीकडे वाफेनें चालणारे नांगर वगैरे आऊतें[1] निघालीं आहेत; त्यांचा उपयोग शेतकीच्या कामांत करितात. परंतु शेतीचें क्षेत्र जर मोठें असेल, तरच या वाफेनें चालणाऱ्या आऊतांचा उपयोग होतो. लहानसा शेतमळा असेल तरं हीं आऊतें अगदीं निरुपयोगीं ठरतात. तेव्हां अशा ठिकाणीं बैल, घोडे वगैरे जनावरांचीच जरूर लागणार.

शेतकऱ्याजवळ जनावरें असलीं ह्मणजे शेतांत उगवणाऱ्या रानासंबंधानें त्यास मुद्दल काळजी करणें नको. तीं तें रान खाऊन फन्ना करितात शेळ्या मेंढ्यांच्या सपाट्यांतून शिल्लक राहणारें, असें रानटी झाडच नाहीं. जनावरें मोकळीं चरत असलीं ह्मणजे, झाडांखालीं पडलेलीं किडकीं फळें, पानें पार खाऊन टाकतात, व त्यामुळें वनस्पतींच्या रोगाचा फैलाव होत नाहीं. डुकरें वगैरे तर जमीन उकरून तींतील वनस्पतींस त्रास देणारे जीवजंतू खाऊन त्यांचा नाश करितात. कोंबडीं, बदकें वगैरे तर या कामांत मोठीं वस्ताद असतात.

जनावरांच्यायोगानें शेतकीच्या धंद्यांत एक प्रकारचें वैचित्र्य असतें. जनावरें असलीं ह्मणजे शेतकरी निरनिराळीं पिकें तयार करितो अगर त्यास तीं करावीं लागतात. कारण जनावरें बैठीं ठेवून खर्च चालत नाहीं. कांहीं पिकें तर मुद्दाम जनावरांच्या पोषणाकरितां शेतकऱ्यास

१. विलायती हत्यारांचा हिंदुस्थानांतील शेतीस कितीसा उपयोग होईल याचें वर्णन रा० पावगीकृत 'भारतीय साम्राज्य पुस्तक १ लें' यांतील ३।४ भागांत केलें आहे तें पहावें.

करावीं लागतात; व त्यामुळें सहजीं मिश्र शेतीचें अवलंबन होऊन जमीन चांगली सुपीक होते.

ज्यावेळीं शेतीचा हंगाम जारीचा नसतो, त्यावेळीं गुरेंढोरें नसल्यास शेतकऱ्यास कांहीं काम नसतें व त्यामुळें त्याची प्रवृत्ति आळसाकडे होण्याचा फार संभव असतो. परंतु गुरेंढोरें असलीं ह्मणजे त्यांचे शुश्रूषेंत त्याचा वेळ आनंदानें जातो, जनावरें असलीं ह्मणजे शेतकऱ्यास सतत उद्योग असतो व शेतकीचें काम सुयंत्रित चालतें. मनुष्य उद्योगांत असला कीं, दुर्व्यसनाकडे त्याची प्रवृत्ति होत नाहीं. उत्तम प्रकारचा जो कामकरी आहे त्यास नेहमीं काम असावेंसें वाटतें व त्याच्या अभावीं त्यास चैन पडत नाहीं.

# निबंध २ रा.

## प्राण्यांचा जीवनव्यापार.

१. पेशी व तिचा जीवनव्यापाराशीं संबंध-पेशी-एकपेशीमय प्राणी–बहुपेशीमय प्राणी. २. प्राण्याचें अन्न–अन्नाचें वर्गीकरण–अन्नाचीं घटक द्रव्यें. ३. अन्नपचन–पचनक्रिया ह्मणजे काय:– लाळ–जाठर रस–आंतड्यांतील पचनक्रिया. ४. पचन पावलेल्या अन्नद्रव्यांचें शोषण–शोषणक्रियेचा प्रकार–आंतड्यांत उत्पन्न झालेल्या रक्ताची व्यवस्था. ५. श्वासोच्छ्वास-श्वासोच्छ्वास ह्मणजे काय–श्वासोच्छ्वासक्रियेनें रक्तांत होणारा फरक–श्वासोच्छ्वासास लागणाऱ्या हवेचें प्रमाण. ६. क्रिया, नाश आणि विश्रांति.

### १. पेशी व तिचा जीवनव्यापाराशीं संबंध.

१. पेशी:—प्राण्याच्या अगर वनस्पतीच्या शरीराची घटना पेशींच्या संयोगानें झाली आहे. शरीरांतील जीवनव्यापार सुयंत्रित चालण्याचें मुख्य बीज या पेशींत आहे. प्रत्येक प्राण्याच्या शरीरांतील पेशी ह्मणजे एक मऊ गोंदासारखा पदार्थ असतो. ही पेशी ( Cell ) नुसत्या डोळ्यांनीं दिसणें अशक्य आहे. अंड्यांतील पांढऱ्या बलकाचा एक अति बारीक कण घेऊन तो सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यास जसा दिसेल, तशी ही पेशी असते. अशा अनेक पेशी फार नाजुक धाग्यांनीं एकमेकांस जडून शरीर बनलेलें असतें. पेशीला सारे दोन भाग असतात. घट्ट आणि कणरहित असा बाहेरील भाग, व पातळ व कणयुक्त असा आंतील भाग. पेशींतील अत्यंत महत्वाचा भाग ह्मणजे जीवबिंदु ( Protoplasm ) होय. हा जीवबिंदु प्राण्याच्या सजीवत्वास साक्षात्

कारणीं आहे. सजीव प्राण्याच्या प्रत्येक सजीव पेशींत हा असलाच पाहिजे. यावरून सजीव सृष्टीचें आदिकारण पेशी होय असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

२. **एकपेशीमय प्राणी**:—अगदीं खालच्या दर्जाचा प्राणी घेतला तर तो एकपेशीमय असतो. ही पेशीच जीवनास लागणारे सर्व व्यापार करीत असते. ही पेशी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकते. ती वाटोळी असेल तर लांबट होते. याप्रमाणें जरूरीचीं सर्व कार्यें पेशीच स्वतः करिते.

सूक्ष्मदर्शक यंत्राच्याच साह्यानें दिसतील असे बारीक कण ग्रहण करण्याकरितां, हा एकपेशीमय प्राणी एका ठिकाणाहून निरनिराळ्या ठिकाणीं जातो. बारीक बारीक दुसरे कण शोषून घेऊन ते पचवून आपल्या शरीराची वृद्धी करितो. तसेंच ग्रहण केलेल्या द्रव्यांपैकीं नाश पावलेलीं व निरुपयोगीं द्रव्यें बाहेर टाकतो. पाण्यामध्यें मिश्र असलेलीं पोषक द्रव्यें ग्रहण करून, पचवून, आपली वृद्धि करण्याचें सामर्थ्य या एक-पेशीमय प्राण्यांत असतें. तसेंच त्याच्या अंगांतील मळ वगैरे निरुपयोगी भाग बाहेर टाकण्याचेंही त्यास सामर्थ्य असतें.

जेव्हां ही पेशी अतिशय वाढते, तेव्हां तिच्या स्वतंत्र निरनिराळ्या पेशी बनतात व या निरनिराळ्या पेशींमध्यें जनक पेशीप्रमाणें जीवबिंदू वगैरे जीवनव्यापार चालण्यास लागणारीं सर्व साधनें असतात.

सारांश या एकपेशीमय प्राण्यांस (आदिप्राणी) वरील दर्जाच्या प्राण्यांप्रमाणें निरनिराळ्या क्रिया करण्यास निरनिराळीं इंद्रियें जरी नसतात, तरी त्या प्राण्यांप्रमाणें सर्व क्रिया करण्याचें सामर्थ्य या आदि-प्राण्यांत असतें. हा प्राणी आपल्या शरीराच्या कोणत्याही भागाचा वाटेल तसा उपयोग करूं शकतो. हाताचें ग्रहण करण्याचें कार्य, पोटाचें पचन करण्याचें कार्य, शिरांचें रुधिराभिसरणकार्य वगैरे सर्व इंद्रियांचीं कार्यें, ही पेशीच करीत असते. कोणत्याही प्रकारचें इंद्रिय

नसतां, हा एकपेशीमय प्राणी आपलें उदरभरण, मलविसर्जन, पुनरुत्पादन वगैरे व्यवहार स्वतंत्रपणें करितो.

३. **बहुपेशीमय प्राणी :—** एकपेशीमय अगर आदिप्राण्यांपासून जसें जसें वर जावें, तसें तसें आपल्या अनुभवास येतें कीं, वरील दर्जाच्या प्राण्यांमध्यें एकपेशी नसून अनेकपेशी एकत्र जमून त्या प्राण्याचें शरीर बनलेलें आहे. आतां वरील दर्जाचा प्राणी जरी अनेकपेशीमय असतो, तरी त्याच्या शरीरांतील एकही पेशी निरुपयोगी नसून जीवनव्यापार सुयंत्रित चालण्यास एकपेशीमय प्राण्याचे पेशीइतकेंच बहुपेशीमय प्राण्याचे शरीरांतील प्रत्येक पेशीचें महत्व असतें. वरील दर्जाच्या व अधिकाधिक घोंटाळ्याची रचना ज्या प्राण्यांत आहे, त्यांच्या शरीरांत प्रत्येक पेशीच्या बाहेरच्या बाजूस एक तंतुमय जाळें बनलेलें असतें, व अशा जाळ्यांत प्रत्येक पेशी अडकलेली असते. एकपेशीमय प्राण्यांचे शरीरांतील पेशीमध्यें जसें अनेक व्यापार करण्याचें सामर्थ्य असतें, तसें बहुपेशीमय प्राण्यांचे शरीरांतील पेशीमध्यें नसतें; तर प्रत्येक पेशीस कांहीं एक काम ठरवून दिलेलें असतें; तें काम ती बिनचूक करीत असते. एकपेशीमय प्राण्यांचे पेशींत जसे सर्वसाधारण धर्म असतात, ह्मणजे जीवनव्यापारास अवश्य लागणारीं सर्व कामें जशी एकच पेशी करीत असते, तशी स्थिति बहुपेशीमय प्राण्यांत नसून त्यांच्या घटक पेशींपैकीं प्रत्येक पेशीकडे निरनिराळें काम वाटून दिलेलें असतें व तें ती बिनतक्रार मुकाट्यानें करिते. मग तें काम करण्यास कितीही संकटें येवोत, ती आपलें विशिष्ट कार्य मिळून सोडावयाची नाहीं.

कांहीं पेशी शरीरपोषणाचें काम करीत असतात, तर कांहीं हाडांतील बारीक छिद्रांत वास करून शरीरपोषणाचें काम करणाऱ्या

---

१. एकपेशीमय प्राण्याचें उत्तम उदाहरण 'आमिबा' Amœba हा प्राणी होय. हा वनस्पतींनीं भरून गेलेल्या तलावांत आढळतो. हा इतका सूक्ष्म असतो कीं, सूक्ष्मदर्शक यंत्राचे साह्यावांचून तो दिसत नाहीं. रा० भाटेकृत 'जीवनशास्त्राचीं तत्वें' पु० १, पृ० १ पहा.

इतर पेशींस हाडांतून पोषक द्रव्यें सुयंत्रित नेण्यास मदत करतात. कांहीं पेशींचा मेंदू बनलेला असतो व कांहींचे ज्ञानतंतू बनलेले असतात. परंतु या रचनेंत मजा ही असते कीं, ज्ञानतंतू बनविणाऱ्या पेशी कधींही हाडांचें अगर दुसऱ्या अवयवाचें काम करावयाच्या नाहींत. त्यांकडे जें काम असेल तें कमी अधिक प्रमाणानें करितील; परंतु दुसऱ्याचे कामास हातभार लावण्याचें कार्य त्यांचेकडून व्हावयाचें नाहीं.

कांहीं पेशी शरीरांतील तारायंत्राचें काम करीत असतात. हे ज्ञानतंतू होत. हे ज्ञानतंतू बनविणाऱ्या पेशी मेंदूत, पाठीच्या कण्यांत व इतर भागांत असतात व त्यांच्यायोगानें शरीरांतील सर्व हालचाल मेंदूस पोंचते. सर्व शरीरभर बातमी पोंचविण्याचें काम या पेशींकडे असतें.

कांहीं पेशींचे 'पिंड' ( Glands ) बनलेले असतात, ते त्यांजकडे जो रस उत्पन्न करण्याचें काम दिलेलें असेल तो रक्तापासून वेगळा करून आपल्या नळ्यांतून बाहेर सोडून देतात. कांहीं पिंड दुग्धोत्पत्ति करणारे असतात, तर कांहींपासून पित्तोत्पत्ति होते व कांहींच्या योगानें मळ शरीराबाहेर टाकला जातो. रक्तांतून उपयुक्त पोषक द्रव्यें निवडून काढण्याचें काम कांहीं पेशींकडे असतें व त्या तें काम चिकित्सक करीत असतात.

कांहीं पेशी अन्नद्रव्यांपासून निरनिराळे पदार्थ तयार करण्यांत गुंतलेल्या असतात. यकृत नामक पिंड ज्या पेशींचा बनलेला असतो, त्या पेशी अन्नाची साखर तयार करितात व तिच्यायोगानें शरीरांत उष्णता तयार होते. स्नायूंचें काम व्यवस्थित चालतें व शरीराच्या पोषणास चांगली मदत होते.

---

१. शरीरांत अनेक रस उत्पन्न करणारे अनेक पिंड ( Glands ) असतात. लाळ अगर थुंकी उत्पन्न करणारे लाळपिंड. शरीरांत यकृत ( Liver ) नांवाचा एक अजस्त्र पिंड आहे, त्यापासून पित्त वगैरे अनेक पदार्थांची उत्पत्ति होते.

कांहीं पेशी आंतड्याचे आंतील बाजूस असतात. त्या अन्नामधील स्निग्ध द्रव्यें शोषून घेऊन रक्तवाहिन्यांत सोडून देतात.

अशाच अनेक पेशींशिवाय कांहीं पेशी शरीरांतील रक्तामध्यें स्वतंत्रपणें वास करीत असतात व इकडून तिकडे भ्रमण करीत असतात. या पेशींपैकीं कांहीं तांबड्या व कांहीं पांढऱ्या असतात. ह्या पेशी इतस्ततः सर्व शरीरांत भ्रमण करीत असतात; परंतु अशा पेशींकडेसुद्धां काम नेमूनच दिलेलें असतें. तांबड्या पेशी ज्या असतात, त्यांचेकडे प्राणवायु पोंचवण्याचें काम असतें; व पांढऱ्या रंगाच्या पेशींकडे तसेंच दुसरें महत्वाचें काम नेमलेलें असतें. सारांश वरील दर्जाचे प्राण्याचे शरीरांतील पेशींमध्यें अनेक कामें करण्याची शक्ति आदिप्राण्याचे पेशीप्रमाणें नसून, त्या कमी अधिक परतंत्र बनलेल्या असतात; व त्यांस जें काम नेमून दिलेलें असतें, तेवढेंच त्या करूं शकतात.

येथवर केलेल्या विवेचनावरून ही गोष्ट आपल्या पूर्णपणें लक्षांत येते कीं, आदिप्राण्यापासून वर वर पाहूं गेलें तर वरील दर्जाचे सर्व प्राण्यांची घटना पेशीमयच आहे. त्यांचे शरीरांतील सर्व अवयव पेशींचेच बनलेले असतात. कामाचे मानानें रंग, रूप, धर्म इत्यादि गोष्टींत फेरफार होऊन अनेक पेशी एकत्र जमून सर्व अवयव झालेले असतात, व विशेष घोंटाळ्याचे प्राणी बनतात.

## २. प्राण्यांचें अन्न.

**१. अन्नाचें वर्गीकरण:**—अन्नामध्यें दोन प्रकार आहेत. एक उद्भिज अन्न व एक प्राणिज अन्न. गाई, बैल, घोडे, मेंढ्या, बकरें वगैरे अनेक प्राणी निव्वळ उद्भिज अन्नावर आपली उपजीविका करितात, व या प्राण्यांस वनस्पत्याहारी प्राणी असें ह्मणतात. तसेंच लांडगे, वाघ वगैरे कांहीं प्राणी निव्वळ मांस सेवून राहतात व त्यांस मांसाहारी प्राणी

---

१ प्राण्यांच्या शरीररचनेबद्दल सोपपत्तिक विवरण रा. भाटे कृत ‘ जीवनशास्त्राचीं मूलतत्वें ’ पु. १, पृ. १ लें यांत उत्तम प्रकारें केलें आहे तें अवश्य वाचावें.

असें ह्मणतात. वनस्पतिजन्य अन्नांत पोषक तत्वें कमी असतात, यास्तव पोषण चांगलें होण्याकरितां निव्वळ वनस्पतींवर पोषण करणाऱ्या प्राण्यांस अन्न पुष्कळ प्रमाणानें खावें लागतें, ह्मणून त्यांस नैसर्गिकच मोठालीं पोटें असतात. ही गोष्ट नेहमीं आपल्या पाहण्यांत येते. तसेंच वनस्पत्याहारी प्राण्यांतही पुन्हां दोन वर्ग आहेत. गाई बैलां- प्रमाणें जे प्राणी निव्वळ गवत खाऊन राहतात त्यांचीं पोटें धान्य खाणाऱ्या घोडीं वगैरे प्राण्यांपेक्षां जास्त मोठीं असतात.

हीच गोष्ट एकाच जातीच्या प्राण्यांतही आपल्या नजरेस येते. शर्यतीकरितां जे घोडे तयार करितात, त्यांस चंदी मजबूत असते, त्यांस हरभरा वगैरे धान्यें पुष्कळ खाऊं घालतात व त्या मानानें त्यांच्या खाण्यांत गवत कमी येतें. हे घोडे बांधेसूत व मजबूत असून त्यांचे पोट वगैरे अवयव आटोपसर असतात. ह्या गोष्टीच्या उलट गोष्ट निव्वळ गवत खाऊन राहणारे घोड्यांचें अवलोकन केल्यास नजरेस येते. ह्या घोड्यांचीं पोटें मोठीं असून ते बोजड दिसतात. आतां वनस्पतींवर उदरनिर्वाह करणारे प्राणी सोडून निव्वळ मांसावर उपजीविका करणारे प्राणी जर आपण पाहिले, तर त्यांचीं पोटें फार लहान आहेत असें आपल्या अनुभवास येतें. बैलाचें आंतडें १६० फूट लांब असतें, घोड्याचें ९० फूट व कुत्र्याचें तर १२ अगर १४ फूट असतें.

**अन्नाचीं घटक द्रव्यें:**—कोणत्याही प्रकारचें अन्न असो, त्यांत शरीराचें अवयवांत होणारी झीज भरून काढणारीं, स्नायूंची वृद्धि करून त्यांस बळकटी आणणारीं व निरनिराळे रसोत्पत्ति करणारीं रासायनिक द्रव्यें अवश्य असलीं पाहिजे.

खनिज द्रव्यें बाजूस ठेवून, आपण अन्नद्रव्यांचा विचार करूं लागलों तर, आपल्या ही गोष्ट निर्विवाद लक्षांत येईल कीं, शरीरांतील टिस्यू ( tissue )ची उत्पत्ति करणारीं जेवढीं मिळून अन्नद्रव्यें आहेत, तेवढ्यांत नैट्रोजन हा अवश्य पाहिजे. एकंदर वातावरणांत या वायूचें प्रमाण $\frac{4}{5}$ आहे, आणि शरीरांतील एकंदर स्नायू बनण्यास या वायूची

अत्यंत जरूर असते. नैट्रोजनयुक्त अन्नाचीं ठळक ठळक उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे कोंबड्याचे अंड्यांतील बलक, अलब्युमेन ( Albumen ) दुधांत असणारें केसिन ( Casein ) नामक द्रव्य व गव्हाचे अगर दुसरे पिठांत असणारा चिकट पदार्थ ( Gluten ) हीं होत.

आतां ज्या अन्नद्रव्यांत नैट्रोजन मुळींच नसतो अशीं अन्नद्रव्यें ह्मटलीं तर स्टार्च, साखर व चरबी हीं होत. ह्या द्रव्यांचा शारीरिक उष्णता उत्पन्न करण्याचे कामीं फार उपयोग होतो. यांच्यायोगानें स्नायू संकोच विकास होण्याचे कामीं मदत होते व नैट्रोजनरहित रसोत्पत्तीही याच द्रव्यांचेयोगानें होते.

निव्वळ नैट्रोजनयुक्त अन्नाचेयोगानेंही साखर, चरबी या पदार्थांची उत्पत्ति होते. याचें उत्तम उदाहरण निव्वळ मांसाहार करणारे प्राण्याचें दूध होय. या प्राण्यांचे बाबतींत असें घडतें कीं, नैट्रोजनयुक्त अन्नाचे निरनिराळ्या रासायनिक व्यापारानें दोन अगर जास्त रासायनिक पदार्थ बनतात. एकामध्यें निव्वळ कारबन व हैड्रोजन हीं द्रव्यें असतात अगर या द्रव्यांशीं ऑक्सिजनही मिळून असतो; आणि बाकी राहिलेल्या सर्व नैट्रोजनचे दुसरे पदार्थ बनतात.

नैट्रोजनयुक्त व नैट्रोजनरहित अशीं हीं अन्नांतील दोन घटकद्रव्यें सांगितलीं. यांशिवाय अन्नद्रव्यांत तिसरा एक घटकावयव असतो. तो क्षार हा होय. शरीरांत नेहमीं जीवनास अवश्यक क्रिया चालू असतात, त्यामुळें स्नायूंस बरीच झीज पोंचते व ती भरून येण्यास निरिंद्रिय द्रव्यांची फार अवश्यकता असते. याशिवाय लाळ, पित्त, जाठररस वगैरे शरीरांतील अनेक रसांची उत्पत्ति होण्यासही क्षारांची जरूर आहे.

उत्तम तऱ्हेच्या अन्नांत हीं तिन्हीं घटक द्रव्यें असून, शिवाय तीं पचण्यास योग्य अशा स्थितींत असतात. अशा सर्वांगपरिपूर्ण अन्नाचें उदाहरण दूध हें होय. दुधांत नैट्रोजनयुक्त ‘ केसीन ’ असतें; आणि त्याच्याशीं क्षार, शर्करायुक्त द्रव्यें, व स्निग्ध द्रव्यें हीं शरीरपोषणास योग्य अशा प्रमाणानें मिश्र झालेलीं असतात.

तेव्हां जनावरांस जें अन्न खावयास घालावयाचें त्यांतही ह्या तिन्हीं घटक द्रव्यांचें कांहीं ठराविक प्रमाण असलें पाहिजे. वाढीस लागलेलीं, काम करणारीं अगर दूध देणारीं जीं जनावरें आहेत, त्यांस द्यावयाच्या अन्नांत नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यांचें प्रमाण जास्त असलें पाहिजे; परंतु ज्या जनावरांचे मांसाची वृद्धि होणें इष्ट असेल, त्यांस द्यावयाचे अन्नांत नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यांपेक्षां शर्करायुक्त वगैरे कार्बनयुक्त अन्नद्रव्यांचें प्रमाण जास्त असावें.

प्राण्यांचें शरीर ह्मणजे एक यंत्र नाहीं कीं, त्यांत केवळ रसायनशास्त्रदृष्ट्या उपयुक्त अन्नद्रव्यें घातलीं कीं इष्ट परिणाम सिद्ध होतीलच. एखाद्या प्राण्यास शरीरपोषण उत्तम होण्यास एका प्रकारचें अन्न जास्त लागेल, तर दुसऱ्यास त्याच जातीचें अन्न कमी प्रमाणानें देऊनही तो चांगला होईल. अन्नाच्या बाबतींत सर्व साधारण नियम ह्मटला तें खाण्यास रुचकर असून पचण्यास सुलभ असावें.

## ३. अन्नपचन.

**१. पचनक्रिया ह्मणजे काय?** :—ज्या क्रियेच्यायोगानें प्राण्यांनीं सेवन केलेलें अन्न रक्तामध्यें सहज रीतीनें विरघळून जाईल, अशा स्थितीप्रत येतें, त्या क्रियेस पचनक्रिया असें ह्मणतात. अन्नपचनाची क्रिया प्राण्यांचे अन्नमार्गांत होत असते. अन्नपचन होण्याचीं मुख्य ठिकाणें ह्मटलीं ह्मणजे तोंड, जठर व आंतडें हीं होत.

---

१. प्राण्यांच्या अन्नासंबंधानें व त्यांतून मनुष्याच्या अन्नासंबंधानें माहिती रा० .टिळकृत ' जीवनशास्त्राचीं तत्वें ' या पुस्तकांत सविस्तर दिली आहे ती इष्ट तर पहावी.

२. तोंडापासून गुदापर्यंतचा जो नळ त्यास अन्नमार्ग असें ह्मणतात. यांत जठर, यकृत, आंतडें वगैरे सर्व भागांचा अंतर्भाव होतो.

३. अन्नमार्गांत मध्येंच फुगलेला जो भाग तो जठर होय. हें अनेक स्नायूंचें बनलेलें असतें व त्याचा संकोचविकास होत असतो.

४. जठरापासून गुदापर्यंत जो अन्नमार्ग त्यांतील जठराकडील भागास आंतडें असें ह्मणतात. हें फार लांब असल्यामुळें पोटांत दुमडलेलें असतें.

तोंड, जठर व आंतडें या तीन स्थानांपासून जे रस उत्पन्न होतात, त्यांची क्रिया अन्नावर घडून अन्नपचन होतें. अन्नामध्यें मिळाफ पावून त्याचें पचन होण्यास मदत करणारे रस अनुक्रमें लाळ, जाठररस, पित्त, प्यांक्रियास व आंत्ररस हे होत.

२. लाळ:—लाळ उत्पन्न करणारे अनेक पिंड तोंडांत असतात. कांहीं पिंड जिभेच्या व कानांच्या खालच्या बाजूस असतात. कांहीं गालांत असतात व कांहीं जिभेवरही असतात. या पिंडांच्यायोगानें लाळेची उत्पत्ति होऊन ती तोंडांत सोडली जाते. दाणागोटा, फळफळावळ खाणाऱ्या पक्ष्यांचे जठरांतही अशाच प्रकारचे रसोत्पादक पिंड असतात व त्यांमुळें तोंडापुढील अन्नमार्ग मानेच्या खालच्या बाजूस जरासा फुगलेला असतो.

लाळेच्या अंगीं एक अजब गुण आहे. तोंडांत पडलेल्या अन्नामध्यें चर्वण चालू असतां लाळेचें मिश्रण होत असतें व त्या लाळेचेयोगानें अन्नांत असलेल्या स्टार्चची कांहीं रासायनिक व्यापार घडून साखर बनते. स्टार्च हा पदार्थ नुसता पाण्यांत मिसळत नाहीं व त्यामुळें रक्तांत त्याचा मिळाफ न होतां पोषणाचे कामीं तो अगदीं निरुपयोगी असतो; परंतु स्टार्चमध्यें लाळ मिसळल्यानंतर त्याची साखर बनते. साखर ही सहज विरघळणारी असल्यामुळें रक्तांत तिचा त्वरित मिळाफ होऊन शरीराचे चलनवलनास, पोषणास व वाढीस तिची फार मदत होते.

लाळेमध्यें स्टार्चची साखर बनविण्याची जी शक्ति आहे, तिचा प्रभाव कच्चया स्टार्चपेक्षां शिजवून परिपक्व केलेल्या स्टार्चवर चांगला होतो; ह्मणून अन्न कच्चें खाण्यापेक्षां चांगले शिजवून खाणें फार फायद्याचें आहे. असें केल्यानें अन्नपचन सहज व उत्तम होतें. अन्न कच्चें असेल तर त्याचें पचन चांगलें होत नाहीं व तें पोटांत ठरत नाहीं.

मनुष्याप्रमाणें ज्या प्राण्यास एकच कोठा असतो, अशा प्राण्यांनीं आपलें अन्न चांगलें सावकाश चर्वण करून, व लाळेशीं चांगलें मिश्र

होऊं देऊन नंतर गिळलें पाहिजे. घाईघाईनें व भराभर अन्न गिळून खाणें आटपणें हें फार घातुक आहे. " लालामिश्रण चांगलें न झाल्यानें अन्नांतील स्टार्च तसाच राहतो, अन्नपचन चांगलें होत नाहीं, आंतड्यांस फाजील मेहनत पडते व ज्याचें चांगलें चर्वण गेल्यास शरीरपोषणास उत्तम होतें, असें अन्न मलरूपानें बाहेर पडून जातें इतकेंच नाहीं, तर पोट दुखणें वगैरे अशांतले अपाय बरें करतें. " परंतु गाई, बैल, शेळ्या, मेंढ्या वगैरे प्राण्यांप्रमाणें जे रंवथ करणारे प्राणी आहेत, त्यांची गोष्ट फार निराळी असते. त्यांचे कोठ्याची रचना फार चमत्कारिक असते. त्यांचे पोटाला चार भाग असतात. ह्मणजे ह्या प्राण्यांस चार कोठे असतात असें ह्मटलें तरी चालेल. हे प्राणी आपलें अन्न भराभर व घाईघाईनें कोठ्यांत भरून घेतात व त्यापासून त्यांस कांहीं इजा पोंचत नाहीं. कारण ते जें अन्न ग्रहण करितात तें त्यांस असलेल्या चार कोठ्यां-पैकीं तीन कोठ्यांत बराच वेळ राहतें व अशायोगानें अन्नांतील स्टार्चें पूर्ण पचन होण्यास बराच वेळ सांपडतो.

अशा प्राण्याचें अन्न चांगलें पचन होण्यास रंवथक्रियेचें बरेंच साह्य होतें. पहिल्यानें हे प्राणी जें अन्न सेवन करितात, तें गिळल्याबरोबर पहिल्या कोठ्यांत जातें; व त्यांत जो अन्नाचा जाडाभरडा भाग शिल्लक राहतो, त्याचे घांस दुसऱ्या कोठ्यांत बनून तें फुरसतीच्या वेळांत चांगलें चर्वण व्हावें ह्मणून परत तोंडांत येतात. या ठिकाणीं त्यांचें सावकाश चर्वण होऊन, त्याच्याशीं लाळेचें चांगलें मिश्रण होतें; नंतर हें अन्न तिसऱ्या कोठ्यांत जातें. या ठिकाणीं कोठ्यास असलेल्या अनंत पडद्यांच्यायोगानें अन्न मृदु व साधारण पातळ बनतें. अशा प्रकारें स्टार्च नाहींसा होऊन, पातळ बनत चाललेलें अन्न चवथ्या कोठ्यांत उतरतें व नंतर तेथें त्याचें पूर्ण पचन होतें.

प्राण्याचा जन्म झाल्यापासून कांहीं काळपर्यंत ह्या लालोत्पादक पिंडापासून लाळेची उत्पत्ति फार थोड्या प्रमाणानें होत असते, आणि

जीं थोडी लाळ उत्पन्न होते तींत स्टार्चची साखर बनविण्याचा गुण फारच कमी असतो. सस्तन प्राण्याचें मूल जन्मापासून कांहीं काळपावेतों निव्वळ दुधावर असतें, याचें कारण त्या काळांत लालोत्पत्ति कमी प्रमाणानें होते हेंच होय. दुधांत स्टार्च नसल्यामुळें तें पचण्यास लाळेची जरूर लागत नाहीं. तेव्हां लहानपणांत मुलांस स्टार्चयुक्त अन्न न घालणें चांगलें. स्टार्चयुक्त अन्न घातल्यास त्याची साखर बनत नाहीं व तें कोठ्यांतून आंतड्यांत जाईपर्यंत त्यांत कांहींच फेरफार होत नसल्यामुळें त्यापासून फार त्रास होऊन अपचन होतें. मूल जसजसें मोठें होत जाईल, तसतसें त्याच्या अन्नांत स्टार्चयुक्त पदार्थांचा थोडथोडा समावेश करीत गेल्यास कांहीं इजा पोंचणार नाहीं.

३. **जाठर रसः—** याप्रमाणें तोंडामध्यें अन्नाचें चर्वण उत्तम प्रकारें होऊन, लाळेच्यायोगानें आंतील स्टार्चची साखर बनून, अन्न मऊ व कांहींसें पातळ बनतें व नंतर तें जठरांत उतरतें. जठर हें अनेक स्नायूंचें बनलेलें असतें. या जठरांतील स्नायूंचा आळीपाळीनें संकोच-विकास चालू असतो व त्यामुळें आंत येणारें अन्न घुसळलें जातें. जठ-रांत हैड्रोक्लोरिक असीड, पेपसिन वगैरे दोन तीन द्रव्यें मिळून एक आंबटसा रस उत्पन्न होतो; त्यास जाठर रस ह्मणतात. लाळेच्यायोगानें जशी स्टार्चची साखर बनून तो रक्तांत मिसळण्याच्या लायकीचा होतो, त्याप्रमाणें जाठर रसाच्यायोगानें नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यें विरघळतात व तीं रक्तांत सहज प्रवेश करितात. केसीन, अल्ब्युमेन, फायब्रिन वगैरे अन्नांतील द्रव्यांचें जाठररसाचेयोगानें पचन होतें, बाकी राहिलेलीं स्निग्ध fatty द्रव्यें वेगळीं होतात व तीं जठरापलीकडे आंतड्यांत जाण्यालायक होतात. यांशिवाय आंतड्यांस त्रास देण्यासारखे जे

---

१. स्टार्चची साखर लाळेचेयोगानें कशी बनते हें पाहणें असल्यास चांगलें शिजविलेलें गव्हाचें सत्व थोडेसें लाळेंत मिसळावें आणि थोड्या वेळानें तें चाखून पाहिल्यास गोड लागेल. चपाती जितकी जास्त चावून खावी तितकी ती अधिक गोड लागूं लागते. हें अनुभवानें कळणार आहे.

कांहीं विषारी पदार्थ अन्नांत असतात, त्यांचाही नाश या जाठर रसामुळेंच होतो. जाठररसाचा परिणाम अन्नावर घडला ह्मणजे तें चांगलें पातळ बनतें, त्यांतील नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यें रक्तांत सहज मिळतात व बाकी राहिलेला अन्नांतील स्निग्ध भाग खालीं आंतड्यांत उतरतो. याप्रमाणें अन्नांतील स्टार्चची वाट लाळेमुळें लागते, नैट्रोजनयुक्त द्रव्यांची व्यवस्था जाठर रसामुळें लागते व बाकी राहिलेलीं स्निग्ध द्रव्यें पुढील व्यवस्थे-करितां आंतड्यांत प्रवेश करितात. 'लाळेच्या व जाठररसाच्या व्यापारानें रक्तांत मिसळण्याची ज्यास योग्यता आली, असा अन्नाचा बहुतेक भाग जठराच्या बाजूमध्यें असणाऱ्या अनेक सूक्ष्म रक्तवाहिन्या तात्कडतोब शोषून घेतात व बाकीचा पुढें आंतड्यांमध्यें रवाना करण्यांत येतो.'

४. **आंतड्यांतील पचनक्रियाः**—लाळेचा व जाठर रसाचा व्यापार घडून, स्टार्च, नैट्रोजनयुक्त द्रव्यें यांचें शोषण रक्तांत होऊन, बाकी राहिलेला भाग आंतड्यांत जातो असें वर सांगितलें. लाळेमुळें व जाठररसामुळें जें पचन घडतें, त्यापासून साखर व पेपटोनस् ( Peptones ) नामक द्रव्यें तयार होतात व तीं रक्तांत सहज विरघळतात. आंत-ड्यांत जो अन्नाचा अवशेष भाग जातो, त्यांत नैट्रोजनयुक्त द्रव्यें वेगळीं होऊन शिल्लक राहिलेलीं स्निग्ध द्रव्यें पचन न होण्यासारखा अन्नांतील भाग व जठरांत व तोंडांत पचन न होतां घाईघाईनें आंत-ड्यांत आलेलीं अन्नद्रव्यें, इतके पदार्थ साधारण प्रवाही स्थितींत असतात.

आंतड्यांत उतरलेल्या अन्नांशावर पित्त, 'प्यांक्रियासरस' व आंत्र-रस या तीन रसांचा व्यापार घडत असतो.

पित्त हा पाचक रस यकृत नामक पिंडापासून उत्पन्न होतो. जठरा-पासून थोड्या अंतरावर आंतड्यांच्या आंतल्या अंगास हें पित्त येऊन पडतें. पित्ताचें मुख्य काम ह्मणजे अन्नांतील स्निग्ध द्रव्यें रक्तांत मिसळण्यासारखीं करणें हें होय. याच्यायोगानें स्निग्ध द्रव्यें चांगलीं

पातळ बनतात. प्राण्यांच्या पातळ कातडींतून त्यांचा प्रवेश होतो व तीं रक्तांत सहज जाऊन मिळतात. याशिवाय पित्तामध्यें स्टार्चची साखर बनविण्याचीही थोडीशी शक्ती असते व शरीरांतील निरुपयोगी द्रव्यें शरीराबाहेर लावून देण्याचे कामींही पित्ताचें चांगलें साह्य मिळतें.

पित्त ज्या मार्गानें आंतड्यांत येऊन पडतें, त्याच मार्गानें दुसरा एक पाचक रस आंतड्यांत येतो. तो 'प्यांक्रियास' नांवाच्या पिंडानें तयार केलेला असतो. त्यास प्यांक्रियासरस (Pancreatic juice) ह्मणतात. पित्त हें रंगानें हिरवट, पिंवळट व कडू असतें; परंतु प्यांक्रियासरस लाळेप्रमाणेंच असतो. पित्तवाहिनी व प्यांक्रियासरस-वाहिनी यांचा संयोग आंतड्या बाहेर झालेला असतो; व हे दोन्हीं रस आंतड्यांत येण्याची वाट एकच असते. लाळेच्या व जाठररसाच्या सपाट्यांतून सुटलेल्या स्टार्चयुक्त व नैट्रोजनयुक्त अन्नाचें पचन या रसाच्यायोगानें आंतड्यांत होत असतें. शिवाय स्निग्ध द्रव्यांवरही याचा व्यापार चालतो. सारांश नजरचुकीनें अगर घाईघाईनें राहिलेलें लाळेचें, जाठररसाचें व पित्ताचें असें तिघांचेंही काम हा एकटा करूं शकतो.

वरील चारी पाचक रसांचे तावडींतून सुटून राहिलेला असा कांहीं ग्राह्य भाग अन्नांत शिल्लक असल्यास, तो फुकट जाऊं नये ह्मणून आंत्ररस नामक पांचव्या पाचक रसाची योजना आंतड्यांत केलेली आहे. या रसाची उत्पत्ति आंतड्याचे बाजूवर असलेल्या अनेक पिंडांच्यायोगानें होते. सेंद्रिय जातीचे कोणत्याही अन्नाचे कण शिल्लक असल्यास, त्यांचें पचन या रसाच्यायोगानें होतें. आतां या रसामध्यें लाळ, जाठररस, पित्त व प्यांक्रियास रस यांचीं कामें करण्याची जरी शक्ति आहे, तरी ती वरील रसांइतकी जाज्वल नाहीं. वरील रसांचे व्यापारानें अन्नाचें होणारें पचन जर कदाचित् कच्चें राहिलें, तर ती उणीव भरून काढण्याची शक्ति मात्र या आंत्ररसांत आहे.

श्वासोच्छ्वासानें बाहेर सोडलेल्या हवेंत १६·०३३ भाग आक्सिजन, ७९·५९७ भाग नैट्रोजन व ४·३८ भाग कार्बनिक असीड असतो.

सारांश आंतड्यांत जे पाचक रस उत्पन्न होतात त्यांत साधारण सर्व पाचक रसांचे गुण असतात, आणि अन्नपचन होण्यांत जी कांहीं कसूर राहिलेली असते, ती आंतड्यांत होणाऱ्या पचनक्रियेनें भरून येते.

## ४. पचन पावलेल्या अन्नद्रव्यांचें शोषण.

**१. शोषणक्रियेचा प्रकार:**—वर सांगितल्याप्रमाणें अन्नाचें पचन झाल्यावर, त्यांतील ग्राह्यांशाचें शोषण रक्तांत व्हावयाचें असतें; व तें मुख्यत्वेंकरून आंतड्यांच्या आंतल्या बाजूवर जे बारीक बारीक फणसाच्या दात्याप्रमाणें नाजूक व मऊ दात्यांचे पुंजके ( Villi ) असतात, त्यांचेयोगानें होतें. हे पुंजके फार मऊ व केसांप्रमाणें बारीक, ह्मणजे सुमारें एका इंचाचे पन्नासावे अगर तिसावे हिश्शाइतके लांब असतात. हे पुंजके आंतड्यांच्या आंतील पातळ कातडीवर सर्वत्र असतात व त्यामुळें ती कातडी मखमालीप्रमाणें दिसते. ह्या पुंजक्यांवर फार नाजूक पेशी असतात, व त्या पेशीच्या खालच्या बाजूस अनेक केशाकार रक्तवाहिन्यांचें सूक्ष्मछिद्रांचें जाळें असतें. पुंजक्यांवर असणाऱ्या पेशी अन्नांतील ग्राह्यांश ग्रहण करितात, नंतर तो रक्तवाहिन्यांत जातो, व रक्तांत मिळतो. आंतड्याच्या आंतील बाजूचा नेहमीं संकोचविकास होत असल्यामुळें, त्यामधून जाणारें अन्न आंतड्यांचे आंतील भागावर असलेल्या पुंजक्यास घांसून जातें व अशायोगानें अन्नांतील ग्राह्यांश तात्काळच शोषला जाऊन रक्तांत मिळतो.

**२. आंतड्यांत उत्पन्न झालेल्या रक्ताची व्यवस्था:**—जठरांत व आंतड्यांत ज्या रक्तवाहिन्या असतात, त्यांनीं शोषून घेतलेला अन्नांतील ग्राह्यांश रक्ताबरोबर एकदम रुधिराशयाकडे न जातां प्रथम तें अन्नद्रव्यांनीं मिश्रित रक्त यकृताकडे जातें, व तेथें त्यावर अनेक संस्कार घडून, अनेक नवीं पोषक मिश्रणें तयार होऊन नंतर तीं रक्तांत मिळतात.

आंतड्यांत अन्नद्रव्यें गेल्यावर जे नवीन पदार्थ होतात त्यांतील मुख्य महत्वाचा पदार्थ ह्मटला ह्मणजे साखर होय. निव्वळ मांसाहार करणाऱ्या प्राण्यांचे यकृतांतही साखर तयार होते. लहान व ज्यांची

वाढ सुरू आहे अशा प्राण्यांचें अवलोकन केल्यास त्यांचें यकृत फार मोठें आहे असें आपणास अढळून येईल; व हीच गोष्ट मांसाहार करणाऱ्या मोठ्या प्राण्यांतही नजरेस येते. यावरून जीवनव्यापार चालण्यांत साखरेचें महत्व काय आहे हें लक्षांत येतें. ज्या प्राण्यांचें यकृत मोठें, त्यांची अन्नपचन करण्याची शक्तीही मोठी असते.

यकृताचें दुसरें महत्वाचें कार्य ह्मटलें ह्मणजे शरीरांतील निरुपयोगी द्रव्यांची व्यवस्था लावणें हें होय. रक्तांमध्यें जीं निरुपयोगी द्रव्यें असतात त्यांचें ऑक्सिजन वायूच्या साह्यानें मलमूत्र बनवून, मलद्वारा-वाटे शरीराबाहेर ती घाण लावून देणें हें कार्य यकृतच करीत असतें.

अशा प्रकारें पचन झालेले अन्नांतील व रक्तांतील निरुपयोगी, अपायकारक द्रव्यांची वाट लावणें, शरीरव्यापार चालण्यास अवश्य अशीं नानातऱ्हेचीं मिश्रणें बनविणें, मलोत्सर्ग करणारे इंद्रियांस विनाकारण श्रम न पडावे अशी व्यवस्था ठेवणें, वगैरे कामें यकृत करीत असतें.

## ५. श्वासोच्छ्वास.

**श्वासोच्छ्वास ह्मणजे काय?**:—श्वासोच्छ्वास ह्मणजे हवा आंत घेणें व बाहेर टाकणें होय. प्राण्यांच्या रक्तांत व स्नायूंत जो कार्बनिक असीडवायू असतो त्याच्या ऐवजीं ऑक्सिजन ग्रहण करणें हा श्वासो-च्छ्वासाचा मूळ उद्देश आहे. श्वासोच्छ्वासानें आंत घेतलेल्या हवेंत जो आक्सिजन असतो, त्याचा शरीरांतील कांहीं सेंद्रिय भागाशीं संयोग होऊन, ते शरीरांतील जीवनव्यापारास उपयोगी होतात अगर शरीरांतील निरुपयोगी पदार्थांचा निकाल सुलभ रीतीनें होतो.

श्वासोच्छ्वास करीत असतां हवेंत कसकसा फेरफार होत असतो हें खालीं दिलें आहे:—श्वासोच्छ्वासानें आंत घेतलेल्या हवेंत २०·८१ भाग आक्सिजन, ७९·१५ भाग नैट्रोजन व ·०४ भाग कार्बनिक असीडवायू असतो.

वातावरणाचे शंभर भाग जर श्वासोच्छ्वास क्रियेनें आंत घेऊन परत बाहेर सोडले, तर ४ भाग आक्सिजन नाहींसा होऊन त्याचे जागीं ४ भाग कार्बनिकअसीड मिळतो.

श्वासोच्छ्वासक्रियेंत जी हवा बाहेर सोडली जाते तींत कार्बनिक असीडशिवाय पाण्याची वाफ, थोडासा अमोनिया व दुसरे कांहीं वाईट वायू असतात.

श्वासोच्छ्वासक्रियेंत प्राणवायूचा (आक्सिजनचा) निकट संबंध रक्ताशीं होत असतो. आमिबासारखे जे एकपेशीमय प्राणी असतात, त्यांस श्वासोच्छ्वासाचीं निराळीं इंद्रियें नसतात. अशा प्राण्यांत पेशीच्या सर्व बाजूंनीं श्वासोच्छ्वासक्रिया चालू असते. मासे आपल्या कल्लच्यांच्या द्वारें प्राणवायू प्राण्यांतून शोषून घेतात. बेडकांसही असेच डोक्याच्या दोहों बाजूस कल्लच्यांप्रमाणें श्वासोच्छ्वास करण्याचे अवयव असतात. मांसमय प्राण्यांत श्वासोच्छ्वासक्रिया त्वचेकडूनच होत असते. कांहीं कांहीं प्राण्यांस पापुद्र्यासारखी पातळ कातडी असते, तीस लागूनच रक्तवाहिन्या असतात. या पातळ कातडींतून हवा आंतबाहेर जाते येते, व तिचेयोगानें रक्तवाहिन्यांतील रक्त शुद्ध होतें. ज्या प्राण्यांचें रक्त उष्ण असतें त्यांच्या शरीरांत अशा पातळ पापुद्र्यासारख्या कातडीच्या पिशव्या असतात, त्यांत हवा बाहेरून येते व जाते व तीमुळें त्या पिशव्यांस जोडून असलेल्या रक्तवाहिन्यांतील रक्त शुद्ध होतें. या पातळ कातडीच्या पिशव्यांस फुप्फुसें ह्मणतात.

**२. श्वासोच्छ्वासक्रियेनें रक्तांत होणारा फरकः**—ज्या प्राण्यांचें रक्त गरम असतें, अशा प्राण्यांचा रुधिराशय छातींत दोन फुप्फुसांच्या मधोमध असतो. या रुधिराशयाचे सारखे दोन भाग असतात व त्या

१. चुन्याच्या पाण्यांत जर नळीवाटें नाकांतून हवा सोडली तर तें निवळीचें पाणी पांढरें होतें. याचें कारण कार्बनिक असीड होय. त्याच पाण्यांत नुसती हवा बंबानें घातल्यास तसा प्रकार होत नाहीं, व पाण्यांत कांहीं फेर होत नाहीं.

प्रत्येक भागाचे दोन विभाग असतात. ह्मणजे रुधिराशय हा दोन दोन खोल्यांच्या एकमेकांस लागून असलेल्या दोन गाळ्यांप्रमाणें आहे. रुधिराशयाचे जे मुख्य दोन भाग असतात त्यांचा एकमेकाशीं मुळींच संबंध नसतो, ह्मणजे एका भागांतील रक्त दुसऱ्या भागांत जात नाहीं. ह्या दोन भागांपैकीं उजवेकडील भागांत अशुद्ध रक्त असतें व डावेकडील भागांत शुद्धरक्त असतें. रुधिराशय नेहमीं संकोचविकास पावत असतो हें संकोचविकासाचें कार्य जीवाचे उत्पत्तीपासून लयापर्यंत अबाधित चालू असतें. रुधिराशयाच्या डाव्या भागांत शुद्ध रक्त असतें व तें त्या भागाच्या संकोचविकासाचे क्रियेच्यायोगानें धमन्यांच्याद्वारें सर्व शरीरभर पोंचविलें जातें. रुधिराशयांतून सर्व शरीरास शुद्ध रक्त पुरविणारे मुख्य नळीस धमनी ह्मणतात. हें शुद्ध रक्त सर्व शरीरभर खेळून अशुद्ध बनल्यावर शिरांचे द्वारें रुधिराशयाचे उजव्या भागांत येऊन पडतें शरीराचे सर्व भागांतील अशुद्ध रक्त रुधिराशयांत आणून टाकणाऱ्या नळीस शीर असें ह्मणतात. अशुद्ध रक्त रुधिराशयाचे उजवे भागांत येऊन पडल्यावर, त्याचे संकोचविकासामुळें तें रक्त फुप्फुसास जोडणारे धमनीचे द्वारें फुप्फुसांत जाऊन, तेथें शुद्ध होउन, नंतर रुधिराशयाचे डावे भागांत जातें. अशाप्रकारें अशुद्ध रक्त प्रथम फुप्फुसांत जाऊन हवेच्यायोगानें शुद्ध झाल्यावर, नाना रक्तवाहिन्यांच्या द्वारें सर्व शरीराचे भागांत जातें.

शरीराचे सर्व भागांतून शिरांच्याद्वारें रुधिराशयाचे उजवे भागांत जाणारें रक्त अशुद्ध असतें व त्याचा रंग काळा व हिरवट असतो. परंतु तें फुप्फुसांतून रुधिराशयाचे डावे बाजूस नेणारी जी धमनी असते तींत व रुधिराशयाचे डावे बाजूंतून शरीराचे सर्व भागांत नेणाऱ्या धमन्यांत लालभडक रंगाचें असतें. या निरनिराळ्या रंगाचें कारण रक्तांत असलेले वायू होत. रुधिराशयाचे डावे भागांतून शरीरभर जें रक्त जात असतें, त्यांत आक्सिजन वायूचें ( प्राणवायूचें ) प्रमाण जास्त असतें, शिरांतून रुधिराशयाचे उजवे बाजूंत येणारे रक्तांत कार्बनिक असीडचें प्रमाण जास्त असतें व त्यामुळें तें काळे हिरवे रंगाचें असतें.

रुधिराशयांतून धमनीचे द्वारें शरीरभर जाणाऱ्या रक्तांत व शरीरांतून परत शिरांचेद्वारें रुधिराशयांत येणाऱ्या रक्तांत वर सांगितलेल्या दोन वायूंचें प्रमाण खालीं दिल्याप्रमाणें असतें. धमनींतून शरीरांत जाणारें रक्त जर शंभर भाग घेतलें, तर त्यांत आक्सिजनचे २० भाग व कार्बनिक असीडचे ३९ भाग असतात; परंतु शिरांतून रुधिराशयांत येणाऱ्या तितक्याच रक्तांत ८ पासून १२ भाग प्राणवायु व ४६ भाग कार्बनिक असीड असतो.[1]

रुधिराशयांतून शरीराचे सर्व भागांस जें रक्त पुरविलें जातें, त्यांतील ऑक्सिजनवायूचा उपयोग शरीरव्यापार चालण्याकडे होऊन त्याचेऐवजीं कार्बनिक ॲसिडचा त्यांत भरणा होऊन तें अशुद्ध स्थितींत परत रुधिराशयाकडे येतें. आतां हा फाजील कार्बनिक ॲसिड जेव्हां रक्त फुप्फुसाकडे जातें, तेव्हां त्यांत भरून असलेल्या हवेंत टाकला जाऊन त्याचे ऐवजीं हवेंतील प्राणवायूचा भरणा रक्तांत होतो व पुन्हां तें शुद्ध बनतें. कार्बनिक ॲसिड वायूंत एक भाग कार्बन, दोन भाग ऑक्सिजनशीं मिळालेला असतो. रक्तांत असणाऱ्या प्राणवायूचे २ भागांशीं शरीराचे स्नायूंचा जो नाश होतो, त्यापासून उत्पन्न झालेला एक भाग कार्बन अगर रक्तांतील द्रव्यांतून एक भाग कार्बन मिळून एक भाग कार्बानिक ॲसिड वायू तयार होतो.

सारांश श्वासोच्छ्वास ह्मणजे ऑक्सिजन व कार्बन वायूंच्या संयोगानें कार्बनिक ॲसीड तयार होणें हें कार्य होय. हें कार्य खरोखर ह्मटलें तर फुप्फुसांत होत नसून शरीराच्या अनेक भागांत ज्या ठिकाणीं रक्त ऑक्सिजन वायू पुरवतें त्या ठिकाणीं होत असतें.[2]

---

१ आपण शरीर टोंचल्यावर जें रक्त बाहेर येतें. तें प्रथमतः काळेंनिळें असतें. परंतु कांहीं वेळ तें हवेंत राहतांच तांबड लाल होतें. याचें कारण मोकळ्या हवेंतील ऑक्सिजन त्यांत मिळतो हें होय.

२ शरीराच्या निरनिराळ्या भागांस स्वतंत्र रीतीनें प्राणवायू पोंचविण्याचें कार्य पातळ रक्तानें होत नसून त्यांत जे लाल रंगाचे साबुदाण्याप्रमाणें बारीक कण असतात त्यांच्याद्वारें होतें. हे कण प्राणवायूचे असतात व कार्बनशीं सहज मिळतात. रक्तास तांबडा रंग असण्याचें कारण हेच कण होत, व या कणांचे अभावीं रक्त काळें असतें.

**३. श्वासोच्छ्वासास लागणाऱ्या हवेचें प्रमाण**:—शरीरामध्यें उत्पन्न होणारा कार्बनिक ॲसिडवायू श्वासोच्छ्वासक्रियेनें फुप्फुसांच्या द्वारें बाहेर टाकण्याचें प्रमाण श्रम, व्यायाम, सूर्यप्रकाश व अन्न या चार गोष्टींवर अवलंबून असतें. तेव्हां या चार गोष्टी ज्या प्रमाणानें होत असतील, त्या प्रमाणानें श्वासोच्छ्वासक्रिया कमी अगर जास्त चालली पाहिजे. याशिवाय श्वासोच्छ्वासाचें प्रमाण प्राण्यांच्या जातीवरही अवलंबून असतें.

ज्या हवेंत शेंकडा १० पासून १२ भाग कार्बनिक असीड असतो, तींत प्राणी जिवंत राहणें अशक्य असतें, व ती प्राण्याचे श्वासोच्छ्वासक्रियेस अगदीं निरुपयोगी होय. वारंवार श्वासोच्छ्वास घडलेल्या हवेंत आक्सिजनचें प्रमाण कमी असतें इतकेंच नाहीं, तर तींत पुष्कळ विषारी द्रव्यें असतात. ह्मणून ती प्राण्यांचे जीवनास अपायकारक होते. श्वासोच्छ्वासक्रियेचेयोगानें उत्पन्न झालेला कार्बनिक असीड वायू जरी शेंकडा १ या प्रमाणानें हवेंत असला, तरी ती हवा अपायकारक असते. बाहेरून हवा येण्यास कांहीं साधन नाहीं अशी जर जागा असेल, तर घोडा २४ तासांत ७००० घनफूट हवा अशा प्रकारें श्वासोच्छ्वासक्रियेनें बिघडवून टाकील.

तेव्हां गुरांढोरांकरितां गोठे, तबेले बाधतांना त्यांत हवा कोणत्या प्रमाणानें पुरवतां येईल, या गोष्टीकडे पूर्ण लक्ष देऊन ते बांधणें अवश्य आहे. गोठा जर उबडा ह्मणजे हवेचा खुला प्रवेश न होईल असा बांधला असेल तर प्रत्येक जनावरास जागा पुष्कळ असली पाहिजे; परंतु हवा वाटेल तशी खेळत आहे व स्वच्छ हवा येण्यास पुष्कळ अवकाश असेल तर जनावरांस बांधण्यास जागा थोडी असली तरी हरकत नाहीं. गुरें बांधावयाचे जागेंतील हवा दर तीन तासांनीं बदलून नवी येईल, ह्मणजे जुनी हवा अशुद्ध दर तीन तासांनीं अगदीं नाहींशी होऊन तिचे जागीं नवीन हवा येण्याला अवकाश असेल तर, एका बैलास अगर गाईस १० फूट लांब, १० फूट रुंद, व १० फूट उंच, अशा बांधणीची जागा असली ह्मणजे पुरे होते. इतक्या जागेंत वर सांगितलेली स्थिति अनु-

कूल असल्यास एक बैलास अगर गाईस श्वासोच्छ्वास करण्यास शुद्ध हवा मिळण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं.

## ६. क्रिया, नाश आणि विश्रांति.

प्राणी असो अगर वनस्पती असो, त्याचा शरीरव्यापार चालू असतां, त्याचे स्नायूंतील कांहीं भागाचा थोड्या बहुत प्रमाणानें ती क्रिया चालण्याचे कामीं उपयोग घडतो, व तितक्या प्रमाणानें त्याच्या शरीराचा नाश होत असतो. हा नाश क्रिया चालू असतां उत्पन्न होणारी उष्णता अगर घाम वगैरे निरुपयोगी पदार्थांच्या रूपानें होत असतो. आतां हा होणारा नाश भरून येण्यास विश्रांतीची अवश्य जरूर आहे. ही गोष्ट चांगल्या सशक्त प्राण्याचा शरीरव्यापार लक्षपूर्वक अवलोकन केल्यास आपल्या तावडतोब लक्षांत येते. रुधिराशयाची संकोचविकास-क्रिया नेहमीं अबाधित चालू असते असें पूर्वीं सांगितलें आहे. परंतु ही क्रिया चालू असतांही रुधिराशय विसावा घेत असतो. एकदां रुधिराशयाचा संकोच झाल्यावर त्याचा विकास होण्याच्या दरम्यान थोडासा काळ जातो. श्वास घेतल्यावर उच्छ्वास टाकण्यापूर्वीं श्वासोच्छ्वास करणारीं इंद्रियें थोडातरी दम घेतात. हीच गोष्ट शरीराचे सर्व अवयवांची होय. याप्रमाणें क्रिया चालू असतां, किंवा इतर प्रकारानें शरीराचे अवयवांस जी विश्रांति मिळते, तिच्यायोगानें त्यांची झालेली झीज भरून येते. अशी जर स्थिति नसती तर प्राण्यांचीं शरीरें लवकर नाश पावलीं असतीं.

शरीराचे स्नायू ज्या प्रमाणानें काम करीत असतात, त्याच प्रमाणानें त्यांचा नाश घडतो, अशी गोष्ट मात्र नेहमींच घडते असें होत नाहीं. उलटपक्षीं श्रमाचे मानानें झीज कमीच पोंचते. याचें कारण शरीर-पोषण हें होय. प्राणी जें अन्न ग्रहण करितात, त्याचा या शरीराचे क्रियेचे कामीं फार उपयोग घडतो. अन्नांत चरबी अगर उष्णता उत्पन्न

१. प्राण्यांचे शरीराची रचना, त्याचे अवयवांची माहिती वगैरे बाबतींत पूर्ण माहितीकरितां रा० भाटेकृत 'जीवनशास्त्राचीं तत्वें' भाग १ ला पहा.

करणारीं जीं द्रव्यें असतात, त्यांचा बहुतेक भाग स्नायूंचें काम चालू रहाण्यांत उपयोगांत येतो. वाफेच्या यंत्रांत चालू असणाऱ्या क्रियेंत व शरीरांतील क्रियेंत बरेंच साम्य आहे. आगगाडीचे अगर गिरणीचे एंजिनांत कोळसा, लांकूड वगैरे घातलें कीं, त्यांत उष्णता उत्पन्न होऊन पाण्याची वाफ होते व काम चालूं होतें; व तें काम चालण्यांत कोळसा, लांकूड वगैरे पदार्थांचा बहुतेक नाश होत असून, मूळ यंत्राचे अवयवांची झीज फारच थोडी होते. अशीच स्थिति शरीररूपी यंत्राची आहे. अन्नां-मध्यें असणारीं स्निग्ध व शर्करारूपद्रव्यें शरीरांत उष्णता उत्पन्न करून चरबीची वृद्धि करितात, इतकेंच नाहीं, तर स्नायूंस कार्य करीत असतां झीज न पोंचावी ह्मणून त्यांचा बराच उपयोग होतो; व अशा रीतीनें मूळ स्नायूंस झीज फार कमी पोंचते.

अशा प्रकारें स्नायूंच्या शक्तीचा व अन्नाचा उपयोग शरीरांतील उष्णता कायम राखण्याकडे व शरीराचे व्यापार चालण्याकडे होत असल्यामुळें, शरीराची वाढ होणें, मांसाची वृद्धि अगर दुग्धोत्पत्ति होणें वगैरे जे दुसरे उपयोग अन्नापासून व्हावयाचे असतात त्यांस बरीच ताण पोंचते. दुग्धोत्पत्ति वगैरे कार्यें होण्यास अन्नाचा अंश शिल्लकच राहत नाहीं. तेव्हां ज्या उद्देशानें जनावरें पाळलीं असतील, तो उद्देश सिद्धीस पावण्याकडे अन्नाचा व्यय होत आहे कीं नाहीं, हें पाहणें फार अगत्याचें आहे. उद्दिष्ट हेतूचे सिद्धीस अन्नाचा उपयोग होत नसून दुसऱ्याच बाबीकडे जर अन्नव्यय घडत असेल, तर तो व्यय होऊं न देण्याचा जनावरें पाळणारानें विशेष प्रयत्न केला पाहिजे. परंतु असें करितांना जनावरांचे शक्तीस मात्र अपाय न घडूं देण्याविषयीं खबरदारी घ्यावी.

जनावरांचे मांसाची वृद्धि व्हावी अशी जर इच्छा असेल तर, त्यास विश्रांति, उष्णता व एकांतवासाची राहणी या गोष्टींची अनुकूलता फार फायदेशीर आहे. गाय अगर ह्मैस दूध देत असेल, व ती कुरणांत चरावयास मोकळी न सोडतां बंदोबस्ताच्या गोठ्यांत ठाणबंदी ठेवून पोसली तर, जास्त दूध देऊं लागते. तितकें दूध रानोमाळ फिरून भक्ष

मिळविणारी गाय अगर ह्मैस कधींही देत नाहीं. शेतकरी एकराणा साळ्यांत कामाचा हंगाम आटपल्यावर, गुरें ठाणबंदी ठेऊन पोसतात, याचें कारण तीं लठ्ठ व्हावीं हेंच असतें. गुरांस खाणचार घालण्यांत तरी हेंच तत्व आहे. परंतु गुरें ठाणबंदी बांधण्यांतही कांहीं मर्यादा आहे. गुरें जर एकसारखींच ठाणबंदी ठेविलीं तर त्यांचे अवयव निःशक्त व कमकुवत बनतात, त्यांचे अवयवांत ताकद कमी असते व तीं फोपशीं बनतात. कसाईखान्यांत मारण्याकारितांच जनावरें पाळलीं असलीं तर, अशीं नेहमीं ठाणबंदी बांधल्यापासून नुकसान होत नाहीं. कारण अशा कामांत त्यांच्या मांसाची जरूर असते व तें अशा रीतीनें मुबलक मिळतें. परंतु जनावरें त्यांचेकडून कांहीं काम करून घेण्याकारितां अगर त्यांचे प्रजोत्पत्तीकारितां पाळणें असेल तर त्यांचे अवयवांस व्यायाम हा अवश्य पाहिजेच, व त्यांस नुसतें ठाणबंदी बांधण्यापासून तोटाच आहे.

प्राण्याचें शरीर ह्मणजे एक मोठी अजब वस्तू आहे. हें तयार करणाऱ्या परमेश्वराचें कौशल्य व महिमा अतर्क्य आहे. या शरीराचे असंख्य निरनिराळे भाग आहेत व त्यांपैकीं एकही भाग निरुपयोगी नाहीं. जीवनव्यापार चालण्यांत प्रत्येक भागाचें कमी अगर जास्त महत्व आहेच आहे. ज्यावेळीं शरीराचे सर्व भाग परिस्थितिपरत्वें आपआपलीं कामें बिनहरकत व बिनचूक करीत असतात, त्यावेळीं शरीर हें सुस्थितींत आहे असें समजावें. प्राण्यांचे शरीराची अशी घोंटाळ्याची रचना असल्यामुळें त्यांचें संगोपन करणें फार मेहनतीचें व विशेषतः अलौकिक बुद्धीचें आहे हें सांगणें नकोच. आतां शेतीकारितां जीं जनावरें पाळावयाचीं त्यांचें संगोपन करणें तर फारच अवघड आहे. या जनावरांस नानाप्रकारचीं कामें करावयाचीं असतात व त्यांचे भोंवतालची परिस्थितीही वेळोवेळीं बदलत असते. तेव्हां अशा प्राण्यांस सशक्त स्थितींत ठेऊन आपलीं सर्व कामें उत्तम प्रकारें पार पडूं शकतील अशा धोरणानें त्यांचें संगोपन करणें, हें शेतकऱ्याचें मोठें महत्वाचें कर्तृत्व आहे, व तें साधण्यास प्राणिशास्त्राची मूलतत्वरूप माहिती त्यास असणें अगदीं जरूरीचें आहे.

# निबंध ३ रा.

## प्राण्यांचें पोषण.

१. प्राण्यांच्या अन्नाचें उत्पत्तिस्थान. २. अन्नाचा उपयोग करून घेण्याची प्राण्यांची रीत. ३. प्राण्यांच्या अन्नाची घटना-अन्नाचें वर्गीकरण,-पाणी,-राख,-नैट्रोजनयुक्त द्रव्यें,-कार्बनयुक्तद्रव्यें, स्निग्धद्रव्यें. ४. पोषणक्रिया,-अन्नांतील पौष्टिक द्रव्याचें प्रमाण,-शरीरपोषणास लागणाऱ्या अन्नाचें प्रमाण,-आहाराचें आकार-मान,-अन्नाचा स्वादिष्टपणा, अन्न शिजविणें व तयार करणें.

### १. प्राण्यांच्या अन्नाचें उत्पत्तिस्थान.

स्थूलमानानें जर विचार केला, तर आपल्या हें स्पष्टपणें लक्षांत येईल कीं, प्राण्यांस आपली उपजीविका प्राण्यांवर अगर वनस्पतींवर करावी लागते. ह्मणजे सेंद्रिय द्रव्यें हा प्राण्यांच्या अन्नसामुग्रीचा सांठा होय. खनिज अगर निरिंद्रिय द्रव्यें सेवन करून, आपलें पोषण करण्याची प्राण्यांचे अंगीं शक्ति नाहीं.

ज्या ज्या पदार्थांचा प्राणी आपल्या पोषणाकरितां उपयोग करितो, त्या त्या पदार्थांस प्राण्यांचें अन्न असें ह्मणतात. ज्या पदार्थांचा प्राण्यांच्या अन्नाकरितां उपयोग व्हावयाचा, ते पदार्थ प्राण्यांस सुलभ रीतीनें ग्रहण करितां येतील अशा स्थितींत असले पाहिजेत, आणि त्यांत प्राण्यांस अपायकारक अगर विषारी द्रव्यें असूं नयेत. इतकें असून शरीरपोषणास अवश्यक जीं द्रव्यें आहेत, तीं प्राण्यांच्या अन्नाकरितां उपयोगांत येणाऱ्या पदार्थांत मुबलक असणें जरूर आहे.

### २. अन्नाचा उपयोग करून घेण्याची प्राण्यांची रीत.

वनस्पतींचा जीवनव्यापार चालूं असतां, वनस्पती आपले अंगांत असलेल्या स्वाभाविक शक्तीच्यायोगानें व सूर्यप्रकाशाच्या साह्यानें

मूलतत्वरूप स्थितींत असलेल्या अनेक पदार्थांचे अनेक संयुक्त व विशेष घोंटाळ्याची ज्यांची घटना आहे असे पदार्थ बनविते, आणि त्यापैकीं कांहीं पदार्थ आपले शरीरांत सांठवून ठेविते. प्राण्यांची अन्नाचा उप-योग करून घेण्याची रीत वरील रीतीच्या अगदीं उलट आहे. प्राणी पचनाक्रियेच्या द्वारें सेवन केलेल्या संयुक्त पदार्थांचें पृथक्करण करितात व त्यांतील तत्वांशाचा आपले पोषणास व वृद्धीस उपयोग करून घेतात.

प्राणी जें अन्न सेवन करितात, त्यांतील सत्वाचा उपयोग करून घेण्यापूर्वी, अन्नाचें पृथक्करण करून त्यांतील सत्वांश वेगळा करण्याचे कामीं प्राण्यांस चर्वण, पचन, शोषण वगैरे ज्या अनेक क्रिया कराव्या लागतात, त्यांकरितां आपल्या शक्तीचा बराच उपयोग करावा लागतो. तेव्हां प्राण्यांचे अन्नाची योग्यता ठरविणें झाल्यास, त्यापासून शरीरास प्राप्त होणाऱ्या शक्तीचा व ती शक्ति प्राप्त करून घेण्याकरितां प्राण्यास त्याच्या शक्तीचा कोणत्या प्रमाणानें उपयोग करावा लागेल तिचा विचार केला पाहिजे. अन्नापासून प्राप्त होणाऱ्या शक्तीपेक्षां जास्त शक्ति जर प्राण्यास खर्च करावी लागेल, तर तें अन्न प्राण्याचे पोषणास नाला-यक आहे असें समजावें. कांहीं कांहीं पदार्थ पचविण्यास प्राण्यांस इतकी मेहनत पडते कीं, तें सेवन केल्यापासून त्यांस शरीरपोषणाचे कामीं कांहीं उपयोग न होतां उलटा त्रास मात्र होतो.

प्राणी जें अन्न सेवन करितात त्यापासून त्यांस अनेक उपयोग घड-तात. शरीराचे सर्व व्यापार चालण्याकरितां जी कांहीं उष्णता शरी-रांत असावी लागते, ती कायम ठेवण्याचे कामीं अन्नाचा उपयोग होतो. जीवनव्यापार चालू असतां स्नायूंस जी झीज पोंचते ती भरून येणें व पित्त, लाळ वगैरे अवश्यक रसांची उत्पत्ति होणें हीं कार्यें अन्नापासूनच घडतात. प्राणी जेव्हां लहान असतात, तेव्हां त्यांचे अवयवांची वृद्धि होणें, हें सर्वस्वी अन्नसेवनावरचअवलंबून आहे. प्रजोत्पत्ति होणें, चरबी वगैरे रूपानें शरीरांत पोषक द्रव्यांचा साठा होणें, दूध वगैरे पदा-र्थांची उत्पत्ति करणें व शारीरिक श्रमानें अनेक कामें उठवणें,

ह्या सर्व गोष्टी घडण्यास प्राणी जें अन्न सेवन करितात, तेंच कारणीभूत होय. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व गोष्टी घडून याव्या, ह्मणून प्राणी अन्न सेवन करितात.

अन्नसेवन करण्याचे जे हे उद्देश वर सांगितले ते ह्मणजे नेहमीं पूर्णपणें सिद्धीस जातात असें नाहीं. प्राण्यांस अन्न जर अपुरें मिळेल, तर त्याचा उपयोग उष्णतेचें रक्षण, स्नायूंची दुरुस्ती, शरीराची वाढ व प्रजोत्पत्ति इतक्याच कामीं होतो; आणि हीं कामें पार पडून उरे इतक्या अन्नाचा पुरवठा जर प्राण्यांस झाला, तर दुग्धोत्पत्ति वगैरे दुसरीं कार्यें घडतात. पहिल्या चार कार्यांकरितां ज्या अन्नाचा उपयोग होतो, त्यास पोषक अन्न व दुसरीं इतर कार्यें ज्या अन्नापासून घडून येतात त्यास उत्पादक अन्न असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

प्राणी जेवढें अन्न सेवन करितो, तेवढ्या सर्व अन्नाचा त्यास उपयोग घडत नाहीं. अन्नाच्या कांहीं भागावर पाचक द्रव्यांची क्रिया घडणें राहतें व असें झालें कीं पचन न पावलेलें अन्न पचनास अयोग्य ह्मणून मलद्वारावाटे मलाचे रूपानें बाहेर टाकलें जातें. जितक्या अन्नाचें पूर्ण पचन घडतें तितकेंच प्राण्यास शरीरपोषणास उपयोगी पडतें.

अन्नपचन करण्याची शक्ति ही निरनिराळ्या प्राण्यांत निरनिराळ्या प्रमाणानें असते. कांहीं प्राणी सेवन केलेल्या अन्नापैकीं शेकडा ८० भाग पचन करूं शकतात, तर दुसरे त्याप्रमाणेंच सशक्त व तितक्याच वयाचे प्राणी सुमार शेकडा ४० भाग पचन करूं शकतात.

अन्न कमी अधिक मानानें पचन होण्याचें प्रमाण अन्नाचे घटक द्रव्यांवरही अवलंबून आहे. कांहीं प्रकारचें अन्न सर्व पचन पावतें, तर कांहीं जातीचें अन्न सुमार $\frac{१}{४}$ च पचन होतें. अन्नामधील कांहीं घटक द्रव्यें अशीं असतात कीं, तीं सहज पचतात, परंतु कांहींचा थोडासा भागच पचन होतो. अशा घटक द्रव्यांच्या कमी अधिक प्रमाणावर हलकें अन्न व जडान्न ह्या संज्ञा अवलंबून असतात. ज्या अन्नांत सहज पचन पावण्यासारखीं द्रव्यें असतात, तें हलकें अन्न व इतर जडान्नें होत.

सेवन केलेल्या अन्नापैकीं बहुतकरून अर्ध्यापासून दोन तृतियांश भाग पचन पावतो व बाकीच्या अन्नाची विष्टेच्या रूपानें वाट लागते.

## ३. प्राण्यांच्या अन्नाची घटना.

**१. अन्नाचें वर्गीकरण:**—प्राण्यांचें अन्न हें अनेक पदार्थ मिळून झालेलें असतें. त्या सर्वांचा थोड्या बहुत प्रमाणानें प्राण्यांस शरीर-पोषणाचे कामीं उपयोग घडतो, व त्या पदार्थांपैकीं प्रत्येक पदार्थाचे सेवनानें प्राण्याचे शरीरावर निरनिराळें ठरीव कार्य घडत असतें. प्राण्यांचे अन्नांत अनेक पदार्थ असतात, परंतु ते सर्व खालीं दिलेल्या वर्गांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी वर्गांत येतात. प्राण्यांचें अन्न ज्या पदार्थांचें मिळून बनलेलें असतें त्यांचे मुख्यत्वें पाणी, राख, नैट्रोजनयुक्त द्रव्यें, कार्बनयुक्त द्रव्यें आणि स्निग्ध द्रव्यें असे पांच भाग होतात.

**२. पाणी:**—कोणताही पदार्थ घ्या, त्यांत पाणी हें असतेंच; मग तें थोड्या प्रमाणानें असो अगर जास्त प्रमाणानें असो. ताजीं कंदमुळें, हिरवें ताजें गवत वगैरे ताज्या पदार्थांत पाणी शेंकडा नव्वद या प्रमाणांत असतें. उबड्या हवेंत वाळलेला दाणागोटा, गवत, पेंढा वगैरे पदार्थांत पाण्याचें प्रमाण शेंकडा दहापासून पंधरा असतें, आणि भट्टींत घालून सुकवलेल्या पदार्थांत तर तें फारच कमी ह्मणजे सुमार शेकडा पांच अगर सहा असतें. यावरून प्राण्यांच्या अन्नांत स्वभावतःच थोडें फार पाणी असतें.

अन्नांत असणाऱ्या ह्या नैसर्गिक पाण्याच्यायोगानें प्राण्यांस प्यावयास लागणाऱ्या पाण्याची कांहींशी गरज भागते. ओला चारा खाणारी गुरेंढोरें पाणी फार थोडें पितात. असें जरी आहे तरी, असें कोणतेंही अन्न नाहीं कीं, तें सेवन केल्यास पाण्याची व इतर अन्नद्रव्यांची अशी दोहोंचीही गरज भागेल.

---

१ दुधाच्यायोगानें दोन्ही कार्यें साधतात, परंतु त्यांचें सेवन नेहमीं करून राहणें फायदेशीर नाहीं. जन्मापासून वर्ष सहा महिने निव्वळ दुग्धसेवन फायदेशीर व अवश्य आहे. यासंबंधी साधकबाधक विवेचन रा. भाटेकृत ‘ जीवनशास्त्राची तत्वें ’ या पुस्तकांत पहावें.

पाण्याच्यायोगानें अन्नास मृदुत्व येतें व तें खाण्यास सुलभ पडून रुचकर लागतें. वाळलेल्या मुख्या गवती पेंढ्यापेक्षां ताजें हिरवें गवत जनावरांस फार आवडतें; याचें कारण तें खाण्यास स्वादिष्ट लागतें हें होय. वाळलेला पेंढा अगर गवत जर कांहीं वेळ पाण्यांत भिजवून अगर वाफ देऊन नंतर गुरांस घातलें, तर तें तीं फार खुषीनें खातात.

**३. राखः**—उद्भिज अगर प्राणिज पदार्थ जर आपण पूर्णपणें जाळला, तर मागें जो अवशेष भाग राहतो त्यास राख असें ह्मणतात. ही राख ह्मणजे वनस्पतींनीं जमिनींतून शोषून घेतलेलीं खनिज अगर निरिंद्रिय द्रव्यें होत. वनस्पतींच्या अगर प्राण्यांच्या राखेंत सांपडणारीं द्रव्यें प्रायः सारखींच असतात. वनस्पतींच्या अगर प्राण्यांच्या सर्व भागांत कांहीं जातीची राख नेहमीं सांपडते व ती राख त्यांचे प्रत्येक भागांत असणें हें त्यांचे जीवनव्यापार अबाधित चालण्यास अत्यावश्यक आहे.

वनस्पतींत अगर प्राण्यांत असणाऱ्या राखेचें (सेंद्रिय द्रव्यांचें) प्रमाण त्यांच्या शरीराच्या मानानें प्रायः फारच कमी असतें; परंतु जनावरांचीं हाडें, व वनस्पतींची साल व असेच दुसरे कांहीं भाग यांत सांपडणाऱ्या राखेचें प्रमाण बरेंच असतें. बहुतेक सर्व अन्नद्रव्यांत प्राण्यांचा जीवन-व्यापार चालण्यास अवश्य तितकीं सेंद्रियद्रव्यें प्रायः असतात, ह्मणून प्राण्यांच्या अन्नांचा विचार करितांना सेंद्रियद्रव्यांच्या बाबतींत विशेषसा विचार करण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण कोणतेही पदार्थावर जरी प्राणी पोसले तरी त्यांस अवश्य तितकीं खनिज द्रव्यें त्या पदार्थांत मिळ-ण्यास कांहीं अडचण पडत नाहीं. निदान गुराढोरांच्या बाबतींत तरी ही गोष्ट बहुतांशीं खरी आहे. आतां मिठाप्रमाणें कांहीं खनिज द्रव्यें अन्नांत घालीत असतात, परंतु त्यांचा उपयोग अन्नांतील निरिंद्रिय द्रव्याची उणीव भरून काढण्यापेक्षां त्याला रुचकरपणा आणण्यासाठींच बहुत-करून करीत असतात.

**४. नैट्रोजनयुक्त द्रव्यें:**— प्राण्यांचे अन्नांतील महत्वाचा भाग ह्मटला ह्मणजे नैट्रोजनयुक्त द्रव्यें होत. या द्रव्यांचें प्रमाण अन्नांत नेहमीं

सारखें नसतें. निरनिराळ्या अन्नांत या द्रव्यांची घटना निरनिराळी व फार घोंटाळ्याची असते. तरी सर्वांत नैट्रोजन व थोड्या फार प्रमाणानें कार्बन, आक्सिजन, हैड्रोजन व थोडासा गंधक व फास्फरस असतो. आतां अन्नाच्या या भागांत जरी वर सांगितलेलीं दुसरीं द्रव्यें असतात, तरी यांत असलेल्या नैट्रोजनमुळें महत्वाचें कार्य होत असल्यानें, या भागास नैट्रोजनयुक्त हें नांव दिलें आहे.

नैट्रोजनच्या अभावीं प्राण्यांचा जीवनव्यापार चालणें अगदीं अशक्य आहे. प्राण्यांच्या अगर वनस्पतींच्या सजीवत्वाची नैट्रोजन ही साक्षच आहे, व त्याविना त्यांची वाढ होणें शक्य नाहीं. असें असल्यामुळें वनस्पतींच्या व प्राण्यांच्या अन्नांत नैट्रोजनचा पुरवठा असणें अगत्याचें आहे. तेव्हां ज्या पदार्थांत अल्ब्युमेन फार असे पदार्थ प्राण्यांच्या खाण्यांत असणें चांगलें.

प्राण्यांच्या सर्व प्रकारच्या अन्नांत अल्ब्युमेन हा थोडा फार असतोच. परंतु कांहीं पदार्थांत तो इतका थोडा असतो कीं, प्राण्यांचा जीवनव्यापार चालून त्यांची वाढ होण्यास तो पुरत नाहीं. ज्या पदार्थांत हीं अल्ब्युमेनसारखीं द्रव्यें पुष्कळ असतात, त्यांस अल्ब्युमेन कमी असणाऱ्या पदार्थांपेक्षां किंमत फार पडते. तेव्हां या दोन्हीं बाबींचा पूर्ण विचार करून प्राण्यांस पोसण्याची तजवीज ठरविली पाहिजे; व असें करितांना नैट्रोजनयुक्त द्रव्यांचा पूर्ण पुरवठा होऊन विशेष खर्चही पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. जर कमी दर्जाचें अन्न प्राण्यांस दिलें तर खर्च कमी पडेल हें खरें, परंतु त्या मानानें प्राण्यांचे वाढीस व त्यापासून उत्पन्न होणारे पदार्थांचे उत्पत्तीस हिसका बसेल; आणि जरूरीपेक्षां जास्त जर पौष्टिक अन्न प्राण्यांस दिलें, तर विष्टेच्या वगैरे रूपानें त्याचा नाश होईल. सारांश काटकसर व अन्नाचा पौष्टिकपणा या दोन्ही बाबी प्राण्याचे अन्नासंबंधी विचार करितांना नजरेसमोर असल्या पाहिजेत.[1]

---

१. नैट्रोजनयुक्त अल्ब्युमेन वगैरे द्रव्यें प्राण्यांचे वाढीस व प्रजोत्पत्तीस अत्यावश्यक आहेत. लोकर, मांस, अंडीं, दूध वगैरे प्राण्यांपासून उत्पन्न होणारे पदार्थांत

५. **कार्बनयुक्त द्रव्यें:**—प्राण्यांचे अन्नांत असणारे दुसरे पदार्थ ह्मटले ह्मणजे साखर, गोंद वगैरे कार्बनयुक्त द्रव्यें होत. ह्या पदार्थांत कार्बनशिवाय आक्सिजन व हैड्रोजन हीं द्रव्यें पाण्यांत ज्या प्रमाणानें असतात त्याप्रमाणानें असतात. नैट्रोजन मात्र या पदार्थांत नसतो.

फुप्फुसांत व रक्तांत असलेल्या आक्सिजन वायूशीं अन्नांत असलेल्या कार्बनयुक्त द्रव्यांचा संयोग होऊन, कार्बनयुक्त द्रव्यांचें पृथक्करण होतें व कार्बनिक असीड व पाणी हे पदार्थ तयार होतात; आणि या रासायनिक व्यापारामुळें उघड्या हवेंत वस्तू जळल्यामुळें जशी उष्णता प्राप्त होते तशी उष्णता उत्पन्न होते. तेव्हां शरीररूपी एंजिनांत उष्णता उत्पन्न करणारे पदार्थ ह्मटले ह्मणजे अन्नांतील कार्बनयुक्त द्रव्यें होत. याशिवाय स्नायूंस शक्ति आणण्याचें व शरीरांत चरबीची वृद्धि करण्याचे कामींही या द्रव्यांची मदत घडते.

६. **स्निग्ध द्रव्यें:**—अन्नांमध्यें जीं स्निग्ध द्रव्यें असतात, त्यांचा उपयोगही बहुतकरून कार्बनयुक्त द्रव्यांप्रमाणेंच असतो. कार्बनयुक्त द्रव्यांप्रमाणेंच त्यांत कार्बन, आक्सिजन व हैड्रोजन हीं द्रव्यें असतात; पण फरक इतकाच कीं, स्निग्ध द्रव्यांत आक्सिजनचें प्रमाण कार्बनयुक्त द्रव्यापेक्षां कमी असतें. असें असल्यामुळें त्यांच्या ज्वलनामुळें कार्बनयुक्त द्रव्यापेक्षां शरीराचे स्नायूंस जास्त शक्ति प्राप्त होते, ह्मणून कार्बनयुक्त द्रव्यापेक्षां प्राण्यांस अन्नांतील स्निग्ध द्रव्यें अधिक उपयोगी असतात.

स्थूलमानानें पाहतां स्निग्ध द्रव्यांच्या सेवनानें उत्पन्न होणारी शक्ति तितक्याच कार्बनयुक्त द्रव्यांच्यायोगानें उत्पन्न होणाऱ्या शक्तीच्या दोन, सव्वादोन पट असते. सर्वसाधारण अन्नांत स्निग्ध द्रव्यांचें प्रमाण फार नसतें. उघड्या हवेंत वाळलेल्या पदार्थांत स्निग्ध द्रव्यांचें प्रमाण शेंकडा तीनपासून आठपर्यंत असतें.

---

नैट्रोजन फार असतो. नैट्रोजनयुक्त द्रव्यांचें पृथक्करण शरीरांत झालें कीं उष्णता उत्पन्न होते, व शरीराची ऊब कायम रहाते. रा. भाटेकृत ' जीवन शास्त्राचीं तत्वें ' पहा.

## ४. पोषणक्रिया.

**१. अन्नांतील पोषणद्रव्याचें प्रमाणः**— येथवर केलेल्या विवेचनावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, जनावरांस अगर प्राण्यांस आपण जें अन्न घालतों, त्या अन्नांत नैट्रोजनयुक्त, कार्बनयुक्त व स्निग्ध पदार्थ जे असतात ते प्राण्यांचे शरीरपोषणास मुख्यतः उपयोगीं असतात. याच पदार्थांस स्थूलमानानें प्राणिशास्त्रवेत्ते प्राण्यांचें अन्न असें ह्मणतात.

नैट्रोजनयुक्त द्रव्यें हीं प्राण्यांचे शरीराची वाढ होण्यास व त्यांपासून प्रजोत्पत्ति व इतर पदार्थांचें उत्पादन होण्यास अत्यावश्यक आहेत. याप्रमाणेंच कार्बनयुक्त द्रव्यांची व स्निग्ध द्रव्यांचीही प्राण्यांस फार अवश्यकता आहे. या दोन्हीं द्रव्यांच्यायोगानें शरीरांत उष्णता उत्पन्न होते, व चरबीची वृद्धि होऊन प्राणी सदृढ बनतात. तेव्हां प्राण्यांचे शरीरपोषणासंबंधी विचार करीत असतां, ह्या तिन्ही घटक द्रव्यांचें प्रमाण नाना प्रकारच्या अन्नांत कसकसें आहे हें पाहणें फार महत्वाचें आहे. इष्ट हेतू सिद्धीस जातील अशा प्रकारें जेव्हां प्राण्यांचे अन्नाची घटना असेल, ह्मणजे इष्ट हेतु फलद्रूप होण्यास योग्य अशा प्रमाणांत जेव्हां वर दर्शविलेलीं तिन्हीं अन्नद्रव्यें प्राण्यांचे अन्नांत असतील, तेव्हां त्या अन्नास उत्तम अन्न असें ह्मणतात.

अन्नाची योग्यता ठरवणें झाल्यास त्यांतील नैट्रोजनयुक्त भागाचें कार्बन व स्निग्धद्रव्ययुक्त भागाशीं काय प्रमाण आहे हें समजणें फार जरूर आहे; आणि या प्रमाणास पौष्टिक द्रव्याचें प्रमाण असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. अन्नांतील पौष्टिक द्रव्यांचें प्रमाण ह्मणजे अन्नांत असलेल्या कार्बनयुक्त द्रव्यांत, अन्नांत असलेल्या स्निघद्रव्यांची सव्वादोनपट मिळवून येणाऱ्या संख्येशीं बसणारें नैट्रोजनयुक्त द्रव्यांचें प्रमाण होय. हें प्रमाण काढणें झाल्यास अन्नांत असलेल्या कार्बनयुक्त भागांत अन्नांत असलेल्या स्निग्धद्रव्ययुक्त भागाची सव्वादोनपट मिळवावी व तीस नैट्रोजनयुक्त भागानें भागावें, ह्मणजे येईल तें पौष्टिक द्रव्याचें प्रमाण होय. अन्नांतील पौष्टिक द्रव्यांचें प्रमाण १ बरोबर ९ $\frac{१}{२}$ आहे

असें ह्मटलें तर त्याचा अर्थ असा कीं, अन्नांत प्रत्येक नैट्रोजनयुक्त (पौष्टिक) एकशेर द्रव्याबरोबर साडेपांचशेर कार्बन व स्निग्धद्रव्ययुक्त (उष्णता व चरबी उत्पन्न करणारीं) अन्नद्रव्यें आहेत.

अन्नांतील नैट्रोजनयुक्त भागाशीं नैट्रोजनरहित भागाचें कांहीं तरी प्रमाण हें असलेंच पाहिजे. जे प्राणी वाढीस लागलेले असतील, अगर ज्यांपासून लोंकर, दुध वगैरे पदार्थ उत्पन्न होत असतील, त्यांस जें अन्न घालावयाचें, त्यांत नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यांचें प्रमाण इतर प्राण्यांस घालावयाच्या अन्नांत असणाऱ्या नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यांचे प्रमाणापेक्षां जास्त असलें पाहिजे. असें असल्यामुळें प्राण्यांस जें अन्न घालावयाचें त्यांतील पौष्टिक द्रव्यांचे प्रमाणाचा विचार करणें फार अगत्याचें आहे. हें पौष्टिक द्रव्याचें प्रमाण लक्षांत घेण्याचें दुसरें कारण अन्नांतील पौष्टिक भागाचा अपव्यय होऊं नये हें होय. अन्नांतील नैट्रोजन द्रव्यांचा उपयोग प्राण्यांचे शरीरांत नैट्रोजनयुक्त पदार्थांची उत्पत्ति होईल अशा कामींच केला पाहिजे. उष्णतेची उत्पत्ति करण्याकडे नैट्रोजनयुक्त अन्नद्रव्यांचा उपयोग करणें फार तोट्याचें आहे. स्टार्च अगर साखर हीं द्रव्यें उष्णताजनक आहेत. व तीं नैट्रोजनयुक्त द्रव्यांपेक्षां स्वस्त असतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तेव्हां स्वस्त वस्तूनें होणारें कार्य जर महाग वस्तूनें केलें तर तोटा होणारच, ही गोष्ट ज्यावेळीं अन्नांत नैट्रोजनयुक्त द्रव्यें गरजेपेक्षां जास्त असतात तेव्हां घडते. त्यावेळीं पौष्टिक द्रव्यांच्या फाजील अस्तित्वामुळें तीं उष्णताजनक द्रव्यांचे ऐवजीं शरीररूपी भट्टींत उपयोग केलीं जाऊन भलत्याच कामीं लागतात व थोड्या खर्चांत होणाऱ्या कामास निरर्थक जास्त खर्च होतो.

---

१. अन्नांतील पौष्टिक द्रव्याचें प्रमाण काढणें फार सोपें आहे. उदाहरणार्थ गवतांत ७ भाग नैट्रोजनयुक्त द्रव्यें, ३८ भाग कार्बनयुक्त द्रव्यें, व १ भाग स्निग्ध द्रव्यें असलीं तर गवताचें पौष्टिकद्रव्याचें प्रमाण:—१×२$\frac{१}{४}$ = $\frac{९}{४}$ (१ स्निग्धद्रव्याची २$\frac{१}{४}$ पट + ३८ (कार्बनयुक्त भाग) = $\frac{१६१}{४}$ ÷ ७ (नैट्रोजनयुक्त द्रव्यें) = ५·७ ह्मणजे गवतांतील पौष्टिकद्रव्यांचे १ बरोबर ५·७ हें प्रमाण होय.

बहुतकरून नैसर्गिक तऱ्हेनें उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रकारच्या अन्नांत [ जसें फळफळावळ, भाजीपाला, गवत वगैरे ] नैट्रोजनयुक्त द्रव्यांचें प्रमाण बेताचेंच असतें. निदान गुरेंढोरें ज्या गवत वगैरे पदार्थांवर पोसलीं जातात, त्यांत तरी नैट्रोजनयुक्त द्रव्यांचें प्रमाण कमीच असतें; ह्मणून जनावरें पाळणारानें पेंड वगैरे पदार्थ गुरांस खावयास घालून त्यांचे अन्नांतील ही नैट्रोजनयुक्त द्रव्यांची उणीव भरून काढणें फार अगत्याचें आहे.

**२. शरीर पोषणास लागणाऱ्या अन्नाचें प्रमाण :**—प्राण्यास शरीरपोषणास लागणाऱ्या अन्नाचें प्रमाण प्राण्याच्या भोंवतालची एकंदर परिस्थिति व दुसऱ्या अनेक गोष्टींवर अवलंबून असतें. प्राण्यानें सेवन केलेल्या अन्नापैकीं कांहीं अन्नाचा भाग शरीररक्षण व जीवनव्यापार चालण्याकडे खर्ची पडत असतो, व अशा प्रकारें ज्या अन्नाचा उपयोग घडतो, त्यास पोषकअन्न असें ह्मणतात. प्राण्याचा जीवनव्यापार सुरळीत चालून, तो सशक्त स्थितींत जिवंत राहण्यास जें अन्न अवश्य लागतें व ज्याच्यायोगानें प्राण्याचे शरीरांत कांहीं फेरफार होत नाहीं, त्या अन्नास पोषक अन्न असें ह्मणतात.

हें पोषक अन्न प्राण्यास कमीअधिक लागणें त्याच्या आंगलटीवर व व कांहींसें त्याच्या स्वतांच्या शरीरप्रकृतीवर अवलंबून असतें. जे प्राणी लहान असतात, त्यांस त्यांच्या शरीराच्या वजनाच्या मानानें लागणारें अन्न, मोठाल्या प्राण्यांस त्यांच्या वजनाच्या मानानें जें अन्न लागतें त्या अन्नाशीं तुलना केलें तर बरेंच अधिक असतें. स्थूलमानानें पाहूं लागलों तर १००० पौंड ज्या गुराचें वजन असतें, त्यास एका दिवसांत सुमारें १८ पौंड वजन सुकें अन्न निव्वळ शरीरपोषणास लागतें.

जनावरें पाळणारांस जनावरांपासून जो फायदा होत असतो, तो तीं पोषक अन्नाशिवाय अधिक जें अन्न खातात त्यापासून होतो. निव्वळ शरीरपोषणापुरेंसेंच अन्न जनावरांस मिळत असेल तर, त्यापासून पाळणारास कांहींच फायदा होणार नाहीं. प्राण्यास जर पोषणापुरेसें खाणें

मिळालें नाहीं, तर तो वाळत जातो व नंतर तो सुधारण्यास फार मेहनत पडते.

पोषक अन्नापेक्षां जास्त अन्न जनावरांस घातल्यामुळें होणारा फायदा जनावरांच्या स्वाभाविक शक्तीवर व जातीवर अवलंबून असतो. कांहीं प्राणी असे असतात कीं, त्यांस ज्या प्रमाणानें जास्त अन्न घालावें त्या प्रमाणानें ते उत्पन्न देत असतात. असें जरी आहे तरी, प्राण्यांची उत्पादक शक्ति कांहीं ठराविक असते; त्या शक्तीचे बाहेर त्यांस कितीही अन्न जास्त घातलें तरी ते अधिक उत्पत्ति करूं शकत नाहींत. जें वाजवीपेक्षां जास्त अन्न आपण घालतों तें त्यांच्या शरीरांत कांहीं परिणाम न घडवितां तसेंच विष्टेच्या रूपानें बाहेर येतें; अगर कधीं कधीं अपचन वगैरे अपाय करतें. असें झालें ह्मणजे प्राणी अन्न खात नाहींसे होतात. असें जरी आहे तरी पोषक अन्नापेक्षां जास्त अन्न सेवन करणें व त्यापासून मालकास फायदा करून देणें, या दोन्ही गोष्टी करण्याचें सामर्थ्य निरनिराळ्या प्राण्यांत निरनिराळ्या प्रमाणानें असतें. कांहीं जनावरांस पोषक अन्नापेक्षां ६ पौंड जास्त अन्न फायदेशीर रीतीनें उपयोग करितां येत असलें तर, कांहींस दोन पौंडही अन्न तसें उपयोग करितां येणार नाहीं व कांहीं तर ६ पौंडांपेक्षां जास्त अन्न सेवन करून त्याचा फायदेशीर उपयोग करूं शकतील.

वरील विवेचनावरून हें आपल्या लक्षांत येईल कीं, प्राणी जें अन्न भक्षण करितात तें अन्न व सदुपयोगी लागणारें अन्न, हीं एकच नसून निरनिराळीं आहेत. सेवन केलेल्या अन्नापैकीं बराच भाग बरेच प्राणी

---

१ प्राण्यांस जें अन्न घालतों त्यापासून होणारा परिणाम प्राण्यांची निगा व तें वागविण्याची पद्धत या गोष्टीवर बहुतकरून अवलंबून असतो. जनावरें बांधण्यास उबदार, स्वच्छ हवा व उजेड ज्यांत बेताचा आहे असा गोठा असावा. फार थंडीचे दिवसांत पाणी जरा कोमट करून पाजावें. असें केल्यापासून फार फायदा आहे. जनावरांस अन्न कमी पुरतें. नुसत्या खाण्यापेक्षां मालकाची नजर ही बरेंच काम करिते.

जशाचा तसाच गुदद्वारावाटे बाहेर टाकितात; त्या अन्नाचा प्राण्याची शक्ति वाढविण्याकडे अगर दुसऱ्या कोणत्याही रीतीनें उपयोग घडत नाहीं.

नानाप्रकारचे शोध करून, निरनिराळ्या प्राण्यांस लागणाऱ्या अन्नाचें प्रमाण प्राणिशास्त्रवेत्त्यानीं काढलें आहे. त्यापैकीं कांहीं प्राण्यांचे अन्नाचें प्रमाण खालीं दिलें आहे.

( पचन पावण्यासारखी )

| प्राणी | सुके पदार्थ | नैट्रोजनयुक्त द्रव्यें | कार्बनयुक्त व स्निग्ध द्रव्यें | पौष्टिक प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | पौंड | पौंड | पौंड | पौंड |
| बैल ( पोषक अन्न ) | १७·५ | ०·७ | ८·१५ | १–१२ |
| काम करणारा घोडा | २२·५ | १·८ | ११·८ | १–७ |
| दूध देणारी गाय | २४ | २·५ | १२·९ | १–५·४ |
| वाढीस लागलेलें डुकराचें पिलूं | ४२ | ७·५ | ३० | १–४ |

आतां हीं वर दिलेलीं प्रमाणें नमुन्यादाखल होत. यांत उपयुक्तते-प्रमाणें फेर करणें वावगें होणार नाहीं. या नमुन्यादाखल प्रमाणांत निरनिराळ्या प्राण्यांच्या गरजेप्रमाणें कसकसा फेरफार करावा हें समजणें फार महत्वाचें आहे; आणि जनावरें पाळणारांना त्यांच्या धंद्यांत किफायत होणें हें सर्वस्वी याच बाबीवर अवलंबून असतें.

**३. आहाराचें आकारमान:**— जनावरांचे अन्नासंबंधीं विचार करितांना फक्त त्यांतील पौष्टिक द्रव्यांचा व उष्णताजनक द्रव्यांचा विचार करून भागत नाहीं, तर आहाराचे आकारमानाचाही विचार करणें अवश्य आहे हें पूर्वींच सांगितलें आहे. भक्षण केलेल्या अन्नापैकीं बराच भाग पचन पावल्याविना जशाच्या तसाच बाहेर येतो. तेव्हां प्रत्येक प्रकारच्या अन्नांत थोडाबहुत तरी निरुपयोगी भाग असतो

हें निर्विवाद आहे; आणि अशा या निरुपयोगी भागामुळेंच प्राण्याचे अन्नाचें आकारमान वाढतें. अन्नांत असणारें पाणी व अन्नद्रव्यांतील तंतुमय भाग ( fiber ) ( गुरांढोरांच्या गवत, पेंढा, कडबा वगैरे अन्नांत तर तंतुमय भाग बराच असतो ) या दोन पदार्थांमुळें बहुतकरून अन्नाचें आकारमान वाढतें.

ज्या अन्नांत पाणी व तंतुमय भाग फार असतो, त्यास अवजड अगर जाडभरड अन्न ह्मणतात, व ज्यांत हा तंतुमय भाग कमी त्यास नाजुक व मृदु अन्न ह्मणण्याचा परिपाठ आहे. जनावराचें अन्न जर अति भरड असेल तर तें खाण्याचा त्यास कंटाळा येतो, व पोषणापुरतींही द्रव्यें त्यास त्यापासून मिळत नाहींत. तेव्हां अन्न अशा प्रकारचें असावें कीं, तें फार भरड नसून अति नाजुकही नसावें, तर शरीराचे पोषणास अवश्य तीं द्रव्यें त्याच्या सेवनानें पुरीं व्हावीं व पाचक रसांची क्रिया पूर्णपणें घडण्यास अवकाश सांपडेल असें अन्नाचें आकारमान असावें. निव्वळ पोषक द्रव्यें जर पोटांत गेलीं व त्याबरोबर अन्नांतील निरर्थक भाग जर मुळीं नसेल तर प्राण्यास पोट भरल्यासारखें वाटत नाहीं. पाचक रसांचे व्यापार नीट न घडल्यामुळें मलोत्सर्ग नीट होत नाहीं व अनेक अपाय उद्भवतात. सारांश अन्न असें असलें पाहिजे कीं, अन्न पचन करणारे इंद्रियांस फाजील श्रम तर पडूं नयेत, पण त्यामुळें त्यांस बेताचें काम प्राप्त व्हावें. सारांश ज्याप्रमाणें अति भरड अन्न अपायकारक असतें, त्याप्रमाणें अति शुद्ध केलेलें अन्नही अपायकारक होतें.

गवत, पेंढा अगर कडबा फार जाड असला ह्मणजे जनावरें तो खाण्यास कंटाळतात. तो खाण्यासही रुचकर नसतो व त्यांत तंतुमय भाग अतिशय असल्यामुळें तो पुष्कळ खाऊनही पोषण चांगलेंसें होत नाहीं. तंतुमय भाग अन्नांत नसून, जेव्हां त्यांत पाणी फार असल्यामुळें तें अवजड बनतें, तेव्हां तें खाण्यास कांहीं वाईट लागत नाहीं, पण तें पोटांत फारसें ठरत नाहीं. ओली चार वगैरे पदार्थ गुरें फार आवडीनें खातात असें आपल्या नेहमीं अनुभवास येतें. रंवथ करणारे प्राण्यांचे अन्नांत सुमार $\frac{2}{3}$ भाग गवत वगैरे असावें व एक $\frac{1}{3}$ साफसूफ

केलेलें पौष्टिक सात्विक अन्न असावें. जनावरें जर काम करणारीं असतील तर त्यांस १/२ भाग चांगलें सात्विक अन्न असावें व १/२ पेंढा, कडबा वगैरे जाडभरड अन्न असावें. सारांश ज्या प्राण्यांचीं पोटें मोठीं असतात त्यांस जें अन्न द्यावयाचें, त्यांत गवताप्रमाणें तंतुमय भाग जास्त आहेत असे पदार्थ पुष्कळ प्रमाणानें असले पाहिजेत. ह्मणजे त्यांस आकारमानानें मोठें असेंच अन्न दिलें पाहिजे व ल्हान पोटांचे प्राण्यांस साफसूफ केलेलें नाजूक अन्न दिलें पाहिजे.

४. **अन्नाचा स्वादिष्टपणा :**--गुरांढोरांस सुख्या वाळलेल्या गवता ऐवजीं जर ताजें हिरवें गवत घातलें तर तें तीं मोठ्या हौसेनें खातात[१]. अन्नाच्या बाबतींत विचार करितांना त्याच्या रुचीबद्दल विचार करणें फार महत्वाचें आहे. अन्नापासून इष्ट हेतू साधणें हें बहुतांशीं त्याच्या रुचीवर अवलंबून असतें. प्राण्यांस खाऊं घालावयाच्या अन्नांत पौष्टिकपणा पुष्कळ असून तें जर रुचकर नसेल अगर ज्या प्राण्यांस घालावयाचें त्यांस तें जर अवडत नसेल, तर त्या अन्नापासून त्या प्राण्यांस मुळींच सुख होणार नाहीं व तें अन्न घालणारास कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. प्राण्यांस त्यांच्या आवडीचे पदार्थ खावयास मिळत असले व अशा पदार्थांत पौष्टिक अंश जरी कमी असला, तरी त्या अन्नापासून परिणाम चांगलाच होतो; आणि जनावरांचे पालकास त्याचा मोबदला चांगला मिळतो. 'आवड गोड' हें तत्व अन्नाच्या बाबतींत प्रधान होय. कांहीं कांहीं पदार्थ स्वभावतःच रुचकर असतात, पण ते सर्व प्राण्यांस आवडतातच असें नाहीं. कोणता पदार्थ कोणत्या प्राण्यास आवडतो ही गोष्ट तर्कापेक्षां अनुभवानेंच कळणारी आहे; तेव्हां जनावरें

---

१ गवत हिरवें राहून त्याचा स्वादिष्टपणा न जावा ह्मणून हल्लीं अनेक योजना करितात. गवत चांगलें रहावें ह्मणून जें घर करितात त्यास ( Silo ) सायलो ह्मणतात. तें तारांचें असतें. गवत चांगलें राहण्यास सोपी युक्ति खालील होय. गवत तयार झाल्यावर हिरवें कापावें व त्यास एक ऊन देऊन त्याच्या गुंड्या जमिनींत खोल खड्डा करून त्यांत पुरून ठेवाव्या, ह्मणजे तें चांगलें राहतें. रा॰ पावगीकृत 'भारतीय साम्राज्य' पूर्वार्ध पृ॰ १ लें पहा.

पाळणारानें पाळलेल्या जनावरांस कोणतें अन्न मानवतें हें अनुभवानेंच ठरवणें चांगलें.

९. **अन्न शिजवणें व तयार करणें:**—आपण जीं जनावरें पाळतों त्यांपैकीं बहुतेक जनावरें गवत, दाणागोटा वगैरे ज्या स्थितींत उत्पादन होतो त्या स्थितींत खाऊं शकतात. त्यांस खाऊं घालण्याकरितां ह्मणजे त्या पदार्थांत विशेष कांहीं फेरफार करावा लागतो असें नाहीं. असें जरी आहे तरी जनावराचें अन्न तयार करण्याच्या अनेक रीती आहेत. अन्न शिजवून घातलें असतां तें जास्त रुचकर लागतें व सहज पचन होतें. जनावरांस घालावयाचीं धान्यें सगळीं न घालतां भरडून घालणें चांगलें. कोणतीं धान्यें शिजवून घालावीं, कोणतीं घालूं नये, या बाबतींत बरेंच मतवैचित्र्य आहे.

जाडेंभरडें धान्य भरडून अगर गवत तोडून तुकडे तुकडे करून बारीक करून घालण्यांत बराच फायदा आहे. अन्न वाफारून अगर शिजवून घातल्यास त्याची रुचि वाढते. असें जरी आहे तरी ज्या पदार्थांत नैट्रोजनयुक्त द्रव्यें अल्ब्युमेन वगैरे असतात, तें शिजविल्यापासून तोटा आहे. कारण नैट्रोजनयुक्त द्रव्यें शिजविलीं गेल्यास चांगलीं पचन होत नाहींत; ह्मणून सरकी वगैरे पदार्थ ( ज्यांत नैट्रोजन बराच असतो ) शिजवून न घालतां हिरवेच भिजवून घालावे. जनावरांस खाऊं घालावयाचे पदार्थांत कधीं कधीं फेरफार करणें चांगलें. दोन तीन पदार्थ मिळून जर अन्न तयार केलेलें असेल तर मिश्रणांतील सर्व पदार्थ सारख्या प्रमाणांत असावे व त्यांचें मिश्रण चांगलें करावें. अशीं दोन चार पदार्थमिश्र केलेलीं अन्नें गाई ह्मशींस नियमानें सदोदित बरेच दिवस घातल्यास फार फायदेशीर होतात.

येथवर गुरांचे पोषणासंबंधीं सामान्य विचार केला. विशेष प्रकारचे नियम या बाबतींत सांगणें कठीण आहे. कारण ही गोष्ट अनुभवजन्य असून एकाचा अनुभव सर्वत्र लागूं पडेलच असें नाहीं. सामान्य नियम सांगणेंच या बाबतींत शक्य आहे. ते अनुभवानें कसोटीस लावून पाहणें जिज्ञासू जनांनें काम आहे.

# निबंध ४ था.

## गुराढोरांची उत्पत्ति व व्यवस्था.

१. गुराढोरांची उत्पत्ति–उत्पत्ति ह्मणजे काय–उत्पत्तींचें धोरण इष्ट हेतू संपादण्याचा मार्ग. २. गुराढोरांची वाढ करण्यालायक स्थान. ३. गुरेंढोरें बाळगण्याचें प्रमाण. ४. गुराढोरांची निगा-गुरें बांधण्याची जागा-पाणी-अन्न.

### १. गुराढोरांची उत्पत्ति.

**१. उत्पत्ति ह्मणजे काय?**:—प्राणी लहानाचे मोठे होतात व कालांतरानें वृद्ध होऊन मरण पावतात. हा प्राण्यांची संख्या कमी होण्याचा नैसर्गिक मार्ग होय. याशिवाय कसाईखान्यांत प्राण्यांचा संहार होत असतो तो निराळाच. या दुसऱ्या कारणामुळें पृथ्वीवर जनावरांची दिवसेंदिवस उणीव पडत आहे.[1] सृष्टिनियमाप्रमाणें जनावरें जर मरत असलीं, तर त्याच नियमान्वयें त्यांची वाढ होऊन मृत्यूमुळें होणारी हानि भरून येते. जनावरांच्या जोड्यांपासून एकच जनावर उत्पन्न होतें असें नाहीं, तर जनावरें जर सुस्थितींत असतील, तर त्यांपासून दोहोंपेक्षां बऱ्याच जास्त जनावरांची उत्पत्ति होऊन, जनावरांचे संख्येंत भरणा पडत असतो. अशा प्रकारें जनावरें जन्मास येऊन त्यांची जी वाढ होते तीस पुनरुत्पादन असें ह्मणतात.

आतां हें प्रजोत्पत्तिकार्य सृष्टिनियमानेंच होत असतें, परंतु तेवढ्यावर आपलें कार्य भागत नाहीं, नवीन होणारी उत्पत्ति किंमतवान व

---

१. आपल्या देशांत प्राणिज संपत्तीचा कसा ऱ्हास होत आहे, याचें सुरेख वर्णन रा. पावगी यांनीं ‘ भारतीय साम्राज्य ’ पूर्वार्ध पु. १ लें यांत केलें आहे तें पहावें. लोकसंख्येच्या मानाशीं जनावरांचें प्रमाण काय आहे हेंही त्या ग्रंथांत दिलें आहे. ‘ कृषिकर्मविद्येंतील ’ परिशिष्ट पहा.

पालकाच्या इच्छेनुरूप व्हावी ही गोष्ट इष्ट असते. अमुक एक तऱ्हेचे गुण नवीन प्रजेंत असणें चांगलें असा समज असतो व त्या गुणावर नवीन जनावरांची किंमत अवलंबून असते. हा इष्ट हेतू साधण्याकरितां जनावरें पाळणारे लोक इष्ट अशा गुणांनींयुक्त असे प्राणी निवडून काढितात व त्यांच्याद्वारें नवीन जनावरांची उत्पत्ति करितात; या कृतीस जनावरांची ' उत्पत्ति करणें ' ही संज्ञा देण्यास कांहीं हरकत नाहीं.

प्राण्यांची उत्पत्ति करण्यांत पालकाचे दोन हेतु असण्याचा संभव आहे. ज्या जातीचे प्राणी असतील त्याच जातीची वीण अगर उत्पत्ति करणें, अगर नवीनच जातीचे प्राणी तयार करणें. लहान ठेंगण्या बांध्याचीं जनावरें असल्यास, तशींच दुसरीं उत्पन्न करणें हा हेतू धरून, जनावरें पाळणारा त्यांची उत्पत्ति करितो, अगर लहान बांध्याच्या जनावरांपासून मोठ्या बांध्याचे प्राणी उत्पन्न करावे अशी त्याची इच्छा असते. जनावरें पाळणारा जेव्हां पहिल्या उद्देशानें जनावरांची उत्पत्ति करितो; तेव्हां असलेली जात कायम ठेवण्याचा त्याचा हेतू असतो, व दुसऱ्या प्रकारानें नवीन जातीची उत्पत्ति करणें असतें.

वनस्पतींमध्यें जशा जाती असतात तशाच जनावरांमध्यें असतात. जेव्हां अनेक जनावरांमध्यें कांहीं गुण साम्यत्वानें असतात, तेव्हां त्या जनावरांची एक जात ह्मणतात. जात ह्मणजे एक सामान्य वर्ग होय. एकाच तऱ्हेच्या प्राण्यांत अनेक जाती असतात. एक जर गाई, बैल हीं जनावरें घेतलीं तर त्यांत आपल्या देशांतच देशपरत्वें अनेक जाती आहेत. कांहीं बैल लहान शिंगांचे व लहान बांध्याचे असतात; तर कांहींचीं शिंगें मोठमोठालीं असतात. सुरती, मावळी, कोंकणी वगैरे बैलांच्या अनेक जाती आहेत.

---

१ हिंदुस्थानांतील बैल, रेडे वगैरे जनावरांचे माहितीकरितां रा. रा. पावगी-कृत ' भारतीय साम्राज्य ' पूर्वार्ध पु० १ लें पहा.

**२. उत्पत्तीचें धोरण**:--गुरांढोरांची उत्पत्ति करितांना, उत्पत्ति करणाराचे मनांत कोणत्या गुणांनीं युक्त जनावरें उत्पन्न करावयाचीं, याविषयीं कांहीं एक ठराविक कल्पना असणें अत्यावश्यक आहे. आतां ही मनांत धरलेली कल्पना अघटित नसून संभवनीय असावी. ही मनांत धरलेली कल्पना संभवनीय असणें हें दोन गोष्टींवर अवलंबून आहे. पहिली गोष्ट ही कीं, ज्या जातीच्या जनावरांत मनुष्य नेहमीं वापरत असेल, ह्मणजे त्याजवळ ज्या जातीचीं जनावरें असतील, त्या जातींच्या जनावरांचे चांगले गुण कोणते याची पूर्ण माहिती जनावरांचे पाळकास असणें जरूर आहे, व जनावरांत असलेले गुणांपैकीं कोणते गुण त्यांच्या संततींत उतरणें संभवनीय आहे हें, ही जनावरांची उत्पत्ति करणारास पूर्णपणें अवगत असलें पाहिजे. या दोन्हीं गोष्टींचें ज्ञान असणें हें अनुभवावर अवलंबून आहे व जितका अनुभव जास्ती तितकें या गोष्टींत मनुष्याचें धोरण जास्त चालतें.

उत्पन्न केलेले प्राणी ज्या कामीं लावावयाचे असतील, तें काम व ते ज्या जातीपासून उत्पन्न करणें असेल ती जात, या दोन गोष्टींवर प्राण्यांचे उत्पत्तीविषयीं कल्पना बदलत असते. सर्व बाबतींत एकच धोरण धरून चालत नाहीं. कसाईखान्याचे उपयोगाकरितां जीं जनावरें तयार करावयाचीं, त्यांस अवश्य लागणारे गुण, दुग्धोत्पत्तिकरितां उत्पन्न करावयाच्या जनावरांस लागणाऱ्या गुणांपेक्षां फारच निराळे असतात.

जनावरांची परीक्षा, त्यांची एकंदर ठेवण, कातड्याची व केंसांची जात, शरीरांतील हाडांची रचना, चलनवलन करण्याचा प्रकार व स्वभाव या गोष्टींचे अवलोकनानें होत असते.

---

१. प्राण्यांच्या निरनिराळ्या जातींसंबंधीं व गुणधर्मसंबंधीं माहितीकरितां त्यांचे वर्णनाचीं पुस्तकें पहावीं. रा० बापटकृत ‘ गुरांचा वैद्य ’ हें पुस्तक पहावें. इंग्रेजी जाणणारे वाचकांस ही माहिती देणारीं अनेक इंग्रजी पुस्तकें आहेत, तीं इष्टतर

३. **इष्ट हेतु संपादण्याचा मार्गः**—वर सांगितल्याप्रमाणें उत्पन्न करावयाचे जनावरासंबंधीं कांहीं एक ठराविक कल्पना बांधल्यावर, जनावरांची उत्पत्ति करणारानें इष्ट गुण ज्या जनावरांत असतील त्या जनावरांपासूनच नवीन उत्पत्ति करविण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

आपल्या अंगांत असलेले गुणधर्म आपल्या संततीचे अंगीं उतरविण्याची शक्ति, प्राण्यांत कमी अधिक प्रमाणानें असते. कांहीं कांहीं प्राण्यांत आपल्या अंगांतील गुणधर्म आपले संततीचे अंगीं उत्तम प्रकारें उतरविण्याची शक्ति कांहीं अलौकिक असते. अशा प्राण्यांत जोमदार प्राणी ह्मणतात. तेव्हां ज्या प्राण्यापासून प्रजोत्पत्ति करावयाची, तो प्राणी जोमदार आहे किंवा नाहीं हें प्रथम पाहिलें पाहिजे. आतां हें मात्र खरें आहे कीं, उत्पत्ति करणारा प्राणी जोमदार होता किंवा नाहीं याचा निकाल त्या प्राण्यापासून होणाऱ्या प्रजोत्पत्तीवर अवलंबून असतो.

जोमदार प्राण्याचें लक्षण ह्मटलें ह्मणजे, त्याचे डोळे पाणीदार, चपळ, मोठाले व स्पष्ट उघडलेले असे असतात. त्याचे केंस पातळ

---

पहावीं. मराठी वाचकांकारितां थोडीशी माहिती खालीं देतों. उत्तम दुधाळ गाईचें वर्णन खालीं दिलें आहे. त्यावरून चांगल्या गाईंत कोणते गुण असणें अवश्य आहे हें समजेल. गाईचें डोकें लहान, मुसकट व तोंड मोठें असून एकंदर चेहरा स्वच्छ व रेखलेला असावा, ह्मणजे तोंडावर मांस फार असूं नये. कपाळ सरळ, मोठाले व पाणीदार डोळे, पातळ व लांब मान व शिंगें लहान व साधारण जाड असावीं. तिची उंची पाठीमागील भागापेक्षां पुढील भागीं २।४ इंचांनीं कमी असावी. गाय मागून अगर बाजूनें पाहिली तर पाचरीप्रमाणें सपाट दिसावी. खांदे पातळ असून त्यांवर मांस नसावें. पाठ लांब व खडबडीत असून कंबर रुंद असावी. मांड्या पातळ असून मागील पाय वांकडे असावे. शेंपूट लांब असावी, व एकंदर बांधा सैल असावा. वळीव बांध्याची ठेंगणी गाय दुध देणारी नसते. सड चांगले मोठाले व एकमेकांपासून दूर दूर असावे. ओटें मोठें पण फार सैल नसावें व मागील बाजूस मोठें होत गेलेलें असें असावें व पोटाच्या बाजूस रुंद व घट्ट चिकटलेलें असावें. ओट्यावरून पोटाकडे जाणाऱ्या दुग्धवाहिन्या जाड व मोठ्या असाव्या व एकंदर गाईचा बांधा खडबडीत वाळकुडा परंतु नाजूक नसावा.

व मऊ असून कातडी फार पातळ अगर फार जाड नसते. त्याचें हाडकांडें सकस असून हाडें फार मोठालीं नसतात व सर्व अवयव रेखल्यासारखे दिसतात. हें जनावर बांधेसूद असून लठ्ठ नसतें. हे प्राणी पाहिले असतां चपळ, बळकट, जोमदार व धीट असतात.[1]

अमुक एक कल्पनेप्रमाणें प्राणी उत्पन्न करावयाचे उद्देशानें प्राण्यांची उत्पत्ति करूं लागलों ह्मणजे, प्रथम प्रथम उत्पन्न होणारे प्राणी इष्ट हेतूप्रमाणेंच निपजतात असें नाहीं. जसजशी वंशावळ लांबत जाईल, तसतसे पुढील प्राणी धारलेल्या कल्पनेप्रमाणें निपजूं लागतात. जात हळूहळू दृढ होत जाते व होणारे संततींत बरेंच साम्य दिसूं लागतें. जसजशी वंशावळ वाढत जाते, तसतसें प्राण्यांतील साम्य अधिक अधिक दृष्टोत्पत्तीस येतें. कारण बरेच दिवसांच्या सान्निध्यानें अंगांतील गुणधर्म अंगवळणी पडतात व स्वाभाविक बनून जातात. तसें पहिल्या महिल्यानें घडत नाहीं. असें असल्यामुळें जी जात उत्पन्न होऊन बरेच दिवस झालेले असतात, तींतील प्राण्यांत आपल्या अंगांतील गुणधर्म आपल्या पोरांचाळांत उतरविण्याची शक्ति, नुकत्याच सुरू झालेल्या जातींतील प्राण्यांपेक्षां जास्त असते.

परदेशांतून निरनिराळ्या जातींचीं जनावरें आणून त्यांची वाढ करणें हा एक धंदाच आहे. परंतु या कामांत शेतकरीवर्गानें पडूं नये. शेतकऱ्यानें आपल्या भुईचींच ( जवळपास होणारीं ) जनावरें पाळावीं, व त्यांत जो जोमदार प्राणी असेल त्यापासून उत्पत्ति करवून, आपला गुराढोरांचा सांठा वाढवावा. असें केल्यास त्यास त्रास न पडतां त्याचें काम उत्तम प्रकारें चालतें. परदेशी जनावरें खरेदी केल्यास त्यांची परिस्थिति बदलल्यामुळें त्यांची पहिल्या पहिल्यानें निगा ठेवण्याचा फार त्रास पडतो व शेतकीचें काम चालण्यास अडथळा येतो. जनावरें

---

१. आपल्या हिंदु धर्मांत वळू सोडण्याची जी चाल आहे, ती फार चांगली आहे. या वळूस कांहीं अटकाव नसल्यामुळें तो जोमदार निपजतो व प्रजोत्पत्तीचे कामीं उपयोगीं पडतो.

पाळणें व त्यांची वाढ करणें हें जरी शेतकीचेंच एक अंग आहे, तरी तें करितांना शेतकींत हिसका बसतां उपयोगी नाहीं, तर जनावरें पाळण्यापासून शेतकीस मदत झाली पाहिजे; आणि हा उद्देश मुख्य समजून शेतकऱ्यानें या बाबतींत वर्तन ठेवावें. निरनिराळे जातींचीं जनावरें बाळगून तीं विकण्याकारितां तयार करणें हा कांहीं शेतकऱ्यांचा धंदा नव्हे.

## २. गुराढोरांची वाढ करण्यालायक स्थान.

उत्तम प्रकारच्या गुराढोरांचा सांठा कशा रीतीनें करितां येईल याचा येथवर विचार झाला. आतां गुरेंढोरें पाळण्यास सोईची परिस्थिति कोणती याचा थोडासा विचार करूं. ज्या जागीं शेती भाती करतां येणें शक्य नाहीं, अशा प्रदेशांत जनावरांची वाढ करणें चांगलें. डोंगराळ मुलखांत गवत, चारा मुबलक असतो आणि अशा ठिकाणीं गुरें बाळगण्यास फारसा खर्च येत नाहीं. नुसत्या नैसर्गिक गवत चाऱ्यावर गुराढोरांचें पोषण केल्यानें कधीं कधीं फायदा होतो व कधीं कधीं तोटाही असतो. सामान्यत्वें एका बैलास अगर गाईस आपला निर्वाह उत्तम प्रकारें चालविण्यास १० पासून २० एकर जमीन लागते. इतकी जमीन असली ह्मणजे तीवर एका जनावरानें पोषण वर्षभर चांगलें होण्यास कांहीं हरकत नाहीं.

विंध्याद्रि पर्वतासारख्या पर्वताजवळच्या दरीखोऱ्यांतील डोंगराळ प्रदेशांत गुरांची वाढ करणें चांगलें. अशा ठिकाणीं वर्षांतील बहुतेक दिवस ओला चारा ढोरांस मिळतो. अशा डोंगराळ प्रदेशांत धान्याचें

---

१. शेतकऱ्यानें दुग्धोत्पत्तीकरितां जर जनावरें पाळलीं असलीं तर प्रत्येक जनावर दररोज जर पक्के ५ शेर दूध देणारें असेल, तर त्यांत त्यास फायदा आहे. ५ शेरापेक्षां कमी दूध देणारें जनावर पाळण्यापासून कांहीं फायदा नाहीं. तेव्हां अशीं जानवरें जवळ ठेऊं नयेत व दुग्धोत्पत्तीचे उद्देशानें वाढवून त्यांची वाढही करूं नये. कारण त्याच्या प्रजेपासून जास्त दुग्धोत्पत्ति होत नाहीं.

पीक चांगलें होत नाहीं, तेव्हां अशा ठिकाणीं गुरेंढोरें वाढविल्यास ती जमीन निकामी रहात नाहीं. या ठिकाणीं अचाट श्रम करून शेतीलायक जमिनी तयार करण्यापेक्षां, त्या जमिनीवर गुरें पोसणेंच जास्त फायदेशीर होतें. कारण अशा जमिनीची परिस्थिति गवत, झाडेंझुडपें उगवण्यास अनुकूल असते; तेव्हां नैसर्गिक प्रवृत्तीच्या उलट जर तींत आपण लागवड करण्याचा प्रयत्न केला, तर त्यापासून श्रम करूनही फायदा होणार नाहीं हें निर्विवाद आहे.

ज्या ठिकाणीं बाजार भरतो, त्या ठिकाणाच्या असपास असणाऱ्या जमिनी किंमतवान असतात, यामुळें त्या गुराढोरांच्या पोषणाकरितां अडवून ठेवणें तोट्याचें आहे. बागांतून अगर मळ्यांतूनही पुष्कळ जनावरें पाळणें फायद्याचें नाहीं. मळ्यास लागणारें खत वगैरे अशा पाळलेल्या जनावरांपासून उत्पन्न होईल हें खरें; परंतु मळ्याकरितां लागणाऱ्या खताचा पुरवठा जवळपासच्या शहरांतून थोड्या खर्चांत होण्यासारखा असतो. असें असल्यामुळें मळ्यांत जरूरीपेक्षां जास्त जनावरें पाळण्यापासून तोटाच आहे. त्यांस लागणारी वैरण मळ्यांत उत्पन्न करण्यास अवकाश नसतो, व ती निव्वळ विकत घ्यावी लागणार, आणि अशायोगानें त्यांपासून होणाऱ्या नफ्यापेक्षां त्यांस पोसण्याचा खर्चच फार होणार. तेव्हां गुराढोरांची वाढ करणें हें काम मळे, भाजीपाल्याच्या बागा करणारांचें नाहीं. त्यांनीं धंद्याच्या कामीं अवश्य लागणारीं गुरें बाळगून थोडींशीं दुभतीं जनावरें बाळगावीं, ह्मणजे त्यांस चांगला फायदा होतो. बागांत उत्पन्न होणाऱ्या पिकांचा जो निरुपयोगी भाग राहतो, त्याची व्यवस्था नीट रीतीनें लागून तो फुकट जात नाहीं, आणि मळ्यांत रानवट गवत वगैरे उगवण्याची मुळींच भीति नसते.

---

१. शेतकऱ्यानें अगर बागवाल्यानें पाळावयाच्या जनावरांत नेहमीं कांहीं दुभतीं जनावरें पाळावीं ह्मणजे त्यांपासून नेहमीं थोड्याबहुत पैशाची प्राप्ती असते व त्यामुळें साधारण वर खर्च चालण्यास टाक पडते. खर्चाच्या ओढाताणीमुळें कधीं पिकें पाडून विकणें वगैरे नुकसानीच्या गोष्टी करणें भाग पडत नाहीं.

गुरांची वाढ करण्यास सर्वांत उत्तम स्थान ह्मटलें ह्मणजे, ज्या ठिकाणीं नानाजातींचीं मोठमोठालीं पिकें होतात, अशा सुपीक जमिनी होत. या ठिकाणीं गुरांस खाण्याची मुळींच कमताई नसते. नानाप्रकारचीं पिकें तयार होत असल्यामुळें, शेतकऱ्यांसही खताची वगैरे बरीच जरूर असते व तें त्यांस पाळलेल्या जनावरांपासून मिळतें, आणि पिकें पुष्कळ प्रमाणानें तयार होत असल्यामुळें, त्यांपासून पेंढा, कडबा वगैरे अनेक पदार्थांची उत्पत्ति होऊन त्यांवर गुरांचें पोषण चांगलें होतें. गुरेंढोरें पाळलेलीं असलीं ह्मणजे मिश्रशेती करणें भाग पडतें, व त्यामुळें जमिनीची चांगली सुधारणा होते. मनुष्यांस व जनावरांस नेहमीं काम असतें व वेळेचा व श्रमाचा सत्कारणीं व्यय होतो.

## ३. गुरेंढोरें बाळगण्याचें प्रमाण.

आगगाड्या, आगबोटी वगैरे अनेक दळणवळणाचीं साधनें सुलभ झाल्यामुळें, गुराढोरांची वाढ मोठमोठ्या शहरांपासून जरी फार दूर प्रदेशांत करीत असलें, तरी त्यांपासून उत्पन्न होणारें दूधदुभतें शहरांत नेण्यास अडचण पडत नाहीं. ज्या जमिनींत गहूं, मका वगैरे पीक चांगलें होतें, त्या जमिनींत प्रत्येक दोन एकर जमिनीवर एक चांगली दुभती गाय पोसण्यास हरकत नाहीं. ह्मणजे दोन एकर जमिनींत होणाऱ्या पिकाचा जो कडबा तयार होईल तो एक मोठ्या गाईचे पोषणास पुरेसा असतो. आतां गहूं, मका या धान्यासारखें सकस धान्य तयार होत नसून भात वगैरे धान्यें होत असलीं, तर त्या जमिनीवर पोसलेले गुरांस कांहीं खुराक द्यावा लागेल इतकेंच; परंतु खुराक न दिल्यास ह्मणजे प्राण्याचें पोषण होणार नाहीं असें नाहीं, तर खुराक देण्याचें कारण भातापासून उत्पन्न होणारा पेंढा कडब्याप्रमाणें सकस नसल्यामुळें त्यावर पोसलेल्या

---

१. वसई तालुक्यास आगगाडीमुळें मुंबई मार्किट फार जवळ झालें आहे. या दोन ठिकाणांत अंतर सुमारें २४ कोस, तरी दुधापासून सर्व पदार्थ दररोज इतक्या अंतरावरून मुंबईस जात असतात. विरारहून ( वसईचे पुढील स्टेशन ) सकाळीं ६ वाजतां निघणारी गाडी जर पाहिली तर तींत बहुतेक दूधवाले नजरेस पडतील.

प्राण्यांपासून उत्पन्न होणाऱ्या दूध वगैरे पदार्थांत कस कमी नसावा हेंच होय. ज्या जमिनी खडकाळ असल्यामुळें त्यांत गवताशिवाय दुसरें कांहींच उत्पन्न होणें शक्य नसतें, अशा जमिनीचे गवतावर पोसलेले गुरांस खुराक देणें अवश्य असतें, कारण त्यांस निव्वळ गवतापासून पोषणास जरूरीपुरतीं पौष्टिक द्रव्यें मिळत नाहींत.

जनावरें किती बाळगावीं या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. जनावरें पाळणारास त्यांचे पोषणाकरितां अन्न विकत घेण्याची ऐपत असून, तसें केल्यास त्यापासून फायदा पडेल किंवा नाहीं ही पहिली गोष्ट, व घरांत उत्पन्न होणाऱ्या अन्नावरच जनावरें पोसावयाचीं किंवा कसें ही दुसरी गोष्ट. या दोन तत्वांवर जनावरें पाळण्याचें प्रमाण सर्वस्वी अवलंबून असतें. निव्वळ गुरेंढोरें बाळगून त्यांचेपासून उत्पन्न होणारे पदार्थ विकणें हा ज्याचा धंदा असेल, त्यानें ऐपतीप्रमाणें गुरें पाळून त्यापासून फायदा कमवावा; परंतु शेतकऱ्यानें गुरांच्या पोषणाकरितां अन्न विकत घ्यावें लागेल इतकीं जास्त गुरें बाळगण्याच्या भानगडींत पडूंच नये. त्याच्या शेतांत उत्पन्न होणाऱ्या पिकावर जितक्या प्राण्यांचा उदरनिर्वाह होण्यासारखा असेल, तितकेच प्राणी त्यानें बाळगावे.

आतां जनावरांकरितां सात्विक खुराकी अन्न विकत घेण्यापासून काय फायदा आहे, त्याचा विचार करूं. हे खुराकाचे पदार्थ ह्मटले ह्मणजे कोंडा, पेंड, सरकी वगैरे होत. हे पदार्थ जरूरीपुरते मळ्यांत तयार करणें हें काम खर्चाचें आहे. तेव्हां ते उत्पन्न करण्याचे भानगडींत न पडतां, जरूरीपुरते विकत घेण्यापासूनच फायदा आहे. जनावरांस खुराक घातल्यापासून त्यांचेपासून उत्पन्न होणारे पदार्थांत फायदा पडतो इतकेंच नाहीं, तर त्यांपासून मळमूत्राच्या रूपानें जें खत प्राप्त होतें, तेंही सकस असतें. एक हजार पौंड गव्हांच्या कोंड्यांत २६ पौंड नैट्रोजन, २८ पौंड फास्फरिक ॲसीड, १६ पौंड पोट्याश इतकीं वनस्पतींचीं अन्नद्रव्यें असतात. आतां हा कोंडा जर दुभत्या गाईस

घातला, तर त्यांत असलेलीं सर्व अन्नद्रव्यें मलमूत्ररूपानें जमिनीस मिळतील असें जरी नाहीं, तरी शेंकडा ९० या प्रमाणानें तीं मलमूत्रांत येण्यास हरकत नाहीं; आणि जीं गुरें निव्वळ बैठीं असतात व दूध देणारीं नसतात, त्यांचे मलमूत्रांत तर या वनस्पतींच्या अन्नद्रव्याचें प्रमाण कोंड्यांत असेल तेंच सांपडेल, त्यांत कांहीं फरक पडणार नाहीं.

आतां गुरांस खुराक घातल्यापासून जो नफा होतो, तो येणाऱ्या खर्चापेक्षां जास्त असतो. जनावरें चांगली वाढतात. त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या पदार्थांची किंमत खुराक न घालतांना उत्पन्न होणाऱ्या पदार्थांपेक्षां जास्त येते. जमिनीस किंमतवान खताची प्राप्ती होते. असे खुराक घालण्यापासून अनेक फायदे आहेत.

गुरांस पेंढा, कडबा वगैरे खावयास घालून शिवाय थोडें थोडें धान्यही त्यांस देत असलें ह्मणजे, जमिनीपासून धान्याच्या रूपानें जीं वनस्पतींचीं पोषक द्रव्यें शेतकरी काढून घेतो, त्याचा $\frac{3}{4}$ भाग गुरांचे शेणाचे रूपानें तीस परत केला जातो. यावरून शेतकीच्या धंद्यांत जमिनीची सुपीकता राखण्यास प्राण्यांची किती मदत होते हें सहज लक्षांत येतें.[1]

## ४. गुराढोरांची निगा.

**१. गुरें बांधण्याची जागा :—**जनावरें बाळगणारानें त्यांस जेणें-करून सुख होईल अशा प्रकारची व्यवस्था ठेवण्यास झटलें पाहिजे.

---

१. एका एकरांत ५० बुशेल जर मक्याचें पीक झालें, तर तें पीक आणि कडबा मिळून ६४ पौंड नैट्रोजन, २४ पौंड फास्फरिक असीड व ३६ पौंड पोट्याश हीं वनस्पतींचीं अन्नद्रव्यें जमिनींतून नाहींशीं होतात. परंतु तो कडबा गुरांस खावयास घातल्यास सुमार निम्मे ह्मणजे ३२ पौंड नैट्रोजन, १२ पौंड फास्फरिक असीड आणि १८ पौंड पोट्याश हीं शेणाचे रूपानें जमिनीस परत करितां येतात. शेतकरी गुरें पाळीत नसला व भाड्याचीं गुरें आणून शेती करीत असला ह्मणजे त्यास चोहीं बाजूनें तोटा बसतो. कडबा वगैरे विकल्यापासून होणारें उत्पन्न गुरांस खाऊं घालून होणाऱ्या उत्पन्नापेक्षां फार कमी असतें.

मनुष्यें काय व जनावरें काय जेव्हां त्यांस सुखदायक परिस्थिति असते, तेव्हां तीं चांगलीं वाढतात व आपआपलीं कामें नीट करितात. जनावरें बांधावयाची जागा चांगली असावी व एकंदरींत त्यांस सुख व समाधान होईल अशी व्यवस्था ठेवण्यास झटावें.

जनावरांस हवेची अवश्यकता फार असते. एका बैलास अगर गाईस श्वासोच्छ्वास करण्याकरितां चोवीस तासांत सुमारें ३१२९ घनफूट हवा लागते, ह्मणजे १८ फूट लांबी १७ $\frac{१}{२}$ फूट रुंद व १० फूट उंच अशा बांधणीचा गोठा असल्यास, त्यांत जितकी हवा मावेल तितकी हवा एका जनावरास लागते. परंतु व्यवहारांत पाहूं गेलों तर इतकी हवा जनावरास मिळत नाहीं, तर सुमारें ४०० घनफूट हवा एका जनावरास मिळत असते. गाईबैलांच्या गोठ्यांत जितकी जागा असते त्याच्या दुप्पट जागा घोड्यांस लागते.

जनावरें बांधण्याकरितां तयार करावयाच्या गोठ्यांत वारा इकडून तिकडे मोकळा वाहूं न देणें चांगलें; कारण वारा मोकळा वाहत असला कीं, गोठ्यांत ऊब राहत नाहीं व गुरें थंडीनें काकडून जाण्याचा बराच संभव असतो. असें जरी आहे, तरी गोठ्यांत हवेचा प्रवेश मुबलक होईल अशी तजवीज केली पाहिजे. ही गोष्ट साधण्याकरितां गोठ्यास मोठ्या खिडक्या न ठेवतां लहान लहान गवाक्षें करून हवा चांगली खेळेल अशी तजवीज करावी. कांहीं गवाक्षें गोठ्याचे भिंतींचे खालचे बाजूस व कांहीं वरचे बाजूस करावीं, ह्मणजे स्वच्छ हवा आंत येण्याचें व श्वासोच्छ्वासाचेयोगानें दूषित झालेली हवा बाहेर जाण्याचें कार्य उत्तम प्रकारें चालतें. गोठ्यांतील हवा उबदार असणें इष्ट असतें, ह्मणून त्याच्या भिंती निदान फळ्यांच्या असाव्या व कूड असल्यास ते चांगले लिंपलेले असावे.

---

१. गुरें बांधण्याकरितां गोठा करणें तो कसा करावा याची माहिती मागें 'जमीन' या विषयावरील ५ व्या निबंधांत दिली आहे.

गोठ्यांत हवेप्रमाणें उजेडाचीही चांगली तजवीज केलेली असावी. जनावरांच्या तोंडाकडून, ह्मणजे पुढच्या बाजूनें गोठ्यांत उजेड आंत घेण्यापेक्षां त्यांच्या मागल्या बाजूनें तो घेणें चांगलें. गुरांच्या मागल्या अंगास जी भिंत असेल तींत बरींच गवाक्षें केल्यास उजेड व हवा या दोन्हीं गोष्टींची प्राप्ति सुलभ होणार आहे. याशिवाय वेळोवेळीं पडणारें गुरांचें शेण काढून गोठा स्वच्छ ठेवतां येईल अशी तजवीज केली पाहिजे. गुरांचें शेण काढल्यावर तें उघड्या हवेंत गोठ्याचे आजू-बाजूस फेंकून देणें चांगलें नाहीं; कारण तें उघड्या हवेंत टाकल्यास त्यास घाण येऊं लागते व आंतील उपयुक्त द्रव्यांचा नाश होतो.

**२. पाणी :**-- प्राणी जें अन्न सेवन करितात तें शरीरांतील सर्व भागांस पोंचविण्याचें व आंतील मळ बाहेर लावून देण्याचें कार्य पाणी करीत असतें. अशी स्थिति असल्यामुळें जनावराचे सर्व अवयवांत पुरेसें पाणी असणें अत्यावश्यक आहे. गुरांस दिवसांतून निदान दोन वेळां पाणी पाजीत जावें, हा ठोकळ नियम आहे. यांत परिस्थिती-प्रमाणें बदल करणें इष्ट आहे.

ज्या जनावरांस पौष्टिक अन्न बऱ्याच प्रमाणानें मिळतें त्यांस, ज्या जनांवरांस पौष्टिक अन्न कमी मिळतें त्यांपेक्षां पाणी अधिक लागतें. दूध देणाऱ्या गाईस दररोज सुमार २९ पासून ४० पक्के शेर पाणी प्यावयास लागतें. जनावरें जें पाणी पितात, तें पोटांत गेल्यावर ९९ पासून १०२ अंशपर्यंत कढत होत असतें. जनावराचे जठरांत अन्ना-पासून जी उष्णता तयार होते त्यांतील कांहीं उष्णतेचा उपयोग जठरांत आलेलें पाणी कढत होण्याकडे होत असतो. तेव्हां निव्वळ थंड पाणी न पाजतां जर पाणी ऊन करून पाजलें तर, पोटांतील अन्नाचा तें तापवण्याकडे उपयोग न झाल्यामुळें शरीरांतील दुसरीं कामें करण्या-कडे त्याचा उपयोग होऊन तें कारणीं लागतें. वर्षांतील इतर दिवसांत जरी नाहीं, तरी थंडीच्या दिवसांत जनावरांस पाणी ऊन करून पाजावें. असें ऊन केलेलें पाणी तीं हौसेनें पितात इतकेंच नाहीं, तर थंड पाणी

पीत असल्यास त्यांस जितकें अन्न लागतें तितकें अन्न ऊन पाणी पीत असतां लागत नाहीं. सारांश गुरांस ऊन पाणी पाजल्यास त्यांस सुख वाटून, वैरणीमध्येंही फायदा पडतो; ह्मणजे अन्नाचा व्यय पाणी ऊन करण्याकडे न होतां, चरबी, मांस, दूध वगैरे अनेक पदार्थांची उत्पत्ती करण्याकडे होऊन, तें सत्कारणीं लागतें.

**३. अन्नः**—— जनावरांचे खाण्यांत येणारे अनेक पदार्थ आहेत. ज्या उद्देशानें जनावरें पाळलीं असतील, तो उद्देश सिद्धीस जाण्यास ज्या जातीचें अन्न घालणें जरूर असेल, त्या जातीचें अन्न त्यांस खाऊं घालावें. जीं जनावरें मेहनतीचीं कामें करण्याकारितां बाळगलीं असतील त्यांस उष्णतेची उत्पत्ति करणारीं कार्बनयुक्त अन्नें खाऊं घालावीं. जे प्राणी लहान असतील त्यांस नैट्रोजनयुक्त पौष्टिक अन्न देणें चांगलें. दूध देणाऱ्या जनावरांस दोन्ही प्रकारचीं अन्नें योग्य प्रमाणानें पाहिजेत, नैट्रोजनयुक्त अन्न जास्त झाल्यास जनावरें दूध कमी देऊं लागतात, परंतु त्यांत कस मजबूत असतो; तेंच कार्बनयुक्त अन्न जास्त झाल्यास तीं दूध पुष्कळ देतात परंतु त्यास कस नसतो. थंडीच्या दिवसांत जनावरांस उष्णतेची उत्पत्ति करणारें कार्बनयुक्त अन्न देणें चांगलें, जीं जनावरें गवत, चारा खाणारीं आहेत त्यांचे अन्नाचें प्रमाण ३ भाग गवत आणि १ भाग धान्य ह्मणजे करड, चूण वगैरे असें असावें.

अन्नाचें प्रमाण ह्मणजे तें किती घालावें व तें घालण्याची वेळ, या गोष्टी जनावरांचे स्वभावावर, संवयीवर व जातीवर अवलंबून असतात. ज्या जनावरांचीं पोटें लहान, त्यांस मोठाल्या पोटांच्या जनावरांपेक्षां पुष्कळ वेळां अन्न दिलें पाहिजे. बैल, गाई, म्हैशी वगैरे जनावरांची अन्न सेवन करण्याची वेळ बहुतकरून दिवसास असते; परंतु घोडे हे आपलें अन्न रात्रीं खात असतात.

जनावरांपुढें एकसारखा पेंढा किंवा गवत टाकून ठेवणें चांगलें नाहीं. असें केल्यास तीं नासधूस करितात व अन्न मनापासून खात नाहींत. त्यांस वैरण घालण्याच्या वेळा नेमलेल्या असाव्या व प्रत्येक वेळेस

अतिशय अन्न त्यांस देऊं नये. अति अन्न एखादे वेळीं दिल्यास दुसऱ्या वेळीं जनावरें चांगलें अन्न खात नाहींत. जनावरांची वाढ करण्याच्या धंद्यांत यश येण्यास, अन्न देण्याचे कामांत नियमितपणा व तें तीं आनंदानें खातील अशा स्थितींत त्यांस अन्न देणें या दोन गोष्टींचें फार महत्व आहे. गुरांस जे पदार्थ खावयास घालावयाचे ते तीं हौसेनें खातील अशा प्रकारचे करून घातले पाहिजेत, तर त्यापासून इष्ट हेतु साधतो. अन्न कितीही उत्तम असलें तरी तें गुरांस खावयास कंटाळा येईल अशा स्थितींत असलें तर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

सारांश, जनावरें वाढविण्याचे कामांत उत्तम प्रकारें यश येण्यास, विचारपूर्वक केलेली व्यवस्था, कळकळ, जनावरांची आवड व अनेक बाबतींत वेळेवर लक्ष देणें या गोष्टींची फार अवश्यकता आहे. उत्कृष्ट प्रकारचें अन्न, सुखकारक राहण्याची जागा वगैरे सर्व गोष्टींची अनुकूलता असून, मायेचा जर अभाव असेल, तर कार्यसिद्धींत बराच हिसका बसतो. नुसत्या मायेच्या शब्दानें जें काम होतें, तें मोठाल्या खुराकांनीं होत नसतें. हीच गोष्ट जनावरांसही लागू आहे.

JAN 27 1934

# ग्रंथमाला

Poona City General Library.
Class—— No——

मासिक पुस्तकांत छापिलेलें प्रकरण.

---

## महाराष्ट्र भाषेचें स्वरूप.

हा निबंध

लक्ष्मण ~~विष्णु~~ रामचंद्र पांगारकर, बी. ए.

यांणीं केला, तो

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए., यांणीं

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छा० छा० प्रसिद्ध केला.

---

किंमत ८३.

# वाचकांस प्रार्थना.

---

**मराठी भाषेचें स्वरूप** या विषयाची व्याप्ति केवढी आहे हें प्रस्तुत लेखकांस माहीत आहे. ज्या विषयाचा व्यासंग दोन तपें केला पाहिजे, त्यावर ग्रंथसंग्रहाचा अभाव, संसारिक आपत्तींची परंपरा, पदवीच्या परीक्षेची निकड, इत्यादि अडचणींत असतांना अवघ्या थोड्या अवकाशांत प्रस्तुत निबंध लिहून प्रसिद्ध करणें अंमळ धाडसाचेंच आहे! तरी पण जगांतलीं नानाप्रकारचीं संकटें व दुःखें शमविण्याचें ज्या मराठी भाषेचें सामर्थ्य अनुभवसिद्ध आहे, तिचें स्वरूप, तिच्या पुत्रांची योग्यता, त्यांचे वाक्प्रभाव याची सामान्य वाचकांस थोडी बहुत कल्पना व्हावी, व निष्कारण अवमानिलेल्या मराठी भाषेच्या अभ्यासाकडे आपल्या तरुण मित्रांची प्रवृत्ति व्हावी, हा, हा लेख लिहिण्यांत लेखकाचा हेतु आहे. लेख अपुरा व दोषग्रस्त असलाच पाहिजे. तरी हेतूकडे लक्ष देऊन, वाचक ह्या प्रथम लेखाकडे प्रेमदृष्टीनें पाहतील अशी आशा आहे.

---

# मराठी भाषेचें स्वरूप.

## भाग १ ला.

उत्कृष्ट वक्ते कवी व ग्रंथकार आणि प्रतापी योद्धे निपजणें हें राष्ट्राच्या जीवंतपणाचें चिन्ह आहे. वाचा आणि बाहु, किंवा भाषा आणि तलवार यांची गट्टी फार जुनी आहे. वाग्वीर्य व बाहुवीर्य यांत जरी थोडा विरोध दिसतो, तरी अग्निधूमासारखा त्यांचा अन्वयव्यतिरेक-संबंध आहे. एक आहे तेथें दुसरें आहे. एक नाहीं तेथें दुसरें नाहीं. श्रीराम व वसिष्ठ हे सदा एका काळीं अवतरतात. विक्रमादित्य आपली दानशौर्यादि गुणांची कीर्ति दिगंत फांकतात; तोंच कालिदास, वररुचि, वराहमिहिर आपला कीर्तिस्तंभ शेषाच्या मस्तकावर उभारतात. इकडे दोनशें वर्षे मराठ्यांची गादी देवगडास चालविणारे जयंतपाळ, सिंघण, रामदेवराव हे जाधववीर अर्वाचीन महाराष्ट्रीयत्वाचें बीज पेरतात; तिकडे मुकुंदराज, ज्ञानदेव, नामदेव हे पंढरपुरास महाराष्ट्रधर्माची पताका फडकावतात. इकडे शिवाजी, तानाजी, बाजी आपलें क्षात्रतेज चमकावतात; तिकडे एकनाथ, रामदास, तुकाराम आपलें दुस्सह ब्रह्मतेज चोहोंकडे पसरतात. याप्रमाणें वाग्वीर्य व बाहुवीर्य एकदम उदय पावलेलें इतिहासांत दिसतात. ज्ञानेश्वरानंतर दोनशें वर्षे दक्षिणेंत जसा वाक्पतींचा लोप झाला, तसाच योद्ध्यांचाही झाला. पेशवाईच्या उत्तरार्धांत स्वार्थ, महत्वाकांक्षा इत्यादि क्षुद्र विकारांनीं जसें क्षात्रतेज मंदावलें, तसें रामजोशी, होनाजबाळ यांच्या डफ तुणतुण्यावर बसून लावण्यातमाश्यांत गर्क झालेलें ब्रह्मतेज ही मळलें. याप्रमाणें वाणी व बाहु यांचा अन्वय-

व्यतिरेकसंबंध त्रिकालाबाधित आहे. भाषेची अभिवृद्धि झाली कीं, राष्ट्रांचा उदय होतोच, त्याचप्रमाणें भाषेची अनास्था झाली कीं, देशास पडता काळ आलाच ह्मणून समजावें. भाषेची वृद्धि होऊन कवी, तत्ववेत्ते, इतिहासकार, साधु वगैरे ग्रंथकार निपजल्यावांचून राष्ट्राची उन्नति होण्याची इच्छा करणें हें ईश्वरभक्तीवांचून मोक्षपदाची इच्छा करण्यासारखें व्यर्थ आहे. ईश्वरी तेजाचें वारें राष्ट्राच्या अंगांत खेळूं लागलें कीं, तें आपला गुण वाणीवर चालवितें व या स्फूर्तीमुळें कवींच्या व साधूंच्या तोंडून उत्कृष्ट विचार बाहेर पडतात व त्यांच्या जोरावर मोठ्या विभूती तयार होऊन राष्ट्राचा अभ्युदय होतो; ह्मणून भाषेची अभिवृद्धि करण्याकडे प्रत्येक देशहितेच्छूनें लक्ष पुरविलें पाहिजे.

कै० गुरुवर्य **विष्णुशास्त्री चिपळोणकर** यांनीं, मराठी भाषा व मराठ्यांचा इतिहास यांचा आपल्या लोकांनीं शोधपूर्वक आस्थेनें अभ्यास करावा ह्मणून फार अट्टहास केला. त्यांपैकीं इतिहासाकडे लोकांचें लक्ष लागत चालल्याचें बखरी, जुने कागदपत्र, थोर पुरुषांचीं चरित्रें व त्यांचा आधार घेऊन रचलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्या यांवरून स्पष्ट दिसतें. पण मराठी भाषेच्या अभ्यासाकडे अद्यापि कोणी लक्ष देत नाहीं. राजाश्रयावांचून सर्वच प्रयत्न निष्फळ होतात. त्याचप्रमाणें भाषाभिवृद्धीचीही गोष्ट आहे हें खरें, पण समंजस व जाणत्या विद्वानांनीं तनमनधन लावून एकनिष्ठेनें व निरपेक्षतेनें मायभाषेची सेवा केल्यास यशःप्राप्ति होणार नाहीं असें नाहीं. उलट राजेराजवाड्यांच्या आश्रयावांचून केवळ कवींच्या वाक्प्रभावावर तर मराठी भाषा वाढली आहे. एखाद्या राजाची किंवा बड्या माणसांची हांजी हांजी करून आपले सेवक जे कवी त्यांचा चरितार्थ चालविण्याची मराठी भाषेस संवय नाहीं. पूर्वकाळच्या रामकृष्ण, युधिष्ठिर हरिश्चंद्र यांसारख्या पुण्यश्लोक राजांची किंवा साधुपुरुषांची मात्र मराठीनें स्तुति केली आहे. पंतांच्या दोन लाख आर्यांत १०।२० मनुष्यस्तुतिपर आर्या असतील नसतील. एखाद्या योगिनीप्रमाणें विटोबाच्या पायीं बसून, पंढरपूर, आळंदी, देहु, पैठण, सज्जनगड अशा क्षेत्रीं राहून तिनें आज ८०० वर्षें ब्रह्मानंदांत

काळ घालविला आहे! तर तिचें हें पवित्र ब्रीद लक्षांत आणून, मातेचें व्रत सिद्धीस नेण्यास्तव पांडवांनीं स्वर्गांतून ऐरावत मृत्युलोकांत आणण्याची जशी खटपट केली; तशी हालअपेष्टा, दारिद्र्य, छळ वगैरे संकटपरंपरा सोसूनही, आपण नको कां तिचा ब्रह्मज्ञानप्रसाराचा मनोरथ पूर्ण करायला? जुन्या संस्कृत भाषेचा अभिमान बाळगणारे जे शास्त्री-पंडित, त्यांचा छळ सोसूनही केवळ प्राकृतजनांच्या उद्धारार्थ मराठी साधूंनीं ग्रंथरचना केली. भागवताचा अर्थ मराठींत आणला ह्मणून एकनाथावर बहिष्कार घातला होता.

वेदाचा तो अर्थ आह्मांसीच ठावा।
येरांनीं वहावा भार माथां ॥१॥

असा यथार्थ उद्गार काढणाऱ्या तुकोबाचे अभंग, हा शूद्र असून वेदाचें मर्म प्राकृतांत आणतो ह्मणून बुडविण्याचा यत्न झाला होता. विद्वान् लोक प्राकृत भाषेचा व प्राकृत ग्रंथांचा धिक्कार करितात ह्मणून, मुक्तेश्वर, श्रीधर, रामदास, मोरोपंत यांच्या ग्रंथांतून उद्गार सांपडतात. मराठी कवींनीं बड्यालोकांना रंजविण्याकरितां किंवा द्रव्य मिळविण्याकरितां जसे ग्रंथ केले नाहींत तसें कीर्तीच्या अभिलाषानेंही त्यांनीं ते केले नसून, केवळ प्राकृत जनांस ईश्वरभक्ति व ज्ञानप्राप्ति करून देण्याच्या परोपकार बुद्धीनेंच त्यांनीं ग्रंथ करून परमेश्वरचरणीं ते अर्पण केले आहेत! हा मराठी भाषेच्या अवताराचा मुख्य हेतु आहे.

'मराठी भाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी नाहीं,' असें कांहीं न वाचतां बेधडक मत ठोकून देणारे कांहीं हरीचे लाल आमच्यांत आहेत. पण अनेक बाबींत ती इंग्रजीच्या तोडीची असून कांहीं बाबींत तर ती इंग्रजीवरही ताण करील अशी आमची खात्री आहे. रघुनाथ पंडितांचे नलोपाख्यान, मुक्तेश्वराचें आदिपर्व, तुकोबाचे अभंग, मोरोपंतांचीं स्फुटकाव्यें, रामजोशाची लावणी व समर्थांचा दासबोध इतके ग्रंथ जरी एखाद्यानें काळजीपूर्वक वाचले, तरी जिची पूर्वी शास्त्री पंडितांनीं व

अलीकडे इंग्रजी विद्वानांनीं सारखी हेळणा मांडली आहे, तिच्या पोटांत केवढीं रत्नें आहेत हें त्यास कळून येईल. मराठी भाषा कांहीं सामान्य नव्हे. अर्धें तप एका मोरोपंतांचा विशेष आस्थेनें अभ्यास करणारे मालाकार आपल्या चटकदार भाषेनें जर एवढी खळबळ करूं शकले, तर एखाद्यानें सारा जन्म तिच्या व्यासंगांत घातल्यास तो तिला मोरोपंताप्रमाणें तळहातावर नाचवील व साऱ्या राष्ट्राची उलथापालथ करील यांत संशय कशाला पाहिजे ?

ना० न्यायमूर्ति रानडे यांनीं मराठीचा विद्यापीठीं शिरकाव करण्याचा अत्यंत स्तुत्य व कळकळीचा प्रयत्न चालविला आहे. परवां त्यांनीं, चालू शतकांत मराठींत जे ग्रंथ झाले त्यांचें परीक्षण करून या शतकांत तिची वाढ किती झपाट्यानें झाली हें चांगल्या तऱ्हेनें लोकांचे नजरेस आणलें आहे. यामुळें साहजिकच लोकांचें लक्ष या विषयाकडे वेधलें आहे. अशावेळीं मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून तों आजपर्यंत झालेल्या सन्मान्य ग्रंथकारांची माहिती देऊन, ती कोणकोणत्या स्थित्यंतरांतून आजपर्यंत आली आहे याचें विवेचन केल्यास ते प्रासंगिक होईल असें जाणून हा प्रयत्न केला आहे. चालू शतकांतल्या ग्रंथाबद्दल न्यायमूर्तीनीं जे आपले विचार प्रगट केले आहेत त्याविषयीं आह्मांस विशेष कांहीं लिहावयाचें नाहीं. त्यांच्या पद्धतीला अनुसरूनच मागील पांच सातशें वर्षांची टोकळ माहिती वाचकांस देण्याचें आह्मीं योजिलें आहे. न्यायमूर्तींच्या विद्यापीठीं मराठीचा प्रवेश करण्याच्या प्रयत्नास यश आल्यास किती बहार होईल! मग बेकन, शेक्सपिअर, मिल्टन, वर्डस्वर्थ, पोप, बायरन् व ॲडिसन् शेजारीं ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, वामनपंडित, रामदास, मोरोपंत, रामजोशी, व मालाकार जाऊन बसतील व मग मराठी भाषेची, मराठी कवींची, व मराठी ग्रंथांची किंमत कळेल.

मराठी गद्य ग्रंथांचा उदय याच शतकांत झाला असल्यामुळें, जॉन्सन, गिबन, स्कॉटही मग आपोआप निर्माण होतील. पण असें होणें परस्वाधीन असल्यामुळें, न्यायमूर्तींच्या यत्नास यश आलें नाहीं, तरी

जिज्ञासु, स्वाभिमानी लोकांनीं घरीं मराठीचा अभ्यास करावा. मराठी भाषा महासती अरुंधतीप्रमाणें ब्रह्मपरायण असल्यामुळें, अनायासें आपल्या धर्मतत्वांचें ज्ञान होऊन उत्तम नीतिशिक्षणही मिळेल व शांतिसौख्याचा लाभ होईल. अशा तऱ्हेनें आत्मोन्नतीस्तव मराठीचें अध्ययन करूं इच्छिणारांस तिचें साधारण स्वरूप कळावें हा प्रस्तुत निबंध लिहिण्यांत लेखकाचा हेतु आहे.

मराठी भाषेचा उदय केव्हां कसा व कोणत्या भाषांपासून झाला; तिची वाढ कशी झाली; तिच्या स्वरूपांत कालांतरानें कसा फरक पडत चालला; कोणकोणत्या ग्रंथकारानीं तिची सेवा कशी केली; ती कोणकोणत्या स्थित्यंतरांतून आली आहे, तिची पुढें जोपासना कशा तऱ्हेनें होईल वगैरे गहन मुद्यांचें सूक्ष्म विवेचन करण्यास ह्मणजे मराठी भाषेचा इतिहास तयार करण्यास दोन तपें अनन्यभावानें तिची उपासना केली पाहिजे. फुरसत व योग्यता यांची प्रस्तुत लेखकांत वाण असल्यामुळें, तितक्या खोल पाण्यांत आज न जातां, गेल्या हजार वर्षांत भाषेचीं जीं स्थित्यंतरें झालीं, व जे मुख्य मुख्य ग्रंथकार झाले त्यांचा विहंगमदृष्टीनें विचार करावयाचा आहे.

हजार वर्षांकडे दृष्टी फेंकली ह्मणजे आपणांस मराठी भाषेचे पांच काळ किंवा स्थित्यंतरें करतां येतील.

१ भाषेच्या उत्पत्तीपासून तों ज्ञानेश्वरांचा अवतार संपेतोंपर्यंतचा पहिला काळ. त्यावेळीं झालेल्या कवींत ज्ञानेश्वर अग्रणी असल्यामुळें, पुढील काळावर त्यांचे ग्रंथांचा व चरित्राचा फार संस्कार घडल्यामुळें व प्राकृत भाषापासून मराठी कशी उत्पन्न झाली हें शोधून काढण्यास त्यांचा मुख्य ग्रंथ ज्ञानेश्वरी फार उपयोगाचा असल्यामुळें, या काळास ज्ञानेश्वरांचा काळ ह्मणूं.

२ दुसऱ्या काळास एकनाथांचा काळ असें नांव देऊं. यवनांचें राज्य महाराष्ट्रांत दोन अडीचशें वर्षें होतें. या पारतंत्र्यास झुगारून देण्याचा शिवाजी महाराजांचे पूर्वीं मराठी योद्धे, मुत्सद्दी व साधु यांनीं सुमारें शंभर वर्षें प्रयत्न चालविला होता. त्या काळच्या पुरुषांत, यो-

ग्यतेनें एकनाथ सर्वांत श्रेष्ठ होते, व यवनांच्या संसर्गामुळें जे फारशी, अरबी भाषांतले शब्द मराठींत घुसले, ते त्यांच्या ग्रंथांत मुख्यतः सांपडत असल्यामुळें, आपण या काळास त्यांचेंच नांव दिलें आहे.

३ तिसरा काळ फार महत्वाचा आहे. दुसऱ्यांतून तिसरा काळ निघाला आहे. शिवाजी महाराजांच्या अवतारांत जी अदृष्टपूर्व राजकीय व धार्मिक खळबळ उडाली, त्यांत चमकणाऱ्या सर्व ताऱ्यांत आकारानें, तेजानें व प्रकाशानें जो तारा अत्यंत श्रेष्ठ होता, त्याचें ह्मणजे **श्रीसमर्थ रामदास स्वामींचें** अभिधान या काळास देऊं. हा **समर्थांचा काळ** होय.

४ चवथा पेशवाईचा काळ. या काळांत लावण्या, पोवाडे व बखरी प्रसिद्ध झाल्या. लहान मोठे शाईर बरेच झाले, पण तत्कालीन कवींत **मोरोपंतच** निर्विवाद श्रेष्ठ होते, व त्यांचा एकट्यांचा मराठी भाषेवर फारच जंगी संस्कार झाला, ह्मणून या काळास **मोरोपंतांचा काळ** अशी संज्ञा देऊं. यास **पेशवाईतले कवी** असें ह्मटल्यासही साजेल.

५ पांचवा काळ ह्मणचे गेलीं साठ वर्षें. इंग्रजांच्या व इंग्रजी भाषेच्या संगतीमुळें मराठींत जें थोडेंसें गद्य होतें त्यास कांहीं विशेष स्वरूप प्राप्त झालें व नाटकें कादंबऱ्या, विविध विषयावरचे निबंध, शास्त्रीय ग्रंथ इत्यादि रचना या काळांत विशेष सुरू झाल्यामुळें, या काळास **गद्यग्रंथांचा उदय** असें नांव देऊं. आतां या पांचही काळांचें अंमळ विस्तारानें वर्णन करूं.

## ज्ञानेश्वरांचा काळ ( शके ११६४—१२२० ).

संस्कृत नाटकादि ग्रंथांत जी प्राकृतभाषा [ बालभाषा ] आढळते, तिच्यापासून ज्या देशीभाषा झाल्या, त्यापैकीं मराठी ही एक होय असें कांहींचें मत आहे. मराठी संस्कृतापासून निघाली नसून, दक्षिणेंत दोन हजार वर्षांवर ‘ महाराष्ट्री ’ ह्मणून एक स्वतंत्र भाषा होती तिच्यापासून मराठी निघाली, व फारशी, इंग्रजी, अरबी, हिंदी या भाषाप्रमाणेंच तिनें संस्कृताची मदत घेतली, असें कित्येकांचें मत आहे. कोणी तिला संस्कृताची कन्या बनवितात, कोणी तर नुस्ती सखी बनवितात.

भाषेचें मूळ शोधून काढणें हें ऋषीचें किंवा नदीचें मूळ शोधून काढण्यासारखें दुर्घट आहे. वरील मुद्याचा निकाल प्राकृत [ बाल ] भाषा, दुसऱ्या देशी भाषा, कानडी भाषा व ' ज्ञानेश्वरी ग्रंथ ' या सर्वांच्या चांगल्या अध्ययनानंतर कदाचित् लागेल. कसेंही असो ; मराठीचा उदय सातव्या आठव्या शतकांतला दिसतो. शालिवाहनशकानंतर महाराष्ट्रांत जीं **राष्ट्रकूट**, **चालुक्य** वगैरे राजघराणीं निरनिराळ्या राजधान्यांत बसून राज्य करीत, त्यांचे शिलालेख वगैरे सारे कानडींत आहेत असें **फ्लीट** ह्मणतो; ह्या राजघराण्यांस डा० **भांडारकर** महाराष्ट्र ह्मणतात; सातव्या शतकांत हिंदुस्थानभर प्रवास करणारा ' हुएन संग' हा चिनी प्रवासी महाराष्ट्राचा विस्तार, तेथील लोकांचे पराक्रम व्यापार इत्यादिकांचें वर्णन करितो; पण कानडी व मराठी हा भेद सांगत नाहीं; शके १११४ मध्यें **बल्लाळ जाधव** देवगडास गादी स्थापितो. त्याचा मुलगा **जयंतपाळ** ह्यास ब्रह्मज्ञानाचा उपदेश करणारे साधु मुकुंदराज शके ११३३ मध्यें होते, यावरून सातवें शतक व अकरावें शतक यांच्या दरम्यान ' महाराष्ट्रमंडळ ' ह्मणून नांवाजलेल्या दाक्षिणात्यांचे ' कानडी मंडळ ' व ' मराठी मंडळ ' असे दोन भेद झाले असावे, असें रा० भागवतप्रमाणें आह्मांस वाटतें. मुकुंदराजांची भाषा फारशी कठिण नाहीं त्यांची व **ज्ञानोबा** वगैरेंची बाराव्या शतकांतली भाषा ही चांगली ४।५ शें वर्षांची तरी सुधारलेली दिसते. एकंदरींत मराठीचा उदय सातव्या शतकांत झाला असावा. मराठींतले पहिले कवि मुकुंदराज त्यांचा ' परमामृत ' ह्मणून एक व जैनपालासाठीं तयार केलेला ' विवेकसिंधु ' ह्मणून एक असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. दोन्हीही ग्रंथ लहान असून परमार्थपर आहेत. हे अनुभवी माणसाशिवाय कोणास कळावयाचे नाहींत, अशी यांची ख्याति आहे. यांची भाषा ज्ञानेश्वरीपेक्षां फार सोपी आहे. ब्रह्म, माया, जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य, चार देह, चार अवस्था, चार प्रकारच्या मुक्ती वगैरेंचें प्रतिपादन यांत केलें आहे. यांचीं कांहीं पदेंही आहेत. ह्या पहिल्या मराठी कवीचा थोडा मासला पहा :—

### पद.

उवगल्ये सासऱ्या आतां मज माहेराशीं न्याहो ।
तोडा एवढा जाच पडते तुमच्या पाया हो ॥ ध्रु० ॥
त्रिविधताप सासरा प्रभु मज उगाचि गांजीतो ।
भेद भयंकर माऊ हा तर उगाचि जाळीतो ।
क्रोध माझा दिर तो मजला भलतेंचि बोलतो ।
काम माझा दादला सखेगे भलतिकडे जातो ॥ उव० ॥ १ ॥

त्या वेळच्या सर्व मराठी कवींची पदें अशीं साधीं आहेत.

ज्ञानेश्वर हे मुकुंदराजानंतर ७९ वर्षांनीं अवतरले. शके १२१२ मध्यें त्यांनीं ज्ञानेश्वरी ( भावार्थदीपिका ) ही गीतेची टीका पुरी केली. जनाबाई ही नामदेवांची दासी. जनाबाई, नामदेव शिंपी, गोरा कुंभार, सांवता माळी; चांगदेव हे सर्व ज्ञानदेवांचे समकालीन. जनाबाईच्या एका अभंगावरून निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानकाका व मुक्ताबाई हीं भावंडें २।३ वर्षांच्या अंतरानें अवतरलीं असें दिसतें. काशीचे प्रख्यात साधु रामानंद यांचे एक शिष्य कबीर व दुसरे शिष्य ज्ञानोबांचे वडील विठ्ठलपंत. जनाबाईनें ज्ञानोबांच्या जन्माचा शक ११९३ हा दिला आहे. यावरून ज्ञानेश्वरांनीं आपला अद्वितीय ज्ञानेश्वरी ग्रंथ वयाच्या १९ व्या वर्षीं पुरा केला असें सिद्ध होतें. ज्ञानोबांचे गुरु निवृत्तिनाथ हे ईश्वरास किंवा गुरूंस नमन करितांना कधीं कधीं आईबापांच्या नांवाचा ही ‘ बाप रखुमादेवीवर ’ या नांवानें उच्चार करीत. निवृत्तीच्या सांगण्यावरून त्यांनीं ‘ अमृतानुभव ’ ह्मणून स्वतंत्र ग्रंथ केला. त्यांची अनुगीतेवर टीका, हरिपाठाचे अभंग व इतर शेंकडों पदें आहेत.

देवाचीये द्वारीं उभाक्षणभरी । तेणें मुक्ती चारी साधीयेल्या ॥ १ ॥
हरी मुखें ह्मणा हरी मुखें ह्मणा । पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥

ज्ञानोबांचीं कांहीं कूटें आहेत.

ऐसा गे माय कैसा हा योगी । जे ठायीं जन्मला तो ठाय भोगी ॥
यांचा अर्थ

अनुभवी जाणे । अनुभवावांचून कोणीच नेणें ॥

यालाच ज्ञानोबांची मेख ह्मणतात. त्यांचा एक डौर आहे. निवृत्तिनाथांचा ' वृत्तिबोध ' सोपानेदेवांचा ' सोपानमार्ग, ' मुक्ताबाईची ' चांगापासष्टी; ' ह्या लहान लहान ग्रंथांशिवाय त्यांचे व नामदेव, जनाबाईंचे शेकडो रसभरित अभंग व पदें आहेत.

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढभावो ॥ १ ॥
चरण न सोडी सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥
या वदनीं तुझें मंगल नाम । हृदयीं अखंडीत प्रेम ॥ ३ ॥

ही ज्या भक्तश्रेष्ठाची वासना, त्याच्या मुखांतून किती रसाळ अभंग निघाले आहेत! शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा ज्या परमभक्त नामदेवाची, त्याचे कांहीं अभंग तरी आज आपल्या सुदैवानें काळाच्या तडाक्यांतून टिकले आहेत. मराठींत ' ळळीत ' करण्याचा प्रघात नामदेवापासून पडला असावा असें आह्मांस वाटतें. त्यांचे ' खेळिये, डौर ' वगैरे मजेदार प्रकार आहेत. चोखामेळा, नरहरि सोनार, सांवतामाळी, बोधला बोवा वगैरे सर्व साधु याच काळांत झाले. आपल्या वैराग्यानें व ज्ञानानें शोभणारी मुक्ता, वडाच्या पारावर बसलेल्या १४०० वर्षें तपश्चर्या केलेल्या योगी चांगदेवास

ह्मणे मुक्ताबाई, ' चांग्या! अंतरिची खूण ।
धरि सद्गुरुचे पाय तुजला नेतिल उतरून ' ॥

असा उपदेश करिते. तो ' मुक्ताई जिव्हारीं बोध करी ' ह्मणून उपरति होत होत ज्ञानोबा व मुक्ता यांच्या पदाला जाऊन पोंचतो. नामदेवाच्या घरची दळणकांडण करणारी दासी जनी, पण तिचाही अधिकार काय होता हें खालील पदावरून दिसेल:—

बाई मीं लिहिणें । शिकलें सद्गुरुरायाशीं ॥ धृ ॥
ब्रह्मीं झाला जो उल्लेख । तोचि नादाकार देख ।
पुढें ओंकाराची रेख । तुर्या ह्मणावी तीशीं ॥ १ ॥
बीजापासुनी अंकूर । होय वृक्षाचे उभार ।
शाखा पुष्पें फळें पत्रें । सामावे बीजाचे कूशीं ॥ २ ॥

वेदशास्त्र आणि पुराण । यांचा अर्थ मनीं आणून ।
कनक नगाचे भूषण । अनूभव वाटे जीवासी ॥ ३ ॥

नामदेव प्रताप देव । मस्तकीं सद्गुरूचा हस्त ।
जनी ह्मणे केली मात । पुसा ज्ञानदेवासी ॥ ४ ॥

अहाहा! निवृति, सोपान, ज्ञानोबा, मुक्ताबाई, जनाबाई, नामदेव ह्यांच्या पायाचा जोडा झालों असतों तरी धन्य झालों असतों. असें कोण ह्मणणार नाहीं? हीं सर्व मंडळी ब्रह्मीं सदा लीन असत व महाराष्ट्रोरांस ब्रह्मज्ञान वाटीत फिरत. ज्ञानेश्वरीनें हजारों लोकांस जी सुखशांति आजवर दिली व पुढेंही देईल, तितकें सुख मोठमोठ्या राजांच्या नशिबीं प्रजेस देण्याचें नसतें! ज्ञानेश्वरीचे पाठ शुद्ध करून एकनाथानें धर्मजागृति केली; ज्ञानेश्वरीचे पाठ ऐकून उपरति झालेल्या ' तुक्या 'चें तुकारामबोवा झाले; ज्ञानेश्वरीनें अद्वैताची महती वाढली; ज्ञानेश्वरी, महाराष्ट्राचे मराठी धर्माचें सर्वस्व आहे! परम पवित्र भागीरथी हिमालयाच्या शिखरावरून निघून हजारों मैलांचा मुलुख सुपीक करीत व प्राणिमात्रांना जीववीत सागरास जाऊन मिळते; त्याप्रमाणें ज्ञानेश्वराच्या मुखांतून निघालेली ही प्रासादिक वाणी मनुष्यमात्रांस शांति व आनंद देत वाचकांस परब्रह्मसागरांत नेऊन सोडते! ज्ञानेश्वरांची भाषा जोरदार व आवेशयुक्त असून उपमादृष्टांतादि अलंकारांनीं भरलेली आहे. अर्थस्वारस्यामुळें ती वाचकांस नाचविते, वेडे करून सोडते. हा अनुभव ज्यांस येतो ते धन्य होत! इतर सर्व ग्रंथापेक्षां ज्ञानेश्वरीची भाषा फार कठीण आहे. प्राकृतांतलीं मुळरूपें त्यांत सांपडतात, कांहीं थोडी अपभ्रष्ट झालेलीं सांपडतात. आज महाराष्ट्रोरांत, कुणबीमाळ्यांत ज्ञानेश्वरींतले पुष्कळ शद्ब प्रचारांत आहेत. रामदेव जाधवांच्या नामाचा उल्लेख व त्यांची स्तुति; पृथ्वीचे सूर्याभोंवतीं फिरणें, राजचिन्हयुक्त चर्मपत्रें वापरणें, वगैरे अनेक गोष्टींचे प्रसंगवशात् उल्लेख, ' मराठी ' किंवा ' देशी ' भाषेचा अभिमान व ' मराठ्यांच्या ' हिताची कळकळ;

माझा मराठाच बोल कौतुकें। परी अमृता तेंही पैजा जिंके।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन ॥

हा स्वतःचा योग्य भरंवसा; वगैरे अनेक प्रकारांमुळें ज्ञानेश्वरीचें ऐतिहासिक दृष्टचाही महत्व फार आहे; व मराठ्यांचा किंवा मराठी भाषेचा इतिहास 'ज्ञानेश्वरी'च्या ज्ञानाशिवाय पुरा व्हावयाचा नाहीं. भक्तीवांचून सर्व व्यर्थ आहे व भक्त कितीही हीनकुळांतला असला तरी भक्तीच्या जोरावर सहज मुक्त होतो हें सांगतांना ते ह्मणतात:—

"अगा कुळाचिया चोखपणा न लगा। अभिजात्य ह्मणी श्लाघा।
व्युत्पत्तीचा वाऊगा। सोस कां वाहावा ॥ १ ॥
कां रूपवयसा माजा। अथिलेपणें कां गाजा।
एक भाव नाहीं माझा। तरी पाल्हाळ तें ॥ २ ॥
कणेंवीण सोंपटें। कणसें लागती घनदाटे।
काय करावें गोमटें। ओस नगर ॥ ३ ॥
नातरी सरोवर आटलें। रानीं दुःखिया दुःखी भेटले।
कां वांझ फुलीं फुललें। झाड जैसें ॥ ४ ॥
तैसें सकळ तें वैभव। अथवा कुळजाति गौरव।
जैसें शरीर आहे सावेव। परी जीवची नाहीं ॥ ५ ॥
तैसें माझिया भक्तिवीण। जळो तें जियालेपण।
अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई ॥ ६ ॥
जयांचिये वाचे माझे अलाप। दृष्टी भोगी माझेंचि रूप।
जयांचें मन संकल्प। माझाचि वाहे ॥ ७ ॥
माझिया कीर्तिवीण। जयांचें रिते नाहीं श्रवण।
जया सर्वांगीं भूषण। माझी सेवा ॥ ८ ॥
ऐसा अवघाचि परी पांडवा। जिहीं आपुलिया सर्व भावा।
जियावयालागीं वोलावा। मीच केला ॥ ९ ॥
ते पापयोनी ही होतु कां। ते श्रुतातीत हीन होतुकां।
परी मजसी तुकितां तुका। तुहीं नाहीं ॥ १० ॥

> ह्मणोनि कुळजाति वर्ण । हे आघवेंचि अकारण ।
> एथ अर्जुना माझेंपण । सार्थक एक ॥ ११.॥ ”

ह्यांत महाराष्ट्र धर्माचें सार आहे. ज्ञानेश्वरासारखा अद्वैत मताचा डंका पिटणारा महाराष्ट्रधर्मसंस्थापक; जनामुक्तासारखीं दैदीप्यमान स्त्री-रत्नें; चोखामेळा, ( महार ) गोराकुंभार, सांवतामाळी, नरहरीसोनार इत्यादीं अठरा पगड जातींतलीं तेजःपुंज साधुरत्नें; बाजरी, मोडी लिपी व दगडी इमारती बांधण्याची कला लंकेंतून महाराष्ट्रांत आणणारा ‘ हेमाद्रि ’कर्ता प्रसिद्ध मुत्सद्दी हेमाडपंत जैत्रपाळ, सिंघण, रामदेवरावासारखे विद्याव्यसनी व नीतिमान् राजे अशीं मानवीं रत्नें ज्या काळांत महाराष्ट्रांत चमकलीं तो काल धन्य होय.

( २ ) **एकनाथांचा काळ** (शके १४७०--शके १५३० )

शके १२१८त, ह्मणजे ज्ञानेश्वरी प्रसिद्ध झाल्यावर अवघ्या पांच वर्षांनीं यवनांची टोळधाड प्रथम दक्षिणेंत आली. रामदेवराव व नंतर त्यांचा जांवई हरपाल यांनीं देवगडची गादी राखण्याचा पुष्कळ प्रयत्न २० वर्षेंपर्यंत केला; पण हरपालाचें अंग सोलून त्यास ठार मारल्यावर शके १२६९ मध्यें कलबुर्ग्यास बाहामनीशाहीची स्थापना झाली. हें घराणें १७५ वर्षें टिकलें, पण त्या राज्याचा शेवटचा शूर थोर दिवाण व साधुमहंमद गवान याचा कपटानें नाश झाल्यावर त्या राज्याचा नाश होऊन पांच निरनिराळीं शकलें झालीं. या दुफळीचा फायदा घेऊन मराठ्यांनीं पुनः डोकें वर काढण्यास आरंभ केला. विजापुरची गादी स्थापणारा युसफअद्दिशलहा यानें मुकुंदराव नांवाच्या मराठे सरदाराची बहीण सुंदर होती, तिच्याशीं लग्न लावलें, व तिचें नांव आवडीनें बुबुजीखान असें ठेविलें, याप्रमाणें विजापुरच्या राजघराण्यांत मराठ्यांचें रक्त शिरलें व त्याचा पुढें फार उपयोग झाला. बुबुजीखानानें माहेरचा अभिमान बाळगून मराठेलोकांस योग्यतेस चढविलें. हिंदूंस जोखमीचीं व जबाबदारीचीं कामें तिनें सांगितलीं. दरबारचीं कामें फारशी भाषेंत चालत तीं मराठींत ठेवण्यास सुरवात केली; याप्रमाणें मराठीस व ब्राह्मणांस उत्तेजन मिळालें. सर्व हिशेब

व दप्तर मराठीलिपींत ठेवून मुलकी कामावर ब्राह्मणांस नेमूं लागल्या-मुळें ब्राह्मणांचें महत्व वाढलें, व थोडक्याच काळांत ते दिवाणगिऱ्या करूं लागले. विजापुरच्या दरबारीं शूर कारस्थानी 'बुबुजीखानानें' मराठ्यांचा प्रवेश केल्यावर तिच्या नंतरच्या बादशहांनींसुद्धां मराठ्यांशीं फारसें वैर ठेविलें नाहीं. विजया नगरच्या तिमप्पा बहिरू नांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा यवनांनीं बाटविला, व त्याचें नांव 'निजाम उल्मुलुख वहिरी' ठेविलें. त्याचा मुलगा अहंमद हा तैलबुद्धीच्या जोरावर वाढत वाढत अखेर निजाम-शाही घराण्याचा संस्थापक झाला. याप्रमाणें बाटल्यावर सुद्धां हिंदूचें रक्त आपल्या देशाच्या उपयोगीं पडूं लागलें. मुसलमान सरदारांतलीं भांडणें शमविण्याकरितां व आपली सुरक्षितता रक्षण्याकरितां ह्मणून पातशहानीं मराठ्यांचा घोडेस्वारांत शिरकाव केला व हे बर्गी पुढें वाढतां पांच पांच हजार स्वारांच्या मनसबदाऱ्या करून पादशहा पासून जहागिरी पटकावूं लागले. निंबाळकर, घाटगे, घोरपडे, डफळे, माने, मोरे, सावंतबहाद्दर हे मराठे सरदार नांवारूपास आले, व शिरक्यासारखे पाळेगार जे दोन दोनशें वर्षे किल्ले बळकावून होते ते दुर्जय होत चालले. निजामशाहींतही मराठ्यांस मलिकंबराकडून उत्तेजन मिळालें. जाधवराव, मालोजी व शहाजी भोसले यांणीं डोकें वर काढलें व याप्रमाणें मराठे वीरांनीं आपलें सामर्थ्य वाढविलें, तों ब्राह्मणही वाढत वाढत दिवाण झाले. गोवळकोंड्याचीं सूत्रें माकण्णा आदण्णा यांचें हातीं आलीं. विजापुरचीं दिवाणगिरी मुरार पंताकडे गेली. जगदेवराव मुरारराव हेही दिवाण झाले याप्रमाणें मराठे वीर व मुत्सद्दी यांनीं झपाट्यानें आपली शक्ति वाढविण्याचा तडाका सुरू ठेवला होता त्यांस एकनाथासारखे साधुही निर्माण होऊन प्रोत्साहन आलें व यासर्व परिश्रमाचें चीज पुढें शिवाजी महाराजांनीं केलें.

या खळबळीचे काळांत महाराष्ट्रांत 'दत्तसांप्रदाय' जारीनें सुरूं झाला होता. 'नृसिंहसरस्वती' हे गाणगापुरास असत. त्यांचे शिष्य जनार्दनपंत व त्यांचे एकनाथस्वामी. नृसिंहसरस्वतींची समाध

नरसोबाचे वाडीस आहे. श० १३८२ मध्यें इकडे मोठा दुष्काळ पडला असतांना सुप्रसिद्ध ' दामाजीपंत कारभारी, बेदरचे अधिकारी ' यांणीं बादशाही धान्य गोरगरीबांस वांटून दातृत्वाची अक्षय्य कीर्ति केली. त्यांच्या उदाहरणावरून अव्वल यवनी अमलांतसुद्धां आमचे सद्गुण कसे प्रज्वलित होते हें दिसतें. ' गुरुचरित्रा 'चा उगम याच काळांत झाला. येथें एक लक्षांत ठेविलें पाहिजे. 'नाथाचा पंथ काय ' किंवा ' रामदासी पंथ ' काय, या निरनिराळया पंथांचा मूळ जो पंढरीचा ' अद्वैत 'पंथ त्याशीं कोणत्याही तऱ्हेनें विरोध नाहीं. दक्षिणेतलें एकुण एक सारे कवि व साधु ' भाष्यकारातें वाट पुसत ' जाणाऱ्या ज्ञानोबाप्रमाणें पूर्ण अद्वैती होते. नृसिंहसरस्वतीचे दुसरे शिष्य ' दासोपंत ' जोगाईच्या आंब्यास राहत. यांची ग्रंथरचना पुष्कळ आहे. मराठींत ' गीतार्णव ' नांवाचा यांचा सव्वालक्ष ग्रंथ आहे. त्यानीं श० १५३६ मध्यें समाधि घेतली. शहाजी राजांचे गुरु ' आनंदतनय ' हेही याच काळांतले. यांचे चूर्णिका कटाव पुष्कळ प्रसिद्ध आहेत. हंसराज ह्मणून तिसरे फार प्रसिद्ध साधु होते. त्यांचा ' वाक्यवृत्ती ' नांवाचा एक ग्रंथ आहे. शिवाय ' अमृतानुभवावर ' टीका आहे. यांचे भक्त अजूनही पुष्कळ सांपडतात. यांजी कविता सौम्य व मृदु आहे. ' भक्तचरित्र ' लिहिणारे उद्धवचिद्घन; दौलताबाद्या मानपुरी; कान्हुपात्रा नांवाची स्त्री वगैरे लहान मोठे बरेच साधु झाले. पण या सर्वांपेक्षां ज्यांचे मराठी भाषेवर, महाराष्ट्रावर अतोनात उपकार झाले आहेत ते श्रीएकनाथस्वामी ( श० १४७०–१५२१ ) होत. यांचे ग्रंथ रुक्मिणीस्वयंवर ( श० १४९२ ) यांची ओंवीसंख्या १७१० आहे. भावार्थ रामायणांत ४००० आहे. शिवाय स्वात्मसुख व चतुःश्लोकी भागवत टीका; हस्तामलक; आनंदलरी वगैरे होत. यांचा मुख्य ग्रंथ भागवताच्या एकादश स्कंदावरची टीका ' एकनाथी भागवत ' या नांवानें प्रसिद्ध आहे. हा श० १४९५ मध्यें तयार झाला. याची ओंवी संख्या २००० आहे. यांच्या भागवताचा मासला पहा:—

भूतासी कायावाचामनें । दुःख न देऊनी सुख देणें ।
त्याही नांव संन्यासधर्म ह्मणणें । तो धर्म मी ह्मणे गोविंदु ॥

अध्याय १६.

( २ ) माझा भावार्थ जेथें होय । तेथें मी जाती कुलीन पाहे ।
मी भावाचेनि लवलाहें । वश्य होय निजभक्तां ॥ १ ॥
मजमध्यें रंगली चित्तवृत्ती । त्यालागीं विसरला गृहासक्ती ।
त्याशीं गृहस्थाश्रमींच माझी प्राप्ती । निश्चयें जाण उद्धवा ॥

अध्याय १७

ज्ञानेंद्रिया पांचसहों व मन । हेचि अरिषड्वर्ग जाण ।
यांचें न करितां निर्दळण । संन्यास घेणें तो विटंबू ॥
त्याचा व्यर्थ संन्यास जाण । व्यर्थ त्याचें दण्डन मुंडण ।
व्यर्थ काषाय वस्त्रें ग्रहण । वेषधारण नटाचा ॥ २ ॥

अध्याय १८

नाथांची कविता गहन पण सरळ आहे. त्यांचे कवितेपेक्षां त्यांचें परोपकारी व पवित्र आचरण, त्यांची अप्रतिम शांति, क्षमा, औदार्यादि लोकोत्तर गुण यांचा लोकांचे मनावर ठसा अधिक उमटला. पितरां करितां तयार केलेलें अन्न अंत्यजांस देणें ; करुणेनें उन्हांत तळमळत असलेलें चांभाराचें पोर कडेवर घेऊन घरीं पोचतें करणें ; कसलेंहीं प्रायश्चित्त ब्राह्मण देऊं लागले तरीं ते शांतीनें घेणें वगैरे गुणावरूनच मोरोपंतांनीं त्यांस ‘ शांतिजलधि ’ ह्मटलें आहे. एकनाथांनीं मराठींत जे मजेदार रचनाविशेष सुरूं केले आहेत त्यावरून त्यांची ब्रह्मज्ञान सर्व पेशाच्या लोकांस देण्या विषयींची कळकळ दिसते. “ जोहार, कोल्हाटीण, महार, गवळी, गावगुंड, वासुदेव, जोशी, होरा, डोंबारी ” वगैरे अनेक चमत्कारिक प्रकार, नाथांचे ‘ भजनी गारूड ’ ह्मणून वारकऱ्यांत प्रसिद्ध आहे. त्यांचे ‘ अर्जदास्त ’ कीर्दरोखा, वगैरे गद्यांतच आहेत. प्रत्येक मराठी साधुचीं पदें अभंग आहेत. वरच्यासारखे आश्चर्यजनक रचनाविशेष पदें, अभंग, कटाव हें मराठीचा जिव्हाळा आहे ! नाथांच्या कवितेंतले मासले पहा : —

## ध्रुवपद.

कसबे कायापूर लांबी साडेतीन गांव ।
तिनशें साठ पेठा तेथें नांदति उमराव ॥
चौदा चौक दहा रस्तें वसविले अपूर्व ।
दिली धन्यानें सनद जिवाजीपंतांच्या नांवें ॥१॥
जोहार मायबाप जोहार महार मीं कायापूरीचा ।
जन्मो जन्मी वेस राख्या आहे या गांवीचा ॥ध्रु०॥
शिवाजी पंतानें जिवाजी ठेविला दीवाण ।
साही षड्विकार त्यासी मिळालें मन ॥
आप आपणा परी वर्धिंच ते घेती भोंदून ॥
तुह्मी सर्व ऐका तुह्मांसी सांगतो खूण ॥जो०२॥
कामाजी कोतवाल याणें नाडिलें बहुतांसी ।
हरीहराची अब्रू घेतो भय नाहीं त्यासी ॥
जमदग्नी दुर्वास ऐसे वाढिले ऋषी ।
क्रोधाजी फौजदार तेही मिळाले त्यासी ॥ ३ ॥

व्यवहारांतले दाखले घेऊन विषय मनांत भिनविण्याची काय हातोटी ही!

( २ ) ऐसे असावे संसारीं । जोंवरि प्राचीनाची दोरी ॥
पक्षी आंगणासी आले । आपुला चारा चरोनि गेले ॥ २ ॥
मूली घराचार मांडिला । खेळ मोडोनी टाकिला ॥ ३ ॥
वाटसरू वाटा आले । प्रातःकाळीं उठोनि गेले ॥ ४ ॥
मार्गीं बहुसाळ भेटले । तेथें मन नाहीं गुंतले ॥ ५ ॥
एका विनवी जनार्दना । ऐसे असतां भय कोणा ॥ ६ ॥

असो. असे उत्कृष्ट उतारे पुष्कळ घेतां येतील. एकनाथांच्या ग्रंथांतच प्रथमतः फारसी व अरबी भाषेंतले शब्द मराठींत घुसडलेले दिसतात. त्या वेळचे साधुही दरबारांत वापरलेले असत. जनार्दनपंत तर नौकर होते. त्यांस व एकदां एकनाथांसही, हातांत शस्त्र घेऊन लढावें लागलें होतें. शिवराम स्वामी पूर्वाश्रमीचे मामलतदार होते. यवनांच्या संसर्गामुळें ह्यांच्या भाषेंतले शब्द मराठींत शिरले, त्याच्या योगानें मराठीस दरबारी-

पणा, एक प्रकारची ऐट व मर्दानीपणा हे गुण मिळाले. याप्रमाणें त्या शतकांत मराठी वीर, मुत्सद्दी व साधु यांनीं राष्ट्रांत चळवळ चालविली होती.

## समर्थांचा काळ ( शके १५३०—१६३६ )

शके १५३० ह्या एका वर्षांत रामदास, तुकाराम, मुक्तेश्वर, व विठ्ठलकवि हे जन्मास आले व आतां आपलें व्रत निःसंशय चालणार असें समजूनच कीं काय, पुढील सालीं एकनाथानें आपला देह ठेविला. शहाजी-एकनाथांचे प्रयत्न सफळ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. साऱ्या दक्षिणेंत सर्व बाजूंनीं मराठ्यांचे सद्गुण जागे झाले. यानंतर शंभर वर्षें महाराष्ट्रांत जितकीं मानवरत्नें उत्पन्न झालीं, इतकीं कोणत्याही देशाच्या इतिहासांत इतक्या अल्प काळांत सांपडण्याची मुष्कील पडेल. राज्यकर्त्याला लागणाऱ्या सर्व क्षात्रगुणांचा अद्भुत पुतळा श. १५४९ त शिवनेरीवर अवतरला व त्यानें आपल्याच योग्यतेच्या नरश्रेष्ठांच्या साहाय्यानें यवनांच्या प्रचंड लाटेचा अवरोध करून स्वदेशास स्वातंत्र्य देऊन मराठ्यांचा माथा उजळ केला. जिजाबाईरूपी कौसल्या व पराक्रमी शाहाजीरूपी दशरथ यांच्या पोटीं जन्म घेऊन, तानाजी, येसाजी, बाजी ह्या लक्ष्मणभरतशत्रुघ्नांच्या मदतीनें, रामदास वसिष्ठ, व मयूर सुमंतांच्या सल्लामसलतीनें, एकनिष्ठ इमानी मावळ्यांची वानरसेना बरोबर घेऊन, ह्या शिवरामानें औरंगझेब रावणाशीं टक्कर मारली. आपल्या पौलासाठीं स्वातंत्र्याचा सेतु बांधून स्वधर्मरक्षण केलें व मराठ्यांच्या भाल्याची चमक जगास दाखविली. दादोजी कोंडदेव, जिजाबाई व समर्थ या त्रिमूर्तिदत्ताचा वरप्रसाद मिळाल्यावर, महाराजांनीं मौक्तिक रत्नांची माला तयार करून, महाराष्ट्रवधूच्या गळ्यांत घातली. संभाजी कावजी, जिऊं माहला, मुरारबाजी, हिरोजीफर्जंद, येसाजीकंक, बाजीफसलकर, प्रतापराव, निराजीपंत, हंबीरराव, बाळाजी आवजी. कितीं नांवें घ्यावींत? महाराजांनीं उत्पन्न केलेल्या जोमावर, संभाजीच्या वधानंतर, औरंगझेबासारखा कर्दनकाळ, मराठ्यांस बुडविण्यासाठीं २७

वर्षें सारखा टपून बसला असतां मराठ्यांनीं त्यास दाद दिली नाहीं व शिवरायानें संपादिलेलें स्वराज्य ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं रामचंद्रपंत, प्रल्हाद-निराजी, धनाजी जाधव व संताजी घोरपडे या महाराजांच्या तालमींत तयार झालेल्या चौकडीनें राखून, तें, त्याची वृद्धि करून कीर्ति दिगंत फांकण्याकरितां, पेशव्यांच्या स्वाधीन केलें. या धामधुमीच्या काळांत ह्मणजे श. १५३० पासून तों पेशवाईच्या आरंभापर्यंत ह्मणजे श. १६३६ पर्यंत इकडे मोठाले साधु व कवि झाले. रामदास, तुकाराम, वामन-पंडित, मुक्तेश्वर, रंगनाथ, श्रीधर ही सगळींच नांवें मोठालीं आहेत.

राजयोगी व विलासी **रंगनाथस्वामी** ( समाधि श० १६०६ ) निगडीकर यांचे तीन ग्रंथ आहेत. बृहद्वाक्यवृत्ति, भगवद्गीतेची टीका आणि योगवासिष्ठ, हे तिन्ही ग्रंथ, [ त्यांतही योगवासिष्ठ, ] चांगले आहेत. यांचीं पदें मधुर आहेत. रंगनाथांचा पुतण्या श्रीधर रंगनाथ-यांच्या ओव्या पन्नास हजार आहेत. श्रीधर ( श. १६००—१६५१ ) हा कवि फार लोकप्रिय आहे. पांडवप्रताप, हरिविजय, रामविजय, शिवलीलामृत, जैमिनी अश्वमेध या श्रीधराच्या मोठाल्या पांच ग्रंथांपैकीं एखादाही ज्यानें ऐकला किंवा वाचला नाहीं, असा खेडे-गांवातूनही एखादाच मनुष्य सांपडेल! पांडवप्रतापाच्या किंवा हरिविज-याच्या पारायणांत बायकापोरें, ह्मातारींकोतारीं, कुणबीमाळी यांना रात्रीं भक्तीनें पुराणिकाभोंवतीं कोंडाळीं घालून बसतांना कोणी पाहिलें नाहीं? संस्कृत न जाणणाऱ्या संसारी माणसांच्या वाचनांत श्रीधरासा-रखा लोकप्रिय झालेला कवि दुसरा नाहीं. एकनाथांचा नातु—लीला विश्वंभरसुत मुक्तेश्वर—यांनीं महाभारत व रामायण ह्या ग्रंथांच्या आधारें पण स्वतंत्र ग्रंथ मराठींत प्रथम केले. याच्या भारताचीं चारच पर्वें आज उपलब्ध आहेत. बाकींचीं कोणी जाळलीं ह्मणतात. मुक्तेश्वराचे रामा-यण इतकें सुरस वठलें नाहीं; पण भारत फारच उत्तम आहे. आदि-पर्वापुरतेंच पाहिलें तरी मोरोपंतापेक्षां मुक्तेश्वरांत कविप्रतिभा अधिक दिसते. मुक्तेश्वरांचीं वर्णनें फार चटकदार असतात. कांहीं स्वतःच्या बुद्धीनें केलेलीं वर्णनें तर केवळ अपूर्व आहेत. मुक्तेश्वराचें ' शकुंतला-

त्या शतकांत ज्या अत्युच्च मनोविकारांचा आमच्यांत उदय झाला, त्यांची प्रत्यक्ष मूर्ति होय! शके १५७१ मध्यें त्यांनीं **शिवाजी** महाराजांस लिहिलें:—

तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळलीं । धर्म गेला ॥ १ ॥
देवधर्मगोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ २ ॥
या भूमंळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुह्मांकरितां ॥ ३ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुह्मांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥ ४ ॥

**समर्थां**चा मुख्य ग्रंथ ' दासबोध '. दासबोधांतल्या एका ओवीवरून शके १५८१ मध्यें तो ते लिहित होते असें दिसतें. प्रपंचपरमार्थांची या ग्रंथांत जितकी उत्तम सांगड घातलेली आहे, व्यवहारज्ञान ब्रह्मज्ञानाशीं जितकें बेमालूम यांत एकवटलेलें सांपडतें, तसें महाभारताशिवाय जगांत दुसऱ्या कोणत्या ग्रंथांत सांपडेल कीं नाहीं, याची आह्मांस मोठीच शंका वाटते. रानावनांत हिंडणाऱ्या स्वामींचें ' बागप्रकरण ' ' कारखानेप्रकरण ' ' राजधर्म ' ' क्षत्रियधर्म ' पाहिले ह्मणजे आचंबा वाटतो. **दास**बोधांत व्यवहारज्ञान परोपरीनें सांगितलेलें पाहून, ह्यांस समाजाचें इतकें पूर्ण ज्ञान कोठून मिळालें, याचें वारंवार कौतुक वाटतें; पण व्यवहार ते उत्तम जाणत, ह्मणूनच त्यास ७०० मठ स्थापन करितां आले, व **शिव**रायास हातीं धरून ' मराठीराज्य स्थापतां आलें. **समर्थां**ची वृत्ति कशी होती याची कल्पना आपणांस **दास**बोधावरून चांगली बांधतां येते.

प्रपंचीं सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण ॥

ह्यांत परमार्थाच्या उपदेशाचें तत्व आहे.

ह्मणोनी आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ १ ॥
ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार ॥ २ ॥
ऐका सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी क्षण ।
प्रपंच व्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ ३ ॥
सांडील सगुण भजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेशी ।
ह्मणोनिया सगुण भजनासी । सांडूंच नये ॥ ४ ॥
दोष देखोनि झांकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करोनि ॥ ५ ॥
जो बहुतांचे सोशीना । त्यास बहुत लोक मिळेना ।
बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ ६ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळोच न द्यावें ।
वर पीडेवरी बसावें । अंतःकरण ॥ ७ ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास शिकवावे ।
उदंड समुदाय करावे । परी गुप्त रूपें ॥ ८ ॥
प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ९ ॥
बोलण्यासारखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयांचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ १० ॥
मुलांचे चालीनें चालावें । मुलांच्या मनोगतें बोलावें ।
तैसे जनास शिकवावें । हळूं हळूं ॥ ११ ॥
समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष झाले ॥ १२ ॥
व्यापआटोप करिती । धक्के चपेटें सोशिति ।
तेणें प्राणी सदैव होती । देखत देखता ॥ १३ ॥
वेडे करावें शहाणें । तरीच जिणें श्लाघ्यवाणें ।
उगेंच वादांग वाढवणें । हें मूर्खपण ॥ १४ ॥
कुग्रामें अथवा नगरें । पाहावीं घरांचीं घरें ।
भिक्षामिषें लहान थोरें । परीक्षून सोडावीं ॥ १५ ॥

जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वादवीवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयोवाद हा दंभ भारी । तुटे वादसंवाद तो हीतकारी ॥ १६ ॥
विचारूनि बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥ १७ ॥
क्रियेवीण वाचालता व्यर्थ आहे ॥ १८ ॥
देहीं आरोग्य चालतें । भाग्य नाहीं त्या परतें ॥ १९ ॥

हे उतारे फार झाले; पण मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीनें व मराठी भाषेच्याही दृष्टीनें हा काळ अत्यंत महत्वाचा असून त्यांत समर्थ हें सर्व तऱ्हेनें अत्यंत श्रेष्ठ होत, ह्मणून ते घ्यावे लागले. समर्थांच्या ग्रंथांवरून कर्तृत्ववान् विचारी मनुष्य कसा असावा हें कळतें. मराठी भाषेचें अगदीं शुद्ध, साधें, जोरदार स्वरूप दासबोधांत आहे. मराठी भाषेंतल्या उत्तमोत्तम ह्मणी, खोंचदार व योग्य शब्द, बायकापोरांची घरगुती भाषा समर्थांच्या ग्रंथांत आहेत व एकट्या समर्थांच्या ग्रंथावर मराठीभाषेंत एक चांगला कोश होईल! त्यांची कविता उपदेशपर असून तिला कवीचे छक्केपंजे ठाऊक नाहींत. 'मनाचे श्लोक' मराठी भाषेंतला एक अलंकार आहे.

असो; याप्रमाणें या काळांतल्या कवींची हकीकत आहे. वरच्या मुख्य कवीशिवाय लहानसहान पुष्कळ झाले. तुकोबाचे निळोबा, पांडुरंग हे शिष्य; समर्थांची 'आका' वेणू, कल्याणस्वामी, उद्धव [ यांनीं रामदासचरित्र सांगितलें आहे ] वगैरेनीं लहानमोठे ग्रंथ केले आहेत. याचवेळीं शेखमहंमद हा साधु होऊन गेला. याचे अभंग आहेत, त्यांचे शेवटीं

शेखमहंमद अविंध । त्याचे हृदयीं गोविंद ॥

असें आहे! याचा मराठींत 'योगसंग्राम' नांवाचा अष्टप्रकरणात्मक ओंवीबद्ध ग्रंथ आहे.

राजारामास, कृष्णाजी अनंत सभासदानें 'शिवछत्रपतिचरित्र' सांगितलें, ती बखर याच काळांत झाली. शिवाय मराठी पोवाड्यांचा उगमही याच काळांत झाला. 'शिवाजी महाराजांनीं अफझुलखानाचा वध केला' त्यावर लागलेंच अज्ञानदास शाहीरानें पोवाडा केला.

याचे ३७ चौक आहेत. शके १५९२मध्यें तानाजीनें सिंहगड घेतला. त्या प्रसंगावर एक ५९ चौकांचा पोवाडा तुळशीदासानें जिजाबाईच्या सांगण्यावरून केला. त्यांत रावबा मुलाचें लग्न टाकून, सूर्याजी व शेलार मामास घेऊन, तानाजी किल्ल्यावर गेल्यापासूनची हकीकत आहे. हा पोवाडा मराठींत पहिल्या प्रतीचा उत्कृष्ट आहे. जिजाबाईनें शाहीराच्या हाताला सोन्याचें लंगर चढविले, व गांव इनाम दिले असें कवि ह्मणतो. यावरून लोकांत वीर्य उत्पन्न होऊन, पराक्रमी पुरुष उत्पन्न झाल्याबरोबर पोवाड्यांचा उदय झाला असें दिसतें.

अशी या तिसऱ्या काळाची हकीकत आहेः यांत मोठमोठे पराक्रमी पुरुष, साधु व कवि झाले; दिंडी, साकी, ओंवी, अभंग, पद, लावणी, कटाव, सवाई वगैरे जे निव्वळ मराठी कवितेचे छंद त्यांचा उपयोग पुष्कळ केला गेला; बखर लिहिणें, पोवाडे तयार करणें याही प्रकारास आरंभ झाला. रघुनाथ पंडिताकडून ' राजव्यवहारकोश ' करून महाराजांनीं दरबारी तरी फारशी, अरबी या भाषांतले शब्द काढण्याचा यत्न केला तरी ते शब्द बेमालूम मराठींत घुसले. हा काळ मराठी भाषेचें यौवन होय.

## ( ४ ) पेशवाईतले कवी किंवा मोरोपंताचा काळ.

काशींत अद्वैतानंदस्वामी असत; त्यांचा संस्कृतांत ' ब्रह्मविद्याभरण ' ह्मणून ग्रंथ आहे. त्यांचे दोन शिष्य, एक मध्वमुनीश्वर व दुसरे, ज्याविषयीं पंत

कीर्तनमुखार्थ झाला अवतारचि अमृतरायजीवाचा ।

असें ह्मणाले, ते कीर्तनकार अमृतराव. मध्वमुनींचीं पदें आहेत. अमृतराव [ शके १६२०—१६७५ ] यांचीं आख्यानें, कटाव व स्वयंवरें फार प्रसिद्ध आहेत. यांची कविता चांगली आहे, व हरिदासांच्या फार उपयोगीं पडते. सीतास्वयंवर चाललें, व यांचें,

कोण तूझ्या मनास येतो सांग, हो सीते ॥

हे वहारींचें पद निघालें नाहीं, असें कधीं व्हावयाचेंच नाहीं. शिवदिन केसरींचींही पदें आहेत. रघुनाथ पंडितांचा काळ निश्चित ठरत नाहीं,

तरी ते पेशवाईच्या आरंभीं झाले असावे असें वाटतें. यांचें एकच 'नलोपाख्यान' ह्मणून बहारीचें काव्य आहे. काव्यदृष्टीनें यांच्या तोडीचें काव्य मराठींत दुसरें नाहींच असें कबूल केलें पाहिजे. कवीची वर्णन करण्याची शैली, कर्णमधुर झणूझणू आवाज करणारी शद्धरचना, अलंकारांची गर्दी हे गुण व कोमल विचार या काव्यांत जसे दृष्टीस पडतात तसे दुसरे कोठेंही आढळत नाहींत. हंसाचें केविलवाणी उद्गार, दमयंतीजवळ हंसानें नळाचें केलेलें वर्णन वगैरे प्रसंग मनोरम आहेत. 'बलिदान'व रावणगर्व परिहार' यांचा कर्ता चतुर साबाजी याच काळांत झाला. श्रीधर कवीसारखे ज्याचे ग्रंथ लोकप्रिय झाले, तो महिपति होय. याचे पांच ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भक्तविजय, भक्तलीलामृत, संतविजय, संतलीलामृत व कथासारामृत. हा कवि संस्कृत जाणत नसे. याची कविता फार प्रेमळ आहे. कवि स्वत: भाविक असल्यामुळें भाविक जनांस याची कविता फार आवडते. मराठी साधूंचीं चरित्रें, कवितेंत याणें लिहिल्यामुळें, हा कवि एकप्रकारें इतिहासकारच आहे.

आतां आपण रावबाजींच्या भैरवींत जे कवि झाले, त्यांजकडे वळूं. कलगीतुऱ्याच्या नादांत असून, चार कुत्रीं, चार वानर, दोन मैना, लाडक्या वेश्येकरितां रेशमी काढण्यांचा झोंपाळा, या सरंजामानिशीं नाचें पोर हातीं घेऊन डफ तुणतुण्यावर चरितार्थ चालविणारे शाक्त सुप्रसिद्ध रामजोशी हे पेशवाईत रावबाजींच्या भैरवींत गाजलेल्या तमासगिरांचे गुरु होत! त्यांच्या मधुरवाणीस भुलणाऱ्या हजारों लोकांची जोशीबोवांजवळ नेहमीं थाप पडे. रामजोशी फार विद्वान्, विलक्षण बुद्धिमान् व संस्कृत जाणणारे होते. त्यांच्या संस्कृत काव्याचें ज्ञान 'छेकापन्हुति' दर्शवितें. मोरोपंताशिवाय रामजोशीबोवासारखी मराठी भाषा या काळांतल्या दुसऱ्या कवीस खेळवितां येत नसे. तरुण वयांत बहकलेल्या या अचाट बुद्धीच्या कवीस मोरोपंताच्या आर्येनें व सहवासानें ताळ्यावर आणलें, व मग यांच्या उपदेशपर लावण्या होऊं लागल्या. रघुनाथपंडित व रामजोशी यांच्या आणखी कांहीं कविता सांपडत नाहीं, ही दु:खाची गोष्ट आहे. पंतांच्या आर्येचे मार्मिक

भोक्ते रामजोशीबोवा. बाजीरावानें पंताच्या आर्येवर बहिष्कार घातल्यावर, जोशीबोवांनीं आर्या महाराष्ट्रभर पसरल्या. डफतुणतुण्याची लोकप्रियता वाढविणारे आणखीही कवि झाले. अनंतफंदी कांहीं लहानसहान मनुष्य नव्हे! ज्याच्या कविस्फूर्तीनें जागच्या जागीं तयार झालेल्या लावण्या ऐकण्याकरितां सभोंवार ४०।४० मैलावरून हजारों लोक येत व पावपाव मैलाचें कडें पडें; एकदां डफावर थाप मारून पुन: लावणी ह्मणणार नाहीं ह्मणून कबूल केल्यावरही जेव्हां वचनाविरुद्ध वागतांना अहल्याबाईनें पाहिलें, तेव्हां प्रसंगावधान आणून आपल्या वाङ्माधुर्यानें तिचा संताप शमवून ज्यानें शालजोडी उपटली; रावबाजीची, त्याच्या निंद्य व आत्मघातकी कृत्यांची ज्यानें भर दरबारांत निर्भिडपणें निंदा केली त्या फंदीचे 'लावणीकर, तमासगीर' ह्मणून गुणग्रहण न करणें हें मार्मिक मनुष्यास शोभणार नाहीं. त्यांचें 'माधवनिधन' ह्मणून एक काव्य आणि लावण्या व पोवाडे आहेत. या रामजोशी व अनंतफंदीशिवाय होनाजीबाळ, सनगभाऊ, राघो धवशा, मार्तंडा शिंपी, बहिरू, मल्हारी न्हावी, रामा गोंधळी हे रावबाजीच्या छत्राखालीं वाढलेले कवी. दादोजी पांडुरंगांचें त्या काळचें हुबेहुब वर्णन पहा. "त्या काळीं रावबाजीच्या उत्तेजनानें पुणें शहरांत व त्या शहराचा वारा लागून जेथें तेथें शिमग्याचें चांदणें पडलें होतें. दिवसास ब्रह्मभोजनाचा थाट; आणि दिव्यांत वात पडली नाहीं तोंच मंदिरांत चौघडे सनयांचा मंजुळ घोष; श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाड्यांत सरकारी तायफांचे मुजरे; रात्रीं रस्त्यांत बोळांत फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपल्याकडेस ओढून घेणारे नुक्तेच चिमणी, साळू, मैना यांच्या मंजूळ कंठांत होनाजी बाळानें घातलेले खडे सूर, आणि फौजेकडील शिलेदार, बारगीर शिपाई आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, दुकानदार, माळी, सराफ यांस रिझविण्याकरितां बहिरू, मल्हारी, धोंडी बापु, सगनभाऊ, आणि रामा गोंधळी यांनीं सजविलेले डफतुणतुण्याचे तमाशे आणि कलगी तुऱ्यांचीं भांडणें; हे थाट रावबाजीच्या उल्लसित मनोवृत्तींच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते." ह्या काळच्या लावण्या जरी शृंगारिक व अंमळ पांचकळपणाच्या आहेत, तरी

मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्यांस त्या टाकाऊ नाहींत. संस्कृतांतलीं नाटकें, मम्मटासारख्यांचे शृंगारिक श्लोक यांतला चावटपणा मराठींत जो आला नव्हता, तो रावबाजींच्या प्रेरणेनें आला!

रामजोशी, अनंतफंदी, सगनभाऊ यांच्या जशा लावण्या आहेत, तसेच पोवाडेही आहेत. पानिपतच्या लढाईनंतर, तानाजीच्या सिंहगडापासून ८० वर्षें जे पोवाडे झाले नव्हते, ते पुन: होऊं लागले. ' पानिपतची लढाई ' ' खड्यांची लढाई ' यावर पुष्कळ पोवाडे आहेत. रामजोशांनीं,

ब्राह्मणी राज्य जोरदार। घोड्यावर स्वार होते शिपाई ॥

हा पोवाडा माधवराव पेशव्यांचे वेळीं केला असावा. त्यांत रमणा, पर्वती, पेशव्यांची सेना व मराठे सरदार यांचें वर्णन आहे. मल्हारराव, महादजी, माधवराव, नाना याचे गुण जसें फांकत चालले, तसें कवींनीं पोवाडे केले. पोवाडे करणाऱ्या सर्व कवींत प्रभाकर दातार ( शके १६९१— १७६९ ) यांस अग्रस्थान दिलें पाहिजे. हा हर्णईमुरूडचा राहणारा. ह्याचे पोवाडे, सुशिक्षित व विचारी ब्राह्मणानें लिहिले असल्यामुळें, शुद्ध व पद्धतिवार आहेत. सवाई माधवरावावर, त्यांच्या रंग खेळण्यावर, व त्यांच्या मृत्यूवर असे तीन पोवाडे आहेत, ते उत्तम आहेत.

कमि नवते सृष्टींत अवांतर प्राणी न्यायाला।
औक्ष कसें कमि झालें सवाई माधवरायाला ॥

हा करुणरसपर आहे. खड्यांच्या लढाईवरच्या पोवाड्यांत २०० ते ३०० सरदारांचीं नांवें आहेत. हकीकत शिस्तवार असून भाषा बरी आहे. ' पेशवाईचा थाट ', ' पेशवाईचा लय ' हे पोवाडे बरे आहेत; पण याचा उत्तमोत्तम पोवाडा ' शेवटच्या बाजीरावा 'वरचा होय. नानांचा जाच; इंग्रजांचें वर्णन; खडकी व अष्टें येथील लढाया; पुण्यांतील लोकांचा आकांत; बाजीरावाचें पलायन व हाल; इंग्रजांची लूट; य:कश्चित् लोकांनीं आह्मांस जिंकलें याबद्दलचा खेद, बाजीराव पुन: येतील ही आशा व शेवटचें गंभीर तत्वज्ञान या सर्वांचें वर्णन

कवीनें फारच बहारीनें केलें आहे. करुणरसाचा हा मराठींत उत्तम मासला आहे.

यशस्वी झाले श्रीमंत पहिले सर्व लढायाला ।
आतांच आलें अपेश कोठून बाजीरायाला ॥ धृं ॥
कुंकवावांचुन कपाळ, मंगळसूत्रावांचुनि गळा ।
तसा सैन्यसमुदाय उदासिन रंग दिसे आगळा ॥
फितुर करुनि सर्वांनि आपुलें राज्य मात्र बुडविलें ॥

तानाजीच्या पोवाड्याचा नंबर पहिला व या पोवाड्याचा दुसरा. प्रभाकराची भाषा शुद्ध असून त्याचीं वर्णनें हृदयंगम आहेत. आजवर ७५।८० पोवाडे छापले आहेत; त्यांत प्रभाकराचे १२ आहेत.

कृष्णाजी अनंत सभासदानें ‘ शिवछत्रपति चरित्र सांगितल्यावर पुढें पेशवाईंत पुष्कळ बखरी लिहिल्या गेल्या. शिवदिग्विजय व शिवप्रताप या बखरी चांगल्या आहेत. पानपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर व शेवटची सोहनी यांणीं लिहिलेली पेशव्यांची बखर या बखरी महत्वाच्या आहेत; पण सर्वांत मल्हार रामराव चिटणीस यांच्या शिवाजी, संभाजी, राजाराम व शाहु यांच्या बखरी फार महत्वाच्या आहेत. मराठ्यांच्या इतिहासांत अक्षय्य कीर्ति करून गेलेल्या या चिटणीसांच्या घराण्यांतील एका हुषार व राजनीतिकुशल माणसानें अस्सल माहिती व कागदपत्रांवरून लिहिलेल्या या बखरी बहुमोल आहेत. त्यांचाच एक ‘ राजनीती ’ वर ग्रंथ आहे. चित्रगुप्ताची बखर पाल्हाळानें वर्णन करून लिहिली आहे. बखरीची भाषा मोठी जोरदार असून वाचण्यापासून मनाला आनंद वाटतो. उदाहरण पहा :—त्याजवरून तानाजी मालुसरा वरिष्ठ हजार लोकांचा सरदार कांहीं सामान्य नव्हे; ज्याचा धाक हबशी यास व कुडाळकर खेमसावंतांस, कोळवणचे राजे यांस वगैरे लोकांस मोठा भारी, पुंड समशेर बहादर, सुदृढ, बळाधिक्यता अधिकोत्तर, दिग्गज पुरुष, त्याजसमागमें त्रिलोकांतयास दुसरा नाहीं. सराइत व दंडाइत व पटाइत सर्व शस्त्रांचे घडामोडींत प्रवीण; रूप पाहतां भयानक भीमसेनेचे उपमेस

योग्य; जनवाक्यें श्मश्रू पिंगटा नेत्र आरक्त, स्फुलिंगें तांबडीं; हस्त दंडप्राय मिशा मोठ्या लांब; तसें मस्तक प्रचंड बळोन्मत्त जसें द्विरदच; हस्तींचा तमा ज्यास नाहीं, हस्तीचे दोन्ही दंत धरून उभा करावा, ऐसी बळाची निस्सीमता. तानाजीराव ज्या फौजेंत असलिया सहस्राचे सहस्र लोकांनीं भयेंकरून पलायन संपादावें. समरीं भयें करून कोणी न टिकावें. त्यास विलोकून कंपायमान होत असावें. असत्य सर्वथा नाहीं. महाराजांची परम कृपा तानाजीवर "....

बखरींच्या भाषेंतली जोम व खुबी आलीकडच्या गद्यांत नाहीं. या बखरी व पत्रें यादी वगैरे काव्येतिहाससंग्रहांत रा. साने यांनीं छापल्या आहेत. किती बखरी काळाच्या तडाक्यांत लुप्त झाल्या असतील! इतिहास लिहिण्याची कला आह्मांस चांगली कळत चालली होती.

याप्रमाणें मध्वमुनि, अमृतराय, महिपति वगैरे कवि; रामजोशी अनंतफंदी वगैरे लावण्या व पोवाडे करणारे, प्रभाकरराव दातार; मल्हारराव चिटणीस, रघुनाथ यादव वगैरे बखरीकार या काळांत झाले; पण या मोत्यांच्या माळेंतला मधला लोलक अजून सांगायचा आहे. तो बारामतीकर आर्यापति मोरोपंत. आर्याछंदानें मोरोपंतास भूषविलें, कां पंतानें आर्येस भूषविलें याचा निकाल करणें कठीण जाईल! पंतांनीं किती ग्रंथ लिहिले आहेत! आधीं महाभारताचीं अठरापर्वें ह्मणजे कांहीं लहान ग्रंथ नव्हे. शिवाय कृष्णविजय, बृहद्दशम, मंत्र भागवत, मंत्ररामायण ( संस्कृत ) हे मोठाले ग्रंथ; रामायणाचीं चमत्कृतिजनक १०८ रामायणें, खेरीज सन्मणिमाला आर्या, केका, प्रश्नोत्तरमाला, सत्संग, पंढरिमाहात्म्य नामसुधा, सन्मनोरथराजि, संशयरत्नमाला वगैरे शेंकडों मनोरम प्रकरणें पंतांनीं केलेलीं आहेत! तीर्थयात्रा करितांना वाटेंत गंगा, यमुना, गोदा, विठोबा, राम वगैरे जीं जीं क्षेत्रें किंवा देवता भेटल्या, त्यांचीं स्तोत्रें केलीं आहेत. शिवाय ज्ञानेश्वरापासून तों पंतांचा समकालीन जो महिपति तेथपर्यंत सर्व साधूंचीं पृथक् स्तोत्रें केलीं आहेत. मोरोपंत एकांतप्रिय असत व खोलींत सुचतील तसे अलंकार, यमक, प्रास टिपून ठेवीत, व त्यांची यथाकाल योजना करीत. रोज १५० आर्या करण्याचा

पंतांचा नियम होता असें सांगतात. मोरोपंत साधु किंवा कवि नव्हते, असा अर्वाचीन पंडितांनीं मागें फार कल्होळ केला होता. अहल्याबाई व वाजीराव हे जहागिरी देत असतां त्यांचा अव्हेर करून, जे आपल्या यजमानाच्या घरीं अल्प वेतनावर संतुष्ट राहिले, व कोणाची स्तुति न करितां दोन लाख आर्या परमेश्वरस्तवनार्थ केल्या;

मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुझे पाय ।
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय ॥

ही ज्यांची निर्मळ भावना, ते साधु नव्हत; मग साधु कोणास ह्मणायचें? रोजच्या २०० आर्या त्यांच्या तोंडून येत, त्या काय कविस्फूर्ती-वांचून? आपला पिसारा पिंजारून करुणस्वरानें टाहो फोडणाऱ्या मयूरास कवि ह्मणण्यास कोणी नाखुष असेल तर त्यास आह्मीं सांगतों कीं, बाबारे! तुला दुनियेंत कवि सांपडायचा नाहीं! पंतांची केकावली व स्फुट काव्यें जरी कोणी वाचलीं तरी या महाकवीची योग्यता त्यास कळेल. पंतांचें भारत ह्मणजे अजब चीज आहे. बाप जसा मुलीशीं खेळतो तसे पंत आर्येशीं खेळत. नानाप्रकारचे अलंकार, चित्रविचित्र वर्णनें, यमकप्रासादिकांनीं भाषेस आणलेली शोभा, सामान्य सिद्धान्त, कूटें ह्यांनीं पंतांच्या काव्यास मोठी शोभा व गोडी आली आहे. पंतांनीं आपल्या उज्वल कल्पनाशक्तीस स्वैर सोडल्यामुळें, ती बहु-रूप्याप्रमाणें नाना छंद करिते. पण मोरोपंतांचा मुख्य गुण अद्यापि सांगायचा आहे. पंतांनीं मराठी भाषा कमावण्याचा यत्न प्रथम केला. मराठी कवींनी व्याकरणादि शास्त्रांचे नियम पार झुगारून दिले आहेत.

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥

अशी ज्यांची सदा स्थिति, त्यांना व्याकरणाचे नियम कसे बद्ध करणार? पंतांनीं सारे नियम पाळून काव्यें शुद्ध भाषेंत लिहिलीं आहेत. शब्द व अलंकार जथल्यातेथें खेचून भरल्यामुळें व कविदोषांस काव्यांत वाव न ठेविल्यामुळें पंतांची कविता ह्मणजे महाकारागीर विश्वकर्म्याची मुख्यवस्थित दुसरी सृष्टीच बनली आहे. पंतांच्या आर्येंत '७८

अक्षरांपर्यंत यमकें साधलेलीं आहेत; पण

अनलसमीहित साधी राया वारा महीवरा कामा।
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही वराका मा ॥ १ ॥

येथें यमकांची हद्दच संपल्यामुळें, कवीचा नाइलाज झाला असेल!

सत्संगमींच नानादुःखार्त तथापि चित्त रंगतसें।
जलनिधितरंग वातें सत्संगें उठति चित्तरंग तसें ॥ १ ॥
हरिकीर्तना टपावें मार्जारें सर्वदा जसें दुग्धा।
मन्मति विनयादि गुणा वाहो प्रेमें नगा जशी मुग्धा ॥ २ ॥

मोरोपंतांच्या काव्यांतले उतारे विस्तारभयास्तव घेतां येत नाहींत. त्यांचे ग्रंथच वाचले पाहिजेत.

इंग्रजी सुरू होण्यापूर्वीं याप्रमाणें मराठी कवितेची स्थिति होती. विषय उपमादृष्टांतांनीं डोळ्यापुढें मूर्तिमंत उभा करणारी ज्ञानेश्वरांची रसाळ व प्रासादिक वाणी; भगवद्भक्तीनें थयथय नाचावयाला लावणारा तुकोबाचा अभंग; सरळ भाषेनें व्यवहारज्ञान व परमार्थ देणारा समर्थांचा उपदेश; हृदयांत उन्नत व शांत विचार उत्पन्न करून मौनावणारी नाथांची ओवी; भक्तीचे कल्लोळ उत्पन्न करणारे मुक्ताबाई, नामदेव, यांचे अभंग व पदें; पदलालित्य, अर्थमाधुर्य साधून हुबेहूब वर्णन करणारीं श्रीधर, रघुनाथ पंडित व मुक्तेश्वर यांचीं काव्यें; प्रतिपक्ष-सिद्धातांचें चर्वण करून कोंवळ्या व सहज वाक्यांनीं मन वेधणारे वामन पंडितांचे श्लोक; ठसकेदार भाषेनें चटकदार वर्णन करून वैराग्य उत्पन्न करण्याची जोशीबोवांची लावणी; शब्दवाक्यालंकारांशीं खेळणाऱ्या पंतांची उक्ती; रसभरित व करुणरसयुक्त प्रभाकराचे पोवाडे, अमृतरायांचे कर्णमधुर कटाव—यांणीं भाषा नानागुणांनीं परिपूर्ण असलेल्या कुलीन युवतीप्रमाणें कोणाचें मन रमविणार नाहीं! परंतु स्वराज्याचा उदय होण्याबरोबर कविप्रतिभा उज्वल होते व त्याच्या अस्ताबरोबर मंदावते.

## ५ मराठी गद्यग्रंथांचा उदय.

पेशव्यांचें राज्य शके १७४० मध्यें लयास गेलें व पारतंत्र्याची दुसरी फेरी महाराष्ट्रावर आली. पेशवाईंत शास्त्री, पंडित, हरिदास,

गवई, गोंधळी, शाईर या सर्वांची चहा असे. पुण्यांत संपत्तीचा धूर निघे, यामुळें गुणिजनांस प्रोत्साहन मिळे. आपल्याकडे छापण्याची कला माहीत नसल्यामुळें, विद्याप्रसार करणारे ह्मणजे वरील गुणिजन; पण ते सारे उघडे पडले.

प्रभाकराची जडण घडण कडकडीत ह्मणायाला ।
अशा कवीची बूज नाहीं कोणी करायाला ॥

या दोन चरणांवरून रामजोशी, फंदी, सगनभाऊ, होनाजीबाळ, गंधर्वतुल्य गवई रामा गोंधळी वगैरेंची कशी त्रेधा उडाली असेल याची कल्पना येईल. अशावेळीं बडोद्याचे सयाजीराव गाईकवाड यांनीं थोरपणानें गुणिजनांचा परामर्ष घेतला. अनंतफंदीस ९०० रुपयांचें वर्षासन मिळालें. याप्रमाणें बडोदें गुणिजनांचें माहेरघर बनविल्याबद्दल सारे मराठे लोक गायकवाडांचे सतत ऋणी राहतील.

पुण्यांत शके १७४३ मध्यें संस्कृत पाठशाळेची स्थापना झाली. ती ३० वर्षे चालून पुढें रूपांतरें होत होत, इंग्रजी शाळा झाल्या, व त्यांतूनच ट्रेनिंग कॉलेज निघालें. संस्कृत शिक्षणांनीं एतद्देशीयांचें कल्याण व्हावयाचें नाहीं असें इंग्रज सरकारास वाटल्यामुळें, त्यांनीं इंग्रजी शिक्षण देण्यास सुरवात केली. त्याचे परिणाम कांहींही झाले असले तरी युरोपांतील ग्रंथांचें ज्ञान होऊन, नाटक, कादंबऱ्या, निबंध, शास्त्रीय ग्रंथ वगैरे गद्य ग्रंथांची आह्मांस कल्पना येऊन, ते मराठींत होण्याचा मार्ग खुला झाला; हा फायदा मात्र भाषादृष्टीनें फार मोठा होय. मुंबईस शके १७४९ मध्यें 'हैंदशाळा पुस्तकमंडळी' स्थापन होऊन इंग्रजी जाणणाऱ्यांची पहिली पिढी मुंबईस तयार झाली. जर्व्हिस साहेबांनीं प्रथम मराठी पुस्तकें केलीं व करविलीं. बाळशास्त्री जांभेकर, सदाशिवशास्त्री थत्ते, हरि केशवजी व दादोबा पांडुरंग हे मराठींतले पहिले गद्य ग्रंथकार. त्यावेळची ह्यांची गणित, इतिहास, शाळांतील क्रमिक पुस्तकें हीं जरी महत्वाचीं नसलीं, तरी यांचीं नांवें संस्मरणीय आहेत. शके १७५८ मध्यें दादोबांचे मराठी भाषेस पहिलें व्याकरण मिळालें. त्यांच्यापूर्वी व नंतर जरी व्याकरणावर लहान

मोठीं पुस्तकें झालीं, तरी कृष्णशास्त्री चिपळूणकरांचें व्याकरणावरील निबंध व गोडबोले यांचें व्याकरण, हीं वजा जातां आजवर दादोबांचें व्याकरण प्रचलित राहिलें आहे. जगन्नाथशास्त्री यांनीं १।३ शास्त्र्यांच्या साहाय्यानें केलेला कोश मराठी भाषेंत पहिला होय. नंतर मोल्स्वर्थ साहेबांचा कोश तयार झाला. पहिला निव्वळ मराठी आहे. दोन्ही कोश चांगले आहेत. याप्रमाणें शके १७६९ चे सुमारांस मराठी भाषेस कोश व व्याकरण मिळालें. नंतर रघुनाथशास्त्री गोडबोले, तळेकर व क्यांडी यांचे कोश तयार झाले. सदाशिव काशिनाथ थत्ते यांचे 'इसापनीति' व 'बाळमित्र' हे ग्रंथ अद्याप वाचनीय आहेत. त्यांच्यानंतर ४।५ नांव घेण्यासारखे ग्रंथकार झाले, त्यांत परशुरामपंत तात्या गोडबोले व कृष्णशास्त्री चिपळोणकर हे मुख्य होत. इंग्रजी किंवा संस्कृतांतून मराठींत खुबीदार भाषांतर करण्याची कला यांच्या पूर्वीं व पश्चात्‌ही यांच्यासारखी कोणांसही साधली नाहीं. हे महाविद्वान् शास्त्री मराठी कवितेचे परम भोक्ते होते. साक्रेटिसाचें चरित्र, अरबीभाषेंतल्या सुरस गोष्टी, मेघदूताचें मराठी काव्यांत भाषांतर, अनेकविद्या मूलतत्वें, पद्यरत्नावलि हे कृष्णशास्त्र्यांचें ग्रंथ प्रसिद्ध आहेत. परशुरामपंतांनीं मराठी कवींचे वेंचे मार्मिकपणें काढून केलेलें नवनीत; मृच्छकटिक, वेणीसंहार, शाकुंतल व उत्तररामचरित यांच्या मराठी प्रतिकृती हे यांचे ग्रंथ फारच सरस आहेत. याशिवाय गणेशशास्त्री लेले यांचा मराठी रघुवंश; कोल्हापूरच्या महाराजांकरितां केलेली रघुनाथशास्त्री पर्वते यांची गीतेवरची उत्कृष्ट टीका; मिशनरी व बाटे यांशीं सडकून भांडणारे विष्णुबोवा ब्रह्मचारी यांचा तेव्हां गाजलेला वेदोक्तधर्मप्रकाश; जनार्दन रामचंद्रांचें कविचरित्र; लक्ष्मणशास्त्री हळबे यांची मुक्तामाला कादंबरी; मोरोबा कान्होबांचा घाशीराम कोतवाल वगैरे ग्रंथ; माधवशास्त्री कोल्हटकरांची अपरोक्षानुभूति हे ग्रंथ व त्यांतही पहिले तीन ग्रंथ वाचनीय आहेत. माधवचंद्रोबांनीं 'सर्वसंग्रह' मासिक पुस्तक काढून मोरोपंतांचीं भारतांचीं अठरा पर्वें व इतर मराठी काव्यग्रंथ छापून काढले व त्यांचेंच अनुकरण करून पुढें रा० काशिनाथ नारायण साने व ज० बा० मोडक यांनीं 'काव्येति-

हाससंग्रहां 'त जुन्या बखरी व कागदपत्रें छापिलीं, व पुढें मराठी काव्याचे रसिक भोक्ते वामन दाजी ओक यांनीं मराठी कवींचे ग्रंथ सुरेख टीपा देऊन चांगले प्रसिद्ध केले. या सर्वांचे महाराष्ट्रावर अपरिमित उपकार झाले आहेत. 'विविधज्ञानविस्तारां 'त फार चांगले लेख येत असत. याच सुमारास गोपाळराव हरि देशमुख यांनीं लोकहितवादी काढून स्वतंत्र लेख लिहिले. इंग्रजी विद्येच्या प्रभावानें डोळे दिपलेल्या माणसाचे विचार कसे असत, हें यावरून दिसतें. आज यांचीं कांहीं मतें जरी पोरासही अगदीं वेडगळपणाची वाटतील, तरी त्यांत 'फडा 'सारख्या विषयावर जे निबंध आहेत, त्यांत ऐतिहासिक माहिती पुष्कळ आहे. 'गुजराथचा इतिहास ', 'ऐतिहासिक गोष्टी ', 'पृथ्वीराज चव्हाणाचें चरित्र ' वगैरे यांचे लेख वाचण्यासारखे आहेत. याप्रमाणें 'निबंधमाले 'च्या पूर्वीची हकीकत आहे.

शास्त्रीलोकांचा काळ संपतांच महाराष्ट्रांत एक मोठा कर्तबगारीचा पुरुष मराठीचा पुरस्कर्ता ह्मणून पुढें आला. विष्णु कृष्ण चिपळोणकर यांनीं गद्यरचनेचे अनेक मार्ग लोकांस घालून दिले. 'जान्सनचें चरित्र, मोरोपंताची कविता, वाचन, इतिहास, मराठी भाषेवरचे निबंध, विनोद महदाख्यायिका, अर्थसादृश्य, साहित्य, कविपंचक ' इत्यादि निरनिराळ्या तऱ्हेचे लेख लिहून त्यांनीं जसें लोकांच्या विचारास व कर्तृत्वास, तसें भाषेसही विशिष्ट वळण लाविलें. 'निबंधमाला ' मराठींत गद्य ग्रंथांच्या अग्रभागीं ठेविली पाहिजे. बहुश्रुतपणा, विलक्षण कोटिक्रम, प्रतिपक्ष्यांस चीत करून टाकणारी झणझणित टीका, लेप करुणा हास्यादि अनेक रसांचा आविर्भाव ह्या गुणांत मालेच्या तोडीचे निबंध झाले नाहींत! मालाकार आणखी कांहीं वर्षें जगते तर मराठी गद्याची स्थिति आज कांहीं निराळी असती. विष्णुशास्त्रयांच्या सहवासामुळें उत्पन्न झालेल्या अभिमानानें शालिग्राम यांनीं 'ऐतिहासिक पोवाडे ' शोधून प्रसिद्ध केले; त्यांच्या संगतींत कांहीं काळ घालविलेले सुधारणेचे पुरस्कर्ते रा. गोपाळ गणेश आगरकर यांनीं आपल्या चटकदार व डौलदार लेखांनीं सुधारकांचीं मतें लौकर चोहोंकडे

फांकली; त्यांचें मुख्य व्रत चालविणारे त्यांचे स्नेही रा. टिळक यांनीं सोप्या भाषेंत खोंचदार निबंध लिहिले. अलिकडे थोर पुरुषांचीं चरित्रें इतिहास बखरी वगैरे जे प्रसिद्ध झाले ते मालाकारांच्या स्फूर्तीमुळें! कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री या पितापुत्रांनीं मराठी भाषेची सेवा उत्तम प्रकारें केली. बापाची विद्वत्ता, शुद्ध मराठी लिहिण्याची हातोटी हीं जरी पुत्रापेक्षां अधिक होतीं तरी मराठी गद्यावर पुत्राचे संस्कार अधिक झाले आहेत. अगदीं शुद्ध मराठी शब्द मालाकारांच्या निबंधांत वापरलेले कमी! संस्कृत शब्दांनीं व मनोहर वर्णनांनीं त्यांच्या लेखांस शोभा आहे, तरी मराठीचा अभिमान जो लुप्त होत होता तो त्यांनीं जागृत केला व लोकांचें लक्ष मराठीकडे वळविलें.

मुक्तामालेनंतर मराठींत कादंबऱ्या बऱ्याच झाल्या; पण बहुतेक एका धर्तीवर. एक राजपुत्र व त्याचा मित्र, दोघांचा प्रवास, राजपुत्राचें एखाद्या राजकन्येशीं प्रेमबंधन, त्यांच्या भेटी व विवाह, तिच्या पातिव्रत्य-भंगाचा दुष्टांकडून प्रयत्न, त्यांचे वनवास व संकटें, अखेर दोघांची भेट हे शेंदोनशें कादंबऱ्यांचें तात्पर्य आहे! असल्या कादंबऱ्यांतही कांहीं वाचण्यासारख्या आहेत. मागें सांगितलेली मुक्तामाला, प्रेमबंधन, विचित्रपुरी, मित्रचंद्र, मंजुघोषा वगैरे चांगल्या वाचण्यालायक आहेत. मोचनगड, पहिले बाजीराव, जिंजिवास, जुनावाडा, पानपतचा मोहरा, (बापट कृत) लालनबैरागीण, सुशील यमुना, पानपतची मोहिम, ( बापट ) शिवचरित्र, ( बंकीचंद्राच्या बंगाली कादंबरीवरून केलेली ) विक्रमादित्य, ( नाईटक्लबचें ) उषःकाल, ( हरि नारायण आपटे ) वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्या चांगल्या आहेत. राजाराणीच्या गोष्टी वाचून लोकांस कंटाळा येऊं लागल्यावर सद्यःस्थिति वर्णन करून सामान्य मनुष्याच्या चरित्रांत प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टी लोकांस आवडूं लागल्या व अशा कादंबऱ्यांत 'नारायणराव आणि गोदावरी'; वेणू, व यशवंतराव खरे, आजकालच्या गोष्टी व पण लक्ष्यांत कोण घेतो या हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या उत्तम आहेत. आपटे हे हुषार गृहस्थ उत्तम कादंबरीकार असून स्कॉटच्या धर्तीवर निरनिराळ्या तऱ्हेच्या गोष्टी तयार करण्याची

हांव बांधतील तर चांगले नामांकित होतील. यांची भाषा अगदीं साधी घरगुती असून, वर्णन अगदीं हुबेहुब असतें. आजवर यांच्या तोडीचा कादंबरीकार कोणी झाला नाहीं.

विष्णुपंत भावे यांणीं शके १७७९मध्यें एक नाटकमंडळी सांगलीस काढली. त्यांचे दशावताराचे खेळ चांगलेच होत असत. ललितांतून हे खेळ निघाले व त्यानंतर संगीताचें वेड लोकांस अण्णा किर्लोस्कर यांनीं लाविलें. मोठमोठ्या शहरांतून नाटकमंडळ्या व नाटकगृहें स्थापन झालीं. किर्लोस्करांचीं 'शाकुंतल' 'सौभद्र' हीं नाटकें लोकप्रिय झालीं. गोविंद बल्लाळ देवल यांचीं मृच्छकटिक, झुंजारराव, शापसंभ्रम व दुर्गा हीं नाटकें चांगलीं आहेत. कीर्तने यांचीं जयपाळ व थोरले माधवराव हीं नाटकें वाचनीय आहेत. महाजनींची तारा व केळकरांची त्राटिका यांची गणना चांगल्यांत आहे. नाटककारांत अधिक लोकप्रिय व पुष्कळ नाटकें करणारे नारायण बापूजी कानिटकर हे होत. यांची तरुणीशिक्षण नाटिका, संमतिवयाचें बिल, व शीघ्रसुधारणा दुष्परिणाम हीं तीन नाटकें आजकालची स्थिति दाखविणारीं आहेत. आपटे यांच्या कादंबऱ्या व कानिटकर यांचीं नाटकें एकत्र वाचावीं ह्मणजे सुधारक व जुन्याचे अभिमानी यांचीं मतें कळतील. कानिटकरांचीं, शिवाजी, प्रतापगडचा मोहरा, राजाराम, बाजीराव आणि मस्तानी व बाजी देशपांडे हीं ऐतिहासिक नाटकें चांगलीं वठलीं आहेत. राणाभीमदेवही वीररसप्रधान आहे. याशिवाय लहानमोठीं शेंकडो प्रहसनें झालीं आहेत; पण तीं बहुधा टाकाऊ आहेत.

चरित्रांत—एकनाथ ( सहस्त्रबुद्धेकृत ), रामदास, नामदेव यांचीं चरित्रें व ज्ञानेश्वरांचीं तीन चरित्रें साधूंचीं होत. ज्ञानेश्वरांचें एक चरित्र भिंगारकरबोवांचें, दुसरें पारख यांचें व तिसरें तत्वविवेचकांत छापलेलें. तिन्हीं आपापल्यापरीनें चांगलीं आहेत; पण त्यांत पहिलें पद्धतीस धरून आहे. शिवाय, शिवाजी, संभाजी, राजाराम, बाळाजी विश्वनाथ, शाहू, बाजीराव, मल्हारराव होळकर, महादजी शिंदे ( नातुकृत ), नानाफडणवीसांचें ( खरेकृत ), परशुरामभाऊ पटवर्धन, ( निगु-

डकरकृत ), प्रभुरत्नमाला, बापु गोखले, अहल्याबाई या ऐतिहासिक थोर पुरुषांचीं चरित्रें छापून प्रसिद्ध झालीं आहेत. धनुर्धारींची जवान मर्द ब्राह्मणभाई व मराठे गडी या मालांतलीं छोटालीं चरित्रें जोरदार भाषेंत लिहिलेलीं आहेत. सौ. काशीबाई कानिटकरीण यांचें आनंदीबाईचें चरित्र चांगलें आहे. याशिवाय विष्णुशास्त्री चिपळोणकर यांचें, त्यांचे बंधु लक्ष्मणराव यांनीं अगदी नव्या धर्तीवर मनोवेधक भाषेनें लिहिलेलें चरित्र, व दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचें झांशीची राणी हीं चरित्रेंही उत्तम आहेत.

याप्रमाणें नाटकें, कादंबऱ्या व चरित्रें यांची हकीकत झाली. शिवाय विशेष विचारांनीं लिहिलेलीं स्वतंत्र पुस्तकें पुष्कळ झालीं आहेत. बाळाजी प्रभाकर मोडक यांचीं सृष्टिशास्त्रावरचीं पुस्तकें, कोल्हापूरच्या राजघराण्याचा इतिहास, फेरिस्तासारख्याच्या ग्रंथांवरून केलेलीं मुसलमानांचे इतिहास हे महत्वाचे आहेत. शंकर बाळकृष्ण दीक्षित या सुप्रसिद्ध ज्योतिष्यांचीं ज्योतिर्विलास व भारतीय ज्योतिःशास्त्रांचा इतिहास हीं बहुमोल ज्योतिषशास्त्रावरचीं पुस्तकें मराठींतल्या उत्तमोत्तम ग्रंथांत मोडतील. बडोद्यास **श्रीसयाजीराव** गायकवाड यांचे आश्रयाखालीं इटाली, ग्रीस, इराण इत्यादि परराष्ट्रांचे इतिहास व माधवराव बोडस यांची ग्रामसंस्था हे मनन करण्यासारखे आहेत. बोडस यांचाच केसरींत प्रसिद्ध झालेला अद्वैतमीमांसा हा निबंध, सुरेख वठला आहे. दाभोळकरांच्या मालेंत स्पेन्सर, मिल्ल वगैरे पाश्चात्य पंडितांचे ग्रंथ भाषांतररूपानें प्रसिद्ध होतात; पण अशीं भाषांतरें विशेष उपयोगाचीं आहेत असें नाहीं. अशा भाषांतरांपेक्षां स्वतंत्र ग्रंथ झाल्यास बरें पडेल. माठे यांचीं वेदांतपर, खुबीदार गोष्टी मध्येंमध्यें घालून केलेलीं दोन तीन पुस्तकें व बावा गर्दे यांची शतपदी गीता हीं पुस्तकें वेदांतविद्यार्थ्यांनीं अवश्य वाचावींत. प्रो॰ गोळे यांचा ' ब्राह्मण आणि त्यांची विद्या ' वाचून मनन करण्यासारखा ग्रंथ आहे. गोळे हे उत्तम ग्रंथ लिहितील तर नामांकित ग्रंथकार होण्याच्या योग्यतेचे आहेत. त्यांची भाषा चांगली आहे. राजाराम-

शास्त्री भागवत यांचें ' मराठ्यासंबंधाचे चार उद्गार ', ' महाराष्ट्रधर्म ' वगैरे ग्रंथ वाचण्यालायक आहेत. स्वतंत्रपणें विचार करून जोरदार भाषा ते लिहितात. उदास यांचें ' धौममहाबळेश्वर वर्णन ' चटका लावण्यासारखें आहे. हा तरुण मनुष्य अल्पवयांत वारला, याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें. विलायतचा प्रवास निव्वळ मराठी वाचकांस कितपत कळेल याचा संशय आहे! संस्कृत शब्द एकत्र कोंडल्यामुळें प्रवासास शोभा आली असून, माहिती विपुल आहे. पंडिता रमाबाईची ' स्त्रीधर्मनीति ' चांगला ग्रंथ आहे. ' झांशीच्या राणीचें चरित्र ' लिहिणारे पारसनीस हे मोठे उद्योगी व होतकरू असून यांची ' मराठ्यांचे पराक्रम ' ' बुंदेलखंडचा इतिहास ' हीं पुस्तकें ऐतिहासिक माहितीनें भरलेलीं आहेत. भानूंचा ' नाना आणि महादजी ' हा एकच निबंध संग्रहार्ह आहे. गाडगीळ यांचें ' संसारसुख ' फार मधुर आहे. याशिवाय शास्त्ररहस्य, बागळेकृत बेकनचे निबंध, महाराष्ट्रस्वातंत्र्य, गोविंदराव कानिटकरकृत ' स्त्रियांची परवशता ' वगैरे पुस्तकें चांगलीं आहेत.

विविधज्ञानविस्तार, नाट्यकथार्णव, बालबोध, केरळकोकिळ, ग्रंथमाला भाषांतर वगैरे मासिकें, वासुदेवशास्त्री खरे यांचे ' ऐतिहासिक लेखसंग्रह व पारसनीस व आपटे यांचें भारतवर्ष हीं दोन अत्यंत महत्वाचीं नुक्तीं जन्मास आलेलीं मासिकें व मराठी कवि प्रसिद्ध करणारे काव्यसंग्रह; याशिवाय केसरी, करमणूक सारखीं वर्तमानपत्रें वगैरे अनंत मराठीभाषाभिवृद्धीचीं साधनें या काळांत झालीं व होत आहेत.

या काळांत कविता ह्मणण्यासारखी चांगली झाली नाहीं. तरी कुंटे यांचें ' राजा शिवाजी ' काव्य, चिंतामणि पेठकरांचें ' गंगावर्णन ' खरे यांचें ' यशवंतराव ' महाकाव्य, श्री. बापूसाहेब कुरुंदवाडकर ' गणेश पुराण ' व ' भट्टवंशकाव्य ' हीं विशेष वाचनीय आहेत. केरळकोकिळकर्त्यांनीं आपल्या कवित्वगुणाचा उपयोग करावा.

याप्रमाणें या काळांत झालेल्या गद्यग्रंथांची हकीकत आहे. गेल्या २५।३० वर्षांत मराठींत गद्यग्रंथ जरी पुष्कळ झाले, तरी बहुतेक इंग्रजी

व संस्कृत या भाषांतल्या ग्रंथांचीं भाषांतरें किंवा भाषांतरें नसलीं तरी त्या ग्रंथांच्या आधारानें केलेले आहेत. मालाकारांसारखे स्वतंत्र विचार करणारे लेखक फारसे अद्यापि झाले नाहींत, असें ह्मटलें पाहिजे. पहिल्या चार काळांपेक्षां या काळांत ग्रंथसंख्या अधिक झाली, यावरून लोकांस विद्येची अभिरुची अधिक लागली किंवा विद्वान् लोक अधिक झाले असें नसून छापण्याच्या कलेमुळें जुनी पुस्तकें प्रसिद्ध करणें किंवा नवीं लिहून बाहेर काढणें अधिक सुलभ झालें आहे. नाटकें, कादंबऱ्या चरित्रें वगैरे, टीकाकारांच्या सूक्ष्म परीक्षणाच्या तागडींत ठेवलीं तर, १०।५ टिकतील कीं नाहीं याची शंका आहे! शास्त्रीय माहिती मिळवून स्वतंत्र विचार करून, पद्धतशीरपणानें ग्रंथ लिहिण्याची व तसे ग्रंथ वाचण्याची कला लोकांस अद्यापि कळूं लागली नाहीं. मनोरंजन किंवा व्यावहारिक बाबींसंबंधाचे विचार यांच्यापलीकडे अद्यापि गति गेली नसून, १००वर्षांपुढें टिकण्याच्या योग्यतेचे स्वतंत्र ग्रंथ पांच चार असतील नसतील! पण यावरून प्रसिद्ध झालेले सर्व ग्रंथ निरुपयोगी आहेत असें कोणी समजूं नये. इतिहासाची मात्र थोडी गोडी, लोकांत उत्पन्न होत चालली आहे. ज्ञानेश्वरापासून महिपतीपर्यंत स्वानुभवाचे उद्गार काढणारे जसे थोर पुरुष उत्पन्न झाले, तसे या काळांत झाले नाहींत, इतकेंच काय, पण परशुरामतात्या, कृष्णशास्त्री, बाळाजीपंत मोडक, वामनराव ओक यांसारखे खरे विद्येचे भोक्ते आलीकडे उत्पन्न होत नसून अर्धकच्चे पंडितच फार होतात ही दुःखाची गोष्ट आहे! ही सत्य पण अप्रिय गोष्ट आपण प्रांजळपणें कबूल केली पाहिजे; तरी पण ब्रह्मज्ञान सांगणारे गुरु आपणांस आपल्या परिपक्क वयांत भेटतात ह्मणून अक्षर ओळख करून देणाऱ्या तात्या पंतोजींची योग्यता जशी कमी समजावयाची नाहीं, त्या प्रमाणें पुढें होणाऱ्या मोठमोठाल्या ग्रंथकारांसाठीं गद्याची भूमिका तयार करणाऱ्या या काळांतल्या छोट्या छोट्या ग्रंथकारांची योग्यता आपण कमी मानणें योग्य नाहीं. या पुढच्या काळांत मोठमोठे कवी, निबंधकार, इतिहासकार, नाट्यकर्ते, कादंबरीकार, शास्त्री वगैरे निर्माण होऊन, मराठी गद्याचें वैभव वाढण्याची आह्मांस पूर्ण आशा आहे, इतकें ह्मणून हा निबंध पुरा करितों.

प्रस्तुत निबंधकारास मराठींत उत्तमोत्तम वाचण्यालायख असे जे ग्रंथ वाटतात त्यांची यादी खालीं दिली आहे.

## कविता.

(१) विवेकसिंधु [मुकुंदराज]
(२) ज्ञानेश्वरी [ज्ञानेश्वर]
(३) एकनाथी भागवत [एकनाथ]
(४) यथार्थदीपिका [वामनपंडित]
(५) महाभारत [मुक्तेश्वर]
(६) दासबोध.
(७) मनाचेश्लोक. } [रामदास]
(८) भर्तृहरीचीं समश्लोकी. [वामनपंडित]
(९) तुकारामबोवांचे अभंगांची गाथा. [तुकाराम]
(१०) नलोपाख्यान. [रघुनाथपंडित]
(११) योगवासिष्ठ [रंगनाथ]
(१२) रामविजय.
(१३) पांडवप्रताप. } [श्रीधर]
[१४] लावण्या. [रामजोशी]
[१५] संतविजय.
[१६] संतलीलामृत. } (महिपती]
(१७) महाभारत
(१८) केकावली [यशोदा पांडुरंगी टीकेसह]
(१९) सन्मणिमाला वगैरे स्फुटकाव्यें } [मोरोपंत]
(२०) नामदेवांची गाथा.
(२१) अमृतरायांचीं काव्यें.
(२२) ऐतिहासिक पोवाडे. [शालिग्राम - प्रकाशक]

## चरित्रें.

(२३) ज्ञानेश्वरांचें चरित्र. [भिंगारकर बोवांचें अगर पारखांचें]
(२४) रामदासांचें. चरित्र.

( २५ ) एकनाथांचें. चरित्र. [ सहस्रबुद्धेकृत ]
( २६ ) नामदेवांचें चरित्र.
( २७ ) महादजी शिंद्यांचें चरित्र [ नातुकृत ]
( २८ ) नाना फडणविसांचें चरित्र [ खरेकृत ]
( २९ ) परशुरामभाऊ पटवर्धनांचें चरित्र [ निगुडकरकृत ]
( ३० ) झांशीच्या राणीचें चरित्र [ पारसनीसकृत ]
( ३१ ) पृथ्वीराज चव्हाणाचें चरित्र [ लोकहितवादीकृत ]
( ३२ ) आनंदीबाईचें चरित्र [ सौ. काशिबाई कानिटकरकृत ]
( ३३ ) विष्णुशास्त्री चिपळोणकरांचें चरित्र [ ल. कृ. चि. कृत ]

## इतिहास.

( ३४ ) भारतीय साम्राज्य [ पावगीकृत ]
( ३५ ) शिवाजी, संभाजी, राजाराम व शाहु यांच्या बखरी. [ मल्हार रामराव चिटणीसकृत ]
( ३६ ) पेशव्यांची बखर [ सोहनीकृत ]
( ३७ ) पत्रें यादी वगैरे [ साने- प्रकाशक ]
( ३८ ) ऐतिहासिक गोष्टी [ लोकहितवादी ]
( ३९ ) मराठ्यांचे पराक्रम [पारसनीसकृत ]

## कादंबऱ्या.

( ४० ) मुक्तमाला. [ हळबेकृत. ]
( ४१ ) प्रेमबंधन. [ योगीकृत. ]
( ४२ ) मोचनगड. [ गुंजीकृत ]
( ४३ ) पण लक्षांत कोण घेतो } [हरि नारायण आपटे.]
( ४४ ) आजकालच्या गोष्टी. }
( ४५ ) शिवचरित्र. [ बंगाली ' प्रभातकाल ' कादंबरीवरून सहचारिणी सभेनें प्रसिद्ध केलेलें. ]
( ४६ ) जिंजीवास [ काळेकृत. ]
( ४७ ) अरबी भाषेंतील सुरस गोष्टी. [ कृष्णशास्त्री चिळोणकर. ]

## नाटकें.

( ४८ ) थोरले माधवराव. [ रा० ब० विनायकराव कीर्तने. ]
( ४९ ) उत्तररामचरित. [ परशुरामपंततात्या गोडबोले. ]
( ५० ) शाकुंतल.
( ५१ ) सौभद्र. [ आण्णा किर्लोस्करकृत. ]
( ५२ ) मृच्छकटिक.
( ५३ ) शापसंभ्रम. [ गोविंद बल्लाळ देवल. ]
( ५४ ) गुणोत्कर्ष. [ वासुदेवशास्त्री खरेकृत. ]
[ ५५ ] बाजी देशपांडे.
[ ५६ ] तरुणीशिक्षणनाटिका. [ नारायण बापूजी कानिटकरकृत. ]
[ ५७ ] त्राटिका. [ केळकरकृत ]

## शास्त्रीयग्रंथ.

[ ५८ ] ज्योतिर्विलास.
[ ५९ ] भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास. [ शंकर बाळकृष्ण दीक्षित. ]
[ ६० ] हवा. [ प्रो० गोळेकृत. ]
[ ६१ ] पाणी. [ सरदेसाईकृत. ]

## प्रवासवृत्त.

[ ६२ ] धोममहाबळेश्वर वर्णन. [ उदासकृत. ]
[ ६२ ] महाराष्ट्रांतील किल्ले.
[ ६३ ] मलबारवर्णन [ केरळकोकिळ. ]
[ ६४ ] विलायतचा प्रवास [ पावगीकृत. ]

## निबंध.

[ ६५ ] वेदोक्त धर्मप्रकाश [ विष्णुबावा ब्रह्मचारी. ]
[ ६६ ] निबंधमाला
[ ६७ ] कविपंचक [ विष्णुशास्त्री चिपळोणकर. ]

[ ६८ ] केसरींतील निवडक निबंध.
[ ६९ ] विविध विषयसंग्रह [ आगरकरांचे लेख. ]
[ ७० ] ब्राह्मण आणि त्यांची विद्या [ गोळेकृत. ]
[ ७१ ] स्त्रीधर्मनीति [ पंडिता रमाबाई. ]
[ ७२ ] नाना आणि महादजी [ भानुकृत. ]
[ ७३ ] संसारसुख [ गाडगीळ. ]
[ ७४ ] शास्त्ररहस्य.
[ ७५ ] ग्रामसंस्था [ बोडसकृत. ]
[ ७६ ] स्वातंत्र्य [ फडकेकृत. ]
[ ७७ ] स्त्रियांची परवशता [ गोविंद वासुदेव कानिटकर. ]
[ ७८ ] बेकनचे निबंध [ वागळेकरकृत. ]
[ ७९ ] अबलोन्नति लेखमाला [ लेख ४ चिंतामणराव वैद्य. ]
[ ८० ] धनुर्धारींचीं स्वतंत्र पुस्तकें.

# ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापलेलें प्रकरण.

# वाचन.

These polished arts have humanised mankind
Softened the rude and calmed the boisterous mind.
*Addison.*

हा निबंध

**यादव शंकर वावीकर.**

यांनीं लिहिला, तो

**विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए.**

ग्रंथमालासंपादक, यांनीं

कोल्हापूर :— 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिला.

किंमत १० आणे.

**डॉक्टर जॉन पॉलेन,**

बी. ए., एल्एल्. डी., आय्. सि. एस्.

ब्यारिस्टर ॲट लॉ, मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो, कस्टम्स, मीठ,

आफीण आणि आबकारी खात्यांचे कमिशनर यांस

त्यांच्या अगाध विद्वत्तेबद्दल व एतद्देशीयांविषयीं

त्यांच्या सर्वश्रुत सहानुभूतीबद्दल, हा ग्रंथ अत्यंत

नम्रतेनें अर्पण केला असे.

ग्रंथकर्ता.

RESPECTFULLY DEDICATED

TO

# DR. POLLEN,

**B. A., LLD., I. C. S.,**

BAR.-AT-LAW, Fellow of the University of Bombay, Commissioner of Customs, Salt, Opium and Abkari as a mark of deep respect for his great learning and his well-known sympathy with the natives of India.

*By the Author.*

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
| --- | --- |
| १. ज्ञानाची महती. | १ |
| २. ज्ञानार्जनाचीं पांच साधनें. | ५ |
| ३. ग्रंथ. | १४ |
| ४. वाचनाची अभिरुचि. | २१ |
| ५. वाचावें कसें? | २८ |
| ६. प्रसिद्ध ग्रंथकार आणि त्यांचें वाचन. | ३६ |
| ७. स्मरण शक्ति व ती वाढवावी कशी. | ४१ |
| ८. वाङ्मय. | ४८ |
| ९. मराठी पुस्तकें. | ५९ |
| १०. उपसंहार. | ७६ |

# प्रस्तावना.

वाचन हा विषय फार महत्वाचा असून या विषयावर स्वतंत्र व व्यापक निबंध लिहिला असतां, तो विद्यार्थ्यांस व सामान्य वाचकांस विशेष उपयुक्त होईल असें वाटल्यावरून, प्रस्तुत निबंध लिहिला आहे. वाचनाचें महत्व केवढें आहे, हें यांत सांगितलें असून जेणेंकरून चांगलीं पुस्तकें वाचण्याची लोकांस अभिरुचि लागेल असा प्रयत्न केला आहे. लहान मुलामुलींच्याही हातीं पडला असतां हा निबंध त्यांना समजावा, ह्मणून पुस्तकाची भाषा होतां होईल तों सुलभ घातली आहे.

घोंकीव उत्तरें तोंडपाठ ह्मणून दाखवितां आलीं किंवा नुसत्या परीक्षा पास झाल्या ह्मणजे विद्या झाली असें नाहीं, तर खऱ्या विद्वत्तेची कसोटी कांहीं निराळी आहे. खरी विद्वत्ता प्राप्त होण्यास वाचनासारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. वाचनानें मन सुसंस्कृत होतें, व विपुल माहिती मिळते इतकेंच नाहीं, तर त्यायोगानें भाषाही चांगली अवगत होते. तुह्मीं कोणतीही भाषा शिका — मग ती तुमची जन्मभाषा असो किंवा कोणतीही अन्य भाषा असो—वाचनावांचून तुमची तींत चांगलीशी प्रगति व्हावयाची नाहीं. सारांश, वाचनापासून मनुष्यास उत्कृष्ट विचार उत्कृष्ट भाषेंत व्यक्त करण्याची कला साध्य होते. फार तर काय, वाचन यास विद्येचें जीवन ह्मटलें असतां अतिशयोक्ति होईल, असें आह्मांला वाटत नाहीं. हल्लींच्या शिक्षणपद्धतींत वाचनाची अभिरुचि उत्पन्न होत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. मुलांस वाचनाची आवड लहानपणीं लागली असतां, पुढें ती आपोआपच वृद्धिंगत होते. येवढ्याकरितां शिक्षकांनीं किंवा आईबापांनीं चांगलीं चांगलीं पुस्तकें मुलांच्या हातीं पडतील, अशी व्यवस्था करावी. चांगलीं पुस्तकें वाचण्याची संवय लागली ह्मणजे वाईट पुस्तकांकडे पुढें तीं ढुंकून सुद्धां पहाणार नाहींत!

येथें शिक्षकांस एक सूचना करावीशी वाटते ती ही कीं,—शाळेंतील क्रमिक पुस्तकांतील विषय मुलांकडून पाठ करवून घेऊन किंवा त्यांतील प्रश्न वारंवार विचारून त्यांना बिनचूक उत्तरें देतां आलीं, ह्मणजे शिक्-

कांची इति कर्तव्यता संपली, असा साधारण समज आहे. जो शिक्षक अशा रीतीनें मुलांकडून आभ्यास करून घेईल, व ज्याच्या हाताखालील मुलें परीक्षेंत पुष्कळ पास होतील तो शिक्षक चांगला, त्यास शिकविण्याची हातोटी चांगली साधली, असें ह्मणतात. परंतु हें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, घोकंपट्टीपलीकडे मुलांचें अध्ययन क्वचित्च जातें. इतिहास, भूगोल, कविता, अन्वयार्थ, शब्दार्थ, व्याकरण वगैरे सर्व विषय मुलांस मुखोद्गत आले ह्मणजे आभ्यास चांगला झाला असें नव्हे, तर खऱ्या आभ्यासाची, खऱ्या शिक्षणाची दिशा निराळी आहे. क्रमिक पुस्तकांतील धडे मुलांस शिकवितेवेळीं पुष्कळ माहिती सांगून तो विषय त्यांच्या मनांत चांगला ठसेल, तसेंच अभ्यास करण्यांत त्यांना आनंद व करमणूक वाटून त्यांची जिज्ञासा व विचारशक्ति वाढेल, त्यांच्याठायीं विद्येविषयीं अभिरुचि उत्पन्न होईल, अशी व्यवस्था करावी. शिक्षकांस स्वतः विद्येची व वाचनाची अभिरुचि असल्याशिवाय त्यांना शिक्षणाचें काम चांगलेंसें करतां येईल, असें आह्माला वाटत नाहीं. तसेंच शिक्षकांनीं खाजगी रीतीनें मुलांचें संमेलन करून त्यांना उत्तमोत्तम ग्रंथ समजाऊन देऊन जेणेंकरून विद्यार्थ्यांस विद्येची अभिरुचि लागेल, अशी व्यवस्था करावी. अज्ञ परंतु कोमल अशा मनास सन्मार्गास लावणें ह्यासारखें स्पृहणीय व पवित्र असें दुसरें कृत्य असेल, असें मला वाटत नाहीं. इंग्लंदांत युनिव्हर्सिटी-एक्स्टेनशन नामक वरिष्ठ शिक्षणाच्या जशा सोई आहेत, तशा इकडे झाल्यास फार चांगलें होईल व तेणेंकरून सामान्य लोकांत विद्येचा अधिक प्रसार होईल.

प्रस्तुत निबंध अगदीं स्वतंत्र असून दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाच्या आधारें लिहिला नाहीं. यांत ज्या अनेक ग्रंथांतून आधार व उतारे घेतले आहेत त्याबद्दल ग्रंथकर्ता त्या ग्रंथांच्या कर्त्यांचा फार ऋणी आहे.

हा माझा पहिल्याच प्रयत्न असून वाचकांनीं यांतील चांगला तेवढाच भाग घ्यावा आणि वाईट तेवढा टाकावा, अशी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

मुंबई, ता०<br>५।११।१९००.

ग्रंथकर्ता.

# वाचन.

## ज्ञानाची महती.

## भाग १ ला.

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते**--भगवद्गीता.

ज्ञानाचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे सुखाची प्राप्ति व दुःखाचा परिहार करणें हा असून, याचकरितां सर्व मनुष्यप्राणी जगांत एकसारखें खपत असलेले आपण पहातों. मनुष्य सुशिक्षित असो वा अशिक्षित असो; तरुण असो वा वृद्ध असो, त्यास जेवढें सुख अधिक मिळेल, तेवढें पाहिजे असतें. सुखाची व्याख्या ही निरनिराळ्या मनुष्याच्या कल्पनेप्रमाणें निरनिराळी असते. एकास अमुक एका गोष्टींत सुख वाटत असतें, तर त्याच गोष्टीविषयीं दुसरा अगदीं उदासीन असतो. इतकेंच नाहीं तर त्याला ती गोष्ट दुःखप्रद होतें. कोणास गोड खाण्यापासून, कोणास मद्यादि अमली पदार्थांच्या सेवनापासून, कोणास उत्तम वस्त्रांपासून तर कोणास अलंकारापासून सुख होत असतें. कवडी कवडीचा संचय करण्यांत कृपणास मोठी धन्यता वाटते! परंतु त्याच्या उलट परोपकारी गृहस्थाची वृत्ति असते. परोपकारार्थ आपल्या द्रव्याचा व्यय करण्यांत मोठें भूषण वाटतें. सारांश, सुखाची कल्पना ही केवळ मानसिक असून ज्या त्या मनुष्याच्या बुद्धीप्रमाणें ती आकुंचित अथवा उदात्त असते. मनुष्यास जसजसें अधिक ज्ञान होत जातें, तसतशी त्याची सुखाची कल्पना उदात्त होत जाऊन 'आत्मवत् सर्वभूतानि' या तत्त्वास अनुसरून मनुष्यमात्रास तो आपणाप्रमाणें मानूं लागतो.

मोत्यांची किंमत त्यांच्या पाण्यावर अवलंबून असते. जें मोतीं रुपया दोन रुपयास मिळतें, तेंच पाणीदार असलें कीं, त्याची किंमत दसपट वाढते! त्याचप्रमाणें मनुष्याचें आहे. मनुष्याची किंमतही त्याच्या ज्ञानावर आहे. कित्येक विद्यार्जन करून ज्ञान संपादन करीत नाहींत, यामुळें त्यांची किंमतही फारशी वाढत नाहीं. परंतु कित्येक अगाध ज्ञान मिळवून श्रेष्ठता पावतात. लोकांस त्यांचा अभिमान वाटून ते त्यांचे एकसारखे गुणानुवाद गातात. पुष्कळ लोक त्यांच्या धोरणानें वागतात; त्यांचीं भाषणें ऐकण्यास फार आतुर असतात. ते गत झाल्यास सर्व लोक दुःखानें विव्हल होतात! त्यांचीं स्मारकें करितात. परंतु दुसरे कित्येक लोक—अशांची संख्या हजारांनीं किंवा लाखांनीं असावयाची—केव्हां जन्मतात, कोठें रहातात, व केव्हां मरतात, याची कधीं कोणी विचारपूससुद्धां करीत नाहीं! याचें कारण हेंच कीं, नुसत्या मनुष्याची मुळींच किंमत नसून त्याच्या ज्ञानाची किंमत असते पशुकोटींत गोंवतां येतील इतके कित्येक लोक ज्ञानशून्य असतात व कित्येक देवकोटींत शोभतील येवढी त्यांची योग्यता असते. कित्येक ज्ञानपर्वताच्या शिखरीं पोहोंचतात व कित्येक अज्ञानांधकारांत तसेच लोळत पडतात.

एका संस्कृत कवीनें मनुष्य व पशु यांची तुलना केली आहे. तो ह्मणतोः——

> आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ।
> धर्मो हि तेषामधिको विशेषो ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ॥

आहार, निद्रा इत्यादि विकार जसे मनुष्यास असतात तसेच पशूंसहि असतात. पशूंपेक्षां मनुष्यास ज्ञानच कायतें अधिक असतें. पशुपक्ष्यांना परमेश्वरानें उपजत बुद्धि दिली आहे. तिच्या योगानें त्यांना आपणापुरतें ज्ञान असतें. आहार, निद्रा, भय इत्यादि विकार त्यांना कळत असून ते तेवढ्यापुरती तरतूद करितात. परंतु त्यापलीकडे त्यांना ज्ञान नसतें. जग हें काय आहे; त्यांतील वस्तुसंग्रह किती उपयुक्त

आहेत; ज्ञानभांडार केवढें प्रचंड आहे; मागल्या काळचे लोक कसे होते; वगैरे गोष्टींचें त्यांना मुळींच ज्ञान होत नाहीं. परंतु परमेश्वरानें मनुष्याच्या ठिकाणीं जी बुद्धि ठेविली आहे, तिच्या योगानें त्यास वरील गोष्टी समजतात इतकेंच नाहीं, तर यांहीपेक्षां अज्ञात अशा अनेक गोष्टींचें ज्ञान करून घेतां येतें. परमेश्वराच्या खालोखाल मनुष्याची योग्यता मानली जात आहे, त्याचें कारण फक्त त्याची बुद्धिच होय.

ज्ञान हें विद्याध्ययनापासून मिळतें व विद्याध्ययनापासून जे अनेक फायदे होतात ते लॉर्ड बेकन यानें फार उत्तम रीतीनें सांगितले आहेत. तो ह्मणतो विद्याध्ययनापासून मनाला आनंद होतो, भाषणाला शोभा येते व बुद्धिही वाढते. एकांतवासांत व निवांतस्थळीं असतां मनाची करमणूक करण्याला विद्या हेंच मुख्य साधन होय. आपलें संभाषण खुलवून देण्याला विद्या ही फार उपयोगी पडते. तसेंच एकाद्या कामाचा विचार करून त्याची जेथल्यातेथें व्यवस्था करितां येण्याला फार उपयोग होतो.

विद्याध्ययनानें स्वाभाविक गुण पक्क होतात आणि अनुभवानें विद्याध्ययन पक्क होतें. कारण आंगची बुद्धि ही आपोआप उगवलेल्या झाडांप्रमाणें आहे. त्या झाडाची खची केल्यानें तें जसें जोमदार होतें, तसें आंगच्या बुद्धीवर विद्येनें कलम केल्यानें तीही बळकट होते. कावेबाज लोक विद्येचा धिक्कार करितात; साधेभोळे लोक तिचें कौतुक मानतात व शहाणे लोक तिचा उपयोग करितात."

सोनें जमिनींत मातींत सांपडतें. परंतु तें शोधून काढण्यास पुष्कळ परिश्रम करावे लागत असून खर्चही बराच येतो. जमीन जरी चांगली सुपीक असली, तरी तींत चांगलें पीक येण्यास तिची पुष्कळ मशागत केली पाहिजे, तरच तिचा उपयोग होतो. नुसता छानदार संगमरवरी दगड असून पुतळा बनत नाहीं. तर पुतळा बनविण्यास तो दगड मोठ्या कुशलतेनें कोरून काढला पाहिजे. त्याचप्रमाणें नुसती बुद्धि उत्तम असली तरी तिचा काय उपयोग? तिजवर विद्येचा

संस्कार झाला तरच ज्ञान प्राप्त होतें. ज्ञान हें एकदम मिळत नाहीं. मधमाशी ज्याप्रमाणें महत्प्रयासानें मध गोळा करिते, त्याप्रमाणें तें थोड-थोडें संपादन करीत गेलें पाहिजे. तें एक दोन दिवसांत मिळत नसतें, तर तें मिळविण्यास तपेंच्या तपें घालवावीं लागतात. ज्याचें ज्ञान त्याला; त्याची अदलाबदल करितां येत नाहीं. तसेंच स्वतः परिश्रम केल्याखेरीज तें कधींही मिळत नाहीं. अशी स्थिति आहे, ह्मणूनच ज्ञानाची किंमत विशेष आहे. व त्याकरितां मनुष्यें येवढी खटपट करीत आहेत.

सिंह, व्याघ्र, इत्यादि हिंस्त्र पशूंस मनुष्यानें अगदीं अंकित करून टाकिलें आहे. हत्ती, घोडे, उंट, इत्यादि पशूंस तो गुलामाप्रमाणें राबऊन घेत आहे. जमिनीची लागवड करून तींतून आपल्या चरितार्थाकरितां धान्य निर्माण करीत आहे. खाणींतून मौल्यवान् धातु, दगड इत्यादि अनेक पदार्थ काढून तो आपल्या गरजा भागवीत आहे. तसेंच हिरे, माणकें इत्यादि रत्नें काढून तो आपलें शरीर सुशोभित करीत आहे. ग्रंथ लिहून क्षणार्धांत नष्ट होणारे विचार अमर करून टाकीत आहे. वायु, प्रकाश, ध्वनि या तत्वांपासूनसुद्धां तो काम करून घेत आहे. विद्युत्, वाफ, इत्यादि शक्ति शोधून काढून त्यांच्या साहाय्यानें अनेक उपयुक्त कामें करून घेत आहे. आकाशाच्या पोकळींत पृथ्वीच्या पाठी-वर किंवा पोटांत काय आहे, याविषयीं त्यानें बरीच माहिती मिळविली आहे. या व इतर अनेक गोष्टी त्यास साध्य झाल्या आहेत, याचें मुख्य कारण काय ?—तर ज्ञान.

# भाग २ रा.

## ज्ञानार्जनाचीं पांच साधनें.

ज्ञान मिळविण्याचीं एकंदर पांच साधनें असून त्यांपैकींच वाचन हें एक होय. वाचनाविषयीं लिहावयाचें ह्मटलें ह्मणजे तदितर जीं ज्ञानार्जनाचीं चार साधनें आहेत, त्यांविषयीं प्रथम थोडेंसें सांगणें अवश्य आहे. ह्मणजे 'वाचन' हें किती सुलभ व उत्तम साधन आहे, हें वाचकांस सहज कळून येईल. शिवाय एकाच वेळीं दुसऱ्या सर्व साधनांचा नेहमीं उपयोग करून घेत गेल्यानें वाचकांचा विशेष फायदा होईल. —[ १ ] अवलोकन, [ २ ] संवाद, [ ३ ] वाचन, [ ४ ] भाषण आणि [ ५ ] मनन हीं पांच ज्ञानार्जनाचीं साधनें आहेत.

**अवलोकन**—आपण स्वतःविषयीं, दुसऱ्याविषयीं किंवा जगांतील कोणत्याही गोष्टीविषयीं जें मनःपूर्वक व बारीक रीतीनें निरीक्षण करतों, त्यास अवलोकन असें ह्मणतात. अवलोकन करण्याची संवय सर्वांस असते असें नाहीं. सर्व मनुष्यें रात्रंदिवस एकसारखे कांहीं तरी व्यवहार करीत असतात. परंतु आपण काय करीत आहों, कशाकरितां करीत आहों, त्यापासून काय परिणाम होईल, हें असेंच कां करावें, किंवा कां करूं नये, असे अनेक प्रश्न मनांत आणून आपल्या डोळ्यापुढें ज्या गोष्टी घडत आहेत, त्यांकडे विचारपूर्वक व शोधक दृष्टीनें पहाणारे असे फारच थोडे लोक असतात. पुष्कळ लोक डोळ्यांनीं पहातात; परंतु पहाण्यापलीकडे ते मुळींच विचार करीत नाहींत. अशा लोकांस अंतर्दृष्टि ह्मणजे काय हें जन्मांतही कळत नाहीं. बाह्यदृष्टीपेक्षां अंतर्दृष्टीची किंमत विशेष असून ती अवलोकनापासून प्राप्त होते. मोठे मोठे कवि, ग्रंथकार, मुत्सद्दी, तत्वज्ञानी, धर्मसंस्थापक

यांना अंतर्दृष्टि विशेष असते; आणि ह्मणूनच सामान्य जनांवर त्यांचें विशेष तेज पडतें.

सृष्टि ही शिक्षणाची मोठी शाळा आहे. या शाळेंत मनुष्यास जें शिक्षण मिळतें, तें प्रत्यक्ष व अनुभविक असून मोठमोठ्या पाठशाळेंत मिळालेलें शिक्षण त्यापुढें रद्द आहे. अवलोकनास आद्यस्थान द्यावयाचें; याचें कारण हें कीं, प्रत्यक्ष वस्तु पाहून व स्वत: विचार करून मनुष्य येथें ज्ञान संपादन करतो. तें मिळविण्यांत स्वत: परिश्रम केल्यानें त्याची बुद्धि तीव्र होते व त्याला विचार करण्याची हळूहळू संवय लागते. दुसऱ्यांचें उच्छिष्ट ज्ञान संपादन करण्यांत बुद्धीस फारसें घर्षण पडत नसल्यामुळें ती फारशी विकास पावत नाहीं. अवलोकन हें सर्व काळीं व सर्व स्थळीं करितां येण्यासारखें असल्यामुळें त्यापासून सहज पुष्कळ ज्ञानप्राप्ति करून घेतां येते.

अवलोकनाची संवय लहानपणापासून लाविली ह्मणजे पुढें ती आपोआप वृद्धिंगत होते. मुलें लहानपणीं फार जिज्ञासु असतात. कोणतीही गोष्ट पाहिली किंवा ऐकिली ह्मणजे तीं तिजविषयीं साहजिक अनेक प्रश्न विचारतात. अशा वेळीं त्यांच्या शोधक बुद्धीस योग्य वळण देऊन त्यांस अवलोकनाची संवय लावावी. अवलोकनाची संवय लागली ह्मणजे जगांतील सर्व ज्ञानभांडार खुलें झालें असें समजावें. कवि किंवा कादंबरीकार हे ज्या गोष्टी पहातात, त्यांपासून ते साधारण मनुष्यापेक्षां अधिक ज्ञान संपादन करून घेतात. आणि त्याचमुळें त्यांचे ग्रंथ एवढे हृदयंगम होतात. आंग्ल कविवर्य शेक्सपियर यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "अवलोकनशक्ति ही एक दिव्यदृष्टि आहे. ती ज्याला असेल त्याला दगडाधोंड्यांत, झाडापाल्यांत, प्रत्येक वस्तूमध्यें, कांहीं कांहीं—दुसऱ्याला दिसत नाहीं, ऐकूं येत नाहीं, किंवा समजत नाहीं, असें—दिसतें". पण तें कोणाला जो अवलोकन करील त्याला. ज्याला अवलोकन ह्मणजे काय हें जन्मांतही ठाऊक नाहीं, अशाला मोठ्या पदार्थसंग्रहालयांत जरी नेऊन ठेविलें, तरी तो बापडा तेथें काय अधिक शिकणार आहे!

झाडावरून फळें पडतांना पूर्वी अनेक लोकांनीं पाहिलीं. परंतु त्यांत कोणासही विशेषसें वाटलें नाहीं. परंतु असेंच फळ पडतांना न्यूटन यानें पाहिलें, तेव्हां त्यानें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला! चुलीवर पदार्थ शिजत असतांना वाफेनें भांड्यावरील झांकण हालतें, ही गोष्ट दररोज पुष्कळांच्या पहाण्यांत आली होती. परंतु त्यावरून वाफेच्या यंत्राचा शोध लाऊन मनुष्यांच्या सुखांत भर घालण्याचें श्रेय जेम्स वॉट यानें घेतलें. गाईच्या अंचळावरील देवी पाहून डाक्टर जेनर यानें गोस्तन देवीचा शोध लाविला! अशा रीतीनें लहानसहान गोष्टीवरून मोठमोठे शोध लागले, हें कशाचें फळ? अर्थात् अवलोकनाचें!

२. **संवाद**—ज्ञानानें जे आपल्या बरोबरीचे किंवा आपल्यापेक्षां श्रेष्ठ असतात, अशा लोकांशीं एकाद्या विषयावर बोललें असतांना दोन फायदे होतात. [ १ ] आपलीं मतें चुकीचीं आहेत किंवा बरोबर आहेत, हें कसोटीस लाऊन पहातां येतें. [ २ ] आणि आपणांस अधिक ज्ञान प्राप्त होतें. आमच्या प्राचीन ग्रंथांत ठिकठिकाणीं गुरूचें विशेष वर्णन लिहिलेलें आढळून येतें. गुरु हे जिवंत विचारांचें भांडार होत. विद्यार्थ्यांची ग्राहकशक्ति पाहून किंवा त्यांच्या विचारांची मजल कोठवर जात आहे, हें पाहून ते उपदेश करतात. मनुष्यमात्रांस अगदीं एकाच लांबीरुंदीचे कपडे घालूं ह्मटल्यास तें ह्मणणें अगदीं हास्यास्पद होईल इतकेंच नाहीं, तर तसें करणेंही अशक्य होईल. त्याचप्रमाणें सद्बोधाचें आहे. मनुष्याचा अधिकार पाहून त्याप्रमाणें त्यास बोध केला पाहिजे. पाठ सांगतेवेळीं गुरु प्रथम आपल्या शिष्याच्या शंकांचें समाधान करतो, व नंतर त्यास पाठ चांगल्या रीतीनें समजाऊन सांगतो. यामुळें विद्यार्थ्यांचें शिक्षण अगदीं पायाशुद्ध होतें. लहानपणीं गुरुमुखाची फार आवश्यकता असते. गुरुमुखाशिवाय कोणत्याही विषयांत प्रवेश होणें अगदीं अशक्य होय.

प्राचीनकाळीं गुरूस अतिशय मान मिळत असे. याचें कारण हें कीं, पूर्वी ग्रंथ फार दुर्मिळ असल्यामुळें विद्वान् लोकांस ते पाठ करावे

लागत असत. हल्लीं प्रमाणें तेव्हां ग्रंथलेखनाची प्रवृत्ति नसल्यामुळें नवीन सुचलेले विचार विद्वान् लोक तोंडींच एकमेकांस कळवीत असत. अशा रीतीनें सर्व ज्ञानभांडार तोंडींच असल्यामुळें तें शिकण्यास गुरूचीच आवश्यकता असून गुरुशिष्यपरंपरेनें तें अस्तित्वांत रहात असे. उदाहरणार्थ, वेद हे जगांतील आद्य धर्मग्रंथ असून ते आज शेकडों वर्षें केवळ ब्राह्मणांच्या * जिव्हाग्रीं होते. गुरुशिष्यपरंपरेमुळेंच ते अस्तित्वांत राहिले आहेत. उपनिषद् ग्रंथ गुरुशिष्यसंवादरूपानें लिहिलेले आहेत. ग्रीक तत्ववेत्ता साक्रेटीस हा संवादरूपानें आपल्या शिष्यवर्गास बोध करीत असे. यावरून गुरुशिष्यसंवादाचें पूर्वी केवढें महत्व होतें याची साक्ष आज सहज पटत आहे.

अलीकडे छापण्याची कला निघाल्यापासून ग्रंथांची समृद्धि झाली असून गोरगरिबांससुद्धां ग्रंथ सुलभ झाले आहेत. परंतु त्यामुळें आतां गुरुमुखाची गरज राहिली नाहीं, असें नाहीं. विद्यार्थ्यास शंका आली कीं, तिची निवृत्ति करण्यास गुरूची आवश्यकता आहेच. एखाद्या किर्र झाडींच्या भयाण जंगलांतून आपणास प्रवास करणें असून कांहीं वेळपर्यंत वाट चालल्यावर आपण भांबावलों आणि कोणीकडे जावें हें आपणास सुचेनासें झालें, ह्मणजे आपली काय स्थिति होईल? अशा वेळीं आपणास जर कोणी वाटाड्या भेटला आणि त्यानें उत्तम व सुलभ मार्गानें आपणास त्या जंगलांतून बाहेर काढिलें, तर आपणास केवढा आनंद होईल बरें! त्या वाटाड्याचे उपकार आपण कधींही विसरणार नाहीं! तद्वत्च गुरूचें होय. ते जगांतील खाचखळगे वगैरे अनेक अडचणी आपणास दाखवितात आणि आपणास सन्मार्गास लावतात.

जे आपले समवयस्क व सहाध्यायी सुहृद् असतील, त्याशीं वादविवाद केल्यानें कधींकधीं आपली शंकानिवृत्ति होऊन आपणास त्यांच्या ज्ञानाचा लाभ होतो. त्यांचे विचार आपणास कळतात व त्यांनाही

---

* यामुळेंच ब्राह्मणांस वेदमूर्ति ह्मणण्याचा प्रघात पडला असावा असें दिसतें.

आपल्या ज्ञानाचा फायदा मिळतो. आपले विचार नेहमीं खरे आणि बरोबरच असतात असें नाहीं. मित्रांबरोबर त्याविषयीं ऊहापोह केल्यानें त्या विचारांत सत्य भाग किती आणि असत्य किती, हें तेव्हांच कळून येतें. 'वादे वादे जायते तत्वबोधः' ही ह्मण सर्वत्र प्रसिद्ध आहे.

अवलोकनांत किंवा ग्रंथवाचनांत आपणास ज्या शंका येतात, त्यांचें निरसन गुरूशीं किंवा मित्रांशीं संवाद केल्यानें तेव्हांच होतें. कोणत्याहि विषयासंबंधानें आपण विचार करीत असतांना आपणांस अनेक शंका येतात व आपलें मन अगदीं गोंधळून जातें. एखाद्या प्रचंड खडकाप्रमाणें त्या आपणांस दुर्गम वाटून आपले सर्व विचार ठिकच्याठिकाणीं लुटपुटतात. आपली मति कुंठित होते. अशा स्थितींत आपणापेक्षां ज्ञानानें जो श्रेष्ठ अशा मनुष्याजवळ जाऊन त्यास आपले विचार कळवून त्याजकडून संशयनिवृत्ति करून घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. याकरितां संवादाचें महत्व विशेष आहे.

**वाचन:**—गुरूचा समागम होऊन त्याशीं संवाद करण्यास सर्वांस मिळतें असें नाहीं. आणि कदाचित् असा दुर्मिळ योग घडून आला तरी तो फार दिवस टिकत नाहीं. दैववशात् आपणांस चांगले व हुषार मित्र मिळाले तरी आपली व त्यांची मैत्री नेहमीं कायम राहील, ते व आपण निरंतर एके ठिकाणींच राहूं, असें कोणीही सांगूं शकणार नाहीं. जशी स्थिति प्राप्त होईल त्याप्रमाणें मनुष्यास रहाणें भाग पडतें. याकरितां सर्व स्थळीं व सर्व प्रसंगीं उपयोगीं पडणारें असें ज्ञानाचें उत्तम साधन ह्मटलें ह्मणजे वाचन होय. मनुष्य श्रीमंत असो वा दरिद्री असो, तो राजवाड्यांत राहो किंवा भिकारड्या झोंपड्यांत राहो, त्यास मित्र असोत किंवा नसोत, तो आपल्या वैभवशिखरीं असो किंवा दुःखानें त्याचें काळीज होरपळून गेलें असो, त्यास वाचनासारखें मनोरंजक आणि ज्ञानप्राप्तीचें सुलभ असें दुसरें साधन नाहीं.

ज्या गांवांत आपण रहात असूं, तेथील विद्वान् लोकांशीं परिचय करून त्यांपासून आपणांस ज्ञान संपादन करून घेतां येईल. परंतु

त्या गांवाशिवाय अन्य गांवीं व अन्य देशीं जे विद्वान् लोक रहात असतील त्यांचा व आपला परिचय कसा होणार? तसेंच आपले चार पांच मित्र खेरीज करून इतरांशीं वादविवाद करण्यास आपणास कसें सांपडणार? परंतु वाचनाच्या योगानें आपणास दूर दूरच्या लोकांशीं, आधुनिक व प्राचीन विद्वान् मंडळीशीं सहज परिचय करून घेतां येतो.

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका ह्या देशांतील, तसेंच आपल्या देशांत दूर प्रदेशीं रहाणाऱ्या ज्ञानसंपन्न मनुष्यांच्या ज्ञानाचा फायदा आपणांस बसल्या ठिकाणीं करून घेतां येतो. त्याकरितां आपणांस फिरावें लागत नाहीं किंवा देशान्तर करावें लागत नाहीं. तसेंच जे विद्वान् लोक जगांत पूर्वकाळीं होऊन गेले व विचाररूपानेंच आज जगांत हयात आहेत, अशा लोकांच्या ज्ञानाचा फायदा आपणास वाचनाच्या योगानें सहज करून घेतां येतो. होमर, व्हर्जिल, शेक्स्पियर कालिदास या अलौकिकबुद्धीच्या पुरुषश्रेष्ठांस हें जग सोडून कित्येक शतकें झालीं. त्यांचीं मृतशरीरें मातीशीं मिळून गेलीं, तरी ते विचाररूपानें जिवंत असून आपणांबरोबर बोलण्यास, हंसण्यास, आपणांस उपदेश करण्यास सदा तयार आहेत. त्यांनीं आपले उत्तमोत्तम विचार आपल्या ग्रंथांत लिहून ठेविले आहेत. मात्र आपण त्यांचे ग्रंथ वाचले ह्मणजे झालें.

पूर्वी ग्रंथ फार दुर्मिळ असत. मोठमोठ्या संग्रहालयांतही दोनशें अडीचशेंपेक्षां क्वचित्च अधिक ग्रंथ असत. सर्व ग्रंथ हातानें लिहून काढावे लागत असल्यामुळें, ग्रंथ पहाण्यासमुद्धां मिळत नसत, आणि या करितां ते समग्र पाठ करावे लागत असत. अशी स्थिति असल्यामुळें गुरुमुख व संवाद हीं त्या काळीं ज्ञान मिळविण्याचीं मुख्य दोन साधनें असून त्यांची योग्यता सर्वत्र विशेष समजली जात असे; परंतु गाटेनबर्ग यांनें छापण्याच्या कलेचा शोध लाविल्यापासून पूर्वीची सर्व स्थिति बदलली. जे ग्रंथ पूर्वी पहाण्यासमुद्धां मिळत नसत, ते अति स्वल्प किंमतींत सर्वांस मिळूं लागले. नवीन ग्रंथ छापून भराभर निघूं लागले. यामुळें वाचनाची अभिरुचि वाढून वाचन हें ज्ञानप्राप्त करून घेण्याचें

मुख्य साधन झालें. ज्ञानसंपन्न लोकांत वाचनाची अभिरुचि वाढली. वाचन हा विषय फार मोठा असल्यामुळें व याच विषयाचें या निबंधांत विवेचन करावयाचें असल्यामुळें, पुढें या विषयांतर्गत सर्व गोष्टींचें यथानुक्रमें विवेचन होईल. प्रस्तुत आपणास ज्ञानाचें जें चवथें साधन 'भाषण' त्याकडे वळलें पाहिजे.

**भाषण** अथवा **व्याख्यानः**--एकच मनुष्य ह्मणेल कीं, मी वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, पश्वादिप्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रें शिकेन तर तें त्याचें ह्मणणें अगदीं वेडेपणाचें होईल. जगांतील ज्ञानसंचय इतका वाढला आहे कीं, फक्त एकच शास्त्र घेऊन त्याचा अभ्यास करण्यास वर्षानुवर्षें घालवावीं लागतात, तेव्हां कोठें त्या शास्त्रांत प्रवीणता प्राप्त होते. नंतर पुढें त्या शास्त्रासंबंधीं नवीन ग्रंथ लिहिण्याइतकी किंवा नवीन शोध करण्याइतकी विद्वत्ता अंगीं येते. असे जे ज्ञानसंपन्न लोक असतात, ते आपल्या आवडत्या विषयासंबंधानें व्याख्यानें देतात. * त्या शास्त्रासंबंधानें प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारांची मतें चुकीचीं दिल्यास किंवा त्या शास्त्राविषयीं नवीन शोध लाविले असल्यास ते जनसमूहापुढें मांडण्यास भाषणासारखें दुसरें उत्तम साधन साधन नाहीं. कधींकधीं अशा भाषणास उत्तरादाखल दुसरीं भाषणें होतात. आणि मग वर्तमानपत्रांत वादविवाद चालू होऊन कांहीं काळानें सत्य तेवढ्या गोष्टी लोकांस कळतात.

कोणताही एकादा विषय घेऊन त्यावर कांहीं लोक आपल्या मंडळीमध्यें व्याख्यानें देतात. लहान लहान व उपयुक्त विषय घेऊन शिक्षक विद्यार्थ्यांस भाषणद्वारा त्या विषयासंबंधीं माहिती करून देतात. धर्मोपदेशक भाषणद्वारा धर्मोपदेश करितात. कोणी एखादें सुरम्य स्थळ पाहिलें असतां किंवा कोणी अन्य देशांत जाऊन तिकडील लोकांच्या

---

V * आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वांटणें ।
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ।
तैसें ज्ञांनीं तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जगासी सांगावें ।
तरतें बुडों न द्यावें । बुडत यासी ।

रामदास.

चालीरीती पाहून आला असतां त्या मनुष्याचीं व्याख्यानें होतात व त्यापासून श्रोतृवृंदास अनायासें पुष्कळ माहिती मिळते. भाषणाची प्रवृत्ति जरी पूर्वापार चालत आली आहे, तरी अलीकडे तिला बरेंच प्रोत्साहन मिळालें आहे. भाषणाच्या शेवटीं व्याख्यात्यास प्रश्न विचारण्याची चाल पाश्चात्य देशांत आहे. तीपासून विशेष फायदा होतो. कारण, श्रोतृसमाजापैकीं कोणास कांहीं शंका असल्यास अथवा व्याख्यात्यापासून कोणास कांहीं विशेष माहिती पाहिजे असल्यास, ती त्यास तेव्हांच सहज मिळवितां येते.

जनसमूहाच्या मनांत कोणतीही गोष्ट भरवून देण्यास व तीसंबंधानें लोकांत चळवळ सुरू करण्यास व्याख्यानासारखें अन्य साधन नाहीं. डिमॉस्थेनिस व सिसरो या प्राचीन गृहस्थांनीं आपल्या अलौकिक वाणीनें ग्रीक व रोमन राष्ट्रांस अगदीं हालवून सोडलें. लोकांस जागृत करून त्यांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न केली. हिंदुस्थानचा पहिला गव्हरनर जनरल वारन हेस्टिंग्स याची पार्लमेंट सभेंत चौकशी चालू असतांना एडमंड बर्क यानें जें अस्खलित व आवेशयुक्त भाषण केलें तें ऐकून खुद्द वारन हेस्टिंग्स याच्या डोळ्यांत अश्रुबिंदु आले! सर्व सभा अगदीं थक्क झाली, व बर्क सांगतो तें शब्दशः खरें आहे, असें सर्वांस वाटलें. केवढा हा भाषणाचा प्रताप! फ्रान्स देशांत राज्यक्रांति होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हां सर्व युरोपखंडांत विद्वान् व राज्यधोरणी मंडळांत मोठी चर्चा होऊन विलक्षण चळवळ झाली. ती बर्क यास न आवडून तिच्या विरुद्ध त्यानें पार्लमेंटांत मोठ्या आवेशाचीं भाषणें केलीं परंतु भाषणाचा प्रभाव नियमित स्थळीं व नियमित प्रेक्षकांवरच कायतो पडणार व तो त्या प्रसंगाच्या मानानें अगदीं अल्प आहे, असें त्यास कळून आलें, तेव्हां त्यानें लागलेंच कलम उचललें व असा उत्कृष्ट निबंध लिहिला कीं, त्याचा प्रसार सर्व युरोपखंडभर होऊन तेणेंकरून राज्यक्रांतीची लाट जी सर्व राष्ट्रांवर लवकरच उसळणार होती, ती ठिकच्याठिकाणीं नाहींशी झाली नाहीं तरी तिचा जोर कमी झाला. यावरून वक्तृत्वापेक्षां प्रसंगविशेषीं लेखनाचा प्रभाव फार मोठा आहे हें उघड आहे.

**मनन** :—पचनशक्तिच जर अंगांत नाहीं तर पौष्टिक पदार्थ खाण्यापासून काय उपयोग? ती अंगीं असली ह्मणजे पौष्टिक पदार्थ पचवून त्यांतील सत्व आपलेंसें करून टाकतां येतें. तसेंच दुसऱ्यांचे विचार आपलेसे करून टाकण्यास ते अगोदर ऐकिले पाहिजेत, किंवा वाचले पाहिजेत; नंतर त्यांविषयीं मनन केलें पाहिजे, ह्मणजे ते विचार अगदीं आपलेसे होतात. नुसतें अवलोकन करून, वाचून, व्याख्यानें ऐकून किंवा वादविवाद करून कधींही भागावयाचें नाहीं. तीं ध्यानांत राहण्यास किंवा त्यांतील सत्यासत्य समजण्यास आपणास त्यांविषयीं विचार केला पाहिजे; तरच तीं आपल्या मनांत उतरतील, ध्यानांत राहतील. नाहींतर हजारों व्याख्यानें ऐकिलीं किंवा भारेच्याभारे पुस्तकें वाचलीं तरी त्यांपासून काडीएवढाही उपयोग होणार नाहीं. कोणत्याही गोष्टींचा आपण जोंपर्यंत विचार करीत नाहीं, तोपर्यंत त्या आपणास कळत नाहींत. परंतु एकदां विचार करूं लागलों कीं, त्या गोष्टी सहज कळून येतात. तसेंच ज्या गोष्टी दुर्बोध वाटून आपले विचार कुंठित होतात त्यांचाही विचाराच्या साहाय्यानें उलगडा होतो. बैलाची मान, घोड्याची छाती, लोहाराचा हात, तालीमबाजाचें शरीर, हीं सहवासानें अथवा संवयीनें जशीं घट्ट होतात, तशी विचार करून करून विचारशक्ति वृद्धिंगत होते.

जगांत अनेक धर्म, अनेक पंथ, अनेक मतें प्रचलित आहेत. तसेंच सत्य आणि असत्य यांची अगदीं मिसळ झाली आहे. त्यांतून आपणास सत्य शोधून काढून सत्यावलंबन करावयाचें आहे. तरी आपणांस आपली विचारशक्ति वाढविली पाहिजे. विचारशक्ति ही ज्ञानज्योति असून इच्या साहाय्यानें सत्य काय, असत्य काय, हें आपणांस कळूं लागतें. अवलोकन करण्यांत, वाचनांत, किंवा वादविवाद करण्यांत आपण जेवढा वेळ घालवितों, तेवढाच वेळ आपण त्या गोष्टींचें मनन करण्यांत घालविण्याचा क्रम ठेविला, तर जें ज्ञान किंवा जो अनुभव मिळण्यास इतरांस वर्षेंच्यावर्षें लागतात, तें आपणांस फारच थोड्या काळांत साध्य करून घेतां येईल.

---

# भाग ३ रा.

## ग्रंथ.

जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥
जेणें होय उपरती । अवगुण अवघे पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥

रामदास.

प्रसिद्ध रोमन वक्ता सिसरो यानें लेखनकलेविषयीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, 'लेखनकला जर नसती तर मूळारंभीं जी जगाची स्थिति होती तिजपेक्षां पुढें पाऊल पडतें ना.' हें त्याचें ह्मणणें शब्दशः खरें आहे. अमेरिकेंतील तांबडे इंडियन, आफ्रिकेंतील झुलु किंवा आस्ट्रेलियांतील मोराई ह्या लोकांकडे पाहिलें आणि त्यांच्या स्थितीविषयीं विचार केला तर सिसरोचें हें ह्मणणें अगदीं खरें आहे, असें आपल्या पूर्ण अनुभवास येतें. आज एकुणविसावें शतक संपलें आहे, तरी त्यांची स्थिति अगदीं पहिल्याप्रमाणें आहे. आगगाड्या, तारायंत्रें, मुद्रणकला वगैरे अनेक शोध लागल्यामुळें जगाची उन्नति झपाट्यानें होत आहे. पूर्वीं राजवाड्यांतसुद्धां ज्या वस्तु क्वचित् पहाण्यास मिळत असत त्या यंत्राच्या साहाय्यानें अति स्वस्त झाल्यामुळें झोंपडींत सुद्धां आतां दृष्टीस पडूं लागल्या आहेत. जे ग्रंथ पूर्वीं महान् पंडितांसही पहाण्यास मिळत नव्हते, ते आतां स्वल्प किंमतींत मिळूं लागल्यामुळें गोरगरीबांस सुद्धां संग्रहीं ठेवितां येतात. अशीं सुखवृद्धीचीं अनेक साधनें प्राप्त झालीं असून झुलु किंवा मोराई लोक हे रानटी स्थितींत कां? शिकार करून भक्ष्य मिळवावें, आणि गवताची झोंपडी बांधून तींत रहावें, या पलीकडे त्यांना फारसें कां समजूं नये? याचें मुख्य कारण हें कीं, त्यांच्यांत लेखनकला नाहीं. मनुष्याच्या उत्कर्षाची किंवा उन्नतीची सर्व इमारत लेखनकलेवर उभारलेली आहे.

विचार हे आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें चंचल व क्षणिक असतात. ते उद्भवतात आणि क्षणार्धांत नाहींसे होतात ते उद्भवले ह्मणजे त्यांजविषयीं विचार करून आपला अनुभव, ज्ञान व अवलोकन यांत त्यांना गोंवून टाकिलें, तरच ते कांहीं काळ टिकतात. परंतु असें केल्यानेंही ते फारसे टिकण्याचा संभव नाहीं. कारण ज्या मनुष्याच्या डोक्यांत ते असतील त्याचा अंत झाला कीं, त्याबरोबर तेही नष्ट होतात. लेखनकलेच्या योगानें विचारांस स्थिरत्व देतां येतें व ते अमर करितां येतात. लेखनकला नसती तर आपण होमर, व्हर्जिल, प्लेटो, सिसरो इत्यादि ग्रीक व रोमन विद्वद्रत्नांच्या; व्यास, वाल्मीकि, कालिदास, रामदास, तुकाराम या आर्य कविवर्यांच्या; तसेंच शेक्स्पियर, मिल्टन, टेनिसन या आंग्ल कविश्रेष्ठांच्या सुरस, उत्तमोत्तम व मोलवान विचारांस मुकलों असतों. त्या अलौकिक पुरुषांचीं मृण्मय शरीरें जरी नष्ट जाहालीं आहेत, तरी ते विचाररूपानें जगांत अस्तित्वांत आहेत.* फार प्राचीन काळीं फिनिशियन्, आसिरियन् आणि इजिप्शियन् हे लोक बरेच सुधारलेले असून त्यांनीं अनेक नवीन नवीन शोध लाविले होते. परंतु त्या लोकांचे इतिहास लिहिले नसल्या कारणानें त्यांजविषयींचें बहुतेक ज्ञान नष्ट झालें असून, ते लोक जगांत होते किंवा नव्हते, याचा मागमूसही राहिला नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.

लॉर्ड बेकन यानें ग्रंथाची जहाजांशीं तुलना केली आहे. नौकांच्या साहाय्यानें जसा या देशांतला माल त्या देशांत आणि त्या देशांतला या देशांत आणतां येतो, तद्वत् या ग्रंथनौकांच्या साहाय्यानें अन्य देशांतील ज्ञानभांडार आपल्या देशांत आणून आपल्या देशबांधवांस ज्ञानसंपन्न

---

*एका आंग्ल कवीनें ह्मटलें आहे :---

'Tis said that memory is age,
and that though dead, men are alive.
Removed from sorrow, care and strife,
They live because their works survive.

करितां येतें. इंग्लिश लोकांनीं या ग्रंथनौकांच्या साहाय्यानें आपल्या देशाच्या किनाऱ्यावर अगणित ज्ञान भांडार उतरून घेतलें व त्याचा आपल्या देशबांधवांस पूर्ण लाभ होईल अशा अनेक सोई केल्या. दुसरीं राष्ट्रेंहीं याच कामीं गुंतलेलीं आहेत. जगांत आमचें पाऊल पुढें पडावें अशी जर आमची मनापासून इच्छा असेल, तर विचाररूपी मालानें भरलेल्या या ग्रंथनौका आह्मीं आपल्या देशांत आणून त्यांतील ज्ञानभांडार आपल्या देशबांधवांस वांटलें पाहिजे.

गुरूची योग्यता सर्व देशांत विशेष मानितात. आह्मीं ह्मणतों ग्रंथ हे आपणांस गुरुस्थानीं होत. सॉक्रेटीस, प्लेटो, मार्कस ऑरालियस यांसारखे तत्वज्ञानी, गौतमबुद्ध, शंकराचार्य, येशूख्रिस्त आणि महंमद यांसारखे धर्मसंस्थापक तसेंच व्यास, वाल्मीकि, शेक्सपियर, मिल्टन यांसारखे कविवर्य यांनीं ज्या कामीं आपलें सर्व आयुष्य वेचलें तेंच काम तें—जरी आज विद्यमान नाहींत तरी—पूर्वींपेक्षांहि अधिक प्रमाणानें करीत आहेत. त्यांच्या विचारांचा किंवा उक्तींचा रिघाव एखाद्या भिकार झोंपड्यांपासून तो सुंदर दैदीप्यमान राजवाड्यापर्यंत झाला आहे. त्यांचे उत्तमोत्तम विचार त्यांच्या ग्रंथांत गोविले असल्यामुळें आपणांस वाटेल त्यावेळीं तें पाहण्यास किंवा ऐकण्यास मिळतात. पूर्वीं ते जें कळकळीनें सांगत होते तेंच आज सांगत आहेत. सद्गुरु मिळणें फार दुर्घट असून त्याचा सहवास घडणें, हें तर फारच दुर्घट आहे. परंतु ग्रंथाचें तसें नाहीं. अल्प किमतींत ते आपणांस मिळतात. वाटेल त्यावेळीं सद्बोध करण्यास किंवा नवीन ज्ञान देण्यास ते तत्पर असतात. कधीं कुरकुरत नाहींत किंवा गुरुदक्षिणा मागत नाहींत. कधीं रुष्ट होत नाहींत किंवा सद्बोध करण्यास नाकारीत नाहींत. ग्रंथाचा गौरव करावा तेवढा थोडाच होणार आहे.

शिकंदर बादशहानें सर्व पृथ्वी पादाक्रांत केली. अनेक देशचे राजे दातीं तृण धरून त्यास शरण आले. त्याच्यासारखें अपार वैभव दुसऱ्या कोणाचेंही नव्हतें. तो आशिया खंडांत विजयध्वज फडकावीत असतां इराणचा बादशहा दारियस याची अति मूल्यवान रत्नजडित पेटी त्यास

मिळाली. तेव्हां त्याच्या मंत्रिमंडळापैकीं एकानें त्यास प्रश्न केला कीं, " या पेटींत ठेवण्याजोगी अशी योग्य वस्तु कोणती आहे? " त्यावर बादशहानें उत्तर दिलें, ' हींत ठेवण्यालायक मजजवळ एक वस्तु आहे, ती कोणती ह्मणाल तर होमरचे ग्रंथ! ' यावरून शिकंदर बादशहा होमर कवीच्या ग्रंथांस किती मान देत असेल याची कल्पना आमचे सुज्ञ वाचक सहज करतील.

ग्रंथ हे सन्मित्र होत. या सन्मित्रांचा सहवास केला असतां महा दुर्मिळ असे सुविचार आपणांस कळून येतात. त्यामुळें आपले विचार थोर व प्रगल्भ होतात इतकेंच नाहीं, तर आपल्या वर्तनक्रमावर त्यांचा सत्परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. आरिस्टाटल यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, जे मुलांस जन्म देतात, त्यांपेक्षां जे त्यांना शिक्षण देतात अशा लोकांस अधिक मान दिला पाहिजे. ' स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ' असें कालिदासानें रघुवंशांत ह्मटलें आहे. कारण आईबाप हे नुसते जीवित्व देतात; परंतु शिक्षक हे त्यांना सन्मार्गानें चालण्यास शिकवितात. शिकंदर बादशहा ह्मणत असे कीं ' फिलिपनें मला जीवित्व दिलें याबद्दल मी त्याचा जितका ऋणी आहें, त्यापेक्षां ज्यानें मला ज्ञानामृत पाजिलें आहे, त्या आरिस्टाटलचा मी अधिक ऋणी आहें. आरिस्टाटल व शिकंदर यांनीं शिक्षकांविषयीं जें लिहिलें आहे, तें ग्रंथास लाविल्यास अधिक शोभणार नाहीं काय?

ग्रंथ हे कल्पतरु होत. या कल्पतरूपाशीं धैर्य मागा, शांति मागा, संपत्ति मागा, युद्धसामर्थ्य मागा, ईश्वरप्राप्तीचा मार्ग मागा, लोकांचीं मनें वळविण्याचें सामर्थ्य मागा, सर्व कांहीं हजर आहे. त्यांस मागील युद्धें, मागील लोकांच्या चालीरीति, त्यांच्या धर्मसमजुती वगैरे अनेक गोष्टी विचारा; ते सर्व सांगतील. तसेंच आकाशाच्या पोकळींत, पृथ्वीच्या पाठीवर, डोंगराच्या शिखरावर, समुद्राच्या तळाशीं काय आहे हेंही ते सांगतील. शत्रूस पादाक्रांत कसें करावें, दुष्टाची खोड कशी मोडावी, सत्संगति कशी जोडावी इत्यादि अनेक गोष्टी ते तुह्मांस समजावून

सांगतील! मात्र अनन्य भावानें तुह्मीं त्यांची सेवा केली पाहिजे. ते जें सांगतात तें लक्षपूर्वक ऐकिलें पाहिजे म्हणजे झालें.

जगांतील सर्व वस्तूंचा नाश करण्याचा सपाटा काळानें एकसारखा चालविला आहे. परंतु उत्तम ग्रंथ या काळाच्या तडाख्यांतून वांचले आहेत इतकेंच नाहीं, तर जसजसा काळ जातो तसतसा त्यांचा कीर्ति-परिमल अधिकाधिक पसरत आहे. रामायण व महाभारत हे ग्रंथ सुमारें चार हजार वर्षांपूर्वीं लिहिले गेले असून ते अद्याप जसेच्या तसेच आहेत. होमरकवीनें 'इलियड' नामक ग्रंथ लिहिल्यास अडीच हजार वर्षें होऊन गेलीं असून अद्यापि त्या ग्रंथाचें एक अक्षरही नष्ट झालेलें नाहीं. प्लुटार्क यानें सुमारें एकुणवीसशें वर्षांपूर्वीं जी चरित्र-माला लिहिली आहे, ती अद्यापि जसीच्यातशीच आहे. साक्रेटीस व प्लेटो या प्राचीन तत्ववेत्त्यांचीं भाषणें अद्याप आपणास जशीच्यातशींच वाचावयास मिळतात. या अवधींत कित्येक भव्य व सुंदर राजवाडे, दिव्य मंदिरें, सुरम्य उपवनें, पार विलयास जाऊन त्यांचा मागमूसही राहिला नाहीं! कित्येक पुरूष व राष्ट्रें उदयास आलीं व विनाश पावलीं! परंतु वर सांगितलेले ग्रंथ अजून जसेच्यातसेच कायम आहेत इतकेंच नाहीं, तर अनेक भाषांत त्यांचीं भाषांतरें होऊन त्यांचा अधिक प्रसार होत आहे. यावरून ग्रंथांस नाश नाहीं असें नाहीं. त्यांचा नाश त्यांतील विचारांवर अवलंबून असतो. विचार उत्तम असून त्यांत सत्याचा भाग जितका अधिक तितका तो ग्रंथ अधिक काळपर्यंत टिकतो. कोत्या विचारांच्या ग्रंथाकडे कोणी पहात नसल्यामुळें ते वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडून अल्प काळांतच नाहींसे होतात.

मुद्रणकला निघण्यापूर्वीं ग्रंथ हातानें लिहून काढण्यास फार श्रम लागत असल्यामुळें ते दुर्मिळ असत. पाश्चात्य देशांत धर्मोपदेशकांच्या मठांत किंवा विद्यालयांत हस्तलिखित ग्रंथ असत त्यांची संख्या शें दीडशेंवर क्वचित् असे. गेम्बलर येथील ऑलबर्ट नामक एका महंतानें निवापाड श्रम करून व सर्व आयुष्यभर खपून अवघे दिडशें ग्रंथ जमविले

होते; व त्याचा प्रचंड ग्रंथसंग्रह पाहून सर्व लोक आश्चर्यचकित होत असत. इ. स. १३०० पूर्वी आक्सफोर्ड येथील मोठ्या ग्रंथसंग्रहालयांत फारच थोडीं लहानमोठीं पुस्तकें होतीं. तीं पेटींत बंद करून ठेविलीं असून पेटी साखळदंडानें बांधून टाकिली होती. मठांत रहाणारे जोगीलोक ग्रंथ लिहून थोडाफार पैसा मिळवीत.

ग्रंथ लिहून काढावे लागत असल्यामुळें त्यांना फार किंमत पडत असे. आपल्या देशांत शास्त्री, पुराणिक यांच्या घरीं ग्रंथांचा संग्रह असून ते बहुधा लोकांस ग्रंथ वाचावयास देत असत. ज्या शास्त्र्याकडे ग्रंथ अधिक, त्याला विशेष मान मिळत असे. श्रीमान लोकही थोडाफार ग्रंथसंग्रह करून गोरगरिबांस ग्रंथ वाचावयास देण्यांत विशेष पुण्य समजत असत. कित्येक पुरुष व क्वचित् स्त्रियाही ग्रंथलेखनाचा धंदा करून चरितार्थ चालवीत असत. त्याकाळीं कागद नसल्यामुळें भूर्जपत्र, ताडपत्र ह्या पानांवर ग्रंथ लिहिण्याचा प्रघात असे. ग्रंथाच्या शेवटीं बहुतकरून खालील श्लोक लिहित असत.

तैलाद्रक्षेज्जलाद्रक्षेद्रक्षेत् शिथिलबंधनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यमेवं पुस्तकरक्षणम् ॥

यावरून ग्रंथांची काळजी पूर्वी किती घेतली जात असे, हें चांगलें व्यक्त होतें. त्रावणकोर, तंजावर, काश्मीर, जयपूर वगैरे अनेक ठिकाणीं पूर्वीं मोठीं संस्कृत ग्रंथसंग्रहालयें होतीं. श्रीनगर येथील राघवदास नामक रामाच्या देवालयांत ४५०० हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह केलेला आढळून येतो. यावरून आमच्या लोकांस पूर्वीपासून विद्येची अभिरुचि विशेष आहे हें उघड दिसून येतें.

मुसलमान लोकांचें या देशांत आगमन होण्यापूर्वीं सुधारणेच्या बाबतींत आमचें पाऊल अव्याहत पुढें पडत चाललें होतें. परंतु मुसलमानांचा या देशांत प्रवेश झाल्यापासून आह्मीं दुर्दैवाच्या महान् फेऱ्यांत सांपडलों! देशांतील शांतता नष्ट झाल्यामुळें लोकांचीं मनें व्यग्र झालीं. कलाकौशल्य वगैरे बाबतींत शोध करण्याचें टाकून देऊन जो तो आप-

आपल्या फिकिरींत चूर झाला. अनास्थेमुळें पुष्कळ ग्रंथांचा नाश झाला. ' बळी तो कान पिळी ' ही स्थिति कित्येक शतकेंपर्यंत चालू राहिल्यामुळें आमचें बहुत ज्ञानभांडार नष्ट होऊन आमची अवनति झाली. पोर्तुगीज किंवा फ्रेंच लोकांनीं या बाबतींत मुळींच लक्ष्य घातलें नाहीं. इंग्रजी लोकांचा अम्मल सुरू झाल्यापासून सर्वत्र शांतता झाली. ते स्वतः विद्याभिलाषी असल्यामुळें कर्नल टॉड, ग्रॅंट डफ, लॉर्ड एल्फिन-स्टन, सर जॉन मालकम, मॉनियर विलियम्स, प्रो० म्यॉक्समुल्लर इत्यादि आंग्ल ग्रंथकारानीं इतिहासविषयक व धर्मविषयक अनेक ग्रंथ लिहून आह्मांस अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे.

लोकशिक्षणाचें काम सरकारानें हातीं घेतलें असून गांवोगांव शाळा स्थापिल्या आहेत. जिल्ह्यांतील मुख्य शहरीं आंग्ल भाषेच्या अभ्या-साकरितां वरिष्ठ शाळा स्थापिल्या असून प्रांतोप्रांतीं विद्यापीठें स्थापिलीं आहेत. ब्राह्मणापासून तों तहत अतिशूद्रापर्यंत सर्व जातींच्या लोकांस सरस्वतिमंदिराचें द्वार खुलें झालें आहे! शिक्षण मिळतांच एका संस्कृत कवीच्या उक्तीप्रमाणें आमचे डोळे एकदम उघडले.

* अथास्य तत्वेषु कृतेऽवभासे
समुन्मिमीलेव चिराय चक्षुः ।

मराठी भाषेची जी इतके दिवस फार हेळसांड चालली होती, ती नाहींशी होऊन मराठी भाषा उर्जितावस्थेस आणण्याकरितां अनेक विद्वान् लोक मोठ्या आस्थेनें झटूं लागले आहेत. मागील चाळीस पन्नास वर्षांत मराठी भाषेंत चांगले ग्रंथ तयार झाले असून दिवसेंदिवस अधिक अधिक होत आहेत. हें आमचें सुदैवच समजलें पाहिजे!

---

* टीप :—( अर्थ ) याप्रमाणें तत्वांचा बोध होऊन त्याच्या हृदयांत ज्ञानप्रदीप उजळला असतां त्याचे फार दिवस मिटलेले डोळे जणूंकाय एकदम उघडले.

# भाग ४ था.

## वाचनाची अभिरुचि.

तुका ह्मणे सर्व सुख त्या संगतीं । घडेल पंगतीं संताचिया.

तुकाराम.

सत्समागमाचा महिमा वर्णन करितांना साधुवर्य तुकाराम यानें सत्समागमापासून जें सुख मिळतें ह्मणून लिहिलें आहे, तेंच सुख उत्तम ग्रंथांच्या वाचनापासून मिळतें. खरा रसिक विद्वान् आपल्या पुस्तकालयांत बसून ग्रंथवाचनांत निमग्न झाला असतां, त्याला त्या वेळेस जें सुख होतें, त्यापुढें राज्यवैभवही तुच्छ आहे. सुप्रसिद्ध आंग्ल इतिहासकार गिब्न यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "मला जरी सर्व हिंदुस्थानची संपत्ति कोणीं देऊं केली, तरी मी आपली वाचनाची आवड दुसऱ्या कोणास देणार नाहीं". तसेंच सर जान हर्शल याला वाचनाची केवढी गोडी होती, हें त्याच्या एका वाक्यावरून स्पष्ट कळतें. तो ह्मणतो, "ज्या गोष्टीच्या छंदानें सर्व अवस्थांत माझी समाधानवृत्ति राहील, माझ्या सर्व आयुष्यक्रमांत जिच्यायोगानें मला सुख होईल आणि सर्व तापापासून माझें संरक्षण होईल, अशी गोष्ट परमेश्वराजवळ मागण्याचा मला प्रसंग आला, तर मी 'वाचनप्रियता' मागेन. मग मला सर्व गोष्टी प्रतिकूळ झाल्या आणि सर्व जग जरी मजवर फिरलें तरी त्याची मी चिंता करणार नाहीं." मोठमोठे कवि, ग्रंथकार, तत्त्ववेत्ते, हे जबर वाचणार होऊन गेले. वाचनाची सवय लागल्याशिवाय जगांत मोठेपण मिळणें दिवसेंदिवस अशक्य झालें आहे.

बुद्धि ही तिजोरीप्रमाणें आहे. तिजोरी असून तींत ठेवण्याकरितां हिरे, माणकें, मोत्यें इत्यादि मौल्यवान वस्तु पाहिजेत. नुसती तिजोरी असून काय उपयोग? 'ज्ञानावीण जी जी कळा । ती ती जाणावी

अवकळा ' असें एका महाराष्ट्र कवीनें ह्मटलें आहे. बुद्धि ही ओसाड जमिनीप्रमाणें आहे. जमीन कितीही चांगली असली, तरी तिची मशागत केली पाहिजे, तींतील कांटेरी झाडें काढून टाकून तींत चांगल्या झाडांची लागवड केली पाहिजे ह्मणजे मग तेथें सुंदर उपवन बनतें. जशी जमिनीची तशीच बुद्धीचीही मशागत केली पाहिजे. मनुष्याची किंमत ही त्याच्या ज्ञानावर असते. जेवढें ज्ञान अधिक तेवढी त्याची किंमत अधिक. ज्ञानाच्यायोगानें मनुष्यें देवपणा पावलीं आहेत. आपली योग्यता वाढविणें हें प्रत्येक मनुष्याच्या हातीं असतें. स्वकष्टानें मनुष्याची जेवढी योग्यता वाढते, तेवढी दुसऱ्या कशानेंही वाढत नाहीं ! ' नर करणी करेसो नरका नारायण होय '. ही ह्मण सुप्रसिद्धच आहे ; व इची सत्यता जगांत श्रेष्ठपणा पावलेल्या मनुष्यांचीं चरित्रें वाचलीं असतां सहज कळून येणार आहे.

ज्ञान संपादन करण्याचें सुलभ व उत्तम साधन वाचन होय. एका ल्याटीन कवीनें वाचनाचा महिमा फारच चातुर्यानें एका वाक्यांत वर्णन केला आहे. तो ह्मणतो ' वाचन मनुष्याचें वर्तन सुधारतें. त्याला रानटीपणांत राहूं देत नाहीं. ' वाचनाच्यायोगानें मनुष्यास अल्प काळांत जेवढें ज्ञान मिळवितां येतें, तेवढें कोणत्याही अन्य साधनाच्यायोगानें मिळवितां येणार नाहीं. जें ज्ञान मिळविण्याकरितां पूर्वींच्या लोकांस वर्षानुवर्षें खपावें लागलें, तें आपणांस सहज मिळवितां येतें. तसेंच त्यांना जे ग्रंथ पहाण्यासमुद्धां मिळत नसत, असे अमूल्य ग्रंथ मुद्रणानें हल्लीं अगदीं सुलभ झाले आहेत. मात्र आपणांस वाचनाची अभिरुचि पाहिजे ह्मणजे झालें. सिसरोचीं भाषणें मिळविण्याकरितां फ्रान्स देशाहून रोम शहरीं वकील पाठविण्यांत आला होता. आत्मज्ञानाविषयीं व अन्य जन्माविषयीं पौरस्त्य देशांतील मतांचा शोध करण्याकरितां लायकरगस आणि पिथ्यागोरस यांना इजिप्त, इराण आणि हिंदुस्थान ह्या प्रदेशांत स्वत: फिरावें लागलें. ज्या ज्ञानाविषयीं सोलन आणि प्लेटो यांची कीर्ति सर्व देशभर दुमदुमत होती, तें ज्ञान संपादन करण्याकरितां त्यांना इजिप्तची सफर करावी लागली. ऐति-

हासिक गोष्टींची माहिती मिळविण्याकरितां प्रसिद्ध इतिहासकार स्ट्रॅबो आणि हेरोडोटस यांना प्रवास करावे लागत असत इतकेंच नाहीं, तर प्रवासांत त्यांना त्या प्रदेशाची भूगोलविषयक माहिती मिळवून टिपून ठेवणें भाग पडे. या गोष्टी वाचल्या ह्मणजे हल्लीं किती सोई झाल्या आहेत त्यांची वाचकांस सहज अटकळ करितां येईल.

वाचनाच्यायोगानें ग्रंथांतील विचारांचा ठसा आपल्या मनावर उमटतो. त्यामुळें आपल्या विचारांत भर पडून ते बरे किंवा वाईट बनतात, व विचार बदलले ह्मणजे त्याप्रमाणें आपलीं मतें बदलतात. आणि मतांचें पर्यवसान शेवटीं आपल्या वर्तनांत होतें. सारांश, चांगलीं पुस्तकें वाचण्याचा क्रम ठेविला असतां आपलें वर्तन चांगलें होतें. सद्‌गुणाविषयीं भक्ति व दुर्गुणाविषयीं तिटकारा आपल्या मनांत उत्पन्न होतो. इहलोकींची यात्रा आपणास सुखकर होऊन परलोकीं सद्गति होते.

वाचनाच्यायोगानें मनोरंजन होऊन ज्ञानप्राप्ति होते. कोणाची संपत्ति जाऊन तो दरिद्री झाला असेल; कोणाची सुस्वरूप स्त्री अथवा जीवापेक्षांही पलीकडे असा एकुलता एक मुलगा निवर्तला असेल; कोणास व्यंगता आली असेल; कोणास सन्मित्रवियोग झाला असेल; अथवा असाच दुसरा कोणता तरी प्रसंग कोसळून कोणास फार दुःख झालें असेल किंवा आपलें जीवित कंटाळवाणें झालें असेल; अशा वेळीं सर्व दुःखाचा परिहार होण्यास वाचनासारखें उत्तम साधन नाहीं. कानफ्यूशीयस स्वतःविषयीं लिहित असतां ह्मणतो कीं "मी आस्थेनें ज्ञान संपादन करीत असतांना अन्नपाणी विसरलों होतों. तेंच ज्ञान संपादन केल्यावर जो मला आनंद झाला, त्यांत मी आपलें दुःख विसरून गेलों. वृद्धापकाळ मजला गाठींत आहे, याचें मजला भानही राहिलें नाहीं." वाचनांत मन व्यापृत असल्यामुळें दुःखवेग कमी होतो. जग क्षणभंगुर असून या भवसागरांत मनुष्यावर अनेक बिकट प्रसंग नेहमीं असतात, असे विचार मनांत येऊन आपणास दुःखाचा विसर पडतो. इतकेंच नाहीं तर तें दुःख सहन करण्याइतकें धैर्य आपल्या अंगीं वाचनाच्यायोगानें येतें.

आळस हा मोठा दुर्गुण आहे. आणि तो आमच्या लोकांच्या अगदीं हाडींमासीं खिळला आहे. 'आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः' मनुष्याच्या शरीराला आळस हा महान रिपु आहे असें भर्तृहरीनें एके- ठिकाणीं ह्मटलें आहे. आळस गुन्हा समजून आळशी लोकांस ग्रीक लोक शिक्षा करीत असत; परंतु आळसानें आह्मांस अगदीं खाऊन टाकिलें आहे. पोटास मिळविलें पाहिजे ह्मणूनच आमचे लोक उद्योग करितात असें ह्मणावें लागतें; नाहीं तर त्यांनीं उद्योगच केला नसता. थोडें फार शिकून एखादी नौकरी मिळवावयाची किंवा घरीं चालत असलेला धंदा तसाच पुढें चालवावयाचा. तेवढें केलें ह्मणजे आपली इतिकर्तव्यता आटपली! असें समजून बाकी राहिलेली वेळ कित्येक नाच तमाशांत किंवा गप्पागोष्टींत, कित्येक झोंपा काढण्यांत व कित्येक आळसांत घालवितात. पैशापेक्षांही अमोल असा वेळ ते दररोज किती तरी फुकट दवडितात! परंतु त्या वेळेचा कांहीं तरी उपयोग करावा असें कधींही त्यांच्या मनांत येत नाहीं. शाळेंत जीं काय दोन चार पुस्तकें वाचण्यांत आलीं असतील तेवढींच. शाळा सोडल्यावर पुस्तकां- कडे ते ढुंकूनमुद्धां बघत नाहींत. पुस्तक न उघडण्याविषयीं जणू काय ते शपथच वाहतात! जगांत काय चाललें आहे, हें त्यांना कधींही कळत नाहीं. तसेंच आपल्या भाषेंत इतिहास, काव्य, निबंध, कादंबऱ्या इत्यादि ग्रंथांत चांगले ग्रंथ कोणते यांचीं नांवेंसुद्धां त्यांना माहीत नसतात. नुसतीं नांवेंही जेथें माहीत असण्याची मारामार, तेथें त्या ग्रंथांचें वाचन कसलें! आमचे सुतार, सोनार, लोहार, तेली, तांबोळी, साळी, माळी, शेतकरी इत्यादि अनेक लोकांकडे पाहिलें ह्मणजे आह्मीं ह्मणतों याची सत्यता सहज दिसून येईल. त्या लोकांस नुसतें ट–फ–च जर येत नाहीं, तर पुस्तकें वाचण्याची गोष्ट दूरच राहिली! एखाद्या सुंदर राजवाड्यांत किंवा सुरम्य उपवनांत आंधळ्यास नेलें असतां जसा त्यास आनंद व्हावयाचा नाहीं, तद्वत्च या आमच्या निरक्षर बंधूंची स्थिति होय! पुस्तकांत सांठवून ठेविलेल्या ज्ञानामृताचा अंशतः लाभ झाल्यामुळें विद्वान् लोकांस जो आनंद होतो, तो या बिचाऱ्यांस काय बरें ठाऊक!

ज्यांना लिहिणें वाचणें येत नाहीं किंवा विद्येचा ज्यांना गंध नाहीं, अशा अशिक्षित किंवा अडाणी लोकांची ही स्थिति झाली. आतां सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांस वाचनाची कितपत आवड असते हें पाहिलें पाहिजे. विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा पास झाल्यावर अथवा एखादी नौकरी मिळवून पोटाचा व्यवसाय करूं लागल्यावर आमचे बहुतेक तरुण लोक पुस्तकांची रजा घेतात. वर्षानुवर्षें ते पुस्तक उघडीत सुद्धां नाहींत. एकाददुसरें शिळें वर्तमानपत्र वाचलें तर वाचलें, नाहींतर त्याचीही त्यांना मुळीं अपेक्षा नसते. त्यांच्या घरांतील सांदीकोपऱ्यांत कोठें पूर्वीची चार पांच जुनाट पुस्तकें पडून राहिलीं असलीं तर तीही वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडतात. नवीन उपयुक्त पुस्तकें पैसे खर्चून संग्रहीं ठेवण्याची बुद्धि तर दूरच; परंतु तीं पुस्तकालयांतून किंवा मित्रांकडून आणून वाचावीं, येवढीसुद्धां त्यांना अभिरुचि नसते! कामधंदा केल्यावर बाकीचा वेळ ते गंजिफा, पत्ते, बुद्धिबळें किंवा बिझिक खेळण्यांत, विड्या फुंकण्यांत किंवा गप्पा मारण्यांत घालवितात!! आणि त्यांतच ते आपणांस धन्य समजतात!!!

ज्यांना विद्येचा गंध नाहीं अशा लोकांकडून काळाचा अपव्यय होत असल्यास त्यांत त्यांचा फारसा दोष नाहीं. परंतु जे आपणांस सुशिक्षित ह्मणवितात, वेळेची किंमत ज्यांना पूर्ण माहीत आहे, अशा लोकांनीं वेळेचा दुरुपयोग करणें, हें खरोखर त्यांनां अगदीं लाजिरवाणें होय! ही शोचनीय स्थिति कधीं नाहींशी होईल ती होवो!

पाश्चात्य राष्ट्रांत जी जागृति दिसून येते व येवढी झपाट्यानें जी त्यांची उन्नति होत आहे, याचें कारण त्यांची वाचनप्रियता होय. तिकडील लोहार, सुतार, काम करणारे मजूर इत्यादि गरीब लोकही आपला धंदा आटोपून वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, ऐतिहासिक ग्रंथ, सुरस कादंबऱ्या व धर्मविषयक व्याख्यानें वाचण्यांत आपला कालक्षेप करितात. आपल्या अल्प मिळकतींतून चांगलीं पुस्तकें विकत घेऊन त्यांचा संग्रह करितात. त्यामुळें ग्रंथकर्त्यांस चांगलें उत्तेजन मिळून ते उत्तम उत्तम ग्रंथ तयार

करितात. सरजॉन लबॉक यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, पुढील पिढींत वकील, वैद्य, प्रोफेसर यापेक्षां कारागीर, शिल्पकार, व मजूर हे अधिक वाचणारे निघतील; आणि असें होणें अगदीं इष्ट आहे. वाचनापासून पाश्चात्य लोकांचें पुष्कळ कल्याण झालें आहे आणि त्या बाबतींत आह्मीं त्याचेंच अनुकरण करणें हें अगदीं श्रेयस्कर होणार आहे.

सुप्रसिद्ध निबंधकार लॉर्ड बेकन यानें ह्मटलें आहे कीं, "वाचनानें मनुष्य निष्णात होतो, भाषणानें हजरजबाबी होतो, आणि लेखनाच्या योगानें त्याच्या अंगीं टापटीपपणा येतो". मनुष्य निष्णात असण्यास तो बहुश्रुत असावा लागतो. आणि वाचनाच्या योगानें बहुश्रुतपणा अंगीं येतो. जगांत दोन प्रकारचे लोक असतात. एक वयोवृद्ध आणि दुसरे ज्ञानवृद्ध. वयोवृद्ध असतात त्यांना कालपरत्वें वृद्धत्व येतें. परंतु जे ज्ञानवृद्ध असतात त्यांचें वय जरी लहान असलें तरी बहुश्रुतपणामुळें त्यांचे विचार प्रगल्भ असतात, व त्यांना जगाचा अनुभव विशेष असतो. आर्यधर्मशास्ता मनु यानें लिहिलें आहे:—

* न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः।
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः॥

वाचन हें ज्ञान मिळविण्याचें सुलभ व उत्कृष्ट साधन आहे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. जॉन स्टुअर्ट मिल्ल यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे. 'मी अगोदर पंचवीस वर्षें जन्मून जितकें ज्ञान मला झालें असतें तितकें बापाच्या शिक्षेमुळें झालें'. आयुष्याचा अपव्यय होऊं नये; थोड्या काळांत आपणांस पुष्कळ ज्ञान प्राप्त व्हावें याकरितां लहानपणापासून वाचनाची संवय लागली कीं, आपण निरनिराळे ग्रंथ पाहूं लागतों व नवीन ज्ञान संपादन करण्याची आपणांस गोडी लागते

वाचनापासून जे अनेक फायदे आहेत, त्यांतील मुख्य मुख्य येथें सांगणें अवश्य आहे. वाचनापासून मनोरंजन होऊन ज्ञानप्राप्ति होते.

---

* अर्थ:—नुसते केंस पांढरे झाल्यानें मनुष्यास वृद्धत्व येत नाहीं. जो ज्ञानी आहे तो अल्पवयस्क असला तरी त्याला देवादिकही वृद्ध मानितात.

पूर्वींच्या लोकांचा अनुभव मिळून त्याचा आपणास फायदा होतो. मन आळशी न राहतां उद्योगांत गुंतलेलें रहातें. विचारशक्ति जागृत होऊन ज्या गोष्टी पूर्वीं आपणास कळत नसतात, त्या आपोआप कळूं लागतात. दुर्गुणी लोकांविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो. सत्समागमाचा लाभ होऊन आपलें वर्तन सुधारतें. आपल्या अंगचे नैसर्गिक दुर्गुण नाहींसे होतात. अंगीं विनय व नम्रत्व येतें. असत्याचा द्वेष व सत्याविषयीं प्रीति उत्पन्न होते. विवेक उत्पन्न होऊन आपणांस आपली खरी योग्यता समजते. भूतदया अंगीं येते. इहलोकीं सुख मिळून परलोकींही सद्गति मिळते. इत्यादि अनेक फायदे होतात आणि ह्मणूनच मोठमोठ्या लोकांनीं वाचनाचे येवढे पोवाडे गाइले आहेत!

# भाग ५ वा.

## वाचावें कसें?

मागील भागांत पुस्तकांचें पुष्कळ वर्णन करण्यांत आलें आहे. पुस्तकें वाचावीं कशीं, ही गोष्ट चांगल्या रीतीनें समजाऊन घेऊन नंतर तीं वाचलीं असतां त्यापासून फायदा होतो. परंतु या गोष्टीकडे बहुधा कोणी फारसें लक्ष देत नाहींत. पुस्तक हातीं पडलें ह्मणजे तें कसेंतरी वाचून एकदांचें संपवून टाकलें ह्मणजे झालें. नवीन पुस्तक पाहिलें ह्मणजे ते वाचण्यास प्रथम त्यांना फार उत्सुकता वाटते. परंतु ती उत्सुकता लवकरच नाहींशी होऊन पांचपंचवीस पानें वाचलीं ह्मणजे त्यांना अगदीं कंटाळवाणें होतें. अर्धेंच पुस्तक वाचून तें टाकून देतात, किंवा आपणांवर हें एक मोठें ओझें येऊन पडलें आहे, असें समजून मोठ्या कष्टानें ते पुस्तक कसेंबसें तरी संपवितात. अशा रीतीनें पुस्तकें वाचण्यापेक्षां तीं न वाचलेलीं बरीं. त्यापासून वाचणारांस फायदा होत नाहींच, परंतु उलट वाचनाचे श्रम होऊन जीव मात्र अगदीं कंटाळवाणा होतो. पुस्तकें वाचतेवेळीं मुळींच कंटाळा न येतां मनास करमणूक होईल, भाराभर पुस्तकें न वाचतां थोड्या पुस्तकांपासून अल्प काळांत आपणांस पुष्कळ ज्ञान कसें करून घेतां येईल, हें या भागांत समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

अन्न पचन होण्यास अन्न बेताचेंच खाल्लें पाहिजे. तें सावकाश खाऊन त्याचें चांगलें चर्वण झालें पाहिजे. ह्मणजे तें पचतें. परंतु तेंच अन्न जर जास्त खाल्लें, त्याचें चांगलें चर्वण झालें नाहीं, तर अपचन होईल; इतकेंच नाहीं तर त्यापासून प्रकृति बिघडून आमांश होईल. त्याचप्रमाणें वाचनाचें आहे. आपलें मन जोंपर्यंत शांत असून वाचनापासून त्याला कंटाळा येत नाहीं, तोंपर्यंतच वाचन चांगलें.

परंतु मन व्यग्र होऊन कंटाळवाणें झाल्यावर वाचलें असतां त्यापासून फायदा तर होत नाहींच, परंतु उलटा मेंदूस त्रास मात्र पुष्कळ होतो. असाच क्रम कांहीं दिवस चालू असल्यावर मेंदू बिघडून त्याचा स्मरण-शक्तीवर अनिष्ट परिणाम होतो! 'खादाडाला चव नाहीं' अशी एक म्हण आहे; त्याचप्रमाणें अति वाचणाराला शब्दसौष्टव, विचारसौंदर्य, शब्दमाधुर्य वगैरे फारच थोडें कळतें. अति वाचणें चांगलें नसून तें बेतानेंच असणें बरें.

हल्लीं हजारों पुस्तकें दरवर्षीं छापून प्रसिद्ध होतात. मोठमोठ्या पुस्तकालयांत वाचण्याकारितां लक्षावधि पुस्तकें ठेविलेलीं असतात. शाळा, पाठशाळा शहरोंशहरीं स्थापन होऊन विद्येचा प्रसार मोठ्या झपाट्यानें होत आहे. खरी विद्येची अभिरुचि ज्याला असेल त्याला पूर्वींपेक्षां हल्लीं किती तरी अधिक सोई झाल्या आहेत. अशी स्थिति असून थ्युसिडायडीससारखे इतिहासकार होमर व्हर्जिलसारखे कवि, आरिस्टाटल व प्लेटो यांसारखे तत्ववेत्ते हल्लीं कां निपजूं नयेत? या पूर्वींच्या लोकांस शिक्षणाच्या फारशा सोई नव्हत्या. फार तर काय, त्यांना ग्रंथसुद्धां फारसे अवलोकन करण्यास मिळत नसत! आणि असें असून ते येवढे विद्वान कसे? याचें कारण हेंच कीं, ते मोठ्या आस्थेनें शिकत असत. ग्रंथांचा अभ्यास फारच मन लावून करीत असून कोणत्या ग्रंथांत कोठें काय लिहिलें तें त्यांस अगदीं मुखोद्गत असे. हल्लींप्रमाणें त्यांची विद्या केवळ पुस्तकी नव्हती. ते जें कांहीं थोडे शिकत, त्यावर ते पुष्कळ विचार करीत असत. त्यामुळें त्यांच्या बुद्धीस घर्षण होऊन ती विशाल होत असे. ते स्वयंप्रकाशित असून परप्रकाशाचा त्यांच्या अंगीं फारच थोडा अंश असे. लोहाराचा हात, डांकवाल्यांचा दम, कारकुनाची मांडी, हीं जशीं संवयीच्या योगानें घट्ट होतात, तसेंच बुद्धीचेंहि आहे. विचाराच्या योगानें ती बळकट होऊन तिला सोज्वळता येते.

नुसतीं भाराभर पुस्तकें वाचण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जे भाराभर पुस्तकें वाचतात त्यांचे विचार अगदीं उथळ असून त्यांची बुद्धि कचि-

त्च खोल असते. ‘ पुढें पाठ आणि मागें सपाट ’ अशी त्यांची स्थिति असते. एका प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकारापाशीं फारच थोडा पुस्तकसंग्रह असल्याबद्दल कोणी त्यास हांसलें, तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, ‘ जेव्हां पुस्तकाची मला जरूर लागते, तेव्हां मी तें तयार करतों. ’ सर्व हिंदुस्थानांत ज्याच्या विद्वत्तेची ख्याति आहे, अशा एका विद्वान् गृहस्थाच्या घरीं लेखक गेला असतां, तेथें त्यास सरासरी वीस पंचवीसच पुस्तकें दिसलीं! यावरून हें उघड आहे कीं, पुस्तकें थोडीं वाचलीं असतां पुरेशीं होणार आहेत. परंतु तीं सावकाश आणि विचारपूर्वक वाचलीं पाहिजेत आणि जेणेंकरून त्यांतील पुष्कळ भाग आपल्या ध्यानांत राहील अशी काळजी घेतली पाहिजे.

पुस्तक वाचण्यास हातीं घेण्यापूर्वीं तें कोणत्या विषयासंबंधीं आहे, त्याचा कर्ता कोण आहे, हें पहावें. तसेंच नांवास अनुसरून पुस्तकांत विषय प्रतिपादन केला आहे कीं नाहीं, हेंही पहावें. कधीं कधीं नांव भलतेंच आणि आंतील विषय भलताच, असेंही आढळून येतें. * नंतर प्रस्तावना वाचून पहावी. प्रस्तावनेंत ग्रंथकर्ता आपल्या पुस्तकाविषयीं तें लिहिण्यास काय कारण झालें तें कशाच्या आधारानें लिहिलें इत्यादि अनेक गोष्टींविषयीं उल्लेख करीत असतो. ज्याप्रमाणें एका गृहस्थाची दुसऱ्या गृहस्थाशीं ओळख करून देतेवेळीं आपण त्या गृहस्थाविषयीं प्रथम थोडक्यांत माहिती सांगतों, त्याचप्रमाणें आपलें पुस्तक जनसमूहापुढें मांडतांना ग्रंथकर्ता प्रस्तावनेंत पुस्तकाविषयीं बरीच माहिती सांगतो. येवढें पहाणें झाल्यावर त्या पुस्तकाविषयीं कोठें काय टीका झाली होती, ती ध्यानांत आणावी किंवा पहावी. नंतर मधून मधून कांहीं पानें वाचून पहावीं, म्हणजे आपणांस ग्रंथकाराची भाषासरणी विचारसौंदर्य वर्णनशैली ही कशीं काय आहेत, तें कळून येईल. जर ग्रंथकाराची

---

* टीप :—पूर्ण ग्रंथ पाहिल्यावांचोण । उगाच ठेवी जो दूषण ॥
तो दुरात्मा दुरभिमान । मत्सर करी ॥

रामदास.

भाषा नीरस असून विचारसौंदर्य, वर्णनशैली बाताबेताचीच असेल; दुसऱ्यांचे विचार मदतीस घेऊनच पुस्तक तयार करण्यांत आलें असेल तर ते पुस्तक वाचण्यांत वेळ न घालविणें बरें. ज्या पुस्तकाची भाषा चांगली असून ज्यांत ग्रंथकर्त्याचे स्वतःचे विचार व स्वतःचा अनुभव नमूद केला असतो, अशीं पुस्तकें वाचण्यालायक असतात. कोणताही पदार्थ खाण्यापूर्वीं प्रथम आपण तो चाखून पहातों. चांगला लागल्यास खातों; वाईट लागल्यास निरुपयोगी ह्मणून टाकून देतों. तेंच तत्व पुस्तकांची निवड करितांता उत्तम रीतीनें लागूं पडतें. चांगलीं पुस्तकें वाचण्यांत वेळ गेल्यास त्यावेळेचा सदुपयोग होतो. परंतु वाईट पुस्तकें वाचण्यांत जो वेळ जातो, तो आपण व्यर्थ दवडितों, इतकेंच नाहीं तर त्या वाचनापासून आपल्या मनावर अनिष्ट परिणाम होऊन, आपलें वर्तन बिघडण्याचा संभव असतो.

वाचतेवेळीं आपलें मन क्षुब्ध किंवा क्रोधयुक्त नसावें. तसेंच विवंचना, भीति, इत्यादि कसल्याही विकारांनीं मन दूषित नसतां तें शांत असून त्यास श्रम करण्याचा हुरूप असावा. अशी मनाची स्थिति असल्यावर वाचनास सुरवात करावी. सावकाश रीतीनें एकएक वाक्य वाचावें. वाक्य संपल्यावर तें आपणास समजलें किंवा नाहीं, हें पहावें तें खरें, विषयास अनुसरून असून महत्वाचें व ध्यानांत धरण्यासारखें असलें तर तेव्हांच चटकर लक्ष लाऊन तें ध्यानांत धरावें. अशा रीतीनें पॅारिग्राफ वाचल्या नंतर पुस्तक मिटून जें वाचलें असेल तें ध्यानांत आणावें. प्रत्येक पॅारिग्राफाचा सारांश ध्यानांत आणल्याशिवाय पुढें वाचूं नये. अशा रीतीनें भाग वाचून झाल्यावर त्या भागांत ग्रंथत्कर्यानें काय सांगितलें आहे, काय सांगण्याचा त्याचा प्रयत्न होता व तो त्यास कितपत साधला यांविषयीं नीट विचार करावा. आपणांस पूर्वीं किती माहिती होती, नवीन किती मिळाली, हें लक्षांत आणावें. वाचतेवेळीं पेन्सिल व टिपणवही जवळ अवश्य असावी व पेन्सिलीनें महत्वाच्या वाक्यांच्या बाजूस ( समासावर ) रेघ मारून ठेवावी. तसेंच प्रत्येक

पारिग्राफांत जें काय सांगितलें असेल तें बाजूस दोन चार शब्दांत टिपून ठेवावे. वाचकानें आपल्याकरितां नवीन खुणा शोधून काढाव्या, किंवा खालीं दिलेल्या खुणा समजून घेऊन वाचतेवेळीं तशा खुणा पुस्तकावर करीत जाव्यात. ह्मणजे वाचलेल्या मजकुराची छाननी किंवा विल्हेवाट सहज उत्तम रीतीनें करितां येईल. पुस्तकांतील चांगला भाग सहज आपल्या लक्ष्यांत राहील.

मुख्य विधान केलें असेल तेथें असें चिन्ह करावें.

|| मुख्य विधान करून तें सिद्ध करण्याकरितां पुढें पुष्कळ प्रमाणें दिलेलीं असतात. मुख्य विधानें फार महत्वाचीं असल्यामुळें तीं ध्यानांत ठेवणें अवश्य असतें.

:: जेथें एखादा उत्तम विचार नमूद केला असून त्या विचारापासून अनेक विचार निघण्याचा संभव असेल अथवा ते विचार वाचून आपणास दुसरे कांहीं विचार सुचले असतील तेथें अशी खूण करावी. अशावेळीं ते विचार आपल्या वहींत टिपून ठेऊन आपणांस जे विचार सुचले असतील तेही लागलीच टिपून ठेविले पाहिजेत. नवीन विचार ज्या वेळचे त्यावेळीं टिपून न ठेविले तर त्यांची आपणास विस्मृति पडते. व ते पुनः डोक्यांत येण्याचा फारच थोडा संभव असतो.

× जेथें खोटीं विधानें आढळून येतील ते अशी खूण करावी.

? ज्या ठिकाणीं आपणांस संशय आला असेल तेथें संशय चिन्ह घालावें

V—— एखादा पारिग्राफ विशेष महत्वाचा व ध्यानांत धरण्यास योग्य असा आढळून आल्यास, आरंभीं असें चिन्ह करावें.

... खऱ्या गोष्टी किंवा खरीं विधानें आढळतील तेथें वाचतेवेळीं जेथें **सुरस शब्द किंवा वाक्यें** आढळून येतील तेथें त्या शब्दाखालीं आडवी रेघ ओढून ठेवावी.

याशिवायही आणखी कांहीं खुणा कोणास करणें असतील तर कराव्यात. परंतु पहिल्यानें खुणा बरोबर ठरवून नंतर त्या करीत जाव्यात. नाहीं तर आपण कशाकरितां खूण केली ती पुढें आपणासच समजणार नाहीं. वर लिहिलेल्या खुणा करण्याचा लेखकाचा क्रम असून तो त्याला फार समाधानकारक वाटतो. त्यायोगानें पुस्तकांतील बहुतेक महत्वाचा भाग कोणत्या ना कोणत्या तरी खुणांनीं व्याप्त असतो. अशा रीतीनें पुस्तक वाचून झाल्यावर त्यांतील खुणा केलेल्या ओळी पुन: लक्ष्य लावून वाचाव्यात. वेळींच जेवढें आपल्या ध्यानांत राहील तेवढें चांगलें. नंतर आपल्या वहींत पुस्तकाचें नांव, ग्रंथकर्त्याचें नांव, ज्या संग्रहालयांतून पुस्तक आणलें असेल त्याचें नांव व कधीं आणलें असेल ती तारीख, इतकें प्रथम टिपून ठेवून नंतर पुस्तकांतील जेवढा मजकूर लिहून ठेवण्यास योग्य असेल तेवढा मजकूर टिपून ठेवावा. कोणत्या पृष्ठावर तो असेल तें पृष्ठ त्या मजकुराच्या बाजूस लिहून ठेवावें, व ती स्मरणवही फावल्या वेळीं पहात जावी, ह्मणजे पुस्तकांतील बराच भाग आपल्या अगदीं सहज लक्षांत राहील.

सर्वच पुस्तकें लक्ष लावून वाचण्यासारखीं असतात असें नाहीं. कित्येक साधारण रीतीनें वाचून टाकलीं असतां भागतें. कित्येक मधून मधून वाचून पहाण्यासारखीं असतात. पुस्तक ह्मटलें कीं, तें ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत वाचून टाकिलें पाहिजे असें नाहीं. यासंबंधानें लिहित असतां लार्ड बेकन यानें ह्मटलें आहे, "कित्येक पुस्तकें फक्त चव घेऊन सोडून देण्याच्या लायकीचीं असतात; कित्येक गिळून टाकण्यासारखीं असतात व कित्येक (अशांची संख्या थोडी असते) चावून चावून खाण्यासारखीं व जिरविण्यासारखीं असतात. ह्मणजे

कित्येक पुस्तकें अशीं असतात कीं, तीं अंशतः वाचावीं, कित्येक समस्त वाचावीं, पण तीं लक्ष्यपूर्वक वाचण्यासारखीं नसतात. व कित्येक (अशीं थोडीं) लक्ष्यपूर्वक व निरालस्यपणानें समग्र वाचावीं."

वर सांगितल्याप्रमाणें वाचनाचा क्रम ठेविल्यास जरी तुह्मीं थोडीं पुस्तकें वाचलीं, तरी त्यांपासून तुह्मांस फार फायदा होणार आहे. तुह्मीं जें वाचलें असेल तें बहुतेक तुमच्या ध्यानांत राहील. पुष्कळ विचार केला असल्याकारणानें तें ज्ञान अगदीं तुमचें होईल. लिहिण्याचा किंवा बोलण्याचा प्रसंग आल्यास तुह्मांस त्या पुस्तकांतून बरोबर उतारे देतां येतील. पुनः कदाचित् तें पुस्तक पहाण्याचें कारण पडल्यास तें कोठें आहे, व त्यांत कोणत्या पानावर काय काय लिहिलें आहे, तें तुह्मांस वहीवरून तेव्हांच कळून येईल.

वाचतेवेळीं दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, वाचनापासून लोकांचे जे विचार आपणास कळतात ते नीटपणें समजावून घेऊन त्यांची योग्य व्यवस्था लाविली पाहिजे. आपले पूर्वीचे विचार व नवीन विचार यांची परस्परांशीं सांगड घालून त्यांचा एक जीव करून टाकला पाहिजे. असें केल्यानेंच पूर्वीच्या विचारांत नवीन विचार अगदीं एकजीव होतात. बाजारांतून अनेक प्रकारच्या जिनसा खरेदी करून आणल्यावर घरीं त्या आपण पृथक पृथक व व्यवस्थेशीर ठेवितों. यामुळें आपणास पाहिजे त्या वेळीं पाहिजे ती वस्तू सहज मिळते. जर आपण जिनसा व्यवस्थेशीर न ठेविल्या, तर काय बरें स्थिति होईल? वेळेवर आपणास एकही वस्तू मिळणार नाहीं, हें उघड आहे. त्याचप्रमाणें विचारांचें आहे. ते नीटपणें समजून घेऊन ध्यानांत ठेविले तरच ते वेळेवर आठवत असतात; नाहीं तर एकच गोंधळ होऊन कांहींच समजेनासें होतें.

अशा रीतीनें लक्ष्यपूर्वक वाचणें सोडून देऊन कित्येक लोक भाराभर पुस्तकें वाचीत सुटतात. प्रत्येक दिवसास ते चार चारशें पानें वाचतात. टिपणवही अथवा सिसपेनसील त्यांना कधींही लागत नाहीं. ग्रंथकार जें

लिहितो, त्यांत सत्य किती, असत्य किती, ध्यानांत धरण्यास योग्य असा भाग कोणता व टाकाऊ कोणता, याकडे ते मुळींच लक्ष देत नाहींत. पुस्तकापासून मनरंजन होऊन कालक्षेप व्हावा, येवढीच त्यांची इच्छा असते. त्यांच्या नजरेखालून जरी हजारों उत्तम विचार गेलेले असतात तरी ऐन बाणीच्या प्रसंगीं त्यांना त्यांपैकीं एकही विचार आठवत नाहीं. येवढें वाचून ते आपल्या डोळ्यांस आणि मेंदूस मात्र व्यर्थ शिणवितात, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें!

वाईट पुस्तकें हातींसुद्धां धरूं नका. सर्वच पुस्तकें चांगलीं असतात असें नाहीं. छापण्याची कला निघाल्यापासून हजारों पुस्तकें छापून निघतात. त्यांत टाकाऊ आणि घाणेरडीं पुस्तकें किती तरी असतात! अशीं पुस्तकें वाचून आपल्या मनास डाग लावून घेण्यापेक्षां तीं हातीं न धरलेलीं बरीं. वाचकांस कांहींतरी सद्बोध व्हावा, त्यांची नीतिमत्ता, परोपकारबुद्धि, त्यांचें धैर्य, साहस इत्यादि सद्गुण वृद्धिंगत व्हावे, अशा हेतूनें तीं मुळींच लिहिलेलीं नसतात. मनोरंजनाकरितांच केवळ तीं असतात. खून, मारामाऱ्या, दरोडे, व्यभिचार, लुच्चेगिरी इत्यादि अनेक निंद्य कृत्यांचें चटकदार वर्णन करून ते वाचकांचीं मनें खराब गोष्टींकडे लावितात. असलीं पुस्तकें वाचण्याची संवय लागली ह्मणजे उदात्त व प्रासादिक काव्येंसुद्धां त्यापुढें रद्द वाटतात! त्यामुळें विचार करण्याची संवय नाहींशी होऊन क्षणिक मनरंजन होण्यांतच मोठी गोडी वाटते. अशा रीतीनें घाणेरडीं पुस्तकें वाचण्याकडे सर्व लोकांची प्रवृत्ति होऊन त्या पुस्तकाचा फार जारीनें खप होतो. ज्या पुस्तकांत अशीं चटकदार व स्वकपोलकल्पित वर्णनें नसतात, तीं पुस्तकें फारशीं कोणी हातीं धरीत नाहींत. आणि यामुळें चांगल्या पुस्तकांचा खप होत नाहीं व तीं छापण्यासही कोणी फारसे धजत नाहींत! याकरितां वाईट पुस्तकें वाचण्याची प्रवृत्ति जेवढी कमी होईल तेवढी बरी.

# भाग ६ वा.

## प्रसिद्ध ग्रंथकार आणि त्यांचें वाचन.

ज्ञानार्जनाच्या कामीं वाचनासारखें दुसरें सुलभ व उत्तम साधन नाहीं, हें पूर्वी सांगितलेंच आहे. वाचन हें खऱ्या विद्वत्तेचें एक मुख्य अंग होय. जन्मतः मनुष्य विद्वान् नसून विद्वत्ता ही त्यास स्वकष्टानें मिळवावी लागते. अशी विद्वत्ता ज्यांनीं संपादन करून आपणांस धन्य ह्मणवून घेतलें, जनसमूहास सन्मार्गास लाविलें, ग्रंथ लिहून पुढील लोकांस ऋणी करून ठेविलें, अशा थोर पुरुषांच्या चरित्रमालिकेचें अवलोकन केल्यास असें आढळून येईल कीं, दिवसांतून त्यांचे तीन चार तास तरी निदान पुस्तकें वाचण्यांत जात असत. पाठशाळेंतील शिक्षणक्रम चालू असतांनाच ते सुरस व उत्तम ग्रंथ वाचीत व शिक्षणक्रम आटोपल्यावर निदान तीन चार वर्षेपर्यंत तरी वाचनांत काळ घालवून नंतर ते ग्रंथ लिहिण्यास लागत. कित्येकांस तर वाचनाची एवढी गोडी लागली होती कीं, जिवांत जीव असे तोंपर्यंत त्यांनीं आपला वाचनाचा हव्यास कधींही सोडिला नाहीं. ऐहिक लाभाची इच्छा धरून ते ग्रंथ वाचीत नसत, तर आपणास ज्ञान मिळावें किंवा सत्य कळावें, हीच त्यांची मोठी इच्छा असे.

सुप्रसिद्ध वक्ता **बर्क** हा दररोज अजमासें तीन तास वाचनांत घालवीत असे. त्यानें एके ठिकाणीं ह्मटलें काहे कीं, "पुष्कळ वाचन चांगलें. परंतु त्या वाचनाचें मनांत चांगलें रूपान्तर करून योग्य प्रसंगीं त्याचा उपयोग करणें हें अधिक चांगलें." ड्रायडनचे गद्य ग्रंथ त्याला फार आवडत असत.

**गिबन** नामक प्रसिद्ध इतिहासकाराच्या चरित्रावरून समजतें कीं, तो सोळा वर्षांच्या वयाचा होण्यापूर्वीच त्यानें आरबी, इराणी, तारतर,

तुर्क वगैरे लोकांविषयीं इंग्रजी भाषेंतील सर्व पुस्तकें वाचून टाकिलीं होतीं. इतिहासाची त्याला फार गोडी असे. ‘ युनिव्हर्सल हिस्टरी [ जगाचा इतिहास ] झेनोफन, हेरोडोटस, या ग्रंथांच्या वाचनापासून त्याच्या मनास आनंद होऊन त्याचें सर्व लक्ष इतिहासाकडे लागलें व पुढें तो मोठा इतिहासकार झाला. वाङ्मयात्मक ग्रंथही तो मोठ्या आवडीनें वाचीत असे. आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी त्यानें ग्रीक भाषा शिकण्यास सुरवात केली, यावरून त्यास विद्येची अभिरुचि केवढी असे हें चांगलें व्यक्त होतें. लहानपणीं व पाठशाळेंत असतांना गिबन याच्या धार्मिक शिक्षणाची फार हेळसांड झाल्यामुळें त्याच्या मनावर जो अनिष्ट परिणाम झाला, तो सर्व आयुष्यभर टिकला. आपल्या वाचनाविषयीं गिबन यानें एक ठिकाणीं लिहिलें आहे, “ पुस्तक हातांत घेऊन त्याचें नांव, विषय, अनुक्रमणिका पाहून टाकिली ह्मणजे कांहीं वेळ पुस्तक मी एकीकडे ठेवीत असें आणि त्या त्या विषयावर आपल्यास किती माहिती आहे हें पहात असें. हें स्वपरीक्षण आटोपलें ह्मणजे मग तें पुस्तक वाचावयास आरंभ करावयाचा. एकीकडे फिरावयाला जाऊन त्या पुस्तकांतील किंवा त्यांतील एखाद्या भागांतील विषयासंबंधानें मला किती माहिती आहे किंवा माझी काय समजूत आहे, मला काय वाटत आहे, हें एकदां पाहिलें ह्मणजे मग त्या पुस्तकानें माझ्या ज्ञानास किती भर घातली हें ओळखण्याची मला पात्रता येत असे. पुस्तककर्त्याचा व माझा अभिप्राय जुळल्यावर मला फार संतोष होत असे. विरोध पडला तरी त्याच्यामुळें माझ्या मनास बळकटी येत असे. ”

**पोप**—बारा वर्षांचा असतांनाच पोप यानें घरींच वाचनास सुरुवात केली. काव्य वाचण्याचा त्याला विशेष नाद असे. वालर, स्पेन्सर ड्रायडन यांचीं काव्यें वाचून त्याला फार आनंद होई. त्यानें तत्वज्ञान व आत्मज्ञान या विषयांवरील ग्रंथ वाचले होते, इतकेंच नाहीं तर यांशिवायही अनेक प्रकारचे ग्रंथ त्याच्या अवलोकनांतून गेले होते. त्याला वाचनाचा इतका नाद होता कीं, त्यापासून त्याची शरीरप्रकृति बिघडेल कीं काय, अशी त्याच्या आप्त मंडळीस भीति पडली होती.

**मिल्टन**—या आंग्ल कवीनें पाठशाळेंत सात वर्षें अभ्यास केल्यावर तो हार्टन नामक गांवीं जाऊन राहिला. तेथें त्यानें पांच वर्षें वाचनांत घालविलीं. तो काळजीपूर्वक पुस्तकांची निवड करी व उपयुक्त अशींच पुस्तकें वाची. त्यास जी माहिती लागे किंवा ज्या उद्देशानें तो पुस्तक हातीं घेई, ती माहिती मिळेपर्यंत किंवा तो उद्देश साध्य होईपर्यंत तो सहसा पुस्तक खालीं ठेवीत नसे. त्याची एक टिपणवही सांपडली आहे. तींत ग्रीक, ल्याटीन, फ्रेंच, इतालियन, इंग्लिश इत्यादि ८० ग्रंथकारांच्या ग्रंथांतील टिपणें आढळून येतात. तसेच त्यानें वाचलेले आराटस, लायकोफ्रन, युरिपिडीस आणि पिंडार हे ग्रंथ हल्लीं उपलब्ध असून त्या ग्रंथावर त्यानें ठिकठिकाणीं केलेलीं जीं विपुल टिपणें आहेत, त्यावरून तो किती लक्ष्यपूर्वक वाचणारा होता, याची पूर्ण साक्ष पटत आहे.

**सर वाल्टर स्कॉट**—ह्या सुप्रसिद्ध कादंबरीकाराची कादंबरी लिहिण्याकडे जी प्रथम प्रवृत्ति झाली, तिला कारणीभूत सर व्हांटिस नामक एका स्प्यानिश कादंबरीकाराचे ग्रंथ होत. सर व्हांटिसच्या कादंबऱ्या तो मोठ्या आवडीनें वाची व त्यांची फार प्रशंसा करी. घरींदारीं किंवा कोठेंही तो असला तरी त्याचें अवलोकन फार लक्ष्यपूर्वक असे. इट्यालियन आणि स्प्यानिश या भाषा त्यास चांगल्या अवगत होत्या. कादंबऱ्या, शिपायांचे पराक्रम, मध्ययुगांतील दंतकथा आणि देशांतील प्रचलित गाणीं इत्यादि वाचण्याकडे त्याचें विशेष लक्ष्य असे. त्याची कल्पनाशक्ति विलक्षण होती आणि तीमुळें त्याला एकांतवास मुळींच दुःखद होत नसे.

**लार्ड मेकॉलेः**--हा प्रसिद्ध निबंधकार व इतिहासकार फार जबर वाचणारा असून कादंबऱ्या वाचण्याचा ह्याला विशेष नाद असे. याची वाचनाची रीत अशी असे कीं प्रत्येक पान वाचून झाल्यावर तो पुस्तक मिटी, आणि काय वाचलें तें सर्व पुनः ध्यानांत आणी. प्रथम प्रथम त्याच्या ध्यानांत कांहींच रहात नसे; परंतु पुढें त्याची स्मरणशक्ति इतकी

वाटली कीं, पुस्तक मिटतांच सर्व मजकूर त्याच्या एकदम ध्यानांत येई, इतकेंच नाहीं तर वाचलेल्या पुस्तकांतील निवडक वाक्यें शब्दशः तो ह्मणून दाखवी. त्याच्या ग्रंथांत शब्दसौष्टव, अर्थगांभीर्य व हृदयंगम वर्णनैशली हीं जीं पदोपदीं आढळूनये तात त्या सर्वांस कारण त्याचें विशेष व मनःपूर्वक वाचन होय. थ्याकरे यानें त्याच्याविषयीं लिहिलें आहे कीं " एक वाक्य लिहिण्यास तो वीस पुस्तकें वाचतो आणि सृष्टिवर्णनाची एक ओळ लिहिण्यास तो शंभर मैल प्रवास करतो. " त्या त्या विषयावरील सर्व ग्रंथ वाचून स्वतः मनाची खात्री झाल्याशिवाय तो आपला ग्रंथ सहसा प्रसिद्ध करीत नसे.

**सर विलियम हामिल्टन**---ह्मणून एक तत्ववेत्ता होऊन गेला. त्याचें ह्मणणें असें आहे कीं, वाचतांना महत्वाच्या भागावर खुणा करून ठेवाव्या. एखाद्या महत्वाच्या ग्रंथाचा अभ्यास करतांना महत्वाच्या शब्दाखालीं किंवा वाक्याखालीं पेन्सिलीच्या रेघा मारण्याचें काम जर चांगलें शहाणपणानें केलेंतर त्या ग्रंथाचा थोडक्यांत गोषवारा काढल्यासारखें होतें. निरनिराळ्या रंगांच्या पेन्सिलींनीं याहीपेक्षां चांगलें काम होतें. ऐतिहासिक दृष्टांतात्मक किंवा इतर तऱ्हेचा मजकूर यांतील भेद दाखविण्यास निरनिराळ्या रंगांच्या पेन्सिली चांगल्या. त्यांच्यायोगानें गोषवारा; व शिवाय त्या ग्रंथांची मीमांसाही होते.

**जॉन मोर्लेः**—यानें एका निराळ्याच वाचनपद्धतीची प्रसंशा केली आहे. तो ह्मणतो कीं, उत्तम पुस्तकाचा अभ्यास एकाच वेळीं होत नाहीं. तीं पुस्तकें वारंवार वाचावीं. वारंवार वाचण्यांत वेळेचा दुरुपयोग होत नाहीं. एकवेळां जीं पुस्तकें वाचण्यासारखीं असतात, तींच शंभरवेळां वाचलीं असतां वेळेचा दुरुपयोग होत नाहीं.

ग्रे, डिकन, ह्यूम, स्विफ्ट इत्यादि ग्रंथकारांसही वाचनाची विशेष अभिरुचि असे. आपल्या इकडील कालिदास, भवभूति, दण्डी, बाण या संस्कृत कवींच्या तसेंच मुकुंदराज, श्रीधर, वामन, मोरोपंत, तुकाराम ह्या महाराष्ट्र कवींच्या श्रवण मनन आणि अवलोकनांतून पूर्वींचे बरेच

ग्रंथ गेले होते. ज्ञानार्जनाच्या व ज्ञानप्रसाराच्या कामीं त्यांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचिलें! पैसा जोडावयाचा ज्याप्रमाणें सतत उद्योग लागतो, त्याप्रमाणें ज्ञानार्जनाच्या कामींही सतत परिश्रम करावे लागतात. 'थेंबेंथेंबें तळें सांचे' या ह्मणीप्रमाणें ज्ञान हें अल्प अल्प अंशानें प्राप्त होऊन सतत परिश्रमानें त्याचा समुद्र बनतो.

लोकांत मान्यता किंवा प्रसिद्धी होण्यास कित्येक ग्रंथकारांस वर्षांनुवर्षें लागलीं. बहुतेक ग्रंथकार मध्यवयांत किंवा उत्तरवयांत प्रसिद्धीस आले. टेनिसन आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं उत्तम कवी ह्मणून ठाऊक झाला. ब्राऊनिंग हा साठ वर्षांचा होईपर्यंत तो उत्तम कवि आहे, हें लोकांस मुळींच माहीत नव्हतें. गोल्डस्मिथ यानें डेझर्टेडव्हिलेज ही सुरस कविता आपल्या वयाच्या ४६व्या वर्षीं प्रसिद्ध केली, तेव्हांपासून त्याची लोकांत ख्याति झाली. मिल्टन कवीनें 'प्याराडाईस लास्ट' व 'प्याराडाईस रिगेंड' हीं उत्तम काव्यें आपल्या ह्मातारपणीं लिहिलीं. यावरून आमच्या वाचकांनीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, नुसती बुद्धि असून तिचा फारसा उपयोग होणार नाहीं, तर त्या बुद्धीस वाचनरूपी जीवन घालून ती वृद्धिंगत केली पाहिजे, व सतत परिश्रम करून आपल्या अंगीं विशेष विद्वत्ता आहे असें जगाच्या प्रचीतीस आणून दिलें पाहिजे.

# भाग ७ वा.

## स्मरणशक्ति व ती वाढवावी कशी.

स्मरणशक्तीचा वाचनाशीं फार निकट संबंध आहे. पुस्तकें वाचून मिळविलेलें ज्ञान ध्यानांत रहाण्यास स्मरणशक्ति चांगली असली पाहिजे. ध्यानांतच जर कांहीं रहात नसेल, तर वाचनाचे श्रम व्यर्थ कशाला? अवलोकन, संभाषण, वाचन, मनन इत्यादि साधनांच्या योगानें महत्प्रयासानें ज्ञान मिळवावयाचें, तें विसरून जाण्याकरितां नव्हे, तर त्या ज्ञानाचा आपणांस नेहमीं उपयोग व्हावा, ही प्रत्येक मनुष्याची मनापासून इच्छा असते. दहावीसदां ग्रंथ वाचून जी गोष्ट एकाच्या ध्यानांत रहात नाहीं, तीच एकदां वाचण्यानें दुसऱ्याच्या ध्यानांत रहाते. एखादा वाटसरू मार्ग क्रमित असतां तृषेनें विव्हळ झाला असतांना त्यास उत्कृष्ट विहीर लागावी, परंतु त्या जवळचें भांडें इतकें फुटलेलें असावें कीं त्यांतून थेंबभरसुद्धां पाणी त्याच्या हातीं पडूं नये, अशी स्थिति झाली असतां तो वाटसरू किती निराश होईल बरें! तेंच त्याचें भांडें धड असतें तर त्यानें तेथें आपली तहान भागविली असती आणि प्रवासांत पिण्याकरितां आपणाबरोबर आणखी पाणी घेतलें असतें. तद्वत् स्मरणशक्ति हें एक भांडें असून या भांड्यांत मनुष्यास आपलें सर्व ज्ञान, सर्व अनुभव, सांठवून ठेवितां येतो. ज्ञानाचा किंवा अनुभवाचा पाया बहुतेक स्मरणशक्तीवर अवलंबून आहे. याकरितां स्मरणशक्ति ह्मणजे काय व ती वाढवावी कशी, याविषयीं प्रत्येकानें अवश्य माहिती करून घेतली पाहिजे.

आपण जी गोष्ट एकदां पाहिली असेल किंवा ऐकिली असेल, ती आपणास पुढें पाहिजे त्यावेळीं ज्या शक्तीच्या योगानें पुनः ध्यानांत आणतां येते, त्या शक्तीस स्मरणशक्ति असें ह्मणतात. पशुपक्षी इत्यादि

प्राण्यांस स्मरणशक्ति नाहीं. ती मनुष्याच्याच ठिकाणीं परमेश्वरानें ठेविली आहे. सृष्टिक्रमांत मनुष्यप्राणी ईश्वराच्या खालोखाल असून तो जगांतील सर्व वस्तूंवर व प्राणिमात्रांवर आपला पूर्ण अंमल गाजवीत आहे, याचें कारण हेंच कीं, जगन्नियंत्यानें त्यास बुद्धि व स्मरणशक्ति या दोन अमोल देणग्या दिल्या आहेत. जेवढी बुद्धीची उपयुक्तता आहे, तेवढीच स्मरणशक्तीची आहे. बुद्धीच्या योगानें मनुष्यास ज्ञान प्राप्त होतें, आणि स्मरणशक्तीच्या योगानें तें त्यास सुरक्षित सांठवून ठेवितां येतें. स्मरणशक्तीस कोठाराची उपमा देण्यांत येते, ती वास्तविक पहातां बरोबर नाहीं. कोठारास कसला तरी आकार असून अमुक एक मण किंवा खंडी इतकाच माल त्यांत राहील, जास्त रहाणार नाहीं. तसें स्मरणशक्तीचें नाहीं. विचार हे जड पदार्थ नसल्यामुळें ते सांठविण्याचें कोठार जी स्मरणशक्ति तीस आकार नाहीं, आणि जडत्वही नाहीं. मेंदूसारख्या लहानशा जागेंत जरी तिचा समावेश आहे, तरी तिची व्यापकता इतकी आहे कीं, मनुष्यानें आजन्म किती जरी ज्ञानाच्या राशीच्याराशी मिळविल्या तरी त्या सगळ्यांचा तींत समावेश होऊन आणखी जागा नेहमीं रिकामी असावयाचीच. ज्ञान साठविण्यास स्मरणशक्तींत जागा शिल्लक नाहीं, अशी गोष्ट कधीं घडून आली असेल, असें संभवत नाहीं.

स्मरणशक्ति सर्वांस सारखी असते असें नाहीं. कोणाच्या ठिकाणीं ती जास्त असते, व कोणाच्या ठिकाणीं कमी असते. तरी पण मनुष्यानें प्रयत्न केल्यास त्यास आपली स्मरणशक्ति बरीच वाढवितां येतें. अष्टावधानी, शतावधानी या लोकांची स्मरणशक्ति जरी जन्मत: अधिक असली, तरी स्वप्रयत्नानें ते ती पुढें वाढवितात. आणि त्याचमुळें साधारण लोकांस ते आपल्या अलौकिक स्मरणशक्तीच्या योगानें अगदीं थक्क करून सोडतात. स्मरणशक्ति वाढविणें हें काम फार कठीण व महत्प्रयासाचें आहे. तें एक दोन दिवसांत किंवा महिन्या दोन महिन्यांत साध्य होण्यासारखें नसून त्याकरितां वर्षानुवर्षें खपलें पाहिजे.

आपणास ज्या संवयी लागल्या असतील त्या समूळ नाहींशा करून त्या जागीं नवीन संवयी लाविल्या पाहिजेत. जुन्या संवयींस फाटा देऊन नवीन लावणें हें काम किती कठीण आहे, हें आमच्या वाचकांच्या पूर्ण अनुभवास आलेंच असेल. त्याविषयीं जास्त लिहिण्याची येथें आवश्यकता नाहीं.

स्मरणशक्ति हें विचारांचें कोठार आहे ह्मणून पूर्वीं सांगितलेंच आहे. कोठारांत तऱ्हतऱ्हेच्या लहान मोठ्या अशा अनेक वस्तु ठेवणें असल्यास त्यांचें वर्गीकरण करून त्या शिस्तवार ठेविल्या पाहिजेत, व त्या वारंवार पहात गेलें पाहिजे. ह्मणजे कोणती वस्तु कोठें आहे, हें वेळेवर सहज चटकन् सांगतां येईल. त्याचप्रमाणें विचारांचें आहे. जें जें आपण ऐकतों किंवा पहातों, तें प्रथम लक्षपूर्वक मनन करून ध्यानांत ठेविलें पाहिजे. लक्षपूर्वक व शांतपणें समजून घेणें ह्मणजे अर्धेअधिक काम झाल्यासारखें आहे. पुष्कळ मनुष्यांची चूक होते ती या ठिकाणींच. ते कोणतीही गोष्ट बरोबर पहात नाहींत, किंवा ऐकत नाहींत, अथवा तीविषयीं फारसा विचारही करीत नाहींत. यामुळें ती त्यांस बरोबर समजत नाहीं. किंवा त्यांच्या बरोबर ध्यानांतही रहात नाहीं. जें जें आपण पहाल किंवा ऐकाल त्याविषयीं प्रथम नीट लक्षपूर्वक विचार करा. आपले पूर्वींचे विचार व नवीन विचार यांची वेळींच योग्य सांगड घाला. असें केल्यानें बऱ्याच गोष्टी सहज आपल्या ध्यानांत रहातील. जीं कामें तुह्मांस करावयाचीं असतील, तीं चांगल्या रीतीनें व लक्षपूर्वक करण्याची संवय अवश्य लाविली पाहिजे. लक्ष न देतां अर्धवट कोणतेंही काम करण्यापेक्षां तें न करणें बरें.

प्रथमतः मनुष्याचा स्वभाव स्थिर व शांत असला पाहिजे. जे लोक घांदल्या व गडबड्या स्वभावाचे असतात, लक्षपूर्वक पहाण्याची, ऐकण्याची किंवा वाचण्याची ज्यांना मुळींच संवय नसते, अशा लोकांच्या ध्यानांत क्वचित्च कोणतीही गोष्ट रहाते. याचें कारण असें कीं, लक्षपूर्वक अवलोकन करण्याची जेव्हां संधि असते, तेव्हां त्यांनीं दुर्लक्ष्य

केल्यामुळें त्यांच्या मनावर बरोबर ठसा उमटत नाहीं, आणि त्यामुळें त्यांच्या ध्यानांत ती गोष्ट रहात नाहीं. कदाचित् जरी राहिली तरी वेळेवर ती त्यांना बरोबर आठवत नाहीं. गडबड्या स्वभावाच्या मनुष्याच्या ठिकाणीं तर्कशक्ति किंवा समर्पकपणा फारच थोडा असतो. त्याची विचारशक्ति कोती असते. त्यानें जरी पुष्कळ प्रवास केला किंवा पुष्कळ ग्रंथ वाचले, तरी त्याच्या ज्ञानभांडारांत फारशी भर पडत नाहीं.

कांहीं लोक शून्यवृत्तीचे असतात. सृष्टींतील अनेक वस्तू ते पहातात. संवाद, वाचन इत्यादिकांच्या योगानें त्यांस पुष्कळ नवीन गोष्टी कळून येतात; परंतु त्यांचे ध्यानांत कांहीं रहात नाहीं. याचें कारण असें कीं, जो विषय ते हातीं घेतात, त्याकडे त्यांचें क्वचित्च लक्ष्य असतें. त्यांच्या मनांत दुसऱ्याच एखाद्या विषयाची तंद्री लागलेली असते. त्यामुळें ते दोन्हीही विषयांस अंतरतात. जो विषय हातीं घेतलेला असतो तो त्यांस समजत नाहीं, आणि ज्या विषयाची तंद्री लागलेली असते तोही पुरता कळत नाहीं. सारांश, 'इदं च नास्ति न परं च लभ्यते' अशी त्यांची स्थिति होते. शून्यवृत्ति ही एक मानसिक महाव्याधि आहे. ती जडली असतां मनुष्य डोळे असून अंधळा होतो; कान असून बहिरा होतो; त्याची विचारशक्ति, स्मरणशक्ति वगैरे सर्व शक्ती नाहींशा होतात! सारांश, शून्यवृत्ति हें एकप्रकारचें वेडच आहे, असें ह्मटलें असतां फारसें गैरवाजवी होणार नाहीं. याकरितां ही व्याधि जडूं न देण्याविषयीं प्रत्येकानें फार खबरदारी घेतली पाहिजे. एकदां जडली कीं, ती हळू हळू वाढत जाते, आणि पुढें मनुष्य अगदीं कुचकामाचा होतो!

कोणतीही गोष्ट ध्यानांत रहाण्यास तिकडे लक्ष दिलें पाहिजे. लक्ष न दिलें तर ती ध्यानांत रहात नाहीं. एखाद्या भिंतीवर असंख्यात चित्रें काढलेलीं असून तीं आपण पाहूं लागलों, तर त्या चित्रांपैकीं ज्या चित्रांकडे आपलें लक्ष विशेष वेधलें जाईल, तींच आपल्या ध्यानांत

रहातील. इतर आपल्या ध्यानांत रहाणार नाहींत, इतकेंच नाहीं, तर तीं आपण पाहिलीं कीं नाहीं याची आपणास आठवणसुद्धां होणार नाहीं. लक्ष नसलें ह्मणजे आपल्याशीं कोण बोलत आहे, आपण कोणीकडे पहात आहों, आपल्या सभोंवती काय चाललें आहे, हें मनुष्यास कांहींच कळत नाहीं. कोणतीही गोष्ट लक्षपूर्वक पहाण्याचा निश्चय केला असतां प्रथम अंमळसे श्रम पडतात; परंतु पुढें तशीच संवय होते. एकाग्र मनानें कोणत्याही विषयाचें परिशीलन झालें असतां, तो थोडक्या काळांत चांगला समजतो व आपल्या ध्यानांत सहज रहातो. आंधळ्यास स्मरणशक्ति विशेष असते, याचें कारण त्याच्या मनाची एकाग्रता विशेष असते हें होय. **ब्रूटस्**विषयीं असें सांगतात कीं, ज्या लढाईवर सर्व ज्ञात पृथ्वीचें स्वामित्व अवलंबून होतें, अशा फारसेलिया येथील लढाईच्या आदल्या रात्रीं तो आपल्या तंबूंत पुस्तक वाचीत व लेखणीनें त्यावर खुणा करीत स्वस्थ बसला होता! यावरून त्याच्या मनाची एकाग्रता केवढी होती, याचा वाचकांनींच विचार करावा! एकाग्र मनानें जें जें कांहीं कराल, तें तें तुमच्या चांगलें ध्यानांत राहील.

विचारानें विचार वाढतात. ज्या गोष्टींत प्रथम आपली मति चालत नाहीं, त्याच गोष्टींविषयीं आपण विचार करूं लागलों कीं, त्या आपणास सहज कळतात. कार्यकारणभाव समजतो. विचारशक्तीस घर्षण होत गेल्यानें तीस तीव्रता येते, व त्यामुळें लहानसहान गोष्टीसुद्धां बिनचूक आपल्या ध्यानांत रहातात. मन हें लोखंडासारखें असून विचारांच्या योगानें तें चकचकीत किंवा तरतरीत रहातें. विचार कमी पडले कीं, तें तेव्हांच गंजून जातें. दुसऱ्यांच्या विचारावर किंवा सल्लामसलतीवर अवलंबून रहाणें, हें दुर्बलतेचें चिन्ह होय. प्रत्येक मनुष्यानें स्वतः विचार करून बरेंवाईट हुडकून काढून आपला निश्चय ठाम ठरविला पाहिजे. आपले पूर्वज वेदस्मृतींसारखे मोठमोठाले ग्रंथ पाठ करीत असत. होमर कवीचे समग्र ग्रंथ पाठ ह्मणून दाखविणारे लोक ग्रीक लोकांत होते. संवयीच्या योगानें पाठान्तरशक्ति वाढते. जे श्लोक पाठ करण्यास प्रथम

तासाचे तास लागतात तेच पुढें पुढें सहज पाठ होतात. लहान वयांत थोडें पाठान्तर करणें बरें. परंतु पाठ करण्याचा बोजा मनावर फार पडतां कामा नये. त्यामुळें मेंदूवर अति श्रम पडून तो बिघडतो. एकाच वेळीं एका दमांत पाठ करून मेंदूस श्रमविण्यापेक्षां पुनः पुनः लक्षपूर्वक एकाग्र चित्तानें वाचून पाठ करणें अधिक चांगलें. * या तत्वास अनुसरून पूर्वींची पाठांतर करण्याची पद्धति प्राथमिक शाळांतून बंद करण्यांत आली असून तिच्या जागीं बालोद्यानशिक्षणपद्धतीचा दिवसेंदिवस अधिक प्रसार होत आहे. बालोद्यानपद्धतीपासून विचारशक्ति वाढत जाऊन स्मरणशक्तीसही चांगली मदत होते.

ऐकलेल्या किंवा वाचलेल्या विषयांवर वादविवाद केला असतां किंवा ते लिहून काढले असतां अधिक ध्यानांत रहातात. थ्युसिडायडीस याची भाषासरणी आपणास यावी ह्मणून डिमॉस्थेनिस यानें त्याचा इतिहास आठ वेळां लिहून काढला होता. ॲडिसनच्या स्पेक्टेटरचा एक भाग बेंजामिन फ्रांक्लीन याच्या हातीं पडला, तेव्हां त्या पुस्तकांतील भाषासरणी व विषय मांडणी पाहून आपणासही असें लिहितां यावें, असें बेंजामिन यास वाटलें. त्याकरितां तो त्या पुस्तकांतील एक एक पारिग्राफ लक्षपूर्वक वाची व पुस्तक मिटून ठेऊन तशाच रीतीनें व त्याच शब्दांनें लिहून काढण्याचा प्रयत्न करी. प्रथम प्रथम त्यास चांगलें लिहितां येईना. परंतु पुढें स्पेक्टेटरसारखे पारिग्राफ तो भराभर लिहून काढूं लागला. इंग्लंदांतील सुप्रसिद्ध मुत्सद्दी सर राबर्ट पील हा आपल्या काळचा मोठा जबरदस्त वादविवाद करणारा असून त्याची बुद्धिमत्ता येवढी वाढली, ती गोष्ट तेथें अवश्य सांगितली पाहिजे. तो प्रार्थनामंदि-

---

* टीप:—जे कांहीं पाठ करावयाचें असेल त्याचा अर्थ समजून घेऊन नंतर पाठ करावें.

अर्थाविण पाठ कासया करावें।<br>व्यर्थाच मरावें घोकोनियां॥

रामदास.

रांतून घरीं आला ह्मणजे तूं आज काय ऐकलेंस ह्मणून त्याचा बाप त्यास नियमानें विचारी. प्रारंभीं त्यास ठळक ठळक गोष्टीसुद्धां ध्यानांत ठेवून सांगतां येत नसत. परंतु पुढें देवळांतील भाषणें मोठ्या काळजीनें ध्यानांत ठेवून बापानें विचारल्यावर तो तीं त्यास सांगू लागला. अशा रीतीनें त्यास लक्षपूर्वक ऐकण्याची संवय लागून त्याची स्मरणशक्ति इतकी वाढली कीं, मंदिरांत ऐकलेलीं व्याख्यानें तो जणूं काय पाठ ह्मणून दाखवूं लागला! सारांश, वाचलेल्या किंवा ऐकिलेल्या गोष्टी लिहून काढल्या असतां किंवा त्याविषयीं वादविवाद केला असतां, त्या बऱ्याच ध्यानांत रहातात असा अनुभव आहे.

स्मरणशक्ति ही मनुष्याच्या स्वराप्रमाणें आहे. स्वभावतःच जसा कित्येक मनुष्यांचा स्वर मधुर असतो व पुढें अभ्यास केल्यानें ‘ अधिकस्य अधिकं फलम् ’ या न्यायानें अति उत्तम होतो, तद्वत् कित्येकांची स्मरणशक्ति लहानपणापासूनच अधिक असते, अशा लोकांनीं प्रयत्न केल्यास ते एकपाठी निघतील किंवा शतावधानी होतील यांत नवल काय? विक्रम राजाच्या पदरीं एकपाठी कवि असून त्यांच्यासमोर कोणी कविता ह्मणून दाखविली कीं, ते ती कविता जुनीच आहे असें ह्मणत व प्रत्यंतराकरितां बिनचुक पाठ ह्मणून दाखवीत. सिनेकानें एका ठिकाणीं लिहिलें आहे कीं, अथेन्स शहरांत पूर्वीं एक सेनापति असे, त्याची स्मरणशक्ति फार विलक्षण असे. त्याच्या हाताखालीं असलेल्या अडीच तीन हजार शिपायांचीं नांवें त्याच्या अगदीं मुखोद्गत असत. अशी विलक्षण स्मरणशक्ति फारच थोड्या लोकांस असते. परंतु स्मरणशक्ति कशी वाढवावी याविषयीं थोडक्यांत जें वर सांगितलें आहे तें वाचकांनीं ध्यानांत बाळगून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न केला असतां, त्यांना विशेष फायदा होईल, व अल्प प्रयासानें बऱ्याच गोष्टी त्यांच्या चांगल्या ध्यानांत रहात जातील.

# भाग ८ वा.

## वाङ्मय.

वाङ्मय हा शब्द जरी लहान आहे, तथापि या शब्दाची व्यापकता अति मोठी आहे. वाङ्मय ही संज्ञा काव्य, कादंबऱ्या, नाटकें, सुरस व मार्मिक लेख, इतिहास, वक्तृत्व इत्यादि विषयांसच साधारणतः लावण्यांत येत असते. कित्येक लोक वाङ्मयांत शास्त्रांचाही समावेश करतात. परंतु शास्त्रें अनेक असून त्यांचा विस्तारही प्रचंड असल्यामुळें शास्त्र आणि वाङ्मय हीं निरनिराळीं समजणें बरें. प्रत्येक राष्ट्राच्या वाङ्मयावरून त्या लोकांची प्रगति, अवनति, यांच्या रीतिभाती, त्यांचे आचारविचार वगैरे अनेक गोष्टी आपणांस सहज कळून येतात. आरशांत पडलेलें प्रतिबिंब पाहून ज्या पदार्थाचें तें प्रतिबिंब असेल त्या पदार्थांविषयीं दृश्य तेवढ्या गोष्टी आपणांस सांगतां येतात, तद्वत् वाङ्मय हा एक आरसा असून त्या आरशांत ती ती भाषा बोलणाऱ्या लोकांचें अंतरंग व बहिरंग स्पष्ट दिसून येतें. दोन हजार वर्षांपूर्वी सुधारणेच्या शिखरीं पोहोंचलेलीं ग्रीक व रोमन राष्ट्रें नामशेष झाल्यास आज किती तरी शतकें झालीं असूनही, त्यांचें जें वाङ्मय उपलब्ध आहे, त्यावरून ते लोक कसे होते, त्यांचें आचारविचार कसे होते, याची आपणास सहज कल्पना बांधतां येते.

फार लांब कशाला? आर्यलोक हे जगांत अत्यंत प्राचीन लोक असून प्राचीन काळापासून त्यांच्या आचारविचारांत जो फरक होत गेला आहे, वेळोवेळीं त्यांनीं जें ज्ञान संपादन केलें आहे, तें सर्व आज कायम आहे, त्याचें कारण त्यांचें वाङ्मय होय. राष्ट्राच्या उन्नतीस वाङ्मय हें जितकें कारणीभूत असतें, तितकी इतर कोणतीही दुसरी गोष्ट असूं शकत नाहीं. आज एकोणिसावें शतक संपत आलें असून आपल्या देशांतील भिल्ल, कोळी, वारली, गोंड इत्यादि जंगली लोक

अद्यापि अज्ञानांधकारांत कां रहावें, सुधारणेचा त्यांना गंधही कां नसावा? याचें कारण हेंच कीं, त्यांच्यांत ग्रंथसंग्रह नाहीं; आणि ते लिहिणें वाचणें शिकत नाहींत. जोंपर्यंत ते लिहिणें वाचणें शिकून जगांतील अनुभवांचा फायदा घेणार नाहींत, तोंपर्यंत त्यांची स्थिति हल्लीं आहे अशीच कायम राहील! वाङ्मय हें नदाप्रमाणें आहे. नदाचा उगम एखाद्या झऱ्यांपासून असून पुढें त्यास अनेक ओढे व नद्या मिळाल्यामुळें तो प्रचंड होतो. तद्वत् वाङ्मयग्रंथसंख्या हळूहळू वाढून पुढें प्रचंड ग्रंथभांडार होतें. वाङ्मयाची जी येवढी थोरवी वर्णिली आहे, याचें कारण हें कीं, त्यापासून मनुष्यास मनुष्यपणा येऊन कालगतीनें तो देवकोटींत बसण्याच्या योग्यतेचा होतो.

लिहिणें वाचणें आलें ह्मणजे वाङ्मयरूपी सरस्वतीमंदिराची किल्ली आपल्या ताब्यांत आली असें समजावें. मग या मंदिरांत प्रवेश करून तेथें सांठविलेल्या ज्ञानामृताचें सेवन करण्यास आपणांस मुळींच अडचण पडणार नाहीं. तेथील ज्ञानभांडार अमित असून त्या मानानें मनुष्यांचें जीवित जरी अल्प आहे, तरी मनुष्यानें निराश न होतां वामनपंडिताची खालीं लिहिलेली उक्ति ध्यानांत ठेवावी.

आकाश अंत न कळोनिहि अंतरिक्षीं।
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी॥

आणि साध्य होईल तेवढें ज्ञान मिळविण्याची मुळींच हयगय करूं नये. **शास्त्रीय** ग्रंथाविषयीं येथें फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. कारण त्यांत विवक्षित शास्त्राविषयींच विचार केलेला असतो. त्या ग्रंथांतील विचार कठीण असल्यामुळें त्यांची भाषा व विषयप्रतिपादन हीं जितकीं सुलभ असतील तितकीं चांगलीं. त्यामुळें ते ग्रंथ समजण्यास फारशी अडचण पडत नाहीं. अगोदरच ते विषय दुर्बोध आणि तशांत भाषासरणी व प्रतिपादनपद्धति दुर्बोध असली कीं, ते ग्रंथ अधिक कठीण होतात.

वाङ्मयाचा मुख्यभाग ह्मटला ह्मणजे कल्पनात्मक ग्रंथांचा असतो. कल्पनात्मक ग्रंथांचे मुख्य दोन भाग—काव्य आणि कादंबरी. काव्याचे

दोन प्रकार असतात--श्राव्य आणि दृश्य. दृश्य साधनांची मदत घेऊन कृति व काव्य यांच्याद्वारें जनमनरंजनाचा जो प्रकार आहे, त्यास नाटक असें ह्मणतात. या कल्पनात्मक लेखाचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे वाचकांच्या मनांतील भिन्नवृत्ति क्षुब्ध करून त्यांच्या मनावर इच्छित परिणाम करण्याचा असतो. व तो ज्यास उत्तम साधतो त्यासच कवींत किंवा कादंबरीकारांत आद्यस्थान मिळतें.

**काव्यः**—कोणत्याही राष्ट्राच्या वाङ्मयाचा लक्ष्यपूर्वक शोध केल्यास असें आढळून येईल कीं, वाङ्मयास प्रारंभ प्रथम काव्यापासून होऊन नंतर त्यांत गद्यग्रंथ निर्माण होतात. वाङ्मयांत कवितेस प्रथम स्थळ देण्यांत येतें. याचें कारण असें कीं, काव्याचा परिणाम लोकांवर फार होत असून त्यांत सुरस व थोडक्या शब्दांत उत्तमोत्तम विचार गोंविलेले असतात. ‘ कवित्वं दुर्लभं लोके शक्तिस्तत्र सुदुर्लभा ’ असें संस्कृतांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे. व अशाच अर्थाची इंग्रजींत एक ह्मण आहे ती अशी. ‘ कवि उपजत असून शिकून तयार होत नसतात. ’ कवीस अंतर्दृष्टि विशेष असून ते फार मर्मज्ञ असतात.* त्यांचें अंतःकरण अत्यंत कोमल व दयार्द्र असून विषयांत अगदीं तल्लीन असल्यामुळें त्यांचे लेख हृदयंगम होतात; आणि याचमुळें त्यांचे ग्रंथ चिरकाल आदरास पात्र होतात. व्यास, वाल्मिकी या कवींचीं नांवें संस्कृत ग्रंथांत चिरायु झालीं आहेत. तसेंच ग्रीस देशाचें नांव निघालें कीं, होमरची आठवण होते. रोम ह्मटलें कीं, व्हर्जिल पुढें येतो इंग्लंडचें नांव निघतांच शेक्सपियरचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं.

---

* कवींचें वर्णन करतांना रामदास स्वामींनीं लिहिलें आहेः—

कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हें नाना कळांचें जीवन ।
नाना सद्विद्यांचें भुवन । यथार्थ होय ॥
कवि प्रेमळांचा प्रेमळ स्थिति । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती ।
कवि उपासकांची वाढ कीर्ति । विस्तारली ॥
कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे वोघ लोटले ।
नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥

हिंदुस्थान ह्मटलें कीं, कालिदासाची सोज्वल कीर्ति नजरेसमोर फडकूं लागते. महाराष्ट्र हा शब्द उच्चारतांच मोरोपंत आणि तुकाराम ह्या कवींच्या काव्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. सूर्यकिरणांच्या तापामुळें विव्हल झालेल्या प्रवाशास ज्याप्रमाणें भव्य व गर्द छायेचा आम्रवृक्ष आपल्या छायेनें आनंद देतो, आपल्या मुळांच्यायोगानें आजुबाजूची जमीन घट्ट थोपून धरते व छायेच्या खालच्या जमिनीवर फारशीं झुडुपें किंवा गवत वाढूं देत नाहीं. तद्वत् उत्तम कवि आपल्या वाणीनें वाचकांचीं मनें रिझवून त्यांना सन्मार्गास लावतात. शोकाकुल किंवा संतप्त झालेल्या मनुष्यास शांतिसुख देतात. समाजास स्थिरता आणतात. त्यांच्यामुळें लहानसहान ग्रंथकारांचीं लोकांत फारशी प्रतिष्ठा वाढत नाहीं. अशा श्रेष्ठकवींची सुश्राव्य व रसाळ काव्यें वाचून मन उदात्त होतें! परंतु अलीकडे काव्य वाचण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस कमी होत असून कादंबऱ्या किंवा नाटकें वाचण्याकडे लोक बहुतकरून आपला काळ खर्च करूं लागले आहेत. सारांश, दूध सोडून ताकावरच ते आपली तृप्ती करून घेत आहेत, असें ह्मटलें पाहिजे.

गद्यापेक्षां पद्य पाठ करण्यास सुलभ असून, त्यांत थोड्या शब्दांत अर्थगांभीर्य विशेष असतें. तसेंच तें मनोरंजक असून एकदां पाठ असलें ह्मणजे वाटेल त्यावेळीं ह्मणून आपणास त्यापासून करमणूक होते. सुरस व बोधपर कविता पाठ असल्या ह्मणजे त्यांचा वर्तनावर इष्ट परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं.

येथवर काव्याची जी स्तुति केली आहे, ती उत्तम काव्यासच अनुलक्षून होय. काव्यांतही कांहीं टाकाऊ व अश्लील काव्यें असतात. तीं न वाचणें चांगलें! प्लेटोनें जो एके ठिकाणीं इशारा दिला आहे तो ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. तो ह्मणतो “ ज्यांच्याकडे स्वदेशहिताची जबाबदारी आहे, त्यांनीं संगीतावर सक्त नजर ठेविली पाहिजे; कारण मर्यादेचें अथवा कायद्याचें उल्लंघन कोणाचेही लक्षांत न येतां करमणुकीच्या रूपानें प्रथमतः या संगीताचेद्वारा होऊं लागतें.

अमर्यादपणा अथवा उच्छृंखलपणा यांचा या द्वारानें मनांत प्रथम शिरकाव होतो आणि मग हळू हळू रीतभात व वागणूक यांतही याचे परिणाम दृष्टीस पडूं लागतात." संगीत नाटकांतील अश्लील पदें आणि शृंगारविषयक लावण्या यांचा आमच्या समाजांत बराच प्रसार झालेला आढळून येत आहे, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. व त्यापासून होणारे अनिष्ट परिणाम जरी स्पष्ट कळून आले नाहींत, तरी ते झाल्याशिवाय कधींही रहात नाहींत.

**कादंबऱ्या :**—ज्यांना लिहिणें, वाचणें येतें, अशा साधारण लोकांचीं करमणुकीचीं पुस्तकें ह्मटलीं ह्मणजे कादंबऱ्या होत. कवीची जेवढी योग्यता आहे, तेवढीच कादंबरीकाराची आहे. काव्यापेक्षां कादंबऱ्या लोकांस विशेष प्रिय होतात, याचें कारण असें कीं, कादंबरींत संसाराचीं व मनुष्यस्वभावाचीं चित्रें रेखटलेलीं असतात. काव्यांत तीं नसतात असें नाहीं; परंतु त्यांत अज्ञात ज्ञानाचा किंवा तत्वज्ञानाचा भाग विशेष असतो. मनुष्यस्वभावास तत्वज्ञान विशेष आवडत नसून ज्या गोष्टींत मानवी प्राण्यांची हकीकत, त्यांचा इतिहास, त्यांचीं सुखदुःखें, त्यांच्यावरील घोर प्रसंग इत्यादि गोष्टी असतात, अशा गोष्टी वाचतेवेळीं किंवा ऐकतेवेळीं त्यांच्या मनोवृत्ति तल्लीन होतात; त्यांच्या अंगावर रोमांच उभे रहातात; किंवा त्यांस आनंदाच्या उकळ्या फुटत असतात. कादंबरी लिहिणें फारसें कठीण नसल्यामुळें कोणासही त्या विषयावर थोडें फार लिहितां येतें. आणि त्यामुळें नीरस आणि हलक्या प्रतीच्या कादंबऱ्या पुष्कळ अस्तित्वांत येतात!

कादंबऱ्या वाचणें चांगलें किंवा वाईट यांविषयीं बराच मतभेद आहे, आणि तो असण्यास सबळ कारणेंही आहेत. त्याविषयीं आह्मांस येथें थोडेंसें दिग्दर्शन केलें पाहिजे. रूपकें, दृष्टांतरूप कथा किंवा कल्पित गोष्टी सांगून श्रोत्यांचीं मनें वळविण्याचा प्रकार फार प्राचीन काळापासून चालत आला आहे. महाभारतासारख्या प्राचीन ग्रंथांतही रूपकें किंवा दृष्टांतरूप कथा आढळून येतात. गौतमबुद्ध, साक्रेटीस, येशूख्रिस्त

वगैरे महात्मे दृष्टांतरूप संवादानें लोकांचीं मनें वळवीत व त्यांच्या हृदयांत प्रकाश पाडीत असत. कादंबऱ्या ह्मणजे दृष्टांतरूप कथाच होत. दृष्टांतरूप कथांपासून जसें पुष्कळ शिकण्यासारखें असतें, तसें कादंबऱ्यांपासूनही असतें. ऐतिहासिक गोष्टी, नीतिसिद्धांत, धर्माचरण, व्यवहारज्ञान, स्वभाववैचित्र्य, दूरदर्शीपणा, उद्योग वगैरे अनेक अत्यंत उपयुक्त गोष्टी ज्या कादंबऱ्यांपासून शिकतां येण्यासारख्या असतात, अशा कादंबऱ्यांची जेवढी प्रशंसा करावी तेवढी थोडीच होणार आहे. सत्याविषयीं प्रीति, सत्याकरितां सोसलेलीं संकटें, असत्याविषयीं तिरस्कार इत्यादि गोष्टी कादंबऱ्यांत सांगितल्या असल्यास त्यांस कोण बरें नांवें ठेवील? फार तर काय, ज्या कादंबऱ्या मनोरंजनाकरितांच लिहिलेल्या असून ज्या निरुपद्रवी असतील व ज्यापासून वाचकांच्या मनावर अनिष्ट परिणाम होणार नाहींत, अशा कादंबऱ्यांस वाईट ह्मणण्यास कोणीही धजणार नाहीं.

परंतु सर्वच कादंबऱ्या अशा धोरणानें लिहिल्या असतात, असें नाहीं. पुष्कळ कादंबऱ्यांतून असत्य व अश्लील गोष्टी लिहिलेल्या असल्यामुळें त्यापासून वाचकांच्या मनावर वाईट ठसा उमटतो. वाचकांच्या चांगल्या मनोवृत्ति जागृत न करितां त्या वाईट मनोवृत्ति प्रक्षुब्ध करितात. विचारापेक्षां विकारांचीच ते अधिक प्रवृत्ति करितात. खून, दरोडे, रस्तेलुटी, तसेच व्यभिचार, लुच्चेगिऱ्या, कावेबाजपणा इत्यादि निंद्य गोष्टींचें तिखटमीठ लावून वर्णन करून आपल्या कादंबऱ्या जितक्या अधिक मनोरंजक होतील, तितक्या त्या करण्याचा प्रयत्न कित्येक कादंबरीकार करूं लागले आहेत, व असल्या कादंबऱ्यांचा विशेष खप होतो, असा अनुभव आल्यामुळें त्यांत त्यांना अधिक अधिक उत्तेजन मिळत आहे. असल्या कादंबऱ्या मुळींच प्रसिद्ध न होतील तर बऱ्या. ज्या गोष्टी पाहून किंवा ऐकून अंगावर रोमांच उभे रहातात, त्यांचीं लांबलचक वर्णनें वाचून आपलें मन तल्लीन होतें; व वाईट वाटण्याचें एकीकडेसच राहून असे ग्रंथ वाचण्याची आपणांस चटक लागते. असे ग्रंथ

नेहमीं आपल्या वाचनांत आले ह्मणजे त्यांपासून आपल्या वर्तनावर अनिष्ट परिणाम होतो. मेवामिठाई किंवा मसाला घातलेले पदार्थ जसें दररोज खाणें चांगलें नाहीं, तसें नीच वृत्ति प्रक्षुब्ध करणाऱ्या कादंबऱ्याही नेहमीं वाचणें इष्ट नाहीं.

मनुष्यास करमणूक पाहिजे व करमणुकीकरितां चांगल्या कादंबऱ्या वाचण्यास हरकत नाहीं. परंतु निरंतर कादंबऱ्या वाचून जे आपला अमोल वेळ व्यर्थ दवडितात, ते अधिक अनुभविक व अत्युपयुक्त ग्रंथांकडे दुर्लक्ष्य करितात, व त्याबद्दल त्यांची जेवढी कींव करावी तेवढी थोडीच होणार आहे? असल्या वाचनांत ते जो वेळ घालवितात, त्या मानानें त्यांना श्रमाचा मोबदला मिळत नाहीं. क्षणभर मनोरंजन होतें, यापलीकडे त्यांना फारच थोडा फायदा होतो इतर ग्रंथांच्या वाचनापासून जशी मनाची मशागत होते, पुष्कळ माहिती मिळते, तशी या ग्रंथापासून होत नाहीं.

**नाटकें:**— योयो स्वभावो लोकस्य सुखदुःखसमन्वितः ।
सोऽङ्गादभिनयोपेतो नाट्यमित्यभिधीयेत. ॥

भरतमुनि.

नाटकें करण्याची चाल आपल्या देशांत फार प्राचीन काळापासून आहे. कालिदासाचीं नाटकें राजदरबारीं होत असत. भवभूति यास राजाश्रय नसल्यामुळें त्याचीं नाटकें यात्रेंत होत असत. मोठ्या सणांत किंवा महोत्सवांत नाटकें करण्याचा प्रघात असे. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांस नाटककला पूर्ण अवगत असून तिचा लोकशिक्षणाच्या कामीं फार उपयोग आहे अशी त्यांची खात्री होती. कवि किंवा कादंबरीकार आपल्या लेखणीनें जो ठसा वाचकांच्या मनावर वठवितात, तोच नाटककार आपल्या कृतीस ( नाटकास ) रंगभूमी, नट, पोशाख, पडदे इत्यादि अनेक साधनांचें साहाय्य घेऊन प्रेक्षकांच्या मनावर वठविण्याचा प्रयत्न करतात. दृश्यवस्तूंचें भरपूर साहाय्य मिळाल्यामुळें ‘ अधिकस्य अधिकं फलम् ’ या उक्तीप्रमाणें त्यांची कृति अज्ञ मूढ जनापासून तों विद्वन्मुकुटमणीपर्यंत सर्वांस प्रिय होते. नाटकाची भाषा तुटक असल्यामुळें साधारण लोकांस समज-

ण्यास ती अम्मळ कठीण पडते. नाटकें अगोदर वाचून नंतर तीं पाहिलीं असतां पुष्कळ समजतात. जीं उत्तम व सर्वमान्य नाटकें असतील, तींच वाचावींत. नीरस व अश्लील नाटकें वाचून काळाचा अपव्यय करण्यांत कांही अर्थ नाहीं.

**इतिहास :**—ह्मणजे घडलेल्या गोष्टींचें टिप्पण. मग त्या गोष्टी एखाद्या राष्ट्रासंबंधीं असोत किंवा एखाद्या संस्थेसंबंधीं असोत. इतिहासांत कार्यकारणभावाचेंही विवेचन केलेलें असतें. मनुष्याच्या सर्व उन्नतीचा पाया अनुभवावर अवलंबून असून तो अनुभव इतिहासशास्त्रांत नमूद केलेला असतो; ह्मणूनच इतिहासाची किंमत जगांत विशेष समजली जात आहे. मागील लोकांस कशा अडचणी आल्या, त्यांजवर कोणकोणतीं संकटें आलीं, त्यांतून त्यांचा कसा बचाव झाला, हल्लींची स्थिति कशी आहे, पुढें स्थिति कशी होईल, इत्यादि सर्व गोष्टी इतिहासावरून कळतात. इतिहास वाचण्यांत बहुतेक लोकांचा फार घोंटाळा होऊन तो बरोबर न समजल्यामुळें विशेष कंटाळवाणा होतो. सन, तारखा, नांवें व स्थळें हीं बरोबर सांगतां आलीं ह्मणजे इतिहास आला, असा कित्येकांचा समज असतो; परंतु तो चुकीचा आहे! इतिहासाचें खरें मर्म ह्मटलें ह्मणजे घडलेल्या गोष्टींचा कार्यकारणभाव समजणें आणि त्यापासून पुढील स्थितीवर काय परिणाम होणार आहेत, यांविषयीं बरोबर अनुमान करतां येणें हें होय. इतिहासापासून दुसरा एक फायदा होतो, तो हा कीं, त्यापासून आपणांस मनुष्यस्वभावाचें ज्ञान होतें. पूर्वीं आपली स्थिति कशी होती, हल्लीं कशी आहे, आपली योग्यता केवढी आहे, इत्यादि गोष्टी इतिहासापासून कळतात. प्रथम आपणांस आपला इतिहास पूर्ण अवगत असला पाहिजे. नंतर ज्या लोकांशीं आपला रात्रंदिवस संबंध जडला आहे, त्यांचाही इतिहास माहित असणें अवश्य आहे. याशिवाय प्राचीन राष्ट्रें व जगांतील इतर अर्वाचीन राष्ट्रें यांचाही इतिहास वाचला असतां त्यापासून फायदा होणार आहे. समजा, आपणास एखाद्या राष्ट्राचा इतिहास वाचावयाचा आहे, तर

प्रथम त्या राष्ट्राच्या इतिहासास जेथून आरंभ होतो, तेथून वाचावयास सुरवात करावी, व नंतर पुढें क्रमशः वाचीत जावा. जरी त्यांत आपण एखाद्या पुरुषाचें चरित्र किंवा एखाद्या लढाईचें वर्णन वाचीत असलों, तरी त्या त्या वेळची पूर्ण परिस्थिति नेहमीं लक्षांत असूं द्यावी. ह्मणजे त्यापासून इतिहासवाचनावर बराच प्रकाश पडून आपल्याही ध्यानांत बराच भाग रहातो.

इतिहासापासून मनोरंजन होऊन सद्बोध होतो. " इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला तत्वबोध होय ! " असें एका प्रसिद्ध ग्रंथकारानें ह्मटलें आहे. तसेंच त्यापासून सत्कृत्याबद्दल आवड आणि दुष्कृत्याबद्दल तिरस्कार मनांत उत्पन्न होतो. अंगीं धैर्य येतें. प्रसंग आला असतां मनुष्य डगमगत नाहीं. मनुष्यस्वभावाचें ज्ञान होतें. आपली योग्यता काय, परिस्थिति काय, हें चागलें समजल्यामुळें काळास अनुसरून वर्तन करण्यास ठीक पडतें. इतिहासांतील गोष्टी खऱ्या असल्यामुळें त्या जशा मनावर ठसतात तशा कादंबरींतील ठसत नाहींत. कारण कादंबऱ्या काल्पनिक असतात.

* **चरित्रें :**—उन्नत जीवित यात्रा, पदचिन्हें कालरूप सिकतेंत ।
मरतांना आह्मांला मागें येतील ठेवितां खचित ॥

काव्यरत्नावली.

जगांत कोट्यवधि मनुष्यें जन्मतात आणि आयुष्यानुसार मृत्यु पावतात. त्या सर्वांचींच चरित्रें लिहिण्यासारखीं असतात असें नाहीं. आपल्या अंगच्या विशेष विद्वत्तेनें किंवा सद्गुणांनीं जगांतील साधारण मनुष्यापेक्षां अलौकिक कृत्यें करून आपलीं चरित्रें संस्मरणीय आहेत, असें जे जगाच्या प्रत्ययास आणून दाखवितात, अशांचींच

---

* Lives of great men all remind us
We can make our lives sublime,
And departing leave behind us
Foot-prints, on the sands of time.

*Longfellow*

चरित्रें लिहिलीं जातात. संस्कृतांत ह्मटलें आहे ' स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ' राजे जे आहेत त्यांना त्यांच्या छत्राखालीं असलेली प्रजा विशेष मान देते, परंतु जे विद्वान् आहेत ते सर्वत्र ठिकाणीं पूज्य व वंदनीय होतात. आपण चरित्र वाचूं लागलों ह्मणजे चरित्रनायकावरील प्रसंग, त्यानें भोगलेला त्रास किंवा छळ, त्याचें धैर्य, त्याची धर्मश्रद्धा, त्याचा निश्चय, त्याची विद्वत्ता, त्याची कळकळ वगैरे अनेक गुण वाचून आपल्या मनावर फारच चांगला ठसा उमटतो. आपणही तसें व्हावें व आपलें चरित्र संस्मरणीय करावें, असें वाटतें. तो मनुष्य प्रथम आपल्यासारखाच असून पुढें तो उदयास आला, तसें आपणही प्रयत्न केला असतां उदयास येऊं, अशी क्षणभर मनाला खात्री वाटते. चरित्रें वाचावयास फार चांगलीं. तीं लहान थोरांनीं, स्त्रियांनीं, व पुरुषांनीं सर्वांनीं वाचावीं. ल्यांगहॅार्न यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे ' चरित्रें हीं लागवड करण्यास जितकीं योग्य आहेत, तितके इतर कोणतेही ग्रंथ योग्य नाहींत. ' तसेंच टॉमस कार्लाईल यानें ह्मटलें आहे कीं, ' वाचनांत सर्वतोपरी उपयुक्त व अति चांगलें वाचन ह्मटलें ह्मणजे चरित्रग्रंथाचें होय. ' चरित्रें आपणास उत्तम मंडळींची ओळख करून देतात व जे महात्मे स्वप्रयत्नानें श्रेष्ठ पद पावले आहेत, त्यांच्या अगदीं जवळ आणून सोडतात.

**प्रवासवर्णनें** व **स्थलवर्णनें** यांच्या वाचनापासून मनोरंजन होऊन अन्य ठिकाणची माहिती मिळते. विविध देशांच्या चालीरीती कळून सत्यासत्य समजण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. मन उदात्त होऊन आपल्या राष्ट्राचे गुणावगुण कळूं लागतात. पूर्वीं अध्ययन संपल्यावर एकदोन वर्षें तीर्थयात्रा करण्यांत ( प्रवासांत ) घालवून नंतर आपले लोक जगांतील व्यवहारास लागत असत. परंतु हल्लीं तो काळ बदलला. आतां प्रवास व स्थलवर्णनाची पुष्कळ पुस्तकें मिळूं लागल्यामुळें बसल्या ठिकाणीं सहज आपणास पुष्कळ ज्ञान प्राप्त करून घेतां येतें. **निबंध** वाचणें चांगलें; परंतु निबंधकार काय ह्मणतो, त्याचें ह्मणणें कितपत खरें आहे, आपल्या मताच्या सिद्धयर्थ तो कोणकोणतीं प्रमाणें पुढें आणतो, याचें लक्षपूर्वक निरीक्षण केलें पाहिजे. पुष्कळ लोक

दररोज एकनिष्ठ भावानें **पोथ्यापुराणें** वाचतात. कित्येकांस त्या कळतात, कित्येकांस कळत नाहींत. धर्मसंबंधीं कांहीं तरी कसेंबसें किंवा डोळे मिटून वाचलें ह्मणजे झालें. मग तें कळो अथवा न कळो. आपण जें वाचतों तें चांगलेंच, असा पक्का समज असल्यामुळें कोणी त्याबद्दल फारसा विचार करीत नाहींत. परंतु धर्मग्रंथ हे अशा रीतीनें वाचणें ह्मणजे त्यांची थट्टा करणें होय! ते एकाग्र बुद्धीनें व लक्षपूर्वक वाचावे व त्याविषयीं विचार करावा. **तत्वज्ञान**विषयक ग्रंथ समजण्यास अत्यंत कठीण असल्यामुळें, ते लोकांस फारच कंटाळवाणे वाटतात. कोणी ते फारसे हातींसुद्धां धरीत नाहींत. परंतु तत्वज्ञान हें मनुष्यांच्या विचारसंग्रहाचें सार असल्यामुळें, त्याचा अभ्यास करणें, तें समजाऊन घेणें, हें अत्यंत श्रेयस्कर आहे. तत्वज्ञान हें मनुष्याचें जीवन असून त्याचा गुप्त प्रवाह राष्ट्रांतील लोकांच्या आंगीं खेळत असतो. ज्या मानानें तो प्रवाह प्रबल अथवा निर्बल असेल त्या मानानें त्याचें प्रतिबिंब लोकांच्या वर्तनांत दिसून येतें. वेद, गीता, किंवा उपनिषदें यांतील तत्वज्ञानाचा ठसा हिंदुलोकांवर उमटलेला स्पष्ट दिसतो. बायबलांतील तत्वज्ञानास अनुसरून ख्रिस्ती राष्ट्रांचे आचारविचार बनले आहेत. तत्वज्ञानांतील तत्वें मनावर पूर्ण बिंबलीं ह्मणजे आंगीं विलक्षण जोम अथवा धैर्य येतें.

**मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें** हींही अलीकडे वाङ्मयाचा एक भाग होऊन बसलीं असल्यामुळें, त्याविषयींही येथें थोडेंसें सांगितलें पाहिजे. मासिक पुस्तकांतील विषय काळजीनें लिहिलें असून ते विशेष विचार करण्यासारखे असतात. वर्तमानपत्रांतील विषय चालू गोष्टींसंबंधीं असल्यामुळें कांहीं दिवसांनीं ते शिळे होतात. वर्तमानपत्रांची भाषा साधारणतः विशेष काळजीपूर्वक लिहिलेली नसते. वर्तमानपत्रांतूनही कधीं कधीं चांगले मनन करण्यासारखे विषय येत असतात, नाहीं असें नाहीं. तरी पण नुसतीं वर्तमानपत्रें वाचून मन कधींही सुसंस्कृत होणार नाहीं. तर तें सुसंस्कृत होण्यास व चांगले विचार चांगल्या भाषेंत लिहितां येण्यास वाङ्मयात्मक ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे.

---

# भाग ९ वा.

## मराठी पुस्तकें.

येथवर वाचन या विषयाचें सामान्य विवेचन झालें. कोणत्याही भाषेंतील ग्रंथ वाचतेवेळीं येथवर सांगितलेल्या मुद्यांचा वाचकांस पुष्कळ उपयोग होईल. वाचन ह्मटलें कीं, अगोदर ग्रंथसंग्रह पाहिजे. व तो ग्रंथसंग्रह कसा आहे, त्यांत उत्तम व वाचण्यालायक असे ग्रंथ कोणते आहेत, त्यांत न्यूनता काय आहे, इत्यादि गोष्टींचें विवेचन झालें तरच तो निबंध पूर्ण होईल, एरवीं होणार नाहीं. तसेंच जे तरुण आहेत किंवा वाङ्मयाशीं ज्यांचा विशेष परिचय नाहीं, अशा वाचकांची वाङ्मयाशीं ओळख करून देणें, हें येथें आवश्यक आहे. प्रस्तुत निबंध मराठी भाषेंत असल्यामुळें मराठी ग्रंथासंबंधीं येथें विवेचन झालें पाहिजे. परंतु तो विषय स्वतंत्र असून प्रकृत निबंधाचा तिप्पट किंवा चौपट विस्तार होऊनही त्याची पूर्णता होणार नाहीं. तरी वाचकांच्या सोईकरितां मराठी वाङ्मयग्रंथाविषयीं येथें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे, तरी आमच्या प्रिय वाचकांनीं मराठी वाङ्मयविषयक ग्रंथ अवश्य पहावेत, अशी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

### कविता.

मराठी भाषेंतील प्राचीन कवि ह्मटला ह्मणजे मुकुंदराज हा असून, याचे ‘ विवेकसिंधु ’ आणि ‘ परमामृत ’ असे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. या ग्रंथांत ब्रह्म, माया, जीवात्मा, परमात्मा इत्यादि विषयांचें प्रतिपादन केलेलें आढळतें. ज्ञानेश्वराची भावार्थदीपिका ( ज्ञानेश्वरी ) ही गीतेवरील टीका असून ती सुप्रसिद्ध आहे. याचा अमृतानुभव ह्मणून एक स्वतंत्र ग्रंथ आहे. हे दोन्हीही ग्रंथ वाचण्यालायक आहेत. ज्ञानेश्वराची भाषा दुर्बोध असून ती गुरुमुखाशिवाय समजणें कठिण

आहे. ज्ञानेश्वरास तीन भावंडें होतीं. त्यांचेही अभंग प्रसिद्ध झाले आहेत. नामदेव हा ज्ञानेश्वराचा समकालीन असून याचे पुष्कळ अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांत भक्तिरस विशेष आहे. ज्ञानेश्वराच्या मागाहून सुमारें ३०० वर्षांनीं एकनाथ झाला. मराठी भाषेंत ग्रंथ लिहिण्याबद्दल एकनाथाचा जरी पुष्कळ छळ झाला, तरी त्यानें आपला निश्चय सोडला नाहीं. एकनाथाचे भागवत, भावार्थ रामायण, स्वात्मसुख व रुक्मिणीस्वयंवर, असे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पैकीं भागवत वाचकांनीं अवश्य वाचावेंच, अशी त्यांना शिफारस आहे. मनुष्य कोणत्याही स्थितींत असो, त्यानें सन्मार्गानें वागून अनन्य भावानें परमेश्वराची भक्ति करावी, हेंच तुकाराम लोकांस नेहमीं सांगत असे. तुकारामाचा एक किंवा अर्धा अभंग येत नसेल, असा एकही मनुष्य महाराष्ट्रांत सांपडणें कठिण. तुकारामाचे अभंग ऐकून पाश्चात्य पंडितांनींही माना डोलविल्या आहेत. तुकारामाच्या अभंगाची गाथा ही मराठी वाचकांस एक **सर्वोत्कृष्ट देणगी** आहे. रामदास हा तुकारामाचा समकालीन असून शिवाजी महाराजांचा गुरु होता. याचे मनाचे श्लोक फार उत्तम व बोधपर आहेत. इंग्रजींत ज्याला एथिक्स [Ethics] व्यवहारनीतिशास्त्र ह्मणतात, त्याच धर्तीवर याचा दासबोध नामक ग्रंथ आहे. तो प्रापंचिक लोकांनीं अवश्य वाचीत जावा. वामन हा मोठा संस्कृतज्ञ असून यानें मराठींत अनेक ग्रंथ लिहिले आहेत. याची कविता गंभीर व रसभरित आहे. यथार्थदीपिका नामक याची गीतेवर मोठी टीका आहे. यथार्थदीपिका आगोदर वाचून नंतर भावार्थदीपिका [ ज्ञानेश्वरी ] वाचावी. तसेंच निगमसार, श्रृंगार, नीति, वैराग्य हीं शतकें, कर्मतत्व व ब्रह्मतत्व हे याचे चांगले ग्रंथ आहेत. प्रियसुधा नांवाच्या ग्रंथांत वामनानें आपल्या पत्नीस शांकर सिद्धान्ताचा उपदेश केला आहे. श्रीधरस्वामी यांची भाषा फारच रसाळ व हृदयंगम आहे. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप हे याचे ग्रंथ अगदीं वाचण्यालायक आहेत. महिपति यानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत. बहुतेक प्राचीन भक्तांचीं व संतांचीं चरित्रें यानें

आपल्या ग्रंथांत लिहून ठेविलीं आहेत. ऐतिहासिक व धर्मदृष्ट्या हीं संतचरित्रें फार महत्वाचीं आहेत. याचे भक्तविजय व संतलीलामृत हे ग्रंथ वाचावे. अमृतराय यानें कटिबंध व पदें पुष्कळ केलीं आहेत. याची वाणी फारच रसाळ व मनोरंजक आहे. मोरोपंत हा कवि मराठींत सुप्रसिद्ध आहे. यानें मराठी भाषेंत जितके ग्रंथ लिहिले आहेत, तितके कोणीही लिहिले नाहींत. मराठी भाषा याच्यापुढें अगदीं हात जोडून उभी असे. मंत्ररामायण, मंत्रभागवत, हरिसंबोधनस्तोत्र हे याचे ग्रंथ वाचले ह्मणजे वरील विधानाची वाचकांस सहज साक्ष पटेल. याचे १८ पर्वें भारत, मंत्रभागवत, अष्टोत्तरशत [ १०८ ] रामायणें, केकावली इत्यादि अनेक ग्रंथ आहेत. संस्कृताचें ज्यास अंग नाहीं, अशा साधारण मनुष्यास याच्या कविता समजण्यास दुर्बोध आहेत. मुक्तेश्वर याचे भारत व रामायण हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याची कविताशक्ति चांगली असून वर्णनशैली अनुपम आहे. याच्या ग्रंथांतील वर्णनें वाचीत असतां, त्या गोष्टी डोळ्यापुढें मूर्तिमंत दिसत आहेत कीं काय, असा वाचकांस भास होतो. अनंतफंदी व रामजोशी हे पूर्व वयांत तमासगीर या नात्यानें सुप्रसिद्ध होते. परंतु पुढें दोघांचेंहि लक्ष्य सन्मार्गाकडे लागलें. अनंतफंदी यानें कटाव, फटके, लावण्या, वगैरे केल्या आहेत. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या मृत्यूवर 'माधवग्रंथ' नामक एक ग्रंथ यानें लिहिला आहे. जोशीबुवांच्या लावण्या सुप्रसिद्ध आहेतच. या लावण्या वाचकांनीं अवश्य वाचून पहाव्या. प्राचीन मराठी कवींचीं जीं सुरस काव्यें आहेत, त्यांत रघुनाथ पंडित याच्या नलोपाख्यानाचा बराच वर नंबर लागतो. या कवीचे दुसरे कांहींच ग्रंथ नाहींत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय.

रंगनाथ स्वामी याचे बृहद्वाक्यवृत्ति, भगवद्गीतेवरील टीका आणि योगवासिष्ठ असे तीन ग्रंथ आहेत. त्यांत योगवासिष्ठ हा ग्रंथ वाचनीय आहे. विठ्ठल हा रामदासस्वामीचा समकालीन असून, याचे 'बिल्हणचरित्र' 'रसमंजरी' व 'विद्वज्जीवन' असे तीन ग्रंथ व शि-

वाय कांहीं पौराणिक कथानकें प्रसिद्ध आहेत. जयरामस्वामी याचा 'शांतिपंचीकरण' नांवाचा ग्रंथ आहे. आनंदमूर्ति व अनंत कवि यांचींही कांहीं काव्यें आहेत. श्रीगोंदें येथील शेख महंमद याचा योगसंग्राम नामक ओंविबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहे; व शिवाय यानें कांहीं अभंग केले आहेत. या शिवाय शिवरामस्वामी, केशवस्वामी, आनंदतनय, जीवनतनय, निरंजन, चिंतामणी, शिवदिन केसरी, मध्वमुनि, सोहिरोबा, कृष्णकवि, नरहरि, देवनाथ, विठ्ठलनाथ, श्यामसुंदर, कृष्णदास, रमणतनय, रामकृष्ण, कृष्णकिंकर, अवधूत, चतुरसाबाजी, मुद्गल, चिन्मयनंदन, वगैरे अनेक कवींच्या थोड्याफार कविता आहेत.

या महाराष्ट्र कवींनीं राजाश्रयाचीं, द्रव्याची, किंवा मानपमानाची आशा न करितां विपत्तींत राहून व ऐहिक सुखांचा त्याग करून केवळ निरपेक्ष बुद्धीनें ज्ञान प्रसाराच्या कामीं जिवापाड श्रम केले व अज्ञ लोकांस जें ज्ञान दुर्लभ होतें, तें सुलभ करून दिलें, त्याबद्दल त्यांचीं स्तुति करावी तितकी थोडीच होणार आहे. तुकाराम, रामदास, मोरोपंत यांना राजाश्रय प्राप्त होत असतांहि, त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं.

या महाराष्ट्र कवींच्या काव्यांत फारसा अर्थ नसून त्यांनी उगींच कांहींतरी भारूड लिहून ठेविलें आहे, असें ह्मणणारे लोक आह्मांत आहेत. ज्यांना विद्येचा फारसा संस्कार नाहीं, अशा मनुष्याकडून हा आक्षेप करण्यांत आला असता, तर त्याबद्दल फारसें वाईट वाटलें नसतें, परंतु बहुतकरून हा आक्षेप सुशिक्षित ह्मणविणाऱ्या गृहस्थांकडून होतो. याचें कारण हेंच कीं, त्यांनीं हे ग्रंथ वाचले नसल्यामुळें त्यांना त्याविषयीं फारशी माहिती नसते. त्यांनीं प्रथम हे ग्रंथ पहावे, ते कसे काय आहेत याचा विचार करावा, आणि मग ठाम ठरवावें. वेदान्तासारखे गहन विषय उपमा दृष्टांतांनीं वाचकांच्या मनांत पूर्ण बिंबविणारी ज्ञानेश्वराची रसाळ व प्रासादिक वाणी, भक्तिरसानें पूर्ण ओथंबलेले व श्रोत्यांच्या मनांत पूर्ण प्रकाश पाडणारे तुकाराम महाराजांचे अभंग, व्यवहारज्ञान व परमार्थज्ञान यांची ओळख करून देणारा सम-

थांचा बोध, नाथाची प्रशांत व हृदयांत विवेक उत्पन्न करणारी ओंवी, सुरस व मोहक अशी श्रीधर व मुक्तेश्वर यांची कविता, शब्दलालित्य व अर्थगौरव यांनीं प्रफुल्लित अशी वामन पंडित व रघुनाथ पंडित यांचीं काव्यें, कविस्फूर्तीनें सुप्रसन्न होऊन आपला पिसारा पिंजारून प्रेमळस्वरानें टाहो फोडणाऱ्या मयूराचा मधुर स्वर, अमृतरायाचे रसभरित व मनोरंजक कटाव, अज्ञ मूढ लोकांसही सन्मार्गास लावणारी जोशीबुवांची लावणी, इत्यादि काव्यें वाचून ज्यास आनंद होणार नाहीं, असा मनुष्य सांपडणें विरळा!

मराठी काव्यांत जसा लावण्यांचा समावेश होतो, तसाच पोवाड्यांचाही होतो. शिवाजीच्या वेळेपासून तों पेशवाईअखेर ह्मणजे जवळ जवळ दोनशें वर्षांत मराठ्यांनीं ज्या लढाया मारल्या, जे पराक्रम केले, किंवा जें अपार वैभव भोगिलें, त्यांचें व तशाच ठळक ठळक गोष्टींचें वर्णन पोवाड्यांत सांपडतें. पोवाडे ह्मणून त्यावर चरितार्थ भागविणारे शाहीर, गोंधळी किंवा भराडी लोक पूर्वीं पुष्कळ होते. या लोकांनीं पोवाडे रचून इतिहासरूपी जीवन मराठे लोकांस वेळोवेळीं पाजलें व त्यांच्यांतलें तेज कायम ठेविलें, याबद्दल यांची स्तुति करावी तेवढी थोडीच होणार आहे! ऐतिहासिक दृष्ट्या हे पोवाडे विशेष महत्वाचे आहेत. गोंधळ्यांकडून व इतर ठिकाणाहून पोवाडे मिळवून ते एकत्र करून मि० तुकाराम शालिग्राम व मे० आक्वर्थसाहबांनीं त्यांचें एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. हें पुस्तक फारच चांगलें झालें असून, तें वाचल्याशिवाय त्याची योग्यता वाचकांस कळून येणार नाहीं.

**आधुनिक कवि:**—वेदांत किंवा पौराणिक कथानकांशिवाय लिहिण्यासारखे अनेक विषय आहेत, अशी अलीकडील लोकांची खात्री झाली. मनोविकारांचें चित्र, सृष्टिसौंदर्यवर्णन ऐतिहासिक प्रसंगांचें वर्णन, स्थलवर्णन वगैरे विषय आधुनिक कवींस विशेष पसंत पडले. रघुवंश व मेघदूत या सुप्रसिद्ध संस्कृत काव्यांचीं पद्यात्मक भाषांतरें झालीं. यामुळें भाषांतररूपानेंच कां होईना, पण कविवर्य कालिदास याच्या कृतीची

मराठी वाचकांस ओळख झाली. श्री० कै० बापूसाहेब कुरुंदवाडकर यांनीं भट्टवंशकाव्य आर्यावृत्तांत मराठींत केलें. कै० कुंटे यांनीं, 'राजा शिवाजी' नामक वीररसप्रधान काव्य ग्रीक किंवा इंग्रजी धर्तीवर लिहिण्याचा प्रयत्न केला असून त्यांत कित्येक भागांत चांगला काव्यरस उतरला आहे. मराठे सरदार शिंदे, होळकर यांच्या रजपूत राजांशीं ज्या उत्तर हिंदुस्थानांत लढाया झाल्या, त्या प्रसंगांची एक काल्पनिक गोष्ट रचून रा० वासुदेव वामन खरे यांनीं 'यशवंतरायमहाकाव्य' नामक एक काव्य लिहिलें आहे. गणेशशास्त्री लेले यांनीं साकीवृत्तांत कृष्णाकुमारी काव्य लिहिलें आहे. तसेंच रा० जुवेकर यांचेंही 'कृष्णाकुमारी' नामक काव्य आहे. कृष्णाकुमारीचें चरित्र इतकें मनोहर आहे कीं, त्यावर कवींनीं कितीही लिहिलें तरी तें थोडेंच होणार आहे! कै० भास्कर दामोदर पाळंदे यांची 'रत्नमाला' प्रसिद्ध आहेच. सर्जन मेजर कीर्तीकर यांनीं आंग्ल कवि टेनिसन याच्या प्रिन्सेस नामक काव्याचें 'इंदिरा' नामक भाषांतर केलें आहे. हें काव्य कितपत चांगलें साधलें आहे, याविषयीं बराच मतभेद आहे. तथापि तें एकदां तरी वाचण्यासारखें आहे. 'स्कॉट'च्या 'लेडी ऑफ् धि लेक'च्या प्रथम आणि शेवटच्या सर्गाच्या आधारें 'दैवसेनी' हें काव्य लिहिलें असून तें मनोहर झालें आहे. रा० महाजनी यांनीं जी कुसुमांजलि लिहिली आहे, तिचा सुगंध मराठी वाचकांनीं एकदां तरी घ्यावा. कै० वा० दा० ओक यांचें 'काव्यमाधुर्य' नामक पुस्तक प्रसिद्ध असून त्यांतील कविता चांगल्या साधल्या आहेत. अधुनिक कवींत रा० मोगरे यांची कविता बरीच सरस असते. दयानंद सरस्वती, मंडलिक वगैरे लोकमान्य थोर पुरुषांच्या निधनावर यांच्या कविता आहेत. यांचें 'अभिनव कादंबरी' नामक मराठी लहानसें काव्य प्रसिद्ध आहे. मि० ना० वा० टिळक यांची कविता बरीच सरस असून प्रासादिक आहे. रा० भांडारे, लोंढे, लेंभे माधवानुज यांच्या कविता चांगल्या असतात. या व इतर आधुनिक कवींचीं काव्यें पहावयाचीं असल्यास जळगांव जिल्हा खानदेश येथें निघत असलेल्या 'काव्यरत्नावळी' नामक मासिक पुस्तकाचे अंक पहावेत.

**नाटकें:** — मराठी वाचकांच्या ठायीं नाटकासंबंधानें जितकी अभिरुचि दिसून येते, तितकी इतर कोणत्याही ग्रंथासंबंधानें दिसून येत नाहीं. नाटकांच्या पुस्तकांच्या जितक्या आवृत्ती निघतात, तितक्या इतर कोणत्याही प्रकारच्या पुस्तकांच्या निघत नाहींत. कै. परशुरामपंत गोडबोले यांनीं उत्तररामचरित्र, वेणीसंहार, मृच्छकटिक, हीं संस्कृत नाटकें मराठींत गद्यपद्यात्मक केलीं असून तीं चांगलीं उतरलीं आहेत. कै. कीर्तने यांचीं जयपाळ व थोरले माधवराव हीं नाटकें उत्तमांत मोडतात. महाजनी यांचें तारा [ सिंबेलाईन ] व केळकर यांचें त्राटिका [ टेमिंग आफ धि श्रू ] हीं नाटकें गद्यांत असून चांगलीं झालीं आहेत. कानिटकर यांनीं बरींच नाटकें लिहिलीं आहेत. त्यांत ‘ तरुणीशिक्षणनाटिका, ’ ‘ संमातवयाचें बिल ’ व ‘ शीघ्रसुधारणा-दुष्परिणाम, ’ हीं नाटकें सामाजिक असून त्यांत लेखकानें आपल्या मताप्रमाणें समाजास सुधारणेविरुद्ध इशारा दिला आहे. त्याचप्रमाणें अलीकडे रा. देवल यांनीं ‘ शारदा ’ नामक नाटक लिहून त्यांत वृद्धतरुणीविवाहाच्या निंद्य चालीचें चित्र समाजापुढें मांडिलें आहे. यावरून हें उघड आहे कीं, नाटकें हीं जरी मनोरंजनाकरितांच आहेत, तरी त्यापासून लोकमत जागृत करण्याचे कामीं पुष्कळ मदत होते. तसेंच कानिटकरांची ‘ शिवाजी, ’ ‘ प्रतापगडचा मोहरा, ’ ‘राजाराम,’ ‘ बाजीराव आणि मस्तानी ’ ‘ बाजी देशपांडे ’ हीं व तसेंच ‘गुणोत्कर्ष,’ ‘ पानपताचा दुर्दैवीं मोहरा,’ ‘श्रीमंत सवाईमाधवरावसाहेब यांचा मृत्यु,’ इत्यादि ऐतिहासिक नाटकें वाचण्यालायक आहेत. ‘राणा भीमदेव’ हें गद्य नाटक शेरिडनच्या पिझारो नामक एका नाटकाच्या आधारें लिहिलें असून त्यावर इकडील पोषाख इतका बेमालूम चढविला आहे कीं, त्याचें असलें संविधानक राजस्थानमधील एखाद्या रजपूत राजाचें पाहिजे असें प्रत्येकांस वाटतें. शेक्सपीयरच्या हॅमेलट नाटकाची गद्यांत वीरसेन, विकारविलसित, हिंमतबहादर अशीं तीन भाषांतरें झालीं आहेत. पैकी ‘ विकारविलसित ’ हें लोकप्रिय झालें आहे. संगीत नाटकांत कै० आण्णा किर्लोसकर यांचें संगीत ‘ शांकुतल ’ व

'सौभद्र' हीं नाटकें सुप्रसिद्ध असून लोकप्रिय झालीं आहेत. रा० देवल यांचीं संगीत 'मृच्छकटिक' व 'विक्रमोर्वशी,' हीं दोन नाटकें चांगलीं आहेत. रा० देवल यांची भाषा सरळ व सुबोध असून यांच्या कवितेंत बराच प्रसाद आहे. तसेंच यांनीं गद्यांत 'झुंझारराव' (ऑथेल्लो) आणि दुर्गा हीं नाटकें लिहिलीं आहेत; तींही बरींच वठलीं आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या संस्कृत नाटकांशिवाय मुद्राराक्षस, प्रबोधचंद्रोदय, मालतीमाधव, रत्नावली, प्रसन्नराघव, हीं नाटकें मराठींत झालीं आहेत. तसेंच इंग्लिश नाटकाचार्य शेकस्पियर याच्या १८ नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. रा० शंकर मोरो रानडे यांनीं आपल्या नाट्यकथार्णवांतून पुष्कळ चांगलीं नाटकें प्रसिद्ध केलीं आहेत. यांशिवाय आणखी पुष्कळ नाटकें मराठींत झालीं आहेत, त्यांचा नामनिर्देश करून जागा अडविणें चांगलें नाहीं. संगीतांत तर अलीकडे नाटकांचा सुळसुळाट झाला असून लेखकांच्या अंगीं विद्वत्ता व प्रसाद हे गुण क्वचित्च दिसून येतात. नाटक कलेची माहिती असो किंवा नसो, जो उठतो तो संगीत नाटकें लिहितो व भीड मुर्वत खर्चून कोणातरी संगीत मंडळीस देतो. विशेष परिश्रम केल्याशिवाय किंवा द्रव्य खर्चल्याशिवाय नाटक मिळाल्यामुळें मंडळीही असल्या नाटकाचे गुणदोष मुळींच न पाहतां एकदम खेळ करूं लागते. या नाटकांचीं पुस्तकें प्रसिद्ध होत नाहींत, किंवा कोणी त्यावर टीकाही करीत नाहींत. कित्येक नाटकें तर अश्लील असून शिष्टाचारास सोडून लिहिलीं आहेत. ही स्थिति खरोखरच फार शोचनीय असून यामुळें नाटककलेचा ऱ्हास होत आहे. इतकेंच नाहीं, तर एका अत्यंत उपयुक्त अशा संस्थेस वाईट वळण लागत चाललें आहे. इकडे आमची समाजहितचिंतक मंडळी लक्ष देतील तर फार बरें होईल!

ज्यांना लिहितां वाचतां येतें अशा लोकांचीं बहुतककरून करमणुकीचीं पुस्तकें म्हटलीं म्हणजे कादंबऱ्या होत. कादंबऱ्यांचाही जितका खप होतो, किंवा त्या जितक्या वाचल्या जातात, तितकीं दुसरीं कोणतींही पुस्तकें

वाचलीं जात नाहींत. आपण एखाद्या मनुष्याची किंवा कुटुंबाची गोष्ट सांगूं लागलों ह्मणजे ऐकणारे ती किती लक्षपूर्वक ऐकत असतात, याचा अनुभव पुष्कळांस आलाच असेल. मनुष्यास मनुष्यवर्गाच्या गोष्टी आवडाव्या हें अगदीं साहजिक आहे! पहिल्या पहिल्यानें मराठींत नीरस व विचकट गोष्टी किंवा कादंबऱ्या निघाल्या. परंतु पुढें लवकरच ती दिशा बदलली आणि घरगुती गोष्टींच्या वर्णनात्मक कादंबऱ्या निघूं लागल्या. वेणू, यशवंतराव खरे, नारायणराव आणि गोदावरी, सद्‌गुणी सून या कादंबऱ्या वाचल्या ह्मणजे गृहस्थितींचें चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभें रहातें. मुक्तामाला ही कादंबरी मराठींत जुनी असून हिची भाषा प्रौढ व सरळ व संविधानक मनोवेधक आहे. या कादंबरीच्या सहा आवृत्ती निघाल्या आहेत, येवढें सांगितलें ह्मणजे इच्या चांगुलपणाबद्दल वाचकांची सहज खात्री होईल.

गोविंदराव अथवा सुशिक्षणाचें फळ, ताराबाई हिराबाई, गोदावरी, या कादंबऱ्या वाचण्यालायक आहेत. मोचनगड, पहिले बाजीराव, छत्रपति संभाजी, जिंजिवास, पानपतचा मोहरा, लालन बैरागीण, पानपतची मोहीम, ह्मैसूरचा वाघ, उषःकाल वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्या चांगल्या असून वाचनीय आहेत. रा० आपटे यांनीं लिहिलेल्या ‘ आजकालच्या गोष्टी ’ ‘ पण लक्षांत कोण घेतो! ’ ‘ मी ’ या कादंबऱ्या मराठी भाषेंत पहिल्या प्रतीच्या असून फार लोकप्रिय झाल्या आहेत. इंग्रजींत सर वॉल्टर स्काटच्या कादंबऱ्या जशा सर्वमान्य आहेत, तशाच आपट्यांच्या मराठी कादंबऱ्या सर्वांच्या आदरास पात्र झाल्या आहेत. यांची भाषा सरळ व सोपी असून विचारसरणी मनोहर व हृदयांत जलद प्रकाश पाडणारी आहे स्त्रीलेखकांपैकीं सौ० काशीबाई कानिटकर यांच्या ‘ शेवट तर गोड झाला ’ आणि ‘ खरी कीं खोटी ’ अशा दोन लहान कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. तसेंच मिस् भोर यांचीही ‘ पुष्पकरंडक ’ नामक कादंबरी वाचण्यालायक आहे. सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार बंकीमचंद्र चतर्जी यांच्या कादंबऱ्यांची आनंदाश्रम, विषवृक्ष, तरुबाला,

दुर्गेशनंदिनी अशीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. इंग्रजींतील रासेलस, पॉल आणि व्हर्जीनिया, गलिव्हरचा वृत्तांत यांचीं भाषांतरें झालीं आहेत. कुवलयपूरची राणी कुमुद्वती हें ' मेरी क्वीन ऑफ् स्काट्स् ' नामक इंग्रजी कादंबरीचें रूपांतर होय. अनाथ पांडुरंग हें पांडुरंग हरि नामक इंग्रजी कादंबरीचें भाषांतर असून चांगलें वठलें आहे. प्रतापसिंह, ठगाची जबानी, मथुरा, शिलादित्य याही कादंबऱ्या इंग्रजीवरूनच झाल्या आहेत. मौनयौवना ही कादंबरी एका इंग्रजी कादंबरीवरून लिहिली असून इजवर इकडील पोषाख फार सुरेख बसविला आहे. संस्कृतांतील कादंबरी, दशकुमारचरित, विश्वगुणादर्श, बृहत्कथासागर, या कादंबऱ्या मराठींत झाल्या आहेत. पैकीं बृहत्कथासागर या कादंबरींत पौराणिक कालानंतर भरतखंडाची कशी स्थिति होती याविषयीं बरीच ऐतिहासिक माहिती मिळते.

आरबी भाषेंतील सुरस गोष्टींचें भाषांतर करण्याचें श्रेय कै० कृष्णशास्त्री व त्यांचे चिरंजीव विष्णुशास्त्री यांना व तसेंच रा० दामले यांना दिलें पाहिजे. मुंबईंतील पोतदार यांनीं संस्कृतांतील मुख्य मुख्य नाटकांधारें लहान लहान कादंबऱ्या किंवा गोष्टी सोप्या भाषेंत मराठींत प्रसिद्ध केल्या आहेत. निर्णयसागर छापखान्याचे मालकांनी ' संस्कृत ग्रंथार्थसंग्रहमालिका ' काढून संस्कृत पुराणें, नाटकें किंवा काव्यें यांच्यांतलीं बरींच आख्यानें मराठींत सोप्या भाषेंत छापून प्रसिद्ध केलीं आहेत. याच दिशेनें मूरकर मंडळीनें रामविजय, हरिविजय, संतलीलामृत इत्यादि प्राचीन ओंवीबद्ध ग्रंथांचीं सुलभ मराठी गद्यांत रूपांतरें केलीं आहेत. ज्यांना विद्येचा फारच थोडा संस्कार आहे, अशा स्त्रीपुरुषांना हे ग्रंथ सहज समजतील, इतके ते सोपे झाले आहेत.

**इतिहासः**—आमचा जुना इतिहास बखरींत सांपडतो. कृष्णाजी अनंत याचें शिवछत्रपतींचें चरित्र प्रसिद्ध आहे. मल्हारराव चिटणीस यांनीं लिहिलेली शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू, रामराजा, धाकटा शाहू यांचीं चरित्रें फार विश्वसनीय आहेत. पेशव्यांची बखर, पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर इत्यादि बखरी वाचण्यालायक आहेत.

बखरीच्या भाषेंत जो एक विशेष प्रकारचा जोम दिसून येतो, तो अली-कडील गद्यग्रंथांत नसतो. जुन्या बखरी प्रसिद्ध करण्याच्या कामीं काव्येतिहाससंग्रह या मासिकपुस्तकानें बरीच मदत केली असून ऐतिहासिक लेखसंग्रह, भारतवर्ष व ग्रंथमाला या मासिकपुस्तकांतूनही हल्लीं बखरी, जुने पत्रव्यवहार छापून निघत आहेत. रा० साने, खरे, राजवाडे व पारसनीस या गृहस्थांनीं या कामीं जे विशेष परिश्रम घेतले, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होणार आहे. मे० ऑकर्थ व शाळीग्राम यांनीं गांवोगांवाहून गोंधळी लोकांकडून पोवाडे मिळवून त्यांचें एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. रा० पारसनिस यांनीं स्वतंत्र माहिती मिळवून झांशीच्या राणीचें चरित्र, मराठ्यांचे बुंदेलखंडांतील पराक्रम, अयोद्धेचे नबाब, हीं ऐतिहासिक पुस्तकें लिहिलीं आहेत. तीं चांगलीं असून अवश्य वाचण्याजोगीं आहेत. ग्रयांट डफ यांनीं विपुल माहिती मिळवून जो इंग्रजींत मराठ्यांचा विस्तृत इतिहास लिहिला आहे, त्याचें क्यापटन डी. केंपन यानें मराठींत उत्तम भाषांतर केलें आहे. कै० मंडलिक यांनीं एलफिन्स्टनचा हिंदुस्थानचा इतिहास मराठींत केला आहे. कै० कीर्तने यांनीं मध्यहिंदुस्थानचा व लोकहित_वादी यांनीं राजस्थानचा, सौराष्ट्र देशाचा, लंकेचा वगैरे इतिहास लिहिले आहेत. तसेंच यांच्या ऐतिहासिक गोष्टी भाग १, २, ३ यांत व रा० ओक यांच्या हिंदुस्थानकथारसांत ऐतिहासिक माहिती ओतप्रोत भरलेली दिसून येते.

मुसलमानी इतिहासकार फेरिस्ता याच्याही ग्रंथाचें मराठींत भाषांतर झालें आहे. रा० मोडक यांनीं दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास व सरदेसाई यांनीं मुसलमानी रियासत हे ग्रंथ लिहून मुसलमानी राज्या-विषयीं बरीच माहिती एकत्र करून, ठेविली आहे. इंग्लंडचा इतिहास, फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास हेही इतिहास मराठींत झाले आहेत. कै० लक्ष्मणराव चिपळूणकर यांनीं विशेष परिश्रम घेऊन महाराष्ट्राचा मोठा इतिहास ग्रंथमालेंत छापून प्रसिद्ध केला आहे. तसेंच बहुतेक देशी

संस्थानांचे व त्यांच्या घराण्यांचे इतिहास प्रो. मोडक यांनीं लिहिले आहेत. डा. भांडारकर यांच्या ‘ दख्खणचा इतिहास ’ नामक इंग्रजी ग्रंथाचें मराठींत रूपांतर झालें आहे. विद्याभिलाषी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं ‘ एपिटोम्स ऑफ हिस्टरी ’ नामक इंग्लिश ग्रंथमालिकेच्या आधारें ग्रीस, रोम, कार्थेज, आसिरिया, तुर्कस्थान, रशिया, स्पेन, इजिप्त, चीन, सिलोन, इराण, या देशांचे इतिहास प्रसिद्ध ग्रंथकारांकडून लिहवून प्रसिद्ध केले आहेत. रा० राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड, १ आणि ४ प्रसिद्ध करून भावी इतिहासकारांकरितां बरीच माहिती मिळवून प्रसिद्ध केली आहे. शेवटीं एक सूचना करावयाची आहे ती ही कीं, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचें अनुकरण करून प्रत्येक संस्थानिक किंवा इतर श्रीमान् गृहस्थ जर अशाच किंवा इतर तऱ्हेच्या पुस्तकमालिका प्रसिद्ध करतील, तर त्यांचें नांव संस्मरणीय होऊन स्वभाषेची अल्पस्वल्प सेवा केल्याचेंही श्रेय त्यांना मिळणार आहे.

**चरित्रें**:—मराठींत चरित्रलेखनाचा उपक्रम महिपतीनें केला असून त्यानें आपल्या भक्तविजय, संतलीलामृत वगैरे ग्रंथांत संत व भक्त मंडळींचीं चरित्रें लिहून ठेविलीं आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं कविपंचक नामक पुस्तकांत—कालिदास, भवभूति, बाणभट्ट, सुबंधु आणि दंडी या—पांच संस्कृत कवींचीं चरित्रें लिहिलीं आहेत. अगोदरच चिपळूणकरांची भाषा चांगली, आणि तशांत त्यांच्यासारख्या मार्मिक गृहस्थानें हें पुस्तक लिहिलेलें, यामुळें तें फारच चांगलें झालें आहे. गौतमबुद्ध आणि शंकराचार्य या दोन्हीही धर्मसंस्थापकांचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत. आमचे मराठी कवि व साधु ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, यांचीं, तशींच मोरोपंत व वामन पंडित यांचींही चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. शिवाजी, संभाजी, ( नागेशराव बापट यांचें कादंबरी धर्तीवर आहे. ) राजाराम, बाळाजी विश्वनाथ, मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, नाना फडणीस, बापू गोखले, विठ्ठल शिवदेव, हरि फडके, परशुरामभाऊ पटवर्धन इत्यादि मराठेशाईंतील ठळक ठळक

पुरुषांचीं चरित्रें झालीं आहेत. इंग्रजी अमलांत विद्यासंपादन करून स्वप्रयत्नानें जे नांवारूपास चढले, अशा बहुतेक प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. कै० नाना मोरोजी, मंडलिक, सर टी. माधवराव, काशिनाथ त्र्यंबक तेलंग, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रि० आगरकर यांचीं चरित्रें वाचलीं असतां त्यांपासून वाचकांस बराच बोध घेण्यासारखा आहे. शेक्सपीयर, पिट, लॉर्ड बेकन, सर आयझ्याक न्युटन, डा० लिव्हिंगस्टन, वेलिंगटन, बर्क, ग्ल्याडस्टन आणि श्रीमती महाराणी व्हिक्टोरिया, इ० सुप्रसिद्ध आंग्ल विभूतींचीं चरित्रें बोधप्रद आहेत. अमेरिकन प्रेसिडेंट गारफील्ड व लिंकन, तसेच नेपोलियन् बोनापार्ट ग्यारिबाल्डी, माझिनी, या सुप्रसिद्ध पाश्चात देशांतील लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें मराठींत झालीं आहेत. आलेक्झांडर, सॉक्रेटीस, डिमॉस्थोनिस, पीटर धी ग्रेट, कोलंबस ह्या पाश्चात्य प्राचीन मंडळींचीं चरित्रें मराठींत लिहिलीं गेलीं आहेत. चरित्रकारांत रा० ओक व बापट यांनीं बऱ्याच पाश्चात्य सुप्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. यांची भाषा सुलभ असल्यामुळें लहान मुलांसही हीं चरित्रें समजण्यास फारसें कठिण पडत नाहीं. तसेंच धनुर्धारी यांनीं मराठशाहींतील कांहीं प्रसिद्ध सरदारांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. यांची भाषा शुद्ध, आवेशयुक्त आणि अभिमानजनक असल्यामुळें मराठी चांगलें लिहितां यावें, अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं हीं पुस्तकें अवश्य वाचावीं. रा० चितळे यांनीं 'भारतवर्षीय युवतिरत्नमाला' नामक पुस्तक लिहिलें असून त्यांत वीस भारतीय सुप्रसिद्ध स्त्रियांचीं चरित्रें गुंफिलीं आहेत. स्त्रीचरित्रकारांत सौ० काशीबाई कानिटकर यांचें 'डा० आनंदीबाई यांचें चरित्र' प्रसिद्ध आहे.

## शास्त्रीय ग्रंथ.

मराठी वाङ्मयांत शास्त्रीय ग्रंथांची मोठी उणीव दिसून येते. प्राचीन कवींनीं फक्त वेदान्त व धर्म या दोनच विषयांवर ग्रंथ लिहिले व अधुनिक मंडळीनें काव्य, कादंबऱ्या, नाटकें, चरित्रें व निबंध इत्यादि ग्रंथ लिहिण्यांत आपलें बुद्धिवैभव खर्च केलें. याचें कारण शास्त्रीय व

औद्योगिक शिक्षणाचा अभाव किंवा लोकांचें त्याकडे दुर्लक्ष, हें होय. इंग्रजी शिक्षणाकरितां जशा अनेक शाळा आहेत, तशा शास्त्रीय किंवा औद्योगिक शिक्षणाकरितां नाहींत, यामुळें लोकांचें लक्ष जसें त्या बाजूस जावें तसें गेलेलें नाहीं. इंग्रजी भाषेंत या ग्रंथाचा विशेष भरणा आहे, तसा मराठींत होणें अत्यावश्यक असून तो जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत भौक्तिक सुधारणेचें पाऊल सहसा पुढें पडणार नाहीं. शास्त्रीय किंवा औद्योगिक शिक्षण इंग्रजींत मिळत असल्यामुळें ते ग्रंथ मराठींत नसल्याबद्दल कोणास फारशी न्यूनता वाटत नाहीं. मागें सुचविल्याप्रमाणें आमच्या संस्थानिकांनीं किंवा श्रीमान् व्यापाऱ्यांनीं किंवा इतर गृहस्थांनीं याचा विचार करून आपल्या आश्रयाखालीं असल्या अत्यंत उपयुक्त पुस्तकांच्या मालिका प्रसिद्ध केल्याशिवाय ही न्यूनता भरून येईल असें दिसत नाहीं.

यावरून मराठींत शास्त्रीय ग्रंथ मुळींच नाहींत असें नाहीं. जे आहेत ते फार थोडे आहेत व पुढें फारसे नवीन होत नाहींत. संस्कृतांतील वैद्यक ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. पूर्वीं आंग्लवैद्यक मराठींत शिकवीत असत, त्यावेळीं वैद्यकावर वैद्यतत्व, शस्त्रवैद्यक, न्यायवैद्यक इत्यादि ग्रंथ झाले. तसेंच इतर शास्त्रीय विषयांवरही प्रथम प्रथम पुस्तकें झालीं; परंतु हें काम पुढें विशेष नेटानें चाललें नाहीं. कै० केरोपंत छत्रे यांनीं शास्त्रीय विषयांवर कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. कोल्हापूर येथील रा० बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं यंत्रशास्त्र, उष्णता, आरोग्यशास्त्र, पदार्थवर्णन, ( भाग १–२ ) रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान-शास्त्र इत्यादि शास्त्रीय विषयांवर ग्रंथ लिहून अल्प अंशानें कां होईना, परंतु ही उणीव भरून काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला आहे. रा० काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं रसायनशास्त्र, जीवनेंद्रियशास्त्र, भूवर्णन, न्यायशास्त्र, ज्योतिषशास्त्र, भूशास्त्र, वनस्पतिशास्त्र वगैरे लहान लहान पुस्तकें ( प्रायमर्स ) लिहून मराठी वाचकांची थोडी फार सोय केली आहे. रा० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं ज्योतिर्विलास व भारतीय

ज्योतिषशास्त्राचा इतिहास हे उत्तम व उपयुक्त ग्रंथ मराठींत लिहिले आहेत. कै० कृष्णशास्त्री यांनीं 'अनेकविद्यामूलतत्वें' हें पुस्तक लिहिलें असून त्याचा विद्यार्थिवर्गास बराच उपयोग होत आहे. प्रो० गोळे यांनीं 'हवा' व रा० सरदेसाई यांनीं 'पाणी' या विषयांवर चांगलीं पुस्तकें लिहिलीं आहेत. रा० नगरकर यांचें 'हवापाणी' नामक पुस्तक प्रसिद्ध आहे. सौ० रुक्मिणीबाई संजगिरी यांनीं विणकामावर पुस्तकें लिहिलीं आहेत.

**निबंध :**—ह्मणजे एखाद्या विषयाचें ज्यांत थोडक्यांत विवेचन केलें असतें, असा लेख. निबंध लिहिण्याची पद्धति संस्कृतांत नाहीं. ती आह्मी इंग्रजी ग्रंथकारांपासून शिकलों. कै० सदाशिव काशीनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर, गोविंद नारायण माडगांवकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर हे मराठींतील प्राचीन गद्यग्रंथकार होत. छत्रे यांचें बाळमित्र व इसापनीति असे दोन ग्रंथ ( भाषांतरें ) प्रसिद्ध आहेत. यांची भाषा उत्तम असून मनन करण्यासारखी आहे. बाळशास्त्री जांभेकर व कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची भाषा शुद्ध व सरळ आहे, इतकेंच नाहीं तर मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं त्यांचे ग्रंथ अवश्य पहावे, अशी त्यांना सूचना आहे. मराठी भाषेंत प्रख्यात निबंधकार ह्मणजे कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. इंग्रजींत ज्याप्रमाणें आडिसननें निबंध लिहून अनेक विषय वाचण्याची लोकांस गोडी लाविली, त्याप्रमाणें कै० शास्त्रीबुवा यांनीं मराठी भाषा, मराठ्यांचा इतिहास, जुने मराठी कवि व त्यांचीं काव्यें इत्यादि अनेक विषयांवर निबंध लिहून मराठी वाचनाची अभिरुचि प्रथम उत्पन्न केली. यांची भाषा सरळ, जोरदार, मनांत ठसणारी व अभिमानोत्तेजक अशी आहे. निबंधमाला नामक मासिकपुस्तक काढून यांनीं अनेक विषयांची चर्चा केली आहे. आपल्या अद्वितीय लेखनशक्तीनें यांनीं महाराष्ट्रास हलवून सोडलें होतें, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. आज शास्त्रीबुवा हे जरी हयात नाहींत, तरी त्यांचे ग्रंथ आहेत. त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास करून मराठींत पुष्कळ लेखक तयार झाले आहेत. मराठी भाषा आपणांस चांगली यावी, अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं

निबंधमाला वाचल्याशिवाय राहूं नये. लोकहितवादी यांनींही अनेक निबंध लिहिले असून यांची भाषा सरळ व प्रौढ आहे. शास्त्रीबुवा हे जुन्या मताचे असून लोकहितवादी हे सुधारणाप्रिय होते. कै० आगरकर यांचा ' निबंधसंग्रह ' प्रसिद्ध झाला आहे. यांची भाषा जोमदार असून तींत शब्दगौरव व अर्थगांभीर्य विशेष आहे. हे कट्टे सुधारक असून यांनीं आपल्या लेखांनीं विशेष चळवळ उडवून दिली होती. वाचकांनीं यांचे लेख अवश्य वाचावेत. रा. टिळक हेही मराठी भाषा चांगली लिहितात, यांची भाषा खोंचदार आहे. धनुर्धारी यांची भाषा शुद्ध ( इडिऑम्याटिक् ) आवेशयुक्त व अभिमानोत्तेजक असते असा सरकारी रिपोर्टरानें अभिप्राय दिला आहे. रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांची भाषा जोरदार परंतु तुटक असते. यांचे ' मराठ्यांसंबंधानें चार उद्गार ' व ' महाराष्ट्रधर्म ' हे ग्रंथ वाचण्यालायक आहेत. रा. आठले केरळ-कोकीळ मासिकपुस्तककर्ते यांची भाषा सरळ व हृदयंगम असून वर्णन-शैली यांना चांगली साधली आहे. रा. भानु यांच्या भाषेंत संस्कृत शब्द विशेष असल्यामुळें क्वचित् प्रसंगीं साधारण वाचकांस ती दुर्बोध होते. ' नाना व महादजी ' नामक यांचा एक निबंध प्रसिद्ध आहे. प्रि. गोळे यांची भाषा चांगली आहे. ' कुटुंबाचा आणि शाळेचा अभिमान ' ' ब्राह्मण आणि त्यांची विद्या ' असे यांचे निबंध प्रसिद्ध आहेत. कै० गोविंद नारायण माडगांवकर यांचे शुचिर्भूतपणा, स्वच्छता, रेशमी रुमाल, भोजनभाऊ, पानतंबाकु इत्यादि निबंध चांगले असून वाचनीय आहेत. रा. नारायण भवानराव पावगी हे भारतीयसाम्राज्यनामक अत्यंत उप-युक्त पुस्तकमाला लिहून निरपेक्षबुद्धीनें जी देशसेवा करीत आहेत, तीबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. सर्व आर्यबंधुभगिनी ही पुस्तकमाला अवश्य वाचतील अशी आशा आहे. रा. बोडस यांचीं ' अद्वैतमीमांसा ' व ' ग्रामसंस्था ' हीं पुस्तकें चांगलीं असून वाचण्यालायक आहेत. तसेंच अलीकडे प्रिन्सिपाल गोळे यांनीं ' हिंदुधर्म आणि सुधारणा ' हें पुस्तक प्रसिद्ध केलें असून समाजसुधारणा व्हावी अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल, त्यांनीं तरी निदान तें एक वेळ अवश्य वाचावें. रा. वागळे यांनीं बेकनच्या निबंधांचें जें मराठींत

भाषांतर केलें आहे, तें चांगलें साधलें आहे. याशिवाय मराठींत अनेक लेखकांनीं निबंध लिहिले आहेत; परंतु स्थळसंकोचास्तव येथें आतां अधिक लिहिणें अशक्य आहे.

**प्रवास व स्थलवर्णनें:**—प्रवासाची आवड आमच्या लोकांस फारशी नाहीं. तशांत आप्तवर्ग व जिवलग मित्र सोडून परदेशांत जाण्यास कोणीही सहसा धजत नाहीं. अशा अनेक अडचणी असल्यामुळें प्रवासवर्णनात्मक व स्थलवर्णनात्मक ग्रंथ मराठी भाषेंत व्हावे तेवढे झाले नाहींत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. कै० करसनदास मुळजी यांच्या विलायतच्या प्रवासाचें भाषांतर मराठींत झालें आहे. रा० रावजी भवानराव पावगी यांनीं आपला विलायतचा प्रवास लिहून प्रसिद्ध केला आहे. यांची मराठी भाषा जरी संस्कृतमय आहे तरी प्रस्तुत पुस्तकापासून वाचकांस खरोखर पुष्कळ उपयुक्त माहिती मिळते. पंडिता रमाबाई यांचा विलायतचा प्रवासही वाचण्यालायक आहे. कै० सरदार अण्णासाहेब विंचूरकर यांनीं उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतील ज्या अनेक तीर्थयात्रा केल्या, त्यांची माहिती 'तीर्थयात्राप्रबंध' नामक पुस्तकांत दिली आहे. हें पुस्तक वाचलें असतां वाचकांस पुष्कळ नवीन माहिती मिळेल, यांत संशय नाहीं. काश्मीर प्रांत अति प्रेक्षणीय असून इंग्रजी प्रवाशांनीं काश्मीरासंबंधीं अनेक वर्णनें इंग्रजींत लिहून ठेविलीं आहेत, परंतु मराठींत 'काश्मीरवर्णन' म्हणून एकच ग्रंथ आहे. तो जरी लहान आहे तरी वाचकांनीं तो वाचल्याशिवाय राहूं नये. मुंबई, पुणें, धोममहाबळेश्वर, विजापूर, काशी, महाराष्ट्रदेशाचें वर्णन इत्यादि स्थलवर्णनें मराठींत झालीं आहेत. रा० गोगटे यांचे 'महाराष्ट्रांतील किल्ले' नामक पुस्तक अवश्य वाचण्याजोगें आहे.

**तत्वज्ञान:**--या विषयावर मराठींत अनेक ग्रंथ झाले आहेत. वेदान्तविषयावर तर अनेक ग्रंथ असून गीता, उपनिषदें वगैरे संस्कृत ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें झालीं आहेत. तसेंच हर्बर्ट स्पेन्सर यांच्या बहुतेक ग्रंथांचीं व प्रो० म्याक्समुलर यांच्याही कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें झालीं आहेत. सुप्रसिद्ध स्वामी विवेकानंद यांनीं अमेरिकेंत वेदांत विषयावर जीं सुरस व्याख्यानें दिलीं आहेत त्यांचीही अलीकडे मराठी भाषांतरें झालीं आहेत.

# भाग १० वा.

## उपसंहार.

वाचन या विषयाचें येथवर यथामति वर्णन झालें. आतां प्रस्तुत विषयाशीं संबंध असलेल्या कांहीं गोष्टींविषयीं या भागांत उल्लेख करावयाचा आहे, त्याकडे आमचे वाचक पूर्ण लक्ष देतील अशी दृढतर आशा आहे. पाश्चात्य देशांत थोड्या काळांत पुष्कळ सुधारणा झाली असून दिवसेंदिवस सुधारणेच्या बाबतींत त्यांचें पाऊल फार झपाट्यानें पुढें पडत आहे. याचीं कारणें अनेक असतील; परंतु त्यांतच त्यांची वाचनाची विशेष अभिरुचि हें एक मुख्य कारण होय. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी इत्यादि देशांत शेंकडा पंचावन्न किंवा अधिक लोकांस लिहिणें, वाचणें येत असून कित्येक देशांत तर मुलांस लहानपणीं शिक्षण दिलेंच पाहिजे, असे सक्तीचे कायदे करण्यांत आले आहेत. गिरण्यांतील काम करणारे मजूर, गाड्या हांकणारे गाडीवान, सुतार, लोहार, न्हावी, धोबी इत्यादि सर्व लोकांस तिकडे लिहिणें वाचणें येत असल्यामुळें कामधंदा आटोपून राहिलेला वेळ ते आळसांत किंवा गप्पागोष्टींत फारसा न घालवितां विश्रांतीच्या वेळीं सुरस काव्यें, उत्तम निबंध, धर्मविषयक ग्रंथ अथवा कादंबऱ्या वाचण्यांत घालवितात! वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें वाचून त्यांतील विषयांवर ते आपल्या मित्रमंडळींत वादविवाद करितात! त्यांच्याकरितां वाचनाच्या पुष्कळ सोई असून त्यांना वरिष्ठ शिक्षणाचा लाभ व्हावा, कठीण ग्रंथ स्वतः समजावेत म्हणून युनिव्हर्सिटी एक्स्टेनशन सीरीज ( University extention series ) सारख्या संस्था स्थापून सुशिक्षित लोक त्यांच्याकरितां जिवापाड श्रम करीत आहेत. त्यांचें वेतन जरी अल्प असतें तरी त्यांतूनच उत्तम उत्तम पुस्तकें विकत घेऊन त्यांचा संग्रह करण्याची त्यांना मोठी हौस असते!

पाश्चात्य देशांतील स्थिति.

ह्याच्या अगदीं उलट स्थिति आमच्या इकडे आहे. आह्मांपैकीं सरासरी शेंकडा ४ लोकांसच लिहिणेंवाचणें येत असून बाकी सर्व लोक अक्षरशत्रु असल्यामुळें आमच्या समाजांत अज्ञान फार माजलें आहे. ज्यांना ट-फ-येण्याची मारामार त्यांना पुस्तकांतील रहस्य कसें बरें ठाऊक होणार? शिक्षणावांचून या काळांत गत्यंतर नाहीं. दुसरीं राष्ट्रें झपाट्यानें पुढें चाललीं आहेत, व त्या मानानें आह्मींही पुढें पाऊल टाकिलें तरच आमचा तरणोपाय आहे. याकरितां शिक्षणप्रसार जितका अधिक झपाट्यानें होईल तितका करून सुशिक्षित लोकांनीं आपल्या अज्ञानबांधवांस ज्ञानामृत पाजलें पाहिजे. आळस हा दुर्गुण आमच्या लोकांच्या अगदीं हाडींमासीं खिळला आहे. तो ज्या मानानें नाहींसा होईल त्या मानानें आमची प्रगति होण्यास फारशी अडचण पडणार नाहीं. अशिक्षित लोकांस विद्या नाहीं ह्मणून ते पुस्तकाकडे पहात नाहींत; परंतु सुशिक्षित लोक हे विद्यासंपन्न असूनही शिक्षणक्रम आटोपल्यावर वाचन सोडून देतात. आणि फावलेला वेळ गप्पागोष्टींत किंवा पत्ते, बुद्धिबळें वगैरे खेळ खेळण्यांत घालवितात. या त्यांच्या कृतीमुळें खरोखर ते आपल्या विद्वत्तेस कालिमा लावितात. ही शोचनीय स्थिति कधीं नाहींशी होईल ती होवो!

आमच्या इकडील स्थिति.

अशी स्थिति असल्यामुळें मराठी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांचा फारसा खप होत नाहीं. ग्रंथप्रकाशकांस अर्थलाभ न झाल्यामुळें ते ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें काम फारसें नेटानें चालवीत नाहींत. ग्रंथकारांसही चांगलासा श्रमाचा मोबदला न मिळाल्यामुळें ग्रंथ लिहिण्यास त्यांना हुरूप रहात नाहीं. असें झालें ह्मणजे ग्रंथ लिहून स्वभाषेची सेवा करण्याकडे कोणीच फारसें लक्ष देत नाहीं याचा परिणाम असा होतो कीं, स्वभाषेंत उत्तमोत्तम ग्रंथ होत नाहींत, व चांगले ग्रंथ न झाल्यामुळें राष्ट्राचीही प्रगति होण्यास मदत होत नाहीं. भाषेंतील

देशी भाषेंत उत्तमोत्तम ग्रंथ झाले पाहिजेत.

ग्रंथसंग्रह थोडाच कां असेना परंतु तो असला ह्मणजे फार फलद्रूप व भूषणावह होतो! जी आपली मायभाषा आहे तिची हयगय करून कधींही चालावयाचें नाहीं. जितकें आपण तिच्या अभिवृद्ध्यर्थ झटूं, तितकी आपली अभिवृद्धि खास होईल! प्राचीनकाळीं जीं राष्ट्रें उदयास आलीं होतीं त्यांकडे व हल्लीं जीं सुधारणेच्या शिखरीं पोहोंचल्यामुळें ज्यांची कीर्ति सर्वत्र दुमदुमत आहे, अशा राष्ट्रांविषयीं क्षणभर विचार केला असतां एक गोष्ट आढळून येईल, ती ही कीं स्वभाषेच्या द्वारेंच त्यांची उन्नति झाली आहे. स्वभाषारूपी वृक्षाची लागवड करून त्यास विदेशीय खत घातलें असतां त्या वृक्षास विशेष जोम येईल आणि फळेंही उत्तम येतील!

ग्रंथकारांस उत्तेजन.

ग्रंथकारांस उत्तेजन मिळाल्यावांचून चांगले चांगले ग्रंथ कधींही निर्माण व्हावयाचे नाहींत. तसेंच प्रकाशकांसही आपल्या धंद्यांत फायदा झाल्याशिवाय ते तरी नेटानें काम पुढें चालविणार कसें? या स्थितीचा लोकांनीं अवश्य विचार केला पाहिजे. गुजराथेंत "गुजराथी व्हर्नाक्युलर सोसायटी" व आणखी एक दोन संस्था आहेत, त्यांच्या साहाय्यानें चांगले चांगले ग्रंथ तयार होत आहेत, आणि त्यामुळें गुजराथी भाषेचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत आहे. असल्या प्रकारच्या संस्था आपल्या महाराष्ट्रांत पाहिजेत, व ज्या आहेत त्यांना द्रव्यसाहाय्य पाहिजे. त्यावांचून ग्रंथसंग्रहास चांगलीशी मदत होणार नाहीं. शरीरपोषणाची जशी आपण काळजी वाहतों तशी मनाच्या पोषणाची ( ह्मणजे त्यास सुसंस्कृत करण्याची ) काळजी कां बाळगूं नये? संसारांत आपण अनेक वस्तूंचा संग्रह करून ठेवितों, त्यांतच चांगल्या व निवडक ग्रंथांस कां स्थळ मिळूं नये. जे श्रीमंत आहेत, पुस्तकें घेण्याची ज्यांना ऐपत आहे, त्यांनीं चांगलीं चांगलीं पुस्तकें विकत घेऊन संग्रहीं ठेवावीं. गोरगरीबांनींही आपल्या ऐपतीप्रमाणें थोड्या फार पुस्तकांचा संग्रह करावा. असें झालें ह्मणजे ग्रंथकारांस उत्तेजन मिळून चांगले चांगले

ग्रंथ तयार होतील. या बाबतींत इंग्लिश लोकांचें अनुकरण अगदीं करण्यासारखें आहे. ज्या घरांत ग्रंथ नाहींत त्या घराला प्राण गेलेल्या कुडीची उपमा सिसरो यानें दिली आहे.

एपिक्टिटस यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, "तुह्मीं घराचीं छपरें उंच न करितां स्वजनांचीं मनें उदात्त कराल तर राष्ट्राची सर्वांत मोठी कामगिरी केल्यासारखें होईल." स्त्रीपुरुष, आबालवृद्ध इत्यादि सर्वांस ज्ञानामृताचा लाभ देणें व त्यांना सन्मार्गास लावणें, यासारखें श्रेयस्कर अन्य कृत्य असेल असें मला वाटत नाहीं. आपल्या देशांत स्त्रियांच्या शिक्षणाची फारच हेळसांड होत आहे, व ती जोंपर्यंत अशीच चालू राहील तोंपर्यंत आमचें नष्टचर्य कधींही संपावयाचें नाहीं. कामधंदा करून पुरुषांनीं पैसे मिळवून आणावयाचे व स्त्रियांनीं गृहांतील सर्व व्यवस्था पाहून आनंदानें संसार करावयाचा. स्त्रीपुरुष हीं संसारांतील मुख्य दोन अंगें असून तीं दोन्हींही बरोबर व एकमेकांस शोभतील अशींच असलीं पाहिजेत. परंतु हल्लीं आमच्या समाजाचें एक अंग अगदीं निरुपयोगी झालें आहे. स्त्रीस "घरांतील लक्ष्मी" असें ह्मणण्याची आमच्यांत चाल आहे. परंतु विद्येचें भूषण असल्याशिवाय तिला लक्ष्मीपण कधींही येणार नाहीं. आई सुशिक्षित असली ह्मणजे तिच्या शिक्षणाचा प्रभाव मुलांवर पडून ती उत्तम निपजतात. जार्ज हर्बर्ट यानें ह्मटलें आहे, "सुशिक्षण देण्याच्या कामीं एक चांगली आई जितकी उपयोगी पडते, तितके शंभर चांगले शिक्षक उपयोगीं पडत नाहींत."

स्त्रीशिक्षण.

मराठी भाषेची जी आजपर्यंत अभिवृद्धि झाली, ती केवळ लोकांच्या खटपटीनें झाली असून पुढेंही तिला लोकाश्रयावरच अवलंबून रहावें लागणार आहे. मराठी भाषेस आजपर्यंत राजाश्रय क्वचित्च मिळाला. पूर्वीं संस्कृतज्ञ शास्त्रीमंडळीकडून हिची बरीच अनास्था झाली. हल्लींचे पदवीधर व सुशिक्षित ह्मणविणारे लोक यांनीं आपल्या मायभाषेविषयीं

विनंति.

जेवढी कळकळ व काळजी वहावयास पाहिजे तेवढी ते वहात नाहींत. इंग्रजी भाषेंत ग्रंथभांडार पुष्कळ आहे; ती भाषा प्रगल्भ आहे; त्या भाषेचा प्रसार फार आहे; या सर्व गोष्टी कबूल आहेत. परंतु सर्वांसच इंग्रजी शिक्षण कोठून मिळणार! एवढी ऐपत तरी सर्वांस कोठें आहे! ज्यांना ऐपत असेल व संधि मिळेल त्यांनीं इंग्रजी शिकावें व इंग्रजी भाषेंत असलेल्या ज्ञानभांडाराचा लाभ घ्यावा, परंतु जे गरीब व निराश्रित आहेत, शिक्षण मिळण्याची ज्यांना फारशी ऐपत नाहीं, अशा लोकां-करितां देशी भाषेंत चांगला व पुष्कळ ग्रंथसंग्रह असला पाहिजे. स्वभाषेंत लोकशिक्षणाचें काम जेवढें सुलभ व अल्प प्रयत्नानें होतें, तेवढें अन्य भाषेंत कधींही व्हावयाचें नाहीं.

# परिशिष्ट.

येथवर ठळक ठळक मराठी पुस्तकांचें दिग्दर्शन झालेंच आहे; तथापि वाचकांच्या सोयीकरितां येथें निवडक पुस्तकांची यादी दिली आहे. या यादींत बहुतेक चांगल्या पुस्तकांचा होतां होईल तों समावेश केला आहे इतकेंच नाहीं, तर मुलें, मुली, स्त्रीपुरुष इत्यादि सामान्य वाचकांस ती उपयुक्त व पूर्ण मार्गदर्शक व्हावी ह्मणून विशेष काळजी घेतली आहे.

## कविता.

* अमृतानुभव–मुकुंदराज.
* ज्ञानेश्वरी—ज्ञानदेव.
* भागवत–एकनाथ.
* महाभारत—मुक्तेश्वर.
* यथार्थदीपिका–वामन.
* अभंगांची गाथा–तुकाराम.
* दासबोध, * मनाचे श्लोक — रामदास.
* रामविजय, * हरिविजय — श्रीधर.
* केकावली, * महाभारत — मोरोपंत.
योगवासिष्ठ—रंगनाथस्वामी.
संतलीलामृत—महिपति.
* नलोपाख्यान–रघुनाथपंडित.
* लावण्या—रामजोशी.
* राजाशिवाजी–कुंटे.
* गंगावर्णन–पेठकर.
गीतामृतशतपदी–गर्दे.
कृष्णाकुमारी–लेले.
कुसमांजलि–महाजनी.
काव्यमाधुर्य–वा० दा० ओक.
रघुवंश–लेले.
अभिनव कादंबरी–मोगरे.
* ऐतिहासिक पोवाडे–शाळिग्राम.
सासरची पाठवणी–आठल्ये.

## चरित्रें.

गौतमबुद्ध—केळुसकर.
* पृथ्वीराज चव्हाण—लोकहितवादी.
तुकारामचरित्र—केळुसकर.
रामदासचरित्र—चौबळ.
* एकनाथ—सहस्त्रबुद्धे.
छत्रपतीचें चरित्र–सभासद.
* संभाजी आणि राजाराम — भागवत.
* नाना फडनवीस–खरे.

* परशुरामभाऊ पटवर्धन--निगुडकर.
* महादर्जी शिंदे--नातु.
अहिल्याबाई होळकरांण.
* राणी लक्ष्मीबाई-पारसनीस.
* साक्रेटीस-चिपळूणकर कृ.
* जॉर्ज वाशिंग्टन-व्हा. पी. रानडे.
एब्राहाम लिंकन-वि. को. ओक.
विक्टोरिया राणीचें चरित्र.
ग्लॅडस्टन-वि. को. ओक.
एल्फिन्स्टनचें चरित्र.
* आनंदीबाई जोशी—काशीबाई कानिटकर.
भारतवर्षीय युवति रत्नमाला—चितळे.

## इतिहास.

हिंदुस्थानचा इतिहास-(मंडलिक).
राजस्थानचा इतिहास-( लोकहितवादी ).
* मराठ्यांचा इतिहास--( ग्रँटडफच्या इ० भाषांतर ).
* पेशव्यांची बखर--सोहोनी.
महाराष्ट्राचा इतिहास-चिपळूणकर ल.
गुजराथचा इतिहास-लोकहितवादी.
पानपतची बखर-यादव.
* भाऊसाहेबांची बखर-रघुनाथ.
मुसलमानी रियासत-सरदेसाई.
मराठ्यांचे पराक्रम, आयोध्येचे नबाब.—पारसनीस.
विद्यमान एतद्देशीय संस्थानें व जहागिरी यांचा इतिहास-गोडबोले.
* युनायटेड स्टेस्टची लोकस्थिति--रमाबाई.
ऐतिहासिक गोष्टी---लोकहितवादी.

## कादंबऱ्या.

* मुक्तामाला.
* अनाथ पांडुरंग.
* मोचनगड.
* प्रेमबंधन.
* ठगाची जबानी.
जिर्जावास.
ताराबाई आणि हिराबाई.
नारायणराव आणि गोदावरी.
छत्रपतिसंभाजी., * बाजीराव.—नागेशराव बापट.
आनंदाश्रम.
विषवृक्ष.
कुवलयपूरची राणी कमुद्वती.
बृहत्कथासागर.
* आजकालच्या गोष्टी.
* पण लक्षांत कोण घेतो?
* मी.
* पानपतची मोहीम.
बांईकरभटजी.
आरबीभाषेतील सुरस गोष्टी.
अजब ऐनेमहाल खंड १ ते ९.

## नाटकें.

* * विक्रमोर्वशीय.—गोडबोले.
* * वेणीसंहार.— „
* * उत्तररामचरित्र.—„
* * शकुंतला.--किर्लोसकर.
* * मृच्छकटिक.--गोडबोले.
* * कादंबरी.--देवल.
* सावित्री. / हरिश्चंद्र. } त्रिलोकेकर.
* गुणोत्कर्ष.--खरे.
* * जयपाळ. / * थोरले माधवराव. } कीर्तने.
* * विकारविलसित.--अगरकर.
* * त्राटिका.--केळकर.
* दुर्गा.--देवल.
* पानपतचा मुकाबला.--शिरवळकर.

## शास्त्रीय ग्रंथ.

* * ज्योतिर्विलास–दीक्षित.
* भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास. }„
* * अनेकविद्यामूलतत्वें-कृ० चिपळूणकर.
* हवा---प्रो० गोळे.
* पाणी----सरदेसाई.

## प्रवास व स्थलवर्णनें.

* इंग्लंदांतील प्रवास--कर्सनदास मूळजी यांचा
* * विलायतचा प्रवास----पावगी. रा.
* * धोममहाबळेश्वर वर्णन–उदास.
* * विजापूरवर्णन----गायकवाड.
* महाराष्ट्रांतील किल्ले.---गोगटे.
* मुंबईचं वर्णन---माडगांवकर.
* मलबारवर्णन-केरळकोकिळ-कर्ते.

## निबंध.

* * भारतीय साम्राज्य--ना० पावगी
* * केसरींतील निबंध--आगरकर.
* * निबंमाला--चिपळूणकर.
* * बेकनचे निबंध--वागळे.
* सिसरोचे निबंध--देव.
* इंद्रियमहत्वाविचार--बा० वैद्य.
* उद्योग आणि नशीब.
* सुभाषित अथवा सुबोध वचनें } लोकहितवादी
* कुटुंबाचा आणि शाळेचा अभिमान / ब्राह्मण आणि त्यांची विद्या. } प्रो० गोळे
* सद्बोधमंदिर.
* हिंदुधर्म आणि सुधारणा.
* कविपंचक--वि० चिपळूणकर.
* विविधविषयसंग्रह--आगरकर.
* संसारसुख--गाडगीळ.

शास्त्ररहस्य.
ग्रामसंस्था---ब्रोडस.
स्वातंत्र्य--फडके.
स्त्रियांची परवशता--कानिटकर.
अबलोन्नतिलेखमाला. भाग १ ते ४ } वैद्य.
सद्वर्तन--गो० शं० बापट.
नीतिमुक्ताहार--पित्रे.
प्रपंचरहस्य--ओक.
शिक्षणमीमांसा.
सौभाग्यरत्नमाला.
स्त्रीधर्मनीति--रमाबाई.

---

* हीं पुस्तकें न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं आपल्या मराठी निवडक पुस्तकांच्या यादींत नमूद केलीं आहेत.

# अर्पणपत्र.

## श्रीमंत गंगाधरराव गणेश पटवर्धन

ऊर्फ

## बाळासाहेब मिरजकर

हे शब्दशः राजश्रियाविराजित आहेतच. पण पुढें लिहिलेल्या पाश्चात्य महाकवि वर्डस्वर्थच्या कवितेंतील उताऱ्यांत लिहिल्याप्रमाणें, आपला बहुतेक वेळ शास्त्राभ्यासामध्यें व लोकांना शास्त्राभ्यास करण्यासाठीं उत्तेजन देण्यामध्यें खर्च करीत असल्यामुळें श्री व सरस्वती ह्या उभयतांच्या संयुक्त तेजानें ते विशेष विराजित झाले आहेत. अशा सरस्वतीभक्तास आपले अल्प यत्न अर्पण केले तर

"पुष्पाश्रयात्शंभुशिरोधिरूढा
पिपीलिका चुंबति चंद्रबिंबम्। "

ह्या न्यायानें आपल्यास थोडेंसें गौरव प्राप्त होईल असें समजून, हा ग्रंथ श्रीमंतांस ग्रंथकर्त्यांनें सप्रेम अंतःकरणानें व अतिशय नम्रपणानें अर्पण केला आहे.

गोपाळ रामचंद्र तांबे.

"Knowledge, methinks, in these disordered Times
    Should be allowed a priviledge to have
Her anchorites, like piety of old;
    Men, who from faction sacred, and unstained
By war, might if so minded turn aside
    Uncensured, and subsist in a scattered few
Living to God and Nature, and content
    Wish that communion. Consecrated be
The spots where such abide! But happier still
    The Man, whom furthermore a hope attends
That meditation and research may guide
    His privacy to principles and powers
Discovered or invented, or set forth
    Through his acquaintance with the ways of truth,
In lucid order; so that when his course
    Is run, some faithful eulogist may say
He sought not praise, and praise did overlook
    His unobtrusive merits; but his life
Sweet to himself, was exercised in good
    That shall survive his name and memory".

*WORDSWORTH*

*Excursion 5th book.*

# मनोलेखन.

अकिंचिदपि कुर्वाणः सौख्यैर्दुःखान्यपोहति ।
तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः ॥*

——उत्तररामचरितम्

शांत समुद्रांत तारूं चालविणें सुलभ आहे. पण जेव्हां क्षितिजावर काळे ढग डोकावूं लागतात; वारा सोसाट्याचा वाहूं लागतो; गडगडाट, खडखडाट, लखलखाट व दणदणाट यांनीं वादळ आपणास नाचवूं लागतें; तेव्हां मोठ्या मी मी ह्मणविणाऱ्या नाविकांना 'दे माय, धरणी ठाय' असें होतें! पण त्यांतल्यात्यांत सुखाची गोष्ट ही कीं, सांप्रतच्या यांत्रिक युगांत यंत्रशास्त्रज्ञांनीं आपलें अमोल बुद्धिचातुर्य खर्च करून 'वायुभारमापक यंत्र' शोधून काढिलें आहे. त्यामुळें वादळ केव्हां येऊन थडकणार याची अगोदर थोडावेळ तरी अगाई मिळून, कोळी, खलाशी व नाखुवे यांना आपल्या सोक्षमोक्षाची तयारी करितां येते. असो. या संसारांतील प्रसंगहि, समुद्रांतील वादळाप्रमाणें, केव्हां व कोठून मनुष्यावर येऊन थडकतील, याचा नेम नाहीं हें खरें; तरी इतिहासकार, तत्ववेत्ते व कवी यांनीं आपलें अलौकिक बुद्धिसर्वस्व वेंचून, एक युक्ति काढिली आहे. तिच्यायोगानें, संसारांतील वादळाचें भविष्य कळून, मनुष्य वारा येईल तशी पाठ देण्यास तयार होतो. ती कोणती? तर मनोलेखन ही होय.

---

* जो ज्यास प्रिय असतो, तो त्यास ह्मणजे अजब वस्तु आहे आहे असें वाटतें; जो कांहीं न करितां, त्यास सुख देऊन त्याचें दुःख दूर करतो!

आतां (१) मनोलेखन ह्मणजे काय?

(२) त्यास कोणते प्रसंग अनुकूल आहेत?

(३) त्याचा इतिहासाशीं काय संबंध आहे?

(४) त्याचा तत्वज्ञानाशीं काय संबंध आहे?

(५) त्याचा कवित्वाशीं काय संबंध आहे?

(६) सृष्टिलेखन श्रेष्ठ कीं मनोलेखन श्रेष्ठ?

(७) मनोलेखनाचें साधन साधी भाषा कीं अवघड भाषा?

या सात प्रश्नांचा आपण क्रमवार विचार करूं.

१. पहिला प्रश्न मनोलेखन ह्मणजे काय हा होय. आपण ज्या गोष्टींचा कळकळीनें स्वताशीं विचार करितों किंवा ज्या गोष्टींचा विचार स्नेह्यांस किंवा इतर जनांस कळकळीनें कळवितों, त्याचें यथातथ्य वर्णन हेंच मनोलेखन होय. तें साधण्यास सूक्ष्म निरीक्षण (किंवा घरगुती भार्षेत ज्यास आपण चाणाक्षपणा किंवा धूर्तपणा ह्मणतों) त्याची अत्यंत गरज आहे. तें शिकण्यास एखादा राजमार्ग नाहीं. तें ज्याचें त्यानेंच स्वताचे अक्कलेनें किंवा ठेंचा खात शिकलें पाहिजे. यास्तव मनोलेखन हा विषय विलक्षण व गहन आहे.

२. जरी मनोलेखन हा विषय असा विलक्षण व गहन आहे असें ह्मटलें आहे, तरी विचारी पुरुषांनीं "नदीमुखेनेव समुद्रमाविशत्" या वचनानुसार त्यास हस्तगत करण्यास कांहीं प्रसंग अनुकूल आहेत असें दीर्घ परिश्रम करून शोधून काढिलें आहे. लॉर्ड बेकन् हा नामांकित इंग्रजी तत्ववेत्ता ह्मणतो कीं, "मनुष्य एकांतीं जे आत्मगत विचार करीत असतो किंवा मोकळ्या मनानें बोलत असतो, त्यावरून त्याच्या मनाचें वर्णन करतां येतें; कारण, अशावेळीं तो कशाचाही आव घालीत नाहीं. तसेंच, तो रागांत किंवा लोभांत असतां, त्याच्या मनाची छबी घेतां येते; कारण, अशावेळीं त्याच्या मताची त्यावर छाप

नसते. आणखी जेव्हां तो नवीन प्रसंगांत सांपडून बावरून जातो, तेव्हां त्याच्या अंतरात्म्याची प्रतिमा आपल्या दृष्टीस पडते. कारण अशावेळीं, तो रूढिबंधनानें गुरफटलेला नसतो." शिलर या जर्मन कवीनेंही अशाच अर्थाचे उद्गार काढिले आहेत. तो ह्मणतो कीं,

आत्म-परीक्षण व्हावें, सूक्ष्म निरीक्षण करी जनीं सतत;
इतर-परीक्षण व्हावें, सूक्ष्म निरीक्षण करी मनीं त्वरित!

आतां हें निरीक्षण निरीक्षण ह्मणजे काय? दुसरे किंवा आपणच काय बोलतों, कसें वागतों यावर बारीक नजर ठेवणें हें होय. विद्यमान इंग्रजी तत्ववेत्ते स्पेन्सर साहेब यांनींही या निरीक्षणाचाच महिमा गाइलेला आहे. ते आपल्या 'समाजशास्त्र' या ग्रंथांत ह्मणतात कीं, 'मनुष्याच्या भाषणांतील वरचेवर येणारे शब्दप्रयोग व ह्मणी यांवरून त्याच्या एकंदर चालचर्येचें धोरण बांधतां येतें.' अनेक--भाषाभिज्ञांचा भाषाध्ययनांतही हाच प्रधान हेतु असतो कीं, निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांचा स्वभाव काय आहे तो माहीत व्हावा व प्रसंग पडल्यास तदनुरूप वागून आपला कार्यभाग साध्य करून घेतां यावा.

३. तिसरा प्रश्न हा आहे कीं, मनोलेखनाचा इतिहासाशीं काय संबंध आहे? इतिहासांत मुख्यत्वेंकरून, स्वाऱ्या, छापे, लढाया व युद्धें यांचीं सविस्तर वर्णनें असतात; किंवा त्यांत कट, धामधुमी, फंदफितूरी व कारस्थानें भरलेलीं असतात. पण त्यांत अलौकिक पुरुषांचें मनोलेखन तुरळक असतें. यानें कारण उघड आहे. इतिहासकारास तशा अलौकिक पुरुषांचा सहवास कायतो तत्कालीन तुटपुंजीं दप्तरें, रोजनामे किंवा कागदपत्रें यावरूनच. तेव्हां त्याचें काम जसें हवें तसें क्वचित्च वठतें. या दृष्टीनें पाहतां, मनोलेखनाची मौज ज्यास पाहणें असेल, त्याची इतिहासांत तृप्ति होणें कठीण आहे. इतिहासकाराचे हातपाय वस्तुस्थितिज्ञानानें इतके जखडून बांधलेले असतात

कीं, त्याचें लक्ष्य दोन घोंड्यांवर पाय ठेवणाऱ्याप्रमाणें अलौकिक पुरुषांकडे व वस्तुस्थितीकडे दुभागलेलें असतें!

४. चौथा प्रश्न असा आहे कीं, मनोलेखनाचा तत्वज्ञानाशीं काय संबंध आहे? तत्ववेत्त्याची उडी शाश्वत सुख कशांत आहे, याचा खल करण्याकडे असते. जीं सुखदुःखें मनुष्यमात्रांत कल्लोळ उडवून देतात त्यांस तुच्छ मानून, वादळाचे प्रदेशांतून वर डोकें काढणाऱ्या सुळ्याप्रमाणें, ते बोलून चालून तृतीयप्रकृति बनतात व या असिधाराव्रतानें मनुष्यजातीचें पितृत्व पतकरितात. तेव्हां जसा एखादा मुलगा बापाजवळ आपलें हितगुज सांगण्यास कचरतो, तसा मनोलेखनेच्छु जन तत्त्ववेत्त्याशीं लगट करण्यास कचरतो. कारण 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' हें तत्त्व तो अगोदरच ओळखून असतो.

५. पांचवा प्रश्न ह्मणजे कवित्वाचा मनोलेखनाशीं काय संबंध आहे हा होय. कल्पना-सृष्टि निर्माण करण्याची विद्या, चित्रकार, नाटककार, कवी व कादंबरीकार यांस अंगचीच असते. या चौघांना "कविवर्ग" ह्मणतां येईल. साहित्यशास्त्रांत काव्याचे दोन प्रकार आहेत; त्यांस दृश्य ( पहावयाचें ) व श्राव्य ( ऐकावयाचें ) असें ह्मणतात. त्यांपैकीं पहिल्यांत चित्रें व नाटकें यांची गणना आहे; व दुसऱ्यांत, कविता व कादंबऱ्या यांची गणना आहे. डोळ्यानें पाहिलेल्या मूर्तींचीं व प्रसंगांचीं चित्रें, कवितेच्या पुस्तकांतून किंवा कादंबऱ्यांतून काढिलेल्या शब्दचित्रांपेक्षां अधिक सुखकर व स्मरणीय असतात हें सर्वश्रुत आहे. तरी या चारी कलांचा मनोलेखनाशीं जो संबंध आहे, तो त्याच्या इतिहासाशीं किंवा तत्वज्ञानाशीं जितका निकट आहे, त्याहून अधिक निकट आहे. यास कारण पण असेंच आहे. कविवर्गाच्या अंगीं सहृदयता हा विशेष गुण असतो. त्यामुळें मनोलेखनासारखा बिकट विषय त्यास करतलमलवत् भासतो. 'शाकुंतलाचा चौथा अंक' कोणास बरें कन्याविरहाची ओळख पटवून देत नाहीं? 'रोमियो आणि जुलिएट्' मधील आषकमाषुकांचा

विरह; किंवा 'ईलियड्' मधील हेक्टर व अँड्रोमॅकी या जोडप्याची ताटातूट; किंवा 'हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं!' असा आक्रोश करणाऱ्या श्रीरामचंद्राचा विप्रलंभ शृंगार कोणास सद्गदित करीत नाहीं? अशीं एक कीं दोन, अनेक प्रसंगांचीं अनेक काव्यें संसारनाटक कसें आहे हें आपणास दाखवीत आहेत. व मनोलेखनाची खरी मौज येथेंच आहे असें आपणास सुचवीत आहेत, ह्या धोरणानेंच कीं काय एका संस्कृत कवीनें असें ह्मटलें आहे कीं--

नैव व्याकरणज्ञमेति पितरं न भ्रातरं तार्किकं
दूरात्संकुचितेव तिष्ठति पुनश्चांडालवच्छांदसम् ।
मीमांसानिपुणं नपूंसकमिति ज्ञात्वा निरस्तादरा
काव्यालंकरणज्ञमेति कविता-कान्ता वृणीते स्वयम् ॥

(कवितारूपी स्त्री वैय्याकरणी मनुष्यास बाप समजून, त्यास वरीत नाहीं; ती तर्कशास्त्रज्ञास, भाऊ समजून वरीत नाहीं; छंदःशास्त्र जाणणाऱ्यास चांडाल समजून, ती त्यापासून दूर दूर असते; मीमांसेंत निपुण असणाऱ्यांना नपूंसक समजून, ती त्यांच्याकडे नाक मुरडते; पण ती काव्य-शास्त्रज्ञाचे गळ्यांत आपण होऊनच माळ घालते.)

६. सहावा प्रश्न असा कीं सृष्टिलेखन श्रेष्ठ कीं मनोलेखन श्रेष्ठ? या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे. या जगांत, मनुष्य हा प्राणिवर्ग, वनस्पतिवर्ग व जडसृष्टि यांत श्रेष्ठ आहे हें सर्वसंगत आहे; तेव्हां मनुष्याच्या मनोधर्माचें वर्णन सृष्टिवर्णनाहूनहि श्रेष्ठ आहे हें उघड आहे, व ह्मणूनच भवभूतीहून कालिदास व मिल्टनहून शेक्सपीयर श्रेष्ठ आहे.

अठराव्या शतकांत इंग्लंदमध्यें अशान प्रकारच्या एका मुद्यावर एक जबरदस्त वादविवाद तत्कालीन कवि-वर्गांत सारखा नऊ वर्षें चालला होता. त्यांत रेव्हरेंड् बौल्स् हे एकटे योद्धे एकीकडे व बायरन्, कँबेल

व पोप ही वीर–मंडळी दुसरीकडे होती. या वादांत असें निष्पन्न झालें कीं "सृष्टींत जें कांहीं सुंदर किंवा उदात्त आहे त्यावर रचलेली कविता मनुष्यकृतीवर रचलेल्या कवितेहून अधिक सुंदर व उदात्त असते व अतएव अधिक रसात्मक असते; तद्वत्, मानवी अंत:करणातले विकार हे साधारण सृष्टींतले प्रकार असल्यामुळें त्यांसंबंधी कविता प्रसंगोपात्त व क्षुल्लक चालीरीतीसंबंधीं कवितेहून अधिक उच्च कोटींतली आहे. तरी या वादांत कृत्रिम व नैसर्गिक कल्पनांच्याच माधुर्याची तुलना होती. तीच जर नैसर्गिक व मानसिक कल्पनांच्या माधुर्याची तुलना असती, तर आपल्या प्रस्तुत मुद्यावरहि इष्ट निकाल झाला असता असें ह्मणण्यास जागा आहे. यास प्रत्यंतर दूरचें नको. वॉशिंग्टन् आयर्व्हिंग् या नामांकित लेखकानें 'भाषेची स्थितिस्थापकता' यावर आपल्या लोकप्रिय **स्केच् बुकांत** एक निबंध लिहिलेला आहे. त्यांत त्यानें असें ह्मटलें आहे कीं, मधून मधून असे ग्रंथकार निपजतात कीं त्यांना भाषेची स्थितिस्थापकता नडत नाहीं असें दिसतें; कारण त्यांचीं पाळेंमुळें मनुष्यस्वभावांतील ठरीव तत्वाशीं अगदीं भिनून गेलेलीं असतात. इतर डोक्यांतून कांहींहि काढोंत, पण त्यांच्या मनांतून जें उसळ्या मारीत निघतें तें कायतें वाचकांचें मनच जाणतें! हें धोरण लक्षांत आलें

कीं, 'पीड्यन्ते गृहिण: कथं नु तनयाविश्लेषदु:खैर्नवै-'

किंवा 'धन्यास्तदंगरजसा मलिनीभवन्ति'

या कालिदासोक्तींचें व 'अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत्'

किंवा 'अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम्'

या भवभूति–वचनांचें मर्म मनांत भिनतें; व

> " Hang up philosophy,
> unless philosophy can make a juliet ! "

या शेक्सपीरियन गाथेचा दिव्यपणा डोळ्यासमोरून हलत नाहीं!

७. सातवा व अखेरचा प्रश्न हा आहे कीं मनोलेखनाचें साधन साधी कीं अवघड भाषा असते. ज्याअर्थीं मनोलेखन हें कवीच्या सहृदयतेचें उत्तम द्योतक आहे, त्याअर्थीं मनाच्या उकळीप्रमाणें मनोलेखन असतें. मनाची उकळी अति साध्या शब्दांत विकारपूर्ण असते. तद्वत् मनोलेखनाची भाषाहि अति साधी व विकारपूर्ण असते. मिल्टन कवीची नेहमींची भाषासरणी विद्वानासच कळण्यासारखी आहे. पण त्यानें जेथें जेथें मनोलेखनांत बहार उडविलेली आहे, तेथें तेथें त्याची भाषा अति सुलभ आहे. उदाहरणार्थ, ' पॅरेडाइस् लॉस्ट ' मधील सैतानाच्या तोंडचे हें वचन पहा ' awake, arise or be for eve fallen !

महाराष्ट्रकविशिरोमणि मोरोपंत यांची भाषा पण अशीच अवघड आहे. तरी मनोलेखनाचे भरारींत ती किती थकून नरम झालेली आहे पहा. द्रौपदीवस्त्रहरणाचेवेळीं, द्रौपदी कृष्णाचा धांवा करतांना असें ह्मणते—

जीहुनि नसे सुभद्रा तुज बहुमान्या अ—कीर्ति हे तीची
धांव दयाब्धे होते विश्रांत तुझ्या अकीर्ति हेतीची !

तसेंच, कृष्णशिष्टाईंत कृष्ण कुंतीस भेटावयास गेला, त्यावेळीं कुंतीनें आपल्या मुलांविषयीं कुशलप्रश्न कृष्णास विचारला, तो असाच सहज मनोहर भाषेंत आहे—

" प्रभुला ह्मणे " मुकुंदा बा तूंचि कारिसि सुखी सखेदास !
संप्रति आहेत कसे मद्बालक ते तुझे सखे दास !

खुद्द पंत ईश्वरास अळवूं लागले ह्मणजे तर कोठें कोठें साध्या भाषेची कमाल होते !आणखी एक मासला पहा.

" दूर असो, दीन असो, दासाची विठ्ठलास आठवण ।
नामाचि पुरें न अष्टांगीं ध्यातें नमन करुनि आठवण ॥

जरा अवघड भाषेचे भोक्ते कवी रंगांत आले कीं स्वाभाविक साध्या भाषेवर घसरतात, तर जे साध्या भाषेचे निरंतर चाहते असतात, ते रंगांत आले कीं, काय मौज करतात तें पुसायलाच नको! तुकाराम, रामदास, इत्यादिकांचे वेंचे ह्मणूनच भाषेंत ह्मणी होऊन बसले आहेत!

एकंदरींत, मनोलेखन हा किती बिकट व अवश्य विषय आहे; त्याचा इतिहासाशीं किती नाजूक संबंध आहे; त्यास तत्वज्ञान किती तुच्छ लेखितें; त्याचा कवित्वाशीं कसा मेळ आहे; तें सृष्टिलेखनाहून किती श्रेष्ठ आहे, तें किती सहज, साध्या व सोप्या भाषेंत प्रगट केलेलें असतें; या गोष्टींचा येथवर विचार झाला. मजसारख्या अनभ्यस्तानें असल्या गहन विषयास हात घालणें मोठें साहसच आहे, हें अव्वलपासून अखेरपर्यंत मी जाणून आहे. पण कोणी ना कोणी तरी नवीन नवीन विषय हातीं घेऊन त्यांत यथाशक्ति साहस केल्याशिवाय मौज नाहीं. उत्कर्ष व्हावा असें मनांत असलें, तर आमच्यानें काय करवणार असें ह्मणून स्वस्थ बसून उपयोगी नाहीं. कांहीं तरी करण्यास आरंभच केला पाहिजे. कारण, भारवि कवीनें ह्मटलें आहे—

निवसन्ति पराक्रमाश्रया
न विषादेन समं समृद्धयः।

ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापिलेलें प्रकरण.

# वाचा आणि वाटल्यास विचार करा.

धनुर्धारी

यांणीं लिहिलें तें

संपादक ग्रंथमाला

यांणीं

कोल्हापूर येथें

'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिलें.

१८९८.

# वाचा आणि वाटल्यास विचार करा!

१. **सध्याची परिस्थिति**:—अनुभवावरून सध्याच्या परिस्थितीचें एकंदर स्वरूप आढळून येतें व आलें तें येणेंप्रमाणें:—

[ अ ] कारकून, वकील आणि मास्तर, या धंद्यांत दाटी मनस्वी झाली आहे. शाळा, छापखाना आणि कोर्टें यांच्या व्यतिरिक्त कर्तब-गारीला ठिकाण नाहीं, ही समजूत खोटी होय.

[ आ ] देशकाज किंवा लोकसेवा यांचा अर्थ अत्यंत आकुंचित झाला आहे. कारकून, वकील आणि मास्तर इत्यादिकांत चर्चिलेली लोकसेवा एकांगी आहे. देशकाज आणि लोकसेवा, वाणी व लेखणी यांच्या द्वारें साधण्याचा प्रयत्न सर्वत्र दिसतो. याच्यापेक्षां जास्त **कृति** आणि **उदाहरणद्वारा** घडावयास पाहिजे.

[ इ ] स्वजनांच्या उन्नतावस्थेला लोकशिक्षण हें एकच साधन नाहीं.

[ ई ] हल्लीं समाजांत आढळणारे एकंदर दोष व तमाम दुर्व्यसनें यांचें मूळ **दरिद्र** आणि **निरुद्योग** यांतच जास्त आहे.

[ उ ] दरिद्र दूर झाल्याशिवाय किंवा निरुद्योगीपणा कमी केल्या-खेरीज शिक्षणाचें काम धडाक्यानें चालणें मुष्कील आहे.

[ ऊ ] नुसत्या सभांनीं व अर्जांनीं ह्मणजे भीक मागून, राजकीय सुधारणा साधणें कठीण वाटतें.

[ ए ] सामाजिक **अव्यवस्था** व धार्मिक **औदासिन्य** यांचें निर्दा-लन व नागरिक हक्कांचें प्रतिपादन दरिद्री व निरुद्योगी समाजाला साध्य नव्हे.

[ ऐ ] पांढरपेशा मंडळीकडून **वाणी** किंवा **लेखणी** या दोन मार्गांशिवाय अन्य तऱ्हेची सेवा शक्य नाहीं. औद्योगिक प्रयत्नांत पांढरपेशाकडून हरकती येतील, इतक्या इतरांकडून यावयाच्या नाहींत.

[ ओ ] हातून घडत नाहीं, त्या कृत्यांचा नुसता पुरावा करण्या पलीकडे पांढरपेशा मंडळीचें लक्ष नाहीं. पांढरपेशा मंडळीस **विश्वास** चांगला दुरावला आहे.

[ औ ] **सहानुभूति** आणि **शिस्त** कोणत्याही कामांत हवी तर ती पांढरपेशांकडून शक्य नव्हे. स्वतः कळावयाचें नाहीं, दुसऱ्यानें सांगितलेलें ऐकावयाचें नाहीं; आपण करावयाचें नाहीं, लोकांनीं केलेलें पाहूं सकवत नाहीं; स्वतः कामाचा उरक नाहीं, आणि दुसऱ्याच्या धोरणानें वागण्यास नको; पुढार घेण्याची ताकद नाहीं, आणि पुढारी दुसरा खपत नाहीं—झालेला पाहवत नाहीं. इत्यादि परस्परविरोधी परिस्थितींत पांढरपेशा वर्ग सांपडलेला आहे. उपदेशांत पटाईतपणा आहे, त्याच्या एक लक्षांश आचरणांत नाहीं, हें या वर्गाचें मुख्य लक्षण झालें आहे. अनुकरणार्ह अशा प्रत्येक बाबतींचा नुस्ता **कोंडा** या वर्गाच्या हातीं लागला, याच्या पलीकडे कांहीं साधलेलें दिसत नाहीं. ‘ क्रियेवीण वाचालता ’ बरीच आहे.

---

आपल्या प्रांतांतल्या व्यापाराची आजमित्तीला स्थिति पाहूं गेल्यास खालील प्रकार आढळतात.

[ क ] एकंदर निर्गत व्यापार मुंबईच्या हपीसवाल्यांच्या हातीं; त्यामुळें आमच्या व्यापाऱ्यांना इंग्रज व्यापाऱ्यांच्या हाताखालचें केवळ दलाली काम करावें लागतें.

[ ख ] **रास्त व्यापार**—( Legitimate trade ) आमच्या व्यापाऱ्यांच्या हातीं नाहीं, ह्मणून **जुगारी व्यापार** ( Specula-

tive trade ) फार वाढला. ज्या त्या दुकानीं व जो तो व्यापारी थोडा ना बहुत जुगारी व्यापारावरच गुजराण करीत आहे.

[ ग ] तेजी, मंदी ओळखण्याचीं साधनें आमच्या व्यापारी लोकांच्या आंवाक्या बाहेरचें काम झालें; कारण, इंग्रजी राज्यांत हिंदुस्थानच्या पेठेचा संबंध साऱ्या जगाशीं घडून आला आहे. जगाचें भूगोलज्ञान व परखंडांतील पर पेठाची व तेथील घडामोडींची माहिती हवी तशी व तितकी आमच्या व्यापाऱ्यांस नाहीं, व होण्याचें साधन जें त्या ठिकाणची भाषा तें त्यांना नाहीं. मुशाफरी त्या मुलखी करणें शक्य नाहीं, व भिन्न भिन्न राष्ट्रांतील नाण्याचा व चलनाचा परस्परसंबंध आमच्या व्यापाऱ्यांस कळत नाहीं. नाणें व चलन ओळखीचें नाहीं; आवड, रिवाज, पेहराव भाषा कळत नाहीं, अशा ठिकाणचा व्यापार साधणें कठीण आहे.

[ घ ] विलायती हुंडीचा संबंध नाहीं, असा एकही पदार्थ हिंदुस्थानांत पैदा होत नाहीं, किंवा खपत नाहीं. ह्मणजे व्यापारांतील प्रत्येक वस्तूचा संबंध विलायती हुंडीशी येतो, आणि ती तर आमच्या व्यापाऱ्यास कळत नाहीं आणि **विलायती हुंडी** भारी नाचरी ह्मणजे घटके घटकेनें बदलणारी यामुळें, व्यापार अत्यंत अशाश्वत झालेला आहे, इत्यादि कारणांमुळें ‘ जुगारी व्यापार ’ करावा एक किंवा युरोपकर व्यापाऱ्यांचे दलाल व्हावें दुसरें, याशिवाय आमच्या व्यापाऱ्यांस गत्यंतरच नाहींसें झालें आहे.

[ च ] या अशा अशाश्वततेमुळें **अडतीचा धंदाच** करण्याकडे सर्वांची प्रवृत्ति आहे. जो तो अडतीचा व्यापार करूं पाहणार. ह्मणजे बिळाइतांपेक्षां अडते जास्त असा प्रकार झाला आहे.

[ छ ] नाणेवाला माणूस जोखीम पत्करण्यास कबूल नसतो. बिन नाणेवाला वाटेल तें जोखीम पतकरून व्यापार करण्यास पुढें सरसावतो. नाणेवाला व्यापारांतून आपलें अंग काढून घेतो, अडत व्याज हे धंदे

करीत बसणें बरें, ह्मणून समजतो, आणि बिननाणेवाला व्यापारांत मालाच्या खरेदी विक्रींत भक्कम धीर धरत नाहीं, याचा परिणाम अनिष्ट असाच होतो.

[ ज ] व्यापाराचे मुख्य विभाग दोन. अदलाबदल करण्याचा व्यापार आणि पैदासी व्यापार. ह्मणजे माल तयार झाला तर त्याचा प्रसार करणें हा एक व्यापार, आणि प्रसारासाटीं माल तयार करविणें हा एक व्यापाराचा भाग आहे. सध्यांची स्थिति पाहूं गेल्यास सर्वांचा आणि सारखा एकच रोंख ' अदलाबदली ' व्यापाराकडे आहे. माल तयार होऊन आला कीं, त्याचा प्रसार करावा, या एकच धंद्याकडे ज्याची त्याची प्रवृत्ति. शेतकरी आणि कारागीर लोकांकडे मालाची **पैदास** हें काम असतें, आणि त्या तयार झालेल्या मालाचा **खप** हें काम व्यापाऱ्यांचें. ह्मणजे पर्यायें करून पैदास असेल तर **व्यापार**. यास्तव पैदास हें व्यापाऱ्यांचें जीवन; यास्तव तिकडेही त्यांचें लक्ष्य असावयास पाहिजे. दुर्दैवानें **पैदासीचें** काम त्यांच्याकडे. ते व्यापारी लोकांपेक्षां जास्त–अतिशय जास्त दरिद्री आणि अज्ञानी व ' सहाय कोणी नस ' अशांतले, त्यामुळें व्यापाराचें पाऊल पुढें नाहीं, मागें मागें आहे. व्यापार चांगला चालवयाचा तर मालाची पैदास चांगली हवी हें उघड आहे; पण त्या मालाच्या पैदासीकडे कोणीच ढुंकूनसुद्धां पहात नाहीं. व्यापारांत धडपड आणि दाटी आहे, तितकी व तशी मालाच्या पैदासीकडे नाहीं, यामुळें एकंदर व्यापाराचें पाऊल पुढें न पडतां आंत आंत येत आहे.

[ झ ] महाराष्ट्र देशांतला सर्व व्यापार गुजराथी आणि मारवाडी लोकांच्या हातीं आहे. राजकीय सत्ता परक्याच्या हातीं गेली; शिक्षण, संरक्षण, महाराष्ट्रदेशाचें परक्यांच्या हातीं, त्याचप्रमाणें महाराष्ट्रदेशाला व्यापारही परक्यांनींच पतकरिला आहे. इंग्रज उत्तम राज्यकर्ता व तो शहाणा सुधारलेला न्यायी आणि प्रजाहितदक्ष त्या-

मुळें, प्रजेचें नुकसान होत नाहीं. महाराष्ट्रदेशाचा व्यापार पटकाविलेल्या परक्या गुजराथी मारवाड्यांची तशी गोष्ट नाहीं. एकंदर दशाचा बाह्य ह्मणजे जलमार्गाचा निर्गत व्यापार युरोपकरांच्या हातीं; खुष्कीचा व तळखपी व्यापार गुजराथी व मारवाड्यांच्या हातीं, याचा परिणाम फारच वाईट होत आहे. जलमार्गी व निर्गत व्यापाराची, त्याचप्रमाणें खुष्की व स्थानिक खपाच्या व्यापारांची प्रत्यक्ष सूत्रें गुजराथी मारवाडी व्यापाऱ्यांच्या हातीं महाराष्ट्रदेशानें सोंपविलीं किंवा, त्यांनीं पटकाविलीं याचा परिणाम मालाच्या पैदासीवर होतो; पेठेचें नांव बद्दू होऊं नये, असें स्थानिक व स्वकीय व्यापाऱ्यांना वाटेल तसें परक्या व्यापाऱ्याला वाटत नाहीं. आहे त्या धंद्याच्या पैदासीकडे परक्या व्यापाऱ्याचें लक्ष, नवीनाकडे नसावयाचें. किंवा स्थानिक व्यापाराची व उद्योगधंद्याची अभिवृद्धि व्हावी अशी स्वदेशी व्यापारी इच्छा करील किंवा तत्प्रीत्यर्थ झटेल तशी गोष्ट परदेशी व्यापाऱ्याच्या हातून घडावयाची नाहीं. गांवच्या स्थानिक व्यापाऱ्याच्या हातून गुजराथी व मारवाडी व्यापाऱ्याकडे गेलेला धंदा किती लवकर व कसा बुडत चालला याची उदाहरणें पेठोपेठीं आहेत; तेव्हां ही गोष्ट जास्त स्पष्ट करून सांगण्याला नको.

[ ट ] बाहेरप्रांतच्या व्यापारी लोकांचे स्थानिक गोष्टीविषयीं सर्व तऱ्हेनें औदासिन्य आढळून येतें, आणि कळकळीचाही अभाव चांगलासाच असतो.

### हीं मुख्य लक्षणें व्यापारी बाबतींतलीं

---

शेतकी व शेतकरी या संबंधाचा विचार करितां प्रत्यक्ष व अगदीं धडधडीत आढळून येतात ते प्रकार हे.

[ १ ] कायम धारा नाहीं. नक्त व नियमित काळीं सारा हें मोठें संकट आहे. पण त्याचें निवारण सरकार लवकर करील हें शक्य नाहीं.

[ २ ] जंगलकायद्यामुळें सरपणाचें काम शेणावर आलें, व हाडाचा व्यापार परदेशी होऊं लागला, यामुळें खताचा तोटा पडतो.

[ ३ ] वकील व कोर्टांतील कारकून, पोलीस व गांवकामगार आणि फारेस्ट गार्ड हीं गिधाडें जीव जाई असे लचके शेतकऱ्याचे घेतात. ह्मणजे शेतकऱ्यांना लुबाडणारे केवळ हे पेंढारी; पण त्यांचें निवारण करणें सरकारच्या हातचें किंवा त्यांच्या स्वाधीनचें नव्हे.

[ ४ ] सावकार हा भोंगा सारखा शेतकऱ्यांस पोखरीत आहे. त्याला उपाय एकदम कांहीं करितां यावयाचा नाहीं.

[ ५ ] मरतुकडीं जनावरें, रडत राऊत शेतकरी, हजार खर्डे घासावयास लाऊन आणि नाद एकदम न तोडतां कर्ज देण्याच्या आशेवर शेतकऱ्यांस गुंतविणारे सावकार, यामुळें शेतकीची वेळेवर आणि योग्य मशागत होत नाहीं.

[ ६ ] त्रीं त्रियाणें वेळेवर आणि चांगलें व स्वस्त्या दरानें शेतकऱ्यांस कधींच मिळत नसतें.

[ ७ ] कर्ज द्यावयाचें तर आपलें कर्जाऊ दिलेले पैसे परत न येतां, मिळकत हातीं यावी ही सावकाराची इच्छा, आणि कर्ज देतों किंवा नाहीं, हें न सांगतां नादांत गुंतवून भर अडचणीच्या वेळीं वाटेल तसें व्याज व खरेदी, गहाण वगैरे लिहून घेत, शेतकऱ्यांस कर्ज देण्याचा प्रघात, यामुळें कोर्टांतल्या फिर्यादीचें काम मनस्वी वाढलें आहे. पैसे कर्जाऊ ह्मणून घेतले, ते हातीं पडतांच मला जितकें रडऊन आणि घोळून पैसे दिलेस, तितकेंच तुला रडऊन आणि घोळून पैसे परत देईन, अशी आपल्या मनांशीं प्रतिज्ञा करण्याचा शेतकऱ्यांस प्रघात घालून देणारे सावकार होत.

[ ८ ] कुचकें नासकें बाजारांत न विकें असें धान्य दिढी दुपटीच्या बोलीवर शेतकऱ्यांस देणें, किंवा हंगाम सरण्याच्या वेळीं पेरणीला कसलें

तरी बीं दिढी दुपटीनें महाग शेतकऱ्यांच्या पदरीं बांधणें या गोष्टी सावकारांच्या.

[ ९ ] जनावरांस भरपूर अन्न, चांगलीशी त्यांची मशागत आणि सं रन हीं कामें दरिद्रामुळें शेतकऱ्यांस साधतच नाहीं. त्यांत अज्ञाना भर.

[ १० ] जमिनीची वेळेवर मशागत, खताची योग्य योजना, जनावरांचें भक्कम साहाय्य आणि शेतकामांत दक्षता या गोष्टींचा पाठिंबा हल्लीं शेतकऱ्यांस मिळत नाहीं.

[ ११ ] बायसिकल व अन्नें व फारच थोड्या लोकांच्या ग आणि त्या जिनसांचीं दुका या प्रमाणें असणाऱ्या शेतकरी लोक दुकानें कोठें दिसत नाहींत. आउतांचीं जनावरें, आउत वा बियाणें यांच्या खरेदी-विक्रीचे व्यापारी कोठें आहेत, किंवा दुकानें किती? या प्रश्नाला उत्तर मिळणें कठीण आहे.

[ १२ ] उधारी कारभार, म्हणून शेतकी पदार्थांचे व जिनसांचे व्यापारी नाहींत, ही गोष्ट खरी आहे. कंगाल गिऱ्हाइकांशीं धंदा कोणी करूं चाहत नाहीं. ठिकठिकाणीं व लहान सहान प्रमाणांवर थत्रकविण्याचा प्रकार शेतकी सामानाच्या धंद्यांत फार, खेड्यापाड्यापेक्षां शहरांत राहण्याची प्रवृत्ति, मनस्वी व झटपट आणि सारखी खरेदी विक्रीची सतत टांकी सुरूं रहावी शिवाय, सर्व सूत्रें एकट्याच्याच आणि एका हातीं असावी इत्यादि लालसेमुळें शाखायुक्त अनेकांच्या सहाय-समुदायाचा आणि शिस्तवार व्यापार शेतकी सामानाचा होणें अशक्य झालें पाहिजे. याचा स्पष्ट अर्थ असा:—

शेतकऱ्यांकडून घेतलेल्या मालांचा दाम रोख मिळत नाहीं;

कंगाल गिऱ्हाईक माल फार घेत नाहीं.

शेतकी सामानाचें दुकान भलें मोठें असें चालत नसतें. ।
काणीं लहान लहान प्रमाणावर तीं अनेक दुकानें घालावीं त्या
जनावरांची पैदास एके ठिकाणीं करीन ह्मणून साधावयाचें नाहीं;
तेवढें कुरण मिळणें नाहीं तितका सारा मिळावयाचा नाहीं.
सामानांत सवंगाई फार हवी, ती ने आण करण्याच्या
महाग होणार.

चार पांच लहान लहानसे धंदे जागोजाग काढून, त्याचीं सूत्रें
हातीं घ्यावयाचीं अशी तजवीज शेतकी सामानाच्या व्य
उप[illegible] साधावयाचीं ह्मणजे बहुतांना श्रमविभाग हवा. त्याला
[illegible] गोष्टी सध्यांच्या व्याप
[ ९ ] मरतुकडीं जनावरें, रडत राऊत शेत[illegible]
याम लाऊन आणि नाद एकदम न तोडतां क[illegible]
[ ] [illegible]विणारे सावकार, यामुळें शेतकीची [illegible] इत्यादि कामें करव[illegible]
अवश्य तें भांडवल [illegible] कामें व्यवस्थित आणि कमी [illegible]
करणारे कंत्राटदार मिळत नाहींत, थोडथोडे हप्त्यानें वसूल घेत
देणारे सावकार नाहींत, गहाण, खरेदी वगैरे लडथडीमुळें शक्य न

[ १४ ] " तूं जीवंत रहा व इतरांस जगीव " " Live a
let live " हें खरें सावकारीचें तत्व आमच्या धनिकांस ठाऊक नस
" इतरांस ठार कर आणि तूं जग " हें त्यांच्या पांचवीला पुजलेलें तत
गरिबांस लुबाड व श्रीमंत व अधिकाऱ्यांपुढें गोंडा घोळ हा त्यांचा बाण
कमाविलेला पैसा, घरांत दागिने आणि लग्न व इतर समारंभाच्यावेळ
खर्चावयाचा ही त्यांची कुलपरंपरा. इत्यादि कारणांमुळें धंद्याला **जग**
**विणें**, उठविणें किंवा **उजागरीस** आणणें, आमच्यांतील धनिकांस
साधत नाहीं.

[ १९ ] कमी व्याजानें सरकार तगाई देते; तेव्हां त्या दानाच्य
प्रसंगीं शुक्राचार्य मध्यें येतात त्यांचें निवारण करून १ आउतें, २ आउ

[ ८ ] सरकार निराकार व निर्विकल्प आणि निराधार आहे. त्यांचे जबाबदार कामदार " तांबड्या फीतीनें " जखडलेले व प्रजेपासून अत्यंत अलग व कागदावरील कामाच्या डोळेझांपेच्या तंत्रानें चालणार व स्थानिक प्रेमा उत्पन्न न होई अशा वर्गावर्गीच्या भोंवऱ्यांतले. प्रजेच्या कल्याणाखातर खर्च करावयास जवळ पैसा नसलेले असें सरकार आहे.

[ ९ ] लोकांच्या पैशावर विद्वान् झालेले लोक देशकाजाचा कोंडा कांडत उभे आहेत.

[ १० ] सावकाराच्या व वकीलाच्या मतलबी निंदेमुळें शेतकरी आणि कारागीर यांच्या लुच्चेपणाच्या खोट्या कल्पनांनीं व्याप्त, ह्मणून उदासीन अशी भाबडी मंडळी पुष्कळ. शेतकरी ह्मणजे कपटी, दगेखोर, लुच्चा, कृतघ्न इत्यादि अधम गुणांचा पुतळा अशी समजूत आढळते. सावकार लोकांनीं शेतकऱ्यांची लूट चालविली तिकडे कोणाचें लक्ष जाऊं नये, अर्थात् आपण आरंभिलेल्या धंद्यांत जास्त लोकांनीं येऊं नये, शेतकऱ्यांची कींव आली तर बरें नव्हे, अशा अनेक हेतूनें सावकार व शेतकऱ्यांशीं व्यवहार ठेवणारे शेतकऱ्यांचें नांव अगदीं विनाकारण बद्दू करीत असतात आणि आपली कृति कोणाच्या नजरेस येऊं देत नाहींत हें, अगदीं बारीक शोध केल्यावांचून कळणार नाहीं. तोच प्रकार साळी, कोष्टी, तेली यांचा आहे. **वस्तुविपर्यास व सत्यगोपन हें एक कसबच** होऊन बसलें आहे.

[ ११ ] आणि देशकाज व लोकसेवा हे सध्या चालूं असलेले प्रयत्न झाडाच्या मुळाला पाणी न घालतां फांद्यावर पाणी शिंपण्यासारख्या तऱ्हेनें चालले आहेत; किंवा दुखत आहे कपाळ आणि औषध मिळतें व चिकित्सा होते पोटदुखीची, असा प्रकार चालला आहे.

[ १२ ] लहान खेड्यापासून तों तहत मुंबईच्या पेढीपर्यंत सर्व व्यापार एका विवक्षित जातीच्या–गुजराथी किंवा मारवाडी–लोकांकडे आहे व ती व्यापारी जात कडवी, जातलोभी, ह्मणजे स्वजातीयांकडे मनस्वी

ओढा असलेली. यामुळें स्थानिक अशा नव्या व्यापाऱ्यांस मध्येंच शिरतां येत नाहीं. मुंबईस पेढी काढिली तर बाहेर गांवीं बिछाईत मिळण्याला अडचण, बाहेर गांवीं धंदा केला तर मुंबईचा अडत्या स्वकीयासारखा मिळण्याची मारामारी. धंद्यांत जातिभेद, धर्मभेद, भाषाभेद यांना वाव मिळत नसतो व मुंबईच्या गुजराथी पेढ्याचे बिछाइत स्थानिक व्यापारी असतात अशीं उदाहरणें आहेत. पण गुजराथी बिछाईत व गुजराथी अडत्या यांतलाच सलोखा गुजराथी अडत्या व लिंगाइत बिछाईत यांत नसतो, ह्मणजे सारांश खेड्यांपासून मुंबईपर्यंत गुजराथी किंवा मारवाडी व्यापाऱ्यांची जी एक साखळी लागलेली आहे त्यांत मध्येंच दुवा अन्य जातीयांचा बसण्याला अशक्यता नसली, तरी सायासता आहे.

[ १३ ] धंदा प्रारंभ करावयाचा त्याचा अगदीं अल्पारंभ असेल तरच त्या धंद्यांत फत्ते मिळण्याचा जास्त संभव आहे. पोक्त व सर्व तऱ्हेचा अनुभव अल्पारंभांत मिळतो, तसा एकदम मध्येंच शिरण्यांत मिळत नाहीं. मोठे यशस्वी व महान् असे सर्व व्यापारी अगदीं लहान प्रमाणांवर अल्पारंभ करणारेच होते. मोठ्या प्रमाणावरील धंदा आवरतां येत नाहीं, व त्यांतून सुटका होण्याला अडचणी फार. मुरत मुरत मुरलेला धंदा पक्का पायांवर असतो. लहानशा वावटळीनें तो हालत नाहीं.

[ १४ ] विलायती हुंडणावळीचा नाचरेपणा आणि व्यापार या नांवाच्या धंद्यांतील एककल्ली मनस्वी दाटी यांच्या वाटेस न जातां येईल तितकें बरें, आणि दाटी बिलकुल नाहीं, अशा मार्गानें रस्ता सांपडेल, तर धुंडाळावा हें इष्ट आहे.

[ १५ ] सध्याच्या काळांत केवळ दरिद्रातिशयतेमुळें **पत** अत्यंत अव्यवस्थित झालेली आहे. **विश्वास** कोठेंच ठरत नाहीं. आणि प्रस्तुतच्या परिस्थितींत सामाईक भांडवलाच्या मंडळ्या अजस्र असें काम